पुस्तकपरीक्षणे

चं. प्र. देशपांडे

' बिढार '

१.

भालचंद्र नेमाडे यांना साहित्य क्षेत्रातले, शिक्षणक्षेत्रातले वगैरे स्वत:चे अनुभव सांगायचे होते. अनुभवांच्या अशा जंत्रीनेही या क्षेत्रांवर आणि पर्यायाने सध्याच्या एकूण जीवनावर -- दिशाहीन हरवले जाण्यावर, गुणवत्तेचे महत्त्व न राहण्यावर आणि बुजबुजलेल्या आपमतलबीपणावर -- प्रकाश टाकता गेला असता. परंतु नेमाडे यांना असा सविस्तर आढावा घेणारे लेखन करावेसे वाटले नाही. किंवा स्वत:तल्या विचारवंतापेक्षा स्वत:तला कलावंत त्यांना अधिक महत्त्वाचा वाटत असल्यामुळे विचाराला कलेत सामावून घेण्याचे त्यांनी ठरवले असावे. याचा एक फायदा त्यांना होणार होता, तो असा की, कोणकोणत्या व्यक्ती, संस्था आणि अनुभव यांवर नेमाडे लिहीत आहेत ते वाचकांना समजणार होते आणि त्या त्या गोष्टींच्या, नेमाड्यांच्या बुद्धीच्या आवाक्यापलिकडे राहिलेल्या बाजू कुणी सांगायचे ठरवले तर, 'अहो, ही कादंबरी आहे, आत्मचरित्र नव्हे ; या सगळया गोष्टी एका सर्जनशील कलाकृतीचे भाग म्हणून पाहा ' -- असे म्हणण्याची उदात्त सोयही उपलब्ध होणार होती. म्हणजे इतरांच्या बेजबाबदारपणाबद्दल सात्त्विक उमाळयाने लिहिणाऱ्या भालचंद्र नेमाड्यांनी स्वत: जरी काही बेजबाबदारपणे लिहिले तरी वाचकांनी, ' ही कादंबरी आहे ' असे म्हणून गप्प बसावे अशी रास्त अपेक्षा ठेवणे त्यामुळे शक्य होणार होते. म्हणून ' बिढार '.

त्यातही कादंबरीचा नायक ' चांगदेव पाटील ' म्हणजे स्वत: भालचंद्र नेमाडेच का, अशी शंका निर्माण करण्यासाठी स्वत:चा एक अनुभव ' सारंग ' हे पात्र तयार करून त्यांनी सांगितला आहे.

परंतु इतके करूनही एक कलात्मक प्रश्न नेमाड्यांना खातच राहिला : ही नुसती अनुभवांची आणि ताशेऱ्यांची जंत्री, कादंबरी म्हणून वाचण्यात काय प्रयोजन राहणार ? या सर्व गोष्टींना स्पर्श करणारा एक कलात्मक तडाखा सुरुवातीलाच मारला नाही तर हे एक रटाळ चोपडे तयार होणार. जातीयता, लाचखोरी, स्वार्थीपणा, तडजोडी -- या नेहमी लिहिल्या--चर्चिल्या जाणाऱ्याच गोष्टी आपण लिहिणार आहोत. यात आपल्या अभिव्यक्तीतील हुशारीखेरीज आणखी नवीन विशेष काय राहणार ?

हा प्रश्न सोडवण्याचा मार्गही नेमाड्यांना सापडला. कादंबरीच्या सुरुवातीलाच त्यांनी चांगदेव पाटीलला (कादंबरीच्या नायकाला) एक भयानक आजारा लावला -- मरणाच्या टोकापर्यंत नेणारा आजार. त्यातून त्याला हळूहळू सोडवून नंतर या गर्दीतून फिरवायचे म्हणजे या गर्दीला सततचे जाणवणारे असे एक कलात्मक परिमाण राहील अशी योजना ठरवली.

चांगदेवचे आजारपण सुचणे ही या कादंबरीच्या कलात्मक प्रश्नांची सोडवणूक होती. गंमत अशी की, इतर सगळे तपशील अधिकाधिक जवळून आणि बिनदिक्कतपणे देणारे नेमाडे या आजाराचे तपशील मात्र सांगत नाहीत. आजाराचे नाव, लक्षणे, ट्रीटमेंट यांतल्या महत्त्वाच्या सगळया गोष्टी अंधारात ठेवतात. आजाराचे तपशील न सांगण्यात काही कलात्मक हेतू साध्य होतात ही सबब सांगता येण्यासारखी नाही. इतक्या जीव तोडून लिहिलेल्या सुरुवातीच्या भागात अशा एखाद्या आजाराबद्दलची माहिती जमवण्याच्या बाबतीतला नेमाड्यांचा आळशीपणा उघडा पडावा ही या कादंबरीच्या अपयशाची सुरुवातच. कारण अर्थात उघडच आहे. बाकी कादंबरी खरी (?)असली तरी हा आजार खोटाच आहे. लेखकाने वाचकांसाठी तयार केलेला हा एक सापळा आहे. (पुढे ते, आपण असा एक सापळा तयार केला होता, हेही विसरून जातात ही गोष्ट वेगळी.)

२.

साडेतीनशे पृष्ठांच्या या कादंबरीची पहिली जवळजवळ नव्वद-ब्याण्णव पृष्ठे या आजाराच्या अस्तित्वाने व्यापलेली आहेत. आणि आश्चर्य म्हणजे आजाराचा हा भाग या कादंबरीचा अंगभूत भाग नसूनही, आणि एक क्लृप्ती म्हणून नेमाडे हा भाग लिहित असूनही हाच भाग उत्कृष्ट लिहिला गेला आहे. कारण या भागात, उद्वेग, चडफड यांना विशेष स्थान नाही. नेमाड्यांना हा भाग खूपच जाणीवपूर्वक लिहावा लागला आहे आणि लेखक म्हणून असलेल्या सर्व शक्ती एकवटून ते हा भाग लिहू शकलेले आहेत. चांगदेवची मन:स्थिती, तगड्या-निरोगी बालपणाची पार्श्वभूमी, नातेवाईक, मित्र, डॉक्टरांशी असहकार्य आणि जगण्याच्या इच्छेपासूनही अलग होण्याची एकूणच प्रक्रिया नेमाडे फार समर्थपणे हाताळू शकलेले आहेत. परंतू मुळातच नेमाड्यांना या भागाचे महत्त्व कळलेले नसल्याने, चांगदेव आजारातून बरा होताच त्याला ते आपल्या ताब्यात घेतात आणि इतक्या कडेलोटाच्या अवस्थेपर्यंत गेलेला हा माणूस पुढे कादंबरीभर नेमाडपंथी रोजनिशीचे आयुष्यच जगताना दिसतो. दुर्दैवाने नेमाडे यांना लेखक म्हणून या रोजनिशीचेच अप्रूप असल्याचे दिसून येते. आजारपणातल्या चांगदेवच्या प्रचंड जाणिवा अडगळीत टाकल्या जातात आणि गुणवत्ता-गंडाने, प्रामाणिकपणा-गंडाने आणि हुशारीने युक्त एवढाच चांगदेव उरतो.

लेखकाने एक कलात्मक युक्ती म्हणून काही भाग लिहावा आणि ती युक्ती त्याच्यावरच उलटून तोच भाग महत्त्वाचा ठरावा आणि पुढचा खास म्हणून लिहिलेला भाग फिका पडावा -- ही एक विचित्र घटना ' विढार ' मध्ये घडलेली आहे.

३.

यानंतर आता अर्थातच कादंबरीच्या पुढच्या भागाचा विचार करायचा आहे. यात लक्षात घेण्यासारखी पहिली महत्त्वाची गोष्ट ही की नेमाडे यांची सहानुभूती, न्यायभूमिका ही नेहमी चांगदेवबरोबरच राहते आहे. ' आपल्या अपूर्ण-अर्धवट पध्दतींनी एका अनुभवजंजाळातून बरेवाईट परिणाम भोगत जाणारे व्यक्तिमत्व संपूर्णपणे उघडे पाडत जावे ' असा कलात्मक शक्तीचा अलिप्तपणा नेमाडे बाळगू शकलेले नाहीत. कारण तसा त्यांचा उद्देशच नाही. चांगदेवबरोबरच अत्यंत चेवपूर्ण रीतीने भालचंद्र नेमाडेही वावरताना जाणवतात. इतकेच नाही, तर चांगदेवच्या मुखवट्याआडून ते स्वत:च्या प्रतिक्रिया नोंदण्यात रस घेत आहेत असे जाणवत राहते. पूर्वी कधीतरी या गोष्टी नेमाड्यांच्या स्वत:च्या आयुष्यात घडून गेलेल्या असाव्यात आणि त्या वेळचे संताप, चीड, उद्वेग, चडफड हे त्यांच्या मनात अजूनही ताजे असावेत -- त्याचे त्यांना फार महत्त्व वाटत असावे -- व म्हणूनच ते सर्व सामावून घेण्यासाठी ही कादंबरी लिहिण्याचा उद्योग त्यांनी केलेला असावा असे जाणवत राहते. कादंबरीचा मूळ उद्देश असा थिल्लर असल्याने अनुभवाचे विस्तृत क्षेत्र आणि चमकदार हुशारी यांचा भरपूर प्रत्यय येऊनही वाङ्मयीन महात्मतेच्या पातळीला ही कादंबरी पोचत नाही. नुसत्या बटबटीतच नव्हे, तर काही वेळा बेजबाबदार मतप्रदर्शनाच्या पातळीवर हे लिखाण राहते. या कादंबरीत मेलेला राजा म्हणजे ' चांगदेव ' असून 'इंद्रदत्त' म्हणजे स्वत: नेमाडे आहेत. (सुरुवातीचा हुशार संदर्भ पाहावा. त्या संदर्भाचे हे असे होऊन बसावे हे या कादंबरीचे मोठे अपयश आहे.)

४.

बेजबाबदार मतप्रदर्शनाचे एक उदाहरण म्हणून या कादंबरीतले ' रत्नागिरीकर ' हे पात्र पाहण्यासारखे आहे. हे पात्र म्हणजे (कै.) चिं.त्र्यं.खानोलकर यांचे कादंबरीतील रूप आहे असे अनेक तपशीलांमुळे जाणवते. हे सर्व तपशील हुबेहूब घेण्यात, ही गोष्ट निश्चितपणे वाचकांच्या लक्षात यावी, हाच उद्देश आहे. कोकणातली खानावळ बंद करून खानोलकर मुंबईल आले होते. त्यांचे साहित्य वाचकांपुढे ठेवण्यात ' मौज प्रकाशन गृह ' या विशिष्ट प्रकाशन संस्थेचाच महत्त्वाचा वाटा आहे. ' सत्यकथेचा कंपू ' जो म्हणतात, त्यातल्या अनेक लेखक-टीकाकारांनी खानोलकरांना डोक्यावर घेतलेले आहे. (दुसऱ्याही अनेकांनी त्यांना प्रतिभावान लेखक मानलेले आहे. नेमाडे म्हणतील की, हा त्या बुवाबाजीचाच

परिणाम आहे. परंतु असल्या शब्दाशब्दीतून काय निष्पन्न होणार ?) हे सर्व तपशील नावे बदलून वा वगळून जसेच्या तसे या कादंबरीत ' रत्नागिरीकर ' या लेखक - पात्राविषयी वापरण्यात आलेले आहेत.

चिं.त्र्यं.खानोलकर हे आपल्या लेखनाच्या नादामुळे युनिव्हर्सिटीतल्या त्यांच्या नोकरीच्या कामाबद्दल बेफिकीर राहत होते का,हे मला माहीत नाही. तरी हे खरे आहे असे मानून नेमाड्यांची त्या बाबतीतली चीड एक वेळ समजून घेता येईल ; परंतु विशिष्ट प्रकाशकांनी आणि टीकाकारांनी विनाकारण चढवत नेलेला लेखक अशा प्रकारे जी रत्नागिरीकरची मांडणी केली गेली आहे, ती निश्चितच आक्षेपार्ह आहे. त्यात पुन्हा ही ' कादंबरी ' असल्याने केवळ दोनचार ताशेरे मारून नेमाडे पुढे जाणार.

जर कादंबरीत व्यक्त झालेली ' रत्नागिरीकर ' या लेखकाची वासलात नेमाडे यांचे खानोलकरांच्या साहित्याबद्दलचे मत व्यक्त करीत नसेल, तर मग खानोलकरांबद्दलचे तपशील वापरायचा उद्देश काय ? (खानोलकरांचे साहित्य हे नुसते 'हुशार' साहित्य नाही, हे इथे जाताजाता नमूद करणे आवश्यक आहे. खानोलकरांचे साहित्य निकृष्ट का आहे, हे सांगण्याचा नेमाड्यांनी प्रयत्न करून पाहिला तर जरा बरे होईल !)

वर दिलेल्या उदाहरणा सारखे ' प्रामाणिक' मतप्रदर्शन या कादंबरीत जागोजाग विखुरलेले आहे.

५.

चांगदेव स्वत: आयुष्यात अनेक तडजोडी करताना दिसतो. आपल्याला सुखकारक ठरलेल्या माणसांबद्दल अनुकूल आणि सहानूभूतीने बोलणे, त्रासदायक ठरणाऱ्या माणसांबद्दल चीड-उव्देग व्यक्त करणे, आणि आपल्या सुखदु:खांवर सरळ परिणाम न करणाऱ्या माणसांबद्दल आपमतलबी तटस्थपणा बाळगणे, अशा व्यावहारिक मर्यादेतच चांगदेवची हुशारी फिरते. परंतु स्वत:च्या आयुष्यात एवढीच समज पुरेशी मानणारा चांगदेव, दुसरीही माणसे आपापल्या हुशारीचा आपापल्या आयुष्यात अशाच प्रकारे उपयोग करीत असतील हे लक्षात घेत नाही. मानवी आयुष्याचे जडजंबाल प्रश्न तयार होणे आणि आयुष्य नासत राहण्याची अव्याहत प्रक्रिया चालू राहणे याची कारणे त्याला बाह्य परिस्थितीतच दिसत राहतात. आणि या परिस्थितीला आपल्याखेरीज इतर माणसेच जबाबदार आहेत अशा भ्रमात राहणेच तो पसंत करतो. एखाद्या उत्साही सामाजिक किंवा राजकीय कार्यकर्त्याला अशी आयुष्याची एखादी भ्रामक समज पुरेशी वाटते, तशीच ती चांगदेवालाही (आणि पर्यायाने नेमाड्यांनाही) पुरेशी वाटते. एवढ्या सामग्रीवर चांगली कलाकृती निर्माण होऊ शकत नाही. कलावंताकडून याहून खूपच खोल अशी मानवी प्रश्नांची जाण आणि परिस्थिती-बदलाच्या प्रचारापेक्षा खूपच व्यापक अवधानाची अपेक्षा असते. मूळ प्रश्नांना प्रथम स्वत: सामोरे जाण्याची शक्ती कलावंतात असावी लागते.

जी.ए..कुलकर्णी किंवा चिं.त्र्यं.खानोलकर यांच्या साहित्यात या शक्तीचा अनेकदा प्रत्यय येतो. भालचंद्र नेमाडे यांचे लिखाण भरपूर बौध्दिक चमक असूनही उथळ वाटते, ते या शक्तीच्या अभावामुळेच.

६.

आता चांगदेवची व्यक्तिविशिष्ट हुशारी म्हणजे काय ते पाहू. त्याच्या प्रासंगिक हुशारीबद्दल बरेच सविस्तर लिहावे लागेल. परंतु सध्या जाताजाता सापडणारी उदाहरणे घेऊ.

चांगदेव प्रथम जेव्हा मुंबईबाहेर एका गावात कॉलेजात प्राध्यापकाची नोकरी पत्करतो तेव्हा नव्या गावात आल्यावर त्याला काही त्रास होतो. शिवाय या गावात इडली-सांबारही मिळत नाही, तेव्हा जिथे इडली-सांबार मिळत नाही ते कसले गाव ! -- असा ताशेरा चांगदेव मारतो. समजा, या गावाचा चांगदेवाला इतर काही त्रास झाला नसता तर तो म्हणाला असता, ' च्यायला, या गावात इडली-सांबार मिळत नसूनही हे गाव इतकं चांगलं कसं !' समजा, गावाचा त्रास आहे पण इडली-सांबारही उपलब्ध आहे तर,' च्यायला, इथं इडली-सांबार मिळत असूनसुध्दा गाव इतकं भिकारचोट कसं !' किंवा गावही चांगले वाटले तर,' इथं इडली-सांबार मिळतं म्हणूनच हे गाव चांगलं झालेलं आहे !'-- इडली-सांबारची शहरी चटक व्यक्त करण्यातली ही चमक मजेदार वाटते इतकेच ; परंतु यातही सर्व गोष्टींचा स्वकेंद्रित पद्धतीनेच विचार करण्याची वृत्ती उघडी पडते हेही आहेच. मरणाचे टोक बघून आलेला चांगदेव ही असली हुशारी दाखवत राहतो यात चांगदेवच्या आजार प्रकरणाला नेमाडे काय किंमत देतात हे दिसून येते.

पुढे एकदा एकाकीपणाने पछाडलेल्या चांगदेवला सिने-संगीताचे माहात्म्य प्रकर्षाने जाणवते. 'आपण जर बालगंधर्वांच्या जमान्यात जन्मलो असतो तर कठीणच झालं असतं ' (पृष्ठ २९१) असे एक वाक्य तो इथे टाकतो. परंतु एकाकीपणा बुडवण्याच्या बाह्य साधनांमध्ये --सिनेसंगीत, दारू, नाटक, धर्म, बाई, बौद्धिक हुशारी यांबरोबरच नाट्यसंगीतही येऊ शकते हे त्याच्या लक्षात येत नाही. आणि एकदा एकाकीपणा बुडवायचा ठरवल्यावर कोणत्या ना कोणत्या उपलब्ध बाह्य गोष्टींचा उपयोग करायचा मनुष्य यशस्वी वा अयशस्वी प्रयत्न करतोच. तेव्हा अशा वाक्यांचा चटकदारपणा मान्य केला, तरी हा एक अत्यंत स्वकेंद्रित, सामान्य आयुष्य जगणारा माणूस आहे हेही त्यातून व्यक्त होते.

(या चमकदारपणाच्या तुलनेने अधिक बरी अशी चमकही काही ठिकाणी दिसते. उदाहरणार्थ : ' चितळे हा काबूलकंदाहारपर्यंत हिंदुस्थानची सरहद्द मानणारा प्रत्यक्ष माणूस आहे, तो किरकोळ एकदीड लाख हडप करील हा विचारच खुळेपणाचा होता.' (पृष्ठ २६) 'त्यामुळे फालतू विषय आपोआपच टिंगलवजा होऊन जायचे. दमदार विषयच

टिकायचे. उदाहरणार्थ, एकदा कोणीतरी बेळगावचा प्रश्न काढला तर सगळे जण मिळून त्याला हसले. नंतर तो येणंच बंद झाला.‘

(पृष्ठ २९)

७

काही वेळा गंभीर हुशारीही करताना चांगदेव दिसतो. अशा ठिकाणी त्याची हुशारी अर्करूपात सापडते. उदाहरणार्थ, पारू सावनूरच्या प्रेमप्रकरणात चांगदेवच्या डोक्यातले विचार :

‘ आज मी एक निरोगी नॉर्मल नोकरी करणारा तरुण आहे. सगळया किरकोळ गोष्टी झुगारून द्यायला समर्थ आहे. म्हणून हे सगळे खेळ आहेत. आज जर मी तसा रोगानं पछाडलेला सडका मनुष्य असतो तर हीच मुलगी माझ्याजवळ तरी आली असती का ? सगळंच व्यवहारी पातळीवरून पाहायचं तर सगळयाच गोष्टींचे अर्थ बदलतात. मला सगळयांनीच कुत्र्यासारखं बाहेर हाकललं असतं.‘

’’ हे सगळं वरवरचं आहे. खोटं आहे. नीटपणाचे सगळे दोस्त असतात. खरं कोणी कोणावर प्रेम करत नाही. प्रेम म्हणजे छबीछबीपुरतंच.’’

‘ आणि मग रात्री त्याला स्वत:च्या अस्तित्वाचं खरं स्वरूप कळलं. ते तर जपलंच पाह्यजे. त्याला दगा देता उपयोगी नाही. त्याच्या आधारावरच मी इतकं बेभामपणे ह्या जगण्याच्या समुद्रात झोकावून घेतलं आहे. हे जग काही माझ्याइतकंसुध्दा सुसंस्कृत उदात्त नाही. सगळीकडे हिंस्रतेच्या कायद्यावर नीतिनियम पाळणं चाललं आहे. डॅम्न, बिनधोक माझ्या कवेत येणाऱ्या पोरीलाच मी आपलं म्हणेन. अशी मुलगी कदाचित कुठे असेलही, पण मग व्यवहार दुसरे सांभाळतात तर आपणही सांभाळावा. व्यवहाराचा बुरखा फाडला पाह्यजे. पाह्यजे तर सगळंच निकोप, निर्मळ, नाहीतर काहीही नको.’’

‘ कदाचित या सगळया गोष्टींचं तंत्र आपल्याला कळत नसेल. पण मी आहे हा असा आहे. मी माझ्या असण्यावरच निर्णय घेणार सगळया गोष्टींचा. खरं म्हणजे आजच ही विद्वत्ता सुचली ती आधी सुचायला हवी होती. आज सुचली हे चुकीच्या कारणावरून. पण एरवी हे सगळं सुचायला काहीच हरकत नव्हती.’’

' अशी एका आध्यात्मिक रात्रीत राक्षसी भोवऱ्यात ह्या गोड प्रकरणाची हवा होऊन गेली.'

-- हे अक्षरश: भयानक आहे. जगातल्या सर्व खुनशी, हिंसक आणि कर्मठ प्रवृत्तींचे सार याहून वेगळे निघणार नाही. आत्मकीव, आत्मगौरव, न्यूनगंड, अहंगंड -- यांचे हे भयानक मिश्रण आहे. आयुष्य समजून घेण्यात बुध्दी आणि भावना यांवर अवलंबून राहण्याच्या स्वप्नरंजनात्मकतेचा हा अटळ शेवट आहे. चांगदेव हा पारू सावनूरची ' निवड ' करणार, पण तिने मात्र याची ' निवड ' करायची नाही हा तर्क अजब आहे ! (चांगदेव हा फक्त एक सुशिक्षित, बुध्दिमान असा वेगळया क्षेत्रातला सखाराम बाइंडर आहे !)

तांत्रिक नवेपणा, भाषेचा सडेतोडपणा, अनुभवाची विस्तृतता आणि हुशारी यांची कौतुके बाजूला ठेवून, भालचंद्र नेमाडे हे विधातक प्रवृत्तींचा प्रचार करणारे, वेडेपणाच्या दिशेने जाणारे भयानक खुनशी लेखन करीत आहेत हेही रोखठोकपणे पाहणे जरूरीचे आहे. ज्या विघातक गोष्टी उघड्या पाडण्यासाठी नेमाडे लेखन करीत आहेत त्यांच्याहून कितीतरी पटींनी अधिक विघातक कार्य ते स्वत: करीत आहेत. दुसऱ्याचे ढोंग उघडे पाडणाऱ्याच्या त्याहून ' प्रामाणिक ' ढोंगीपणाचा हा सगळा प्रकार आहे.

म्हणूनच वाचकांना चटकदार-चमकदार-मजेदार वाटणाऱ्या ' बिढार ' चे अंतरंग फसलेले आहे -- नुसते फसलेले नव्हे -- प्रचंड फसलेले आहे. किंचाळणारे, आक्रस्ताळे कलावंत महत्त्वाच्या कलाकृती निर्माण करू शकत नाहीत, हे प्रकर्षाने जाणवून देणारी कादंबरी भालचंद्र नेमाडे यांनी लिहिलेली आहे. ' बिढार ' चे हे महत्त्व मान्यच करावे लागेल.

८.

ता.क. मराठी टीकाकारांना ' अस्तित्ववाद' हा शब्द कुठून सापडला असे अलीकडे होऊन गेले आहे. ऊठसूट कुठल्याही कलाकृतीला वा लेखकाला ' अस्तित्ववादी ' म्हणण्याची फॅशनच पडत चालली आहे. त्यातही मुळात ' अस्तित्ववाद ' म्हणजेच काय याबद्दल खूप गैरसमज आहेत. ' अस्तित्ववादी ' तत्त्वज्ञानासाठी प्रसिद्ध असलेल्या लेखकांची काही संदर्भबाह्य वाक्ये त्यांच्या अर्धवट समजुतीतून लक्षात ठेवून त्यावरून ' अस्तित्ववादा ' ची कल्पना तयार केली जाते असे दिसून येते.(उदाहरणार्थ, ' मॅन ईज कंडेम्न्ड टू सफर ' किंवा 'हेल ईज अदर पीपल' वगैरे.) 'बिढार' लाही ' अस्तित्ववादी ' कादंबरी म्हणण्याचा प्रयत्न काही टीकाकार करतात.

’मी आहे हा असा आहे, माझ्या असण्यातूनच मी माझे निर्णय घेणार ’ अशा प्रकारे ’ बिढार ’ चा चांगदेवही बोलतो आणि शिवसेनेचे बाळ ठाकरेही बोलतात. तेवढ्याने दोघेही अस्तित्ववादी झाले काय ? तसे असेल तर यच्चयावत सगळी मानवजातच अस्तित्ववादी आहे, असे म्हणायला काही हरकत नसावी. की ’ अस्तित्ववाद ’ म्हणजे दुसरेच काही आहे ?

(सत्यकथा, फेब्रुवारी १९७९).

--- 000 ---

कै.अनिल बांदेकर यांचा कवितासंग्रह

(ऋचा प्रकाशन, ठाणे ; कि.१० रु.)

’ ऋचा ’ ने हा कवितासंग्रह काढल्याबद्दल प्रथम आनंद ! सुट्या प्रसिध्द होणाऱ्या कवितांकडे कुणी लक्ष देऊ नये, कवितासंग्रह फारसे कुणी काढू नयेत, काढले तर दहा-दहा, वीस-वीस वर्षे कविता लिहून झाल्यावर काढावे -- अशा या परिस्थितीत कै.अनिल बांदेकर यांच्या कवितांची ’ संग्रह ’ रूपात नोंद झाली हे महत्त्वाचे.

परंतु एवढे सगळे झाल्यावर अर्पण पत्रिकेचा प्रश्न आला असावा.कै. बांदेकर तर नाहीत, मग अर्पणपत्रिकेचे काय ? तर यावर प्रकाशकांनी ’ तुझं तुलाच --’ असे लिहून एक पोरकट मार्ग काढला आहे ! संग्रहाचे मुखपृष्ठ, कागद, छपाई उत्तम आहे. कवितांचे संपादन सौ.वासंती मुजुमदार यांनी केलेले आहे. निवड वगैरे ठोक असेलच. कारण यातल्या काही कविता या कविता म्हणून फारशा चांगल्या नसल्या, तरी त्या कवीचे काही विशेष दाखवणाऱ्या आहेत. कदाचित हाही विचार असेल. उदाहरणार्थ : --

पूजा

एक उंदीर येतो कधी
दिवेलागणीची वेळ काढून
देवघरात बिळातून
पाडून हवे तितके देव
विठोबासुध्दा

नेतो अन्
पिंडीच्या टाळूवरचे तांदूळ
दोनचार रेशनचे -- बिनबोभाट.
मी करीत बसतो कल्पना
बिळात तो कसा दिसत असेल
बिळातून मी कसा दिसत असेन
बीळ आतून कसं दिसत असेल
पूजा सोडून
एकाग्र....

उंदराने देव पाडणे आणि पूजा करणाऱ्याने पूजेत एकाग्र होण्याऐवजी एकाग्रपणे बिळाबद्दल विचार करणे हे अगदीच बालिश आणि किरकोळ उपरोधाचे प्रकार आहेत. आता बिळाबद्दलच्या विचारात एक किरकोळ सेन्स ऑफ वंडर आहे असेही म्हणता येईल. पण या कवितेत 'कविता' फारच कमी असून वि.म.कुलकर्णी - छाप कविता लिहिण्याची हौसच जास्त दिसून येते.

थोड्याफार प्रमाणात ही हौस इतरत्रही जाणवते. या कवीचे एक वैशिष्ट्य म्हणजे, एका बाजूला पूजा, देव, भूत, आत्मा,पितर, ओंकार, वगैरे सगळे असते तसे आहे ; आणि दुसऱ्या बाजूला चांद्रयान, आईन्स्टाईन, संगिनी, वगैरेंबरोबर --.

तर एकूण आपला जन्म झालाय
दिशाहीन स्वप्नाचा जन्म झालाय
एकाकी

असेही सगळे असते । म्हणजे एका बाजूने परंपरागत मूल्ये, श्रध्दा, वगैरे जपणाऱ्याला या सगळयाला धक्का न लावता एक आधुनिकपणाचा टच अनुभवायला द्यायचा असा प्रकार दिसतो. थोडक्यात म्हणजे, कोणताही धोका न पत्करता साळसूदपणे लिहिलेली ही निरुपद्रवी आणि कौतुकास्पद कविता आहे. आता धोका पत्करणे म्हणजे काय किंवा धोका पत्करणे हे कवितेचे मूल्य असते काय असे प्रश्न निघू शकतील. तर ही सुरक्षिततेच्या स्तरावर वावरणारी, काहीच मुळापासून पाहू न शकणारी, हौस म्हणून लिहिलेली कविता आहे एवढेच म्हणता येईल. अशा स्तरावर कुठलाही अनुभव संपूर्णपणे घेतलाही जाऊ शकत नाही आणि काही शक्तिमान अभिव्यक्तीही होऊ शकत नाही.पाहणेही कमकुवत राहते

आणि अभिव्यक्तीही.आणि तरीही अभिव्यक्ती-इन्-इटसेल्फ महत्त्वाची वाटत राहते आणि चालू राहते. याचा अर्थच ती एक हौस असते.

’ पहाटेचे पाळीवाले अजून निजून आहेत ते जरा जागे होऊ द्या ’

’ अजून तो निजून आहे,
तो जरा जागा होऊ द्या.’

-- मानवी संस्कृतीच्या मानभावी ठेकेदारांना धमकावणारा हा माणूस पुनरुक्तीचा असा ’कलात्मक ’ परिणाम साधत बसतो हे खटकते.

संस्कृत शब्दांच्या उदात्ततेत रमलेली ’ प्रार्थना ’ ही पाहण्यासारखी आहे. ’ महन्मंगल, महाकार स्मिमित अस्मिता ’ ही काय भानगड आहे ते कळणे कठीण आहे -- पण त्या ’ स्मिमित अस्मिते ’ कडून शक्ती मिळावी अशी ही प्रार्थना आहे. शेवटच्या ओळी अशा आहेत : --

’ एरवी
निराधार ठरतील घेतलेले फांद्यांचे आधार
अव्याकृत अस्तित्वाच्या दर्शनाकरिता
निरर्थक ना ठरोत आजवर केलेल्या
स्वर व्यंजनांनी युक्त
माझ्या पुनरुक्त प्रार्थना ! ’

-- म्हणजे पुनरुत्त प्रार्थनाही करणार, संकृतीच्या मानभावी ठेकेदारांना धमक्याही देणार, एकाकीपणा आहे म्हणणार, विज्ञानाची महतीही गाणार, भुताची टाळीही घेणार, ’ चिंचेचा आकडा ’ नको -- कारण ’ अक्षर ’ आहे --हेही म्हणणार, आणि हे सगळे असतानाच, ’आमचा सगळा डाव सदा खुल्लम् खुल्ला ह्या रस्त्यांना विचारा.’ हेही सांगणार ! अशी सगळी ही गंमत आहे. कवी हा अशा दृष्टिकोणाचा प्रतिनिधी वाटतो.

कै.अनिल बांदेकर यांच्या कवितेने या एका मजेदार दृष्टिकोणाची नकळत नोंद झाली हेही मजेदार आहे. कवितेबद्दल लिहिताना भावनेच्या भरात न लिहिता जरा मनापासून लिहावेसे वाटले हे नाईलाजास्तव मजेदार आहे असे फार तर म्हणता येईल.

(आवडनिवड, अभिरूची, मे-जून ७९.)

--- 000 ---

वासनाचक्र

टेनेसी विल्यम्यचा नाटकाचा सफाईदार मराठी अनुवाद

वासनाचक्र: मूळ लेखक -- टेनेसी विल्यम्स, अनुवाद -- विजय तेंडुलकर, प्रकाशक -- पॉप्युलर प्रकाशन, ताडदेव रोड मुंबई--३४ कि.रु.३, पृष्ठे १२२.

टेनेसी विल्यम्सच्या ऋ ह्मद्मद्धड्ढड्ढद्य ड़ठ्ठद्ध दठ्ठथ्ड्ढड्ड क़्ड्ढह्मत्द्धड्ढ या नाटकाचा हा अनुवाद. अनुवादातल्या अडचणी वगैरे आहेतच. आता इथं जर एखादी नीग्रो बाई मागासलेले इंग्रजी बोलत असेल तर मराठीत ते देशी मराठी झालं. शिवाय मराठीकरण स्वाभाविक होण्यासाठी येणाऱ्या मराठीतल्या इंडिअम्स इत्यादी, वातावरण मूळचंच राहिल्याने परक्या वाटत राहतात. त्यामुळे मग ’ नारळ देणे ’ हा प्रकार स्टॅन्लेच्या तोंडी वेगळा वाटणारच. बरं नावं बदलावीत आणि वातावरणही इकडचं घ्यावं म्हटलं तर मग सगळी बैठकच वेगळी होणार. मग ते रूपांतर झालं -- किवा ’मूळ कल्पना परकीय ’ असं आधी लिहून मग येणारं नाटक झालं. पण तसं केलं असतं तर मग ते नाटक तेंडुलकरांचंच म्हणावं लागलं असतं. सारांश,

टेनेसी विल्यम्सलाच शक्य तितकं मराठीत आणायचा प्रयत्न करायचा झाला तर एक किमान धेडगुजरीपणा येणारच. पण हे एवढं ओळखून, ते स्वीकारूनच अनुवाद करायला बसलेल्या माणसानं आपल्या या विचारात सुसंगती ठेवायला काय हरकत आहे ? यातली काही वाक्यं अशी आहेत की नाटकाबाहेर काढून स्वतंत्रपणे जरी ती पाहिली तरी त्यांना एक इंग्लिश वास आहे हे जाणवतं. उदा. ’’ मला वाटतं तुला ते लोक तेवढेसे छान वाटायचे नाहीत --’’ (स्टेला -- पृ.११), ’’ खरं तरी वाटेल आता तुम्हाला की कधी तरी मी लोकांच्या मते मोहक होते ?’’(ब्लान्शे -- पृ.२४) -- ‘ तेवढ्यांत काय होतं का, त्या मुर्ग्यांच्या नजरेला पडतो तो निगर -- म्हणजे कुठला -- दाणे फेकणारा -- तशी एकदम तो ब्रेक्स लावतो - उभा राहतो

-- कोंबडीला देतो जाऊ आणि आपण लागतो दाणे टिपू. तर आता यावर तो थेरडा निग्रर म्हणतो काय -- ' देवा परमेश्वरा, एवढी मोठी भूक आपल्याला नको रे कधी लागू दे बाबा !' '(स्टीव्ह पृ.३३) '' तुला माझ्यापाशी ठेवायला आवडेल मला पण तसं नाही मला करून चालणार.'(ब्लान्शे पृ.६६), वगैरे. आता हीही पुन्हा अनुवादातली अडचणच म्हणता येईल का ? मुळातल्या वाक्याचा वासही मराठीत आणून दाखवणं हा अनुवादाचा गुण की दोष ? भाषेत नव्या रचनांची भर पडणं, तिचा विकास होणं, ती जास्त लवचीक होणं हे अनुवादाचे काही महत्त्वाचे फायदे मानतात. कदाचित हे सगळं तेच असेल ? ! हा एक दोष थोड्याफार प्रमाणात दुर्लक्षित केला तर तेंडूलकरांचा हा अनुवाद एकंदरीतपणे सराईत आहे. शब्दांचे लगाम या लेखकाच्या हातात आहेत हे जाणवतंच. विशेषत: निरनिराळया वृत्तींची, वजनांची ही पात्रं मराठीत उतरवतांना दिसणारी तेंडूलकरांची जाण आणि सफाई उल्लेखनीय आहे.

ब्लान्शे ही स्टेलाची बहीण -- जीवनाकडून आपल्या लायकीपेक्षा जास्त अपेक्षा करणारी -- किंवा आपल्या अपेक्षांच्या संदर्भात अपयशी ठरलेली. तिची शोकांतिका हा या नाटकाचा एक महत्त्वाचा भाग. पण कुणा एका पात्रावर केन्द्रित असं हे नाटक नाही. इथं एका विषयाच्या संदर्भात, माणसांचा एक समूहच्या समूहच उघडा पडत जातो. निरनिराळया थरातल्या माणसांच्या अपेक्षांचा, वृत्तींचा, एक थरारक संघर्ष उभा होत जातो. स्टेलानं तिच्या नवऱ्याचा रांगडेपणा--काहीसा रानवटपणा आणि जनावरासारखा प्राथमिकपणा हे सगळं स्वीकारलेलं आहे. ती याच्यापेक्षा असं एक, उच्च (भ्रू) जीवन कल्पून कुठला अंतर्गत संघर्ष उभा करत नाही. पण ब्लान्शे नेमक्या उलट प्रवृत्तीची आहे. ती स्वत:च्या जीवनात तर हा संघर्ष निर्माण करतेच पण स्टेलाच्याही मनात असं काही भरवण्याचा प्रयत्न करते. या दोन विरुध्द प्रवृत्तींच्या संदर्भात यातलं नाट्य अस्तित्वात येतं.

वासनांबद्दल बोलायचं झालं तर प्रत्येक पात्रागणिक वासनांचे निरनिराळे प्रकार सांगता येतील. कामवासना आणि स्त्री-पुरुष संबंध हा अर्थातच या नाटकातला सर्वात महत्त्वाचा प्रवाह. पण एकंदरीतच वासनांचं वर्तमानाशी घर्षण निर्माण केलं जाणं आणि त्याची परिणती विकृतीत, विनाशात होणं हा या नाटकाचा गर्भित अर्थ अधिक महत्त्वाचा आहे. नाटक अगदी सहजपणे दैनंदिन जीवनातून सुरू होणं आणि अत्यंत भयानक अशा विकृतीत संपणं याला निश्चितच अर्थ आहे.

मराठीत स्टेजवर उभं करण्याच्या दृष्टीनं अनुवाद केलेला नाही हे एका दृष्टीनं बरंच आहे. कारण नाटकाला साहित्यिक मूल्य असतं की नाही हा जरी सर्वसाधारणपणे चर्चेचा विषय होऊ शकत असला तरी या नाटकाला ते आहे असं निश्चितपणे म्हणता येईलसं वाटतं.

(साहित्य समालोचन, विशाल संह्याद्रि, १४ जुलै १९६८).

--- ००० ---

आंग्ल कादंबरी कथा (भाग २)

लेखक - राजा मंगळवेढेकर, प्रकाशक- शारदा प्रकाशन,१३९२ शुक्रवार पेठ पुणे २. पृ ९३. किंमत तीन रुपये.

साहस आणि शौर्य यांनी ओथंबलेल्या, गूढरम्य वातावरणावर लिहिलेल्या अशा जगभर गाजलेल्या काही इंग्रजी कादंबऱ्यांचे मराठी संक्षेप या मालेत प्रसिध्द होत आहेत. कुमारांना हवंहवंसं वाटणारं हे जग, इंग्लिश प्रतिभावंतांनी उभी केलेली ही सृष्टी थोडक्यात मराठीत आणण्याची कल्पना खरोखरीच स्वागतार्ह. मालेच्या या दुसऱ्या भागात ' नवलपुरीतील फेरफटका ' (लुई कॅरोलची 'ॲलिस इन वंडरलॅड '), 'टॉम सॉयर ' (मार्क ट्वेनची कादंबरी) , 'पोवळयांचे बेटावर '(आर.एम.वॅलन्टाइनची. ' कोरल आयलंड ') आणि ' आयव्हानो ' (सर वॉल्टर स्कॉटची कादंबरी) अशा चार कथा दिलेल्या आहेत. मंगळवेढेकरांचा अनुवाद, संक्षेप सुबोध आहे. 'आयव्हानो ' मध्ये त्यांची जरा तारांबळ उडालेली दिसते. नवलपुरीतील फेरफटका ' सर्वोत्कृष्ट जमलेला वाटतो. एकंदरीत पुस्तक (अर्थात सचित्र) मुलांना जरूर जरूर आवडेल असे झालेले आहे. मराठी बाल कुमार साहित्याच्या दुर्दशेचा विचार करता असे उपक्रम खास अभिनंदनीय.

(विशाल सह्याद्रि, १५ सप्टें. १९६८)

--- ००० ---

आकाशवेडी

भावूक, कोवळया, स्वप्निल वृत्तीच्या कवितांचा कवयित्री पद्मा यांचा नवा काव्यसंग्रह

आकाशवेडी - कवयित्री - पद्मा : प्रकाशक - मौज प्रकाशन गृह. खटाववाडी, मुंबई ४, पृ.८२, किंमत रु.४.५०

' आकाशवेडी ' हे काही या कवितासंग्रहातल्या कवितेचं विशेषण होऊ शकणार नाही. कारण कुठला तरी प्रचंड अनंत आशय तोलत उभं राहण्याची कुवत या कवितेत नाही. मग हा शब्द का ? तर याचं उत्तर कवयित्रीच्या भावूक, कोवळया (काही वेळा पोरकटही), स्वप्नील वृत्तीत सापडतं. जीवनाला सामोरं जाऊन त्याच्या प्रचंड-प्रखर अनुभूतीतून उद्भवणारं हे काव्य नाही. उलट स्वप्न हेच सत्य समजण्याचा हा एक दुबळा प्रयत्न आहे. या दृष्टीने पाहता ' स्वप्नवेडी ' हा एक शब्द अधिक उचित झाला असता असं वाटतं.

म्हणोत तुला स्वप्नवेडी

खुळया स्वप्नांत रंगणारी

ज्याचे त्यास साजून दिसते,

म्हणोत काही म्हणणारी

-- ही आत्मसंतुष्ट वृत्तीसुध्दा कवाडं बंद करून घेण्याचाच एक प्रकार आहे. ' थोडी उरली आहे वाट ' याच कवितेत कवयित्री म्हणते --

पूस डोळे मनस्विनी,

तुझे असणे एक स्वप्न,

नकळत जायचे पलीकडे,

स्वप्नातून दुसरे स्वप्न.

याचा सरळसरळ माया, ब्रम्ह, मृत्यूनंतरचे जीवन वा पुनर्जन्म इत्यादींशी संबंध पाहता येतो. मथितार्थ असा की एक उक्त तत्त्वज्ञान जसंच्या तसं स्वीकारण्याकडे कवयित्रीचा कल आहे आणि याचाच परिणाम म्हणजे कवितेतली सांकेतिकता. ही सांकेतिकतासुध्दा बहुश: गीतलेखनांतील सांकेतिकतेच्या पातळीइतकी ढोबळ आहे. नुसती पारंपरिकता किंवा सांकेतिकता हा दोष ठरणार नाही. पु.शि. रेग्यांची कविता या संदर्भात आठवावी. असंख्य अर्थच्छाचा वेध घेण्याच्या त्यांच्या सूक्ष्म वृत्तीमुळे भाषेचा वापर एका नव्या परिमाणातून होतो. म्हणून ती कविता नावीन्यपूर्ण, चैतन्यपूर्ण वाटते आणि या अर्थाने मग ती सांकेतिक राहातही नाही. इथे मात्र सामान्य अनुभवांचं सफाईदार कारागिरीतून चित्रण एवढंच श्रेय उरतं.

उदास काळोखाच्या सीमा, क्वचित कदाचित, आकाशवेडी, निळेभोर जळ खाली, एखाद्या वादळी रात्री, वेगळी, चाफ्याच्या झाडा, आणि,अजिंठा -- या, या संग्रहातल्या ' त्यातल्या त्यात ' कविता. पण संपूर्ण कविता म्हणून कवयित्री स्वत:च्या मर्यादा ओलांडू शकत नाहीच.

(साहित्य समालोचन, विशाल सह्याद्रि, १ डिसेंबर १९६८)

--- ००० ---

हसायचं नाही

बाळ गाडगीळ यांचा नवा विनोदी लेख संग्रह -- विषय नेहमीचेच, पण समर्थ हाताळणी

हसायचं नाही ! ले.बाळ गाडगीळ ; संजय प्रकाशन, ९१७/२२, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे ४. पृ.१४४, किंमत पांच रुपये.

' टवाळा आवडे विनोद ' सारखी संतवचनं (सुध्दा) निर्धोकपणे वापरणे कठीण करून ठेवणारे महाभाग असतात. प्रस्तुत पुस्तकाचे लेखक त्यातले एक.

या पुस्तकात गाडगीळांचे बारा विनोदी लेख संग्रहित केलेले आहेत. ' हसायचं नाही ! ' या संग्रहातल्या बाराव्या लेखाचं नाव या पुस्काला दिलेलं आहे. तेव्हा तसं भ्यायचं कारण नाही. कारण हसायला हरकत नाही.

गाडगीळांचा विनोद हा करमणूक प्रधान -- खुशमस्कऱ्या थाटाचा -- आणि काही टाळया घेऊन जाणारा असा तात्पुरता विनोद नाही. त्यांच्या विषयांच्या निवडीतच ते स्वीकारीत असलेल्या आव्हानांचं स्वरूप स्पष्ट होण्यासारखं आहे. या दृष्टीनं, विशेषत: त्यांचे -- ' पूज्य बाबासाहेब यांस ', ' आम्हाला समुद्र मिळाला (च) पाहिजे ', ' आम्ही कसे गडगडलो', ' शिवाजी महाराजांची जन्मतारीख ', ' पक्षी आणि दगड ' हे लेख पाहण्यासारखे आहेत. ' अवमूल्यनाच्या संदर्भात सामान्य माणूस ' (हे सगळं विवेचन मग अवमूल्यानांच्या अर्थशास्त्रीय विवेचनाच्या समांतर), 'निवडणुकीच्या गर्दीत एखादी मागणी' (मग तिचे पुढचे सगळे सोपस्कार -- तपशील -- समित्या -- त्यांचे परदेश दौरे -- वाटाघाटी वगैरे), ' नवकविता आणि तिच्यावरची नवटीका ' -- असे हे विषय गाडगीळ समर्थपणे हाताळतात. विषयांच्या अनेक बाजूंचा -- तपशीलाचा ते मजेत समाचार घेतात.

विनाकारण (आणि अवास्तव) गांभीर्यातून हास्यास्पदता दर्शविणे ही गाडगीळांच्या विनोदाची प्रमुख रीत. ' कँटरबरी टेल्स ' वाल्या चॉसरसारखी ही पध्दत आहे. स्वत:च गांभीर्याचा एक मुखवटा धारण करून भाबडेपणाने सगळे तपशील देत जाण्याचा पध्दतीतून निर्माण होणारा हा विनोद अधिक सूक्ष्म वाटतो. समाजातली विसंगती -- हास्यास्पदता उघडी करण्यासाठी हा सूर लावणं आणि तो सहज पेलणं ही तशी सोपी गोष्ट नाही. गाडगीळांना हे साधलेलं आहे.

आता ' स्त्री' किंवा ' प्राध्यापक ' हे विनादाचे आपले कुणीहि वापरावे असे विषय पण गाडगीळांची या विषयांची हाताळणी वेगळी वाटते. अधिक रंजक वाटते. इतर लेखही वैशिष्ट्यपूर्ण (आणि वैचित्र्यपूर्णही) आहेत.

विषय कुठलाहि असो, पहिली गोष्ट म्हणजे गाडगीळांकडे कच्चा माल अगदी भरपूर असतो. त्यांचा साहित्य, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राजकारण इत्यादी गोष्टींचा अभ्यास आणि त्यांची निरीक्षणशक्ती यांमुळं कच्च्या मालाच्या बाबतीत गाडगीळ अत्यंत श्रीमंत आहेत. या सगळयाचं ' व्यवस्थापन ' ते आपल्या लेखांतून करतात.

सारांश, मराठीतल्या विनोदाच्या दृष्टीनं बाळ गाडगीळ हे एक महत्त्वाचं नाव !

(साहित्य समालोचन, विशाल संह्याद्रि, ८ सप्टेंबर १९६८)

--- ००० ---

स्मृतिरेखा

स्वप्नाळू कल्पनांची उधळण -- सोप्या व सुबोध कवितांचा संग्रह

स्मृतिरेखा -- (कविता संग्रह) कवी विठ्ठल केशव कोरटकर, प्रकाशिका - सौ.लीलाबाई वि.कोरटकर, मराठी साहित्य परिषद आंध्र, इसामिया बाजार, हैद्राबाद, कि.रु.३,पृष्ठे ८०

कविता करणं हा वाक्प्रचार तसा कौतुकाचा. कडव्यांच्या पायऱ्या-पायऱ्यांनी निसर्ग, प्रेम,इत्यादी गोष्टी व्यवस्थितपणे रचून दाखवणारा माणूस तो कवी. भाषेवर थोडंफार प्रभुत्व असलं म्हणजे कविता लिहिणं तसं अवघड नाही असं मर्ढेकर प्रभृतीही सांगून गेलेले आहेतच. सारांश हा एक अशा सोप्या कवितांचा संग्रह. सोप्या आणि सुबोध.

आपल्या कविता संग्रहाला एखाद्या प्रथितयशाची प्रस्तावना असणं हे एक भूषणच ! तोही माणसू शक्य तितकं गुणान्वेषण करून ' वाहवा ', हे पहा,वगैरे सगळं करतो. त्यातून मग प्रोत्साहन दिल्याचं वा कौतुक केल्याचं श्रेय वगैरे मिळतं. या संग्रहाची प्रस्तावना सर्वश्री प्राध्यापक शंकर केशव कानिटकर ऊर्फ ' गिरीश,' यांची आहे. म्हणजे तेच. आता हा
मरणोत्तर प्रसिध्द होणारा कवितासंग्रह आहे हे खरं पण प्रस्तावना पूर्वीच लिहिलेली. तर कौतुक - प्रोत्साहन - आणि विशेषत: मोठेपण बहाल करणं वगैरे साहिजकपणेच आहे तेव्हा हे सगळं सोडून प्रत्यक्ष कवितांकडे जाणं हे अधिक शुध्द कृत्य होईल.

पहिली कविता ' रसिकास ' --

प्रीती लतेची फुले बाग माझी
येथे तुम्ही या रमा !

-- ही सुरुवात आणि --

रसिकवरांनो ही गीत-माला,
प्रेमे तुम्हा वाहिली !

-- हा शेवट. मधे मग..जीवनाला, उन्मेष, सेवा, बालक्रीडा गोड मानून घ्या, इत्यादी. पुढची कविता --' प्रतिभे, येशिल काय फिरून ?' -- आता यावर काय बोलणार ? सुरुवातीलाच यांची प्रतिभा गायब, म्हणजे कोणे एके काळी आपण प्रतिभावान वगैरे होतो अशी कवीची धारणा दिसते. त्या कविता या संग्रहात घेतलेल्या नाहीत. पुढच्या आहेत.

एकंदरीतपणे पाहता -- भृंग, कमळ, चांदण्या, स्वर्ग, सृष्टीचे मोहक रान, इंद्रधनू, मौक्तिक, सरिता, पक्षी, पर्णकुटी, ईश्वर -- वगैरे असं सगळं हे या कवितेचं विश्व. आता यात बालकवींच्या भाषेसारखा भास होतो (किंवा ही भाषा बालकवींसारखी आहे) असं प्रस्तावनेत म्हणायला निश्चितच आधार आहे. पण बालकवींची कविता ही एखाद्या चर्वित कल्पना-चमत्कृती इतकी स्वस्त आहे काय ? चांदण्यांना ' तारा-पुष्पे ' म्हणायला फारशी प्रतिभा लागत असेल असं वाटत नाही. या संग्रहातली कविता विलक्षण सांकेतिक आहे. आणि सवयीनं लिखाणात एक सफाई-सुबकता आणणं काही अवघड नाही. ती आहे. काही श्रेय द्यायचं तर हे देता येईल. या कवितांची शीर्षकं जरी वाचली तरी हा कवितासंग्रह वाचल्याचं श्रेय मिळवल्यासारखं होईल. ' देवी सरस्वती ', ' जीवित नौका ', ' कल्पकतेस ', ' अहिल्ये बाले !', ' तारा पुष्प उधळी वरी दक्षिन मी भारतभूला ', ' मी असे चिमुकला वीर ', ' गाय प्रेमळशी गाणी ', ' जीविताशा ', ' नौकाविहार ', इत्यादी.

कवीच्याच शब्दात आपल्याला बोलता येईल.

रोज सकाळी उठून
गाशी गोड गोड गान
आम्ही जगी दु:ख जन
करी आमुचे रंजन

तुला प्रीय प्राणाहून -- तुझे काटेरी कुंपण !,

आपलं काल्पनिक, स्वप्नील, रंजक असं काही लिहावं आणि जगातल्या दु:खी जीवांना थोडा विसावा द्यावा असा या कवितांचा माफक उद्देश आहे. आणि असं काही लिहिण्याइतके ' सामर्थ्य, ' या कवीत निश्चितच आहे. एवढं मात्र अगदी दिलखुलासपणे मान्य !

(साहित्य समालोचन, विशाल संह्याद्रि, २८ जुलै १९६८)

--- ००० ---

अक्षरे

दुर्लक्षित कवीमनाचा मागोवा -- अक्षर प्रकाशनचा खास प्रयत्न

अक्षरे : संपादक- रमेश जोशी ; प्रकाशक - अक्षर प्रकाशन,निर्मल पिदास, तेजपाल स्कीम रोड,विलेपारले,मुंबई ५७,पृ.४८,किंमत २ रुपये.

सहा कवींच्या काही कवितांचा हा संग्रह. सदा कऱ्हाडे यांच्या ११, मधू ताम्हनकर यांच्या ७, रमेश जोशी यांच्या ८, जयंत गोखले यांच्या ४,जयंत वष्ट यांच्या ६, आणि अरविंद वैद्य यांच्या ५ -- अशा एकूण ४१ कवितांचा हा संग्रह. प्रकाशनाच्या दृष्टीनं काहीशा दुर्लक्षित राहिलेल्या पण कसदार अशा लिखाणास पुस्तक स्वरूपानं प्रसिध्दी द्यावी ही अक्षर प्रकाशनाची मनीषा.

आता अभिव्यक्तीतली सफाई किंवा अनुभवाची एकंदर लय सुसंगतपणे कवितेत एक पूर्ण कविता म्हणून सहज सांभाळता येणं या प्राथमिक गोष्टीच्या दृष्टीनं पाहिलं तर सदा कऱ्हाडे, जयंत गोखले आणि अरविंद वैद्य यांच्या कविता तुलनेनं अधिक सराईत वाटतात. बाकीच्यांमधली माध्यम संदर्भातली अपरिपक्वता ठळकपणे जाणवते. अर्थात एकमेकांत फारच मोठं अंतर असलेले कवी इथं एकत्रित आणले गेले आहेत असं वाटत नाही -- हेही या संदर्भात नमूद करायला हवं. सांकेतिकतेचा, साचेबंदपणाचा आणि अलंकरणात्मकतेचा असे दोष थोड्याफार प्रमाणात सर्वच कवींमध्ये आहेत.

सदा कऱ्हाडे हे या सहातले सर्वात अनुभवी आणि काहीसे प्रथितयश असे कवी. त्यांच्या अकरा कवितांतल्या ' जखम ' आणि ' काजवा ' या दोनच कवितांत ते अनुभवांशी सहज निकटलेले वाटतात. ' जखम ' या कवितेत

निरनिराळया प्रतिमा-चित्रांमधून,मनाला झालेल्या जखमेचा भावानुभव साकार होत जातो. ही कविता एक एकसंध अशी स्वाभाविक कलाकृती वाटते. तिच्यातल्या प्रतिमा अलंकरणात्मक वाटत नाहीत.

चंद्राला पाहून सागरलाट उसळते तेव्हा
पाण्याच्या मनात केवढी पोकळी होते ?
तेवढीच खोल जखम
मनाला झाली

अशा प्रतिमांचा चित्रक्रम आशय सहजपणे उभा करतो. त्याचप्रमाणे ' काजवा ' या कवितेतही कवी स्वतंत्रपणे काही सांगू पाहतो आहे असे वाटते पण त्यांच्या इतर सर्वच कवितांतून सांकेतिकता जाणवते.

स्पर्श गंधातून धूप जेव्हां
श्वास तुझा धूप होतो
आणि माझा श्वास तेव्हां
कापराचा पेट घेतो.

हा टाईप. ' फुलदाणी ' सारख्या कवितेतल्या क्लृप्त्यांतून दिसून येणारी त्यांची चमत्कृतीची ओढ तर पोरकटतेच्या पातळीवर येते.

जयंत गोखले यांच्या चारातल्या तीन कविता लोकप्रिय गीत-पातळीवरच्या आहेत. ' अमित्र ' ही जरा वेगळी कविता, पण तिच्यातहि ' माया ', ब्रह्म' वगैरे आहेच.

अरविंद वैद्य यांच्या कवितांतली तरलता आणि संवेदनशीलता संग्रहात इतरत्र नाही.

' चमकून उठता लचक कुणाच्या नाजुक देही होती भरली ' अशी नजाकत ते व्यक्त करू शकतात.' वेदनेला अर्थ दे रे ', 'शंका ' आणि 'स्मृती ' या त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण कविता. ' पुनरपि ' या कवितेवर सरळ सरळ माडगूळकरांच्या ' जोगिया ' ची छाप आहे.

संग्रहातले इतर तीन कवी बरेच कच्चे वाटतात. 'फसवणूकीची फुले ',' पहाटेचे कलेवर ', 'सकाळच्या दारात ', 'जीवनाचा घट ', 'सुखाची साय ', ' अज्ञानाची विशाल शेतं ', ' प्रवृत्तीची काळी भूते ', वगैरे. अशी समीकरणांची बांधणी बऱ्याच ठिकाणी आहे. स्पष्टीकरणात्मक रचना हा मुख्य दोष आणि रमेश जोशी हे त्यातल्या त्यात आशादायक कवी असूनही हा दोष त्यांच्यात सर्वात अधिक प्रमाणात आहे हे विशेष.

काही खास अपेक्षा करावी अशा अव्दितीयतेच्या खुणा संग्रहात नाहीत. त्यातल्या त्यात अरविंद वैद्य हा कवी उत्सुकता निर्माण करणारा आहे.

अक्षर प्रकाशनाचा उपक्रम स्तुत्य.

(साहित्य समालोचन, विशाल संह्याद्रि, १५ सप्टेंबर १९६८)

--- ००० ---

ब्रह्महत्या

मजेदार घटनांची उतरंड --' ब्रह्महत्या ' नाटकाचे वैशिष्ट्य

ब्रह्महत्या - (नाटक) लेखक- रत्नाकर मतकरी, प्रकाशक - ग.रा.भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी,ताडदेव रोड,मुंबई ३४,कि.रु.४, पृष्ठे -- ६१.

रत्नाकर मतकरी हा हल्लीच्या नाटककारांतला आपला असा काही कस असलेल्यांपैकी एक. नाटकाची बांधणी, प्रसंगांची खुलावट, आणि संवाद यांतली सफाई या नाटकात निश्चितपणे जाणवते.

आबा हा एक पाच लाखांची इस्टेट असलेला माणूस. याचा मुलगा विनायक याच्या इच्छेविरूध्द सरिता नावाच्या मुलीशी रजिस्टर लग्न करतो. या माणसाला एक विचित्र संशय. ही अमुक एक मुलगी सून म्हणून घरात येणं याला काही खास अर्थ आहे. ही आपला खून करण्याचं नवऱ्याच्या मनात भरवणार आणि आपली इस्टेट मग हे सरळच वारसा हक्कानं लाटणार. हा विषय. खरोखर या विषयात फार मोठ्या शक्यता आहेत. मतकरींनी हा एकंदर प्रकार चार कलाटण्यांनी मांडला आहे. पहिल्यांदा हे सगळं संशयाचं वातावरण. त्यात सरिताच्या बॅगेत विषाची बाटली सापडते. ' रक्ताशिवाय खून ' हे पुस्तक सापडतं. विनायककडे रिव्हॉल्व्हर सापडतं, वगैरे. मग आबा इन्स्पेक्टर वाघमाऱ्यांना फोन करतात. (हा एक मजेदार माणूस -- फोन करायचा अवकाश की फोनवर येण्याऐवजी हा प्रत्यक्षच अवतीर्ण होतो।) इन्स्पेक्टर या दोघांना तंबी देतो की बाबांना कोणत्याही कारणानं काही दगाफटका झाला तर तुम्हाला अटक करण्यात येईल. इथून दुसरी स्टेज

सुरू होते. नवरा-बायको दोघंही आबांची जिवापाड काळजी घेऊ लागतात. पायऱ्या बुळबुळीत राहू नयेत, त्यांना नीट झोप लागावी, इत्यादी. ही दोघं जितकी जास्त काळजी घेतात तितका तो माणूस लाईफ जास्त एंजॉय करू लागतो. तिसऱ्या स्टेजमध्ये मग या नवराबयकोंचे खरोखरच खुनाचे प्रयत्न सुरू होतात. कारण, अशी ही भयंकर काळजी घेत राहण्यापेक्षा खरोखरच यांचा यशस्वी खून करून यांतून मुक्त का होऊ नये ? -- असा विचार बळावतो. आपण निरपराधी आहोत असं सिध्द करता येईल अशा परिस्थितीत हे सगळं झालं म्हणजे झालं. मग करंडीत साप, अंथरुणात जळती सिगारेट इ.अयशस्वी प्रकार होतात. पुन्हा एकदा सगळं गाडं अंगावर कोसळतं. चौथ्या स्टेजमध्ये (२५ वर्षं उलटल्यानंतर) हा म्हातारा तब्बल नव्वद वर्षांचं ऐसपैस आयुष्य जगून आजारपणानं मरतो. ही दोघं तोपर्यंत आपले केस पिकवून बसलेली आहेत. इन्स्पेक्टर येतो न् म्हणतो की मला माझं कर्तव्य केलच पाहिजे. मी तुम्हाला अटक करतोय. इथं अंतिम पडदा. असं हे तीन अंकी नाटक.

अशा चढत्या स्टेजेसनं मांडल्यामुळे आणि प्रवेशी रचनेमुळे नाटक गतिमान आणि रंजक झालेलं आहे. केवळ काल्पनिक जंजाळात माणसं अडकत जातात आणि जे कधी अस्तित्वातच नव्हतं त्याचे गळफास लावून घेतात हा खरोखर एक धाडसी विषय. मतकरींनी हा विषय रंजकपणे रचला हे अर्थात् कौतुकास्पद. पण एकंदर विषय त्यांना कितपत पेलला हा प्रश्न उरतोच. आणि या प्रश्नाचं उत्तर एकदंर हाताळणीच्या पध्दतीत सापडतं. विनोदाची पखरण, रंजकता यांची काळजी घेणं हे तसं आक्षेपार्ह नाही. पण या नाटकात केवळ एक मजेदार घटनांची उतरंड एवढंच या विषयाचं स्वरूप राहिलेलं आहे. त्यामुळं नाटकाचा शेवट अपेक्षित परिणाम साधू शकत नाही. या नाटकाचा नुसता आराखडा सांगण्यात जी भेदकता आहे ती प्रत्यक्षात राहात नाही. यावर मतकरींना विशेष ' थोर ' असं काही सांधायचं नव्हतंच, फक्त एक बऱ्यापैकी करमणूक उभी करायची होती असा एक बचावात्मक विचार करता येईल. पण मग विषयाचं वेगळेपण इत्यादी कौतुकांना फार मर्यादित अर्थ राहील. एक बऱ्यापैकी करमणूक एवढंच जर लेखकाचं साध्य असेल तर मग हे सगळं ठीक आहे. तेवढ्या बाबतीत मात्र एक निखालस प्रणाम !

(साहित्य समलोचन, विशाल सह्याद्रि, २१ जुलै १९६८)

--- ००० ---

मनवा

स्त्रीबद्दलच्या असंख्य सूक्ष्म जाणिवा रंगविणारा प्रा.पु.शि.रेगे यांचा वेधक कथासंग्रह

मनवा - लेखक - पु.शि.रेगे, प्रकाशक- मौज प्रकाशन गृह,खटाववाडी,मुंबई ४, पृष्ठे ८६,किंमत ४ रुपये.

१९५६ मध्ये प्रसिध्द झालेल्या 'रूपकथ्थक 'मध्ये आणखी पांच कथांची भर टाकून हा नवा कथासंग्रह प्रसिध्द झालेला आहे. आपल्या कवितांतून स्त्रीबद्दलच्या असंख्य सूक्ष्म जाणिवा व्यक्त करणारे रेगे या कथांतून तिची अनेक चित्रे रंगवताना दिसतात. शैलीची त्रुटितता आणि सूचकता हे रेग्यांच्या कवितेचे विशेष त्यांच्या कथांतूनही तितक्याच प्रकर्षाने जाणवतात.रेग्यांची कविता जशी मनात घोळवत राहावी लागते तशी त्यांची कथाही तिचे वाचन संपल्यावरच खरी सुरू होते.

' कथा ' किंवा ' लघुकथा ' यापेक्षा ' गोष्ट ' हा शब्द पसंत करणारा हा लेखक आहे ही खास लक्षात घेण्याजोगी बाब. अर्थात ' गोष्ट ' आणि ' साक्ष ' या दोन कथा याला अपवाद ठरण्याजोग्या. विशेषत: ' साक्ष ' ही कथा तर, चारपाच वर्षांपूर्वी ' शब्दरंजन ' च्या दिवाळी अंकात रेग्यांच्या ' सवित्री ' या कादंबरीतले एक प्रकरण कविता विभागात प्रसिध्द झाले होते त्याची आठवण करून देणारी. पण एकंदरीत रेग्यांची कथा ही गोष्ट असतेच. ती नेहमी पुढे सरकत असते. तिच्यात काहीतरी घडत असते ' विपर्यय: स्त्रीपूर्वक: ' ही कथा तर या दृष्टीने फारच विशेष. टागोरांची ' व्हिक्टरी 'नावाची कथा आणि ही कथा तंत्राच्या दृष्टीने मुद्दाम एकित्रतपणे पाहाव्या अशा. लिखाण तर सगळे केवळ निवेदनाच्या पातळीवरचे. पण कथेचे ' असणे ' मात्र त्याहून खूप !

टागोरांच्या कथांतून जाणवणारे चिंतकाचे व्यक्तिमत्व आणि रेग्यांच्या कथांतून जाणवणारे चिंतकाचे व्यक्तिमत्व यांचे प्रकार वेगवेगळे असले तरी एकाच तोलामोलाचे आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्वांतील फारक हे रेग्यांच्या स्त्रीविषयक खास दृष्टिकोणामुळे आहेत असे वाटते. एरवी, टागोरांची सखोल, चिंतनशील, काव्यमय वृत्ती आणि रेग्यांची वृत्ती या खूपच मिळत्या जुळत्या आहेत. या कथासंग्रहातली ' मन ' ही कथा या दृष्टीने पाहण्याजोगी. जीवनात रस घेणारे आणि तरीही अलिप्त असे हे ' रूप ' व्यक्तिमत्व.

कथासंग्रहाचे कव्हर वैशिष्ट्यपूर्ण पण छपाईच्या २/४ चुका राहून जाव्या हे 'मौज 'च्या दृष्टीने निश्चितच वाईट !

बालवाचकांसाठी ज्ञानवर्धक साहित्य

असे विख्यात संशोधक, असे त्यांचे शोध -- लेखक :- फ्लेचर प्रॅट. अनुवादक - शं.ना.नवरे बोरा ॲन्ड कंपनी,पब्लिशर्स प्रा.लि.३ राऊड बिल्डिंग, काळबादेवी रोड मुंबई २,पृ.१३८ कि.तीन रुपये.

सर्वज्ञान मालेतले हे पुस्तक. विज्ञाननिष्ठ अशा आजच्या युगात बोरा ॲंड कंपनीच्या या मालेसारख्या अनेक माला आपल्या भाषेत निघणे आवश्यक आहे. इतर भाषांतील अशा प्रकारच्या पुस्तकांचा मराठीत अनुवाद करणे हा या प्रकारातला एक महत्त्वाचा भाग. फ्लेचर प्रॅटच्या मूळ पुस्तकाचा शं.ना.नवरे यांनी केलेला हा अनुवाद.

स्फोटक द्रव्ये,छपाई आणि दुर्बिण, शिडाच्या होडीपासून विमानापर्यंत,सरकी काढण्याचे यंत्र आणि कापणीचे यंत्र, शब्दांनी आणि तारांनी केलेली जादू,घरगुती उपयोगाचे शोध, पोलाद आणि गगनचुंबी इमारती, लष्करी शोध आणि आधुनिक शोध असे आठ लेख या पुस्तकांत आहेत. ओघवत्या सुबोध भाषेत ते लिहिलेले असल्याने मुलांना गोष्टींसारखे आवडतील.शास्त्रज्ञांच्या आणि त्यांच्या शोधांच्या या हकीकती रंजक आणि ज्ञानवर्धक आहेत.

(साहित्य समालोचन, विशाल संह्याद्रि, २९-११-१९६८)

--- ००० ---

बॅरिस्टर अनिरुध्द धोपेश्वरकर

लेखक - भाऊ पाध्ये,पॉप्यूलर प्रकाशन,पृष्ठ संख्या १३२, कि.रु.६

उथळ, औपचारिक आणि लोकांच्या अपेक्षा ध्यानात घेऊन जगणं आणि आपलं स्वाभाविक जीवन जगणं यातला हा संघर्ष. धोपेश्वरकर, तो म्हणतो तसं हा काही नुसता वस्तुस्थितीची जाणीव असलेला माणूस नाही. ' सिनिक ' च आहे. त्याचं आयुष्य म्हणजे एक प्रकारची तिडीक आहे. एक प्रतिक्रिया आहे. ' मोठं ' होण्यामध्ये त्याला इंटरेस्ट नाही हे खरं, पण स्वत:ला ' फालतू ' हे विशेषण लावणं हेही तितकंच ' भंपक '. आपण जसे आहोत तसं स्वत:ला पाहणं ही गोष्ट अर्थात संपूर्ण वेगळी. सिगारेट्स ओढणं ही या माणसाची निरनिराळया संदर्भात दर्शविली गेलेली क्रिया त्याच्या ' सिनिक ' पणाची साक्ष आहे.' मी जन्माला का आलो ? माझ्या जगण्याचा उपयोग काय ?' हे या माणसाला पडणारे प्रश्न त्याची चिंतनशील अस्वस्थता दाखवतात. पण ही अस्वस्थता मूलत: एक प्रतिक्रिया या स्वरूपात आहे हे नाकारता येणार नाही.

' बाहेरच्या गुंत्यात तो जसजसा अडकत जातो तसतसा आतून त्यापासून मोकळा होत जातो ' असं मलपृष्ठावर म्हटलं आहे ते पटत नाही. अशा स्वरूपाच्या मानसिक प्रगतीच्या वा बदलाच्या कल्पनेला कादंबरीत तरी आधार नाही. ही व्यक्तिरेखा मूलत: स्टॅटिक अशीच आहे.

प्रियवंदा, मालविका, शर्मिष्ठा, प्रद्युम्न, अभिमन्यु, चक्रपाणी इत्यादी नावांतून एक प्रकारची कालिक सरमिसळ आणि विडंबन या गोष्टी साधतात. प्रियवंदा, क्लारा, आयव्ही, राय, तात्या, जनार्दन, चक्रपाणी इत्यादी व्यक्तिरेखा ' गुंता ' तयार होण्यात आपापल्या परीनं सार्थ कामगिरी बजावतात. धोपेश्वरकरांना आपण ' सिनिक ' खासच म्हणू शकू, पण पाध्यांना सहजासहजी हे विशेषण लावता येणार नाही. त्यांनी एकंदर कादंबरी (प्रथम पुरुषी निवेदन हे धोपेश्वरकरांचंच असल्यानं) एक वस्तुस्थितीची जाणीव या स्वरूपातच आपल्यापुढं ठेवलेली आहे. मानवी आयुष्याबद्दल सर्वसामान्य निष्कर्ष निघावे अशी कोणत्याही प्रकारची तजवीज त्यांनी केलेली नाही. थोडक्यात, कादंबरी यशस्वी.

--- ००० ---

बारा गावचं पाणी

लेखक - वसंत बापट,पॉप्युलर प्रकाशन,पृ.१३५, कि.रु.७

प्रवासवर्णन हे जेव्हा आत्माविष्काराच्या स्वरूपाचं असतं तेव्हाच ते ललितकृती या प्रकारात येऊ शकतं, नाहीतर तो एक नुसता नोंदवजा ऐवज होतो. बापटांचं हे प्रवासवर्णन ललितकृती आहे. खास त्यांचा असा छाप या वर्णनावर आहे. ' सी ॲन्ड ड्रीम ' हा आदेश बापटांनी तंतोतंत पाळलेला आहे. बापटांच्या काव्यमय वृत्तीचा प्रत्यय जागोजागी येतो. नुसती शीर्षकांवरून नजर फिरवली तरी हे दिसून येईल. ' मनाली,माझी लाडकी ', ' पहाडांची देखणी राणी ', ' रामेश्वरा, तू कोठे रे गेलास ?',इत्यादी.

जयपूरमधल्या पाषाणांबद्दल लिहितांना ते म्हणतात, ' केवळ स्त्रियांनीच फोडले इथले पाषण ; त्यांच्या हातांच्या स्पर्शाने हे पाषाण लाल झाले !' पेहलगाम, मनाली, चंडीगड, दार्जिलिंग, शिलाँग, पाँडेचरी, रामेश्वर, कन्याकुमारी, माण्ड, उदेपूर, जयपूर, कोणरक आणि वाराणसी यांची बापटांनी केलेली वर्णनं सूक्ष्म आणि माहितीपूर्ण तर आहेतच ; पण तिथला निसर्ग आणि तिथली माणसं यांचं कविहृदयानं घडवलेलं दर्शनही त्यांत आहे. निसर्गाच्या नजाकतीनं, सौंदर्यानं बहरून येणारं त्यांचं मन तथाकथित ' धार्मिकपणा ' च्या नावाखाली चाललेला माणसाचा क्षुद्रपणा आणि हिडीसपणा पाहून व्यथित होतं. त्यांच्या स्वप्निल कल्पनाशक्तीचा प्रत्यय त्यांच्या ' माण्डू ' आणि ' कोणारक ' वरील लेखांत चांगला

येतो. भूतकाळातल्या व्यक्ती, प्रसंग ते साक्षात पाहतात. मनाली आपल्याच तंद्रीत सफरचंदी स्वप्ने पाहते, पाँडेचेरी म्हणजे शँपेन आणि माडी यांची विचित्र कॉकटेल, चंदीगड म्हणजे नुकताच उगवलेला एक अंकुर -- अशा स्वरूपाची त्यांची वाक्यं, त्यांचा अनुभव आणि त्यांची काव्यदृष्टी दर्शवतात. स्वप्निल अलंकरणाचा सोस हा खास बापटांचा. त्यामुळं एकंदर लिक्षाणाला मर्यादा पडत असल्या तरी एका रसिकाचं प्रवासवर्णन म्हणून त्याचं मोल कमी होत नाही.

--- ००० ---

प्रकाशयोजना व नेपथ्यरचना

लेखक - डेरेक जेफेरिस.भाषांतर - प्र.ना.परांजपे, मौज प्रकाशन,पृ.७९, कि.रु.२

नाट्य क्षेत्रातील मराठी साहित्यात महत्त्वाची भर. ग्रीक नाटकांच्या काळापासून ते आतापर्यंतच्या प्रगतीच्या महत्त्वाचे टप्पे दर्शविणारा आढावा, अनेक आकृत्या, साधनं, वेगवेगळया शैली,इत्यादींची चर्चा ही या पुस्तकाची वैशिष्ठ्ये. प्रकाशयोजना आणि नेपथ्यरचना यांतल्या गुंतागुंतीच्या अनेक प्रश्नांची हे पुस्तक वाचून चांगली ओळख होते. असे उपयुक्त पुस्तक मराठीत आणल्याबद्दल श्री.परांजपे यांना धन्यवाद.

--- ००० ---

खळाळ

लेखक - आनंद यादव, मौज प्रकाशन, पृ.१८८, कि.रु.६.२५

ग्रामीण जीवन हे या कथांचं अनुभवविश्व. लेखकानं हे सारं बारकाईनं पाहिलेलं आहे. संज्ञाशीलपणे, भरभरून अनुभवलेलं आहे आणि हे सर्व अनुभव आविष्कृत करण्याची क्षमताही लेखकाच्या लेखणीत आहे. पण असे असूनही हा लेखक या अनुभवांची खोली - उंची यांचा संपूर्ण स्वाभाविक शोध घेऊ शकत नाही असं दिसतं. याचं कारण म्हणजे रचनेविषयी बाळगलेली अवास्तव सावधगिरी आणि विशिष्ट परिणाम साधले जाण्याची लेखकाची उघड अपेक्षा. यांमुळे मूळ अनुभवाचं स्वरूप शोधण्यात लेखक अपुरा पडतो. अशा प्रकारच्या लेखकाच्या उघड अपेक्षा ' वखार ',' मुद्दा',' बाळा पाडा ' या चांगल्या कथाही एक प्रकारच्या ठोक पातळीवर आणून ठेवतात. ' गाळ ' ही मात्र ' लेखका ' च्या कचाट्यातून सुटलेली एक चांगली कथा. बहुतेक सर्वच कथा खेड्यातल्या अस्सल व्यक्तिरेखा उभ्या करतात.

' बाळा पाडा ' मधला बापू, 'मोट' मधला बाबू, ' धुणं ' मधला येशा, 'माघारी ' मधला म्हातारा, 'बरातीचा शालू ' मधली अंजना अशा कित्येक व्यक्तिरेखा ठसठशितपणामुळे लक्षात राहण्यासारख्या आहेत. ' राजावाणी', माणूस', 'मुंडरी', 'सासुरवाशीण ', या कथांतलं काहीसं नाट्यछटेसारखं तंत्र उल्लेखनीय आहे. नाट्यगुण हा बहुतेक सर्वच कथांत आढळतो. ' धुणं ',' वखार ',' चटावलेला ', ' मुद्दा ', ' बाळा पाडा ', ' माघारी ' या कथा या दृष्टीनं पाहण्यासारख्या आहेत. नाट्य आणि रचना यांची या लेखकाची जाणीव पाहता यानं पुढंमागं नाटक लिहिल्यास तो नाटककार या कथाकाराहून खूप सरस होईल असं वाटतं. स्वत:च्या दोषांवर विजय संपादण्याचा तो एक मार्ग होऊ शकेल.

लेखकाचं समृध्द अनुभवविश्व, सूक्ष्म निरीक्षण आणि गाढ संज्ञाशीलता पाहता या लेखकाचा वकूब प्रत्यक्षात उतरतो त्याहून मोठा आहे हे जाणवतं. सर्वच कथांमधली ग्रामीण शैली हा अलीकडच्या ' ग्रामीण ' कथांच्या संदर्भातला वेगळेपणा. परिशिष्टात स्वाभाविकतेला लेखकानं दिलेलं महत्त्व योग्यचं आहे. ' कथा ' ही एकच यातली ' ग्रामीण ' नसलेली कथा. संग्रहात अगदी वेगळीच पडणारी. मनाच्या सूक्ष्मतेवर लक्ष केंद्रित करणारी, ' अशी रचना करून घ्यावी ' हे यातलं वाक्य या कथेच्या संदर्भात जरी नसलं तरी संग्रहाच्या दृष्टीनं लक्षणीय आहे.

--- ००० ---

बारा रामांचं देऊळ

लेखक - सरिता पदकी,मौज प्रकाशन,पृ.१४९,किं.रु.५

हा एका ' लेखिके ' चा कथासंग्रह. ज्या ज्या कथांतून प्रथमपुरुषी निवेदन आहे तिथे ' मी ' ही व्यक्ती स्त्रीच आहे. इतर कथांत स्त्री पात्रंच महत्त्वाची आहेत. लग्न, मुलं, नातीगोती हे सर्व जग या कथांत म्हणूनच महत्त्वाचं.

काही कथांमधली तांत्रिक प्रयोगशीलता उल्लेखनीय आहे. एक प्रकारच्या नुसत्या ' अवेअरनेस ' ठेवण्याच्या तंत्रानं एक समर्थ तटस्थपणा येतो आणि सूचकतेची क्षमता वाढते. उदा.' बारा रामांचं देऊळ ', ' अधू माणसांचं घर ', आणि ' आटापिटा. '

.

' वाटचाल ' ही या कथासंग्रहातली लेखिकेचं सामर्थ्य पूर्णपणे दाखवणारी कथा. जन्म, मृत्यू आणि एकाकीपणा या तिन्ही गोष्टी एकवटून कथा गोठवल्यासारख्या आकारात एक जोरदार वास्वत सांगून जाते. ' नुसतं आपलं फरशीला धरून पडून राहायचं ! ' हे वाक्य लेखिकेच्या समर्थ अशा सूचक शैलीचं उत्तम उदाहरण. ' ट्रिप' ही आई, मुलगा, बाप यांच्या नात्यांतले सूक्ष्म हेलकावे दाखवून जाणारी आणखी एक चांगली कथा.

' पुनर्जन्म ', ' रात्र', असंबध्द ' आणि ' अर्धा दिवस सुट्टी' याही यशस्वी कथा. विशेषत: ' पुनर्जन्म ' मधलं चढवत नेलेलं ' आयडेन्टिफिकेशन ' भेदक आहे. ' घटस्फोटाची गोष्ट ' त्या मानानं सामान्य वाटते. दीर्घ आणि घटनाप्रधान कथांमधे ' फुगे ' आणि ' दंश ' अधिक सरस उतरलेल्या. लेखिकेच्या सूक्ष्म-तटस्थ दृष्टीचा स्पर्श सगळयाच कथांना आहे. सूचकतेचं सामर्थ्य हे या लेखिकेचं मुख्य वैशिष्ट्य असल्यानं आकारानं लहान असलेल्या ह्या कथा अधिक जोमानं भिडतात.

(किर्लोस्कर, फेब्रुवारी १९६८)

--- ००० ---

नवी प्रकाशने

निवडक एकांकिका - १९६५

संपादक - प्रा.श्री.र.भिडे, सोमय्या पब्लिकेशन्स लिमिटेड, मुंबई.पृष्ठे २८३, कि.रु.१२

एकांकिका हा खरोखरच मराठीतला एक उपेक्षित साहित्यप्रकार. त्या दृष्टीनं पाहता प्रा.श्री.र.भिडे यांचा हा एकांकिकामालेचा वार्षिक उपक्रम अत्यंत महत्त्वाचा. निवडीबद्दल मतभेद होणं संभवनीय असलं तरी एकंदर निवड साक्षेपानं केलेली आहे हे जाणवतं. ज.दि. दांडेकरांच्या ' नादी नवरे ' -- पासून ते विजय तेंडुलकरांच्या ' काही खरं नव्हे !' पर्यंत वेगवेगळया तऱ्हेच्या एकांकिका यात समाविष्ट आहेत आणि या अर्थानं हे १९६५ च्या एकांकिकांचं प्रातिनिधिक स्वरूप. सामाजिक, ऐतिहासिक, रहस्यमय, प्रहसनात्मक आणि प्रायोगिक या सर्व तऱ्हांचं प्रतिनिधित्व या संग्रहात आहे.

विजय तेंडुलकरांची 'काही खरं नव्हे ' ही एकांकिका सर्वात सिध्दहस्त आहे. कमलाकर हा एक मध्यमवर्गीय नवरा. त्याच्या लग्नाचा वाढदिवस. वेणीबिणी घेऊन घरी येतो तर बायको पाकक्रियेत मग्न. आणि मग त्याच्या कल्पनेतली त्याची ' रोमँटिक ' बायको आणि ' वस्तुस्थिती ' यांच्या संबंधात जे एक विलक्षण नाट्य निर्माण होतं ते खास तेंडुलकरांच्या लेखणीचं वैशिष्ट्य. मोठ्या मजेदार पध्दतीनं त्याचा विकास होत राहतो. पण या ' मजेत ' कुठंतरी एक

अस्फुट वेदना असते, रुखरुख असते -- आणि म्हणूनच ' काही खरं नव्हे ! ' असं म्हणून होणारा, तडजोडी शेवट, आपल्याला एका चमत्कारिक अशा घुसमटत्या अवस्थेत सोडून देतो.

रत्नाकर मतकरींची ' रणमर्द ' ही एकांकिका फॉर्मच्या दृष्टीनं अत्यंत महत्त्वाची. त्यांच्या संवादांतून (आणि सूचनांतूनही) होणारी वातवरणनिर्मिती चांगलीच भेदक आहे. वसुधा पाटील यांची ' एकटा ' ही एकांकिका एक भरघोस असा भावनात्मक अनुभव आहे, पण एक बऱ्यापैकी मेलोड्रॅमेटिक एकांकिका यापलीकडे तिचं श्रेय जात नाही. प्रभाकर पाटील यांची ' बळी ' ही एकांकिका मात्र भावना आणि रहस्य यांच्या संयोगाच्या संयत पण तीव्र अशा वातावरणातून एक जबरदस्त थीम सांगून जाते. यातली तंत्राची हाताळणीही मराठी एकांकिकेच्या विकासाच्या संदर्भात महत्त्वाची ठरावी. (कल्पना परकीय ते सोडा).

अनिरुध्द पुनर्वसूंची ' डाकीण ' एक भयानक सुन्नपणा निर्माण करते. बाकीच्या नवरे, चिमोटे, वैष्णव, सिनकर आणि दांडेकर यांच्या एकांकिका आपल्या ' ठीक ' या सदरात येतील. श्रीकांत सिनकर यांच्या ' पेटलेली अमावास्या ' या एकांकिकेतल्या रहस्यातली (हिंदी रहस्यपट टाईप) हवा सुरुवातीला जे एकांकिकेला लागणारं सामान दिलं आहे ते वाचून निघून जाते. प्रयोगेच्छू लोकांच्या सोयी ध्यानात धेणं हे संपादकांचं स्तुत्य कर्म. पण एकांकिकेतल्या उत्सुकतेची हानी न होण्याच्या दृष्टीनं हा भाग शेवटी टाकता येणार नाही काय ? ' १९६६ ' मधे या सूचनेचा विचार होईल अशी आशा आहे. १९६५ साली प्रसिध्द झालेल्या एकांकिकांची सूची पुस्ताकच्या शेवटी दिलेली आहे. अभ्यासकांच्या आणि उत्सुक वाचकांच्या दृष्टीनं हा एक उपयुक्त भाग. एकूण प्रा.श्री.र.भिडे यांचं हे वार्षिक म्हणजे दर वर्षी मराठीतला एक ' प्रसंग ' ठरणार अशी खात्री वाटते.

--- ००० ---

मनोरा

कवयित्री - पद्मा लोकूर. मौज प्रकाशन गृह, मुंबई.पृ.८२, किं.रु.४

या संग्रहातल्या कवितांतून नेहमी येणारे काही शब्द--डोळे (पापणी),श्वास,फिक्कट (पुसट),तळ (खोल),कळी (पाकळी,फूल) ,अंधार (रात्र), काजवे, कापूर,थेंब,ओठ, डोह (जळ), दंव, देठ, काठ, स्पर्श, तुंब,(तुडुंब), तडा, सूर, स्वप्न, बोट, क्षण, लाट, शून्य, रिक्त, धुके आणि व्यथा -- या पंचवीस एक प्रतिमांचं विश्व हेच यांतल्या कवितांचं विश्व आहे. यांतले एक वा अनेक शब्द संग्रहातल्या जवळजवळ प्रत्येक कवितेत आहेत. त्यांतूनच कवयित्रीचं संज्ञाशील मन

वेगवेगळया अनुभवांचे आकार घेत राहतं, एक प्रकारचं ' निजगुज ' करीत राहतं. यात काहीसं गूढ, काहीसं हरवलेपण आणि काहीसा

(उप) भोग असतो. अनेक संवेदना आणि एक भावानुभव यांच्या एका सखोल सरमिसळीतून कविता आकाराते आणि या अर्थानं दोन प्रतिमांमधलं (वा शब्दांमधलं) अंतर ती भाववृत्ती भरत असते आणि प्रत्यक्ष शब्दांमधून ' सदेह ' होत असते. आणि याच अर्थानं ' या शब्दाचा त्या शब्दाशी, चिरा सांधुनी घेते आहे ' हे खरे आहे. कवयित्रीचं भावविश्व मर्यादित आहे आणि तसंच तिचं माध्यमही. पण या मर्यादेतल्या असंख्य छटा आणि बारकावे ती दाखवते. पण तरीही बऱ्याच कवितांच्या समान तंत्रामुळे संग्रहाला काहीसा ' कंटाळयाचा शाप ' मिळतोच.

कवयित्रीच्या अनुभवांची जात ही नाजूक, काहीशी हळवी पण आवेगमय आहे. ' कहाणी', ' महामूर बरसात ', ' ती शक्ती ', ' क्षितीजाच्या रेषेपाशी ', ' मनोरा ', ' बर्फ-गारव्याची रात्र ', ' मंतरलेली वाट ', ' जळात उतरे सांज कापरी ', ' होते मनी ',' तर', नकार ', ' तळ नसलेला तळ', ' झुला ' ह्या या संग्रहातल्या काही चांगल्या कविता. अनुभवांची सूक्ष्म जाणीव आणि तरल संज्ञाशीलता यांच्या संयोगानं पद्माबाईंची कविता मराठी कवितेत आपला असा एक ' मनोरा ' रचीत आहे खास.

(किर्लोस्कर,मार्च १९६८)

--- ००० ---

दुसरा पक्षी

कवी - पु.शि.रेगे, मौज प्रकाशन,पृ.६७, कि.रु. ४.५०

पु.शि.रेग्यांच्या कवितेचं एक अत्यंत महत्त्वाचं वैशिष्ट्य र.कृ.जोश्यांनी या संग्रहाच्या मुखपृष्ठात पकडलेलं आहे. 'समुद्राचे काठ किंचित् सरकतात ' हा शब्दसमुच्चय किंवा संग्रहाच्या सुरुवातीलाच छापलेली 'पक्षी जे झाडावर गाणे गातो' ही कविता यांमध्ये हे वैशिष्ट्य प्रकर्षानं ग्रथित आहे. या वैशिष्ट्याला शोभादर्शकाची उपमा देता येईल. एकच कविता असंख्य पॅटर्न्स देत राहते. यामुळं रेग्यांची कविता नेहमीच अत्यंत सळसळती, चैतन्यपूर्ण अशी वाटते.

मी जे कधीच बोललो नाही
त्याचे झाले तीन शब्द --
एक माझा, एक तुझा, एक कुणाचाच नाही.
जो कुणाचाच नव्हता

त्याला मी आता पढवले आहेत तीन शब्द --

एक तुझा, एक माझा, एक कुणाचाही.

ही कविताही या दृष्टीनं पाहण्यासारखी आहे. ही कविता या संग्रहात आणखी एका दृष्टीनं वैशिष्ठ्यपूर्ण आहे. या कवितेत इंद्रियगम्य असा एकही शब्द (प्रतिमा) नाही. 'तू-मी ' च्या संदर्भात विचार-भावना यांची एक गुंतागुंतीची जाणीव या कवितेत व्यक्त केलेली आहे. काव्याचा औपपत्तिक विचार करणाऱ्यांच्या दृष्टीनं ही कविता महत्त्वाची ठरावी. 'ऋग्ऋ प्रेमा, मग काहीही करा ', ही कविताही या दृष्टीनं पाहण्यासारखी आहे.

रेग्यांची ' पुष्कळा ' शब्दकळा, त्यांचा ढंग, लय यांचा प्रत्यय त्यांच्या याही संग्रहात येतोच. अगदी मोजक्या शब्दांत खूप काही सामावणं हे या संगहातल्या सर्वच कवितांचं वैशिष्ठ्य. समजून घेणं आणि जाणवून घेणं या जर वाचकाच्या संदर्भातल्या दोन महत्त्वाच्या प्रक्रिया असतील, तर बऱ्याच वेळा रेग्यांच्या प्रतिमा जाणवून घेण्यासाठीच असतात असं वाटतं. म्हणजे त्या प्रतिमांवरून काही वेगळे संकेत - प्रतिध्वनी आपल्या मनात प्रयत्नपूर्वक निर्माण करत जाणं हे अशा कवितांच्या संदर्भात चुकीचं ठरतं. ' तळयात पाणी पाण्यात फूल ' ही कविता या दृष्टीनं पाहण्यासारखी आहे. ही एक ' साधी ' कविता आहे. या साधेपणाचा प्रत्यय रेग्यांच्या बहुतेक कवितांतून येतो. स्वाभाविकता आणि सहज दृष्टिकोण यांमुळं हा साधेपणा येतो आणि कुठल्याही मोठ्या कवीचं हे एक लक्षण आहे. (अर्थात् ' साधी कविता ' सोपी ' असेलच असं नाही.)

कवितांचे तीन गट करण्याची कल्पना मात्र अगदीच ढोबळ आहे. या वेगवेगळया गटांतल्या वेगवेगळया कवितांत 'गृहीत ' धरण्याजोगं सूत्र वगैरे आहे की काय याबद्दल शंका वाटते. अशा प्रकारची ' सजावट ' करण्याची खरं म्हणजे काही जरूरी नव्हती.

--- ००० ---

करपध्दती व राष्ट्रीय अर्थव्यवस्था

ले.हेमलता राइरकर,समाजप्रबोधन संस्था, पृ ८३,किंमत रु १.२०

राष्ट्रीय अर्थव्यवस्था पुस्तकमालिकेतील हे पहिले पुस्तक. नागरिकाला राष्ट्रीय दृष्टिकोणाचा परिचय होण्याच्या दृष्टीने ही माला आखलेली आहे. नियोजनबध्द आर्थिक विकासाचा प्रयत्न यशस्वी होण्याच्या दृष्टीने लोकांचे अधिकाधिक सहकार्य मिळणे आवश्यक. त्या दृष्टीने सामान्य माणसाला राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या वेगवेगळया अंगांचा व त्यातील प्रश्नांचा

परिचय होणे महत्त्वाचे. या छोट्या पुस्तकात अर्थसंकल्पाची भूमिका, करचिकित्सा, भारतातील कर-आकारणी, सरकारी खर्च -- या गोष्टींबद्दल विवेचन केलेले असून पुस्तकाच्या शेवटी निरनिराळया अंदाजपत्रकांचे, उत्पन्नाचे, खर्चाचे असे तक्ते दिलेले आहेत. हा विषय थोडक्यात, सुबोधपणे लोकांपुढे ठेवल्याबद्दल हेमलता राईरकर यांना धन्यवाद.

--- ००० ---

स्वप्नगंधा

लेखक - प्रकाश कामतीकर, प्रकाशक - प्र.भा.कामतीकर, पृ.९७, किंमत रु.४

या ललित लेखसंग्रहाचे नाव त्या लेखांचं स्वरूप सांगण्याच्या दृष्टीनं अन्वर्थक आहे. (स्वत: लेखकानंच काढलेलं साधं, एकमेकात मिसळणाऱ्या आकाराचं रंगीबेरंगी मुखपृष्ठही.) कामतीकरांमधे एक प्रकारची गंभीर चिंतनशीलता आहे हे खरं आहे ; पण ती ते ' हळव्या विभ्रमा 'च्या नादी लागून वाया घालवतात. मनावर ठसतो तो भाषेचा फुलोरा आणि प्रतिमांचे कारंजे. अर्थात इतक्या प्रतिमांना, असोसिएशन्सना स्वप्निलपणे का होईना पण हाताळता येणं हे कर्तृत्वच ! तेवढं श्रेय अर्थात कामतीकरांना कुणीही देईल. शिवाय वाक्यांच्या विशिष्ट (काव्यात्म ?) रचनेनं एक प्रकारची वृत्ती निर्माण करण्यातही ते तयार आहेत. (थोड्याफार प्रमाणात सर्वच लेखांचं तंत्र समान आहे.) आशयापेक्षा माध्यमाला महत्त्व येण्याचा हा जो प्रकार इथे घडतो त्यामुळं ' आपले सामर्थ्य, नीट पारखून वापरण्याचा प्रयत्न मात्र त्यांनी केलेला नाही.'-- हे कुरुंदकरांचं प्रस्तावनेतलं म्हणणं पटतं. आपलं सामर्थ्य जेव्हा हा लेखक पारखील तेव्हा काहीतरी फार महत्त्वाचं लिहील असं वाटतं -- आणि या अर्थानं हा संग्रह लेखकाबद्दल अपेक्षा निर्माण करणारा.

(नवी प्रकाशने, किर्लोस्कर, एप्रिल १९६८)

--- ००० ---

हरवले ते

ले. उध्दव ज.शेळके - कॉन्टिनेंटल प्रकाशन,पृ २४९,कि.रु.६

' तोवर इकडे काय घडत होते ' तंत्रांन लिहिलेली एक सामान्य कादंबरी. अत्यंत ढिसाळपणे ' रचलेली ', लेखकाच्या मर्जीवर चालणारी. एका अपघातामुळं सदाशिव आपल्या बायको-मुलांना दुरावतो. त्यांच्या आयुष्याच्या दोन समांतर रेषा लेखक आपल्यापुढं ठेवतो. सदाशिव कीर्तिशिखराकडे चढत जातो. त्याची पत्नी, निर्मलाचं पतन होत जातं.

तिला झालेल्या अनौरस मुलामुळं सुप्रसिध्द अभिनेते टी.सदानंद म्हणजे तिचा पती सदाशिव हे ओळखूनही ती त्याला सामोरी जाऊ शकत नाही. ' हरवले ते ' कधीच ' गवसत ' नाही. दोघांनाही. शेळक्यांच्या नावावर आणखी एक पुस्तक जमा होणं एवढंच या कादंबरीचं ' श्रेय' . वेळकाढू वाचकांनासुध्दा या कादंबरीबद्दल कितपत आकर्षण वाटेल याची शंकाच आहे.

--- ००० ---

ब्रह्महत्त्या

ले.रत्नाकर मतकरी -- पॉप्युलर प्रकाशन,पु.६१,किमत ४ रुपये.

एका इस्टेटवाल्या माणसाला आपली इस्टेट लंपास करण्यासाठी आपला खून करण्यासाठी कुणीतरी कट रचतंय असा उगीचच संशय -- हा विषय. आपणच आपल्या कल्पनेनं निर्माण केलेल्या गुंत्यात माणसं अडकत जातात. जे कधी अस्तित्वातच नव्हतं त्यासाठी खर्ची पडतात. विषय खरोखर लेखकाला आव्हान देणारा. मतकरींनी व्यावसायिक यशाच्या अपेक्षेनं ' करमणुकी ' ची काळजी घेतली याबद्दल काही म्हणायचं नाही, पण नाटकासाठी असा विषय घेणाऱ्या माणसाचा प्रत्यक्ष नाटक लिहितानाचा एकंदर दृष्टिकोण वरवरचाच राहावा याचं आश्चर्य वाटतं. त्यामुळं तिसऱ्या अंकातला दुसरा प्रवेश (नाटकाचा शेवटचा भाग) हा चांगला लिहिलेला असूनही अपेक्षित परिणाम साधू शकत नाही. व्यवसाय आणि विषयाचं मोठेपण यांच्यातला लेखकाच्या मनातला गोंधळ स्पष्टपणे जाणवतो. या गोंधळामुळंच हे एक चांगलं होऊ शकलं असतं असं नाटक फसलेलं आहे. (नाटकाला व्यावसायिक यशही फारस मिळालं नाही ही या नाटकाच्या शोकांतिकेची दुसरी बाजू.) उरतं ते कल्पनेचं नावीन्य, बरे संवाद आणि लेखकाच्या कसलेल्या हातानं पेललेली प्रसंगांची उतरंड. पण एक कलाकृती म्हणून याचं कौतुक कितीसं करायचं ?

--- ००० ---

मळणी

ले.रा.रं.बोराडे - मौज प्रकाशन, पृ.१७९,कि.६ रु.

बोराडे यांची कथा मुख्यत: स्थितिशील आहे. माणसाचा स्वार्थ, त्याचे हितसंबंध आणि त्याच्या स्वत:च्या संदर्भातल्या अपेक्षा या गोष्टी गृहीत धरल्या तर निरनिराळया नात्यांतून, संबंधातून ज्या काही बिनतोड अशा परिस्थिती निर्माण होतात त्या या कथांतून प्रामुख्यानं जाणवतात. म्हणून बोराड्यांच्या कथेचा परिणाम हा बऱ्याच वेळा एकंदर सूत्रापेक्षा निर्माण होणाऱ्या परिस्थितीतच अधिक साठलेला असतो असं दिसून येतं. माणसं एक प्रकारच्या चमत्कारिक

गोंधळात आणि गुंत्यात कशी सापडतात यापेक्षा त्याचं एकंदर स्वरूप कसं आहे हे इथे अधिक अर्थपूर्ण ठरतं. आणि म्हणूनच बोराड्यांची कथा ही त्यातल्या कथेपेक्षा एक अवस्था म्हणून अधिक अर्थपूर्ण ठरते. त्या अवस्थेचं यथार्थ आकलन होण्यासाठी 'कथा ' असते. ('पौरुष ' सारखी एखाददुसरी घटनाक्रमाचं महत्त्व असलेली कथा सोडली तर इतर बहुतेक कथांतून हे वैशिष्ट्य जाणवतं.)

यामुळं बऱ्याच वेळा बोराड्यांच्या कथेला द्वंद्वात्मक स्वरूप येतं. ' चुंबळ', ' लगीन ', ' माघारी ', ' सौदा ', या कथा या दृष्टीनं पाहण्यासारख्या आहेत. बऱ्याच कथांचा शेवट ते एक प्रकारच्या पराभवात्मक स्थितीत करतात. त्यांच्या बहुतेक सर्वच नायकनायिका या पराभूत व्यक्ती आहेत.

या सर्व गोष्टींचा विचार करता बोराड्यांच्या कथेचं एक सर्वसामान्य तंत्र ठरून गेल्यासारखं जाणवायला लागतं. हा अर्थात् ते रंगवत असलेल्या मानवी जीवनाचा आणि त्यांच्या स्वत:च्या दृष्टिकोणाचा परिपाक आहे हे जरी खरं असलं तरी यातूनच लेखकाच्या मर्यादा स्पष्ट होण्याचा आणि स्थिरावण्याचा धोकाही नाकारता येणार नाही. लेखक,वाचकाला ' सापडू ' लागला की काय अशी शंका निर्माण होणं हे काही सुचिन्ह नव्हे -- आणि बोराड्यांमधे तर चांगल्या कथाकाराच्या शक्ती आहेत !

(नवी प्रकाशने, किर्लोस्कर, मे १९६८)

--- ००० ---

रंगभूमीवरील नेपथ्य

लेखक - पु.श्री.काळे, व्हीनस प्रकाशन, पृ.९६, कि.रु १५

हे लेख प्रथम 'मनोहर' मासिकातून क्रमश: प्रसिध्द झाले. व्हीनस प्रकाशननं ते पुस्तकरूपानं एकत्र आणले आहेत ही एक फार मोलाची कामगिरी आहे. नाट्याच्या तांत्रिक अंगांची जाण वाढवण्याच्या दृष्टीनं अशा पुस्तकांची मराठीत जितकी भर पडेल तितकी हवीच आहे. श्री.काळयांचा प्रदीर्घ अनुभव आणि त्यांची अभ्यासू वृत्ती यांचा हा परिपाक आहे. श्री.केशवराव भोळयांची प्रस्तावना हे या पुस्तकाचं आणखी एक महत्त्वाचं भूषण. एकंदर विवेचनाला पूरक अशी अनेक छायाचित्रं पुस्तकात दिलेली असल्यानं पुस्तकाचं स्वरूप अधिक सरस झालेलं आहे. एका मोठ्या कालखंडांचा आवाका असलेलं हे पुस्तक नेपथ्य कलेच्या विकासाची दिशा समजण्याच्या दृष्टीनं अत्यंत महत्त्वपूर्ण असं झालेलं आहे.

--- ००० ---

ही चौकट वाटोळी

ले. शाम फडके, प्रेस्टिज प्रकाशन, पृ.८८, कि.रु.४.

राज्य नाट्य महोत्सवात गाजलेलं असं हे नाटक. नाटकाचं पुस्तक वाचणं आणि त्याचा प्रत्यक्ष प्रयोग पाहणं यात जमीनअस्मानाचं अंतर आहे असे आपण म्हणतो. पण कादंबरी वाचतानाचा आणि नाटक वाचतानाचा वाचकाचा दृष्टिकोण काही प्रमाणात का होईना पण वेगळा असेल तर नाटक म्हणून त्याचं मूल्य वाचकाला सांगता यावं असं वाटतं. शिवाय निकृष्ट दर्जाचं लिखाण जर रंगभूमीवर प्रभावी होत असेल, तर ते काही लेखकाचं कर्तृत्व मानता येणार नाही. नाटकाच्या स्क्रिप्टचं परीक्षण हे नाटकाच्या लेखकाच्या कर्तृत्वाचं मोजमाप करण्यासाठी असतं. आणि यासाठी नाटकाला प्रयोगापासून विभक्त करायला हरकत नसावी असं वाटतं.

जुगारी मवाल्याशी एका मुलीचं लग्न ठरतं. तिचा एक भाऊ तसाच वाया गेलेला. बाकीची सगळी माणसं प्रतिष्ठा वगैरे गोष्टींना जपणारी. पण मुलीचा निश्चय कायम. म्हणजे विषय तसा थोडाफार ' एक हट्टी मुलगी ' त येऊन गेलेला. त्यात निदान तेंडुलकरांचा खऱ्याखोट्यातल्या संषर्षाला सामोरं जाण्याचा प्रयत्न तरी होता. पण इथं लेखक मूळ संघर्षापासून अगदी लांब राहतो, अगदी सामान्य मुद्यांवर सामान्य बुध्दीनं पानांच्या पानं वाया घालवताना आढळतो. म्हणजे संघर्षाचं एकंदर स्वरूप उलगडण्याची आपली ताकत नाही हे लेखकानं ओळखलं असावं. त्याच्या दृष्टीनं नाटक तीन अंकी होणं हे महत्त्वाचं. यातून अर्थातच अपरिहार्यपणे, लेखक पात्रांच्या सूक्ष्म विशेषांपासून दुरावलेला आढळतो. बहुतेक पात्रं ही ' ठोक ' आहेत. 'मधू ' हे पात्र आजचा एक बीटनिक समर्थपणे उभ करू शकलं असतं. ' जयू ' ला जर आवश्यक ते महत्त्व दिलं असतं तर नाटकात आवश्यक त्या गांभीर्याची भर पडली असती. इथं मात्र फक्त जुगाऱ्याच्या मन:स्थितीचं समर्थन आणि जुगाऱ्याशी लग्न करण्याच्या जयूच्या निश्चयाचं उदात्तीकरण एवढंच झालेलं दिसतं.

--- ००० ---

गोफ

ले..पद्माकर गोवईकर, बा.ल. पाठक प्रकाशन, पृ.१७५, कि रु ४.

चांगल्या कलाकृती निर्माण व्हायला केवळ सराईत हात पुरत नाही हे दाखविणारा कथासंग्रह. गोवईकरांची भाषा ओघवती आहे, प्रसंगांची मांडणीही त्यांना जमलेली आहे असं म्हणता येईल. ' तणावा ' ' गोफ ' यांसारख्या कथांतून

जोमदार विषयांना सामोरं जाण्याची त्यांची वृत्तीही दिसून येते. आणि इतकं असूनही त्यांच्या कथा सामान्यच राहतात. त्यांची सर्वच चित्रणं वरवरची वाटतात. सूक्ष्मतेकडं, विषयाच्या तळाकडं जाण्याचे त्यांचे प्रयत्न ठिकठिकाणी दिसतात, पण ती त्यांच्या लेखणीची स्वाभाविक ताकत नसल्यानं ते प्रयत्न कृत्रिम वाटतात. हाच खुजेपणा त्यांच्या विनोदी कथांतूनही नेहमी जाणवतो.

--- ००० ---

गोदी

कवी - वसंत दत्तात्रेय गुर्जर, राजा ढाले प्रकाशन,पृ.१६, कि.रु.९९ पैसे.

' आयुष्यातल्या पराभवाचं सामर्थ्य घेऊन मी उभा आहे ' असं म्हणणारा हा कवी. यात पराभवापासून काहीसं परकं झाल्याचं किंवा त्याच्यावर विजय मिळवल्याचं सांगण्याचा त्याचा हेतू असावा. मानसिक दडपण ही एक शक्ती होऊ शकते. भावनांचं दडपण, विचारांचं दडपण, दु:खाचं दडपण - अशा अनेक प्रकारच्या दडपणांतून कलात्मक उद्रेक होऊ शकतात. यश किंवा अपयश, विजय किंवा पराभव हीही दडपणंच. अधिक संवेदनशील माणसाला ती अधिक प्रखरतेनं जाणवतात आणि तशी जाणीव ही एक शक्ती होऊ शकते.

व्यक्तीच्या संदर्भात याचा विचार करायचा झाल्यास याला खरोखरच सामर्थ्य म्हणता येईल का हा प्रश्नच आहे. पण निर्मित कलाकृती या एका विशिष्ट मर्यादेपलीकडं (म्हणजे उदा. एका विशिष्ट कवीनं लिहिलेली कविता एवढ्या वस्तूस्थितीपलीकडं) व्यक्तिनिरपेक्ष असतात. वाचकाचा कलाकृतीशी संपर्क हा एका विशिष्ट अनुभूतीचं संपूर्ण दर्शन असाच असतो. त्यामुळंच कवितेत गृहीत असलेलं मन जरी ' दुर्बल ' असलं तरी कविता ' सामर्थ्यवान ' असू शकते.

आता प्रश्न असा की या कविता संग्रहातल्या कविता ' सामर्थ्यवान ' आहेत का ? या संग्रहात एकूण पंधरा कविता आहेत. सगळया कवितांचं तंत्र समान आहे. त्या एकाच ॲटिट्यूडनं लिहिलेल्या आहेत. फक्त कवीची काव्यगत व्यक्तित्वं आणि अनुभव निरनिराळे आहेत असं म्हणता येईल. या सर्वच कवितांच्या तंत्राचं प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे अनुभवाची मांडणी विकीर्ण स्वरूपात करणं. यातूक एक प्रकारचा तिडीकयुक्त गोंधळ जाणवतो हे खरं असलं तरी याला क्लृप्तीचं स्वरूप आलेलं आहे असं वाटतं. कारण एकत्रितपणे जर या कविता पाहिल्या तर त्या ही 'शिस्त' पाळताना दिसतात. त्यांत स्वाभाविकतेचा अभाव जाणवू लागतो आणि कविता ही एक ' सवय ' वाटू लागते. सवयीत असलेलं वेगळेपण एकदा कळलं की मग अर्थातच फक्त पुररावृत्ती उरते.(प्रत्येक कवीच्या व्यक्तित्वानुरूप त्याच्या काव्यावर असणारा त्याचा असा ठसा आणि ही ' सवय ' यातला फरक इथं लक्षात घ्यावा.)

पराभवातून निर्माण झालेली तिडीक आणि आत्मकीवेचं अहंकारात्मक स्वरूप यांचं मिश्रण असं या कवितांचं वर्णन करता येईल. ' विश्वातील विव्हळ माणसांना ' किंवा ' पराभवाचं सामर्थ्य ' इत्यादी उद्गारांतून हे दिसून येतंच. त्यांच्या संवेदनशीलतेची ताकत मान्य करूनही, त्यांच्या मर्यादाच या कवितांतून अधिक स्पष्टपणे जाणवतात असं म्हणावंसं वाटतं.

मलपृष्ठावर कुंडली कशाला ? कवीची कुंडली कुणी मांडू नये म्हणतात म्हणून ? गोषवाऱ्याला फोलपट ठरवण्यासाठी ? या क्षेत्रात स्वत:बद्दल काही अपेक्षा निर्माण करण्याचा एक प्रयत्न म्हणून ? की विशिष्ट ज्योतिषाचार्यांची जाहिरात करून त्यात पुस्तक छापण्याचा खर्च काढण्यासाठी ? आणखी काही शक्यता निघू शकतात, पण इथं एवढ्या पुरेत.

काहीतरी वेगळं करण्याचा अट्टाहास सोडल्यास हा कवी काहीतरी वेगळं करू शकेल असं वाटायला लावणारा हा संग्रह. कवीची कुंडली कुणी मांडावी ?

(नवी प्रकाशने, किर्लोस्कर,जुलै १९६८)

--- ००० ---

देवाचा शब्द

लेखक - मनोहर शहाणे, मौज प्रकाशन, पृ.११९, किंमत ६.७५ रुपये

ही लघुकादंबरी की लघुकथा हा एक वेगळाच मुद्दा आहे. तो राहू द्या. अपत्यहीनतेचं दु:ख हा विषय. हे दु:ख शहाण्यांना ज्या भरीवपणानं आणि सूक्ष्मपणानं उभं करायचं आहे त्यासाठी ११९ पृष्ठं आवश्यक आहेत एवढं तरी आपल्याला मान्य करावं लागेल. आता यात गंमत अशी होते की ज्या गांभीर्यानं,वृत्तीनं शहाणे निरनिराळया तपशीलांची दखल घेत असतात ती वृत्ती जर वाचकात निर्माण झाली नाही किंवा वाचक थोड्या वेगळया स्तरावरून या एकंदर प्रकाराकडे पाहू लागला तर मग हे सगळं केविलवाणं किंवा कंटाळवाणं होण्याची शक्यता आहे. (कोणी एक टीकाकार या कादंबरीचा ट्रॅंक्विलायझर पिलसारखा वापर करू लागले आहेत असं ऐकतो.) हे वाचकाचं अपयश की कलावंताचं हा एक विचारार्ह प्रश्न ठरावा. मूल्यमापनाच्या दृष्टीनं हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे.

आता कादंबरीशी प्रामाणिक राहून जर काही बोलायचं झालं तर याबद्दल काय बोलता येईल ? आशा आणि भीती यांच्या मिश्रणापासून तो सर्वनाशापर्यंतचा हा प्रवास. हा प्रवास विश्वासार्ह वाटतो की नाही हा पहिला प्रश्न. तर वाटतो. यात काही अनावश्यक प्रसंग घुसडलेले आहेत का किंवा यात असा कोणता प्रसंग आहे का की जो या प्रवासाच्या दिशेनं पात्रांच्या अवस्थांत भर टाकीत नाही ? तर नाही. शहाण्यांची संवेदनशीलता, दु:खाला भिडण्याची क्षमता, हेही निश्चितपणे जाणवतं. असं पाहता एकंदरीत या कादंबरीला एक चांगली कादंबरी म्हणायला काही हरकत वाटत नाही.

मात्र या कादंबरीला ' थोर ' वगैरे म्हणता येणार नाही हे सरळ आहे. याचं कारण स्पष्ट आहे. एक दु:ख, एक विनाश समर्थपणे उभा करणं हा या कादंबरीचा उद्देश आहे. त्यामुळं एकूण जीवनच कुठंतरी मुळापासून हाललं आहे, काही मूलभूत प्रश्न निर्माण झाले आहेत, असं होत नाही. हे दु:ख लेखक गृहीत धरतो. (ही कादंबरी जर आत्मचरित्रात्मक असेल -- आहे असं म्हणतात -- तर लेखकाच्या जीवनातल्या व्यक्तिगत मर्यादा या कादंबरीला पडल्या असण्याची शक्यता आहे. असं होणं हे अर्थात कलावंताच्या तोकडेपणाचं निदर्शक.) यातली दोन्ही महत्त्वाची पात्रं (पति-पत्नी) या दु:खाच्या साखळीत प्रत्यक्ष अडकलेली आहेत आणि दोघांपैकी कुणातही त्याकडे थोडं अलिप्तपणे पाहण्याची ताकद नाही. दोघंही सरळ फरफटत जातात. आपल्या वाट्याला आलेल्या जीवनाच्या समोर उभं ठाकणं हे जे ' थोर ' कलाकृतीतल्या महत्त्वाच्या पात्रांचं अथवा एकंदर हाताळणीचं वैशिष्ट्य असतं ते इथं नाही. कादंबरी विवक्षिततेतच सुरू होते आणि विवक्षिततेतच संपते.

पण एक जबर दु:ख उभं करणं हेसुध्दा काही सोपं काम नाही.

--- ००० ---

स्त्रीचरित्र -- एक समुद्र

लेखक - राजाराम हुमणे, जयहिंद प्रकाशन, पृष्ठे ११३, किंमत ५ रुपये

स्त्रीचरित्राचा समुद्र. चौदा लेख. हुमण्यांना या समुद्रात पोहणं जमलेलं आहे. त्यांचा स्त्रीविषयक व्यासंग लेखालेखातून जाणवतो. हलक्याफुलक्या शैलीत या चौदा लेखांतून हुमण्यांनी स्त्री हा प्रकार व्यवस्थितपणे उलगडून दाखवलेला आहे. शाब्दिक-भाषिक कसरती आणि ढोबळ विसंगती हा विनोद अथवा हलकेफुलकेपणा. सरळसरळ विश्लेषण विनोदी कसं होणार ? हाताळणीच्या पध्दतीमुळं रंजकपणा येतो. स्त्रीमनाचं एक रंजक विश्लेषण म्हणून अवश्य वाचनीय. वसंत सरवट्यांची चित्रं वसंत सरवट्यांचीच !

--- ००० ---

संभुसांच्या चाळीत

लेखक - श्री.ना.पेंडसे, मौज प्रकाशन, पृष्ठे ८६, किंमत ३.५० रुपये.

बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार बदलणारी नैतिक मूल्यं, त्यातून निर्माण होणारी तेढ, संघर्ष आणि त्यांच्या निराकरणाचा मार्ग हा तसा कलाकृतीना विषय पुरवणारा माणसाच्या आयुष्यातला एक महत्त्वाचा भाग. हे नाटक नोकरी करणारी आधुनिक बायको, तिचे मित्र आणि तिचा नवरा यांच्या नात्यांतून निर्माण होणारे प्रश्न हाताळतं. नैतिक मूल्यांच्या बाबतीत अधिक स्थितिशील (म्हणून संशयी) असणाऱ्या मध्यमवर्गीय समाजातच हे प्रश्न अधिक तीव्र असतात, अधिक नाट्यमयतेनं उभे करता येतात. ही संभुसांची चाळ, या प्रश्नाच्या संदर्भात पेंडशांनी दाखवलेलं या समाजाचं प्रातिनिधिक स्वरूप या दृष्टीनं उल्लेखनीय आहे.

सामाजिक प्रश्न घेऊन उघडउघड त्याबद्दल काही सांगणारी नाटकं ही तसं नवीन काही सांगण्याची शक्यता कमी असते. बदलत्या नैतिक मूल्यांची जाणीव असलेल्या समाजातल्या व्यक्ती त्याचा निर्देश करीत असतातच. तेव्हा अशा नाटकाचं यश हे निवडलेल्या प्रश्नाचं स्वरूप आणि त्याचं निराकरण आकर्षकपणे उभं करण्यात असतं, आणि पेंडश्यांना या नाटकात ते साधलेलं आहे असं म्हणावंसं वाटतं.

नाटकाच्या एकंदरच ' काही सांगण्याच्या ' स्वभावाला अनुसरून पेंडश्यांनी जाताजाता अनेक विषयांना स्पर्श केलेला आहे. शिक्षण, धंद्यातली धडपड, लग्नं जमणं- जमवणं, राष्ट्रीय एकात्मता, इत्यादी. लहान-मोठ्या अनेक पात्रांना योग्य त्या वजनानं हाताळता येणं पेंडश्यांना सहज जमलेलं आहे. नाटकाला सरळ सरळ चर्चात्मक स्वरूप आलेलं नाही हे विशेष. सारांश, एक जमलेली सुखांतिका.

(किर्लोस्कर,ऑगस्ट १९६८)

--- ००० ---

अ ब क ड इ

१ २ ३ ४ ५

...इतकं असूनही एकूण अंकांबद्दल म्हणाल तर, सगळयांच्या माथी एखादा अपरिहार्य दणका देणारं यात काहीही नाही...

ठीक आहे इतकंच !

ठठ

सबकुछ चंद्रकान्त खोत असलेल्या (म्हणजे प्रकाशक, संपादक वगैरे) ' अ ब क ड इ ' या नियतकालिकाचे पाच अंक समोर ठेवून तयार केलेला हा लेख.

’ अ ब क ड इ ’ ह्या पाच अंकांच्या बरेवाईटपणाबद्दल लिहिणं हा दुय्यम हेतू. खरं तर प्रमुख लिट्ल मॅगॅझिनवाल्यांचं, लिट्ल मॅगेझिनच्या आस्तित्वाबद्दल, साध्याबद्दल, भवितव्याबद्दल काय म्हणणं आहे हे तपासून पाहणं हा प्रमुख हेतू.

कारण ह्यातल्या ’ इ ’ ह्या शेवटच्या अनियतकालिकात प्रमुख लिटल् मॅगेझिनवाल्यांच्या मुलाखती प्रसिध्द झाल्या आहेत. त्या दृष्टीने हे महत्त्वाचे.

ठठठ
ठ

’ अबकडइ ’ या लिट्ल मॅगझिनचे हे पाच अंक. लिट्ल मॅगेझिन काढावं असा विचार असलेल्या एक वा अनेक व्यक्ती कधीकधी तसं करतात हे यातलं प्राथमिक सत्य. बाकीच्या गोष्टींची अर्थात चर्चा करता येतेच.

अ मध्ये ललित गद्य, ब मध्ये लिट्ल मॅगझीन्सची सूची, क मध्ये छत्तीस कविता, ड मध्ये मिश्र साहित्य आणि इ मध्ये लिट्ल मॅगझीन्सच्या संपादकांच्या मुलाखती -- असं या अंकांचं स्वरूप आहे. शेवटच्या अंकापासून सुरुवात करू.

या अंकात, लिट्ल मॅगझीन काढण्याची गरज, प्रस्थापितांविरुध्द लढा, संतप्तता, बंडखोरी आणि दाखवेखोरी या प्रश्नांवर अशा मासिकांच्या संपादकांना बोलायला लावलेलं आहे. अशोक शहाणे हे ’ अबकडइ ’ चे खापरपणजोबा. त्यांच्यापासून ते स्वत: खोतांपर्यंत जो तो आपापल्या खयालोंकी दुनियामे इथं गेलेला आहे.

अशोक शहाणे हा एक अव्वल स्वच्छ माणूस. असं अनियतकालिक काढायची गरज का भासली तर इतरत्र जे दिसत नव्हतं आणि जे कुठंतरी असायला पाहिजे असं वाटत होतं ते आपलं योगायोगानं जमलं म्हणून स्वत:च केलं. बाकी प्रस्थापिताविरुध्द लढा, बंड वगैरे काही उद्देश नव्हते. आता हे प्रस्थापिताविरुध्द वगैरे खास करून नसले तरी प्रस्थापितच त्यांच्याविरुध्द असून ते मोर्चे बांधतात, काही प्रकार कसे न छापले जातील याची व्यवस्था करतात वगैरे नंतर यांच्या लक्षात आलं. बरं, इतर नियतकालिकांतली बंडखोरी वगैरे त्यांचं काय तर -- आता, फक्त, तापसी, येरू, श्रीशब्द, टिंब, अबकडइ, वगैरे चाळून बघा. जो तो कामाच्या जागी निमूट अन् बाहेर या अंकांतनं बंडखोर आहे. अन् ही एवढी बोलाची बंडखोरी त्याला समाधान देते. ’’ मला वाटतं, श्री.पु.भागवत हसत असतील हा प्रकार बघून गालातल्या गालात.‘ -- असं ते एकूणच माप काढून टाकतात. या अंकात एवढे सरळसोट विचार दुसऱ्या कुणाचेही नाहीत. तर या सोप्या-परखड पार्श्वभूमीवर इतरांचा विचार करू.

खोतांमुळं ' अबकडइ ' आहे एवढा त्यांच्याबद्दलचा विचार पुरे. एरवी ' मी बराचसा बंडखोर आहे ' असं कारेकरांनी म्हटलं असलं आणि खोतांनी स्वत:च्या लिखाणाला वेगळा टाईप वापरला असला तरी एकूण फारसं तथ्य नाही.

रमेश समर्थ हेही थोडेसे असेच. 'शब्द ' च्या संपादकांचं हे शाब्दिक चऱ्हाट फार झालेलं आहे. ' घट ' हा शब्द डोक्यात आला की मातीचा घट, सोन्याचा घट, हिऱ्यामोत्यांचा, रत्नाचा आणि दगडांचा असे सगळे घट ते ओतून रिकामे करतात आणि म्हणतात, की यात नवं चैतन्ययुक्त पाणी भरलं पाहिजे. ' शारदादेवीचे प्रांगण नवकमलदलांनी सुशोभित करण्याची ' चिंता बाळगणारा हा माणूस. खालील विधाने पाहा --

' प्रस्थापनेविरुध्द लिट्ल मॅगझिन्सचा लढा नाही असे मला वाटते. कारण एस्टॅब्लिशमेंट या शब्दाचे अनेक अर्थ होऊ शकतात. एस्टॅब्लिशमेंट तर आहेच, पण ती एस्टॅब्लिशमेंट आहे त्यापेक्षा कणखर बनविणे, प्रभावी बनविणे व समाजपरिपोषक बनविणे यासाठी प्रयत्न करावे अशी माझी प्रामाणिक समजूत आहे.' आता एस्टॅब्लिशमेंट या शब्दाचे जर अनेक अर्थ होऊ शकतात तर मग कणखर आणि प्रभावी काय करायचं आहे आणि कशाचा परिपोष कसा करायचा आहे किंवा केला जातो आहे किंवा करण्याचा समर्थांचा विचार आहे ते काही ध्यानी येत नाही.

राहता राहिले मनोहर ओक, अरुण खोपकर आणि काळसेकर, गुर्जर. खोपकर यांनी खूपच गांभीर्यापूर्ण आणि विचार करायला लावणारं असं लिहिलं आहे. त्यांच्या संदर्भात काळसेकर, गुर्जर यांचं लिखाण पाहावं असे काही मुद्दे आहेत. तेव्हा त्यांचा एकत्रितपणे विचार करू.

मनोहर ओकांबद्दल स्वतंत्रपणे बोलायचं झालं तर जे काय म्हणायचं ते थोडक्यात पण स्पष्टपणे हा माणूस म्हणू शकलेला आहे. प्रस्थापिताविरुध्द लढा वगैरेबाबत तो म्हणतो, '' एक जे मला स्वत:ला पटतं ते करणं. मग लोक त्याला हळूहळू ' चळवळ ' ' लढा ' वगैरे त्यांच्या फायद्याकरिता म्हणायला लागतात. हात लांबवून पोचलो म्हणण्याचं शहाणपण न येईल तर बरं.'

लिट्ल मॅगझिन्स मधल्या साहित्यावर होणाऱ्या टीकेबद्दल बोलताना तो म्हणतो, ' सर्जनशील साहित्य म्हणाल तर या सवंग मराठीत कोण माणूस आहे ज्याच्याकडे बोट दाखवून आपल्याला सांगता येईल की हा लिहितो ? युगप्रवर्तक, सव्यसाची, युगंधर लेखक तीन दमडीला तेरा मिळतात. प्रत्येक पिढी आपले लेखक निर्माण करते. मागच्यांचं शहाणपण आणि पुढच्यांचा भरवसा तिच्या कामी येत नाही. सर्जनशील साहित्यच मुळात थोडं असतं. कारण ते वेचक असतं. पुष्कळसं फालतू निर्माण होणं यात बिचकून जाण्याचं बिलकूल कारण नाही. निसर्गात कुठेही पाहाल तर अफाटता -- विपुलता नव्हे -- तुमच्या दृष्टीस पडेल. एक्सेस ही गुणाची पावती आहे. दोष नव्हेच नव्हे.'

यावर कुणी म्हणेल की गाडगीळ, जी.ए.कुलकर्णी हे आधीच्या पिढीचे लेखक म्हटले तर त्यानंतरच्या पिढीचे लेखक कोण ? समजा कोलटकर, चित्रे, खानोलकर. त्यांच्यानंतर ? तर हे असं चालूच राहणार. ट्रॅश किती आणि काय किती याचे हिशेब पिढ्यांच्या संदर्भात मांडणं हे शेवटी नुसतं ऐतिहासिकच ठरणार. शिवाय तीनतीन पिढ्यांशी समकालीन राहणारेही निघतातच.

खोपकरांच्या मते कदाचित काळसेकर--गुर्जर यांचं म्हणणं शंकास्पदच ठरण्याची शक्यता आहे. कारण ते म्हणतात, ' खरं सांगायचं म्हणजे ज्या वेळी एकापेक्षा अधिक लोक एकत्र येऊन सत्याची घोषणा करतात तेव्हा मला जरा घाबरायला होते.' म्हणजे काही प्रश्नांची उत्तरं संयुक्तपणे देणं हे भयानकच ! म्हणूनच खोपकरांच्या आत्यंतिक व्यक्तिनिष्ठ भूमिकेबरोबर थोडाफार समूह मानणाऱ्या या दोघांचा विचार करावा असं वाटलं.

खोपकर म्हणतात,' व्यक्ती विरुध्द संख्या ही एक लढाई आहे. अनादी कालापासून चालत आलेली. पण आपल्या काळात ह्या लढाईची जी अवस्था आहे तितकी दयनीय स्थिती व्यक्तीची कधीच झालेली नव्हती. प्रचाराची प्रभावी साधने, शास्त्रांचा उपयोग, मानसशास्त्रीय छळाची साधने ह्यांच्या साहाय्याने आणि सर्वांपेक्षा जास्त म्हणजे सुघड समाजरचना ह्यांच्या साहाय्याने व्यक्तीला जवळजवळ नामशेष केले आहे.

व्यक्तीला ह्या लढ्यात फारसं काही करता येत नाही. कारण ह्या लढ्याचं स्वरूपच असं आहे, की इतरांची मदत मागणं किंवा चारचौघांनी एकत्र येणं म्हणजे व्यक्तित्व संपल्याचं कबूल करणं. प्रत्येकानं आपापला क्रूस खांद्यावर घेणं हाच एक मार्ग आहे.

त्यामुळे लहान मासिकांमागच्या लोकांनी एकत्र येणं आणि लढा देणं ही कल्पनाच तर्कदुष्ट, विसंगत आणि हास्यास्पद आहे. जे काही करायचं ते वेगवेगळं राहून. सवतासुभा राखून.'

यातली ' लढ्या ' ची कल्पना मला एका नव्या रोमँटिक वृत्तीची द्योतक वाटते. व्यक्ती विरुध्द समाज ही कल्पना खूप भव्य आहे यात शंकाच नाही. पण ही कल्पना मूळ धरते तरी कुठे हे पाहिले पाहिजे. व्यक्तीला जेव्हा स्वत:चं वेगळेपण पुसटसं का होईना जाणवतं आणि त्या वेगळेपणानं जगण्याचा तिचा जेव्हा ' प्रयत्न ' सुरू होतो किंवा जेव्हा ती त्या ' प्रयत्नात ' जगत असते तेव्हा हा ' लढा ' डोक्यात येतो. म्हणजे व्यक्ती जेव्हा आपल्या व्यक्तित्वानं पूर्णपणे जगत नसते तेव्हा या लढ्याचा प्रश्न येतो. स्वत:चे ' वेगळेपण ' समजून स्वच्छपणे आणि ' सहजपणे ' (इथे ' प्रयत्ना ' तले घर्षण नसते.) जगणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत या लढ्याचा प्रश्न नसतो.

मग समाजाच्या स्थितिशील आणि समावेशक वृत्तीत ही व्यक्ती बसत नाही म्हणून समाज कदाचित या व्यक्तीशी लढा पुकारील (किंवा भजनीही लागेल) पण तरीही तसे जगणारी व्यक्ती मात्र समाजाविरुध्द काही करण्याच्या भूमिकेत असणार नाही. सारांश, लढ्याची कल्पना ही फक्त ' अर्धवट ' व्यक्तींनाच स्फुरू शकते. 'सर्वस्वी ' व्यक्तीना नाही. त्यामुळे ' व्यक्ती ' चा काही निभाव लागणार नाही -- वगैरे आत्मकीवयुक्त (किंवा आत्मगौरवात्मक म्हणा) भूमिका घेण्यात फारसा काही अर्थ नाही.

दुसरी गंमतीची गोष्ट म्हणजे व्यक्तींनी एकत्र येणं किंवा न येणं यालाच एक महत्त्व अर्पण करून या प्रकाराच्याच सत्यासत्यतेचे किंवा मूल्यमापनाचे होणारे मतभेद. आपला समाजाशी लढा आहे असं मानणाऱ्या काही व्यक्ती एकत्र का येवू शकणार नाहीत ? ' लढा ' मानण्याच्या वृत्तीतच खरं म्हणजे एका वेगळया समाजाची स्थापना आहे. मग तो समाज एका व्यक्तीचा असेल नाहीतर अनेक. दोन्ही प्रकारांत मूलत: काही फरक नाही असं मला वाटतं. एकेका व्यक्तीनं स्वत:चंच फक्त असं एकेक लिट्ल मॅगझिन काढलं आणि नंतर त्यांचा गठ्ठा बांधला किंवा त्या सगळयांनी एकाच ' लिट्ल मॅगझिन ' मध्ये लिहिलं -- तर -- या दोन्ही प्रकारांत काही तात्त्विक फरक मानावेत असं मला वाटत नाही. म्हणूनच सत्याची घोषणा खोपकरांनी करणं किंवा काळसेकर-गुर्जर यांनी संयुक्तपणे करणं यात विशेष बिचकण्यासारखा काही फरक नाही असं मला वाटतं.

काळसेकर-गुर्जरांच्या लिखाणातील काही विधाने पाहा. एखादं अनियतकालिक काढण्याच्या आवश्यकतेविषयी लिहिताना सुरुवातीलाच ते म्हणतात, ‘आम्ही स्वत: आणि आमच्या आजूबाजूचे दोस्त हे शब्दमाध्यमाव्दारे आम्हाला व्यक्त करीत होतो आणि आमच्या ह्या व्यक्तिगत आविष्कारांना अधिक चारचौघांसमोर आणवं अशी इच्छा होती.‘

दुसऱ्या एका ठिकाणी ते म्हणतात, ‘ ही लिट्ल मॅगझिन्स बहुतेक वेळा संपादक, सूत्रधार, संकलक, आयोजक किंवा तत्सम नावांनी स्वत:च्या जवळपासच्या समवृत्ती, समविचार आणि नव्याने सुरुवात करणाऱ्या दोस्तांसाठी येतात, ह्यात काही वावगे नाही. फक्त यांची संख्या वाढावी.‘ (आणि हे दोघंही ' व्यक्तिमत्वाच्या अस्सलपणा ' ला महत्त्व देणारेच आहेत.)

हे विरोध अधिक सविस्तरपणे दाखवत न बसता, थोडक्यात बोलायचं झालं तर खोपकरांच्या 'तिसऱ्या शक्यतेच्या ' भाषेत बोलू. सत्याच्या शक्यतांबद्दल बोलताना ते सत्याच्या व्यक्तिसापेक्षतेचा सिध्दान्त सांगतात, आणि असं म्हणतात, की या शक्यतेमुळेच आदिवासींचा वैदूवरचा विश्वास आणि आपला डॉक्टरवरचा विश्वास एकाच पातळीवर येतात. म्हणजे विश्वासाचे-श्रध्देचे काय किंवा कशाचेही काय, फक्त प्रकार आणि पध्दती यांचेच हे प्रश्न आहेत असं समजायचं काय ?

आणि असं जर असेल तर थोड्याफार फरकानं एखादा विशिष्ट पॅटर्न अपेक्षिणाऱ्या अनेक व्यक्ती अस्तित्त्वात असूच शकणार नाहीत असं कोणत्या आधारावर मानायचं ?

व्यावसायिक मासिकात अपरिहार्यपणे होणाऱ्या तडजोडी, संपादकीय अधिकारांच्या कुवती आणि मर्यादा, एकूणच संपर्कक्षेत्रातील मक्तेदारी आणि अभिरुचीच्या क्षेत्रातही तिचा होणारा शिरकाव, नव्यानव्या गोष्टींना भराभर वाव मिळण्यातल्या अडचणी, इत्यादी गोष्टींचे विचार होत राहणारच, पण त्यांचा लेखकाच्या वृत्ती-समजुतीशी संबंध लावताना काळजी घ्यायला हवी एवढंच मला म्हणायचं आहे. सरधोपट सारांशकडे कल नको.

आता इतर अंकाबद्दल सरळ क्रमाने पाहू. ' ए काईंड ऑफ सायलेन्स ', ' पोस्टमार्टेम ', ' कंटिन्युटी ' (तुम्ही म्हणाल की हा अंक काय इंग्रजीत काढलाय काय -- तर नाही -- मराठीतच आहे.). ' गोष्ट निवड ' (डहाके), ' गिधाडे ' (पारपिल्लेवारांच्या कादंबरीतले प्रकरण) आणि ' वटवाघुळ ' (मनोहर सप्रे) -- साहित्य आहे.

यात ' ए काईंर्ड ऑफ सायनलन्स ' (विलास सारंग) आणि ' कंटिन्युटी ' (श्याम मनोहर) एवढं बरं आहे. शांततेचे अव्दातव्दा ओसंडून जाणारे प्रवाह आणि तरीही पार्श्वभागीचं काहीच नसलेपण -- हे सारंगांनी ठीक दाखवलं आहे.

नवीन कथालेखकांत श्याम मनोहर हा एक फारच आशादायक लेखक. हा माणूस मराठीत कथेचा एक वेगळाच प्रकार रुजवतो आहे. सर्वांगांनी उलगडत जाणारी अनुभववस्तू एवढ्या ढोबळ अशा ' कथे' च्या व्याख्येवर ज्यांचं भागू शकेल अशा वाचकांना हे लिखाण ' कथा ' म्हणूनही आवडू शकेल. अर्थात वाङ्मयप्रकारांच्या अनिश्चित सरहद्दी आणि अनिश्चित शक्यता यांची किमान जाणीव असणाऱ्यांच्या बाबतीत हेही प्रश्न येणार नाहीत.

अनिल डांगे यांनी ' पोस्टमार्टेम ' (नंतर वाढीव स्वरूपात ' मनोहर ' मध्ये आलेली) ही कथा म्हणजे निव्वळ टाईमपास गोष्ट आहे. ढोबळ चमत्कृतीची हाव पुरी करण्यासाठी यात क्लँचेट वगैरे काहीही आहे.

लिट्ल मॅगेझिन्सच्या सूचीचा अंक परिश्रमपूर्वक तयार केलेला आहे. चळवळ, बंड, काय ते असेल नसेल; पण मराठी लिट्ल मॅगझिन्सची संख्या विसाच्या वर गेल्याची तरी खात्री पटते. मूल्यमापन काय व्हायचं ते होवो, पण हे प्रकार आता लहानसहान गणता येणं कठीण आहे असं समजायला हा अंक खूप आहे.

छत्तीस कवितांमध्ये फक्त दोन कविता चांगल्या म्हणता येण्यासारख्या आहेत. एक मनोहर ओकची ' पटनमलो शालिबडा ! पैंरैना गोलकोंडा ' आणि दुसरी श्याम मनोहरची.

बायकी खेळाच्या आनंदी लयीवर ' सुसंस्कृत ' माणसाचा जन्मवेध घेणारी ओकची कविता साध्याशाच क्लृप्तीनं बरीच झेप मारून जाते.

कवितांवर सविस्तर चर्चा करण्याची काही ही जागा नव्हे. तरी श्याम मनोहरच्या या ओळी पाहा.

अस्थींना फुटलेल्या

प्राणांच्या सांगाड्यांच्या

राज्यात

एक नागरिक होण्याचे दीर्घ स्वप्न

मी पृथ्वी पाखडून पाखडून निवडले

तरी

तर्कशास्त्र अस्तित्वाच्या भीतीला मिंधेच !

अनुभवाला भिडण्यातला हा जोम इतरत्र दिसत नाही. त्यातल्या त्यात विजय निरखी, नागनाथ कोत्तापल्ले, प्रकाश कामतीकर, राजा राजवाडे, शरद साटम, अनिल बांदेकर, प्रभा गणोरकर आणि चंद्रकांत खोत यांच्या कविता बऱ्या आहेत.

चौथ्या अंकात मिश्र साहित्य आहे. सतीश काळसेकरची ' निशासूक्त ' ही कविता प्रथम. काळसेकरच्या कविता वाचताना आपण दिलीप चित्रेच्या कविता वाचतोय की काय असा बऱ्याच वेळा भास होतो. ही कविता वाचतानाही चित्रेच्या ' शक्तीची प्रार्थना ' या कवितेची लय सारखी डोक्यात येत राहते. पण कवितेवर अभिप्राय देताना अर्थातच -- भावनांचं

हे अवडंबर उत्तुंग आहे एवढं कबूल करावं लागतंच.

प्रकाश गुप्ते हा एक नवा माणूस. त्याच्या संकल्पित कादंबरीतला थोडा मजकूर. त्याच्या पुढच्या लिखाणाची उत्सुकता बाळगायला हरकत नाही असा. मानसिक अवस्थांचे धिंडवडे काढण्याचं बऱ्यापैकी सामर्थ्य याच्याकडे आहे एवढा अंदाज या मजकुरावरून निश्चितच येतो.

वसंत गुर्जर या माणसानं स्वत:ला स्वत:च्याच शैलीनं करकचून बांधून टाकलंय की काय अशी शंका, ' मैत्रेयी ' वाचून बळावते. विखुरलेल्या शब्दांनी बोलायची स्टाईल सबंध ' गोदी' भर पाहिली. अजूनही तेवढंच ?

बऱ्याच नव्या लेखकांना शैलीतला एक वेगळया प्रकारचा मेलोड्रामा बरीच भुरळ घालू लागलेला आहे याची प्रचीती या अंकातून अनेक ठिकाणी येते.

इतर गोष्टी म्हणजे -- एवढ्या टापटिपीनं लिट्ल मॅगझिन्स क्वचितच निघालेली आहेत. अनिल बांदेकरचं रेखाटन छान ठसठशीत. भ.मा.परसवाळे यांचं चित्र मूकपणे भयंकर ऐकू येतं.

इतकं असूनही एकूण अंकाबद्दल म्हणाल तर -- सगळयांच्या माथी एखादा अपरिहार्य दणका देणारं यात काहीही नाही. ठीक आहे इतकंच !

(मनोहर, ऑक्टोबर,१९७०)

--- ००० ---

दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या

' कवितेनंतरच्या कविता '

दिलीप चित्रे यांची कविता वाचल्यावर बऱ्याच वेळी पहिली प्रतिक्रिया ' कळत नाही ' अशी येऊ शकते. चित्र्यांवर महत्त्वाची समीक्षा लिहून झाली नाही असे प्रस्तावनेत नेमाडे म्हणतात त्याच्या अनेक कारणांपैकी हेही एक कारण असू

शकेल. चित्र्यांच्या ' कवितेनंतरच्या कविता ' हा कवितासंग्रह वाचल्यावर, ही कविता समजायला लागण्याच्या शक्यताही या कवितेतच कशा लपलेल्या आहेत हे लक्षात आले. त्या शक्यतांबद्दल लिहावे असे वाटले.

कवितेबद्दल लिहिताना एकेक कविता घेऊन, ती कविता वाचत जाताना होणारी सर्जक प्रक्रिया विशद करत जाणे हा एक प्रकार असू शकतो. अशा प्रकारे सुरुवात करायची असल्यास -- ' क्ष ' परिमाणांतून (पृष्ठ २६), सत्ताविसावा वाढदिवस (पृष्ठ ३६), खुर्ची (पृष्ठ ४४), मूळ (पृष्ठ ८०), मीच नाही (पृष्ठ ८५), आणि--आजीचं मरण (पृष्ठ ९६)-- या कविता मला सुचवाव्याशा वाटतात. सध्या, मी मात्र हा प्रकार अवलंबत नाही आहे. कारण, या संग्रहातल्या सर्वच कविता लक्षात घेऊन त्या कविता समजण्याचे सूत्र कसे सापडते ते इथे दाखवायचे आहे. तसेच त्या बाबतीतले एक दोन मुद्दे मांडायचे आहेत.

ही कविता 'स्व' चे अव्यक्तीकरण करून संवेदनांचे सरळ भाषांकन ' करते -- असे नेमाडे म्हणतात. हे फारसे बरोबर नाही. हे 'स्व' च्या संवेदनांचेच भाषांकन आहे. नाहीतर ' वास्तव ' हे ' विस्तवी वास्तव ' म्हणून या कवितांमध्ये वारंवार आले नसते.' चरित्राचा चतकोर ', ' चरित्राचा काळोख ' -- असे झाले नसते.

दृश्यांना जन्म देते मस्तकांतील गुप्त खाच

(ख्याल -- पृष्ठ ७३)

-- असे झाले नसते. आणखीही पुष्कळशी उदाहरणे घेऊन हे स्पष्ट करता येईल. या विवेचनाच्या ओघात ते अधिकाधिक स्पष्ट होणार आहेच.

ही कविता अनाकलनीय होण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे तिची व्यक्तिविशिष्टता हे आहे. ही व्यक्तिविशिष्टता अति-तीव्र आहे. याचा अर्थच, 'स्व' हा अतिशय तीव्रपणे वेगळा पडणे - त्म्ञ्दृथ्ठ्ठ्यड्ढ होणे. याचा एक थेट परिणाम असा होतो की ' स्व चे जगणे हे एकूणच वस्तुमात्राच्या विरोधात उभे राहते. उदा.

वस्तूंच्या विरोधांतून
पांची इंद्रियांना
सामोरं येणारं
काठिण्य.

-- (कष्ट -- पृष्ठ ६७)

किंवा

मला आता फक्त माझ्या कडा जाणवतायत,

वाटतंय की त्वचेचा पडदा दूर सारला तर

या दृश्यात अन् माझ्यात कसलंही अंतर नाही.

-- (मीच नाही -- पृष्ठ ८५)

-- या तीव्र विरोधामुळे -- त्यात अंतर्भूत असलेल्या घर्षणामुळेच वास्तव हे ' विस्तवी वास्तव ' बनते.

मीही परतलोय सर्वांगाला राख फासून

विस्तवी माणकासारख्या डोळ्यांनी या शहरात

-- (शहरी कबुतरे, पारवे -- पृष्ठ ११)

वास्तवाहून भडक जसे वास्तववादी टेक्निकलर

विस्तववाद्यांच्या कवितेत.

-- (बाजार -- पृष्ठ १९)

मी पाहिले विस्तवी विस्तार स्वत:च्या काळोखाचे

-- (दीर्घ --पृष्ठ ३९)

मी वास्तवाच्या विस्तवावर चालतोय

-- (तीव्र कोमल... -- पृष्ठ ५९)

-- हे सगळे

मी जपला माझा आतबाहेरपणा, माझं कठोर आस्तिक्य.

-- (मृत्यू -- पृष्ठ ८६)

यामुळेच असे आहे.

तर हे माझं स्वत:चं जन्मदत्त, वतनी मरण.

हे माझ्या अरण्यांचे कोळसे -- हा माझ्या
कोळशांचा विस्तव -- ही माझ्या विस्तवाची राख.

' राख,' ' विस्तव ', ' काळोख ', ' अरण्य ',-- अशा प्रतिमा या कवितांमध्ये वारंवार येण्याचे हेच कारण आहे. या ' विरोधा ' ची तीव्रता म्हणजेच जगण्याची तीव्रता -- ही जाणीव या कवितांच्या मुळाशी आहे. ही तीव्रता कोणत्या टोकाला जाते हेही पाहण्यासारखे आहे :-

अंगातल्या अंगात बंद बल्बमध्ये
तापून पांढऱ्या अन् आंधळया झाल्यात
माझ्या बेभान फिलामेंटस

-- (पुन्हा मी-- पृष्ठ ११८)

किंवा

फुलते अंगांगावर शहाऱ्यांची राई, जशी लय
करते मस्तकात अविरत विजेचा स्राव

-- (ख्याल -- पृष्ठ ७३)

याचेच जरा सौम्य वर्णन असे येते :--

कित्येक गोष्टी गुप्त राहतात शहाळयातल्या पाण्याहून
मनातला अव्यक्त अर्थ जसा अपरिहार्य
आणि संपूर्णपणे आपला. तशी संध्याकाळ वा रात्र
आपली नव्हे. ती बदलते आपल्या छटा
डोळयांच्या वेशीवर.

-- (संध्याकाळची आवाहने - पृष्ठ २७).

डोळयांच्या वेशीच्या बाहेरचे आणि आतले यातला विरोध हे या कवितांमधले एक महत्त्वाचे सूत्र आहे. त्यामुळे अर्थातच बाह्य विराटापुढे ' चरित्र ' हे चतकोरच ठरणार. ' चरित्राचा चित्रमय चतकोर ', ' चरित्राचे दाट शहर ', ' चरित्राचा अपरिहार्य काळोख ', आणि ' चरित्राचे कॅलिडोस्कोप फुटून विखुरणे ' -- अशा गोष्टी जाणवतात. यातला ' दाटपणा ', ' अपरिहार्यपणा ', ' काठिण्य ', 'दगडीपणा '-- वारंवार या कवितांतून व्यक्त होतो.

फक्त गच्च

देठातून

भळभळणारी फुलं...

-- (सिंफनी तिसरी -- पृष्ठ ५२)

--असा ’ गच्च ’ पणाही. याचाच सारांश --

संभोगोत्तर औदासीन्यासारखे आकाश

या खोलीच्या एकुलत्या खिडकीतून दिसते

-- (खिडकी - पृष्ठ १२)

-- असा व्यक्त होतो. ’ या खोलीची एकुलती खिडकी ’ म्हणजे काय हे आता अनाकलनीय राहात नाही. हे असे सगळे ’ काठिण्य ’, ’ अपरिहार्य ’ असल्यामुळे मग आता कवितेतून काय होऊ शकते ? आहे याच जाणीवांचे, संवेदनांचे, अनुभवांचे उदात्तीकरण. ’एकुलत्या खिडकीतून ’ ’ चरित्राच्या चतकोरातले ’ जगणेच फक्त आता उपलब्ध आहे. यातून फक्त दु:ख, निराशा, काळोख, जखमा, होरपळणे -- यांचीच निर्मिती होऊ शकते हेही लक्षात आलेले आहे. त्यामुळेच मग ही कविता उदात्तीकरणाचा मार्ग चोखाळते. या उदात्तीकरणासाठीच या कवितेला ’ शब्दकळेचा अतिव्यय ’ करण्याची गरज भासते. रंगांची, प्रतिमांची, चित्रमय भाषेची आतशबाजी ही यातून येते.

त्याचे शरीर गुणगुणले चरित्राच्या चित्रमय चतकोरात

लोळण घेत भाषेच्या रंगमय होळीत

-- (चरित्र -- पृष्ठ ९)

असे हे लोळण घेणे म्हणजे या कविता. काही उदाहरणे पाहू :--

...द्रष्ट्यांची भिंगं

असावी लागतात शीघ्र इतर सर्वांहून

असे रंग टिपायला. जसे मुंडीछाट कोंबडा

मरणावर विश्वास बसायच्या आत उधळतो.

-- (बाजार - पृष्ठ १९)

घे मनाच्या पिंजऱ्यात वाघ स्तब्धतेचा
फेऱ्या घालणारा अफाट नैसर्गिक अरण्यात

-- (संध्याकाळची आवाहने - पृष्ठ २७)

मी विखुरतो एखाद्या आत्महत्येच्या बातमीप्रमाणे
आणि आकाशातून होतो शीर्षकांचा वर्षाव ...

-- (१८ पृष्ठ ३५)

वर्षानुवर्षांपूर्वी हसऱ्या आणि तरल विटांनी
आपण रचत होतो एकमेकांची हीच चिरेबंद कबर

-- (विस्मरणात ...पृष्ठ ४३)

उत्तुंग मग्नतेत होरपळल्यावर पुन्हा मी
थोडासा शुध्दीवर येताना
सर्वस्वाची विराट खुर्ची झालेली असते माझ्या.

-- (खुर्ची - पृष्ठ ४४)

ही सुन्नतेची सोसाट्याची सर्वांगभरती

-- (कलंडणाऱ्या -- पृष्ठ ४९)

भासांच्या रात्रीत
कायम उभं इच्छांचं अमानुष कालातील लावण्य
भव्यता सळसळती हिंस्र स्तब्धतेत
अपरंपार चांदणं आत्मभूलीचं अरण्य

-- (काळी चित्तीण -- पृष्ठ ७६)

-- अशी आणखीही उदाहरणे देता येतील. कितीही उदात्ततेचा आभास निर्माण केला तरी मुख्यत: आणि मूलत: ही स्व-छळाची कविता आहे. हेच खरे तर कवीचे 'कठोर आस्तिक्य ' आहे.

...माझ्यापुरता म्हणाल तर
नाही ठेवत मी विश्वास कोंबड्याच्या पंखावर

तो जीवनमरणाच्या दरम्यान तडफडत नसताना

-- अशा प्रकारच्या ' स्वत:च्या अस्तित्वमग्नतेचं सातत्य टिकवणं ' कवीला महत्त्वाचे वाटते. पण

त्या ठिकाणी
लागलेली असते
बधिरात
एक सततची सुई

-- (२७ पृष्ठ ४७)

त्यामुळे हे सातत्य टिकवणे आणि त्यापासून पळवाटा शोधणे दोन्ही गरजेचे होते.

हाडं थकलीत
मी जातोय भरधाव टॅक्सीतून
एक एस्केपिस्ट, वाऱ्यावर केस उडत असलेला.

-- (टॅक्सी राईड - पृष्ठ - ७५)

या एकूण प्रकारालाच मग म्हटले जाते --

अ. ओळखीचा काळोख
माझी मूळ शक्ती

-- (मूळ -- पृष्ठ ८०)

ब. हे दालन फक्त बीज ह्या क्षणी स्वत:च्या अरण्याचे.

-- (रिकामे दालन - पृष्ठ २५).

क. एका विराट स्फोटाचा बिंदुवत संकोच मी

-- (दुपार - पृष्ठ - ३१)

ङ जन्म रिकामा करणारा आवेग

इ. मी रुतून बसतोय
ह्या निरर्थकात
खोल आणि गच्च
-- (स्क्रू -- पृष्ठ ५०)

फ. मी वास्तवाच्या विस्तवावर चालतोय
-- (तीव्र कोमल ... पृष्ठ ५९)

ग. अंगच्या जंगलांना अंगचेच वणवे
अंगचीच जनावरं अंगच्याच आरोळया
-- (स्वर्गीचे चिन्ह -- पृष्ठ ८१)

ह. पोटात जन्मभर जे ॲसिड पोसलं
त्यात आख्खा सह्याद्री विरघळून जातोय
-- (पिसाटीचा बुरूज -- पृष्ठ १०६)
-- अशी ही अवस्था आहे.

सुन्नतेच्या देवळात
सुन्नतेचाच घंटानाद ऐकत
मी स्थिरावलोय
ह्या स्थूल अनंतकाळात
स्वत:च्याच किर्र काळजातली जिवंत धडपड ऐकत.
-- (पिसाटीचा बुरुज -- पृष्ठ १०६)

याच अवस्थेला वेगवेगळी अभिव्यक्ती देणाऱ्या या ओळी पाहा :--

अ. आता शाश्वती कसलीच नाही
माझा मला मी नाही आवरत एकही प्रसंग

ब.	ज्या परंपरेचा वणवा घुसलाय माझ्या अंगात
	तिला वावगी नाहीत कोणतीच विस्तारती अरण्यं

क.	मला भोवळ येतेय सतत आठवणींची

ड.	मला जाऊ दे अखेरपर्यंत असाच ओसंडत
		-- (स्मरणपत्र -- पृष्ठ १३६)

या संग्रहातल्या कवितांमध्ये एक अढळ असा प्रामाणिकपणा भरलेला असल्यामुळे, सर्व कवितांच्या मदतीने, एकेक कविता स्वतंत्रपणेही समजणे शक्य होईल असे सूत्र सापडणे शक्य होत आहे. प्रस्तावनेत नेमाडे ज्याला ' जगण्याचा उत्सव साजरा करणे ' म्हणतात त्याचे एकूण स्वरूप हे असे आहे. मुळात हे सगळे असे भयानक असताना ' भाषेला सतत कवितेच्या सार्वभौमत्वाचे भान देणे '--याचे कौतूक करत कवितेच्या आशयाकडे दुर्लक्ष करावे का असा प्रश्न पडतो. स्वत: चित्रेही वाचकाला त्यांच्या कवितेच्या ' जल्लोषी ' स्वरूपामुळे असे करण्यास प्रोत्साहन देतात. म्हणूनच त्यांची कविता मूल्यशोधाच्या मार्गाने न जाता 'जगण्याचा उत्सव साजरा करण्याचा ' मार्ग पसंत करते. त्यामुळे या कवितेचे मूल्यमापन हे आशयाच्या अंगाने न होता ते ' आतषबाजी ' च्या अंगाने व्हावे अशी अपेक्षा ही कविता बाळगते. आशयदृष्ट्या ही कविता स्थितिशील, दु:खमय, काळोखमय, विस्तवी वास्तवाची आहे. या वास्तवाबद्दलचे प्रश्न या कवितेला पडत नाहीत ; त्यांचे या कवितेला महत्त्व वाटत नाही. हे वास्तव, 'अपरिहार्य ' आहे असे ही कविता गृहीत धरते. मग तसे तर, कमीजास्त प्रमाणात, बहुसंख्य व्यक्तींचे हेच वास्तव आहे. मग चांगल्या कलेचे कार्य काय तर उपलब्ध वास्तव सजवून मांडणे ? की अशा प्रकारच्या वास्तवाच्या बाबतीतल्या मूलभूत प्रश्नांची दखल घेणे, असे वास्तव अस्तित्वात येण्याची प्रक्रिया तपासणे, त्यातून एकूणच जगण्याचे भान घेणे ? ही कविता हिंसा व्यक्त करू शकते, पण हिंसेची यंत्रणा पाहणे नाकारते. आहे ती हिंसा व्यक्त करण्यात धन्यता मानते. माणसाला, आहे ते फक्त गृहीत धरायला उद्युक्त करणारी कला ही कधीही मौल्यवान कला असत नाही -- मग तिची प्रदर्शनात्मक, झगमगणारी श्रीमंती कितीही असो. माणसाच्या हिताविषयी, जगण्याच्या मूल्यात्मकतेविषयी ही कविता बेफिकीर आहे. एखादी गोष्ट कला आहे की नाही हे कलेच्या दंडकांनी ठरू शकेल पण ती कला ' मोठी ' आहे की नाही हे ठरवायला कलेचे दंडक पुरे पडणार नाहीत -- अशा अर्थाचे टी.एस.एलियट यांचे म्हणणे इथे आठवते. कोणत्याही कलेत जर चिंतनशीलतेचा अभाव असेल तर तिला वैश्विक धर्माच्या स्वरूपासारखे मूल्यात्मक श्रेष्ठत्व प्राप्त होणार नाही. 'नव्या मराठी कवितेची समृध्दी कळून येण्यासाठी रा.चित्रे यांची कविता समजून घेणे अपरिहार्य आहे.' -- हे नेमाडे यांचे वाक्य -- तंत्र, प्रतिमा, भाषा यांची समृध्दी या अर्थी घेता येईल. या कवितेत आशयाची समृध्दी नाही, कारण ही अलगतावादाचा उत्सव साजरा करणारी भ्रमिष्ट कविता आहे. या संग्रहातली ' इमर्जन्सी ' ही कविता पाहू. इमर्जन्सी वाईट असे कवीचे मत दिसते.

अंधारात केकाटतील तुमचे महाकवी.
आणि त्यांना गोळया घातल्यावर
नांदेल तुमच्या निष्पाप चरित्रांवर
ही अलौकिक सामसूम
ही सामुदायिक निजानीज.

-- अशा ओळी या कवितेत येतात. मुळात इमर्जन्सी येते अलगतावादातून आणि तिला विरोधही अलगतावादातूनच होऊ शकतो -- मग याचा अर्थ काय ? --असा प्रश्न कवीला पडत नाही. खरे तर, चित्र्यांच्या एकूण कवितेचे स्वरूप पाहता इथे इमर्जन्सीतल्या दडपणांचा, दु:खांचाही उत्सव माजवता येणे जड जाऊ नये असे दिसते. आपल्या मानसिक गोंधळातून येते ते सत्य आणि दुसऱ्यांचा मानसिक गोंधळ अन्याय्य -- अशी बाळबोध दृष्टी यामागे आहे.

आता घट्ट हो
विरजण लागल्यासारखा. घे वेध स्वत:चा.

' विरजण लागल्यासारखे घट्ट झाल्यावर ' स्वत:चा वेध कसा घेणार ? या प्रकारात समर्थने करणे, गृहीत धरणे, सुखदु:खे भोगणे, भयग्रस्त राहणे, कंटाळवाणे होणे, हिंसक होणे -- हेच शक्य आहे. यालाच वेध घेणे म्हणायचे असेल तर जगभर हे चालूच आहे. काहीजण याला अभिव्यक्ती देतात, काहीजण देत नाहीत इतकेच. असे जर असेल तर निव्वळ मनोरंजनवादी कला आणि ही कविता यात मूलभूत फरक तरी कोणता ? त्यामुळे, भाषेला सतत कवितेच्या सार्वभौमत्वाचे भान देण्यापेक्षा, कवितेला चिंतनशीलतेच्या सार्वभौमत्वाचे भान देणे महत्त्वाचे आहे असे म्हटले पाहिजे. ते या कवितेत घडत नाही.

-०-०-०-०-

स्व--गत

प्रस्तावना

भावनिक उद्रेकांना कमीजास्त प्रमाणात अभिव्यक्ती देता येईल अशा घटनांची मालिका असली की ती नाट्यमय वाटते हे ठीक आहे. पण नाट्यमयता ही या एकाच प्रकारात असते असे नाही. मनांच्या वेगवेगळया स्तरांचे वागणे, अनपेक्षित पध्दतीचे संवाद, संबंधांमधल्या ताणांचे सवयीत नसलेले असे आकलन, वेगळे वातावरण, वेगळे विचार -- हे सगळे नाट्यमयच असते. रंगमंचावरून ही अशी अनेक प्रकारांची नाट्यमयता अभिव्यक्त होतही असते. उद्रेकीपणाच्या तुलनेत इतर प्रकारची नाट्यमयता ही अनेकांना कमी ' नाट्यमय ' वाटते. नाटक या माध्यमाच्या बाबतीत या गोष्टीकडे दुर्लक्ष करता येत नाही, कारण प्रेक्षकसंख्या, प्रयोगसंख्या त्यामुळे बाधित होण्याचा धोका असतो. प्रायोगिक ' चळवळ ' अस्तित्वात असताना, एक तर एक प्रयोग -- अशा तयारीनेसुध्दा नाटके होत असत. आता काळ तसा नाही. तरीसुध्दा, याचा अर्थ असा नाही की नाट्यमयतेचे ठरीव साचेच सगळयांनी वापरत राहावे. कारण असे समजल्यास कलेच्या क्षेत्रातली निर्मितीक्षमता आणि नावीन्य हरपू शकेल आणि एकूणच आकलनालाही मर्यादा घातल्यासारखे होईल. त्यामुळे, काही कलावंत, म्हटले तर धोके पत्करूनही, वेगवेगळया प्रकारांची निर्मिती करत राहतातच. प्रेक्षकांच्या अपेक्षांचे भान ठेवणे आणि आशयाशी प्रतारणा न करणे -- असा समन्वय साधला गेला तर उत्तमच, नाही साधला गेला तरी ही वेगळी 'नाट्यमयता ' कधी ना कधी रंगमंचावरून अनुभवायला मिळावी हे महत्त्वाचेच ठरेल. प्रा. विजय कारेकर यांचे ' स्व-गत ' हे नाटक वरील प्रश्नांचे महत्त्व विशेषत्वाने जाणवून देणारे आहे.

' अभिरुची ', कोल्हापूर यांनी आयोजित केलेल्या नाट्यलेखन स्पर्धेत हे नाटक पाहिले आले होते. नाट्यकृती लिहून झाल्याझाल्या ' अंतिम ' च असणे असे क्वचित घडते. रंगमंचावरचा त्या नाटकाचा प्रयोग कल्पनेने ' पाहू ' शकणारा दिग्दर्शक भेटल्यावर लिखित संहितेला एका वेगळया प्रक्रियेतून जावे लागते. शंका, विचार, चर्चा यांतून त्या संहितेचे स्वरूप आणखी निखरण्याची शक्यता असते. हे खरे असले तरीही लेखकाची चिंतनशीलता, त्याच्या निर्मितीप्रक्रियेचे हेतू, त्याच्या आकलनातली परिपक्वता हे सर्व पहिल्या लेखनातूनही जाणवते. ' स्व-गत ' -- हे याचे एक उत्तम उदाहरण आहे.

' जिथं गोंधळाचा बिंदू असेल तिथं नाट्य असेल ' -- हे या नाटकाच्या सादरीकरणाचे सूत्र या नाटकातच अंतर्भूत आहे. ' आपण सगळे वास्तव सोडून पक्के रोमँटिक झालो आहोत --' किंवा ' सालं हे आयुष्य म्हणजे एक आचरटपणाच आहे -- रिकाम्या पोत्यात रिकाम्या वस्तू भरत राह्यचं ! '-- असे संवाद हे या कलाकृतीच्या वेगळया आस्तित्वसमर्थनाचे द्योतक आहेत. ' हिंसक शांतता ', ' सुंदर उव्दिग्नता ' -- अशा अंतर्विरोधी अवस्था हाताळणारे हे नाटक आहे. आधुनिक जीवनातले अनेक प्रश्न, नीतीकल्पना, विकृतींबाबतचे आकलन यांचा आवाका हे नाटक घेऊ पाहते.

हे नाटक अतिवास्तववादी आहे का किंवा न--नाट्य आहे का किंवा विसंगतीचे नाटक आहे का -- अशा प्रश्नांचे एकच उत्तर द्यायची आवश्यकता नाही. या सर्व प्रकारच्या अभिव्यक्ती पध्दतींचे ऋण मान्य करून स्वत:ची अशी एक एकात्म अभिव्यक्ती इथे लेखकाने सिध्द केलेली आहे.

यशापयाशाचे ठरीव आडाखे बाजूला ठेवून या संहितेबरोबर, या लेखकाबरोबर झटापट करणारा दिग्दर्शक उपलब्ध नाही अशीच जर परिस्थिती असेल तर नाट्यक्षेत्राच्या दृष्टीने ही चिंतेची बाब आहे. वस्तूंचे रिकामेपण जाणवूच नये म्हणून तर आपण उद्रेकांची गर्दी करत नाही आहोत ?

-०-०-

' आपलं माणूस '

(नाटक) ले. प्रसन्न जी. कुलकर्णी.

प्रस्तावना

घरकाम (धुणंभांडी, केरफरशी, स्वैपाकपाणी, इत्यादी), मुलांचे संगोपन (शी-शू पासून, अंघोळ, कपडे, अभ्यास, इत्यादी) आणि आर्थिक परावलंबित्व -- या गोष्टींमधून स्त्रियांना मोकळेपणा मिळाल्याशिवाय स्त्री-पुरुष समानता येऊ शकत नाही हे सर्वमान्यच आहे. शिक्षणामुळे, यांतले, आर्थिक परावलंबित्व हे कारण बऱ्यापैकी डळमळले आहे. पण, इतर दोन कारणांचे ब्रेक्स आहेतच.

हाच विषय हाताळणारे ' आपलं माणूस ' हे प्रसन्न जी. कुलकर्णी यांचे नाटक खरे तर काही वर्षांपूर्वीचे. ऱ्द्धठ्ठश्च्ड्ढ ध्/द्म ऱ्द्धठ्ठश्च्ड्ढ या चित्रपटाची कल्पना घेऊन त्यांनी ते लिहिले. ' प्रतिपदा ' या संस्थेतर्फे व्यावसायिक रंगभूमीवर याचे सुमारे शंभर प्रयोग झाले आणि टेलिप्ले स्वरूपात टीव्हीवरही ते अनेकदा दाखवण्यात आले. हे एक प्रेक्षकांना आवडलेले नाटक होते आणि मान्यवर नाट्यसमीक्षकांनीही याला ' स्वागतार्ह रूपांतर ' असे म्हटले होते. स्त्री चळवळीतल्यांनीही या नाटकाचे स्वागतच केले होते. मधे बराच काळ गेला असला तरीही, आणि उलट आज तर अधिकच तीव्र बनलेला असा हा प्रश्न आहे. हा प्रश्न पायाभूत कल्पून ही नाट्यरचना करण्यात प्रसन्न जी. कुलकर्णी यांनी, एका उकल अवघड असलेल्या प्रश्नाला हात तर घातला आहेच पण एका दीर्घकालीन समस्येला नाट्यरूप देण्याची

आकांक्षाही बाळगलेली आहे.

सध्याच्या या नाटकात आणि प्रयोगातही असलेला शेवट टेलिप्लेमध्ये सुखपर्यवसायी केला गेला होता आणि त्यासाठी काही आनुषंगिक बदलही केले गेले होते. मी या नाटकाचा प्रयोग पाहिला नाही, पण, टीव्ही प्रक्षेपण पाहिले होते. कौटुंबिक नाटकाला एका महत्त्वाच्या समस्येची चौकट देण्याचा प्रयत्न म्हणून मला ते आवडलेही होते. त्या समस्येची प्रस्तुतता आजही तशीच असल्याने, किंबहुना अधिकच तीव्रपणे जाणवणारी असल्याने, हे नाटक पुस्तकरूपाने प्रसिध्द होणे हे औचित्यपूर्ण आहे यात शंका नाही.

प्रसन्न जी. कुलकर्णी हे स्वत: एक उत्तम दिग्दर्शक आणि अभिनेतेही आहेत. त्यांची त्या दोन्ही क्षेत्रांतली समज या रूपांतरात व्यक्त झालेली आहेच. एक आठवण सांगतो. माझ्या डोक्यात एखादे नवे नाटक लिहावे असे काहीही नसताना या व्यक्तीने १९७६-७७ साली, कोल्हापूर केंद्रातून, राज्य नाट्य स्पर्धेत, त्या वर्षी ते माझेच नाटक सादर करणार असे घोषित केले होते. आणि अक्षरक्ष: खनपटीला बसून त्यांनी माझ्याकडून ' एक गगनभेदी किंचाळी ' हे माझे नाटक लिहून घेतले होते. त्याचे त्यांनी केलेले उत्तम दिग्दर्शन आणि त्यांनी अतिशय समजून अभिनीत केलेली त्यातली ' आनंदराव ' ही प्रमुख भूमिका मी कधीच विसरणार नाही. तितक्याच महत्त्वाची होती या नाटकाची त्यांनी डिझाईन केलेली वैशिष्ट्यपूर्ण नेपथ्य रचना. नाटकाच्या आणि प्रयोगाच्या गरजा लक्षात घेऊन आणि प्रेक्षकांच्या कोनाचे भान न सोडता त्यांनी केलेली नेपथ्यरचना केवळ अप्रतिम होती. त्यांच्या या सगळया गुणांचे अस्तित्व ' आपलं माणूस ' च्या लेखनात जाणवतेच. या नाटकाची दृश्यात्मकता आणि पकडून ठेवण्याची क्षमता यांत त्यांच्या अनेक वर्षांच्या या तपस्येचेही योगदान आहे. (त्यांच्या दिग्दर्शनाखाली, माझ्या त्याच नाटकात एक छोटीशी भूमिका करण्याची आणि एक हुकुमी हंशा वसूल करण्याचीही संधी मला मिळाली होती -- हेही मला इथे नमूद करावेसे वाटते. माझ्या आणखीही काही संहिता त्यांनी चांगल्या प्रकारे, पुढील काही काळात रंगमंचावर आणल्या याचाही उल्लेख इथे करणे इष्ट होईल.)

नाटकाची ' व्यावसायिक ' गुणवत्ता हा विशेष प्रामुख्याने लक्षात ठेवूनच हे नाट्यलेखन झालेले आहे. त्या बाबतीत ते बव्हंशी यशस्वीही झालेले आहे. आजच्या आणि उद्याच्या परिस्थितीतही, फक्त किरकोळ काही बदल करून, हे नाटक प्रस्तुतच राहील, जुने वाटणार नाही, हे निश्चित. पण, ' व्यावसायिक ' यशाची आकांक्षा बाळगल्यामुळे या नाटकाचे काय झाले आहे हेही पाहावे लागेल, आणि, व्यावसायिक नाटकांचा प्रेक्षक सांस्कृतिक प्रवाहाला कसे अडथळे निर्माण करतो याबद्दलही बोलावे लागेल. कलेतला सांस्कृतिक प्रवाह म्हणजे, थोडक्यात, जगण्यातल्या प्रश्नांना सामोरे जाण्याची प्रक्रिया.

इथे मी, आधी, दोनतीन उदाहरणे देऊ इच्छितो. ' आजचे प्रश्न ' म्हणता येतील असे विषय हाताळणारी दोन नाटके -- जयंत पवार यांचे ' माझं घर ' आणि नितीन दीक्षित यांचे ' सोक्षमोक्ष ' ही व्यावसायिक रंगभूमीवर आलेली

नाटके पाहू. या दोन्ही लेखकांनी, आणि अर्थातच निर्मात्यांनीही, मर्यादित यशाची शक्यता लक्षात घेऊनही ही नाटके लिहिली -- सादर केली. प्रत्यक्षातही त्यांना तळपणारे असे यश मिळालेही नाही. कारण, त्या लेखकांनी, समोर असलेली समस्या योग्य त्या गांभीर्याने घेतली. याच्या उलट, ' नकळत सारे घडले ' हे नाटक घ्या. करिष्मा कपूर, कधीतरी, कदाचित तोंडदेखले म्हणूनही असेल किंवा उपचार म्हणूनही असेल, एका मुलाचा गॅदरिंगमधला अभिनय पाहून ' छान ' म्हणते आणि त्याचे वारे त्या मुलाच्या डोक्यात जाते -- हा प्रश्न. पण, पुढे नाटकभर तो मुलगा राहतो बाजूला आणि भलत्याच दोन पात्रांची अभिनयाची जुगलबंदी बघत बसण्याचे भाग्य प्रेक्षकांना लाभते. इथे ' भाग्य ' हा शब्द उपरोधिक अर्थाने वापरलेला नसून वस्तुस्थितीवर्णनात्मक आहे. कारण, प्रेक्षकांना तेच, तसेच हवे आहे, डोक्याला ताप नको आहे.

'आपलं माणूस ' हे ' नकळत ' च्या हुशार लायनीतले नाटक आहे. ढोबळपणापासून थोडेफार सूक्ष्माकडे असे पाहात जाऊ. मुळात प्रश्न काय, तर यातली नायिका ' अनघा ' हिचा कोडमारा होतो आहे. गृहिणीटाईप रूटीन जगण्याचा तिला उबग आलेला आहे. स्वत:च्या छोट्या मुलीची कामे करणेही, या मनस्थितीमुळे, तिला वैतागवाणे वाटत आहे. हे ठीक. मग हिच्यात अशी कुठली गुणवैशिष्ट्ये आहेत की ज्यांना या रूटीनमुळे संधी मिळत नाही आहे ? तर, ' पेंटिंग ' असे उडतउडत सांगितले जाते. आधी, अथवा नाटकाच्या उत्तरभागातही ही अशी काही खास गुणवैशिष्ट्ये असलेली स्त्री आहे असे दिसतच नाही. ' पेंटिंग ' ठीक आहे. पण, त्यांच्या घटस्फोटानंतरही तिने खास असे काय केले ? तिला प्रश्न असह्य होण्याच्या सुरुवातीच्या प्रक्रियेतही तिचा ' मौल्यवान ' (प्रश्नाला तोंड देणारा -- या अर्थी) गोंधळ किंवा तिच्या निर्णयप्रक्रियेतले काही अर्थपूर्ण टप्पे असे काही दिसत नाही. कारण स्पष्ट आहे. व्यावसायिक स्वरूपाचे नाटक लिहायचे हे पक्के ठरलेले आहे आणि त्यात तडजोड करायची नाही हाही निर्धार आहे. (' आम्ही यात कोणतीही तडजोड केलेली नाही ' -- हे यशस्वी लेखकांचे आणि निर्मात्यांचे वाक्य इथे आठवावे.) तिच्या प्रश्नाचे गांभीर्य समजा चुकूनमाकून वाढले किंवा त्यातून काही ' खरे ' जाणवायला लागले तर प्रेक्षकांच्या डोक्याला ताप होण्याचा धोका निर्माण होतो. तो टाळायचा याचे सतत अवधान आहे. बरे, तिचा कोंडमारा खूप ठळक करावा तर तिचा नवरा ' बिंदू ' हा खूपच बधीर दाखवावा लागेल. पण, तसे केले तर पुढचे त्याचे सगळे ' चांगुलपण ' आणि त्याचबरोबर त्याच्या मुलीबरोबरचे त्याचे हृद्य प्रसंग खोटे तरी पडतील किंवा या दोन्हीतला पूल बांधण्यासाठी ' गंभीर ' पणाच्या दिशेने जावे लागेल. त्यामुळे, तोही, खूप ' दुष्ट ' वा ' गुन्हेगार ' वाटूच नये अशीही योजना आहे. म्हणजे मूळ प्रश्न ' यथातथा 'च आणि त्या प्रश्नाला कारणीभूत होणारी व्यक्तीही ' फार वाईट नाही ' -- अशी चौकट घेतल्याशिवाय पुढचे ' आपुलकी ' चे नाट्य ' एंजॉयेबल ' होणार नाही -- हे ओळखून या नाटकाची तशी कौशल्यपूर्ण हाताळणी केलेली आहे. या संदर्भात खालील संवाद पाहावे :--

अनघा : बिंदू, मी घर सोडून निघालेय.

पासून

बिंदू : ... अरे, पण काय चुकलं ते तरी सांगशील की नाही ?

वगैरे दृश्य वाचावे. धड तिच्या प्रश्नाला खरे ’ वजन ’ नसणे आणि धड त्याची ’ संवेदनहीनता ’ नीट व्यक्त न होणे -- हे ’ व्यावयायिक ’ प्रेक्षकांची गरज ओळखून आलेले कौशल्य इथे नीट लक्षात येते.

बिंदू बिचारा, फारसा काही उलगडा न होता, ’ आपुलकीने ’ आणि ’ प्रेमाने ’ या एकूण प्रक्रियेतून
जात राहातो. त्याचा प्रश्न म्हणूनही, नाटक, फारसे खोलात न जाता, पुढे चालू राहाते. पुढे या एकूण प्रकाराबद्दल शशी हे पात्र म्हणते -- ‘ च्यायला, ’ जस्ट वॉक्ड आऊट !’ सोडून गेली ?‘ वगैरे -- हे सर्व प्रेक्षकांचेही संभाव्य आश्चर्य लक्षात घेऊन ते सगळे लिंपून टाकण्यासाठीच येते हे उघड आहे. आणि ’ व्यावसायिक ’ मध्ये हे अपेक्षितच असते. चौकट सगळी ’ समकालीन ’ पण ’ खोटी ’ असली तरी पुढे सगळे, एक तर ’ विनोदी ’ नाही तर ’ हृद्य ’ घडावे ही प्रेक्षकांची अपेक्षा असते. या नाटकाला अर्थातच तशी प्रक्रिया मान्य आहे हे स्पष्ट आहे. त्या अपेक्षेची बऱ्यापैकी पूर्तताही हे नाटक करते.

टेलिप्लेमध्ये या नाटकाचा शेवट सुखपर्यवसायी करणे आणि त्यासाठी काही बदल करणे असे घडले होते हे आठवते. नाटक जर ’ बेतायचे ’ च आहे तर प्रेक्षकांची ते ’ सुखपर्यवसायी ’ असण्याची अपेक्षा पूर्ण करण्यात या संहितेत कोणते तत्त्व आड येते याचा उलगडा होत नाही. ’ व्यावसायिक ’ गुणांची समज असलेल्या लेखकाने इथे कोणत्या ’ सर्जकते ’ ला महत्त्व दिले हे कळत नाही. एवढ्या महत्त्वाचा प्रश्न टाळून दाखवण्याचे ’ व्यावसायिक ’ आणि ’ लोकप्रिय ’ कौशल्य जो लेखक दाखवू शकतो त्याला हे मुळीच अशक्य नव्हते. समजा ते जमवले आणि अनघा नमते घेऊन, येऊन पुन्हा त्यांचा सुखी संसार सुरू होऊ शकला तर अजूनही या नाटकाची नवी जिंदगी घडू शकते. कारण, नाटकात हाताळलेला प्रश्न ’ एव्हरग्रीन ’ आहे. परंतु, आहे या स्वरूपातच या नाटकाचे इतके प्रयोग झालेले आहेत हे लक्षात घेऊन, सध्या हे नाटक आहे असेच प्रकाशित करावे आणि दुसऱ्या ’ इनिंग ’ ची संधी मिळाल्यास या बाबतीत पुनर्विचार करावा हेच योग्य होईल. उत्तम बालकलाकार मुलगी मिळाल्यास या नाटकाचे पुनरुज्जीवन होण्यात अडचण येऊ नये असे दिसते.

या नाटकातली एकूणच पात्रे ’ आपुलकी ’ ने युक्त अशीच आहेत. कुणी दुष्ट नाही, हेतुत: वाईट नाही, पण, प्रश्न तीव्र आहेत -- अशा वातावरणात सापडलेली एक बिचारी लहान मुलगी -- हा या नाटकाचा कळीचा भाग आहे. त्या मुलीला हा प्रश्न जेवढा कळतो त्यापेक्षा फार जास्त आकलन नाटकात येऊच नये याची खुबीने काळजी घेण्यात आलेली आहे. ’ अनघा ’ चा प्रश्नही फारसा गंभीरपणे न घेणे आणि तिची मुलगी चिन्नू हिच्या अजाणतेपणाचे प्रसंग रंगवणे यांतून, थोडेफार, असे प्रश्न निर्माण करणाऱ्या स्त्रियांना एक उद्‌बोधन मिळते. आपल्याला असा प्रश्न आहे असे समजून असा विध्वंस करणाऱ्या स्त्रिया कितपत समर्थन मिळवू शकतात ?-- असा हा अध्याहृत प्रश्न आहे. खरोखर असा प्रश्न असलेली आणि त्यातून बाहेर पडू शकणारी स्त्री असे दाखवायचेच नाही आहे. कारण हे एक पारंपरिक दृष्टिकोण बळकट करू

इच्छिणारे नाटक आहे. प्रश्न ' आजचा ' पण दृष्टिकोण ' कालचा ' हे मराठी व्यावसायिक रंगभूमीवरचे आवडते गणित याही नाटकात सोडवून दाखवण्यात आलेले आहे. तसे नसते केले तर मधल्या सगळया ' हृद्य ' भागाचा पायाच खिसकला असता. ' व्यावसायिक ' रंगभूमीवर ' सांस्कृतिक ' महत्त्वाच्या घटना का घडू शकत नाहीत आणि कुणी त्या तशा घडवायचा प्रयत्न केला तर त्यांचे ' व्यावसायिकपण ' का कमी होते हे या एकूण विवेचनावरून लक्षात यावे.

संपूर्ण नाटकाची सविस्तर समीक्षा करण्याचा इथे हेतू नाही. परंतु, ' यशस्वी ' म्हणता येईल असे नाटक ' मूल्यमापना 'च्या दृष्टीने कसे कमी पडते याचे हे नाटक म्हणजे एक वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण आहे -- हे सांगायचे आहे. नाट्यसंहितालेखन या विषयावर बोलताना, शिकवताना, चर्चा करताना या नाटकाचे उदाहरण खूपच उपयोगी पडू शकते. ' मूल्यमापना 'त महत्त्वाचे काय असते ? समोरच्या प्रश्नाची आकलनप्रक्रिया सर्वांगांनी व्यक्त होणे. ती टाळण्यामुळे नाटकाचे मूल्य अर्थातच उणावते. पण, नेपथ्य, अभिनय, इतर तांत्रिक अंगे, उत्तम बालकलाकार असणे अशा गोष्टींनीही प्रेक्षक खूप खूष होऊ शकतो. याला महत्त्व देणाऱ्या नाटकाला मूल्यमापनाची फिकीरही करून चालत नाही.

या सर्व बाबींची वैशिष्ट्यपूर्णता असलेले हे एक ' जमलेले ' तसेच ' जमवलेले ' ही नाटक आहे. यासाठी, याची ' उपलब्धता ' महत्त्वाची ठरू शकते. एखाद्या खऱ्या प्रश्नाचा ' यशस्वी ' पणे नुसता निर्देश करणेही आवश्यक असतेच. तथाकथित नाटकवेड्या प्रेक्षकांच्या करमणूकप्रधान रंगभूमीवर तर नक्कीच.

--०--०--०--

सलाम नमस्ते

ले. दिलीप जगताप

यासाठी

प्रस्तावना

(परंतु हे पुस्तक निघाले नाही.)

‘ सलाम नमस्ते ‘ हे नावातच समावेशकता सुचवणारे सदर दिलीप जगताप यांनी ‘ लोकमत ‘ च्या ‘ हॅलो सातारा ‘ या पुरवणीत सहा महिने चालवले. त्यासाठी त्यांनी एकूण सत्तावीस लेख लिहिले. त्या सर्व लेखांचा हा संग्रह. तेंडुलकर, खानोलकर यांनी चालवलेली अशा प्रकारची सदरे आठवली तर त्यांचेही ‘ नो बोल ‘ पडत असत हे कुणालाही मान्य होईल. इथे मात्र एकही ‘ नो बोल ‘ पडलेला नाही. ‘ सदरभरू ‘ म्हणावा असा एकही लेख यात नाही.

हे सर्व लेखन एका सुसंस्कृत व्यक्तीच्या घडणीतला, भूतकाळातल्या एका टप्प्यापर्यंतचा भाग व्यक्त करणारे आहे. ही व्यक्तीही अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे. राजकारण, शिक्षण, क्रिकेट, सिनेमा, लेखन -- विशेषत: नाट्यलेखन, आणि अध्यात्म -- अशा विविध अंगांनी जगणे समजून घेणारी अशी ही व्यक्ती आहे. भोवतालच्या सर्व घटनांचे भान ठेवणारी अशीही ही व्यक्ती आहे. कार्याचे डोंगर उभे करणारी माणसे असल्यामुळे महाराष्ट्रातला एक तालुका कसा सांस्कृतिक दृष्ट्या विकसित होत गेला याचे मनोज्ञ चित्रण इथे आलेले आहे. मधल्या काळाच्या अंतराने आणि विशेषत: जगतापांच्या सुसंस्कृत समजूतदारपणामुळे या लेखनाला एक मौलिक तटस्थता लाभलेली आहे. ‘ प्रगल्भ ‘ या शब्दाचा शब्दकोशातला अर्थ ‘ प्रौढ, धीट, शहाणा ‘ असा आहे. या अर्थाचा पूर्ण प्रत्यय यावा असे हे लेखन आहे.

जगतापांनी वेळोवेळी, काँग्रेस (आय) चा तालुका सरचिटणीस, प्रत्येक निवडणुकीतला आक्रमक प्रचारक, इंटकच्या ग्रामीण मजदूर महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचा सदस्य आणि त्यांच्या महाराष्ट्र शाखेचा संघटक सचिव वगैरे जबाबदाऱ्या पार पाडलेल्या आहेत. आय एल ओ च्या आंतरराष्ट्रीय परिषदेत त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले होते. शिवाय महाराष्ट्र शासनाच्या प्रादेशिक निवड मंडळाचे ते सदस्यही होते. या सगळया गोष्टींत असंख्य व्यक्तींशी संबंध येणे आणि अनेकांशी संघर्षही होणे अटळच आहे. तरीही या एकूण लेखनात कुठेही कडवटपणा व्यक्त झालेला नाही. निर्वैर,
द्वेषरहित असे हे लेखन आहे. राजकीय क्षेत्रातल्या कृतिशीलतेबरोबरच सांस्कृतिक क्षेत्रातही तितकीच कृतिशील असलेली ही व्यक्ती आहे. हा एक दुर्मीळ मिलाफ जगतापांमध्ये असल्याने, इतिहासाच्या विशाल पटाबरोबरच, या लेखनात अंतर्भूत असलेले इतिहासाच्या सूक्ष्म हालचालींचे निवेदनही महत्त्वाचे ठरते. वयाने आणि समजुतीने प्रौढ असणे, आपली समज

व्यक्त करताना निर्भय असणे आणि समंजसपणा, सहानुभूती बाळगत, मानवी अनुभवांचा अर्क पिऊन येणारे शांत, तटस्थ शहाणपण असणे -- या सर्वांनी युक्त अशा दृष्टिकोणातून भूतकाळाकडे पाहणे -- असे हे वेगळे, संपन्न लेखन आहे.

मधे बराच काळ गेल्यानंतर हे लेखन घडलेले आहे हे लक्षात घेतले तर, यातले तपशील, बारकावे आणि आपापल्या वैशिष्ट्यांसह येणाऱ्या अनेक व्यक्तींच्या, घटनांच्या नोंदी हे सर्व थक्क करणारे आहे. ' स्मरण ' या मेंदूच्या विभागाचे एक प्रकारचे अद्भूत साहाय्य या लेखनाला लाभलेले आहे.

यातल्या बऱ्याच लेखांना प्रादेशिकतेचे म्हणावे असे एक कोंदण आहे. निरनिराळया प्रदेशांत मोठमोठ्या समूहांना समृध्द करून गेलेले जगतापांसारखे सर्जक उद्रेक आणखीही कुठेकुठे घडून गेले असतील -- अशी खूप कृतिशीलता आणि कृतिवैशिष्ट्यता बेदखल होत काळाच्या पडद्याआड गेली असेल. त्यातला हा एक नमूना तरी आज आपल्या हाती लागतो आहे हे या पुस्तकाचे महत्त्व आहे. यासाठी, लेखक दिलीप जगताप यांच्याबरोबरच ' लोकमत ' आणि या पुस्तकाचे प्रकाशक यांचेही अभिनंदन केले पाहिजे. या सदराच्या शेवटच्या लेखात जगतापांनी राजकीय कादंबरी लिहिण्याचे सूतोवाच केलेले आहे. ते घडेल तेव्हा ते अद्वितीयच काम होईल यात शंका नाही. पण, हे लेखन वाचल्यावर लक्षात आलेला एक मुद्दा इथे मांडावासा वाटतो. ते सर्व लेखन तथाकथित कादंबरीचा फॉर्म घेऊनच आले पाहिजे असे आता वाटत नाही. भूतकाळनिवेदनाच्या या पध्दतीनेच जरी जगतापांनी ते लिहिले तरी त्यांच्या समंजस, उदार दृष्टिकोणामुळे त्याला दर्जेदार ललित लेखनाची उंची लाभू शकेल. कादंबरीसुध्दा राजकीय, सामाजिक, ऐतिहासिक, पौराणिक हे आपण त्यातल्या मटेरिअलवरून ठरवतो. कलाकृतीत प्रमुख असते ती आकलनातली परिपक्वता. ती जगतापांकडे असल्यामुळे, त्यांनी कशाही पध्दतीने हा सगळा मानवी संबंधांचा आणि संघर्षांचा पट मांडला तरी ते साहित्यकलेला एक महत्त्वाचे योगदान ठरेल हे निश्चित.

नेटके, नेमके, अर्थवाही, आणि मोजकेपणाने (वर्तमानपत्राच्या अपेक्षेप्रमाणे) केलेले असे हे लेखन आहे. यातल्या प्रत्येक लेखाची आस्वादक समीक्षा करायचा इथे हेतू नाही. परंतु, ढोबळमानाने त्यांची एक विभागणी कल्पून काही लिहावेसे वाटते. राजकारण, शिक्षण आणि लेखन यांच्यावर साताठ साताठ लेख असून क्रिकेट, सिनेमा, अध्यात्म यांच्यावर एकदोन एकदोन लेख आहेत. लेखांचे या पध्दतीने एकत्रित वाचन केल्यास जगतापांचा दृष्टिकोण सलगपणे स्पष्ट होतो. त्या पध्दतीने जाणवलेले काही थोडक्यात लिहीत आहे.

राजकारण

राजकारणात जगतापांची वाटचाल काँग्रेसच्या मार्गाने झालेली आहे. गांधी, नेहरू, इंदिरा गांधी यांच्याबद्दल त्यांना अत्यंत आदर आहे. जे. कृष्णमूर्ती यांच्याशी चर्चा करून इंदिरा गांधींनी आणीबाणी उठवून निवडणुका

जाहीर करणे या घटनेचा अत्यादरपूर्वक त्यांनी केलेला उल्लेख, राजकारण आणि मानवी प्रश्न यांचा संबंध त्यांना कसा दिसतो ते उजागर करतात. त्यांच्या विचारात आकलनाची स्पष्टता आहे पण हेकटपणा नाही. ' माणसे ही गुणी बाळे असतात ' असा भाबडेपणा बाळगण्यात अर्थ नसतो याचे भान आहे, तरीही, मैत्रीचे क्षेत्रच विस्तरले पाहिजे ही समज आहे.

राजकारणाचे बहुआयामित्व ते अशा समंजस भूमिकेतूनच व्यक्त करतात. मोठा आदरणीय नेता जातीमुळे निवडणुकीत पराभूत होणे, नेहरू आणि यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या महान नेत्यांबद्दलही महाराष्ट्रात रोष निर्माण होणे या गोष्टी ते अशा समावेशक भानातून मांडतात. यशवंतराव चव्हाणांबद्दल बोलतानाचा त्यांचा एक मुद्दा, राजकारण हा गुंडांचा खेळ असतो -- असे म्हणणाऱ्यांना चपराक देणारा आहे. ते म्हणतात की मराठ्यांच्या ताकदीचा उपयोग करून जातीय मार्गाने चव्हाणांना इथला सम्राट होणे सहज शक्य होते, पण मग महाराष्ट्राचे काय झाले असते या विचाराने अंगावर काटा येतो. हे कोण अमान्य करेल ? नेता ' भला ' असेल तर जनतेलाही तो भल्या मार्गाने नेऊ शकतो हेच जगताप इथे स्पष्ट करतात. ते स्वत: जातीय, संकुचित, प्रादेशिक वा धर्म, भाषा यांवर आधारित राजकारण स्वीकारत नाहीत हे तर त्यांच्या सर्वच लेखांतून कळून येते. सर्व जातीधर्माच्या लोकांना त्यांच्या त्यांच्या गुणांबद्दल भरभरून दाद देणे, त्यांचे संस्कार घेतल्याचे सांगणे -- यांतून ते दिसून येते. समाजवाद्यांच्या मार्गाने ते गेले नसले तरी त्या मार्गातल्या लोकांचे योग्य ते कर्तृत्व मान्य करणे, त्यांच्याकडून आपण काय शिकलो ते सांगणे हे जगतापांच्या उदार अंत:करणाचे द्योतक आहे. तरीही, ' साथी कुठे आहेत ' या लेखात त्यांची टोपी उडवून त्यांची खिल्ली उडवायची संधीही ते सोडत नाहीत. ' भूमिके ' चा आग्रह धरणारे ' भूमिकाहीन ' होण्यातली गंमत ते नेमकी टिपतात. भाबडेपणा टाळून एकात्मतेला, समावेशकतेला महत्त्व देणारा हा दृष्टिकोण आहे. अखिल भारतीय स्तरावर हाच दृष्टिकोण महत्त्वाचा ठरतो हे काळाच्या ओघात सिध्दही झालेले आहे. अशा विचारांनीच जगतापांनी वेगवेगळया जबाबदाऱ्या सांभाळणे आणि प्रभावी प्रचार करणे ही कामे केलेली आहेत.

इथे एकच प्रश्न पडतो की स्वत: निवडणुकीला उभे राहणे -- नेतृत्व स्वीकारणे हे, अनुकूल भूमी उपलब्ध असूनही, जगतापांनी का टाळले ? या बाबतीत त्यांची निर्णयप्रक्रिया कशी झाली ? याचे स्पष्टीकरण या लेखांत कुठे मिळत नाही. आर्टस् ला जाण्याचा निर्णय, प्राध्यापक होण्याचा निर्णय, नोकरी सोडून विश्वकोशात रुजू होण्याचा निर्णय -- हे सगळे जर येत असेल तर मग या महत्त्वाच्या निर्णयाची प्रक्रियाही यायला हवी होती असे वाटते. आश्वासित लेखनात हे सर्व येईल असे समजू.

शिक्षण

या विभागात दोन प्रकारचे लेख येतात. एक म्हणजे, वाई आणि परिसर या भागाचा शैक्षणिक, सांस्कृतिक विकास होणे आणि दुसरे म्हणजे, जगतापांचे स्वत:चे शिक्षण. त्या भागाच्या शैक्षणिक विकासाच्या संदर्भात जगतापांच्या वडिलांनी केलेल्या कामाचा, त्यांच्या योगदानाचा मजकूर येतो. ' वडिलांची कीर्ती ' या प्रकारचा तो मजकूर

नाही. आणि तरीही, त्यात एक संयमित अभिमान जरूर आहे. आपल्या इथल्या शिक्षणसंस्था या आपल्या हव्यात, दुसऱ्यांच्या शाखा नकोत -- हा ध्येयवादी विचार बाळगून तिथे झालेल्या कामाचे वर्णन चांगले आलेले आहे. नुसत्याच प्रचंड विचारमंथनाला अर्थ नसतो, त्याला संस्थात्मक कार्याची जोड असावी लागते, नाही तर सगळेच निरर्थक ठरू शकते, हेच जगताप इथे सुचवतात. या एकूणच लेखनात ‘ उपदेशाचे डोस ‘ कुठेच नाहीत, पण, बोध घेण्यासारखे बरेच आहे. त्या

भागात उभ्या राहिलेल्या एकूण शैक्षणिक कार्याबद्दल लिहिताना, जगताप सर्व संबंधितांचे आदरपूर्वक उल्लेख करतात. एकूणच या सत्तावीस लेखांत, ज्यांची नावेही बहुसंख्य लोकांना माहिती नाहीत, त्यांनाही त्यांचे त्यांचे मोलमाप जगताप देत जातात. आपापले योगदान देऊन लुप्त होणाऱ्या असंख्य माणसांचे महत्त्व कृतज्ञतापूर्वक नोंदवण्याची ही जाण हे जगतापांच्या लेखनाचे एक वैशिष्ट्यच म्हणावे लागेल.

जगतापांचे स्वत:चे शिक्षण याबद्दलचे लेखही हृद्य आहेत. ‘ कुठेही ॲडमिशन मिळाली असती ‘ असे असताना त्यांनी आर्टस् ला जायचा निर्णय घेतला. ‘ मिळतेय तर घ्या ‘ या मार्गाने न जाता आपल्या आकलनाप्रमाणे जाणे,

तसे जगणे हेही एक जगतापांचे म्हटले तर ‘ खुळे ‘ वैशिष्ट्य आहे. लहान गावातून शहरात येणे, न्यूनगंड, नंतर निबंधाचे कौतुक होणे, न्यूनगंड हळूहळू कमी होणे, खूप मित्रमैत्रिणी मिळणे, एकांकिका लेखन, स्पर्धा, यश -- हा सर्व भाग खरोखरच वाचण्यासारखा आहे. हे सगळे असूनही, जे मुळातच शहरातच राहात आहेत किंवा ज्यांना न्यूनगंडाचा प्रश्नच नाही , अशांबद्दल मत्सर वा राग यांचा लवलेश यात नाही. सर्वांकडून मिळेल ते ज्ञान घेत जावे आणि ‘ मैत्री ‘ हा विभाग समृध्द करत जावा, असे हे जगणे आहे. या शिक्षणाच्या काळात जगतापांच्या संपर्कात नुसती आलेली नव्हे तर त्यांच्या ‘ मैत्री क्लब ‘ मध्ये सामील झालेली नावे जरी पाहिली तरी त्यातले बरेचजण आज नावारूपाला आलेले दिसत असून आपापल्या क्षेत्रात चांगले काम करत आहेत हे लक्षात येते. ‘ पुरुषोत्तम करंडक ‘ च्या चालकांनाही सांगता येणार नाही असे त्या काळाचे तपशीलवार वर्णन जगतापांच्या स्मृतीतून इथे येते. याचबरोबर, इंग्रजी भाषा शिकण्याचे फायदे, त्या भाषेतले वाचन यांचाही उल्लेख जगताप त्या भाषेला सलाम ठोकून करतात. या सगळयातून जगतापांच्या व्यक्तिमत्वघडणीची प्रक्रियाही आपल्या लक्षात येत जाते. वाई या भागाचा आणि तिथल्या एखाद्या व्यक्तीचाही शैक्षणिक, सांस्कृतिक विकास होण्यात कुणाकुणाचे, कसेकसे कष्ट पायाभूत ठरत असतात याचीही जाणीव या लेखनातून होते.

क्रिकेट आणि चित्रपट

क्रिकेट आणि चित्रपट यांचे प्रचंड प्रेम जगतापांनी आयुष्यभर जोपासलेले आहे. त्या दोन्ही क्षेत्रातल्या त्यांच्या आठवणी लाजवाब आहेत. क्रिकेट, नाटक आणि राजकारण या तिन्हींचा एकत्रितपणे त्यांनी केलेला विचार मुळातूनच वाचण्यासारखा आहे. आय पी एल स्पर्धेचे त्यांना अत्यानांद देणारे वैशिष्ट्य म्हणजे राष्ट्रवाद बाजूला ठेवून

सर्वच देशांच्या उत्तम खेळाडूंच्या खेळाचा मनमुराद आनंद घेता येणे -- हे ! यातही वैश्विकतेचा ध्यास असणारे मनच दिसते. ग्लॅमर मिळवलेल्या अनेक खेळाडूंबद्दल लिहितानाच, आता कदाचित फारसा कुणाला माहीत नसलेला गोलंदाज अफजल याच्याबद्दलही आत्मीयतेने आणि अभिमानाने लिहायला ते विसरत नाहीत !

लेखन आणि अध्यात्म

स्वत:ची प्रतिकृती म्हणून वामन हे पात्र तयार करून जगताप लिहितात. स्वत:कडे लहानपण घेऊन दुरून बघतात. याच वैशिष्ट्यामुळे ते व्यक्तिगत मते आणि बांधिलकी यांचे स्तोम माजवत बसत नाहीत. लेखन किंवा नाटक हे त्यांचे अध्यात्म आहे असे ते म्हणतात तेव्हा त्यांना काय म्हणायचे असते ? माणसांमध्ये विचार हे हजार तऱ्हांनी चालतात, अमुकच वैचारिक रचना सर्वश्रेष्ठ असे ठरवण्यात अर्थ नसतो. तरीही, एकात्मतेचे, समावेशकतेचे महत्त्व नेहमीच

अबाधित असते. या आकलनामुळेच जगतापांचे हे लेखन सर्वांसाठीच महत्त्वाचे ठरते. ‘ साधनेचे दिवस ‘ आणि ‘ गावाकडे

चला ‘ हे दोन लेख जगतापांच्या जीवनदृष्टीचा अर्कच व्यक्त करणारे आहेत. वैचारिक, जातीय असा कोणताही भेदभाव विद्वेषाचे कारण न होता जगताप लिहू शकतात हे त्यांच्या या अध्यात्माशिवाय शक्य झाले नसते. जो माणूस जगण्यातली अर्थहीनता जाणवण्यापर्यंत पोचतो तो माणूस कुणाबद्दल तुच्छता, द्वेष कसा बाळगणार ? बुध्दीच्या कक्षेत माणसाचे पूर्ण जगणे बसू शकेल यावर जगतापांचा विश्वास नाही हे स्पष्टच आहे. माणसाच्या आकलनातच अंतिम गूढतेचे तत्त्व समाविष्ट झाल्याशिवाय सगळेच अधुरे राहील ही जाणीव त्यांच्या लेखनात दिसते. त्यांच्या लेखनप्रवासाची फक्त सुरुवातच या लेखांमधल्या कालखंडात आलेली आहे. तीही तशी अनेक तपशील-घटनांनी युक्त आहे. यशासहही आहे. आजची अनेक प्रसिध्द नावे त्यांच्या या प्रवासात त्या वेळी सहभागी झालेली होती असे दिसून येते. पुढे त्यांनी शेक्स्पिअरच्या पाच नाटकांचे अनुवाद केले, सार्त्रचे एक नाटक आणि झनेचे एक नाटक यांची रूपांतरे केली. याचबरोबर, स्वत:चीही काही स्वतंत्र नाटके लिहिली. पण, कुठेतरी माशी शिंकली खास. एखाद्या दिग्दर्शकाला नाटकाच्या शक्यता दृष्टिगम्य झाल्याशिवाय तो त्या नाटकाशी आणि लेखकाशी आवश्यक ती झटापट करत नाही आणि त्यामुळे त्या नाटकाची अंतिम संहिता निर्माण होणे राहूनच जाते. तसे काहीतरी झाले असावे असे दिसते. आपले नाटक एखाद्या योग्य दिग्दर्शकाला क्लिक होणे हे कसे घडते याचे तर्कशास्त्र अनाकलनीय आहे असेच शेवटी म्हणावे लागते.

समारोप

हे एक छोटेसेच पण अनेक कारणांनी वाचकांना आवडू शकेल असे पुस्तक आहे. ‘ मृत सवयींच्या भयाण वाळवंटात स्वच्छ विवेकाची धारा हरवून जाऊ नये ‘ -- अशा अर्थाची टागोरांची एक ओळ आहे. जगतापांना तसाच

काहीसा मनाचा ताजेपणा आणि स्वातंत्र्य अभिप्रेत असावे असे दिसते. एखादा विचारव्यूह, एखादे मत अशा सवयीत पूर्ण आयुष्य जखडणे यापेक्षा स्वातंत्र्याच्या मार्गाने समावेशकता यावी अशी त्यांची अपेक्षा असावी. या विशेष कारणाबरोबरच, वरील मजकूरात आलेली इतर वैशिष्ट्येही या पुस्तकाचे वाचन घडवत राहतील.

या लेखांतून जगतापांनी दिलेले पुढील लेखनाचे आश्वासन लौकरच पूर्ण होवो हीच शुभेच्छा !

---------- ००००० ----------

लेखास प्रतिसाद

प्रिय श्रीनिवास जोशी,

धरणाचे सगळे दरवाजे खोलावेत त्याप्रमाणे मेंदूची सगळी केंद्रे खुली करून लिहिलेला तुमचा ' कोंबडी पळाली ' हा लेख वाचला. भन्नाट, अप्रतिम म्हणून थांबवत नाही म्हणून ग्रेटच म्हणतो. वैचारिक, समीक्षात्मक आणि ललित या तिन्ही प्रकारांत एकाच वेळी उत्तम ठरण्याची अद्वितीय करामत या लेखात घडलेली आहे. हा लेख नुक्ताच लिहिलेला असल्याने त्याला अजरामर म्हणता येत नसले तरी, पुढे अनेक वर्षे महाराष्ट्राने या लेखाचे वाचन करणे इथल्या सांस्कृतिक तब्येतीच्या दृष्टीने निश्चितच उपकारक ठरू शकेल यात शंका नाही. इतके समृद्ध, दिलखुलास लेखन क्वचितच वाचायला मिळते. एक प्रकारे, ॲब्सर्डिटीच्या आकलनातून आलेली आल्हाददायक सहजता या लेखनात आहे. त्यामुळेच, उपरोधही आकसहीन आहे. आणखीही बरेच गुण या लेखात आहेत असे म्हणून आवरते घेतो.

आपल्याला माहीत असलेला मनाचा वापर हा अलगता निर्माण करणाराच असतो. त्यामुळे, स्पर्धा, वर्चस्व, स्वातंत्र्याच्या गप्पा मारत दडपशाही हे सगळे या ना त्या प्रकारे चालूच असते. समीक्षेचे क्षेत्र एखाद्या विशिष्ट विचारसरणीच्या लोकांच्या प्रभावाखाली असते तेव्हा सांस्कृतिक बाबतीत खूपच हानी होते. विदीर्णता हे मनाचे वैशिष्ट्य असेल तर उत्तम कला ही एकात्म आणि समग्रावधानी असते. तुकारामाच्या भाषेत ' एकविध मन ' हीच कलेची सांस्कृतिक महत्ता असते. आपल्याकडे, तुकारामाचा आशय सोडून देऊन त्याला ' कवी ' म्हणून मोठा म्हणायची निर्बुद्ध फॅशन तथाकथित बुद्धिप्रामाण्यवाद्यांनी पाडलेली आहे. हेही तुकारामाला दडपून टाकायचा प्रयत्न असेच स्पष्टपणे पाहायला हवे. असे करणाऱ्यांना आजचे मंबाजीच

म्हणायला हवे.

-- चं. प्र. देशपांडे.

अभिप्राय

‘ सुसाट ‘ (नाटक)

ले. – अजित तात्याबा देशमुख.

अजित तात्याबा देशमुख यांचे ‘ सुसाट ‘ हे नाटक व्यावसायिक रंगभूमीवर येणे ही मराठीतली एक अपवादात्मक विशेष घटना होती. हे नाटक, ज्याला ॲब्सर्ड वा व्यस्त रंगभूमीचे नाटक म्हणतात, तसे होते. अशा नाटकाच्या लेखनात नुसते कौशल्य असून भागत नाही. मानवी जगण्यातली व्यस्तता, निरर्थकता, हेतुशून्यता, अतार्किकता यांचे स्वतःचे आकलन आणि भान लेखकाला असावे लागते. या अर्थाने ते नाटक सर्जक असावे लागते. प्रेक्षकांच्या सवयींचे नुसते लाड करणारे असून चालत नाही. या नाटकाचा प्रयोग मी पाहिला तेव्हा त्यात असलेल्या या सर्व वैशिष्ट्यांमुळेच मला विशेष आनंद वाटला होता. अलिकडेच मी या नाटकाची संहिताही वाचली. एका अतार्किक परिस्थितीत माणसाचे डांबले जाणे हे या नाटकात अनेक आवर्तनांतून प्रभावीपणे आलेले आहे. देशमुखांचे संवादही नाटकाच्या आशयशी एकजीव झालेले आहेत. एका बाजूला हे सगळे पृष्ठस्तरावर विनोदी वाटत असतानाच आपल्याला त्यातला गंभीर आशयही जाणवत राहतो आणि त्यामुळे आपण अंतर्मुख होत जातो. एखादे नीतीतत्त्व सांगणे वा बोध देणे असा या नाटकाचा कोणताच उद्देश नाही. मानवी जगण्यातल्या एका अटळ कोंडीचे भान देण्याचे गंभीर काम हे नाटक करते.

देशमुखांचे हे पहिलेच नाटक आहे. त्यात, असा गंभीर आशय, हसतखेळत पद्धतीने, उत्तम रचना आणि उत्तम संवाद यांतून ते देतात. माझ्या मते, ‘ सुसाट ‘ हे मराठीतले एक अपवादात्मक चांगले नाटक आहे. त्यांच्या पुढील नाट्यलेखनाबाबत खूप उत्सुकता निर्माण करणारे असे हे नाटक आहे.

--- ००० ---

प्रस्तावना (एकांकिका ८७ ते ९२)

घड्याळाचा कालावकाश आणि मनाचा कालावकाश यांतला फरक लक्षात घेतला तर, कलेच्या संदर्भात, घड्याळाच्या कितीही कमी कालावकाशात मनाचा कितीही मोठा कालावकाश सामावणे शक्य आहे, हे मान्य होण्यात अडचण नसावी. ' ब्रेथ ' या एकांकिकेचा प्रयोग काही सेकंदांत पूर्ण होणारा आहे, हे इथे लक्षात घ्यावे. याचा अर्थ, मनाचा कालावकाश, अनुभवाचा आकार आणि त्याची व्याप्ती, जगण्याच्या प्रक्रियेचे आकलन आणि त्यांची कलात्मक अभिव्यक्ती या गोष्टी घड्याळाच्या कालावकाशाने नियंत्रित होत नाहीत. एखादी कलाकृती घड्याळाचा किती कालावकाश व्यापते हे फारसे महत्त्वाचे नसते. म्हणूनच ' एकांकिका ' हा एक स्वतंत्र, स्वयंपूर्ण नाट्यप्रकार मानण्यास कुणाची हरकत नसते. या नाट्यप्रकारात काही उत्तमोत्तम नाट्यकृती निर्माणही झालेल्या असल्याने आता हा मुद्दा फारसा विवाद्यही राहिलेला नाही. त्यामुळे, याच्या पुढची पायरी अशी आहे की, एखादी दर्जेदार एकांकिका ही एखाद्या तशाच दर्जेदार नाटकाहून कोणत्याही कारणाने ' कमी ' समजायचे कारण नाही -- हेही मान्य व्हायला हरकत नसावी. लघुकथा हा एक स्वतंत्र साहित्यप्रकार म्हणून जगभर मान्य झालेला आहे आणि तो कादंबरीपेक्षा कमी दर्जाचा आहे, असे काही नाही. किंवा तुकारामाचा एखादा अभंग चार ओळींचा आहे म्हणून तो कुठल्याही दीर्घकवितेहून कमी महत्त्वाचा असतो, असे काही नाही, हेही इथे लक्षात घ्यावे.

वरील सर्व गोष्टी बरोबर असल्या तरी आपल्या प्रेक्षकांनी मात्र या गोष्टी मान्य केलेल्या नाहीत, असे दिसते. समांतर रंगभूमीचा प्रेक्षकवर्ग जमेस धरूनही हेच सत्य असल्याचे दिसून येते. ' रंगायन ' च्या काळात प्रेक्षकांना एकांकिकांबद्दलही उत्सुकता असायची. नाटकाच्या मानाने मराठीत एकांकिकेला खूपच कमी परंपरा असली तरी तेव्हा हा बऱ्यापैकी प्रतिष्ठित होणारा असा नाट्यप्रकार होता. याला अर्थातच विजय तेंडुलकरांचे मोठे योगदान होते. एकांकिका अशी अशी रचावी आणि ' लिहून काढावी ' असे वातावरण नव्हते. या नाट्यप्रकारातल्या लेखनाकडूनही चिंतनात्मकता,

संवेदनशीलता, तंत्रसफाई, कलात्मक आव्हानात्मकता अशा अपेक्षा बाळगण्यात कुणाला अपराधीपणा वाटत नसे. ’ ’ सत्यकथा ’ सारखे मासिकही एकांकिकेला जागा देत असे. थोडक्यात म्हणजे एकांकिकालेखनाला काळाचा पाठिंबा आताच्या तुलनेने खूपच चांगल्या प्रकारचा होता. आता ती परिस्थिती नाही. एकाच एकांकिकेचा प्रयोग पाहायला प्रेक्षकांनी येणे तर आता अशक्यच दिसते. (काही वर्षांपूर्वी ’ महाराष्ट्रीय कलोपासक ’ ने दर बुधवारी एकच एकांकिका सादर करायचा ’ प्रयोग ’ करून पाहिला होता. त्याला प्रेक्षक येत असत.) दोन--तीन एकांकिकांच्या एकत्रित प्रयोगांनाही प्रेक्षकांचा फारसा प्रतिसाद मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. अपवाद म्हणजे एखादी एकांकिका--स्पर्धा संपल्यावर तीत यशस्वी झालेल्या दोनतीन एकांकिकांचा एकत्रितपणे एखाददुसरा प्रयोग त्या तापलेल्या वातावरणाच्या तव्यावर होऊ शकतो, एवढेच. विशेष म्हणजे दोनचार वेगवेगळे किस्से असलेले पण एकच नाव असलेले नाटक प्रेक्षकांना चालते पण एकांकिकांकडे त्यांचे पाय वळत नाहीत, असे दिसून येते. नाटिका, एकांक, एकांकिका यांऐवजी प्र. ना. परांजप्यांनी ’ लघुनाटक ’ ही संज्ञा सुचवली होती, ती स्वीकारायला हवी होती असे वाटते. त्यामुळे कदाचित एकांकिकेचाही ’ नाटक ’ पणा लक्षात राहिला असता !

हे सगळे एकूण पाहता असे दिसते की आपला प्रेक्षक घड्याळाच्या कालावकाशाला खूप महत्त्व देणारा आहे. तो पाच अंकांवरून दोन अंकांपर्यंत खाली येईल पण ’ मोठ्या ’ नाटकाचे मध्यांतर आणि बटाटेवडे यांचा त्याग करायला तो तयार होईल असे दिसत नाही. याच वेळी समांतर रंगभूमीवर मात्र दीर्घांकाला मान्यता असल्याचे दिसते. (हॉल्समध्ये, गच्च्यांवर वगैरे प्रयोग करायचे झाल्यास ’ दीर्घांक ’ च सोयीस्कर असतो -- हेही आहेच. प्रयोगांचे वाढते आर्थिक गणित आणि तालमींना लागणारा काळ वगैरे विचारात घेतले तर कदाचित यापुढे प्रायोगिक / समांतर रंगभूमीला दीर्घांकाशिवाय तरणोपायच राहणार नाही असे वाटते.) सारांश म्हणजे एकूणात घड्याळाचा कालावकाश पुरेसा ऐसपैस असणे ही आपल्या रंगभूमीवरची एक अटच होऊन बसली आहे. त्यामुळे, कलात्मक शक्यतांच्या स्तरावर एकांकिकेला मान्यता असली तरी व्यवहारात प्रेक्षकांची या नाट्यप्रकाराला मान्यता / आश्रय लाभत नाही. म्हणूनच ’ एकांकिका ’ हा नाट्यप्रकार मृत्यूपंथालाच लागल्याचे दिसते आहे. परंतु, हा नाट्यप्रकार जसा कलाबाह्य कारणांनी मृत्यूपंथाला लागला आहे, त्याचप्रमाणे, कलाबाह्य कारणांनीच तो तगूनही आहे असे दिसते. एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यातला सोयीस्करपणा, खूपजणांना संधी मिळणे, कमी खर्चात व्यासपीठ उपलब्ध होणे, स्पर्धेच्या वातावरणाचा सनसनाटीपणा अनुभवायला मिळणे, इत्यादी कारणांमुळेच हा नाट्यप्रकार जिवंत राहिलेला आहे. या नाट्यप्रकाराचे मोसमी फोफावणे हे किरकोळ धुगधुगीपेक्षा जास्त योग्यतेचे नाही, हे स्पष्ट आहे. थोडक्यात म्हणजे घड्याळाचा कालावकाश कमी असणे, या कारणाने प्रेक्षकांकडून नाकारला गेलेला आणि त्याच कारणाच्या काही व्यावहारिक उपयुक्ततेमुळे टिकून असलेला असा हा नाट्यप्रकार आहे. निरनिराळया लेखनप्रकारांचा २००० सालापर्यंतचा आढावा घेणाऱ्या ’ प्रदक्षिणा ’ -- खंड दुसरा -- या पुस्तकात एकांकिकेवरच्या लेखात वि.भा.देशपांडे म्हणतात, ‘ गेल्या पाच-दहा वर्षांत एकांकिका लेखनाचा विस्तार उदंड झाला. तुलनेने गुणात्मकता कमी आहे हे सतत जाणवते आहे.‘

इथे एक मुद्दा विचारात घ्यावा असे वाटते. गेल्या काही काळात काही एकांकिकांची नाटके करून ती सादर करण्यात आली. असे करावे की करू नये, यावरची मतमतांतरेही झाली. घड्याळाच्या ' वाढीव ' कालावकाशात एकांकिकेचे नाटक झालेली कलाकृती, कंटाळा न आणता, आपल्या अंगप्रत्यंगांनी नाटक म्हणून सिध्द होत असेल तर याला कुणाचीही काहीही हरकत असायचे कारण नाही. बऱ्याच वेळा असे न झाल्याने किंवा असे प्रयत्न फसल्याने त्याला अप्रामाणिकपणाचे रूप आले. या बाबतीत एखादे सार्वकालीन सत्य असे तत्त्व सापडेल असे वाटत नाही. त्या त्या नाट्यकृतीच्या बाबतीत याचा स्वतंत्र विचार करावा लागेल, असेच म्हणणे योग्य आहे. अशा प्रकारातले व्यावसायिक यशापयशाचे आडाखे सोडून दिले तरीही एकांकिकांचे जगणे नगण्य होत चालल्यावर या प्रकारचे बरेवाईट प्रयत्न होत राहणारच. कथेवरून नाटक, कादंबरीवरून सिनेमा, नाटकावरून सीरीयल, सिनेमावरून नाटक असे आंतरकलाप्रकार आदानप्रदान चालू असतेच. ते होणे इष्ट की अनिष्ट हे कुणी ठरवायचे ? शेवटी, त्या कलाप्रकारात स्वतंत्रपणे निर्माण झालेल्या कलाकृतीला जे निकष लावायचे तेच या आदानप्रदान कलाकृतीला लावावे लागणार. चिंताजनक किंवा अनैतिक असे यात काही नाही.

१९८७ ते १९९२ या कालखंडातल्या, या संग्रहात समाविष्ट असलेल्या एकांकिका म्हणजे त्या कालखंडातल्या सवाई यशस्वी एकांकिका आहेत यात वादच नाही. संजय पवार, वसंत डहाके, देवेंद्र पेम यांनी यानंतरच्या काळातही कलेच्या अनेक क्षेत्रांत उल्लेखनीय काम केलेले दिसते. या अर्थाने ' चतुरंग ' च्या या अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या गेलेल्या स्पर्धेच्या माध्यमातून निवडल्या गेलेल्या या एकांकिका प्रातिनिधिक मानता येतात. परंतु, याचबरोबर एक गोष्ट लक्षात घ्यावी लागते की प्रतीकात्मक नेपथ्य न समजणारे आणि वास्तवदर्शी नेपथ्याचा आग्रह धरणारे, कलेत जीवनदृष्टी / तत्त्वज्ञान असले काही आले की बोअर होते असे म्हणणारे, तांत्रिक करामतींनी प्रभावित होणारे, असे परीक्षक ठिकठिकाणी काही चांगल्या एकांकिकांचे मुडदेही पाडत असतात. त्यामुळे काही चांगल्या संहितांवर अन्याय झालेला असण्याचीही शक्यता असते. शिवाय, एकांकिका स्पर्धा या मुख्यत: सादरीकरणाच्या स्पर्धा असतात, काही संघ चांगल्या कलाकारांभावी, सोयीसुविधांभावी मागेही पडलेले असू शकतात, त्यामुळेही काही संहिता मागे पडलेल्या असू शकतात. हे उल्लेख यासाठी केले की अधिक खोलातला अभ्यास करण्याची इच्छा असणाऱ्यांनी अशा चांगल्या असूनही अपयश पदरी पडलेल्या संहितांचाही शोध घ्यावा. एकांकिका काय किंवा नाटक काय, स्पर्धेत अपयश मिळणे म्हणजे मृत्यू पावणे, हेच एक सत्य असल्याचे सामान्यत: दिसून येते.

चिंतनात्मकतेचे सांस्कृतिक महत्त्व कुठल्याच कलेत दुर्लक्षिता येत नाही. माणसाचे जगणे हे एकरेषीय अशा बौद्धिक कारणपरिणामांच्या साखळीत चालते का, गोंधळलेली, हिंसक माणसे जगात शांतता आणू शकतात का, माणसाच्या सगळयाच संबंधांत संघर्ष का आहेत, सर्व तऱ्हेच्या समृद्धीतही एकाकीपणा आणि नैराश्य का फोफावतेय,

नीती-अनीती, सत्यासत्य, चांगुलपणा-दुष्टपणा वगैरे आपण जे बोलतो त्याचे अर्थ काय, सगळीकडे फूट पडतेय ती का, धर्म म्हणजे काय, विचारसरणी काय देत आहेत, उत्तर-आधुनिकवाले म्हणतात त्याप्रमाणे सगळेच निरर्थक आणि उथळ असते का -- हे आणि असे प्रश्नच ज्यांना पडत नाहीत ते लेखक / कलावंत कसली कलानिर्मिती करणार ?   गुणदोष नाहीत, मर्यादा नाहीत अशी कलाकृती अस्तित्वातच असू शकत नाही. तिची दिशा परिपूर्णतेची असली तरी, शंभर टक्के परिपूर्ण अशी कलाकृती अस्तित्वात येऊ शकत नाही. पण असे असूनही, शंभर टक्के परिपूर्ण अशी कलाकृतीची मूल्यात्मकता मात्र असू शकते. कलाकृतीच्या संपर्कात येणाऱ्याला, प्रसंगी, देहातीत, म्हणजे कलाकृतीच्या देहाच्या अतीत, होता यावे लागते ते त्या मूल्यात्मकतेसाठीच. कलाकृतीचा देह हा त्या मूल्यात्मकतेचे माध्यम म्हणून अस्तित्वात आलेला असतो. पण तो तिला स्वत:च्या मर्यादेत जखडत नाही.

---- ००० -----

१७ मे २०१७ नंतर इथे घेतलेला वाढीव मजकूर --

हिंदू

जगण्याची समृद्ध अडगळ

(भालचंद्र नेमाडे यांची कादंबरी)

१. या कादंबरीत अनुभव, माहिती, शेरोशायरी, धार्मिक वाङ्मयातील उद्धृते, मानवी संबंधांतले, विशेषत: ग्रामीण जीवनातले बारकावे आणि तपशील यांची भरपूर रेलचेल आहे. मराठी कादंबरीत ही अशी मास्टरी क्वचितच दिसणारी आहे, असेही म्हणता येईल. प्रचंड मेहनत, अभ्यास, निरीक्षण, टिपणे करून ती जतन करणे अशा प्रदीर्घ आणि सधीर कामाशिवाय हे शक्यच होणार नाही हे स्पष्टच आहे. हा भरपूरपणा या कादंबरीच्या सहाशे पानांत ओसंडून वाहतो आहे. या वैशिष्ट्यासाठी सदर कादंबरीला प्रथम एक सलामच ठोकला पाहिजे. (पुढल्या आवृत्तीत दुरुस्त करावी अशी लक्षात आलेली एक चूक म्हणजे, ' साथी न कोई मंजिल ' हे गाणे ' काला पानी ' या सिनेमातले नसून ' बंबईका बाबू ' या सिनेमातले आहे.)

२. या कादंबरीतली बहुसंख्य पात्रे आणि स्वत: नायक हा हिंदू आहे, हे कारण सोडता या कादंबरीला ' हिंदू ' हे नाव देण्यातले औचित्य दिसत नाही. या दृष्टीने तर आपल्या बहुसंख्य कथाकादंबऱ्या या ' हिंदू ' च म्हणता येतील. हिंदू धर्म वा जगण्याची पद्धत यावर कोणताच सखोल भर या कादंबरीत नाही. काही शाब्दिक, बौद्धिक संबंध दाखवण्यापलीकडे या क्षेत्रातले इथे काही नाही. नाही तर, या विषयावरची सहाशे पानांची कादंबरी हातात पडूनही भावना दुखावणारे कुणालाच काहीच सापडू नये, असे घडले नसते. माणसांतले भलेबुरे संबंध, वागण्याच्या असंख्य पद्धती हे तर

जगभर आहे. हेच इथे जे घडते ते हिंदू धर्माच्या प्रभावामुळे घडते, असे आकलन काही ही कादंबरी देत नाही. मग हे नाव कशासाठी दिले ? आधी ठरले होते, हे कारण असेल. आता नुसते ' हिंदू ' म्हणणे फारसे अर्थपूर्ण ठरत नाही, हे लक्षात आल्यामुळेच, ' जगण्याची समृद्ध अडगळ ' हे नंतर जोडले असावे. तरीही, हिंदू असण्याचा आणि जगण्याची समृद्ध अडगळ असण्याचा काय संबंध, असा एकत्रित आवाकाही ही कादंबरी घेत नाही. ' जगण्याची समृद्ध अडगळ ' हे खरे तर या कादंबरीतल्या एकूण मटेरियललाच लागू पडते. त्यामुळे, काही पानांवरून नुसती नजर फिरवत, उड्या मारत ही कादंबरी वाचली तरी काही बिघडत नाही. हे सगळे एकत्र धरणारे अंतर्गत भान इथे अनुपस्थित आहे. यात आणखी चार गोष्टी वाढवताही येतील किंवा आहेत त्यांतल्या कमीही करता येतील, कारण ही नुसती समृद्ध अडगळ आहे. समृद्ध असणे चांगले आहे, पण कादंबरीलाच अडगळीचे रूप येणे, हा दोष वाटतो. या वेगवेगळया लघुकथा असत्या तरी काय फरक पडला असता ? की नेमाड्यांना लघुकथा हा फॉर्म कमी दर्जाचा वाटतो म्हणून असे झाले असेल ? सहाशे तीन पाने ! बाप रे !

--- ००० ---

अलास्कन लोककथा

August 16, 2014 at 4:32pm

उत्तर ध्रुवाजवळील अलास्कन लोककथा

डॉ. अरुण प्रभुणे हे माझे एक जुने मित्र आहेत. पूर्वी ते उदगीरच्या कॉलेजात मराठीचे विभागप्रमुख होते. आता ते अमेरिकेत असतात आणि तिथल्या एका विद्यापीठाची अभ्यासवृत्ती मिळालेली असल्याने तिकडच्या आणि आपल्या लोकवाङमयाचा ते तौलनिक अभ्यास करत असतात. माझ्याकडून, माझ्या लेखन कारकीर्दीतले दोन विशेष लेख – १. मराठी प्रायोगिक नाटक आणि प्रायोगिकतेचे निकष २. माझी नाट्यलेखन प्रक्रिया – हे त्यांनीच माझ्याकडून लिहून घेतले आणि दोन वेगवेगळ्या विशेषांकांत प्रसिद्ध केले.

अलिकडेच त्यांची भेट झाली तेव्हा त्यांनी ' उत्तरध्रुवाजवळील अलास्कन लोककथा ' हे त्यांचे एक वेगळेच पुस्तक मला सप्रेम भेट दिले. या लोककथांचे मूळ संशोधन व लेखन जॉन इ. स्मेल्सर या प्रख्यात अमेरिकन लेखकाचे असून अनुवाद डॉ. प्रभुण्यांच्या पत्नी उषा प्रभुणे आणि स्वतः डॉ. प्रभुणे यांनी केलेला आहे. पशू, पक्षी, प्राणी, जलचर,वनस्पती, मानव आणि निसर्ग यांच्या या अजब लोककथा आहेत. मला तर आपण एक कवितेचे पुस्तक वाचतो आहोत, असेच वाटत होते. यात ही वेगवेगळी अस्तित्वे एकमेकांची रूपे घेतात, त्यांच्यांत सरमिसळ होते – ही सरमिसळ आहे की हे वेगवेगळ्या वंशांचे मानव आहेत, हेही प्रत्येक वेळी स्पष्ट केले जात नाही. काही नीतीकथा आहेत, पण अनेक कथा कोणत्याही तात्पर्याकडे न जाणाऱ्या जीवनदर्शन कथा आहेत ! कलेतले ' पटणे ' हे एक तत्त्व आपण नेहमी विचारात घेतो – त्याची इथे मुळीच चिंता दिसत नाही. वाचताना, या कथांच्या जगात आपण असे रमतो की तसले प्रश्न आपल्या मनांत येणे बंदच

होते ! असे अत्यंत मुक्त लेखन क्वचितच आपल्या वाचनात येते.याचा अर्थ, या कथा म्हणजे निरर्थक बडबड आहे, असेही म्हणता येत नाही. या कथांच्या वाचनातून आपली जगण्याची जाण समृद्ध होत आहे, हे आपल्याला जाणवत राहते. आपण मनात जे मानव, पक्षी असे पूर्ण वेगळे प्रकार कल्पिलेले असतात, ते सैल पडतात – सगळ्या जीवजगताची आणि विश्वाची एकात्मता जाणवू लागते. एक गंमत सांगायची झाली तर कावळा हा काही आपण फार ग्लॅमरवाला पक्षी मानत नाही – यांतल्या बऱ्याच कथांमध्ये डोमकावळा हे एक अत्यंत महत्त्वाचे पात्र आहे ! खूप बोलता येईल -- मला हे पुस्तक खूप आवडले. पद्मगंधा प्रकाशनची उत्कृष्ट, दर्जेदार निर्मितीमूल्ये असलेले असे हे पुस्तक आहे. फारच छान ! जरूर आवर्जून वाचा !

--- 000 ---

मराठी राज्यात मराठी कोपऱ्यात !

' मराठी भाषेची अ-श्वेतपत्रिका'

September 24, 2013 at 2:18pm

महाराष्ट्र हे मराठी भाषकराज्य आहे, तर इथे मराठी भाषेच्या विकासाची, तिची दैनंदिन उपयुक्तता वाढण्याची आणि त्या भाषेतून निरनिराळे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळण्याची – अशी सर्व काळजी शासकीय स्तरावर घेतली जात असणारच, असे आपण गृहीत धरतो. पण परिस्थिती तशी मुळीच दिसत नाही. अत्यंत धक्कादायक म्हणजे, मराठीची इथे उपेक्षाच होते आहे, असेच म्हणावे, अशी स्थिती आहे. या राज्याच्या भाषेसाठी इथे दर वर्षी माणशी फक्त एक रुपया खर्च होतो आणि त्यातला निम्मा खर्च आस्थापनासाठीच लागतो ! इतर राज्ये वा केंद्रशासित भाषाविभाग आपापल्या भाषांसाठी आपल्या दसपट तरतूद करतात ! इतरत्र अशा भाषाविभागांतल्या कर्मचाऱ्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी, हक्क आणि सोयी-सुविधा मिळतात.या पार्श्वभूमीवर आपल्या ' राज्य मराठी विकास संस्था' चे कर्मचारी त्या गोष्टींपासून कैक वर्षे, सुरुवातीपासून वंचित आहेत ! भाषा ही एक बिनमहत्त्वाची, बिनकामाची, फालतू गोष्ट असल्यासारखा एकूण कारभार आहे!

हे मला नीट माहिती व्हायचे कारण म्हणजे डॉ. दीपक पवार यांच्या नेतृत्वाखाली चालणाऱ्या ' मराठी अभ्यास केंद्र ' या अशासकीय स्वयंसेवी संस्थेने काढलेले ' मराठी भाषेची अ-श्वेतपत्रिका' हे २५८ पानी पुस्तक माझ्याकडे अभिप्रायार्थ आल्याने, ते वाचले गेले ! डॉ. पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या बाबतीत केलेले काम आणि पाठपुरावा पाहून थक्क

झालो. इतके तपशील, संदर्भ, विषयाची सखोल जाण आणि अत्यंत सुविहित मांडणी – हे खरोखरच वाखाणण्यासारखे आहे.या पुस्तकाचे देणगी मूल्य रु. ३००=०० आहे. मराठीबाबत कळकळ असलेल्या संस्था, व्यक्ती आणि राजकीय नेते यांनी हे पुस्तक अवश्य जवळ बाळगावे असे आहे. शासनाकडे एखाद्या गोष्टीचा पाठपुरावा कसा करावा, याचा तर हा वस्तुपाठच आहे.

भाषेबाबतची अमुक संस्था स्वायत्त आहे असे म्हणून त्यांना अन्याय्य, असुरक्षित आणि हीन वागणूक देणे, हे मुळीच समर्थनीय नाही. ही कामे करण्यासाठी, भाषेचे पर्यावरण माहीत असलेली,वाचन-अभ्यास असलेली, संशोधनाची बुद्धी विकसित झालेली, स्वतः काही प्रकल्प सुचवू शकणारी अशी माणसे लागतात, विशेषज्ञ माणसे लागतात. त्यांना अशा अपमानास्पद परिस्थितीत काम करावे लागणे, हे क्लेषदायक आहे.

या अभ्यासकेंद्राच्या पाठपुराव्यामुळेच २०१० ला मराठी भाषाविभाग स्थापन झाला. पण त्याच निरर्थक शासकीय दृष्टिकोणातून ! अशा भाषाविभागाची रचना कशी असावी ते या अभ्यासकेंद्राने अत्यंत अभ्यासपूर्वक आणि खरोखर मराठीचा विकास झालाच पाहिजे, या तळमळीने सुचवलेले आहे. तसे ते झालेले नाही.आता त्यासाठी पाठपुरावा चालू आहे. आपल्याच राज्यात असा पाठपुरावा करावा लागणे ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे.

साहित्याचा विकास आणि भाषेचा विकास या दोन वेगळ्या गोष्टी आहेत, हे अधोरेखित करून या अभ्यासकेंद्राने ‘ राजभाषा मराठी विभाग ’ याबाबतचा प्रस्ताव मांडलेला आहे. तो खूप सविस्तरपणे, तपशीलवार मांडलेला आहे. दैनंदिन वापरातली मराठी, शिक्षण,संगणकीय मराठी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, कोशनिर्मिती, परिभाषानिर्मिती – अशा सर्व तपशीलांसह दिलेला हा प्रस्ताव मुळातून पूर्णपणे वाचण्यासारखा आहे.“ प्रगत व्यवहार क्षेत्रांत भाषेचा विकास आपोआप होत नाही, तो जाणीवपूर्वक करावा लागतो. “ – हे यातले वाक्य शासकीय स्तरावरून असणारी प्रयत्नांची, आखणीची व अंमलबजावणीची नितांत आवश्यकता व्यक्त करणारे आहे.

मराठी भाषेच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या गोष्टींना शासन फारसे महत्त्व का देत नसावे,यांबाबत फारसे गंभीर का नसावे, असा प्रश्न पडतो.कदाचित याला जबाबदार आपण सर्व मराठी भाषक लोक आहोत – आपल्यालाच याचे कवडीचे महत्त्व नसल्याने, शासन या कामाची अशी किंमत करत असावे. पण हे पूर्ण सत्य नाही. एकूण जनतेला सगळ्याच गोष्टींचे गांभीर्य कळेल असे नाही. त्यासाठीच तर जनता जाणकार, कर्तबगार नेते निवडून पाठवते.त्या नेत्यांना आपल्या जनतेच्या आणि राज्याच्या हिताबाबत दूरदृष्टी असणे अपेक्षित आहे. आपल्या राज्यात चाललेली एकूण मराठीची हेळसांड पाहता,या दूरदृष्टीचा अभावच दिसून येतो आहे.

डॉ. दीपक पवार आणि त्यांचे सहकारी मिळून ‘ मराठी अभ्यास केंद्र ‘ या, लोकांच्या देणग्यांवर चालणाऱ्या, स्वयंसेवी संस्थेमार्फत जे काम करत आहेत त्याबद्दल मराठी जनतेने कृतज्ञ तर राहायलाच हवे पण त्यांच्या कामाला पाठिंबा आणि शक्य ती मदतही द्यायला हवी. ही नोट अधिकाधिक मित्र-मैत्रिणींनी शेयर करावी आणि ती अधिकाधिक लोकांपर्यंत पोचेल, असे पाहावे, ही विनंती.

---००० ---

Tuesday, January 25, 2011 at 4:43pm •

बाकी शून्य

विश्या म्हणाला, “ ब्रम्ह म्हणजे तुझं डेथ वॉरंट, रांडेच्या. ह्या अध्यात्म, देवदेवस्कीच्या नादानं कोणाचं कधी भलं झालेलं नाही. “

मी म्हटलं, “ हे अध्यात्म नाही, तत्त्वज्ञान आहे. “

विश्या म्हणाला, “ तत्त्वज्ञानाविषयी मला एकच गोष्ट माहीत आहे. A philosopher is like a blind man in a dark room, looking for a black cat which is not there. माझ्या संदर्भग्रंथात याची नोंद आहे. आणि रांडेच्या, तत्त्वज्ञान सांगणारा मनुष्य मोठा होतो. तत्त्वज्ञान ऐकणारा आयुष्यातून उठतो. “

मग मी तत्त्वज्ञान ठेवलं आणि मराठी साहित्य वाचायला घेतलं . (कादंबरी पृष्ठ ४२१.)

--- कमलेश वालावलकर यांची ‘ बाकी शून्य ‘ ही कादंबरी अलीकडेच वाचली. मला ही एक अपवादात्मक चांगली कादंबरी वाटली.

तरुण वयातल्या जगण्याचा आवाका घेणाऱ्या ‘ वासूनाका ‘, ‘ कोसला ‘ अशा कलाकृतींचा खूप बोलबाला आहे. त्यांहून मोठी आव्हाने ही कादंबरी घेते. केवळ बुद्धीच्या अंगाने आयुष्य जगणाऱ्या एका तरुणाचे एक टोक गाठणारे हे आयुष्य आहे. इथे नुसती वर्णनात्मकता नसून या प्रक्रियेतल्या मूलभूत प्रश्नांशी झटापट आहे. जगण्याच्या एका साच्याचा ठसा देण्यापेक्षा जगणे अनेक तऱ्हांनी पाहण्याची इथली समज अद्वितीय आहे !

--- ००० ---

जुईची कविता –

‘ श्वासाचं बांधकाम ‘.

जुई कुलकर्णी हिची कविता तिच्या स्वतःच्या नावाप्रमाणेच मिताक्षरी आहे. साधीही आहे. विचार-भावनांना ती सरळ, सहज अभिव्यक्ती देते. जगण्यातली क्रियाशीलता हेच या कवितेचे मुख्य अंगद्रव्य आहे. विशेष म्हणजे जुई स्वतः चित्रकार असूनही तिची कविता खूप चित्रमय वा प्रतिमामय आहे, असे म्हणता येत नाही. नव्या कवींच्या कवितेबाबत केली जाणारी दुर्बोधतेची तक्रार जुईच्या कवितेबद्दल फारशी करता येणार नाही. तरीही ही आजचीच कविता आहे. मुख्यतः आजच्या जगण्यातला उन्मुक्तपणा, काहीसा तात्पुरतेपणा, त्यातून येणारी भावनिकतेतली घट आणि जे असेल जगणे ते आहे तसे घेण्याची तयारी आणि अकांडतांडवाची निरर्थकता समजून असणे – हे सगळे आजच्या जगण्याचे विशेष म्हणता येतात. जुइच्या कवितेचे – एका अर्थाने तिच्या जगण्याचेही – विश्व फार मोठे नाही. आधुनिक जगण्यातलेही सांगणकीय वा बाजारपेठीय असे संदर्भ तिच्या कवितेत फारसे नाहीतच. या अशा आपल्या व्यक्तिमत्वातून ही कविता एक दाखवूनच देते की जगण्याच्या प्रक्रियेला भिडण्यासाठी अंगद्रव्याची श्रीमंती लागते, असे मुळीच नाही. जुईची कविता ही आजच्या स्त्रीची कविता आहे. अभिव्यक्तीतला निर्भयपणा आणि बेधडकपणाही, ही गोष्ट अधोरेखित करतो. ही मानवी जगण्याची कविता आहे. जगण्यातले प्राथमिक प्रश्न मिटल्यावरही त्यात खूप सुखदुःखांचे पदर राहतात, मानवी प्रश्न राहतात – त्यांची ही कविता आहे. संवेदनशीलतेमुळे जुई अनुभवातल्या सूक्ष्मतेचा सहज वेध घेते. शब्दांचा क्रम, त्या विशिष्ट क्रमामुळे उमटणारी अर्थवलये आणि अचानक जणू वाक्य पूर्ण करत असल्यासारखा येणारा एखादा अनपेक्षित शब्द – हे जुईचे तंत्रकौशल्यही वेगळे आणि दाद द्यावे असे आहे. यातल्या सगळ्याच कविता उत्कृष्ट आहेत वा जुईची सगळी कुवत व्यक्त करणाऱ्या आहेत, असे नाही, पण कवितासंग्रहाची मूल्यात्मकता ही शेवटी एक उंची गाठणाऱ्या कवितांवरच केली पाहिजे. खूप सविस्तर लिहिण्याची ही जागा नव्हे, पण वाचता वाचता मला आवडलेल्या काही कविता सांगतो – बहावा (पृ ७), सत्यदर्शन (पृ ३९) आणि प्रश्न (पृ ९०) . आणखीही बऱ्याच आहेत. सध्या अनुभवाचे बारकावे आणि रूप न्याहाळण्यात गढलेली ही कविता थोड्याच काळात जगण्यातले तात्त्विक स्वरूपाचे मूलभूत प्रश्न पाहू लागली तर आश्चर्य वाटू नये. तशा खुणा या संग्रहात दिसतात. जुईचे अभिनंदन आणि शुभेच्छा !

--- ००० ---

' मन्वंतर '

(समूहाकडून स्वतःकडे) – लेखक – सुरेश द्वादशीवार (साधना प्रकाशन).

नुकतेच हे एक अद्वितीय पुस्तक वाचले. एकूणच माणसाच्या यापुढच्या जगण्याचा आवाका घेण्याचा असा प्रयत्न मराठीत आणखी कुठे झाल्याचे पाहण्यात / ऐकण्यात नाही. खूप मोठ्या सांस्कृतिक, वैचारिक बदलांची अपेक्षा साधार मांडणारे हे पुस्तक, ज्यांना कुणाला असे वैचारिक वाचन चालते, त्या सर्वांनी वाचावे असे आहे. नव्या प्रश्नांची शक्यता मान्य करूनही, आजपर्यंत आपण महत्त्वाचे समजलेले प्रश्न कसे भविष्यात संपुष्टात येणार आहेत, याचे अत्यंत मनोहारी चित्र या पुस्तकात आहे. अतिशय घट्ट वैचारिक / तार्किक बांधणी असूनही अत्यंत स्वप्नील / खुळे म्हणावे असे हे विवेचन आहे. जणू आता इथे स्वर्गच अवतरणार आहे, अशी (मुळीच न पटणारी) अचाट कल्पना, बुद्धीच्या अत्यंत कार्यक्षम वापरानेही कशी शक्य होते, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. तरीही, कोणत्या ना कोणत्या सामूहिक अधिपत्याखाली जगत राहण्याचा काळ कसा संपत आला आहे, याची या पुस्तकातली मांडणी दाद द्यावी अशीच आहे. माणसाच्या मनाची विदीर्णतेची सवय – हा एक मुद्दा वगळल्यामुळे सगळी बौद्धिक कसरत कशी भ्रामक ठरते, हे इथे पाहण्यासारखे आहे. पण, छान वाटावे, रंगून जावे असे वैचारिक स्वप्न आपल्यासमोर ठेवण्याचे अवघड काम या पुस्तकाने केलेले आहे, यासाठी सदर लेखकाचे अभिनंदन करणे उचित होईल.

--- ००० ---

‘ या रूममध्ये आलं की लाईफ सुरू होतं... ’

-- हेमंत दिवटे

‘ अभिधानंतर ’ चे संग्राह्य अंक ज्यांनी वाचले असतील त्यांना हेमंत दिवटे कोण हे सांगायची गरज नाही. त्या वेळी त्यांच्याबरोबर आपले इथले मित्र सचिन केतकरही होते. (मराठीत अशा आशयघन अंकांची गरज नाही, हा भाग वेगळा !) तर सांगायचे हे आहे की अलिकडच्या या एका महत्त्वाच्या कवीचा नवा कवितासंग्रह प्रकाशित झालेला आहे – ‘ या रूममध्ये आलं की लाईफ सुरू होतं... ’ असे त्या पुस्तकाचे नाव आहे. त्यातल्या सहज दिसतील त्या (at random) काही ओळी माहितीसाठी देतोय –

पृष्ठ ३१ –

वॉलवरची श्रद्धांजली ना आपल्याला
फॉरवर्ड करता येते ना नष्ट
सायबर स्पेसभर जमा झालाय
किरकोळ जगण्याचा खाजगी इतिहास
जो चरबीसारखा जमलाय
आणि निसटता निसटत नाहीये

पृष्ठ ४९ –

मी एक महाकाय विद्युतदाहिनी ऑन करतो

तपतपती लालबुंद वाट पाहतो व्हायची

मग कन्व्हेअर बेल्टवर एकेका

धर्माला लाइनशीर आडवं करतो

बेल्ट चालू करतो

धर्म लेंडकासारखे दाहिनीत टपटपतात

मी एकेका धर्माला राख होताना पाहतो

ओंजळभर भरलेली सगळी ॲश

कुणाच्याही नकळत अंगाला फासतो

उरलेली गटारात टाकून देतो

छान आंघोळ करतो

लिबर्टी मिळवतो

-- हा एक निराशावादी नकार आहे की शोधाची शक्यता बाळगणारा उद्रेक आहे, हे समजून घेण्यासाठी अवश्य वाचावा ,असा हा कवितासंग्रह आहे.

--- ००० ---

डॉ. तस्लिमा नासरीन यांची

' उधाण वारा '

ही अनुवादित कादंबरी (अनुवाद -- विलास गिते आणि मेहता प्रकाशन) वाचली. त्यांचे हे मी वाचलेले पहिलेच पुस्तक. या ग्रेट लेखिका आहेत. जगण्याचे असे अंतर्बाह्य भान क्वचितच दिसते. यांना मनःपूर्वक सॅल्यूट !

--- ००० ---

' आवरण '

कादंबरी, मूळ कन्नड लेखक डॉ. एस. एल. भैरप्पा, मराठी अनुवाद उमा कुलकर्णी, प्रकाशक मेहता २००९ -- वाचली. माणसाच्या जगण्यातल्या गुंतागुंतीचा आणि ॲब्सर्डिटीचाही अवाढव्य आवाका. स्तिमित व्हावे अशी कलाकृती. शेवटच्या

भागात, ही जणू एक सामाजिक समस्या असून तिचा काही योग्य वैचारिक भेद होणे आवश्यक आहे, अशा निष्कर्षाकडे लेखकही झुकू लागतो आणि एवढे प्रतिभासंपन्न आकलन आपली गहनता आणि उंची सोडून खाली येते, असे जाणवले.

--- ००० ---

गाओ झिंगझिआनची

' सोल माउंटन '

(अनुवाद -- मधू साबणे)

वाचली. उत्तम मराठीत उत्तम अनुवाद. लेखकाची परिपक्वता, अनुभव-समृद्धी, माणसाचा इतिहास आणि अनेक संस्कृतींचे जगणे-मरणे, निसर्गाची शेकडो रूपे आणि अविरत प्रवास यांबरोबरच असंख्य स्त्री-पुरुष पात्रांचे येणेजाणे यांचे सातत्य आहे पण अमुक पात्रांचे, त्यांच्या कहाणीचे सातत्य असे नाही -- अशी एक वेगळीच कादंबरी. या फॉर्मला म्हणणारे काहीही म्हणोत, पण महान वाचनाचे समाधान मिळते, हे मात्र खरे !

--- ००० ---

' द रीडर '

-- मूळ जर्मन कादंबरी -- बर्नार्ड श्लिंक, मराठी अनुवाद -- अंबिका सरकार,

वाचली. काही बाबतीत ' पटण्या ' चे प्रश्न वाटले, पण अशा कादंबरीत, जाने दो. मानसिक क्रियाप्रतिक्रियांतून जगण्यातले जे एक ' अटळपण ' (नियती) व्यक्त होते त्याला तोड नाही. अत्यंत सूक्ष्म कामाचे भरीव शिल्प !

--- ००० ---

एफबी पोस्टस २०१३ मधून –

आशयनिष्ठ समीक्षेचे मराठीतले एक अत्युच्च शिखर म्हणून माधव आचवलांचे **' जास्वंद '** हे पुस्तक जरूर वाचावे. (माझ्या मते) याला म्हणतात ' दर्जेदार समीक्षा ' ! कलाकृतीच्या अंतरंगात शिरून, तिच्या सखोल अर्थवत्तेत बुडी मारून तिची अकल्पित रहस्यरत्ने आपल्यासमोर आणून ठेवणारे असे समीक्षक विरळा ! अशी समीक्षा ज्या भाषेत असेल तिथे कलेचे भान खूपच सखोल असेल, यात शंकाच नाही ! लेखकांच्यांतलीही सुप्त सर्जनकेंद्रे जागी करण्याचे सामर्थ्य अशा समीक्षेत असते ! अशा वेळी लेखक आणि समीक्षक दोन्हीही तोलामोलाच्या सर्जक व्यक्ती असतात !

--- ००० ---

बखर एका राजाची

-- ले० त्र्यं वि सरदेशमुख.

ही कादंबरी मी आत्ता वाचली, खूप उशिरा. मराठीतले एक महत्त्वाचे म्हणावे असे काम ! एक प्रकारची फँटसीच. तो माहोल नीट उभा करणारी. त्यातला संस्थानिक राजा आणि राजस नामक एक तरुण स्त्री यांच्यात प्रेमसंबंध तयार होतात पण ते सहजपणे जगण्यात येऊ शकत नाहीत – हा एक त्यातला विषय आहे. तो तर संस्थानिक राजा आणि या राजसला कोणतेही पाश नाहीत – तरीही ते एकत्र येऊ शकत नाहीत. याचे कारण सध्याची राणी दमयंती – तिचे राग, संताप, मत्सर, कारस्थाने आणि अर्थातच नीतीच्या प्रस्थापित कल्पना – ही सगळी आहेत, हे जाणवते. समजा हीच एक घेतली समस्या – तर ही स्त्री-मुक्तीची समस्या म्हणावी की पुरुष-मुक्तीची ? कारण विवाहानंतर दुसऱ्या ठिकाणी प्रेम निर्माण होणे – विशेषतः आजच्या जगात – सहज शक्य आहे. याला न्यायाचे, योग्य आणि तिन्ही संबंधित व्यक्तींना समाधानकारक असे उत्तर असू शकते
का ? आणि असू शकत नसेल तर ही समस्या सुटूच शकत नाही – जगण्यातले काही प्रश्न कोणत्याही तथाकथित मानवतावादी विचारानेही सोडवता येऊ शकत नाहीत, असे म्हणावे का ?

--- ००० ---

सुचरिताचा ' **हृदयार्त** ' हा कवितासंग्रह वाचतो आहे, त्यातली मला आवडलेली एक कविता ः--

प्रश्न तू नसण्याचा नसतो
नको ती असण्याचा असतो
एकांत परवडला पण
गर्दी असह्य होण्याचा असतो

प्रश्न दुराव्याचा नसतो
का ? कसे ? कधी ? कुठे ... असा असतो.
प्रश्न प्रश्नांचा नसतो
न मिळणाऱ्या उत्तरांचा असतो.

--- ००० ---

' रस-अनौरस ' सारखी भारी कादंबरी लिहिणाऱ्या राजन खान यांचीच **' एक लेखक खर्च झाला '** ही कादंबरी वाचली. राजन खान हे सिद्धहस्त लेखक आहेत यात वादच नाही. एका मराठी लेखकाच्या कौटुंबिक जीवनावर फोकस असलेली, असंख्य बारकाव्यांनी भरलेली ही कादंबरी कुणा ऐरागैऱ्याला लिहिता आलीच नसती. मुळात मुद्रितशोधक असलेला एक माणूस लेखक होतो आणि हळूहळू ' मोठा ' लेखक होतो आणि शेवटी त्याचा करुण अंत कसा होतो, याची ही कथा आहे. मुख्यतः त्या लेखकाचे कौटुंबिक जीवन चितारणारी. यात दोन प्रश्न अस्पर्शित राहिले आहेत. एक -- या लेखकाचे त्याच्या लेखनातले अनुभवविश्व कोणते होते आणि दोन तो जर मोठा लेखक झाला तर त्याच्या चिंतनाचे स्वरूप काय होते आणि समीक्षक त्याच्याबद्दल काय म्हणत होते. त्याचे चितारलेले जीवन पाहता, हे कोणत्याही एखाद्या कारकुनाचे वा मुनीमजीचे जीवन असू शकेल, असे वाटते. त्या लेखकाच्या मनाच्या कोनातूनही इथे लिहिले जाते तर त्या लेखकाच्या लेखनाचे स्वरूप का झाकून ठेवले जाते ? त्या लेखकाची चिंतनशीलता -- जी काय असेल ती -- दिसली असती तर ही कादंबरी खूपच उंचीवर गेली असती. सध्या मात्र, हा ' मोठा ' लेखक झाला असे कादंबरीत सांगितले की आपण मान डोलवायची, असे होते. त्यामुळे, एका सिद्धहस्त लेखकाची फसलेली कादंबरी, असे इथे थोडक्यात म्हणावे लागते.

--- ००० ---

चिं त्र्यं खानोलकर यांचा **' राखी पाखरू '** हा कथासंग्रह वाचला. मला त्या कथा कालबाह्य वाटल्या नाहीत. आणि सध्याच्या तथाकथित वेगाने बदलणाऱ्या वास्तवाच्या संदर्भातही अप्रस्तुत वाटल्या नाहीत.

--- ००० ---

पाउलो कोएलो ची **' एलेव्हन मिनिटस '** ही अनुवादित कादंबरी वाचली ! ग्रेट काम ! शिवाय ' माहिती कम ' लोकांसाठी लैंगिक शिक्षण म्हणूनही उपयुक्त !

ना. मा. निराळे (कथा)

लेखक – सतीश तांबे.

ही एक अद्वितीय महत्त्वाची, बहुआयामी कथा आहे. साधी, कुणालाही कळेल अशी ' कथा ' असलेली ही एक कथा आहे. तरीही ही नुसतीच एक कथा राहात नाही. वाचक साधा, सहज म्हणून वाचणारा असो की एखादा समीक्षक असो, मानवी जगण्याचे अनपेक्षित दर्शन तर त्याला घडेलच पण तो थोडा अधिक संवेदनशील असेल आणि मानवी जगण्याबाबत काही स्वतःचे चिंतन मनात आले तरी चालेल, असा असेल तर निश्चितपणे जगण्यातल्या अनेक प्रश्नांचे भान वाढवेल, अशी ही कथा आहे.

अलिकडेच इथे फेसबुकवर एक पोस्ट फिरत होती जीत ‘ माणसाला खरोखर विचारस्वातंत्र्य असते का ‘ या विषयावरच्या शास्त्रीय संशोधनाची माहिती होती. या कथेतही अनुषंगाने हा विषय आहे. जगण्याच्या ओघात माणसे आस्तिक वा नास्तिक असे साचे स्वीकारत जातात पण जगणे सगळ्यांचे साधारणतः तसेच सुखदुःखयुक्त असते – हे भान ही कथा देते. दुसरा एक खूप महत्वाचा प्रश्न या कथेमुळे पुन्हा समोर येतो – तो म्हणजे – हे सगळे नियतिबद्ध आहे का – हा. कुण्या एका गावात कधी काळी एक रोगाची साथ पसरणे, एकाने कुठेतरी कर्जाचा दुरुपयोग केलेला असल्याने त्याच्यावर आलेल्या संकटातून कुणी त्याला सोडवलेले असणे आणि श्री. आस्तिक यांच्या जावयाने आत्महत्या करणे – या अर्थाअर्थी काहीही संबंध नसलेल्या गोष्टी / घटना एकमेकींशी अभेद्यपणे एकमेकींत गुंतलेल्या -- एकत्र असल्याचे इथे जाणवते ! जरा विचार करता ही कथा असे सुचवते की हे विश्व पूर्णपणे एकत्र जगते आहे – सगळ्याच गोष्टी एकमेकींवर अवलंबून आणि एकमेकींमुळे आहेत – स्वतंत्र / अलग असे काहीच नाही. हे भान आल्यास नियतीचा मुद्दा निकालातच निघतो ! एकरेषीय घटनाक्रम ही जगण्याची कल्पनाच खोटी पडते ! अमुक अमुक माणसे अशी अशी का वागतात याची तात्कालिक कारणेही ही कथा निवेदन करत जाते आणि त्याच वेळी हे सगळे त्या व्यापक पटातले, स्वतंत्र/अलग अस्तित्व नसलेले असे आहे, याचे भानही ही कथा देत जाते.

एखाद्या विचारसरणीचे महत्त्व मांडणे, एखादी भूमिका अभिव्यक्त करणे, अमुक अशा प्रकारचे परिवर्तन अपेक्षिणे – असले काहीही ही कथा करत नाही. तिचा आवाका त्याहून खूपच मोठा आहे. जगण्याच्या समग्रतेचे भान देणे – हे कलेचे अत्यंत मौल्यवान काम ही कथा करते.

कोणताही तात्विक/ आध्यात्मिक आव न आणता साधेपणाने केलेल्या निवेदनातून ही कथा अशी अत्युच्च उंची गाठते. या कथेच्या अनेक भागांवर विश्लेषणात्मक लिहायचे तर खूपच लिहावे लागेल. कुणी समीक्षक अर्थातच माझ्यापेक्षा खूपच बारकाईने आणि संपन्नतेने ते करू शकेल. मला या कथेने, एका अत्युच्च दर्जाच्या कलाकृतीच्या संपर्कात आल्याचे समाधान लाभले, हे मी सांगू शकतो. सतीश तांब्यांची आणि माझी प्रत्यक्ष भेट अजून झालेली नसली तरी ते माझे एक उत्तम मित्र आहेत. परंतु, हा प्रतिसाद एका मित्राने दुसऱ्या मित्राला दिलेला नसून – कलेच्या माध्यमातून जगणे समजून घेण्याची साधना करणाऱ्या एका साधकाने दुसऱ्या साधकाला दिलेला प्रतिसाद आहे. आपल्या सर्वांच्या या मित्राची ही ग्रेट कामगिरी सर्वांनी जरूर वाचावी, असे मी म्हणेन !

--- ००० ---

एफबी पोस्ट २०१४ मधून --

चंद्रकांत पाटील यांनी सांगितलेली अस्सल कवितेची लक्षणे --

“ कविता जगण्यातील सूक्ष्म आणि गुंतागुंतीच्या अनुभवांवर आधारित पाहिजे. तिचा गाभा भावात्मक आणि ज्ञानात्मकही पाहिजे. कविता अतःप्रेरणेतून आली पाहिजे. कवितेने व्यक्तीकडून समष्टीकडे, खाजगीपणातून सार्वजनिकतेकडे, जगण्यातून जीवनाकडे जाताना विचार, चिंतन, आधिभौतिकता, तात्त्विकता यांचा आश्रय घेतला पाहिजे. कवितेने माणूस

आणि अचेतन, माणूस आणि निसर्ग, माणूस आणि जीवसृष्टी, माणूस आणि माणूस यांच्यांतील व्यामिश्र नात्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कवितेने भाषेच्या अतःस्तराचा वेध घेतला पाहिजे. कवितेच्या भाषेने विस्मित केले पाहिजे. कवितेतील शब्द संघटन व रचना अकल्पनीय असली पाहिजे. कवितेतील सूचकतेने आणि संदिग्धतेने वाचकांच्या कल्पनाशक्तीला आवाहन केले पाहिजे. कवितेचा सुरुवातीपासून शेवटपर्यंतचा प्रवास अनुमान करता येण्यासारखा असू नये. " – ' प्रिय रसिक ' – मे २०१४.

--- ००० ---

एफबी पोस्ट २०१५ मधून –

रवी लाखे -- यांनी केलेला आल्बेर कामूच्या ' **कॅलिगुला** ' या नाटकाचा उत्तम अनुवाद वाचला ! याला म्हणतात महानाट्य ! माणसाच्या मनाच्या क्षेत्रातले मानलेले सगळेच भलेबुरे उलटेपालटे करून पाहणारे नाटक ! माणसाच्या जगण्यावर सहज स्वार होणारा लेखकच असे नाटक लिहू शकतो ! (मूळ नाटक मी वाचलेले नाही -- ते नेटवर फ्री उपलब्ध आहे -- आता वाचेन.) लाख्यांनी केलेले हे एक मौलिक काम आहे -- कुणा प्रकाशकाने जमल्यास याचे पुस्तक प्रकाशित करावे.

--- ००० ---

अभिरुची रमेश ज्ञातेच्या कविता

भूतकाळातल्या वा स्वप्नांतल्या सत्यांच्या वर्तमानात पडणाऱ्या सावल्यांकडे ' पाहणे ' म्हणजे या कविता. त्यामुळे, या कवितांत ' सावली ' ही प्रतिमा अनेकदा येते. आशयाची ही सूक्ष्मता आणि त्याचे सर्वांगीण अवधान ही अभिरुचीच्या कवितेची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. तिच्या कवितेची ही रहस्ये व्यक्त करणारी या संग्रहातली ' जोगवा ' ही कविता या दृष्टीने अनेकदा वाचावी अशी आहे. अभिरुचीची कविता ही एक वेगळी कविता आहे – ना स्त्रीवादी, ना विद्रोही, ना कसला न्याय मागणारी, ना कसली तक्रार करणारी, ना नुसतेच आत्मकेंद्री अनुभव मांडणारी. एका स्त्रीमनाच्या जगण्याच्या या सूक्ष्म आणि संवेदनशील अवस्थांचे हे पूर्ण व्यक्त होणे आहे. काळाची गूढे समजून घेण्याच्या कृती हेही या कवितेत मधून मधून घडत राहते कारण तिच्या ' असण्या ' चीच ती मागणी आहे. या कविता म्हणजे सावल्या असल्याची जाणीव असल्याने, ते क्षण पूर्णत्वाने व्यक्त होत असले तरी त्यांत या क्षणीचे तडक गुंतणे नाहीय. त्यामुळे, या कवितांना एक तटस्थतेचेही परिमाण लाभते. या एक प्रकारच्या आध्यात्मिक, तत्त्वज्ञानात्मक दृष्टीमुळे कविता साधी राहते. इथे खूप प्रतिमांची रेलचेल वा श्रीमंती येत नाही. कलात्मकतेचेही प्रदर्शन नाही. अनुभवांच्या या ' पाहण्या ' तच एक अर्थसमृद्धी आहे. अशा प्रकारच्या या, प्रेम, मीलन आणि विरह यांच्याच पण वेगळ्या कविता आहेत. ' सामाजिक बांधिलकी ' वा ' राजकीय भूमिका ' यांची मूल्यात्मक मागणी असणारे कदाचित या कवितेला शून्य गुण देऊन नापास करतील, पण,

कोणत्याही अटीशिवाय जगण्याकडे पाहणे हे सांस्कृतिक प्रवाहाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असते, हे दुर्लक्षिता येणार नाही. त्या दृष्टीने मराठीतली ही महत्त्वाची कविता आहे. यातल्या सगळ्याच कविता या, या सर्व वैशिष्ट्यांनी युक्त आहेत असे नाही. काही कविता नीट जमलेल्या नाहीत, काहींत अभिव्यक्तीतला कच्चेपणाही दिसतो, पण, महत्त्व जोखायचे ते जमलेल्या कावितांतून – अभिव्यक्तीच्या प्रक्रियेतली स्मूथ परिपक्वता जिथे दिसते त्या कवितांवरून. इथे कवितांची उदधृते देत या कवितांचे सविस्तर परीक्षण करण्याचा हेतू नाही. मला जाणवलेली त्यांची काही वैशिष्ट्ये सांगावीत आणि या कविता समजून घेण्याच्या मला दिसणाऱ्या शक्यता सुचवाव्यात, इतकाच हेतू आहे. या कवितांच्या अर्थसंपृक्ततेची दोन उदाहरणे देऊन थांबतो –

आता मी आश्वासकपणे पाहत राहते
कधी अतृप्त राहूच न शकणाऱ्या
आणि वेगात भूतकाळ बनू पाहणाऱ्या
माझ्या वर्तमान संदर्भांच्या दिंडीकडे...
आता आयुष्यात येणारा भूतकाळ
कधीच छळणार नाही मला
माझ्या मानेत आपली धारदार हिंस्र नखं खोचत... (' स्वत्व ' -- पृ ५७)
(यात ‘ येणारा भूतकाळ ‘ ही कल्पना बघा !)
तसेच –
मुद्दाम जपायच्या नाहीत म्हणून मोडीत काढलेल्या वस्तूंसारखी
मी देखील नाहीशी झाले... (' शिशिर ' -- पृ १८)

उदाहरणांदाखल मला आवडलेल्या काही कविता म्हणजे –
जगणे, जाणिवा, ओवी, थेंब, क्षण आणि प्रारब्ध. या सहज सापडल्या त्या दिल्या आहेत.
माझ्या मते हा एक वेगळा, महत्त्वाचा कवितासंग्रह आहे. गमभन प्रकाशन आणि राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांचे या प्रकाशनाबद्दल अभिनंदन !
--- ००० ---

' परिवर्तनाचा वाटसरू डिसे १ ते १५ ' हा पूर्ण अंकच मला उत्तम वाटला. काही बाबींतींत आधी पोस्ट दिल्या आहेत. याच अंकात ' पॉर्न-चर्चा ' या शीर्षकाखाली दोन लेख आहेत -- गोपाळ आजगावकर आणि आनंद करंदीकर यांचे. आपण बरेचजण या विषयाकडे फारसे लक्ष देत नाही, या पार्श्वभूमीवर तर हे लेख खूपच महत्त्वाचे वाटले.

नुकतेच एक अत्यंत महत्त्वाचे पुस्तक वाचले. मराठीतले हे अशा प्रकारचे पहिलेच पुस्तक आहे. सर्व शाळांमध्ये असायलाच हवे, असे हे पुस्तक आहे –

‘ नाट्य आणि शालेय अध्यापन ‘

लेखिका – प्रेमा साखरदांडे आणि संपादन – गिरीश पतके. Girish Patke.

शालेय अभ्यासक्रमात नाट्यशिक्षणाचे स्थान, त्याचे महत्त्व, त्याचे उपयोग आणि पिढ्या घडवण्यात असू शकणारा त्याचा दीर्घकालीन सहभाग – असा व्यापक विषय हे पुस्तक हाताळते. पुस्तकाच्या ज्या लेखिका आहेत त्यांना शिक्षण क्षेत्रातला आणि नाट्यक्षेत्रातला प्रदीर्घ अनुभव आहे. तो अनुभव, त्यांचे स्वतःचे चिंतन आणि त्यांनी चिकाटीने आणि आवडीने केलेला या विषयाचा सखोल अभ्यास या सर्वांचे हे फलित आहे. (त्यांनी माझ्या ‘ ढोलताशे ‘ या नाटकात, म्हटले तर नायकाच्या विरोधातली अशी, एक केंद्रवर्ती भूमिका केलेली होती.) नाट्य म्हणजे आपण समजतो तसे रंगभूमीवरचे नाटक एवढ्या मर्यादित अर्थाने त्या या विषयाकडे पाहात नाहीत. मुलांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने नाट्याचे किती असंख्य प्रकार महत्त्वाचे असतात, ते त्या समजावून देतात.

शाळेतले नाटक बसवणे आपण अनुभवलेले वा पाहिलेले असते. ते बसवणाऱ्या शिक्षक-शिक्षिकाही या गोष्टीकडे विशेष गांभीर्याने पाहात नाहीत. हालचाली हव्यात म्हणून हालचाली दिल्या जातात – त्या, चाललेले संवाद वा प्रसंग यांना सुसंगत असायची गरज लक्षातच घेतली जात नाही. ही अवस्था हे पुस्तक समूळ बदलू शकते. या पुस्तकाच्या वाचनाने शाळेतल्या सांस्कृतिक कृती अधिक समृद्ध तर होतीलच पण अधिक आनंददायक, अधिक सर्जक आणि अधिक उपयुक्तही ठरू शकतील.

भीती जाणे, सांघिक भावनेचे महत्त्व कळणे, मूल्यशिक्षण होणे आणि एकाग्रपणे आपली कामे करता येणे – या सगळ्या गोष्टी या नाट्यशिक्षणाने कशा साध्य होऊ शकतात. याचे खूप तपशीलवार विवरण या पुस्तकात आहे. अभिनय, भाषा आणि संवादफेक यांची सविस्तर चर्चा हे पुस्तक करते. हे सगळे टप्पाटप्प्याने कसे शिकवावे, त्यासाठी व्यायाम कोणते घ्यावे, हळूहळू नाटकाच्या सखोल सादरीकरणाची मुलांना कशी कल्पना देत जावे, हेही यात आहे.

पुस्तकाच्या मलपृष्ठावर सुलभा देशपांडे यांची शिफारस आहे. हे पुस्तक, विशेष म्हणजे, प्रख्यात ‘ आविष्कार ‘ या नाट्यसंस्थेने प्रकाशित केलेले आहे.

नुसत्या शाळाच नव्हे तर नाट्यक्षेत्रात काहीही काम करण्याची इच्छा असणाऱ्या कुणालाही हे पुस्तक मार्गदर्शक ठरू शकेल. असे अद्वितीय पुस्तक मराठीत सादर केल्याबद्दल या सर्वांचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे !

--- ००० ---

प्रशान्त बागड यांचा

‘ विवादे विषादे प्रमादे प्रवासे ‘

हा कथासंग्रह वाचला. वाचायला सुरुवात करताच हे जाणवले की लेखकाने त्याच्या जगण्याच्या आकलनाला सुसंगत असा कथेचा वेगळाच घाट आणि एक वेगळीच अनपेक्षित शैली शोधलेली आहे. या लेखकाचे हे मराठीतले एक मोठे योगदान आहे. उगीचच वेगळे काही करायचे म्हणून हे केलेले नाही (तसे जमणे अवघडच असते) तर एका तात्त्विक आवाक्यातून हे आपोआप घडून आलेले आहे. या घाटाची आणि शैलीची वैशिष्ट्ये पाहू. मुळात या कथा एखाद्या नायक-नायिकेच्या वा एखाद्या प्रमुख पात्राच्या अशा नाहीत. त्यांत कारण-परिणामस्वरूप घटनांची साखळी (लिंक) महत्वाची नाही. पात्रे, वस्तू, घटना, आठवणी, इच्छा, पात्रांचे वा निवेदकाचे विचार, निसर्गातले वा इतर अनेक तपशील, अशा असंख्य गोष्टींची ही कथा असते. हे सगळे एकत्र असते – काहीच बिनमहत्त्वाचे नसते. एक प्रकारे हा समग्रतेचा आवाका असतो – नुसत्याच मानवी क्रिया-प्रतिक्रियांचा नव्हे. त्यामुळे, अमुक एक कथा इथे का सुरू झाली आणि तिथे का संपली याचा शोध घेण्यात अर्थ नसतो. यांत कथा म्हणजे काय, नायक म्हणजे काय, आशय म्हणजे काय, गाभा म्हणजे काय – अशा विषयांवरही मजकूर येतो. कारण लेखकाला त्याच्या आकलनसंगत असणाऱ्या त्याच्या शैलीच्या नवेपणाचे भान आहे. भूतकाळाचा परिणाम सांगणे वा पुढे काय होणार याची उत्सुकता बाळगणे – यांत या कथांना रसच नाही. या वर्तमानकेंद्री कथा आहेत. अशा या अनवट, विचित्र लेखनपद्धतीतून सतत जगण्यातल्या निरर्थकतेची जाणीव होत राहते. पण, ही निरर्थकता निराशावादी नसून फक्त बौद्धिक अर्थाचा अभाव सुचवणारी वाटते. सर्वच कथांत बागडांच्या या मर्मदृष्टीचा प्रत्यय येतो. पण, काही ठिकाणी बागड या शैली-नावीन्याच्या प्रेमाला बळी पडतात असे वाटते. अशा वेळी ते सगळे रुक्ष, चोथा तपशील वाटू लागतात. अशा लेखनपद्धतीत जान टिकून राहण्यासाठी लेखकाला सतत अलिप्त राहणे भाग आहे. मुळात, या प्रकारच्या लेखनाला वाचक धीराचा लागणार – हे ओळखून, खरे तर, बागडांनी त्याला हुसकावून लावणारी शीर्षके देऊ नयेत, असे वाटते. या संग्रहातली ‘ गढी ‘ ही कथा मला विशेष आवडली. संग्रहाचे नाव तेच दिले असते तर बरे झाले असते. या प्रकारच्या लेखनाला एका असिधारा भानाची आवश्यकता आहे – जरा इकडे-तिकडे झाले की त्या लेखनाची वाट लागण्याचा धोका असणार. मी काही इथे या संग्रहाचे परीक्षण करत नाहीय. मराठीतला हा एक वेगळाच ताकदवर कथाकार वाचल्यामुळे त्याची वैशिष्ट्ये इथल्या फ्रेंडसना सांगावीत, इतकाच उद्देश आहे. या कथा कशा वाचायला हव्यात याचा थोडा निर्देश व्हावा, हाही हेतू आहे. कथेचे क्षेत्र खूपच विस्तारून देणारा, लेखनातल्या स्वातंत्र्याची वेगळी क्षितिजे दाखवणारा असा हा कथासंग्रह आहे. छान वाटले !

--- ००० ---

स्त्रीमुक्ती

Rangnath Pathare – रंगनाथ पठारे यांचे **‘ नामुश्कीचे स्वगत ’** हे पुस्तक वाचायच्या राहिलेल्या इच्छित पुस्तकांच्या यादीत होते. ते सध्या वाचतो आहे. ओळीने वाचत चाललो आहे. ‘ नामुश्की ’ हा कॉमन थीम – आशय – असलेले हे अनेक लेख आहेत. पठाऱ्यांची संपन्न बहुश्रुतता, विस्तृत अनुभव आणि असंख्य निरीक्षणे यांनी युक्त असे हे लेख आहेत. निम्मे पुस्तक झाले आहे वाचून. त्यातला ‘ स्त्रीमुक्ती ’ हा लेख मला अत्यंत इंटरेस्टिंग आणि महत्त्वाचा वाटला. एक कनिष्ठ मध्यमवर्गीय कुटुंब, पतिपत्नींचे एकमेकांवर प्रेम, पत्नीला नवऱ्याच्या स्वामित्वभावनेचा अडथळाच नसणे आणि तिच्या स्वभावाला अनुसरून तिने बाहेर अनेकांशी संग करत राहणे, नवऱ्यासमोरही इतर पुरुषांना तिच्याशी प्रेमाच्या हक्काने बोलू-वागू देणे आणि शेवटी मुले नवऱ्याकडे सोडून कुणाबरोबर तरी निघून जाणे – अशा हकीगतीवर हा लेख आहे. निवेदक शेवटी त्या नवऱ्याला ' नेभळट ' म्हणतो. स्त्रीमुक्ती-विचारातल्या अनेक मुद्यांमध्ये लैंगिक स्वातंत्र्य आणि स्वामित्व हक्क हे मुद्देही येतात. या लेखावर पूर्वी कुठे काही चर्चा झाली होती की नाही, ते मला माहीत नाही, पण, यावर चर्चा व्हायला हवी, असा हा लेख आहे. निवेदक त्या नवऱ्याला नेभळट म्हणतो कारण तो हे सगळे प्रेमामुळे चालवून घेत असला तरीही, त्याचा मानसिक मार खातच चालवून घेतो आहे – जे त्याच्या, ती सोडून गेल्यानंतरच्या अवस्थेवरून दिसून येते. याचा अर्थ, एक तर हे नाते नेभळट किंवा स्वामित्व हक्काने जखडलेले, असेच असणार ! दोन अण्वस्त्रधारी राष्ट्रे जशी एकमेकांशी गुण्यागोविंदाने राहतात, तसेच म्हणायचे हे ! एकमेकांच्या भीतीने नॉर्मल असणे ! यातून येणारा, जगभरच्या साहित्यातून व्यक्त झालेला चोरटेपणा संभाळत ! हा स्त्रीमुक्तीचा प्रश्न आहे की मालकी हक्काचा की मानापमानाचा ? या नात्यातल्या प्रतारणेची आणि हिंसेची शक्यता नष्ट होऊ शकेल का ? एकूणात, आदर्श नाते कसे असायला हवे ?

--- ००० ---

' अक्षरवाङ्मय ' च्या एप्रिल-जून'१५ या अंकात सआदत हसन मंटो यांच्या **' टोबा टेकसिंह '** या कथेचा डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे यांनी केलेला अनुवाद आलेला आहे. कथा चांगलीच आहे, पण, विशेषतः तिची सुरुवात मला खूपच अर्थपूर्ण वाटली. ती सुरुवात अशी आहे --

फाळणीनंतर दोन-तीन वर्षांनी पाकिस्तान आणि हिंदुस्तान सरकारच्या लक्षात आलं की साधारण कैद्यांप्रमाणे वेड्यांचीसुद्धा अदलाबदल व्हायला हवी. म्हणजे जे मुसलमान वेडे हिंदुस्तानच्या वेड्यांच्या हॉस्पिटलमध्ये आहेत त्यांना पाकिस्तानला पोहोचवायचं आणि जे हिंदू आणि शीख पाकिस्तानातल्या वेड्यांच्या हॉस्पिटलमध्ये आहेत त्यांना हिंदुस्तानच्या ताब्यात द्यायचं.

--- ००० ---

विजया मेहतांचे

' झिम्मा '

वाचले. उशिराच वाचले, हे मान्य. इतक्या विविध प्रकारची आणि त्यातली बरीचशी जागतिक परिमाणेही असलेली अनेक कामे पेललेली दुसरी दिग्दर्शक व्यक्ती मराठीत नाही. विजयाबाई या मराठी नाट्यक्षेत्रात दिग्दर्शिका आणि अभिनेत्री म्हणून अद्वितीय आहेत, यात शंकाच नाही. अशा दिग्दर्शिकेचे चारशेहून अधिक पानांचे पुस्तक वाचताना मला मुख्य उत्सुकता होती ती, नाटकाचा आशय त्या कसा समजून घेत आणि नाट्यमाध्यमातून तो कसा मांडत -- याबद्दलची त्यांची प्रक्रिया कशी होती, याची. त्या बाबतीत या पुस्तकाने निराशा केली. उदाहरणार्थ, ' एक शून्य बाजीराव ', ' अजब न्याय वर्तुळाचा ', वा ' मुद्राराक्षस ' – या त्यांच्या महत्त्वाच्या निर्मिती घ्या. त्यांनी घेतलेले बरेच कष्ट दिसतात पण त्या निर्मितिप्रक्रियेबद्दल फारसे बोलत नाहीत. सत्याभास निर्माण करत सुखदुःखाचे प्रसंग उभे करणे – एवढीच त्यांची दिग्दर्शकीय दृष्टी इथे व्यक्त होते. त्यांनी केलेले लोकमान्य (म्हणजे व्यावसायिक) रंगभूमीवरचे काम करायला अशी दृष्टी नुसती पुरेशीच नव्हे तर खूप प्रभावीही ठरू शकते, पण सर्जक दिग्दर्शक म्हणजे एवढेच असते ? जादुई क्षण, असत्यातून सत्य – असे शब्द त्या वापरतात पण म्हणजे काय, हे सांगत नाहीत. पात्रे शोधणे, सापडणे – अशा बाबतींतले त्यांचे विवेचन हे सुखदुःखे उभी करणे अशाच मर्यादेतले दिसते. नाट्यक्षेत्रातले त्यांचे एकूण यश दिपून जावे असेच आहे, तो प्रश्न नाही. पण, तो भव्य, चरित्रात्मक भाग जरा बाजूला ठेवला तर कोणत्याही रंगकर्मीला, त्यांचे खास म्हणावे असे, कोणते चिंतन या पुस्तकात सापडेल ? नुसत्या चरित्रात्मक वा नाट्यैटीहासिक घटना जरूर सांगा – अभ्यासकांना त्या उपयोगीही पडतील – पण, एकमेवाद्वितीय अशा मराठी दिग्दर्शिकेने तिचे नाटकाबद्दलचे, त्या माध्यमाच्या प्रक्रियेबद्दलचे कोणते चिंतन, कुणासाठीही, मुख्यतः पुढील पिढीसाठी, या पुस्तकातून दिले आहे ? – माझ्या दृष्टीने या प्रश्नाचे उत्तर निराशाजनक आहे.

Champra Deshpande updated his status.

विजया मेहता यांनी भूमिका केलेले कानेटकरांचे ' अखेरचा सवाल ' हे नाटक पाहिल्यावर आलेली खानोलकरांची प्रतिक्रिया -- " काय गं बयो ! किती अश्लील गं तुझं हे नाटक. प्रेक्षकांच्या डोळ्यांत बोटं खुपसायची आणि म्हणायचं, रडा लेको. रडण्यासाठी आम्ही हे नाटक करतो आहोत !! "

' झिम्मा ' -- विजया मेहता -- पृष्ठ २४५.

--- ००० ---

माझा मित्र मधू साबणे (कथा-कादंबरी-ललित लेख यांचा लेखक) याने मला दोन पुस्तके वाचायला दिली. त्या पुस्तकांबद्दल --

१ **स्वतःला फालतू समजण्याची गोष्ट** – कादंबरी – ले – अवधूत डोंगरे.

गोष्टीची सलगता नसलेली पण आशयाची सलगता असलेली नावीन्यपूर्ण फॉर्ममधली एक वेगळी कादंबरी. मूल्यांची तरतमता हरवणे, त्यांच्यांत विस्कळितपणा आणि निरर्थकता येणे, प्रत्येक व्यक्तीच्या जगण्याचा पाया ढिसाळ असणे, निसर्ग आणि माणूस यांचे अगम्य मिश्रण होत राहणे, सगळी समर्थने फुटकळ वाटणे, व्यक्तिगत-स्थानिक-जागतिक सगळे एकच आणि एकाच क्षुद्रतेचे होणे, जगणे वा आत्महत्या करणे हे दोन्ही निरर्थक असणे, आदर्श मातीत जाणे – अशा असंख्य वस्तुस्थितींचे जग ही कादंबरी फक्त ९२ पानांत उभे करते. कोणताही संदेश वा प्रचार नाही वा कुणाला कार्यप्रवृत्त करायचा हेतू नाही. हे भान नाकारता येण्यासारखे नाहीय – हे सहज शब्दाशब्दांतून प्रवाहीपणे जाणवतेय – म्हणजेच हा कलाकृतीसाठी घेतलेला मुखवटा नाहीय. खूप दिवसांनी एक चांगली, खरी, ताजी, वेगळी कादंबरी वाचायला मिळाली. मला ही कादंबरी आवडली, महत्त्वाची वाटली.

२ **प्रत्यय आणि व्यत्यय** – एक संवाद – दिलीप पुरुषोत्तम चित्रे आणि रंगनाथ पठारे.

रंगनाथ पठारे यांचे लेखन या विषयावरचा हा संवाद आहे. दोन मातब्बर मने साहित्यकृतींना कशी भिडतात, किती तऱ्हांनी तींवर बोलतात हे पाहणे खूपच उद्बोधक आहे. गुणदोषांची खुली चर्चा आहे – प्रांजळपणाने युक्त. ज्यांना साहित्यप्रांतात खेळायचे आहे त्यांनी हे पुस्तक जरूर वाचावे. गंभीरपणे – सर्जकतेने लिहिणे म्हणजे काय, याचा अंदाज येईल. साहित्यकृतीकडे गंभीरपणे पाहणे, मराठीच्या एकूण परिप्रेक्षात तिच्या वैशिष्ट्यांची चर्चा करणे – हे विशेष गुण या पुस्तकात आहेत. चित्र्यांनी उपस्थित केलेले प्रश्न आणि सादर केलेले काही विलक्षण अन्वय आणि त्यांना आलेला पठाऱ्यांचा तसाच प्रगल्भ प्रतिसाद हे मुळातून वाचलेच पाहिजे असे आहे. या पुस्तकाच्या वाचनामुळे पठाऱ्यांची ' नामुष्कीचे स्वगत ' ही कादंबरी वाचलीच पाहिजे, असे मी ठरवले आहे. मेंदूला जरा कामाला लावून तल्लख करायलाही हे पुस्तक चांगले आहे. दर्जेदार संवाद ! मला आवडले !

--- ००० ---

चैताली आहेरच्या

' विंझोळ '

या कवितासंग्रहाचे प्रकाशन -- दिनांक – २८-०१-१५.

(विंझोळ म्हणजे मानसिक अस्वस्थता, गोंधळ, काहूर, कल्लोळ -- हा चैतालीने लिहिता लिहिता उत्स्फूर्तपणे निर्मिलेला शब्द आहे. शब्दकोशात शोधू नये.)

वरील समारंभात अध्यक्ष म्हणून मी सहभागी होतो. चैतालीच्या कविता मी गेला बराच काळ फेसबुकवर वाचत होतो – या निमित्ताने तिच्या कविता एकत्रितपणे वाचता आल्या. या नक्कीच वेगळ्या, सशक्त, सकस कविता आहेत. काल माझ्या भाषणात मी जे सांगितले तेच इथे, सर्व फ्रेंडससाठी देत आहे.
तिच्या कवितेवर कुणाचाही प्रभाव जाणवत नाही – ही तिची स्वतःची कविता आहे. स्त्रियांचे काही स्त्रीविशिष्ट विषय पाहून ‘ स्त्रियांचे लेखन ’ अशा विभागाची काहीजण आखणी करतात. चैतालीची कविता अशी स्त्रीविशिष्ट कविता नाही. तिचे कविताविषय हे कोणत्याही माणसाचे असू शकतात. पुढचा कप्पा म्हणजे स्त्रीवादी कवितेचा. स्त्रियांवरील अन्यायाला वाचा फोडत, न्यायाची, समानतेची मागणी करणारी कविता. ही कविता त्याही कप्प्यात बसणारी नाही. चैतालीच्या जगण्यात सामाजिक बांधिलकी आहे – ती इमारतींच्या साईटसवरील मजुरांच्या मुलांसाठी ‘ अक्षरपाऊल ’ या एनजीओ तर्फे चालवल्या जाणाऱ्या शाळांचे काम करते. पण या कवितांवर सामाजिक बांधिलकीचा वा चळवळीचा वा अमुक प्रकारच्या परिवर्तनवादाचाही शिक्का मारता येणार नाही. कोणत्याही व्यक्तिजीवनाचे मूलभूत प्रश्न पाहणारी ही कविता आहे. प्रतिमा, शैली साधी आहे – मुद्दाम समकालीनतेचा आव आणण्यासाठी संगणक, हँग, हॅक, व्हायरस – अशी शब्दयोजना नाही. निवेदनाच्या भाषेत ही कविता कळणार नाही. ही संवेदनांची आणि जाणिवांची भाषा आहे. ही कविता दुःख, वेदना, एकाकीपणा यांना मानसिक अवस्था म्हणून पाहते. दुःखातून वा एकाकीपणातून येणारी किंवा स्वतःचा एकाकीपणा वा मूडस व्यक्त करणारी अशी ही कविता नाही. ती या मानसिक अवस्थांना सामोरी जाते – त्यांच्याकडे पाहते. वर्डस्वर्थचे शब्द इथे आठवतात – सशक्त भावनांचे ओसंडणे – पण शांततेत पुन्हा अवलोकिलेले ! नुसतीच स्वतःच्या भावनांची आहे तशी ही अभिव्यक्ती नव्हे. अनुभव नुसता व्यक्त करण्यापेक्षा ही कविता त्या अनुभवाची रचना पाहते – त्याच्या पूर्णतेचे भान घेते. त्यामुळे, या कवितेचा आवाका मोठा होतो – समावेशक होतो. बऱ्याच कविता तत्त्वज्ञानाच्या प्रश्नांच्या क्षेत्रात जातात. इथे अनेकदा असण्या-नसण्याचे – अस्तित्वाचेच प्रश्न येतात. स्वप्रतिमेचे, भ्रम, स्वप्न, सत्य यांचे प्रश्न येतात. एकूणात माणसाचे असमाधान पाहणारी ही कविता आहे. अमुक एक असमाधान महत्त्वाचे असा निष्कर्ष नसल्याने ही causeless discontent ची – कारणहीन असमाधानाची कविता --किंवा एकूणच मनाच्या मर्यादा, हेच असमाधानाचे कारण असण्याची कविता म्हणता येते. सर्वच कविता या अशा कसाच्या आहेत, असे नसले तरी बऱ्याच तशा आहेत. या अपवादात्मक वेगळेपणासाठी या कवयित्रीचे स्वागत करायला हवे. बोध, उपदेश, सारांश वा सुभाषित अशा दिशेने अशी कविता थोडी जरी कलली तरी तिचे भान-वैशिष्ट्य हरपते आणि ती कस गमावून बसते. काही कविता तशा वाटतात. पण एकूण बऱ्याच कवितांना आणि एकूणच या संग्रहालाही आशयाची एक संगती – अंतर्गत शिस्त आहे. त्यामुळे, प्रत्येक

ओळीचा मध्य सरळ रेषेत घेऊन कविता छापण्याची बाहेरून लादलेली शिस्त नुसती अनावश्यकच वाटत नाही तर खटकत राहते. या एकूण विवेचनाला पूरक अशा, वेगवेगळ्या कवितांतल्या या काही ओळी –

विंझोळ --- ठिय्या मांडून बसलेल्या

ठळक आयुष्याच्या ओळी

बुद्ध – १ --- मानलेल्या दुःखांचे

रकानेच्या रकाने

डोळ्यांवर रेखून

तू जाणून घे ---- माझं नसणं झळाळेल

उसनी माती --- नसण्याच्या असंबद्ध कविता

चक्र ---- सोहळे साजरे

करावे एकलेपणाचे

शब्दांच्या कविता – स्वतःला शोधताना शब्दांच्या कविता हरवणे

काही पक्षी ---- पुन्हा ओळख-बिळख शोधत बसतील

खेळ --- असण्या-नसण्याच्या सीमेकडे

घेऊन जाणारा खेळ

वगैरे.

हा एक वेगळा, अपवादात्मक चिंतनशीलता असलेला, महत्त्वाचा कवितासंग्रह आहे. जरूर वाचा.

सुश्रुत कुलकर्णी यांच्या अमलताश या संस्थेचे हे प्रकाशन असून अरुण देसले यांचे उत्कृष्ट मुखपृष्ठ आहे. आणि सौमित्र यांचा मलपृष्ठ अभिप्राय आहे.

--- ००० ---

एफबी पोस्ट २०१६ मधून –

डाव्या विचारसरणीचा म्हणून माहीत असलेला कवीही कसा
वैचारिकतेच्या आणि व्यक्तिगततेच्या मर्यादा ओलांडून
एक व्यापक भानाची कविता लिहितो, हे पाहायचे असेल तर
यंदाच्या ‘ मौज ‘ दिवाळी अंकातली, सतीश काळसेकर यांची
‘ चिवट चिमण्या ‘ ही कविता पाहावी.

--- 000 ---

मध्येच जरा वेळ होता आणि एक पुस्तक प्रदर्शन चालू असल्याचे दिसले म्हणून ते पाहिले. हिंदी पुस्तकांचे होते. ९० टक्के पुस्तके धार्मिक वा तत्सम प्रकारची होती ! सगळ्यात कहर म्हणजे **वेदमूर्ती श्रीराम शर्मा** नामक एक लेखक आहेत – त्यांची विद्वत्ता आणि ग्रंथसंपदा पाहून अवाढव्य थक्क झालो ! सगळ्या वेदांच्या हिंदी अनुवादांच्या खंडांपासून असंख्य विषयांवर भरपूर पुस्तके ! ती न वाचताही मनातून त्यांना नमन केले ! एवढी पाने नुसते ‘ जय मराठी ‘ असे लिहायचे म्हटले तरी अशा दोन-पाच पुस्तकांत अवसानघात होऊन जाईल कुणाचाही ! दुनिया खूप मोठी आहे आणि तिच्यात असे खूप काही प्रचंड अचरजवाले आहे, हेच खरे !

--- 000 ---

‘ अक्षर वाङ्मय ‘ -- जानेवारी ते सप्टेंबर २०१६.

प्रा. सतीश बहादूर विशेषांक (चित्रपटभाषा अंक).

चित्रपट या माध्यमाच्या बाबतीत मराठीत तरी असे महत्त्वाकांक्षी काम एखाद्या नियतकालिकाने केल्याचे पाहण्यात / ऐकण्यात नाही. डॉ. नानसाहेब सूर्यवंशी, डॉ. अरुण प्रभुणे आणि डॉ. श्यामला वनारसे यांच्या प्रदीर्घ प्रयत्नांनी हा अंक सिद्ध झालेला आहे. त्यासाठी आधी त्यांचे अभिनंदन आणि वाचकांतर्फे त्यांचे आभार ! सिनेमा या माध्यमाबाबतची सजगता वाढवणारा असा हा अंक झालेला आहे. इथे या अंकाचा थोडक्यात परिचय करून देणार आहे.

या अंकाच्या एका भागात समर नखाते, गणेश विसपुते, अभिजित देशपांडे, अरुण खोपकर, गिरीश कसारवल्ली, अनिल झणकर, अशोक राणे, सुषमा दातार, श्यामला वनारसे आणि सतीश जकातदार यांचे लेख असून दुसरा भाग पूर्णपणे सतीश बहादूर यांचे व्यक्तिमत्व, कार्य आणि त्यांचे लेख यांना बहाल केलेला आहे. बहादूरांवरचा भाग फारच कष्टपूर्वक उभा केलेला आहे. त्यांच्याबाबतचे लेख आणि त्यांचे लेख हे असे एकत्रितपणे बहुधा प्रथमच येत आहेत. या क्षेत्रातला त्यांचा अधिकार हा सखोल अभ्यास आणि अथक शिक्षण-कार्य यांतून तयार झालेला आहे. या माध्यमाच्या खोल पाण्यात उतरायची ज्याची इच्छा असेल त्याने या भागाचे परिशीलन करणे खूप लाभदायी ठरू शकेल.

अन्य लेखकांच्या विभागात गिरीश कासारवल्ली या कर्नाटकतल्या सर्जक दिग्दर्शकाने उपस्थित केलेला प्रश्न महत्त्वाचा आहे. नुसती वेगवान कथा सांगण्यातून सर्जकतेला आवश्यक असणारी सूक्ष्मता आणि सखोलता मारली नाही का जाणार, असा तो प्रश्न आहे. या माध्यमाच्या काल-संकल्पनेवर विचारात पाडणारा हा लेख आहे.

इतर सर्व लेखकांचे लेखन हे प्रामुख्याने चित्रपट माध्यमाच्या भाषेची वैशिष्ट्ये व अंगे यांवरच्या सविस्तर चर्चेचे आहे. हे सर्वच लेखक या माध्यमाचा अनेक वर्षे अभ्यास करणारे आहेत. मूकपटापासून बोलपटापर्यंत बदलत गेलेली या माध्यमाची भाषा, लय, गती, प्रकाशयोजना, स्क्रीन टाईम म्हणजे काय, कला-विज्ञान-तंत्रज्ञान यांचे एकत्रित काम चालणे, दिग्दर्शकामुळे सिनेमाला येणारी समृद्धी, दृश्य आणि ध्वनी यांचे सायुज्य, चित्रपटाचा रचयिता हा दिग्दर्शकच कसा असतो, ध्वनीचा या माध्यमातला विशेष प्रभाव, सिनेमाची आस्वाद-प्रक्रिया, सिनेमातली स्त्री-प्रतिमा आणि सिनेमाविषयक झालेल्या लेखनाचा आढावा -- असा भरगच्च मजकूर आहे. पृष्ठ ८२ वर क्रमांक २ या मुद्यात बहादूरांनी या भाषेची सांगितलेली सर्व वैशिष्ट्ये इथे चर्चिली गेलेली आहेत. यातली त्रुटी काहीशी जाणवते ती अशी की प्रत्येक लेखकाने त्याच्या विषयाच्या संदर्भात एखाद्या सर्जक सिनेमावर निदान एक-दोन परिच्छेद लिहायला हवे होते, असे वाटते. याचबरोबर असेही वाटते की अशा एक-दोन सर्जक चित्रपटांची पूर्ण आस्वादप्रक्रिया असलेले एकदोन लेख असते तर फार बरे झाले असते. इथे बहादूरांचे हे वाक्य पाहावे – " My teaching inputs supplemented the technical learning with awareness of the best of international and Indian cinema. " अशा प्रकारचे समाधान इथे

बहादूर यांच्या लेखांतून मिळते. शिवाय, सिनेमा हा सिनेमा असतो -- असे मोघम बोलणाऱ्यांनी, बहादूरांनी केलेला, व्यावसायिक हिट चित्रपट आणि सर्जक चित्रपट यांतला फरकही जरूर वाचावा.

असा हा मौलिक अंक प्रसिद्ध केल्याबद्दल सर्व संबंधितांचे पुन्हा एकदा अभिनंदन !

--- ००० ---

अनुकविता

प्रगल्भ आणि विदग्ध व्यक्तिमत्व म्हटले की माझ्या डोळ्यांसमोर दोन व्यक्ती हमखास येतात – एक, ६०-७० च्या काळात मुंबई विद्यापीठात इंग्रजीचे नंबर वन प्राध्यापक म्हणून प्रसिद्ध असलेले प्रा. बॅनर्जी आणि आपले आदरणीय त्र्यं. वि. सरदेशमुख. माझा काही संबंध नसताना प्रा. बॅनर्जींचा एक तास मी गुपचुप अटेंड केला होता. सरदेशमुख सरांची आणि माझी तीनदा भेट झाली होती. या दोन्ही व्यक्तींच्या असण्यात आणि त्यांच्या भोवती एका गहनगूढ चिंतनशीलतेचे वलय जाणवत असे. वागणे, बोलणे सहज, साधे असे. हा विषय निघायचे कारण म्हणजे आशय परिवारचा २३ एप्रिल २०१६ चा अनुकविता विशेषांक. हा अंक ग्रंथदिन अंक म्हणून काढलेला असून नितीन वैद्य, पुरुषोत्तम नगरकर आणि जयंत राळेरासकर यांनी संपादित केलेला आहे. यात सरदेशमुख सरांनी इंग्रजीतून मराठीत अनुवादित केलेल्या अनेक कवींच्या बऱ्याच कविता देण्यात आलेल्या आहेत. अंकाचे सादरीकरण दर्जेदार असून मुद्रित शोधनाकडेही नीट लक्ष दिलेले आहे. ' प्रदेश साकल्याचा ' लिहिणाऱ्या सरदेशमुख सरांचे असलेले असे हे काम या अंकात आहे. अंकाच्या शेवटी सरांच्या कवितांची सूचीही देण्यात आलेली आहे.

या सर्व कविता महान कविता म्हणून निवडलेल्या आहेत, असे वाटत नाही. पण, वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव-वैभव जाणवल्याने त्या निवडलेल्या असणार. कवितांच्या मराठी रूपांत, भाषावैभवात सहज पोहणे जाणवते. यांतल्या मला आवडलेल्या कविता – ' मजल दरमजल ' आणि ' तुझ्याविना ' (हरमान हेसे), तसेच ' निरोप ' (वॉल्टर डि ला मेयर) या आहेत. अनुवादित कवितांमधल्या काही विशेष ओळी --

पण माझ्या परित्यक्त एकलेपणाला
माझ्याच वैराण स्वप्नांनी तडे जातात (पृ १)

म्हणून सख्या
तुझ्या ठायी तू, माझ्या ठायी मी

असेच भेटत राहू या :

मधला दरवाजा
उघडा असू दे. (पृ ४)

माझ्या आतली हाक वेगळीच होती
त्याच्यातल्या हाकेइतकीच सत्य आणि निर्मळ
मला प्रश्न पडतो
दोन्ही हाकांचा उगम एकच असेल काय ? (पृ ७)

ज्या वस्तुमात्राची गुणप्रशंसा
करीत आलास
त्या वस्तुवैभवानं आपलं सौंदर्यसर्वस्व,
त्यावर प्रेम करणाऱ्या,
एकेका जिवंत असणाऱ्या भावसंपन्नाकडून
घेतलेलं असतं हे लक्षात ठेव. (पृ २७)

नितीन वैद्यांनी ‘ संवादा ‘ त म्हटले आहे – अनुवाद (गद्य वा पद्य) त्यांना शब्दशः अपेक्षित नव्हता … मुळात खोल अर्थाने पाहता सर्व लिखित वाङ्मय हे मनःस्तरावरील भासरचनांचे शब्दरूप असते, त्यामुळे अनुवाद कसा असावा-नसावा याविषयी ठोस काही बोलणे वाया जाते. एका जीवाने दिलेल्या उद्गाराचा कोण्या दुसऱ्याने तिसऱ्यापर्यंत पोचवलेला तो निरोप असतो, असे त्यांनी म्हटले आहे.

एका प्रगल्भ मनाच्या शब्द-क्रीडा म्हणून या अनुकविता जरूर वाचाव्यात अशा आहेत.

--- ००० ---

अमका

म्हणजे, अरुण महादेव काकडे या पूर्ण नावातली अद्याक्षरे समजा किंवा अमका-तमका मधला ‘ अमका ’ समजा ! काकडे काकांचे आत्मचरित्र. सुरुवातीलाच काका म्हणतात की नाटक ही एक सामुदायिक कला आहे, त्यात माझे योगदान किती ते रसिकांनीच ठरवावे. पुढे ते लिहितात, माधव वाटवे नेहमी म्हणायचा, “अरुण, तू नसतास तर रंगायन, आविष्कार, छबिलदास असतं का ? – तू अथकपणे आमच्यामागे उभा राहिलास म्हणून हे घडलं. ” आणि पुढे ते लिहितात – जी कामं केल्याशिवाय संस्था उभी राहात नाही, नाटक उभं राहात नाही, कलाकार उभा राहात नाही, चळवळ उभी राहात नाही – ती सर्व कामे करण्यात हयात गेली. काका स्वतः एक उत्तम नट असूनही नाट्यक्षेत्रात त्यांनी प्रामुख्याने एका निरलस संयोजकाची भूमिकाच बजावली. या संस्थांच्या २०० हून अधिक नाट्यकृती, त्यांचे ५००० हून जास्त प्रयोग आणि छबिलदास चळवळीतले २००० हून अधिक इतर संस्थांचे प्रयोग – असा हा प्रचंड नाट्यसंसार काकांनी केलेला आहे ! नाट्यकर्मींच्या चरित्रांत आपण विजया मेहता आणि श्रीराम लागू यांच्या आत्मचरित्रांकडे खूप अपेक्षेने जातो. अमुक नाटके का निवडली, आशयदृष्ट्या तुम्हाला कसे नाटक महत्त्वाचे वाटते, एखादी भूमिका का आव्हानात्मक वाटली, त्या बाबतीत काही प्रश्न पडले का, समस्या आल्या का, त्यांना कसे तोंड दिले, अमुक प्रकारची काही कमतरता राहूनच गेली, असे कधी वाटले का, नाटकाचा आणि जगण्याचा संबंध कसा वाटतो, नाटकाचे सांस्कृतिक काम कोणते – अशा प्रश्नांबद्दल त्यांत काही असेल म्हणून आपण ती पुस्तके वाचतो. पण, निराशा पदरी पडते. पुढच्या पिढ्यांना नाटक आतून समजायला मदत व्हावी असा मजकूर फारसा सापडतच नाही. त्या फक्त त्यांच्या यशोगाथा असल्याचे दिसते ! काकडे काकांनी मुख्यतः संयोजक-सूत्रधार या रूपात काम केले. नाटकाच्या बाह्य अंगांशी, व्यवहारांशी, नियोजनाशी त्यांचा संबंध आला. त्या बाबतीतले अनुभव समजावेत याच प्रमुख उद्देशाने आपण हे ‘ अमका ’ वाचतो, आणि आपल्या त्या अपेक्षा इथे नक्कीच पूर्ण होतात. या पुस्तकातल्या २६८ पैकी पहिली सुमारे १०० पाने काकांच्या व्यक्तिगत घडणीची आहेत. पुढे अनेक प्रमुख नाट्यकृतींच्या घडत जाण्याच्या ‘ बाह्य ’ प्रक्रियांबद्दल काका बोलतात. त्यांतही ‘ तुघलक ’, ‘ एक शून्य बाजीराव ’, आणि ‘ शांतता कोर्ट चालू आहे ’ यांबद्दल काका विशेष आत्मीयतेने बोलतात. या एकूण प्रकारात काकांच्या स्मरणशक्तीला दादच द्यायला हवी ! त्यांच्याकडे काही नोंदी ठेवलेल्याही असतील, पण, इतके तपशील, इतक्या घटना अशा आठवणे हे काकांच्या एकनिष्ठ नाट्यप्रेमाचे निदर्शक आहे ! मराठी रंगभूमीच्या एकूण इतिहासातला हा एक मोठा आणि अति-महत्त्वाचा भाग काकांच्या परिश्रमांमुळेच घडत गेलेला आहे. अशा प्रकारच्या या कामाला कुठे कुणी प्रसिद्धी वा ग्लॅमर देत नसते ! तरीही काका ते निष्ठेने करत राहिले ! तसे ते अनेक पुरस्कारांनी सन्मानित तर झालेले आहेतच, शिवाय ते नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद भूषवणारेही ठरले आहेत !

‘ आपल्या अपेक्षा पूर्ण करणारे नाट्यकर्मींचे आत्मचरित्र ’ हा निकष लावला तर काकांचे हे पुस्तक मला नंबर वन वाटते. आणखी बऱ्याच नाट्यनिर्मितींच्या कथा यायच्या राहिलेल्या आहेत, त्या पुढल्या भागात येतील, अर्थातच.

काकांनी हे एक मोठे काम करून ठेवल्याबद्दल त्यांना, तसेच, हे एक महत्त्वाचे पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल ‘ आविष्कार ’ आणि ‘ मौज प्रकाशन ’ यांना धन्यवाद !

--- ००० ---

परेश एजन्सीज

पुण्यातल्या अप्पा बळवंत चौकातले हे पुस्तकांचे दुकान. नाटके आणि एकांकिका सापडण्याचे आणि मिळण्याचे तर नंबर वन दुकान ! शिवाय ते एकांकिका आणि नाटके प्रकाशितही करतात. माझ्या सगळ्या एकांकिका सुट्या -- एकेक स्वरूपात, त्यांनी प्रकाशित केलेल्या आहेत. आमचे जुने संबंध आहेत. अनेकदा, त्या भागात गेलो की त्यांच्याकडे थोडा वेळ गप्पा मारून येणे, हा एक माझा कार्यक्रम असे. तर, त्या दुकानाला २५ वर्षे पूर्ण झाली म्हणून अनिरुद्धने मला बोलावले होते. (आधी त्याचे वडील दुकानाचा पूर्ण कारभार पाहात असत.) त्याला म्हटले की तेवढ्या एकाच कारणासाठी येण्यापेक्षा समोरच असलेल्या किबे थियेटरमधून माझे ' नटसम्राट ' चे एक तिकीट काढून ठेव. त्याने तसे केले, म्हणून जाऊन आलो. दुकान मस्त, आत फिरून पुस्तके पाहता येतील, असे छान आहे ! शुभेच्छा दिल्या, त्याने मला एक स्मृतिचिन्ह दिले, आमचे एकत्र फोटो काढले. थोडा वेळ होतो तिथे. तेवढ्यात तिथे एक ग्राहक आला. " प्रेमाची काही कादंबरी असली तर हवीय " म्हणाला ! अनिरुद्धला असे काही लगेच सांगता येई ना -- त्याच्या सहायकाला त्याने दुकानातला अमुक भाग यांना दाखव, असे सांगितले. नंतर, त्यावर आम्ही बोललो. खरेच, च्यायला, नुसतीच प्रेमाची अशी कुठाय रोमँटिक कादंबरी ? अरेरे ! एवढे रुक्ष झालोय आपण ? फडके होते तेव्हा हे दालन नीट असायचे -- आता कोण आहेत ?
--- ००० ---

पळवाटा वाटा पाताळाच्या

(रसातळाला ख प च – या, सतीश तांबे यांच्या कथासंग्रहातली एक कथा. अक्षर प्रकाशन.)
माझे शिस्तबद्ध आणि अद्ययावत असे वाचन नाहीय. काही लेखक मित्र भेटतात तेव्हा मनातून मी खजिल झालेला असतो कारण त्यांचे मी फारसे वाचलेले नसते. कधी कधी हे कळते की तेही तसेच आहेत ! मग मला बरे वाटते ! हे सांगायचे कारण म्हणजे मित्रवर्य सतीश तांबे यांचा वर उल्लेखलेला कथासंग्रह मी नुकताच वाचला ! (त्याची आता दुसरी आवृत्ती निघायची वेळ आलीय, असे कळते !) सगळ्याच कथा उत्तमच आहेत, तरीही, ‘ पळवाटा वाटा पाताळाच्या ‘ ही कथा मला मराठीतली एक अत्यंत महत्त्वाची कथा वाटली. तांबे यांची प्रत्येक कथा रूटीन सवयींचे अंगण ओलांडतेच ओलांडते आणि आपल्याला चकित करत मानवी प्रश्नांची एक आगळीवेगळी समावेशक समज देते. हे जाणवते कारण कोणत्याही बौद्धिक अन्वयाला ओलांडून ती कथा दशांगुळे उरते. तांब्यांचे विस्तृत अनुभवक्षेत्र, कल्पनाशक्ती आणि पूर्ण आशयाला मोकळी जागा करून देण्याची, कोणत्याही चांगल्या कलावंताकडे असावीच लागते अशी सहज नम्रता, यांमुळे हे घडते. जगणे समजून घेताना एखादे विधान वा भूमिका वा विचारसरणी हे सर्व कुचकामी असते याचे भान या कथा देतात. कथेचा फॉर्म नाकारणाऱ्यांना हे कादंबऱ्यांतूनही जमलेले नाही, असे मला दिसते. विद्वत्ता आणि पानांची संख्या या गोष्टी अशा अथांगतेपुढे नगण्य ठरतात. याबाबत खुला, पूर्वग्रहविरहित पद्धतीने साहित्यकृतीच्या आशयाला सामोरा जाणारा कुणी

समीक्षक मराठीत आहे की नाही, कोण जाणे. सतीश तांबे आणि राजन खान यांचे लेखन हे मराठीतले अपवादात्मक दर्जेदार लेखन आहे, हे मराठीने स्वीकारलेले दिसत नाही. हे नुसतेच टोळी-संस्कृतीचे लक्षण आहे की समजच कमी आहे, असा प्रश्न पडतो.

या संग्रहातली ' पळवाटा वाटा पाताळाच्या ' ही एक जबरदस्त कथा आहे. इतिहासाचे छातिठोक विश्लेषण करून माणसाच्या भविष्यातील वाटचालीचे भाकित करणाऱ्यांनी तर ही कथा जरूर वाचावी. सार्त्रसारखे लेखक जाणीवपूर्वक जी कलात्मक उंची गाठतात तीच उंची सतीश तांबे, राजन खान आणि खानोलकर हे लेखक उत्स्फूर्तपणे गाठतात, असे लक्षात येते. माणसाच्या कृतीचे अर्थ लावणे हे कसे अवघड काम असते हे दाखवणारे सार्त्रचे ' क्राईम पॅशनेल ' हे नाटक मला ही कथा वाचताना आठवले. अशी कथा दिसणे-सुचणे हेच मुळात सखोल मर्मदृष्टीचे लक्षण आहे. या कथेतला विस्तृत अनुभव पट आणि कुठल्या कड्या कुठे जोडल्या गेल्या आहेत हे एकत्रितपणे दाखवण्याचे कसब, सलाम ठोकावा, असे आहे ! असे लेखन आपोआप तत्त्वज्ञानाची उंची गाठते आणि वाचकाची चिंतनशीलता जागृत करते. माझ्या मते लेखनाचा अत्युच्च सांस्कृतिक अर्थ हाच असू शकतो.

सदर कथेचे सविस्तर समीक्षण करणे हा हेतू नाही. परंतु, अशा महत्त्वाच्या सर्जक साहित्यकृतींची मराठीतल्या समीक्षेच्या क्षेत्रात नीट दखल घेतली न जाणे, ही एक फार मोठी पोकळी आहे, असे म्हणावेसे वाटते.

--- ००० ---

(मी कोल्हापूरला गेलो होतो तेव्हा मानसी देशमुख यांनी मला त्यांची दोन पुस्तके अभिप्रायार्थ दिली होती. ती वाचून झाल्यावर त्यांचा संपर्क होई ना. त्यामुळे, वाट पाहून, अभिप्राय इथेच देण्याचे ठरवले. त्यांना हे पोचले तर ठीकच आहे.)

मानसी देशमुख यांचा कथासंग्रह – **' झेरॉक्स '.**

या सगळ्या कथा आजच्या स्त्रियांच्या जगण्याचे विषय हाताळणाऱ्या आहेत. लेखिका बहुश्रुत आणि आजच्या स्त्रियांचे जगणे जवळून पाहिलेल्या आहेत. त्यामुळे, या कथांमधल्या अनुभवविश्वाला एक सच्चेपणा आहे. होणारे मूल कुणापासून, हा संशय असणे (झेरॉक्स), स्त्री-पुरुष संबंधांबाबतचे ' ज्ञान ' मिळत स्त्रीने फुलत जाणे (ब्लॉसमिंग), एकल पालकत्व – इथे मातृत्व (सिंगल), लेडीज हॉस्टेलमधले रॅगिंग (एल्गार), ठराविक वयानंतर होणारे शारीरिक बदल आणि त्यांची माहिती नसल्यामुळे होणारे घोटाळे (मेल पॉज), स्वतःच्या महत्त्वाकांक्षा मुलावर लादल्याचे दुष्परिणाम (क्रूस), मुलाच्या घरच्यांच्या भरवशावर, स्वतःची आर्थिक कुवत नसताना लग्न करणे (पहिला डाव), एका ज्येष्ठ स्त्रीने स्वेच्छानिवृत्ती घेण्याचा व्यवहारात होणारा अर्थ (व्ही आर एस), काबाडकष्ट करून मुलाला शिकवणे झाल्यावर, सधन

मुलीशी लग्न केलेल्या मुलाचे वागणे (सुंभ) – असे या कथांचे विषय आहेत. लेखन ओघवते, निर्भीड आणि खुले आहे. इंटरेस्ट टिकवणारे आहे.

या साध्या वास्तववादी पद्धतीने लिहिलेल्या कथा आहेत. असे असताना प्रथम पुरुषी निवेदनवाल्या कथेत निवेदक व्यक्तीचा मृत्यू असणे, ही तांत्रिक चूक ठरते. असे दोन-तीन कथांत झालेले आहे. दुसरे म्हणजे, तशा या नुसत्या घटनाप्रधान किंवा ' बघा, कसे झाले ते ' या टाईपच्या कथा आहेत. सर्जकतेतून येणारी चिंतनशीलता, घडणाऱ्या गोष्टींचे सखोल भान, असे काही या कथांत जाणवत नाही. त्यामुळे एका पृष्ठस्तरावर येणारी बोधप्रदता फक्त जाणवू शकते.

हे सर्व पाहूनही, एकूणात वाचनीय कथासंग्रह.

--- ००० ---

मानसी देशमुख यांचा ललितलेख संग्रह – **' सृजन संवाद '.**

दैनिक ' नवशक्ती ' च्या रविवार पुरवणीत मानसी देशमुख यांनी चालवलेल्या सदरातले हे लेख आहेत. ' आजच्या ' स्त्रीच्या जगण्यातल्या अनेक प्रश्नांचे स्त्रियांचे ज्ञान आणि भान वाढावे, या हेतूने लिहिलेले हे लेख आहेत. लेखिकेचे मन बहुश्रुत आणि आधुनिक जगण्यातले अनेक तपशील शिताफीने टिपणारे आणि ते सफाईदारपणे लेखनात आणू शकणारे आहे. या दृष्टीने हे पुस्तक नक्कीच सर्वांनाच काही ना काही देऊ शकेल असे झालेले आहे. लिव्ह इन पासून घरातल्या प्रत्येक कामाचे मुलाला बक्षीस देण्यापर्यंतचे अनेक महत्त्वाचे विषय यात हाताळलेले आहेत. निवेदिका ही सर्व प्रश्नांच्या निराकरणांची मास्टर असल्याप्रमाणे सगळीकडे वावरताना दिसते. वर्तमानपत्री लेखनात, इंटरेस्टिंग पद्धतीने थोडी माहिती आणि काही ' तयार सल्ले ' मिळणे काहींना हवेच असते. ती अपेक्षा पूर्ण करणारे हे लेख आहेत. प्रत्येक लेख म्हणजे जणू एक सुभाषित बनूनच अवतरत गेलेला आहे. परंतु, प्रत्यक्ष जगण्यात अशी सुभाषिते वा सल्ले कितपत उपयोगी पडू शकतात, हा प्रश्नच असतो. त्या त्या व्यक्तीचे जगणे-वागणे असंख्य प्रभावांनी बद्ध वा ग्रस्त असते. असे बाहेरून स्वीकारलेले सल्ले धोक्याचेही ठरू शकतात. काही सल्ले तर पूर्ण निरुपयोगीच ठरू शकतात. उदाहरणार्थ, शेवटच्या लेखात असलेला मन पवित्र ठेवण्याचा साधा, सोपा सल्ला ! म्हणजे काय करायचे ?

अर्थात, अशा सदर-लेखनातून खूप सखोल लेखनाची अपेक्षा नसते. तरीही, लेखिकेच्या चौकस आणि तपशीलवार भान बाळगणाऱ्या मनामुळे हे पुस्तक नक्कीच वाचनीय झालेले आहे.

--- ००० ---

अत्युत्तम कथा

दोन आघाडीचे आणि अत्युत्तम कथाकार / कादंबरीकार इथे आपल्या मित्रयादीत आहेत. सतीश तांबे यांच्या ‘ ना मा निराळे ‘ आणि ‘ संशयकल्लोळात राशोमान ‘ या कथांबाबत मी इथे लिहिले होते. अलिकडेच मी राजन खान यांचे

‘ फैल / रात्र ‘

हे दोन दीर्घकथांचे पुस्तक वाचले. त्याही दीर्घकथा मराठीतल्या श्रेष्ठ साहित्यकृती आहेत. साहित्याच्या मूल्यात्मकतेबाबत मी जे लिहीत आलो त्या संदर्भात, या कलाकृतींची नक्कीच मौल्यवान म्हणून उदाहरणे देता येतील. या कलाकृती ‘ प्रदेश साकल्याचा ‘ आवाक्यात घेणाऱ्या म्हणजेच ‘ समग्रावधानी ‘ आहेत

राजन खान यांच्या ‘ फैल ‘ आणि ‘ रात्र ‘ या दोन्ही दीर्घकथा, चोरटे आणि सामाजिक दृष्ट्या अनैतिक म्हटले जातील अशा स्त्री-पुरुष संबंधांबद्दल आहेत. फैल म्हणजे वागणूक, कृती, बर्ताव. आपण बदफैली म्हणतो त्यातला हा फैल. माणसाच्या मनाच्या सूक्ष्मतम हालचाली, तिच्यातले आंतरविरोध, फिकीर-बेफिकीर, इलाज-नाइलाज, कोंडी-प्रतिकार – अशा सगळया गोष्टींचा अचूक वेध घेण्याची एक अजब सिद्धी राजन खान यांच्याकडे आहे. एकही वाक्य अनावश्यक वा भरताड नसते. यातला प्रत्येक शब्द त्या अभिव्यक्तिप्रक्रियेला पुढे नेत असतो. त्यामुळे, काय होणार याच्या उत्सुकतेपेक्षा त्या कथेतला प्रत्येक चालू क्षण महत्त्वाचा असतो. हे घाईने वाचून संपवायचे लेखन नसते. या कथा जगण्यातले, टोकाचे म्हणता येतील असे प्रश्न हाताळतात. त्या त्या टोकापर्यंत पोचण्याची प्रक्रिया ही अचंबित व्हावे अशा सूक्ष्मपणे, पटणाऱ्या अशा व्यापक, समावेशक पद्धतीने घडत जाते. इथे एखादे तत्त्व सांगायचे नसते वा बोध द्यायचा नसतो. भूमिका वगैरे गोष्टी इथे फिजूल असतात. हा मानवी जगण्याचा एक अमर्याद आवाका असतो – भान घेणे असते. हे भान म्हणजेच परिपक्वता. अशा परिपक्वतेचा स्पर्श होणे म्हणजेच संस्कृती. हे लक्षात घेता, अशा साहित्यकृती या महत्त्वाच्या सांस्कृतिक घटना ठरतात.

या दोन्ही लेखकांकडून अशीच सांस्कृतिक समृद्धी घडत राहो, हीच सदिच्छा !

--- ००० ---

गालिब १८६९ ला वारला आणि टागोर १८६१ ला जन्माला आले. म्हणजे सलग जोडूनच या दोन लेखन-कारकीर्दी झाल्या. यांच्या कविता म्हणजे भक्तीचे नुसते उत्तुंग आविष्कार, एवढेच नसून मानवी जगण्याच्या आकलनाचे हे विशाल पटच आहेत ! या दोघांनीही अत्युच्च दर्जाच्या कविता लिहिल्या आहेत आणि, तुलना म्हणून नव्हे, पण, महानतेचा स्पर्श म्हणून, एक वाचताना दुसराही आठवावा, याचा एक वेगळाच अपवादात्मक आनंद यांनी निर्माण करून ठेवलेला आहे !

हे आठवायचे कारण म्हणजे **‘ आशय परिवार ‘** हा २३ एप्रिल २०१७ चा अंक. दर वर्षी नीतीन वैद्य, पुरुषोत्तम नगरकर आणि जयंत राळेरासकर मिळून हा अंक घडवतात आणि संदर्भमूल्य असलेला मौल्यवान मजकूर आपल्या हातात ठेवतात. या वर्षीचा अंक ‘ गीतांजली ‘ ला वाहिलेला आहे. मराठीतला ‘ गीतांजली ‘ चा पहिला अनुवाद ह. ना. आपटे यांनी केलेला आहे, हे मला माहीत नव्हते. (त्यात काही विशेष नाही – मी काही मराठीचा खास अभ्यासक नाहीय). तो पूर्ण अनुवाद मिळवून या अंकात देण्यात आलेला आहे ! हे अर्थातच जबाबदारीचे काम होते. त्या काळात होते त्या प्रकारच्या शुद्धलेखनाने हे सर्व काळजीपूर्वक छापलेले आहे. येटसची प्रस्तावना, आपट्यांची प्रस्तावना, टागोरांचा लेख यांबरोबरच ‘ गीतांजली ‘ ची मराठी भाषांतरे – याबाबतची पूर्ण माहितीही इथे देण्यात आलेली आहे. अनुवाद, या कवितांची प्रगाढता आणि प्रगूढता व्यक्त करणारा – चांगला आहे !

असा अमूल्य अंक निर्माण केल्याबद्दल सर्व संबंधितांचे मनःपूर्वक अभिनंदन !

--- ००० ---

मित्रवर्य सतीश तांबे यांची, ‘ प्रपंच ‘ दिवाळी अंकात आलेली, **‘ संशयकल्लोळात राशोमान ‘** ही कथा वाचली.
ही एक अत्युत्तम कथा आहे !
मानवी संबंधांकडे एका वेगळ्याच उंचीवरून पाहणारी ही कथा जरूर वाचा --

--- ००० ---

लोकगीते – आकलन आणि आस्वाद

लेखकद्वय – डॉ. नेताजी पाटील आणि सौ. भावना पाटील.

(अनघा प्रकाशन, ठाणे, पूर्व.)

कोणत्याही संवेदनशील माणसाला कधी ना कधी हा प्रश्न पडत असावा असे वाटते की आपण एखादी व्यक्ती काम काय करते यावरून त्या व्यक्तीचे मूल्य ठरवतो, ते बरोबर आहे का ? आर्थिक, राजकीय ताकद, याही तशाच बाह्य गोष्टी. एखादा माणूस महापौर आहे म्हणून किंवा कलेक्टर आहे म्हणून त्याचे मूल्य एखाद्या आदिवासीपेक्षा जास्त का असावे ? व्यवहारात आपण निरनिराळ्या व्यक्तींना आपापल्या मूल्यमापनाप्रमाणे कमी-अधिक प्रमाणात मान देत-घेत असतो, हे मात्र खरे. हा विचार मनात यायचे कारण, हे पुस्तक. अनेक वस्त्या-वाड्यांवरून संकलित केलेली ही लोकगीते. लेखकांनी, ती कोणत्या प्रसंगी म्हटली जातात, त्यांचे अर्थ काय, हे सगळे समजावून सांगितलेले आहे. हे सर्व वाचल्यावर एक गोष्ट

प्रकर्षाने जाणवली की मूलभूत, सार्वकालिक भावभावना आपल्या सगळ्यांच्या सारख्याच आहेत. सर्व माणसांतला माणूस एकच आहे.

ही लोकगीते इथे तीन भागांत देण्यात आलेली आहेत. विभाग एक – लग्नगीते, विभाग दोन – सणासुदीची गीते आणि विभात तीन – आदिवासी गीते. ही सर्व गीते जमवणे सोपे काम नव्हते. आणि या सर्व गीतांवरचे भाष्य म्हणाल तर ते पाटील पतिपत्नीच लिहू जाणे ! त्या भागांचा आणि तिथल्या जीवनसरणींचा सखोल, मुरलेला अनुभव, या विषयाचा गाढा अभ्यास आणि वाचकांना त्या गीतांची खुमारी समजावून देण्याची हातोटी – निव्वळ अप्रतिम आहे ! इथे सविस्तर परीक्षण लिहिण्याचा हेतू नाही, पण, माहितीसाठी आणि एक नमूना म्हणून मला आवडलेले एक गीत देतोय –

दारीचा चाफिया

दारीचा चाफिया हिसाल्या देतो
नवरीचा बापिया उसासे देतो ।। ध्रु ।।

नको रे चाफिया देऊ हिसाली
अंगनी लावीन तुझी डहाली ।।

नको रे बापिया मनी गहिवरू
मायेनें बांधीन सासर-माहेरू ।।

चाफियाच्या डहालू फुलांचं घोसू
बापियाच्या डोलां खलखलती आसू ।।

(हिसाल्या म्हणजे हेलकावे आणि घोसू म्हणजे घोस)
सासरी जाणारी मुलगी त्या चाफ्याला म्हणतेय की मी तुझी एक डहाळी बरोबर नेईन आणि ती सासरी लावेन ! तिचे बोलणे ऐकून चाफ्याच्या डहाळीवर फुलांचे घोस येतात आणि बापाच्या डोळ्यांत अश्रूधारा !

काहींना इथे शाकुंतल आठवेल तर काहींना स्वतःच्या मुलीचे सासरी जाणे !

अत्यंत परिश्रमपूर्वक आणि प्रेमाने लिहिलेले एक उत्तम पुस्तक !

--- 000 ---.

दुनिया दामू देवबाग्याची

कहाणी एका शूद्राची

-- लेखक – डॉ. यशवंत रायकर.

भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या आगेमागेचा काळ. कोकणातले देवबाग नावाचे एक छोटे काल्पनिक गाव. त्या गावातली ब्राम्हण आळी. तिथे राहणारे एक एकत्र कुटुंब. आणि त्यात आश्रिताचे जिणे जगणारा दामू. तर ही त्या दामूची आणि त्या निमित्ताने त्याच्या आजूबाजूच्या सर्वच व्यक्तींची कहाणी. ही कहाणी दामू स्वतःच कधी प्रथम पुरुषात तर कधी तृतीय पुरुषात निवेदन करतो. त्या काळातल्या ब्राम्हणी जगण्याचा एवढा तपशीलवार ऐवज इतरत्र कुठे सापडणे अवघड आहे. वापरात असलेल्या वस्तू, सामान, रूढी आणि परंपरा, तसेच मानवी नातेसंबंधांतले असंख्य तपशील आणि बारकावे यांनी ही कहाणी अक्षरशः समृद्ध आहे – संपन्न आहे. एकेका व्यक्तीचे एकेक प्रकरण करून सांगत जाण्याचा असा हा घाट असला तरी ही कादंबरीच आहे. एका काळातल्या एका समूह जीवनाचा पट इथे उलगडला जातो आहे. कादंबरीला कथानक असायला हवे, असे काही नाही. गाओ झिंगझिआन या लेखकाचे ‘ सोल माउंटन ‘ हे पुस्तक आपण कादंबरी म्हणूनच वाचतो.

ही कादंबरी कोकणातल्या ब्राम्हणी स्वयंपाकासारखी सौम्य आहे. सुखदुःखे आणि घटना यांचे असंख्य प्रकार हीत असले तरी ते खूप भडक वा सनसनाटी पद्धतीने येत नाहीत. म्हटले तर, दामूच्या जगण्यातल्या नाट्यहीनतेचा स्पर्श या निवेदनालाही झालेला आहे. तरीही, त्या जगण्याचा असा सर्वांगीण आवाका घेणारी ही कादंबरी अद्वितीय आणि विशेष ठरावी, अशी आहे. अनेक ठिकाणी विनोदाचा शिडकावा तर आहेच, शिवाय अनेकदा तपशीलांचे बारकावेही मजा आणणारे आहेत. ‘ दामूचा परलोक ‘ सारखे प्रकरण तर त्या विशिष्ट मानसिकतेतल्या कल्पनांची उत्तम खिल्ली उडवणारे आहे.

तसे तर कोणतीही कादंबरी तिच्या वाचकाला परकीच असते, म्हटले तर त्याच्या जगण्यात अप्रस्तुतही असते. कारण, त्या कादंबरीतले अनुभव विश्व हे त्याचे स्वतःचे नसते. परदेशातल्या कादंबऱ्या आपण का वाचतो ? याचे उत्तर एकच असते की कोणत्याही मानवी जगण्याच्या प्रभागांच्या निमित्ताने त्या कादंबरया आपले एकूण जगण्याचेच भान वाढवतात. याच कारणामुळे कोणतीही कलाकृती इतर कुणाच्याही आयुष्यात प्रस्तुत आणि सांस्कृतिक उन्नयन करणारी ठरू शकते. ते श्रेय या कादंबरीला दिले जायलाच हवे.

या कादंबरीची एक आवृत्ती संपलेली असून , अनोखी पब्लिकेशन्स ने हिची दुसरी आवृत्ती २०१६ ला प्रकाशित केलेली आहे. मराठी कादंबरीच्या क्षेत्रात या कादंबरीला योग्य ते स्थान दिले जायला हवे.

--- ००० ---

लज्जा

पुस्तके आली की त्या त्या वेळी माझी कधीच वाचून होत नाहीत. काय वाचायचेय ते मनात असते. ते जेव्हा जमते तेव्हा मात्र वाचतो. मुळात वाचन फार नाहीय, हा भाग वेगळा !

तर, नुकतीच तस्लिमा नासरीन यांची ' लज्जा ' ही कादंबरी वाचली. इकडे बाबरी मशीद पाडल्यावर तिकडे बांगला देशात काय झाले, हे वाचून अंगावर काटा आला. तिथले सगळे हिंदू जणू ती बाबरी पाडणारेच वा त्या मताचेच होते, असे गृहीत धरून अनेक दंगली झाल्या. एखाद्या घरातली तरुण मुलगी तिच्या आईवडिलांदेखत, त्यांचा विरोध तुडवून, पळवून नेली जाणे, ही किती भयानक गोष्ट असते, ते पूर्ण जाणवले ! इथे काही धर्मांधांनी केलेल्या कृतीचा तिथल्या साध्या, सरळ हिंदूंना, ते हिंदू आहेत याच एका कारणास्तव त्रास व्हावा, इतकी दुःखे, संकटे त्यांच्या वाट्याला यावीत, यातला मानवी गधडेपणा पाहून दिङ्मूढ व्हायला झाले !

या संदर्भात, अलिकडेच, अमरनाथ यात्रेकरूंवर झालेला हल्ला पाहिला पाहिजे, असे वाटले. त्या वेड्या अतिरेक्यांनी केलेल्या कृतीचा परिणाम आपल्या इथल्या हिंदू-मुस्लिम सौहार्दावर होता कामा नये. हा देश सर्व धर्मीयांचा आहे, हे कदापि विसरता कामा नये. आपले एक अतिशहाणे पत्रकार म्हणाले की भारतातून कुणालाही हज यात्रेला जाऊ देणार नाही – सगळी विमाने रद्द करायला लावू ! हे म्हणजे, त्या नीच, वेड्या अतिरेक्यांच्या कृतीची शिक्षा भलत्याच, सज्जन लोकांना देणे होईल ! असे होऊ नये. इथल्या सर्व नागरिकांतले सौहार्द आणि प्रेम लक्षात घेऊनच आपले वागणे व्हायला हवे. त्या गधड्या अतिरेक्यांमुळे आपण आपल्या संबंधांचे नुकसान करून घेऊ नये.

--- ००० ---

सआदत हसन मंटो

" फाळणीनंतर दोन-तीन वर्षांनी पाकिस्तान आणि हिंदुस्तान सरकारच्या लक्षात आलं की साधारण कैद्यांप्रमाणे वेड्यांचीसुद्धा अदलाबदल व्हायला हवी. म्हणजे जे मुसलमान वेडे हिंदुस्तानच्या वेड्यांच्या हॉस्पिटलमध्ये आहेत त्यांना

पाकिस्तानला पोहोचवायचं आणि जे हिंदू आणि शीख पाकिस्तानच्या वेड्यांच्या हॉस्पिटलमध्ये आहेत त्यांना हिंदुस्तानच्या ताब्यात द्यायचं. " -- ही आहे मंटोच्या ' टोबा टेकसिंह ' या कथेची सुरुवात. (अनुवाद – डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे – ' अक्षर वाङमय ' – एप्रिल ते जून २०१५.) मानवी मनाचा ' उत्तुंग ' गधडेपणा फक्त ७-८ पानांत इतका उघडा पाडणारी दुसरी कथा सापडणे अवघड आहे. मंटो म्हणतोच असे की तो सत्य वेधण्यासाठीच लिहितो.

मंटोच्या अनुवादित कथांचा एक संग्रहही मी नुकताच वाचला – ' एक होती राधा ' -- अनुवाद – चंद्रकांत भोंजाळ – अक्षर प्रकाशन. त्यातल्याही कथा अशाच मानवी जगण्यातल्या अनेक गुंतागुंतीच्या रचना उघड्या पाडणाऱ्या आहेत. माणसाच्या मनाच्या सूक्ष्म प्रक्रियांचे आणि त्यातून घडणाऱ्या संबंधरचनांचे पूर्ण भान व्यक्त करणाऱ्या या कथा आहेत. या कथांतली पात्रे मुख्यतः वेश्या, त्यांचे दलाल, गिऱ्हाइके अशी असली तरी त्या कथा तेवढ्या समूहांचेच जगणे, अशा मर्यादित राहात नाहीत. त्यांतली सुखदुःखे, मानापमान, नाइलाज हे सर्व आपलेही असल्याचे जाणवते. मंटो हा एखादी वैचारिक भूमिका घेणारा वा विद्रोही टाईप लेखक नाही. तो त्याच्या कोणत्याही पात्राला कंडेम करत नाही वा कुणाचेही उदात्तीकरण करत नाही. किंवा, " मी तळपती तलवार आहे – उद्याचा सूर्य तुम्हाला खतम करेल " असला उद्रेकी आवाजही त्याच्या कथा करत नाहीत. वेश्यांचे वा इतर उपेक्षितांचे जगणे हे या कथांचे अनुभवद्रव्य आहे कारण मंटोला ते जग अंतर्बाह्य माहीत आहे. एखाद्या वेश्येला काय वाटते ते तो किती सखोलपणे दाखवतो, ते पाहा – " सुगंधी आपल्या तोऱ्यातच असे. पण जर कुणी आपलेपणानं बोलला तर लगेच विरघळत असे. तसं स्त्री-पुरुषांचं शारीरिक मीलन तिच्या दृष्टीने अगदीच निरर्थक होतं. त्यात तिला अजिबात गंमत वाटायची नाही. पण शरीराचे इतर अवयव खूप कुस्करले जावेत, पुरुषाने आपल्या शरीराशी केलेल्या झोंबाझोंबीत आपण थकून जावं असं तिला वाटे. अशा थकव्यानंतर येणारी झोप तिला खूप प्रिय होती. अशा झोपेमध्ये कधी तुम्ही आहात तर कधी नाही आहात असं वाटतं. असण्यानसण्याच्या या जाणिवेमध्ये कधीतरी तुम्ही हवेत उंच जागी लटकत आहात असाही भास होतो. वर-खाली, आजूबाजूला फक्त हवेचं अस्तित्व जाणवत राहतं. ह्या हवेतही श्वास अडकायला लागतो. पण ती अवस्थाच मोठी छान असते. "

त्याच्या व्यक्तिगत जीवनात मंटो डाव्या विचारसरणीचा होता अशी माहिती दिसते पण तो कोणत्या एखाद्या चळवळीचा भाग होता का, ते काही समजले नाही. अनुभवद्रव्य उपेक्षितांचे असले की त्या लेखकाला बांधिलकीवाला म्हणायचे, इतरांना कलावादी म्हणायचे – हे फारच ढोबळ विचार कधी कधी दिसतात. अनुभवद्रव्य कुठलेही असले तरी मानवी जगण्याचा सखोल वेध घेणे हीच ज्यांची सर्जकता असते असे मंटोसारखे लेखक ते भेद ओलांडून वाचकांना जगण्याच्या प्रक्रियांबाबत सर्वांगीण सजग करतात. यामुळेच मंटोच्या कथा सर्वच माणसांना प्रस्तुत ठरतात. यासाठीच तो एक महत्त्वाचा, मौल्यवान लेखक ठरतो.

--- ००० ---

दोन गझल संग्रह

गझलेची थोडक्यात वैशिष्ट्ये म्हणजे -- ती द्विपदींची काव्यरचना असते आणि तीत सामान्यतः पाच ते सतरा द्विपदी असतात. एका द्विपदीचा दुसरीशी वा एकूणात सर्वच द्विपदी एकमेकींशी संबंधित असल्या पाहिजेत, असे बंधन नसते. हा काव्यप्रकार प्रामुख्याने श्रृंगाराच्या अभिव्यक्तीसाठी – विप्रलंभ श्रृंगारासह – वापरला जातो. यात मधुरा भक्तीचीही विपुल काव्यरचना झालेली आहे. चमत्कृती आणि अर्थांचे अनपेक्षित धक्के यांनी या कविता खूपच आस्वाद्य होतात.

कोणतेही मौल्यवान साहित्य हे स्वतंत्रपणे आणि निर्भयपणे लिहिलेले असावे लागते कारण त्याशिवाय मानवी मनाचा चौफेर आवाका घेणे शक्य होत नाही. या दृष्टीने पाहता साहित्यात स्त्रियांचे योगदान हे, समाज-परिस्थितीच्या बंधनांमुळे कमीच दिसते. त्यातही गझल हा कविता प्रकार प्रामुख्याने श्रृंगार-प्रधान ! त्यामुळे, गझल लिहिणाऱ्या स्त्रिया तर फारच कमी ! हे लक्षात घेता राधा भावे यांचा
तुला भेटून येताना
हा कवितासंग्रह महत्त्वाचा ठरतो. राधा भावे या उच्च विद्याविभूषित असून मोठ्या जबाबदारीच्या सरकारी पदावर कार्यरत आहेत. त्यांचा हा कवितासंग्रह, बुद्धिमानता आणि सूक्ष्म संवेदनशीलता या गुणांनी युक्त आहे. यातल्या -- तुला भेटून येताना, प्रेम केले, छान केले, काळजाचे गुप्त रस्ते, मनात ठेवले तुला, कवडसा, नकाराचे बळ, दिवेलागणीच्या वेळी आणि नजराणे – या कविता विशेष लक्षणीय आहेत. या संग्रहातल्या काही खास ओळी अशा आहेत –

तोल जराही ढळू न द्यावा अंधाराचा
खुल्या मनाने उन्हात मग वावरता येते (पान ७)

थांबतील श्वास अन मी निघेन जायला
जाहली मुकी म्हणा आज एक बासरी (८)

मी डावलू कशाला निष्पर्ण वृक्ष सारे
आहे मनात आशा संभाव्य पालवीची (९)

एकच दुखरी हाक उराशी चिघळत आहे
त्यात खोलवर हळद स्मृतींची भरत राहते (१०)

तसा असतोस वस्तीला जरी तू काळजाकाठी
सुनेपण नेहमी डसते तुला भेटून येताना (११)

भरोसा रेखिशी भाळी नव्या ओढाळ स्वप्नांचा
म्हणे मी वेगळी दिसते तुला भेटून येताना (११)

धुमसतो अंधार आहे उग्र त्यातच रात्रही
आज माझ्या सोबतीला थांब ना रे पावसा (१३)

पाहण्या माझे बहरणे
तू जिवाचे रान केले (१५)

आसवे पुसायला दिला रुमाल तू
ठेवले घडीत मी जपून चांदणे (१७)

दिलेली लाट स्पर्शाची कुणा बेभान दर्याने
खुबीने टाळता येते, हवी तर माळता येते (१८)

असे सर्वस्व माझे तू मला सांगायचे होते
मनी दाटून येते ते कुठे उच्चारता येते (१८)

तुला म्हणून सांगते, गटांगळ्यांतली मजा
थरार आवडे मला, नकोच लाट आवरू (२०)

काळजाचे गुप्त रस्ते बोलवाया लागले
मज तुझे स्वप्नात येणे आवडाया लागले (२२)

बेरजा वजा तरी करू कशा जिण्यातल्या
शब्द तू कुठे दिलास हातचा धरायला (२८)

नवी रात ही नवा चंद्र हा

पुन्हा रान हे तुला मोकळे (३०)

मनात ठेवले तुला कुणास ना कळू दिले

जळू दिले स्वतःस अन तुलाच मोहरू दिले (३३)

खोल तळाशी गोष्टी दडल्या

तशाच तेथे राहू द्याव्या

दोन मनांच्या पुसून रेषा

मुकेपणाने समजून घ्याव्या (६८)

शब्द कुठले मी कशाला साठवू

मी कशाला अर्थ आशय आठवू

सर्व त्या कोलाहलांना टाळूनी

फक्त मी तर काळजाशी बोलते (८८)

असे बरेच आहे – जरूर वाचा.

दुसरा गझल संग्रह आहे सतीश दराडे यांचा –

कैदखान्याच्या छतावर

हाही संग्रह चांगल्या गझलांनी युक्त आहे. मानवी मनाच्या सूक्ष्म हालचाली अनुभवता – पाहता आल्याशिवाय अशा गझला लिहिता येणार नाहीत. त्यातल्या काही ओळी –

सांडले मी ऊन्ह माझे

डाग पडले सावलीवर (पान – १)

पारदर्शक जाहलो की काय मीही आतुनी

का बरे माझी पडेना सावली भिंतीवरी (३)

उन्हाच्या काढुनि खपल्या कशाला सावल्या शोधू (२७)

मी पिकांना गायला लावीन भजने
वाजवावी फक्त टाळी पावसाने (२९)

तालुक्याएवढी जिंदगी
लालसा मुंबई एवढी (३३)

वीट आयुष्या तुझा आला असा
ना हसावे ना रडावे वाटते (४१)

माझ्या समूळ नोंदी डोळ्यांत तुझ्या
मी नामशेष होईन इतके रडू नको (४५)

फुगतात का भिताडे याचा कयास घ्यावा
नुसताच पोपड्यांवर फासू नये गिलावा (५४)

मातीतुनी उगवलो मातीमधे मिसळलो
माझे मरून काही गेले न फार वाया (५५)

जरा बोल डोळ्यांत घालून डोळे
दिवा मालवाया पुरी रात्र पडली (६२)

फक्त तू चुंबन कपाळाचे न माझ्या घेतले
घेतले ठेवून माझे भाग्यही ओलीस तू (६३)

कधी काळी ढगाचाही खिसा मी कापला होता
कुण्या वंचीत ओढ्याचा घसा ओलावण्यासाठी (६४)

श्वासांतुनी अताशा उल्लेखिते मला ती
असतो म्हणावयाला मी दूर दूर नुसता (७५)

कुठलेही नाते नव्हते अखंड रिमझिमले
मी तुरळक भेटींवर जन्म फुलवला सारा (७६)

-- इथे फ्रेंडसना या चांगल्या ओळींचा आस्वाद घ्यायला मिळावा या हेतूने ही जरा सविस्तर पोस्ट दिली आहे.

धन्यवाद, Sureshkumar Vairalkar अण्णा !

--- ००० ---

एखाद्याच्या मते एखादी कादंबरी छापून छापून वाढवलेली (प्रत्येक पानावर बरीच मोकळी जागा सोडून) अशी असते तर दुसऱ्या एखाद्याच्या मते एखादी कादंबरी अडगळ भरून वाढवलेली असते. कादंबरीचा दर्जा हा पृष्ठसंख्येवरून ठरत नाही, हे सूज्ञ वाचक जाणतातच.

हे बोलायचे कारण म्हणजे, सध्या, गणेश विसपुते यांनी अनुवादित केलेली, ओरहान पामुक या नोबेल विजेत्या लेखकाची **' माय नेम इज रेड '** ही कादंबरी वाचतो आहे. हिच्यातली नावे आणि कथेतली गुंतागुंत माझ्या नीट लक्षात येई ना. पण, प्रत्येक पान लेखकाच्या सूक्ष्म मर्मदृष्टीने भरलेले आहे, हे समजत गेले ! आता त्या मर्मदृष्टीच्या संपर्कात राहात वाचायचे, असेच करतोय ! ग्रेट कादंबरीकार म्हणजे काय -- तर हे बघा -- ये है ग्रेट !

ही कादंबरी ४६७ पानांची आहे -- प्रत्येक पान समृद्ध !

--- 000 ---

प्रज्ञा दया पवार यांची कविता – ‘ हे चिरफाळलेलं नागडं ‘

प्रज्ञा पवार यांच्या खूप कविता मी वाचल्या आहेत, असे नाही. पण, ज्या वाचल्या आहेत त्यांवरून मला असे दिसते की त्या एकाच पठडीतल्या कविता लिहीत नाहीत. विद्रोही, स्त्रीवादी, व्यक्तिगत सुखदुःखांच्या अशा अनेक प्रकारच्या कविता त्या लिहितात. त्या अर्थातच सर्वच खऱ्या अभिव्यक्ती असतात. त्यांच्या जगण्याचे सर्व आयाम त्यांच्या कवितेत मुक्तपणे वावरतात. आता ‘ मौज ‘ दिवाळी अंकात आलेली त्यांची ‘ हे चिरफाळलेलं नागडं ‘ ही एक आणखीनच वेगळी कविता

आहे. कवयित्री या कवितेत तिच्या विविध पण मर्यादित असणाऱ्या आयामांचा मृत्यू घडवू इच्छिते. तिला असे काही अभिव्यक्त करायचेय की ज्याने इतर कुणाचेही जगणे विस्कटू नये. अंतर्बाह्य ‘ असणे ‘ जे असते ते, खरे तर, सर्वांचेच चिरफाळलेलेच असते, पण, तेही तिला दिसू द्यायचे नाहीय. तिच्या खाजगी आयुष्याबाबत कुणी काही अंदाज करावेत, असा मजकूरही तिला टाळायचा आहे. स्वतःच्या भावभावना वा स्वप्नीलपणा हे तिला उधळून लावायचेयत. म्हणजे मानवी संबंधांतला सामाजिक भाग आणि व्यक्तिगत भाग – हे दोन्ही ती तिच्या प्रखर भिंगाखाली घेते आहे ! ती म्हणतेय की तिला आत्महत्येचा एक निर्मम अनुभव लिहायचा आहे. आणि विशेष म्हणजे त्यातून तिला स्वतःला वजा करायचेय ! हा असा असणार आहे तो मृत्यू ! याबाबतीत मेंदूत येणाऱ्या ‘ विचित्र वासाच्या ‘ कल्पना वा सवयीचे अनिच्छाकेंद्रही नको आहे !

ही कविता, काही गट वा समूह यांनाच फक्त आवाक्यात वा विचारात घेण्याचे त्यागून सर्वच माणसांशी संबंध प्रस्थापित करणारी आहे. काही समूहांसाठी न्यायाचे, सन्मानाचे जगणे प्रस्थापित करू इच्छिणाऱ्या प्रतिक्रियात्मक कविता समर्थनीय असतातच, तरीही, ही कविता त्या मर्यादित क्षेत्राबाहेर झेप घेते. ही कविता बुद्धाच्या मानवी मूल्यात्मकतेला स्पर्श करते. कविता वाचून झाल्यावर कुणी म्हणेल, अजून लिहायचा आहे तो अनुभव – इथे नुसती इच्छा प्रदर्शित केलीय. तर तसे नाहीय ! हीच ती कविता, त्या तशा आत्महत्येचा तो निर्मम अनुभव व्यक्त करणारी ! पुन्हा वाचून पाहा.

प्रज्ञा पवारांची ही कविता मला अपवादात्मक वाटली – खूप महत्त्वाची वाटली.

मी काही समीक्षक नाहीय – एक बरा वाचक नक्कीच आहे. माझ्या मते मराठीत सध्या समीक्षक ही प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. एक तर गटबाज लोक आहेत किंवा आजूबाजूला पाहात, कोण काय बोलतेय याचा कानोसा घेऊन लिहिणारे भित्रट समीक्षक आहेत. त्यामुळे, आता आपण ‘ वाचक-समीक्षक ‘ हा प्रकार भरभराटीला आणायची गरज आहे. तसे इथे थोडेफार चित्रा राजेंद्र जोशी लिहीत असतात. त्यातून काही चांगले, समावेशक आवाक्याचे समीक्षकही तयार होऊ शकतील. वाचक-समीक्षक म्हणूनच मीही इथे लिहीत असतो.

ही कविता प्रज्ञा पवारांची न राहता आपली सर्वांची होवो, हीच सदिच्छा !

कविता अशी आहे --

हे चिरफाळलेलं नागडं

मी ठेवतेय सुरक्षित अंतर कवितेपासून

रोखतेय तपशीलांना अनवरत

टाळतेय संबंधिताना अडचणीत आणू शकतील

असे प्रश्नब अवघड

मला दिसू द्यायचं नाहीये

हे चिरफाळलेलं नागडं

आतलं बाहेरचं

बांधता येतील आडाखे खाजगी आयुष्याचे

असं काहीही लिहिणं निक्षून टाळते आहे मी

उधळून लावतेय

भावकवितेचे चिर-परिचित संकेत

कवयित्रीची एकात्म एकरेषीय प्रतिमा

मला लिहायचाय आत्महत्येचा एक निर्मम अनुभव

वस्तुनिष्ठ अलिप्तपणाने

तो नाहीये स्वेतर-बितर

माझा फक्त माझाच आहे तो

ज्यातून करायचंय स्वतःलाच वजा

वजा करायचं आहे

पंख्याला बांधून ठेवलेल्या

माझ्या आवडत्या हिरव्याकाळ्या स्टोलला

मी मरण्याआधीच बेडरूममध्ये पसरलेल्या

मृत्यूच्या विचित्र वासाला

मेंदूत उगवलेल्या अनिच्छेच्या केंद्राला

घोटीव अनघड खुंटीला

सहजीवनाच्या वगैरे

लिहायचाय मला

आत्महत्येचा एक निर्मम अनुभव

--- ००० ---

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे विभागीय साहित्य

संमेलन नुकतेच अहमदनगर येथे पार पडले.

ज्येष्ठ साहित्यिक **रंगनाथ पठारे** यांनी त्या

संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणाचा

संपादित अंश... – मुकेश माचकर यांच्या पोस्टमध्ये दिलेला वाचला. असा ऐवज जेव्हा सर्वांसमोर येतो तेव्हा तो आकलनसाठी आणि त्या विषयाच्या अनेक बाजूंचे भान येण्यासाठी सर्वांना खुला असतो. याच विचाराने थोडा सहभागी होत आहे.

१ चांगली साहित्यकृती – महाकाव्य – म्हणून पठाऱ्यांनी महाभारताचे उदाहरण दिलेले आहे. त्याचे कारण देताना त्यांनी असे म्हटले आहे की, बरे-वाईट, सुष्ट-दुष्ट वग़ैरे मूल्यनिर्णयाचे सर्व पदर त्यात खुले ठेवलेले आहेत. म्हणजेच निष्कर्षात्मक आकलन मांडलेले नाही.

२ आणखी उदाहरणे त्यांनी संत वाङमयाची दिलेली आहेत. ज्ञानेश्वर, तुकाराम, गालिब अशा कवींचे आपण वंशज आहोत, असे म्हटले आहे. त्यांना त्यांनी विशालहृदयी म्हणून मूल्यात्मकताही दिलेली आहे. त्यांचेही लेखन वैचारिक निष्कर्ष सांगण्यासाठी नव्हतेच – हे आपण जाणतोच. त्यांच्या लेखनाचा गाभा हा माणसाच्या समग्र जीवनाचा आवाका घेणारा होता आणि त्यामुळेच ते आजही प्रस्तुत ठरतात, हे उघडच आहे.

३ परंतु, पठाऱ्यांनी मांडलेली भूमिका ही याला पूरक नाही. वर्तमानकाळाला प्रतिक्रिया देणे, हे त्यांनी साहित्याचे प्रमुख कार्य मानलेले आहे. मुळात वर्तमान काळ असे एकच काही असते का, हा विवाद्य भाग सोडून देऊ. तरीही कोणतीही वैचारिक प्रतिक्रिया ही समग्र भानापेक्षा विशिष्ट व्यक्तीच्या वा समूहाच्या हिताला महत्त्व देणारी असते, हे नाकारता येत नाही. कोणतीही प्रतिक्रिया ही मर्यादित आणि संघर्षमय आणि पर्यायाने हिंसकच असते, हे पाहायला हवे. प्रतिक्रिया ही वर्चस्ववादीच असते. त्यामुळे, आपल्या विरोधातील प्रतिक्रियांचे दमन करायचा प्रयत्न करणे, हे तीत अध्याहृतच असते. माझी प्रतिक्रिया दमन झाली की मी स्वातंत्र्यासाठी ओरडायचे आणि दुसऱ्याची दमन झाली की त्याने ओरडायचे – हेच जगभर चालू असते. सर्व दुःखांचे, विनाशाचे, हिंसेचे मूळ या प्रतिक्रिया-गौरवातच असते. त्याला मूल्यात्मकता कशी बहाल करणार ?

-- सारांश, मूल्यात्मक नसलेल्या अशा वैचारिक मांडणीला मूल्यात्मक उदाहरणे देऊन इथे दिशाभूल होते आहे, असे मला दिसते.

--- 000 ---

माया पंडित

यांच्या कविता जबरदस्त आहेत ! कोणतेही लेबल न लावता थेट भिडणाऱ्या मानची अस्तित्वाच्या कविता ! या विद्रोही कविताही आहेतच -- पण, विद्रोहाला एक वेगळीच सशक्त भाषा देणाऱ्या अशा खास कविता आहेत !

(माया पंडित यांनी, त्या कोल्हापूरला असताना, प्रसन्न जी. कुलकर्णी या माझ्या मित्राच्या दिग्दर्शनाखाली माझ्या ' नातं ' या दीर्घांकात काम केले होते. त्याचा प्रयोग मी पाहिला नव्हता, पण, मी कोल्हापूरला गेलेलो असताना प्रसन्नने त्याची एक तालीम आयोजित केलेली होती. १५-२० प्रेक्षकही बोलावलेले होते. अत्युत्तम ! माया पंडित यांनी नंतर अभिनयाचा मार्ग सोडला असावा, असे दिसते. पण, कलेचा जागर डोक्यात सतत चालूच असणार !)

--- 000 ---

साध्या शब्दांतून अवाढव्य आशयाचे बुलडोझर
-- रवींद्र लाखे यांची कविता

आपले इथले मित्र रवींद्र लाखे यांच्या १७ कविता एकत्रितपणे ‘ नव अनुष्टुभ ‘ च्या नोव्हें-डिसेंबर ’१७ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या आहेत. या कवितांची बाह्य लक्षणे म्हणजे -- त्या अत्यंत साध्या वाटतात आणि त्यांत इंद्रियगम्य प्रतिमांची गर्दी दिसत नाही. आकारानेही त्या खूप मोठी जागा व्यापणाऱ्या नाहीत. सारखे जागतिक वा देशी घटनांचे संदर्भ किंवा आजच्या जीवनशैलीतले तपशील, हेही फारसे दिसत नाहीत. सांगीतिक लयही फारशी जाणवत नाही. थोडक्यात म्हणजे, दिखाऊ देखणेपणापासून लांबच राहणाऱ्या या कविता आहेत.

आणि तरीही, या कविता प्रचंड आशयघनतेचा प्रत्यय देणाऱ्या आहेत ! त्यामुळेच, कोणतीही कविता एका वाचनात पुरेशी पोचत नाही. पुन्हा वा पुन्हापुन्हा वाचावी लागते. म्हटले तर एखाद्या व्यक्तिगत अनुभवापासून वा जगण्याच्या एखाद्या कंगोऱ्यातून ही कविता सुरू झालेली दिसते, पण, असा एखादा अनुभव वाचकात परावर्तित करणे हा तिचा हेतूच नसल्याचे लक्षात येते. ही कविता कोणत्याही विशिष्टतेशी न थांबता त्या त्या क्षणीचे पूर्ण जगणेच कवेत घेऊ पाहते. ही प्रक्रिया सामान्यतः वाचकाच्या सवयीची नसते. या अर्थाने, ही कविता सवयीच्या जगण्यावर तिच्या अमर्याद आशयाचा बुलडोझर फिरवते ! या कवितांचा पूर्ण आशय त्यांच्या ओळींत वा शब्दांत मर्यादित होऊ शकणारा नसल्याने या कविता कायमच गूढ वाटत राहतात. साठलेल्या भूतकाळातून प्रतिक्रिया देणे हा या कवितेचा हेतूच नाही. सर्वस्वाने, जगण्यातल्या आत्ताच्या, या क्षणाचा आवाका घेण्याची ही प्रक्रिया आहे. या कवितांतून येणारी आशयाची आवर्तने आणि आधीच्या व नंतरच्या बाबींच्या गुणवैशिष्ट्यांचे एकमेकांत मिसळणे – ही या कवितांची खास कलात्मक बाजू म्हणता येईल. या, माणसाच्या जगण्यातल्या मूलभूत प्रश्नांच्या तत्त्वज्ञानात्मक-अध्यात्मिक आशयाच्या कविता आहेत. अशा कविता मराठीत अपवादात्मकच आहेत. इथे सविस्तर समीक्षण करण्याचा हेतू नाही. पण, या कवितांच्या अपवादात्मक

मूल्यात्मकतेकडे लक्ष वेधणे, एवढेच करायचे आहे. सांस्कृतिक परिपक्वता आणणाऱ्या या कविता आहेत. उदाहरणादाखल ही कविता बघा –

कासव

जागं असतं माझ्या एकटेपणातलं
रिकामपण
दिवसरात्रभर

पृथ्वी आपल्या पाठीवर
तोलून धरणाऱ्या कासवासारखं

कासव कुठलीही हालचाल
करू शकत नाही

समोर रिकामपणाचा समुद्र
आणि पृथ्वीनं लादलेलं एकटेपण

कासवाच्या एकटेपणातलं
भयाण रिकामपण
रोज अंगावर येतं माझ्या

माझा जीव
आवरून घेतो आपले
अक्षांश रेखांश
स्वतःच्या अंगाशी

मी स्थिर निश्चल राहतो फक्त
तोलून धरली जाते माझी पृथ्वी

मी रमतो कृतिहीन

माझ्या अंतर्मग्नतेत

-- अनेक मळलेल्या वाटा सोडून चिंतनात्मकतेने आपल्या चोख वाटेने जाणारी ही खरी कविता आहे !

--- ००० ---

INSANITY Beyond Understanding

(अनाकलनीय वेडेपणा) – बाजीराव पाटील.

आपले फेसबुक मित्र बाजीराव पाटील यांचे हे एक अचाट आणि अफाट पुस्तक आहे ! ते वाचून जो शहाणा होणार नाही त्याला गॉन केस म्हणून सोडून द्यावे लागेल. अमेरिकेतल्या एका व्यसनमुक्ती केंद्रात समुपदेशक म्हणून काम करताना त्यांना आलेले अनुभव आणि त्यांनी पाहिलेल्या अनेक मनोविकृतींच्या कहाण्या या पुस्तकात आहेत. निव्वळ आततायी, उद्रेकमय आणि अराजकी मनांचे जग !

महाराष्ट्रातल्या एका खेडेगावात वाढलेले हे बाजीराव पाटील कष्ट, चिकाटी आणि जिद्द यांच्या जोरावर अमेरिकेत पोचले आणि तिथे एक ख्यातनाम समुपदेशक झाले, हे खरोखरच प्रेरणादायक आहे ! त्यांचे सहकारी आणि रुग्ण यांच्या प्रेमामुळे ते हे पुस्तक लिहायला उद्युक्त झाले.

दारू आणि अनेक मादक द्रव्ये यांच्या विळख्यात सापडलेल्या अनेक व्यक्तींच्या या कहाण्या आहेत. त्यांतल्या ' सर्व काही व्यक्त करणाऱ्या ' संवादांमुळे त्या जिवंत, स्फोटक आणि जगण्याचे विदारक दर्शन घडवणाऱ्या झालेल्या आहेत. हे सगळे बारकाईने आठवून लिहिणे सोपे नव्हते. बाजीरावांच्या सखोल समजुतदारपणामुळे या सत्यकथांना अत्यंत मौलिक अशा ललित साहित्याचाही दर्जा प्राप्त झालेला आहे.

पुन्हा माणसात येण्याची इच्छा असलेल्या आणि ती इच्छाही हरवून बसलेल्या अशा व्यक्तींचे हे जग आहे. यांतल्या बऱ्याच व्यक्ती बेघर, बेसहारा आणि बेकार आहेत. काही स्त्रियांची उपजीविका वेश्याव्यवसायातूनच चालते आहे. कधीही तोल जाऊ शकेल, कधीही हिंसक होऊ शकतील, अशी ही माणसे आहेत. खुद्द बाजीरावांसारख्या समुपदेशकाचा अपमान करणे, त्यांना अत्यंत घाणेरड्या शिव्या देणे – असेही बेभानपणे वागणारी ही माणसे आहेत. अशा लोकांमध्ये स्वतःचा तोल संभाळून राहणे ही सखोल माणुसकीची एक अद्वितीय अशी साधना आहे – तपस्या आहे ! नुसते उपजीविकेचे वा पैसे

मिळवण्याचे काम म्हणून हे होऊच नाही शकणार. हृदयात सखोल करुणा असलेला माणूसच हे करू शकेल. हे सर्व वाचताना आपोआपच आपण बाजीरावांबाबत आदरभावनेने नतमस्तक होत जातो. यात क्वचित काही व्यक्ती तर एखाद्या तत्त्वज्ञाचा बाप वाटाव्यात अशा बुद्धिमान आणि बिनतोड वाद घालणाऱ्या आहेत. त्यांनाही बाजीराव कसे हाताळतात हे पाहून आपण थक्क होतो !

या पुस्तकातले बाजीरावांचे तिथल्या रुग्णांबरोबरचे संवाद ही एक शहाणपणाची अद्वितीय संपन्नता आहे ! किती तऱ्हांचे अनपेक्षित वागणे-बोलणे ! किती तऱ्हांच्या विकृती सहन केलेली आणि आता स्वतःही अनेक विकृतींना बळी पडलेली ही माणसे ! याला विकृतींचे एक विश्वरूप दर्शनच म्हणावे लागेल. अशा या जगातले बाजीरावांचे बोलणे-वागणे हे अनेक प्रकारे समृद्ध करणारे आहे. अशी व्यक्ती इथे फेसबुकवर आपली फ्रेंड म्हणून वावरते आहे, याला आपले भाग्यच म्हणायला हवे !

मी वाचलेल्या निवडक ग्रेट पुस्तकांपैकी हे एक पुस्तक आहे. यातला कण न कण स्वतः वाचला पाहिजे – निवेदनातून वा माहिती देण्यातून ते समजणे शक्यच नाही. यापुढचा काळ हा वाढत्या मानसिक समस्यांचा काळ असण्याची शक्यता अनेकदा व्यक्त केली जाते – त्या पार्श्वभूमीवर तर या पुस्तकाचे विशेष महत्त्व आहे. तोल गेलेल्या अशा व्यक्ती आता तुमच्या-आमच्या जीवनाचाही कधीही भाग होऊ शकतात – हे लक्षात घेता या बाबतीत आपले भान आणि सजगता वाढणे महत्त्वाचे आहे. ही महत्त्वाची कामगिरी पार पाडू शकणारे पुस्तक लिहिल्याबद्दल बाजीराव पाटील यांचे अभिनंदन आणि मनःपूर्वक धन्यवाद !

Bajeerao Patil

‘ नाभितून उगवलेल्या वृक्षाचं रहस्य ‘

(कथासंग्रह) – प्रणव सखदेव. --

प्रणवच्या या कथासंग्रहात एकूण आठ कथा आहेत. एखाद्या लेखकाचे मूल्य हे त्याने सर्वाधिक गाठलेल्या उंचीवरून करायला हवे -- तो कमी उंचीवर कसे किती खेळला यावरून नव्हे. या संग्रहातल्या पहिल्या सात कथा या ‘ ठीक ‘ या सदरात येणाऱ्या आहेत. त्यांतही समकालीन जगण्याचे विविध काप आहेत – किमान सफाई, मध्यमवर्गीय जगण्यातल्या मानवी संबंधांतले प्रश्न, ताण – हे सगळे आहे – तरीही, या कथांतून प्रणव त्याचा सर्वोच्च आवाका गाठतोय, असे वाटत नाही. ते, या संग्रहात शेवटी येणाऱ्या शीर्षक-कथेत मात्र घडताना दिसते. इतर सर्व कथांहून ही कथा खूपच अधिक ताकदीने लिहिलेली आहे !

‘ नाभितून उगवलेल्या वृक्षाचं रहस्य ‘ (यातला ‘ भी ‘ दीर्घ हवा, असे वाटते – नीट पाहून घ्यावे) या कथेत प्रणव, लेखक म्हणून खूप मोठा परिसर हाताळतो. लग्न नको असणे, मूल नको असणे, आपल्या आवडीने जगायचा हट्ट असणे – या पद्धतीच्या प्रश्नांतून सुरू होणारी ही कथा पुढे – असंख्य गोष्टींच्या परिणामांतून एखादी गोष्ट घडणे वा एखाद्या गोष्टीचे असंख्य परिणाम होणे – असा, तत्त्वज्ञानात्मक आवाका घेत जाते. एकच कथा अनेक दृष्टिकोणांतून मांडण्याचे ‘ राशोमान ‘ तंत्र सोडून ही कथा, कथेचा एकेक तुकडा वेगवेगळ्या पात्रांच्या ‘ पाहण्या ‘ तून मांडत जाते. यात, मग, ' काळा तलाव ' हेही एक पात्र बनते. या कथेत, प्रणव कथेचे नुसते वस्तुरूप अस्तित्व दाखवत नसून, जगण्याच्या एकूण रचनेतली अतर्क्यताच दर्शवतो आहे, असे वाटते. असे झाले म्हणून तसे झाले – ही एकरेषीय समजूत इथे निकालात निघते. (मोठमोठ्या कालखंडांची अशा सामान्यीकृत पद्धतीने एकरेषीय मांडणी करणारे इतिहासकार आणि भाष्यकार इथे आठवून पाहावेत !) या अतर्क्यतेला ही कथा स्पर्श करत असल्याने ही निराकरणहीन कथा ठरते. कुणाला कंडेम करावे वा कुणाचे गुणगान करावे, असे यात काही राहात नाही. अतितीव्र नाट्यमयता नसलेल्या अशा आधीच्या सात कथांच्या पार्श्वभूमीवर ही कथा थेट खुनाच्या घटनेपर्यंत जाते ! आणि प्रणव तशी ती जाऊ देतो !

नव्या लेखकांमध्ये प्रणव हा, एखाद्याच स्थिर दृष्टिकोणातून जगणे समजून घेता येणार नाही याचे भान असलेला लेखक व कवी आहे. ही काही सवयीतून येणारी व्यक्तिगत कुवत वा हुशारी नव्हे. ही समज सर्वांसाठी महत्त्वाची ठरू शकते आणि ती सर्वांची असूही शकते. अशी समज, क्वचित का असे ना, व्यक्त करणारा लेखक हा सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचा असतो.

--- ००० ---

द अदर सन

वाचनालयातून पुस्तक बदलायचे होते. या वाचनालयात मला हवी असणारी पुस्तके फारशी नाहीत. आहेत ती वाईट आहेत, असा याचा अर्थ नाही. सहज नजर टाकली आणि समोर दिसलेले ' विदेशी पडदा ' हे अमोल उकिडवे लिखित, मेनका प्रकाशनचे पुस्तक घेतले. तीन तीन पानांत एकेक चित्रपट कथा ! घरबसल्या अनेक गाजलेले जागतिक चित्रपट आपल्या मनाला स्पर्शून गेल्याचा बेश्ट अनुभव ! यात एक ' द अदर सन ' या एका पॅलेस्टाईन चित्रपटाची कथा आहे -- तीन पानांत मास्टरपीसचा अनुभव ! युद्धकाळात, एका इस्पितळात ज्यू आणि मुसलमान बाळे चुकून बदलली जातात -- आणि ते, पुढे, ती मुले अठरा वर्षांची झाल्यानंतर, एका मुलाचा रक्तगट तपासण्याच्या निमित्ताने लक्षात येते ! (पहिला प्रश्न, अर्थातच, त्या बाईने काही अनाचार तर केला नसेल ?) त्यानंतर शोध घेतला जातो आणि ती मुले बदलून घ्यायचे ठरते ! कट्टर शत्रुत्व असणाऱ्यांनी मुले बदलून घेणे ! तशाच शत्रुत्वाचे संस्कार झालेली !

या प्रकारात, नुसती एक ढाचा कथा म्हणून जे येते तेही डोळे उघडून देणारे आहे !

नुसती तीन पानी कथाही अशी ग्रेट असणारा हा चित्रपट जागतिक महत्त्वाचा ठेवा असणार यात शंकाच नाही !

--- ००० ---

एवढ्यातेवढ्याने भावना दुखावल्यामुळे एकमेकांच्या अंगांवर धावून जाणाऱ्या लोकांच्या या कमकुवत मनाच्या, अस्मिताग्रस्त ' पुरोगामी ' महाराष्ट्रात -- **' इतिहासाचा अंत '** अशा विषयावर बुद्धिप्रामाण्यवादातून लिहिणारा कुणी माणूस आला तर झेपेल का ? झेपणार नसेल तर बुद्धिप्रामाण्यवाद आणि वैज्ञानिक दृष्टिकोणाच्या गप्पा मारून उपयोग काय ? पुरोगामीपणाची भाषणबाजी वेगळी आणि पुरोगामी असणे वेगळे !

तरीही, अस्मिताहीन अशा निर्भीड आरोग्यपूर्ण विचाराच्या दिशेने जाणे कुणाला महत्त्वाचे वाटत असेल तर एक प्राथमिक तयारी म्हणून, आमचे मित्र चिन्मय धारुरकर यांनी अनुवादित केलेला आणि ' खेळ ' च्या ३९ व्या अंकात आलेला ' इतिहासाचा पुनर्विचार ' हा लेख वाचावा. " इतिहासात अनेकांचे हितसंबंध गोवलेले असतात " -- हे वाक्य पचवू शकणाऱ्यांनी तर तो अवश्य वाचावा.

(मी स्वतः जातिवंत इतिहास-द्वेष्टा असल्याने माझे हितसंबंध या लेखात खूपच गोवलेले आहेत !)

--- ००० ---

डाहाके यांच्या लेखावरील प्रतिक्रिया –

(मटा ‘ संवाद ‘ पुरवणी १० जून’१८ ला आलेला ‘ कविता आणि बांधिलकीची भूमिका ‘ हा लेख.)

मुळात डहाक्यांचा हा लेख अत्यंत निराशावादी आहे. ते काय म्हणताहेत, ते वाचा – “ ज्यांच्याकडे राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक सत्ता असते ते आदेश देतात. या सत्ता सुट्या सुट्या नसतातच, त्या एकवटलेल्या असतात : एका व्यक्तीच्या, एका गटाच्या, एका समूहाच्या, एका संघटनेच्या, एका पक्षाच्या ठिकाणी.सर्वत्र हुकूमत गाजवू पाहणारी एक विचारसरणी असते. तिला काउंटर करणारी, भिडणारी, प्रतिरोध करणारी दुसरी विचारसरणी असते. ही दुसरी विचारसरणी स्थापित झाली की ती पहिलीची जागा घेते. हे आजच्या कवींना सांगण्याची गरज नाही. अर्थातच पुन्हा पहिली किंवा तिसरीच विचारसरणी कार्यरत होऊ लागते. दोन्ही विचारसरणीपाळकांच्या घोषणाफलकावर मानवाचे

कल्याण, मानवाचा विकास हेच ध्येय असल्याचे लिहिलेले असते. प्रत्यक्षात कल्याण होते ते काही गटांचे हेही सर्वज्ञात आहे. हिटलर-मुसोलिनीचा फॅसिझम-नाझिजम असो की स्टालिन-माओचा साम्यवाद असो, महाकथने रचली जातात आणि कष्ट करणाऱ्यांच्या हाती केवळ करवंटीच येत नाही, त्यांच्या अत्यंत जवळचे, खाजगी जग आणि बाहेरचे जग भयाने, दहशतीने, असुरक्षिततेने भारलेले असते. " -- म्हणजे, हेच सतत चालू असते, यात फरक पडत नाही. याच विचाराला सुसंगत असा या लेखाचा शेवट डहाक्यांनी केलेला आहे – खैरलांजी चालूच राहणार – ती शतकांची युगांची व्हईल खैरलांजी जख्ख म्हातारी – अशा, कवितेच्या ओळीने.

इथे काही प्रश्न निर्माण होतात. मुळात, इतकी निराशावादी व्यक्ती परिवर्तनवादी असू शकते का ? अशा व्यक्तीला ' बांधिलकीची भूमिका ' असू शकते का ? परिवर्तनवादी असायलाच हवे किंवा तसे असणेच आदर्श, असे इथे सुचवायचे नाही आहे. खरे तर मानवी जगण्यातल्या असंख्य अवस्था आणि मनःस्थिती या सर्वांनाच साहित्यात मुक्त प्रवेश असायला हवा. दुसरे म्हणजे निराशावाद ही एक संज्ञा झाली. प्रत्यक्ष निराशावादाचे अस्तित्व माणसागणिक वेगवेगळ्या प्रकारचे असू शकते. आपण विज्ञानवादी आहोत, त्यामुळे, Genetic Psychology म्हणजे, जनुकीय मानसशास्त्र, ही एक ज्ञानशाखा म्हणून मान्यताप्राप्त आहे, हे आपण लक्षात घ्यायला हवे. कोणाच्याही स्वभावाच्या वा मूडच्या साच्यात इतर माणसांना कोंबून बसवायचा प्रयत्न करणे, हे अत्याचाराचे होईल.

यातूनच एक मुद्दा असाही स्पष्ट होतो की कोणत्याही काळात, कुणाचीही सत्ता असली तरी, सामान्य लोक अन्यायग्रस्तच राहतात. त्यामुळे, त्यांची बाजू घेत राहणे, हे कवीचे काम असते. कोणत्याही पिढीतल्या कवीचे हेच महत्त्वाचे काम असते ! म्हणजे काय ? हाच निरर्थक उद्योग कवीने पिढ्या न पिढ्या करत राहायचे ? हे तर त्या सिसिफसच्या खडकासारखे झाले ! त्याला एक मोठा खडक ढकलत डोंगरावर चढवत राहायची शिक्षा होती. शिखरावर पोचण्यापूर्वीच तो खडक गडगडत पुन्हा पायथ्याशी येई ! पुन्हा तेच – ढकलत राहणे ! त्या सिसिफसने, देवाच्या मते, काही अपराध केलेला होता म्हणून त्याला ती शिक्षा देण्यात आलेली होती, अशी ती कथा आहे. कवींना कोणत्या अपराधासाठी डहाके ही शिक्षा फर्मावत आहेत, ते समजत नाही. आणि कोणतीही माणसे वर्चस्वासाठी झटणारी आणि ते मिळताच इतरांवर अन्याय करणारीच असतात, तर हे कवी कोणत्या आकाशातून पडलेले असतात ? तेही त्या न्याय-अन्यायाच्या साखळीतलेच असणार ना ! (यात मला एक गोष्ट विशेष वाटली – ती म्हणजे, डहाके स्वतः कोणत्याही विचारसरणीशी समरूप होऊन तिची तरफदारी करत नाहीत !)

डहाक्यांचे म्हाणणे असे आहे की कवी हा बलात्काऱ्यांच्या, खुन्यांच्या बाजूचा असू नये. मला तरी असा कुणी कवी दिसलेला नाही की जो म्हणतो, " बलात्कार – वा होऊ देत, खून – फारच बेश्ट – मस्त ! " सामान्यतः असे कुणी नसते. कुणाचीही तडफड पाहून सामान्यतः माणूस हादरतो, त्याला वाईटच वाटते. कवीही, अगदी मग तो साधी चित्रपटगीते लिहिणारा का असे ना, असा संवेदनाहीन वा सॅडिस्ट नसतो. ती त्याची सकारात्मक भावना व्यक्त व्हायला हवी, असा

डहाक्यांचा आग्रह दिसतो. ते मात्र तसे होईलच असे सांगता नाही येणार. गालिबने मधुरा भक्तीच्या प्रेमकविता लिहिल्या, याचा अर्थ, ' मरू देत सगळे गरीब लोक ' अशा वृत्तीचा तो होता, असे नाही म्हणता येणार. या प्रकारात गंमतीचा भाग म्हणजे, डहाक्यांना बेकेटमध्येही ' भूमिका ' सापडते ! तो तर निरर्थकतेचा आणि व्यस्ततेचा जागतिक एक्का समजला जातो ! तो विषयहीन अशी जगण्याची समस्या (issueless predicament) व्यक्त करतो, असे त्यानेच म्हटलेले आहे. पण, कुणाला काय जाणवावे यावर कोण बंधन घालणार ? आपण ठरवले तर ' बीज भाजून केली लाही । जन्ममरण आम्हां नाही ।। ' या ओळींतही आपल्याला बांधिलकी सापडू शकेल ! मुद्दा तो नाही. अमुक आशय अमुक प्रकारे आलाच पाहिजे का – हा प्रश्न आहे. इथे आपण एक वेगळे उदहरण घेऊ. बुद्धाने प्रेत पाहिले. आपणही पाहतो. सामान्यतः येणाऱ्या प्रतिक्रिया, वाईट वाटण्याच्याच असतात. पण, बुद्ध तिथे थांबला नाही. त्याच्या मनात काही मूलभूत प्रश्न निर्माण झाले, त्यांचा त्याने शोध घ्यायचे ठरवले. त्याने तसे केल्यामुळे, त्याला दुःखी लोकांबद्दल बेफिकीर असणारा माणूस म्हणणार ? अशाच प्रकारे एखाद्या कवीची ' सामान्यतः येणाऱ्या प्रतिक्रियेहून अधिक ' अशी काही चिंतनशीलता जागी होऊ शकते. त्याला कुणीही बंदी नाही घालू शकत. ' साहित्य कलेपासून तत्त्वज्ञानाची फारकत होऊ नये ' अशा अर्थाचे सार्त्रचे एक वाक्य आहे, ते इथे आठवावे.

कविता म्हणजे नुसता क्रिया-प्रतिक्रियांचा खेळ वा अभिव्यक्ती, असे समजल्याने हे घोळ होतात. स्वतः डहाके कोणत्याही विचारसरणीशी समरूप होत नाहीत, असे या लेखावरून दिसते. मग, त्यांच्या प्रतिक्रियांचा पाया कोणता ? दुःखितांबद्दल वाईट वाटणे हाच ? असे वाईट वाटता कामा नये, असे कुणीच म्हणणार नाही, उलट तशी प्रतिक्रिया तर सामान्यच असते. मग, या लेखात मुद्दा काय आहे ? मला असे दिसते की डहाक्यांचा कल प्रतिक्रियेहून अधिक अशा चिंतनशीलतेकडे आहे, पण, आपण भूमिकेची तरफदारी करणारेही आहोत, असे त्यांना म्हणायचे आहे ! ही अवस्था नक्कीच असू शकते – ती नाकारायचा प्रश्नच नाही. त्याचप्रमाणे, उदाहरणादाखल, " Absurd is that which is devoid of purpose … Cut off from his religious, metaphysical, and transcendental roots, man is lost; all his actions become senseless, absurd, useless " -- Martin Esslin – The theatre of the absurd – page 23) असेही आकलन असू शकते, हे संवेदनशीलतेने समजून घ्यायला हवे.

कलेच्या, साहित्याच्या क्षेत्रात कुणाचाच हेकटपणा महत्त्वाचा ठरू शकत नाही, हाच या टिपणाचा सारांश.

-- चं. प्र. देशपांडे.

(ही प्रतिक्रिया मटा च्या २४ जून '१८ च्या अंकात आलेली आहे.)

--- ००० ---

' आपले वाङ्मयवृत्त ' चा मे'१८ चा अंक. यात वसंत आबाजी डहाके -- Vasant Dahake -- यांचा एक उत्तम लेख आहे -- **' एशरचा डोळा '**. एशर नामक चित्रकाराची चित्रे ' पाहण्याची ' डहाके सरांची प्रक्रिया मांडणारा हा लेख आहे. सर लिहितात, " एशरची चित्रं पाहत असताना वास्तव या संकल्पनेविषयी अनेक प्रश्न उपस्थित होतात. आभास, भ्रम, वास्तव, भ्रामक वस्तुस्थिती या संकल्पना परस्परांत मिसळून जातात. "

या अंकात मुखपृष्ठ, मलपृष्ठ आणि या लेखातही एशरची अनेक चित्रे आहेत. या सर्वच चित्रांबाबत या लेखात विवेचन केलेले आहे. डहाके सर स्वतः एक चित्रकार असल्याने त्यांचे अशी चित्रे ' पाहणे ' समजून घेणे ही एक सुसंधी आहे !

' आपले वाङ्मयवृत्त ' ला धन्यवाद !

(या चित्रांत डहाके कुठेही भूमिकेचा विषय काढत नाहीत !)

--- ००० ---

अवघाची संसार

-- कादंबरी – ले० रवींद्र पांढरे.

या लेखकांचे नाव प्रथमच माझ्या समोर आले ते या कादंबरीमुळेच. मराठीत हे कितपत कुणाला माहीत असतील याची शंकाच वाटते. साध्या पारंपरिक आणि सपक नावाची ही कादंबरी वाचली आणि मी अक्षरशः चकित झालो. मराठीतले हे एक महत्त्वाचे लेखक आहेत, हे मला मनोमन समजले ! फक्त १३७ पानांची ही कादंबरी मला अनेक कारणांनी महत्त्वाची वाटते. अध्यात्माचा प्रभाव, नीतीकल्पनांचा दबाव आणि नैसर्गिक अभाव यांतून एका छान साध्या कुटुंबाची होणारी वाताहात ही कादंबरी चितारते. सगळी माणसे, म्हटले तर साधे सरळ रूटीन जगणारी आहेत. कुणाला चांगले, वाईट, दुष्ट म्हणावे असे कुणीच नाही. तरीही कशा गुंतागुंती तयार होत जातात आणि त्याच कशा त्या माणसांची नियती बनतात याची सखोल समज ही कादंबरी व्यक्त करते. हिच्यावर आधारित असा ‘ घुसमट ‘ या नावाचा चित्रपट मराठीत येऊन गेला असे समजते. या कादंबरीच्या महत्तेला जागून आणि पेलून तो काढला असेल का याबद्दल मला दाट शंका वाटते. आणि ढोबळ कथांचा चाहता मराठी प्रेक्षक असे ‘ जीवनदर्शन ‘ स्वीकारू शकेल का, हीही शंका आहेच.

‘ मनोगता’ त लेखक काय म्हणताहेत ते पाहा – “ आध्यात्मिक पातळीवर चिंतन करण्याची माझी कुवत नाही. त्यामुळे चिंतनाला आपोआपच सामाजिक आशयाची डूब लाभली आणि एक स्वतंत्र सामाजिक कादंबरी लिहून झाली. “ मला जाणवले ते असे की या लेखकाकडे अत्यंत सखोल आणि परिपक्व चिंतनाची कुवत असून ही कादंबरी आध्यात्मिक वा सामाजिक नसून एक परिपूर्ण अशी ‘ मानवी ‘ कादंबरी आहे. म्हटले तर हे सगळे घडते एका लहान खेड्याच्या परिसरात. तिथल्या मर्यादित अनुभवविश्वात. पण, लेखक जर मानवी जगण्याची ‘ समज ‘ असलेला असेल तर या मर्यादित अनुभववस्तूतूनही तो केवढा अमर्याद आवाका घेऊ शकतो, याचे हे उदाहरण आहे. ही ‘ समज ‘ व्यक्त करणारी

ही कादंबरी आहे. कथा, अनुभव – ही निमित्ते आहेत. इथे लेखक स्वतः कुठल्याही पात्रात वा ताणात गुंतत नाही आणि त्यामुळे – पर्यायाने, वाचकालाही तो तसे गुंतू देत नाही. साध्या तृतीय पुरुषी निवेदनातून साधली जाणारी ही किमया अजब म्हणावी अशी अद्वितीय आहे. माणसे, त्यांचे रूटीन, तिथला निसर्ग यांचे सहज, प्रत्ययकारी चित्रण हे या अभिव्यक्तीला समृद्धी देणारे वैशिष्ट्य आहे. आणि भाषेला असलेला खानदेशी गोडवा ! अत्युत्तम ! ही भाषा वाचायची सवय नसल्याने मला वाचनाचा वेग कमी ठेवावा लागला, पण, अशा एका महत्त्वाच्या कलाकृतीच्या संपर्कात आपण आहोत, याच्या आनंदासाठी ते आवश्यक होते.

सविस्तर परीक्षण वा समीक्षण करण्याचा हेतू नाही. पण, चाललेल्या कथानकाबरोबरच वाचकाच्या मनात आणखी खूप विचार चालू राहावेत, अशी ही एक ताकदवर ‘ भरपूर ‘ कादंबरी आहे. अपवादात्मक महत्त्वाची ! श्रीविद्या प्रकाशनाचे अभिनंदन !

--- ००० ---

अतुल पेठे

हा माझा मित्र एक उत्तम दिग्दर्शक असून त्याने दोनदा दिग्दर्शित केलेले बेकेटचे ' वेटिंग फॉर गोदो ' मी पाहिलेले आहे. ते त्याचे अतिशय प्रगल्भतेचे काम म्हणून माझ्या लक्षात आहे. ' रंगवाचा ' च्या ऑगस्ट २०१८ च्या अंकात अतुलचा अभिनेत्यांशी ' नाट्यसंवाद ' आलेला आहे. अभिनयाच्या क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्यांसाठी धर्मलेखच ठरावा असा हा लेख आहे. सर्वच नाट्यकर्मींनी वाचावा असा हा एक मौल्यवान लेख आहे.

नाट्यशिबिरे घेणाऱ्यांना आणि सर्वच नाट्यकर्मींना अत्यंत उद्बोधक ठरू शकणारा हा लेख लिहून अतुलने एक महत्त्वाचे काम केलेले आहे !

--- ००० ---

समीक्षक भालचंद्र नेमाडे

-- लेखक – सुधीर रसाळ – पाने ११५ – राजहंस प्रकाशन.

या पुस्तकाचे परीक्षण वा समीक्षण करण्याची माझी कुवत नाही, हे आधीच सांगतो. दोन विद्वानांच्या या लढतीत आपण पडणे म्हणजे आपले हातपाय मोडून घेणे, एवढे मला साहित्यातले समजते. नेमाड्यांच्या विद्वत्तेतल्या त्रुटी, आहे ती विद्वत्ता वकिली पद्धतीने काहीही सिद्ध करण्यासाठी वापरण्याची त्यांची पद्धत आणि तर्कशुद्धतेचा अभाव हा अपशब्द,

शेरेबाजी, उपहास आणि उपरोध यांनी भरून काढण्याची त्यांची सवय -- हे सगळे उघडे पाडण्याचे काम या पुस्तकात झालेले आहे. या पुस्तकाच्या निमित्ताने, देशीवाद, वैश्विकता, इकडचे वा तिकडचे वाद, मूल्यमापनाची प्रमाणके या विषयांवर आपले काही आकलन मांडावे, या हेतूने ही पोस्ट लिहीत आहे. त्यानंतर, ' आहे ऐसा देव ' या तुकारामाच्या अभंगाचे जे अर्थ लावले जातात त्याबद्दल थोडे बोलायचे आहे.

माणसांच्या जगण्याचे आणि प्रभावयुक्ततेचे (conditioning चे) असंख्य प्रकार आहेत. निरनिराळे देश, धर्म, भाषा आणि सांस्कृतिक संचित असे अनेक आयाम त्याला असणार. शिवाय आनुवंशिक वा जनुकीय प्रभावही असणारच. यात आणखी एक महत्त्वाचा आयाम सामान्यतः विसरला जातो. तो म्हणजे आपल्या अनुभवात वा अभ्यासात नसलेल्या गोष्टींचेही आपल्यावर असणारे प्रभाव. सार्त्रचा किंवा काफ्काचा जगावर प्रभाव आहे असे आपण म्हणतो, त्याचा अर्थ असा असतो की मानवी मनाला कुठेही काहीही जे दिसते, सुचते, भावते, समजते – ते सर्व पूर्ण मानवाला प्रभावित करत असते. सगळीच मने, फक्त मनेच काय, यच्चयावत सर्व वस्तुमात्र सतत एकमेकांवर परिणाम करत असते. या अर्थाने सर्व मानवी मन आणि सर्व जगच एकत्र जगत असते. देशीवादाच्या अंगाने विचार करताना यात जणू अधिक प्रभावी, अधिक मूलभूत काही असते, असे समजून विचार केला जातो. नुसते भारतात म्हटले तरी भौगोलिक प्रचंडतेमुळेही निव्वळ खूप वेगवेगळ्या प्रभावयुक्तता संभवतात. अनेक भाषा, जाती, शहरे, खेडी, गरीब, श्रीमंत असे अनेक नमूने असतात. प्रत्येक व्यक्तीची प्रभावयुक्तता वेगळी असते, हे लक्षात घेतले तर प्रत्येक माणूस हा एक बेट असतो. एका बाजूला तो सामाजिक परिणामांनी बद्धही असतो आणि दुसऱ्या अर्थाने सर्व समाजापासून तुटलेलाही असतो. त्यामुळे, व्यक्तिगत आणि सामाजिक अशा भेदावर आधारित विचार करणे निरुपयोगी असते. तरीही एका एका समूहाचे काही सामान्य गुणधर्म काढून देशीवादाचे बोलणे चालूच ठेवता येते. एक साधी गोष्ट आहे की प्रत्येक माणसाची काही ना काही प्रभावयुक्तता असतेच. ती अमुकच प्रकारची असली पाहिजे, असा आग्रह धरता येणार नाही. हा आग्रह धरला जाण्यात एक मूलभूत चूक असते ती ही की प्रभावयुक्ततेचेच दर्जे असतात वा अमुक प्रभावयुक्तता अधिक मौल्यवान असते असे समजणे. साहित्याच्या वा कलाकृतीच्या प्रभावयुक्ततेच्या नमून्यातच मूल्यात्मकता दडलेली असते असे समजणे. या मार्गाने मग, लेखक ग्रामीण आहे की शहरी आहे, खालच्या वर्गातला आहे की वरच्या – एवढे पाहूनच प्रमाणपत्रे वितरित केली जाऊ शकतात. कोणत्याही काळात काय किंवा आता तर जागतिकिकरणानंतरच्या काळात विशेषत्वाने काय, लेखक कशा, कोणत्या प्रभावयुक्ततेने लिहील हे सांगता येणार नाही. प्रभावयुक्ततेच्या नमून्यात मूल्य असते ही कल्पना सोडून देणे हे महत्वाचे आहे. ती चूक सुधारली नाही तर समीक्षेचे क्षेत्र कायमच खुजे आणि गोंधळलेले राहील.

आता वैश्विकतेचा मुद्दा पाहू. कोणताही लेखक, त्याची प्रभावयुक्तता व्यक्त करणे एवढेच काम करत असेल तर तो वाचकांना पोचणे अवघड होईल. त्याने कथनात्मक, निवेदनात्मक, करमणुकीचे असे क्षेत्र निवडले तर कदाचित जमून जाईल. यातली मुख्य गोष्ट ही आहे की प्रभावयुक्तता कोणतीही, कशीही असली तरी मनाचा वापर होण्याची पद्धत जगभर

एकच आहे. राग, लोभ, सूड, सुखेच्छा, वर्चस्वाची इच्छा – हे सगळीकडे तेच तसेच असते. कोणत्याही साहित्यकृतीच्या संपर्कात येताना त्या त्या लेखकाच्या प्रभावयुक्ततेत असणारे तपशीलांचे वेगळेपण समजून घ्यावेच लागते. परदेशांतल्या साहित्यासाठी कदाचित अधिक परिश्रम घ्यावे लागतील. आणि इतके करूनही ती प्रभावयुक्तता, तिचा पोत, तिचा दाह, पेच हे सगळे पूर्ण समजेलच, असे नाही. मग, महत्वाचे काय असते ? मानवी मनाच्या वागणुकीने निर्माण होणारे असंख्य गुंते आणि त्यांचे परिपूर्ण भान व्यक्त होणे. कोणत्याही प्रभावयुक्ततेत वैश्विकता नसते तर ती या समावेशक भानात असते. कारण ते भान, प्रभावयुक्तता कशीही असली तरी पूर्ण मानवी जगण्यालाच प्रस्तुत असते. ते भान प्रभावयुक्ततेचा भाग नसून प्रभावयुक्ततेच्या निरपेक्ष असते.

थोडक्यात लिहायचे म्हटले तरी बरेच झाले. आता फक्त तुकारामाच्या एका विवाद्य अभंगाबद्दल बोलू या. त्यातल्या पहिल्या दोन ओळी अशा आहेत --

आहे ऐसा देव वदवावी वाणी ।

नाही ऐसा मनी अनुभवावा ।।

-- या ओळींचा आधार घेऊन नेमाडे, तुकारामाने निरीश्वरवादही व्यक्त केला होता, असे म्हणतात. आणखी एक विद्वान डॉ. आ. ह. साळुंखे तर तुकाराम नास्तिकच होता हे सांगण्यासाठी या ओळी वापरत असल्याचे वाचले होते. या दोन ओळींमुळेच अनेकांचा घोटाळा होतो, असे दिसते. याबद्दल मला काय वाटते, ते सांगतो. ‘ असणे ‘ ही होकारात्मक अभिव्यक्ती आहे आणि ‘ नसणे ‘ ही नकारात्मक. देव आहे असे जरी आपण होकारात्मक म्हणत असलो तरी त्याचे प्रत्यक्ष अस्तित्व नकारात्मक आहे. ‘ रिकामीक ‘ आहे. ‘ तुका करी रिता ठाव । त्यांसी बैसावया वाव ‘, ‘ मजहून नष्ट आहे ऐसा कोण ‘, ‘ अहो पंडितजन । तुका टाकावा थुंकोन ‘, ‘ मागेपुढे अवघा दिसे रिता ठाव ‘, ‘ तुका म्हणे पोते । देवे भरिले नव्हे रिते ‘, ‘ देह निवेदुनि पायीं । जालों रिकामा उतराई ।। ‘ – असे बरेच सापडेल. जे कृष्णमूर्ती, ओशो वा आणखीही काही संत या रिकामेपणाबद्दल (emptiness) बोलतात. सारांश, हा निरीश्वरवाद नसून ‘ देव ‘ या शुद्ध अनुभूतीचे हे वर्णन आहे. हे लक्षात घेऊन या अभंगाच्या पुढील ओळींचा अर्थ लावला पाहिजे.

धन्यवाद !

--- ००० ---

आपल्या समाजात विनोदबुद्धीची कमतरता असल्याने असहनशीलता वाढत आहे -- असे निरीक्षण औरंगाबाद खंडपीठाने अलिकडेच नोंदवले आहे. यावरचा, श्रीकांत बोजेवारांचा एक चांगला लेख -- ' विनोदबुद्धीचे वावडे ' -- हा आजच्या पुणे मटात वाचा.

विनोदाशिवाय दुसरे काही चालतच नाही अशा मराठी माणसाबद्दल हे असे निरीक्षण ? पुरुषाला लुगडे नेसवून यावरही विनोद करून जल्लोषी हसल्याशिवाय आता हा समाज राहणार नाही !

" दैनंदिन व्यापताप आणि ताणतणाव यांनी तू त्रासलेला, थकलेला असतोस -- रात्री थोडी करमणूक घे करून आणि झोप " -- असे पटवून दिला गेलेला हा सुहास्यवीर, अस्मितायुक्त, दुखावल्या जाण्यास सदोदित उद्युक्त अशा भावनांचा, गौरवशाली इतिहासाचा पुरोगामी प्रांत आहे !

उसकी ये हालत ?

--- 000 –

वास्तव आणि फिक्शन

संजय भास्कर जोशी संपादित ‘ साहित्य सूची ‘ च्या यंदाच्या दिवाळी अंकात, ‘ एकविसाव्या शतकातील कथात्म साहित्य ‘ हा एक महत्त्वाचा परिसंवाद आलेला आहे. जगण्यात उत्तर-आधुनिक अवस्था आणि जाणिवा कशा तयार होतात याचे दर्शन या परिसंवादात घडते. आपण आपापले छोटे छोटे किल्ले घट्ट धरून बसून काही उपयोग नसतो. जगण्याच्या आव्हानांपुढे ते फारच थिटेही असते. इथे त्या परिसंवादातल्या सर्वच मुद्यांवर लिहिण्याचा विचार नाही. पण, कदाचित सर्वच मुद्दे कव्हर करणाऱ्या अशा एका कळीच्या मुद्याबद्दल बोलणार आहे. कुणाच्या विरुद्ध बोलणे वा एखादी बाजू मांडणे, असा कोणताही अभिनिवेश यात नाही. निव्वळ विचारासाठी म्हणून माझे आकलन व्यक्त करत आहे.

तो कळीचा मुद्दा वास्तवाचा आहे. वास्तव खूप वेगाने वाढत आणि बदलत असल्याने त्याचे आकलन करून घेणे आणि कलेतून ते व्यक्त करणे अशक्य होत आहे, हा तो मुद्दा आहे. मागे जयंत पवारांनीही म्हटले होते की कलावंताला ते वास्तव समजेपर्यंत ते जुने होते आहे, तर ते व्यक्त करून उपयोगच काय किंवा त्याला अर्थ तरी काय ? माझ्या मते हा एक बौद्धिक प्रश्न आहे. वस्तू वेगळ्या आणि वास्तव वेगळे, हे लक्षात न घेण्याचा आहे. संगणक, मोबाईल, मॉल, मल्टिप्लेक्स या वस्तुरूप गोष्टी आहेत. आजचे राजकारणही त्या अर्थाने वस्तुरूपच आहे. पण, ‘ आजचे वास्तव ‘ असे काही अस्तित्वातच नसते. प्रत्येकाचे वास्तव हे त्याच्या त्याच्या मानसिक घडणीप्रमाणे वेगवेगळे असते. त्यामुळे, त्या त्या वास्तवाला येणाऱ्या प्रतिक्रिया वेगवेगळ्या असतात. वास्तव म्हणजे प्रतिक्रिया. ते सर्वांना सामान्य वा एकच असे असूच नाही शकत. बौद्धिकतेचे आणि तथाकथित विवेकाचे महत्त्व माजवणाऱ्यांनी वास्तव हेच अंतिम सत्य मानले. शास्त्र व तंत्रज्ञान हे विषय सोडता कोणत्याही मानवी संबंधांत एकच एक असे समान वास्तव असूच शकत नाही, इकडे दुर्लक्ष झाले वा हेतूपूर्वक

करण्यात आले. त्यामुळे, कला म्हणजे वास्तवाची म्हणजे प्रतिक्रियांची अभिव्यक्ती असा भ्रम दृढ होत गेला. आपल्या सांस्कृतिक क्षेत्राची वाट लागण्याचे हेच मुख्य कारण आहे.

कलेतली अभिव्यक्ती म्हणजे वास्तव नसून फिक्शन असते हे विसरले गेले. काय फिक्शन म्हणजे ? फिक्शन ही मनाची प्रतिक्रियारूप अवस्था नसते. ती वास्तवाच्या विदीर्णतेचा भाग नसते. ती वास्तवाचा अपुरेपणा, विदीर्णता आणि भ्रामकता यांचे भान असते. कलेतल्या या फिक्शनला हद्दपार केले गेल्याने बांधिलकी, भूमिका यांचे स्तोम माजले. जगण्याचे समग्र अवधान हे कोणत्याही बांधिलकीपेक्षा मौल्यवान, सर्जक आणि जीवनदायी असते, हे गाडून टाकण्यात आले. त्यामुळे, वास्तवकेंद्री सर्व कलावंत गोंधळून जाण्याची वेळ आली. विचारसरण्या, भूमिका यांचा तर ऱ्हास झालेला आहे, मग मी कशासाठी, काय लिहितोय, अशा प्रश्नांनी ते भंजाळून गेले. फिक्शन फक्त कलेतच असते, असे नाही. जगण्यातही असते. वास्तव म्हणजे सत्य आणि फिक्शन म्हणजे असत्य वा भ्रम, असल्या निर्बुद्ध कल्पनांमुळे कलाक्षेत्राचे वाटोळे होत गेले आणि होत आहे.

कला म्हणजे वास्तव नव्हे तर फिक्शन – हे समजण्याची नितांत गरज आहे. अन्यथा कलेतूनही अस्मितांचे आणि विध्वंसाचेच पीक निघत राहील !

--- ००० ---

Avinash Gaikwad अविनाश गायकवाड यांच्या ‘ खिंडीत गोठलेलं सुख ‘ या कवितासंग्रहाचे आसाराम लोमटे यांनी केलेले **‘ समष्टीचे विधान ‘** हे परीक्षण आज दिनांक १८-११-१८ च्या लोकसत्तेत आलेले आहे. परीक्षण वाचल्यावर, हा संग्रह ताकदवर असणार हे लक्षात येते. त्याबद्दल, अर्थातच माझे मित्र गायकवाड यांचे मी अभिनंदन करतो ! वस्तुतः काळाचा महिमा पाहता, एवढेच लिहून थांबायला हवे. पण, मी तसे करणार नाही. गायकवाड जर मैत्रीत कधी कधी मला काही खोचक प्रश्न विचारत असतील तर त्याच मैत्रीत मलाही तो तसा अधिकार मिळतो, असे मी समजतो. (शिवाय, गायकवाड आणि संतोष पद्माकर यांनी त्यांच्या कॉमेंटसमधून मला लिहायला उद्युक्तही केलेले आहेच.) हे सगळे आरोप-प्रत्यारोप अशा निरुपयोगी मार्गाने न जाता यावर खुली चर्चा व्हावी.

१. शोषिताने शोषकाबद्दल संताप बाळगणे ही नैसर्गिक प्रतिक्रिया आहे. एवढ्यावरच कला थांबावी का ? कला म्हणजे, राग-लोभ-प्रेम-क्रोध-द्वेष वगैरे व्यक्त करत राहणे, इतकेच असते का ?

२. व्यवस्था म्हणजे काय ? काही लोक शोषक, विषमतावादी, असंवेदनशील, क्रूर असणे आणि काही लोक शोषित, समतावादी, संवेदनशील आणि मायाळू असणे – म्हणजे व्यवस्था का ? मुळात या दोन गटांतल्या लोकांच्या मनांमध्ये काही मूलभूत फरक असतात का ? एकूणच ही व्यवस्था घडते कशी ? दुष्ट आणि सुष्ट लोकांची ही विभागणी कशामुळे होते

? नियतीमुळे की प्रारब्धामुळे की मागच्या जन्मातल्या पापपुण्यांमुळे की आत्ताच्या – या जन्मातल्या आपल्या मन वापरण्याच्या पद्धतीमुळे ? मुळात एकूण मानवी मनांत काही मूलभूत फरक नसतील तर काही माणसे वर्चस्ववादी कशी होतात ? बाकीच्यांना वर्चस्ववादी व्हायचे नसते का ?

३. चांगल्या व्यवस्थेची आपली कल्पना संतत्वाच्या गुणांशी वा बुद्धाने सांगितलेल्या मार्गाशी जुळणारी असते. तसे घडू शकेल असे खरेच आपल्याला वाटते का ? की आहे त्याच वर्चस्ववादी मनाने ती स्वर्गीय व्यवस्था जन्माला घालता येईल, असे वाटते ?

४. चांगली व्यवस्था कशी हवी ते समजा सगळ्यांना कळते आणि पटतेही. समता हे तर मूल्य म्हणून पूर्ण मानवजात स्वीकारते. मानवी हक्क ही तर खूपच प्रचारात असलेली गोष्ट आहे. तरीही, यात चांगले बदल तर होतच नाहीत तर उलट, व्यवस्था अधिकाधिक किडत, बिघडत, सडत जाताना दिसते – असे का होते ?

५. जातीच्या वा धर्माच्या वा भाषेच्या वा पक्षाच्या पायांवर टोळ्या करून शक्तिप्रदर्शन करत राहावे, असे माणसाला का वाटते ? अशा शक्तींच्या प्रभावांतून काही स्वार्थ साधले जातात की नाही ? हे सगळे चालू ठेवून व्यवस्था बदलू शकेल का ?

६. बाजार, जागतिकिकरण, भांडवलशाही, मालकी हक्क, वर्चस्ववाद – हे सगळे समजा वाईट आहे – धिक्कारण्यायोग्य आहे, तर नवी व्यवस्था आणायची म्हणजे काय करायचे ? आता जे शोषित आहेत त्यांची सत्ताही आज ना उद्या येईल समजा – तर ती नवी चांगली व्यवस्था असेल का ? माणसाचे मनच जर भ्रष्ट होणारे, अमानुष होणारे असेल तर असे मन नवे काय घडवू शकेल ?

७. आताचे शोषित पुरुष स्त्रियांशी समतेने वा न्यायाने का वागू शकत नसतील ?

-- असे आणखीही अनेक प्रश्न विचारता येतील. हे प्रश्न कलावंताच्या चिंतनात असायला हवेत की नकोत ? आपापल्या पद्धतींनी प्रतिक्रिया देत कुणी नक्शली, कुणी अतिरेकी, कुणी तालिबानी वगैरे होताहेत – ते सगळे बरोबर समजायचे का ? – यावर मित्रवर्य गायकवाडांचे काय विचार आहेत, ते समजून घ्यायला या निमित्ताने संधी आहे. त्यांनी यावर बोलावे, ही विनंती.

--- ००० ---

आलोक – ले० आसाराम लोमटे – शब्द प्रकाशन.

नोकरी करत आणि स्वतःचे वाचन-लेखन करत असा मी साहित्य क्षेत्रात वावरत आलो. त्यामुळे, व्यापक वाचन झाले नाही. याचा परिणाम म्हणजे एखादा महत्त्वाचा लेखक मला खूप उशिरा माहीत होतो आणि मी चकित होतो ! आसाराम

लोमटे यांचा हा कथासंग्रह वाचून मी याच पद्धतीने नतमस्तक झालेलो आहे. आता इतक्या उशिरा मी काही बोलण्यात अर्थच नाही, हे समजूनही, या लेखकाला सलाम करावेसे वाटतेय, ते व्यक्त करतोय.

या कथांचा माहोल – कच्चा माल – अनुभव-क्षेत्र सगळे ग्रामीण जीवनातले आहे. पण, म्हणून ' ग्रामीण कथा ' अशा बंधनात अडकवण्यासारख्या या कथा नाहीत. या सर्वच माणसांच्या जगण्याला प्रस्तुत असणाऱ्या अशा ' माणसांच्या ' कथा आहेत. अत्यंत सूक्ष्मपणे मानवी जगण्याचा सर्वव्यापी आवाका घेण्याची या लेखकाची कुवत निव्वळ अद्वितीय आहे ! यात काहीशा दीर्घच म्हणाव्यात अशा स्वरूपाच्या सहा कथा आहेत. सर्वच कथांमधून लेखकाची समजूत आणि मानवी जगण्याकाडे एका व्यापक करुणेने पाहणे, हे जाणवत राहते. कमकुवत माणसांना बलवान लोकांनी जगणे हराम करण्याचे अनेक प्रकार या कथांतून जाणवतात. हे एकूण माणसाचेच जगणे आहे. याचे इथे असे सर्वांगीण भान व्यक्त होते की त्या भानात आपण या सर्वांतून बाहेर, स्वतंत्र आहोत, असे वाटावे. मी खूप सविस्तर काही लिहिणार नाहीय. ज्यांनी लोमट्यांच्या कथा वाचलेल्या नसतील त्यांनी त्या मिळवून वाचाव्यात, एवढेच मी म्हणेन. यातल्या ' वळण ' या कथेत लेखकाची जरा फसगत झाली आहे, असे वाटले. त्या मुलीला शाळेतून काढल्यामुळे, तिने साक्ष देण्याचा प्रश्न कसा सुटू शकतो, हे कळले नाही. पण, या अर्थाने ही एक फसलेली कथाही लेखकाचे सामर्थ्य दाखवतेच.

या पुस्तकाच्या परिशिष्टात लोमट्यांनी त्यांच्या लेखन प्रक्रियेबद्दल लिहिले आहे. तो लेखही मराठीतला एक महत्त्वाचा लेख ठरावा. असे आणखीही काही लेखकांनी वा कवींनी स्वतःच्या लेखन प्रक्रियेबद्दल गंभीरपणे लिहिलेले आहे (उदाहरणार्थ, मीही). असे काही निवडक लेख एकत्र करून एक पुस्तक निघावे, असे वाटले. लोमट्यांनी या लेखात त्यांचे जे मानवी जगण्याकडे ' पाहणे ' व्यक्त केलेले आहे, ते खूपच मौल्यवान आहे.

या निमित्ताने आसाराम लोमटे यांना सविनय सलाम !

--- ००० ---

उगी उगी मर्दानगी -- Satish Tambe

' अक्षर ' दिवाळी अंकात आलेली, आपले मित्रवर्य सतीश तांबे यांची ही कथा वाचली ! इथे उद्गार चिन्ह टाकले कारण मला ती कथा खूपच आवडली. आणि मला वाटते की ही नुसती व्यक्तिगत आवड नसावी. ही कथा अमुक एका बिंदूपर्यंत येऊन संपणे म्हणजे जगण्यातल्या सर्व गुंतागुंतींची एक छोटी गोळी करून फेकून देणे वाटते. एक छान मोकळेपणाचा उत्तुंग फील ही कथा निर्माण करते. त्यांच्या पात्रांच्या सुखदुःखांत वाचकांनीही सामील व्हावे असा काहीही प्रयत्न तांबे करत नाहीत. म्हटले तर हे एक साधे, रूटीन निवेदन वाटते, पण यात खच्चून भरलेला जो ड्रामा आहे तो कथाद्रव्य पूर्णपणे अपरिचित आणि अनपेक्षित असण्यातला आहे. अत्यंत अपवादात्मक वाटणारे हे जगणे तांबे इतक्या बारकाईने आणि

सूक्ष्मपणे पाहात जातात की जणू गाता गाता लता मंगेशकर वाटेतल्या सर्व जागा, वळणे-वाकणे भरत चालल्या आहेत ! लेखनावर हुकमत ही निव्वळ भाषिक वा तांत्रिक गोष्ट नाही – मुख्यतः ती आशयाबद्दलची क्लॅरिटी – स्वच्छ समज – भान असते. हे जमणारा लेखक जगण्याच्या प्रवाहात सहज पोहणारा असतो. तांब्यांची ही कथा त्या सहजतेचा प्रत्यय देणारी आहे. आपल्या व्यक्तिगत आवडी-निवडी, नीती-अनीतीच्या कल्पना, चांगले जगणे म्हणजे काय याचे ठोकताळे – हे सर्व किती फिजूल आहे याचे भान ही कथा देते. ही कथा परिचिताशी फटकून वागणारी या अर्थाने फँटसी असली तरी तांबे ती एक वास्तववादी निवेदन या स्वरूपात सांगतात. आधुनिक कथेतली अतिवास्तव अनाकलनीयता वा कल्पनेला खूप काम देणारा गुंतागुंतीचा घाट यांची या कथेला गरज पडत नाही. त्याशिवायही ‘ सांगण्यासारखे ‘ जे आहे ते सर्व ही कथा वाचकाला सहज पोचवते.

ही काही निवडक अपवादात्मक व्यक्तींची कथा आहे. (प्रत्येक संबंधातल्या समस्यांचे स्वरूप असे बारकाईने पाहात गेल्यास आपले सगळ्यांचेच जगणे अपवादात्मक ठरू शकते !) या व्यक्ती कोणत्याही समाजगटाच्या वा समूहाच्या प्रातिनिधिक व्यक्ती नाहीत. तांब्यांना इथे नुसतीच यांची एक कथा – कुणाच्यातरी आयुष्यात घडलेल्या घटना – सांगायची नाहीय. या निमित्ताने ते कुणाच्याही स्थितिशील मनाला एक आव्हान निर्माण करतात. हे आव्हान जर वाचकांनी स्वीकारले तर आपोआपच मानवी जगण्यात एक सौहार्द, समज, परिपक्वता येऊ शकते ! आशयाच्या या सखोलतेमुळेच ही कथा ग्रेट ठरते ! या कथेत पूर्ण मानवी जगण्याचे भान आहे – सामाजिक भान असे स्वतंत्र काही नाहीय. स्वतंत्र सामाजिक भानाचा आग्रह धरणाऱ्यांनी या कथेबद्दलचे त्यांचे आकलन मांडणे हे त्यांना आणि इतरांनाही उद्बोधक ठरू शकेल.

या कथेचे परिपूर्ण विश्लेषण, तिच्यातल्या एकूण सर्जक प्रक्रियेचे कणाकणाचे समालोचन करायचे तर या ‘ दीर्घ ‘ कथेहून जास्त मजकूर लिहावा लागेल. ते सर्व करणारा समीक्षक मी नाही. तरीही, या कथेच्या वैशिष्ट्यांचे वर्णन आणि ती वाचण्याच्या प्रक्रियेचे मला समजलेले दिग्दर्शन इथे केलेले आहे.

तांब्यांचे अभिनंदन वगैरे काही नाही कारण ही समज हे त्यांचे सहज जगणे आहे ! अशा उत्तुंग कलाकाराचे कौतुक आपण एक उपचार म्हणून करू शकतो पण ते करतानाच आपल्या लक्षात येते की असे कौतुक ही त्या सर्जकतेपुढे एक खूपच छोटी गोष्ट आहे !

--- ००० ---

' चौकट दिग्दर्शनाची ' -- ले० कुमार सोहोनी -- प्रकाशक -- मॅजेस्टिक.

आपला अभ्यास, अनुभव आणि सर्जकता यांचे धन पुढील पिढ्यांकडे सुपूर्त करणारी माणसे मराठीत कमीच आहेत -- विशेषतः नाट्यक्षेत्रात. एखाद्या निष्णात दिग्दर्शकाने नाट्यदिग्दर्शनावर लिहिलेले असे दुसरे कोणते पुस्तक आहे का, ते मला माहीत नाही. कुमार सोहोनींनी एखाद्या उत्तम प्रशिक्षकाच्या शैलीत हे पुस्तक लिहिलेले आहे. दिग्दर्शनाची सर्व पायाभूत तत्त्वे आणि कामे समजावून देऊन पुढे ते त्यांच्या उपयोजनाचेही सोदाहरण धडे देतात. नव्याने नाट्य-दिग्दर्शनात शिरणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने वाचलेच पाहिजे असे हे पुस्तक आहे. सर्व तंत्रांसह एक जिवंत नाट्यानुभव निर्माण करण्याची कला आणि सर्जकता यांचे पुरेसे ज्ञान हे पुस्तक नक्कीच देते. भाषा बऱ्यापैकी येऊ लागल्यावर मग जो तो कवी आपापली स्वतंत्र कविता लिहू शकतो. दिग्दर्शनाची भाषा उत्तम प्रकारे शिकवणारे हे पुस्तक आहे.

या निमित्ताने सोहोनींबाबतची एक आठवण सांगतो. माझे ' बुद्धिबळ आणि झब्बू ' हे नाटक प्रायोगिक रंगभूमीवर बरेच गाजले होते. ' वलय ' चा सर्व संच उत्तम होता आणि गिरीश पतकेचे अत्युत्तम दिग्दर्शन होते. या पार्श्वभूमीवर त्या नाटकाचे चित्रीकरण करावे असा विचार पुढे आला. दादरच्या प्लाझा थियेटरचे त्या वेळचे मालक श्री. मयेकर या निर्मितीला तयार झाले. या चित्रीकरणाचे दिग्दर्शन कुमार सोहोनी यांच्याकडे सोपवले गेले. या नाटकाच्या मूळ कलाकार संचात ते चित्रीकरण झाले. गोरेगाव, मुंबई इथे एका आलिशान बंगल्यात हे काम पूर्ण झाले. ' चोर-पोलीस ' या नावाने. आम्ही सर्वजण खुशीत होतो. नंतर कशात तरी काही तरी बिनसले आणि त्यामुळे ते चित्रीकरण तसेच पडून राहिले. मूळ संचातले ते काम उत्तम झालेले असणार यात शंकाच नाही. अजूनही, श्री. मयेकरांकडे ते असेल तर कुमार सोहोनी यांनी ते मिळवायचा प्रयत्न करावा असे मी सुचवू इच्छितो. अन्यथा, कुमार सोहोनी यांच्यासारख्या एका निष्णात दिग्दर्शकाचा माझ्या लेखनाशी आलेला संबंध काळाच्या उदरात गडप होणार आहे.

सदर पुस्तकाबद्दल सोहोनी आणि मॅजेस्टिक यांचे अभिनंदन !

--- ००० ---

अतुल पेठेचा नाट्यसंवाद

' रंगवाचा ' च्या ऑगस्ट'१८ च्या अंकात, ' रंगचिंतन ' या सदरात, माझा मित्र अतुल पेठे याची ' अभिनय ' या विषयावरची प्रश्नोत्तरे आलेली आहेत. अभिनय म्हणजे तळपणे, चमकणे, शेकडोंना सह्या देणे, असंख्य चाहत्यांबरोबर सेल्फी काढणे -- अशा आकर्षक, लोभस कल्पना अनेकांनी बाळगलेल्या असतात. तसे घडूही शकते, पण, अभिनेता होण्याची सर्जक प्रक्रिया ही त्यासाठी नसते घडत -- ती जगणे समजून घेण्याची -- शहाणपणाकडे जाण्याची प्रक्रिया

असते -- हे अतुलने खूपच सूक्ष्मपणे सांगितलेले आहे. ' वेटिंग फॉर गोदो ' दोनदा बसवणारा आणि त्यात अभिनयही करणारा हा एक अनुभवी आणि चिंतनशील नाट्यकर्मी आहे. अनेकदा नवख्या लोकांकडूनही त्याने विशेष नाट्यनिर्मिती उभी करून दाखवलेली आहे. या सर्व अनुभवी आणि सखोल ' असण्या ' तून तो बोलतो आहे. प्रत्येक होऊ घातलेल्या अभिनेत्याने वा अभिनेत्रीने वाचलाच पाहिजे, असा हा मजकूर आहे. अभिनयाची तयारी म्हणजे काय, आवाजाच्या शक्यता कशा वाढवायच्या, बोलणे -- त्याची लय -- त्यातले आघात कसे समजतात, फोकस म्हणजे काय -- अशा अनेक महत्त्वाच्या विषयांवर अतुल बोललेला आहे. नाट्यविषयातल्या अशा अनेक भागांबाबतची अतुलची चिंतने ओळीने येत असलेली दिसतात. कायप्पावरही ही चिंतने पोचत असतात.

अतुलचे हे एक अत्यंत महत्त्वाचे काम चालू आहे. पुरेसा परखडपणा आहे -- जो नीट जागे ठेवायला आणि विषयाचे महत्त्व समूळ कळायला आवश्यकही आहे !

--- ००० ---

बेंगळुरूला जाऊन आलो. २७ मार्चला जागतिक रंगभूमी दिन होता. त्या दिवशी माझ्या ' **ढोलताशे** ' या नाटकाचा कानडी अनुवाद (' **रस्त्यावरचे घर घ्या !** ') तिथल्या रंगशंकरा या रंगमंदिरात सादर झाला. तो ३३ वा प्रयोग होता. सुमारे २०० प्रेक्षक होते. त्या दिवशी अनेक ठिकाणी नाटकाबाबतचे कार्यक्रम असल्याने लोक जरा कमी होते, असे कळले. अन्यथा, ३०० आसनक्षमतेचे हे थियेटर बऱ्याचदा हाऊसफुल असते, म्हणे. या ग्रुपने सदर नाटकाचे प्रयोग कर्नाटकातल्या अनेक शहरा-गावांत सादर केलेले आहेत. हे नाटक तिथल्या लोकांना खूपच आवडलेले आहे. वेगळ्या भाषेत नाटकाला मिळत असलेला प्रतिसाद अर्थातच आनंददायक होता !

तिथे वर्तमानपत्रांनी या नाटकाची कितपत दखल घेतली, काही परीक्षणे वा लेख असे काही आले होते का, असे विचारले असता असे कळले की तिथे तशी काही पद्धतच नाही. नाटकांवर फारसे काही लिहिले जात नाही. लोकच एकमेकांना सांगतात वा फोन, एफबी, कायप्पा यांवरून लोकांना कळवले जाते. जाहिरात करणे परवडत नाही. या बाबतीत त्या मानाने आपली परिस्थिती, अजून तरी बरी आहे, असे वाटते. पण, आपलीही अधोगती त्याच दिशेने चाललेली आहे, हेही जाणवते.

नाटक या अभिव्यक्तिप्रकारसाठी काही वेगळे मार्ग सुचायला हवेत, असे वाटले.

--- 000 ---

' आशय परिवार ' चा २३ एप्रिल २०१९ चा अंक वाचला. कै. त्र्यं. वि. सरदेशमुख यांच्या प्रकाशित आणि अप्रकाशित लेखनाबाबत नीतीन वैद्य या अंकांतून जे काम करत आहेत ते खूप महत्त्वाचे आहे. एखाद्या गंभीर अभ्यासक आणि तत्त्वचिंतक लेखकाच्या अशा नोंदी क्वचितच वाचायला मिळतात. एक तर वाचनाचा पैस मोठा आणि त्याबाबतची चिंतनेही सखोल या सरदेशमुखांच्या वैशिष्ट्यांमुळे अंक दर्जेदार झालेला आहे.

काही मजकूर चुकून दोनदा छापला गेला आहे. आणखी प्रती काढणे झाल्यास ते डिलीट करता येईल. आयनेस्को च्या नाटकावरचे सरदेशमुखांचे टिपण मला विशेष आवडले. माझे ते एक अत्यंत आवडते नाटक आहे. त्यांच्या ' प्रदेश साकल्याचा ' या पुस्तकात आलेल्या संदर्भांची यादी त्यांच्या चौफेर अवधानाची साक्ष देते ! ते पुस्तक मी वाचलेले असून त्यातली मांडणी मला पटलेली आहे.

कै. प्रा. गो. म. कुलकर्णी यांच्या घरी दोन वेळा माझी सरदेशमुखांशी भेट झाली होती. त्यांचे प्रगल्भ व्यक्तिमत्व माझ्या स्मृतीत आहे. माणसाचे ' सुसंस्कृत आणि विदग्ध ' असणे म्हणजे काय याचे ते संपन्न मूर्तिमंत उदाहरण होते !

--- ००० ---

' अक्कलखाते ' -- डॉ. अमित करकरे.

मुख्यतः किशोरवयीनांसाठी आणि म्हटले तर सर्वांसाठी असणारे असे हे पुस्तक आहे. डॉक्टरांनी त्यांच्या दोन मुली नुपूर आणि राधा यांच्यासाठी लिहिलेल्या ब्लॉगमधून संपादित केलेले हे लेख आहेत. वाढत्या वयात मुलांना थोडी जगाची ओळख व्हावी आणि प्राथमिक व सखोलही बोध मिळावा या हेतूने लिहिलेले हे लेख आहेत. लेखांचा आकार छोटा आणि भाषा व मांडणी साधी, सोपी आहे. डॉक्टरांचा अनुभव, वाचन व सामान्य ज्ञान चांगले असल्याने हे लेख वाचनीय झालेले आहेत. हा काही ' सक्तीचा बोध ' नाही -- हे विचारार्थ काही सांगणे-सुचवणे आहे. अनेक पालकांनी या पुस्तकाचे स्वागत केलेले आहे. नेहमीचे पुराणकथांचे माध्यम न वापरता, आजच्या जगण्यातल्या घटितांतून मुलांशी संवाद साधण्याची ही पद्धत अभिनव आणि आकर्षक आहे. हे एक वाचनीय पुस्तक आहे !

--- ००० ---

एक शिक्षणप्रेमी

अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असूनही शिक्षण घ्यायचे हा त्याचा निर्धार होता. त्यासाठी त्याने पडेल ते आणि पडतील तितके कष्ट सोसले. शिक्षणासाठी मुंबईला येऊन नातेवाईकांकडे राहिला. मिळेल त्या नोकऱ्या केल्या. त्याने घरोघर जाऊन बिस्किटे विकली तर काही दिवसांनी त्याला कळले की एका नावाजलेल्या कंपनीचे नाव वापरून तयार होणारी बनावट बिस्किटे तो विकतोय ! मग त्याने ते सोडून दिले. नंतर तो डास, पाली, झुरळे मारायची औषधे विकू लागला तर लोकांच्या तक्रारी येऊ लागल्या की त्या औषधांनी त्या दुष्ट जीवांपैकी कुणीच फारसे मरत नाहीत, उलट, खाऊन-पिऊन सुखी असे हिंडत राहतात ! मग त्याने तेही काम दिले सोडून ! प्रचंड काबाडकष्ट ! अशी कामे करत रात्री जागून शरीराच्या ताकदीची फिकीर न करता हा अभ्यास करत असे. त्याचा भयानक परिणाम असा झाला की बी. ए. च्या पेपराच्या वेळी सर्व प्रश्नांची उत्तरे येत असूनही त्याला लिहिताच येई ना -- लिहिताना ओळी तिरक्या वर जाऊ लागल्या, त्यामुळे, परीक्षा सोडून द्यावी लागली ! मग ऑक्टोबरला पुन्हा बसून त्याने ती परीक्षा पार केली ! अशा जिद्दीने शिक्षण पूर्ण करून पुढे तो मुंबईच्या रूपारेल कॉलेजमध्ये प्राध्यापक झाला आणि शेवटी तिथूनच निवृत्त झाला ! त्याचा एक मुलगा मुंबईत ऑर्थोपेडिक सर्जन असून दुसरा इंजिनियर होऊन परदेशात असतो !

तुम्ही म्हणाल की कोण हा आणि मी ते का सांगतोय इथे -- तर हा म्हणजे कॉलेज जीवनातला माझा जिगरी दोस्त गजानन रामभाऊ शिंदे ! इस्माईल युसुफ कॉलेजात आमची एक मित्र-चौकडी होती. गजाननचे अलिकडेच एक आत्मचरित्रात्मक पुस्तक प्रकाशित झाले आहे -- त्यात तो काय म्हणतो ते पाहा -- " बरोबर २१ जूनला कॉलेज सुरू झाले. पहिल्याच दिवशी कॉलेजचे त्या वेळचे प्राचार्य डॉ. पोतदार यांचे व्याख्यान झाले. हे व्याख्यान सोप्या इंग्रजीत असल्यामुळे आम्हाला ते बऱ्यापैकी समजले. माझा मित्र जाल कारभारी माझ्या बरोबरच होता. पहिल्याच दिवशी चंद्रकांत देशपांडे आणि रमेश काब्रा या दोन मुलांशी आमची ओळख झाली. चंद्रकांत मालाडला राहायचा तर रमेश जोगेश्वरी पश्चिमेला राहायचा. आजही आम्ही चौघे मित्र एकमेकांच्या संपर्कात आहोत.चंद्रकांत सध्या पुण्याला राहतो. बँकेतून निवृत्त झाल्यावर त्याने आपले लेखन चालूच ठेवले. तो आज प्रसिद्ध लेखक व नाटककार आहे. अनेक पुरस्कार त्याला मिळाले आहेत. रमेश सध्या बोरिवलीला राहतो. बँकेतून निवृत्त झाल्यावर पालघर-डहाणू भागात त्याने एक छोटासा कारखाना चालू केला आहे. जाल मात्र हाँगकाँगला राहतो. तो मोठा सॉलिसिटर झाला आहे. " (' एक शिक्षणप्रेमी ' पृष्ठ ३०.)

जीवनप्रवाह चालू राहात आलेला आहे ! जाल सोडून आम्ही तिघेजण पुढल्या महिन्यात मुंबईत भेटणार आहोत ! एकूण शाळा-कॉलेज जीवन लक्षात घेतले तर माझा नंबर वन मित्र हाच -- गजानन शिंदे !

--- ००० ---

‘ कवितानिरूपणे ’ – सुधीर रसाळ, ‘ इराणी ’ – अरुण कोलटकर, अतिवास्तववाद, वगैरे.

-- चं. प्र. देशपांडे.

कवितेचे स्वरूप, तिची निर्मितिप्रक्रिया, तिची अर्थवत्ता, तिची संपर्कप्रक्रिया आणि तिच्या असंख्य शक्यता – यांबद्दल थोडी जरी उत्सुकता असेल, कवितेचे माणसाच्या जगण्यातले महत्त्व समजावे असे वाटत असेल तर सुधीर रसाळांचे ' कवितानिरूपणे ' हे पुस्तक वाचलेच पाहिजे. कवितेच्या ' संहितासमीक्षा ' मराठीत खूपच कमी आहेत, याबाबतची खंत रसाळांनी व्यक्त केलेली आहेच. तर अशा संहितासमीक्षा अत्यंत विचक्षणपणे देणारे हे पुस्तक आहे. भाषेच्या, कवितेच्या अभ्यासकांना, खुद्द कवींना आणि अर्थातच वाचकांना कवितेबाबत अधिक सजग करू शकेल, असे हे पुस्तक आहे.

या पुस्तकात रसाळांनी दिलेल्या संहितासमीक्षात्मक लेखांत एक लेख अरुण कोलटकरांच्या ' इराणी ' या कवितेवरही आहे. या कवितेची रचना, तिचे तंत्र, तिच्यातून निर्माण होणारी अर्थवलये यांबद्दल रसाळांनी छान आणि सविस्तर लिहिलेले आहे. या कवितेकडे पाहण्याची ही एक दृष्टी असू शकतेच, पण, मला जरा वेगळे काही जाणवले. मला ही कविता अतिवास्तववादी शैलीतली वाटते. तिच्यातल्या प्रतिमा आणि तिचे एकूणच असणे याचे सर्व अर्थ वास्तवकेंद्रित वा वास्तवानुगामी लावावेत का, असा मला प्रश्न पडला. अतिवास्तववादी कवितेकडे अधिक व्यापक अशा तात्त्विक / आध्यात्मिक अंगानेही पाहिले जायला हवे, असे जाणवले. त्यामुळे, मला ही कविता कशी दिसते / जाणवते हे लिहावे, असे ठरवले. त्या विचारानेच हा एक छोटासा प्रयत्न करत आहे. या कवितेवर लिहिण्यापूर्वी अतिवास्तववादावर थोडे लिहायला हवे.

अतिवास्तववाद

अतिवास्तववाद हा तर्क आणि बुद्धिप्रमाण्यवाद फेटाळून लावतो, हे लक्षात घेतले पाहिजे. असे का घडते, तर आकलन-प्रक्रिया आणि अभिव्यक्तिप्रक्रिया यांच्यावरचा जागृत मनाचा ताबा सोडून देणे, हे याचे प्रमुख वैशिष्ट्य असते. जागृत मन हे सदोदित आपापल्या कुवतीप्रमाणे तर्काच्या वा बुद्धीच्या प्रभावाखालीच काम करते. अर्धजागृत वा सुप्त मन हा माणसाच्या जगण्याचा एक प्रचंड भाग असतो. यात हजारो वर्षे विकसित होत आलेल्या प्रेरणांपासून आनुवंशिक प्रभाव, भ्रम, स्वप्ने, आठवणी असे खूप काही असते. अतिवास्तववाद असे मानतो की फक्त जागृत मनानेच नव्हे तर पूर्ण मनाने जगण्याकडे पाहायला हवे. यासाठी अर्थातच जाणीवपूर्वक असणाऱ्या तर्काचा ताबा सोडावा लागतो. ताबा सोडणे म्हणजे हवे तसे शब्द भिरकावणे नव्हे. ' पूर्ण मनाची ' ही प्रक्रियाही त्या त्या मनाच्या प्रगल्भतेवर आणि गांभीर्यावरच अवलंबून असते. कोणत्याही सर्जक कलेत कल्पनेचा असा स्वैर वापर काही ना काही प्रमाणात होत असतोच, पण, अतिवास्तववाद ते पायाभूत तत्त्वज्ञान म्हणूनच स्वीकारतो. याबाबत पुढील वाक्य विचारात घ्यावे असे आहे – Breton conceived of

Surrealism as a revolution of the mind that would fundamentally transform everyday experience. Surrealism was less interested in the irrational for its own sake, than in reconciling the contradictory states of dream and reality into a more potent form of reality – a kind of surrealist consciousness. सारांश, मनाच्या पूर्ण असण्याला वाव देणारी ही प्रक्रिया आहे.

इथे, अतिवास्तववादी कवितेची वैशिष्ट्ये काय असतात ते थोडक्यात पाहू. इथे मनाच्या पूर्णतेचे महत्त्व असते याचा अर्थ जागृत मन वगळले जाते, असे नाही. फक्त इथे जागृत मनाची शिस्त, सलगता आणि सुसंगत आकलन यांचा अभाव असतो. यामुळे हे जग केवळ जागृत मनाला परके आणि चकित करणारे असते. यातून एक परात्मभाव, उपरोध आणि काहीसा बोचरा विनोदही निर्माण होतो. या सगळ्यात निरर्थकता हा एक स्थायी भाव असतो. योजना, विचारसरणी, आदर्श यांना इथे स्थान नसते. नैतिकता आणि सौंदर्यकल्पना यांची इथे फिकीर बाळगली जात नाही. या अभिव्यक्तीत अनपेक्षितता, योगायोग आणि अनिश्चितता भरपूर असते. जागृत मनाच्या उचापतींनीच हे जग घाणेरडे झालेले आहे, अशी जाणीव यात असते. त्यामुळे, जागृत मनाचे उपाय व निराकरणे इथे मान्य नसतात. या अशा स्वैर गांभीर्यातून ही अभिव्यक्ती येत असल्याने असंबद्धता, शब्दांचे व प्रतिमांचे विचित्र साहचर्य, अतार्किक मांडणी यांच्या रेलचेलीसह भाषेचा सढळ वापर असतो. एकेका कल्पनेचे एकेक कडवे, अशी शिस्त नसते. कडवी, वाक्ये एकमेकांत मिसळत राहतात. याला psychic automatism म्हणजे मानसिक स्वयंचलितता असेही म्हटले जाते. बऱ्याच वेळी कवितेचा विषय हा फक्त निमित्तमात्र असतो आणि त्यातून अनपेक्षित आकलनाचे भांडार व्यक्त होत राहते. जगताना जाणवलेल्या असंख्य गोष्टी कवीच्या प्रगल्भतेतून त्या त्या वेळी रूप घेत राहतात. अमुक अर्थाचे पाहणे, असे याचे स्वरूप नसून अनियोजित पाहणे असे हे स्वरूप असते. धर्म, जादू, गूढ, मादकता, बधीरता या सगळ्यांनी युक्त अशी ही अनिश्चिततेची नदी वाहत असते. Sur म्हणजे सरपास करणे – पलिकडे जाणे. Surreal म्हणजे सवयीच्या सत्यापलिकडे जाणे. तर्क आणि उपयुक्तता यांच्या मर्यादा ओलांडून ‘ पाहणे ‘.

अतिवास्तववादाची ही थोडक्यात ओळख करून घेतल्यावर आता अरुण कोलटकरांच्या ‘ इराणी ‘ या कवितेकडे जाऊ --

इराणी

इराणचा चकणा शहा पाहतो तडकलेल्या व सस्मित
काचेआड केकला चढणारी क्रमिक बुरशी.

क्वचित् विचलित करते त्याचे लक्ष सुशिक्षित
बेकाराला राखी बांधताना अकृत्रिम माशी.

चित्रातील वनराजीच्या कुशाग्र निर्जीवतेस व्यग्र
करीत नाही वारा; अन् सरळ सरोवराचे विपर्यास
वाकडा हंस. सुईसारखा सीधा मार्ग
अग्रावर तोलतो राखीव बंगल्याचा रेखीव आभास.

अशा निसर्गचित्रांची होते ग्लासात अविद्राव्य तारांबळ
घोटागणिक परिच्छेद पाण्याचा लांबताना तृषार्तासमक्ष.
जिज्ञासूंचे वेधू इच्छिते चहाचे विचक्षण वर्तुळ
विचारप्रवर्तक टेबलाच्या महत्त्वाच्या भागाकडे लक्ष.

खुर्चीखालील अंधारांना निमित्त झालेले मांजर,
गतप्रभ दुश्चिन्ह, सांभाळते दुटप्पी झोपेत दोन
सापत्न स्वप्नप्रपंच. दिशांची अफरातफर
करून बिलोरी मंत्रिमंडळ पिकवते अप्रच्छन्न प्रतिबोंब.

सिगारेट पेटवून बेकार ठेवतो जळणारी काडी
चहाच्या वर्तुळात जी उठून बसते विझताना जरा.
अगत्यशील जशी लाश बर्फाच्या लादीवर उघडी
समशीतोष्ण कोणी आलासे वाटताच सगा सोयरा.

(अरुण कोलटकरांची कविता – प्रास प्रकाशन, मुंबई १९७७.)

मूळ पुस्तकातल्या कवितेत ‘ हंस ‘ या शब्दानंतर पूर्णविराम आहे, पण, रसाळांच्या पुस्तकात स्वल्पविराम आहे. त्याचप्रमाणे, मूळ पुस्तकात ‘ तोलतो ‘ या शब्दानंतर पूर्णविराम आहे, पण, रसाळांच्या पुस्तकात तो वगळलेला आहे. तो वगळणेच बरोबर असावे. खरे तर सरमिसळ व्हावीच आणि गोंधळ – chaos – निर्माण व्हावाच या ‘ सत्यगामी ‘ हेतूने अतिवास्तववादी कविता विरामचिन्हांचा कमीत कमी वापर करते. त्यामुळे, हे थोडे लाईटली घेऊन पुढे जाऊ.

नावावरून आणि कवितेतल्या एकूण वर्णनावरून ही कविता इराणी हॉटेलावर आहे, असे दिसते. की ती कवितेतल्या बेकार माणसाची मनस्थिती व्यक्त करणारी आहे ? की या हॉटेलच्या निमित्ताने ती कवीची स्वतःचीच मनस्थिती व्यक्त करते आहे ? समजा तो बेकार माणूस. तर त्याची मनस्थिती जी नेहमीच्या रूटीन भाषेत सांगता येईल, तिच्यासाठी ही अशी मास्टरीयुक्त कविता कशाला ? आपण कविता वाचता वाचता समजून घेत जाऊ.

कवितेच्या पहिल्या वाचनात एक महत्त्वाची घटना घडते – ती म्हणजे तो बुरशी लागून नष्ट होत चाललेला केक. तो वाचवावा किंवा फेकून द्यावा असे काही घडणे अशक्य झालेला. (कारण हा केक मानसिक काळाचा – स्वप्नातला आहे – सत्यातला नाही.) हे स्वप्नसदृश सुप्त मनाचे ताबाहीन नष्ट होत जाणे आहे. साल्वदोर डालीच्या ‘ पर्सिस्टन्स ऑफ मेमरी ‘ – ‘ स्मृतीचे सातत्य ‘ -- या चित्रात जशा एका पालथ्या पडलेल्या पॉकिट वॉचला मुंग्या लागलेल्या आहेत ! तिथेही एक प्रकारे अशीच मानसिक काळाच्या नाशाची जाणीव व्यक्त होते. ही कविताही स्वप्न आणि जागृत मनाचे सत्य यांचे बेमालूम मिश्रण आहे. या कवितेत विकृती आणि नाश हे अनेक गोष्टींतून व्यक्त होताहेत – इराणी चकणा असणे, काच तडकलेली असणे, केकला बुरशी, निर्जीवता, वाकडा हंस, अंधार, गतप्रभ मांजर, अफरातफर, विझणे, लाश. जिवंतपणाची लक्षणे म्हणजे बुरशी, मांजर, बेकार आणि पेटलेली सिगरेट. या अशा खगदृष्टी दृश्यानंतर आता ओळीने कविता पाहू.

हे एक इराणी हॉटेल आहे. नुसता चहा पीतही कितीही वेळ तुम्ही इथे बसू शकता. सध्या इथे एक बेकार बसलेला आहे. म्हणजे त्याचा बुद्धिवाला काळही वाया चाललेला आहे आणि मानसिकही. काउंटरवरच्या इराण्यालाच कवी शहा म्हणत असावा. या दरिद्री हॉटेलच्या मालकाचे ते हास्यास्पद उदात्तीकरण आहे. शिवाय तो चकणा आहे. तो कुठे, काय पाहतोय ते कळू शकत नाही. ते अनिश्चित आहे. त्याला कशातच फारसे इंटरेस्ट नाही हे स्पष्ट आहे. काचेला तडा गेलाय तर जाऊ दे, केकला बुरशी लागलीय तर लागू दे – असा प्रकार. विशेष म्हणजे काचेचा तो तडा स्मितहास्यासारखा दिसतोय ! सगळे सुखदुःख समे कृत्वा जणू ! पुढे असे म्हटलेय की सुशिक्षित बेकाराला राखी बांधणारी ‘ अकृत्रिम ‘ माशी त्याचे लक्ष क्वचितच विचलित करते ! मुळात तो एक बेकार आणि त्याच्याकाडून जणू रक्षणाची अपेक्षा करत एक क्षुद्र माशी त्याला राखी बांधणार ! काय लक्ष द्यायचे त्यात ? चालू दे ! पण, माशी ‘ अकृत्रिम ‘ का ? कारण मनाचे सगळे हेतूपूर्वक आणि म्हणून कृत्रिम आहे ! ती माशी एक वेळ उत्साही, बरी म्हणावी अशी मनाची अवस्था आहे ! इथे आता हळूहळू लक्षात येऊ लागते की ही कविता नुसतेच या हॉटेलबद्दल वा त्या बेकाराबद्दल बोलत नसून पूर्ण मानवी जगण्याबद्दलच बोलत आहे. पुढे बघा – चित्रातील वनराजी ‘ कुशाग्र ‘ आहे – धारदार आहे पण, ती चित्रातली आहे. ती कोणत्याही वाऱ्याने व्यग्र होत नाही – ती नुसतीच सुंदर पण निर्जीव आहे. तिला वाराही व्यग्र करत नाही वा सरळ सरोवराचे जणू विपर्यास असलेला वाकडा हंसही नाही व्यग्र करू शकत. हे एक जणू एखाद्या कल्पित आदर्शाचे चित्र आहे. पण, हंस मात्र वाकडा का ? तर ते जिवंत असण्याचे मानसिक चित्र आहे आणि जे जे मानसिक ते ते सगळे विकृत, नष्ट होत चाललेले, वाकडे

आहे ! आता पुढे बघा – सुईसारखा – धारदार – सीधा मार्ग तोलतो राखीव बंगल्याचा रेखीव आभास ! इथे मात्र या आदर्शाला स्पष्टपणे ‘ आभास ‘ म्हणून ओळखले जाते !

अशा निसर्गचित्रांची अविद्राव्य तारांबळ का होते ? ती तुकड्यातुकड्यांची आहेत – एकजीव होऊ शकणारी नाहीत – मनाचे असणेच असे तुकड्यांचे आणि विदीर्ण आहे ! तृषार्ताला ते सगळे सत्यात हवे आहे पण, ते शक्य नाही. चहाच्या ग्लासाच्या गोल डागाला पुढे ‘ विचक्षण ‘ म्हटलेय ! हा निव्वळ उपरोध आहे ! कसले इयाटाचे विचक्षण – असे खरे तर ते आहे ! तार्किक, बुद्धिप्रधान जगण्याची ही चेष्टा आहे ! आता पुढे येतो उल्लेख खुर्चीखालील अंधारांचा ! अंधाराचे अनेकवचन ! विचार, अनुभव यांचे तुकडे हा जगण्याचा पाया – ते सगळे अंधार ! आणि या अंधारांना निमित्त काय होते तर गतप्रभ दुश्चिन्ह असणारे मांजर ! हे अर्थातच विचार आणि अनुभव यांवर ताबा ठेवणारे मनाचे केंद्र आहे. त्याचे तेज मुळातल्याच विकृतीमुळे गेलेले असून या सगळ्या शांत नासाडीचे तेच आहे मूळ दुश्चिन्ह ! दोन सापत्न स्वप्नप्रपंच म्हणजे जागृत आणि सुप्त अशा अवस्थांतले जगणे ! चांगल्यावाईटाचे मिश्रण अशी बिलोरी अफरातफर, मंत्रिमंडळ, बोंब, प्रतिबोंब – हा सततचा गोंधळ ! हे काही त्या हॉटेलातले नाही – मनाच्या अवस्थेला धरूनच आहे. शेवटच्या कडव्यात पुन्हा त्या चहाच्या वर्तुळाचा उल्लेख येतो – ते विचक्षण वर्तुळ ! त्यात टाकलेली जळती काडी विझताना थोडी गोलाकार वळते जणू कुणी सगासोयरा आलाय, आदरातिथ्य करायला हवेय ! हीही एक सवय – जणू मेल्यावरही जागी होणारी – हास्यास्पद ! वस्तुतः कुणी नाहीच आहे सगासोयरा – सगळे संबंध तुटलेले वा बिघडलेले आहेत !

वाचत वाचत आणखी खूप बारकावे जाणवत जाऊ शकतात. या कवितेचे प्रतिमायुक्त रूप विकृतींनी भरलेले आहे. अनपेक्षितता, उपरोध आणि विनोदही यांनी भरलेले आहे. हा काही कवीचा एखादा व्यक्तिगत मूड नाही. हे पूर्ण मनाने पूर्ण मनाला पाहणे आहे. कवीला याचे सुखदुःख नाही पण मानवी जगण्याची शोकात्मता पूर्णपणे समजून घेण्याची यात आच आहे. त्यामुळे ही कविता अध्यात्माच्या / तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात जाते. हीच मानवी परिपक्वतेची प्रक्रिया – हीच सांस्कृतिक प्रक्रिया. ‘ इराण्याच्या हॉटेलातले दृश्य पाहून ‘ अशी ही नुसतीच एक प्रतिक्रिया नाही. यात व्यक्तिगत रागलोभ, कुणाला दूषणे देणेही नाही. माणसाच्या जगण्याच्या पद्धतीतून काय घडतेय याचे हे भान घेणे आहे. सोडवायला घेतलेली ही अनेकांपैकी एखादी समस्या नाही. ‘ विचक्षण ‘ विचारातून येणारे एखादे भाष्य वा निराकरणही यात येत नाही. कारण अर्थातच ते शक्य नाही, हे समजलेले आहे.

माणसाच्या शोकात्म अवस्थेचे भान येणे, समज येणे हीच पहिली पायरी आणि हेच तातडीचे – या प्रगल्भ चिंतनातून आलेली ही कविता आहे. त्यामुळेच, मराठीतली ही एक महत्त्वाची सांस्कृतिक घटना ठरते ! एखाद्या आदर्शाला वा निष्कर्षाला गृहीत धरून निर्माण होणाऱ्या कविता हिच्यापुढे खुज्या ठरतात.

--- ००० ---

साहित्याचे इहवादी सौंदर्यशास्त्र

– ले० यशवंत मनोहर – प्रकाशक० पद्मगंधा प्रकाशन.

अलिकडेच आलेले मराठीतले हे एक अत्यंत महत्त्वाचे पुस्तक आहे. एखाद्या सर्जक लेखकाने ‘ सौंदर्य ‘ आणि ‘ साहित्य ‘ या संकल्पनांचा स्वतःच्या चिंतनातून सविस्तर आकलन-पट मांडावा, हे अपवादात्मकतेनेच घडणारे या पुस्तकाने घडलेले आहे. विशेष म्हणजे, आध्यात्मिक, पारलौकिक वा विश्वचैतन्यवादी मांडणी पूर्णतया नाकारून ही स्वतंत्र इमारत उभी करण्यात आलेली आहे. पण ही काही मार्क्सिस्ट मांडणी नाही. या आकलनाला बुद्धाने सांगितलेल्या दिशेचा आधार आहे, असे म्हणता येईल. हे पाहता, हे पुस्तक आद्यतायुक्तच (original) म्हणायला हवे. आजच्या काळात, हे एक बीजपुस्तक समजून यावर अनेक चर्चा, परिसंवाद आणि वादही घडावेत, अशा योग्यतेचे हे पुस्तक आहे.

या पुस्तकातले शेवटचे प्रकरण, ‘ सौंदर्याची पुनर्रचना ‘ तर चिंतनात्मकतेचा एक उत्तुंग षटकारच आहे ! हा लेख वैचारिकच असूनही एखाद्या उत्तम कलाकृतीचा अनुभव देणारा आहे. वाचताना बाजूला पेन्सिलने रेघा मारत वा काही वाक्ये अधोरेखित करत पुढे जाण्याची माझी पद्धत आहे. या लेखातली सर्वच वाक्ये – हा पूर्ण लेखच -- अधोरेखित करावा लागेल, असा आहे ! यातली काही वाक्ये पाहा --

“ हे खरे की विविध हितसंबंधांची गर्दी असलेल्या जीवनातच साहित्यिकातील माणसाची रचना होते आणि ही रचना त्याच्यातील प्रतिभावंताला एक मर्मदृष्टी देते. पण ही मर्मदृष्टी स्वतःच हितसंबंधग्रस्त नसते तर या हितसंबंधांच्या घडणीचे, त्यातील इष्टतेचे आणि अनिष्टतेचे, त्यातील परिहार्यतेचे आणि अपरिहार्यतेचे आकलन, अन्वर्थन आणि मूल्यन करणारी असते. ही मर्मदृष्टी कोणत्याही विद्यमान हितसंबंधाची प्रतिनिधी नसते. कारण अशी प्रतिनिधीदृष्टी प्रकृतितःच पक्षपाती असते. अशा पक्षपाती मनाची साहित्यनिर्मिती पक्षपातीच असणे अपरिहार्य असते. “

“ स्वतःच्या समाजदत्त विघटनशील रचना झुगारून देता येणे आणि न मी एक हितसंबंधाचा होऊन दाखवता येणे, म्हणजे वैविध्यपूर्ण पण शोषणातीत, सर्वहितैशी आणि सर्वसुंदर हितसंबंधात स्वतःचे रूपांतर करून घेता येणे माणसांना शक्य आहे. “

“ आस्वादक आपली भूमिका न सोडता दुसऱ्या भूमिकेत जातो हे म्हणणे योग्य नाही. खरे तर तो कोणाचीच भूमिका घेत नाही. तो wisdom होतो. साहित्यकृती या विज्डमचीच रचना असते. “

“ साहित्यिकाच्या स्वातंत्र्याला कोणत्याही हितसंबंधाची चौकट नसते. “

-- अशी बरीच आहेत वाक्ये. पूर्ण पुस्तकातही अशा मूलगामी चिंतनाचा खजिनाच आहे.

तरीही, उदाहरणार्थ हे एक उद्धृत पाहा --

“ कोणतेही असुंदर हे सत्य वा इष्ट ठरू शकत नाही आणि सत्याचे अस्तित्व बुद्धिवादानेच किंवा विज्ञानदृष्टीनेच संभवू शकते. इष्टाचे वा सुंदराचे अस्तित्वही बुद्धिवादाशिवाय केवळ अशक्य आहे. विवेकवादी मनाला जे पटू शकत नाही ते सत्यही ठरत नाही. “ (पान १०९). इथे असा प्रश्न येतो की इतरत्र, मनोहर जर ‘ सौंदर्य ‘ या संकल्पनेचे वर्णन ‘ असीम ‘ वा ‘ कक्षाहीन ‘ अशा शब्दांनी करत असतील तर ते बौद्धिक वा वैचारिक मर्यादेतले कसे असेल ? बुद्धी एकरेषीय असते आणि विचार मर्यादित असतो. सौंदर्य हा एक विचार असतो का ? तसे असेल तर सौंदर्याचा एखादा डिप्लोमा घेऊन कुणीही उत्तम लेखक होऊ शकेल ! इथेच आणखी एक प्रश्न उपस्थित करावा लागेल. बुद्धाला अनेक ठिकाणी त्यांनी बौद्धिकच म्हटलेले आहे. बौद्ध धर्मातली ‘ निर्वाण ‘ ही अवस्था बौद्धिक असते ? तृष्णाहीनता वा दुःखहीनता ही बौद्धिक असते ? मनाची एक मर्यादित अवस्था असते ? बौद्ध धर्मात ध्यानाचे खूप महत्त्व आहे. ध्यान ही काय विचारप्रक्रिया असते ? बुद्धज्ञान वा सौंदर्य हे इहवादी – इथलेच – आहे या जगण्यात घडणारेच -- म्हणून मान्य करता येते पण, ते वैचारिक असते, असे म्हणता येणार नाही. खुद्द मनोहरांच्याच मांडणीशी ते विसंगत आहे.

आता हे एक उद्धृत घेऊ --

“ समाज म्हणजे माणसांच्या संबंधांची रचना ! साहित्य म्हणजे या संबंधांचे तटस्थ वर्णन नव्हे. या संबंधांवरील भाष्याला साहित्यरूप प्राप्त होते. माणसांमधील संबंधांची पुनर्रचना असे या भाष्याचे रूप असते. “ (पान १२४). ही पुनर्रचना कसली ? परिस्थितीची ? संबंधांच्या आदर्श साच्याची ?

“ सौंदर्य निर्माण करणारी प्रतिभा कधीच पक्षपाती नसते. “ (पान १२७). सौंदर्य निर्माण करणे म्हणजे काय ? ते एक बौद्धिक, वैचारिक मत असते का ?

-- हे काही प्रमुख मुद्दे. पुस्तकाचे नाव ‘ साहित्याचे इहवादी सौंदर्यशास्त्र ‘ असे आहे, पण, यातील विवेचनाच्या पुष्ट्यर्थ वा स्पष्टीकरणार्थ एकाही लेखकाचा वा साहित्यकृतीचा यात उल्लेख वा संदर्भ नाही. मनोहर, कुठेच अस्तित्वात न आलेल्या आणि अस्तित्वात येऊही न शकणाऱ्या एखाद्या स्वप्नसंकल्पनेबद्दल तर बोलत नाहीयत ? सौंदर्यशास्त्रात मानसशास्त्र, शरीरशास्त्र, जनुकशास्त्र वगैरे शास्त्रांचे अनेकदा आधार घेतले जातात. तसे इथे काहीच नाहीय. त्यामुळे, एक प्रकारे, हे वैचारिक ललित लेखनच झालेले आहे. यातला ‘ इहवादी ‘ हा शब्द निर्विवाद वाटतो. परलोकाचा काही संबंधच नाही, किंबहुना तो असतो अशा शक्यतेचीही गरज नाही. जे काही घडते ते इथेच, याच जगण्यात घडते, हे खरेच आहे. पण, इहवादी म्हणजे फक्त बौद्धिक, वैचारिक वा वैज्ञानिकच असते का ? ‘ असीमता ‘ ही वैचारिक असते का ? – हे प्रश्न समोर येतात.

या पुस्तकाबद्दल अनेक मतमतांतरे आणि चर्चा व वाद शक्य आहेत. ती सर्व घुसळण व्हायलाच हवी. ते सर्व घडावे अशा योग्यतेचे एक महत्वात्चे पुस्तक लिहिल्याबद्दल मित्रवर्य मनोहरांना धन्यवाद !

--- ००० ---

रवीन्द्र दामोदर लाखे यांची कविता

लाख्यांच्या कवितेची अनेक वैशिष्ट्ये आणि मूल्यात्मकता यांवर मी यापूर्वी लिहिलेले आहे. आता सहज वाचता वाचता चांगल्या वाटलेल्या, म्हणजे मुद्दाम निवडून न काढलेल्या, अशा त्यांच्या दोनतीन कवितांबद्दल लिहिणार आहे. या तिन्ही कविता ‘ संपर्कक्षेत्राच्या बाहेर ‘ या संग्रहातून घेतलेल्या आहेत.

लाख्यांच्या कवितेचा एक प्रमुख म्हणावा असा विषय असतो तो म्हणजे ‘ मी ‘आणि ‘ वास्तव ‘ यांच्यांतला संघर्ष. हे वास्तव विश्वासार्ह नसते आणि प्रत्येकाचे वेगवेगळे असते. ‘ सत्य वास्तव ‘ असे काही नसते. या द्वंद्वाच्या अनेक परी लाख्यांच्या कवितेत दिसत राहतात. वास्तव नाही तरी आभासीच आहे तर मग या आभासावर आधारितच एक बनावट वास्तव तयार करून ते न्याहाळले तर ते अधिक त्रयस्थपणे आणि पूर्णतेने समजू शकेल, या विचाराने ही कविता अशा बनावट वास्तवाचे ढीगच रचत जाते. या प्रकारे ही कविता जगण्यातल्या असंगततेला, विसंगतीला आणि अनिश्चिततेला चितारत राहते. बऱ्याचदा या कवितांतले वास्तव आपल्याला ॲब्सर्ड नाटके वा काफ्काचे जग यांची आठवण करून देते. एकाच वास्तवाचे बदलते स्वरूप आपल्याला ‘ वडील ‘ या कवितेत दिसते. घड्याळ रंगवण्याच्या घटनेतले वास्तव (‘ काय माहीत ' पान ७८), आपल्या काळाच्या कल्पनेलाही उलटेपालटे करते. या कवितांतले वास्तव हे कवीचे व्यक्तिगत वास्तव नसते. ते कोणत्याही माणसाचे वास्तव असते. व्यक्त होताना ते कवीच्या मानसिक साठ्यातून येते, इतकेच. या वास्तवाची गंमत म्हणजे इथे भावभावना, विचार, मूडस, सुखदुःखे यांच्याबरोबरच शरीराचे अवयव, वस्तू, झाडे, रस्ते, ढग अशा गोष्टीही ‘ जिवंत ‘ समजल्या जातात. यातच अबोध मनातली स्वप्ने, विचार, आठवणीही मिसळत राहतात. आपल्या परिचयाचे नसलेले विचित्र वास्तव सतत समोर येत राहते. या वास्तवाच्या जाचातून वा काचातून सुटका शक्य आहे का, हा प्रश्न या कवितांच्या मुळाशी अस्तित्वात असतो. मानवी जगण्यातला काळ आणि मृत्यू यांचाही सखोल तपास या प्रक्रियेत घेतला जात राहतो. कवितेची ही शैली आपल्या सवयीची नाही. मराठीत, वास्तव असे चुरगळून पाहणारी कविता फारशी लिहिली गेलेली नाही. त्यामुळे, ही कविता अद्वितीय ठरते. मराठी कवितेतल्या या कवितेच्या स्थानाच्या चर्चेपेक्षा या कवितेतली चिंतनशीलता वाचकाला माणूस म्हणून महत्त्वाची ठरावी, अशी ही गंभीर कविता आहे. आता उदाहरणादाखल खालील तीन कविता पाहू.

१. शांततेचा बिंदू (पान १५८)

शहरभर भटकल्यावर

एकभानतेनं

घराकडे परततांना

मीच निर्मनुष्य होऊ पाहतोय
पावलांचं ओझं ओढतोय.
एकेका पावलावर
आणखी कुठलंतरी ओझं वाढतंय.
कुठलं ते कळत नाहीय
तरी मी ते वाहतोय.
रिकामं पोट जड झालंय.
जडशीळ.
ते स्वतंत्र होऊ पाहतंय
माझ्या जिवंतपणाच्या जोखडातून.
मी काही त्याला अडकवून ठेवलं नाहीय.
भटकलो ज्यावरून ते रस्ते
पोटात वळवळताहेत.
ते थकले नाहीयत;
उलट वेगवान झाले आहेत;
आणि त्या रस्त्यांवर
माणसांच्या सावल्या एकवटल्या आहेत
रक्त साकळल्यासारख्या.
मी कोलाहलासारखा मल्टिपल झालोय
आणि माझ्यातून कुणी एकजण
कानावर घट्ट हात रोवून
सैरावैरा पळतोय
शोधत शांततेचा बिंदू
स्थिर होण्यासाठी.

--- ० ---

अपूर्ण (पान १७१)

अपुरं आणि उथळ आहे

वास्तव बाहेर
नाही मावत संपूर्ण मी
माझी खोली.
भवतालाच्या गतीत
वाहणाऱ्या जगरहाटीत
नाही राहू शकत मी
अस्खलित.

मी खिळतो
जागच्या जागी.
मी केलेल्या
आत्मझटपटीतून
येते हातात केवळ
फरफट.

ही फरफट
चौफेर होण्याची
वास्तवात उपरी होण्याची
भीती वाटतेय मला.

मी चिणून घेतोय
स्वतःला,
अभावाच्या आकाशभिंतीत
जमीनदोस्त.
मी गुदमरतोय,
माझी ही गुदमर
ऐकायला
लाभोत कान या भिंतींना
आणि लाभो वाचा

माझ्या मृत्यूला
ही गुदमर
व्यक्त करण्यासाठी.
--- o ---

माणसं (पान १८९)

ही माणसं,
गर्दीत घेत असतात श्वास
मेंटली.

ही माणसं,
उचलू देतात आपलं जगणं प्रत्यक्ष गर्दीला
वागवू देतात जिवंतपणाला खांद्यावरून प्रेतवत.

ही माणसं,
उत्कट प्रेम करतात
एकटेपणाच्या त्वचारोगावर.

ही माणसं,
जपतात हा रोग
रक्ताच्या नात्यासारखा
त्यांचा जिवंतपणा
सिद्ध होण्यासाठी.

ही माणसं,
नाकारतात कुठलंही मलम
त्या खाजेवर लावण्यासाठी.

ही माणसं

घाबरतात

मलमाने पोटच्या एकटेपणाचा

खून होण्याला.

ही माणसं,

खाज बंद झाली तर

मेल्यातच होतील जमा.

ही माणसं,

दुकटी असताना

बाळाला वा नात्याला जन्म देतात

ही माणसं,

फिजिकली एकटी, मेंटली गर्दीची झाल्यावर

काळाचा सतत होत राहणारा जन्म

पाहत असतात

ही माणसं.

--- ० ---

‘ शांततेचा बिंदू ‘ या कवितेतले जगण्याचे जोखड म्हणजे वास्तवाबरोबरचा संघर्ष आणि ‘ भटकलो ज्यावरून ते रस्ते ‘ म्हणजे जमा झालेले सर्व अनुभव, हे लक्षात घेऊन कविता वाचून पाहा. ‘ अपूर्ण ‘ ही कविताही हाच संघर्ष वेगळ्या प्रकारे व्यक्त करते. जगण्यातली ‘ गुदमर ‘ जिवंत असेस्तोवर मला तरी व्यक्त करता येणे शक्य नाही आहे – माझ्या मृत्यूला ती शक्ती लाभो, असे ही कविता म्हणते ! तिसरी ‘ माणसं ‘ ही कविताही ‘ मेंटली ‘ श्वास घेणाऱ्या माणसांचीच आहे. मनाच्या उलट्यापालट्या कृती हेच जगणे ! प्रत्येकाचे वास्तव आणि वास्तवसंघर्ष वेगवेगळा असल्याने ही सर्व माणसे एकटी पडलेली आहेत. त्यांना ‘ एकटेपणाचा त्वचारोग ‘ झालेला आहे.

काहींना ही कविता दुर्बोध वाटते. त्यांच्याबरोबर ही कविता समजून घेण्याचा हा एक प्राथमिक प्रयत्न.

--- ००० ---

बिंदूत खूप जागा आहे (कवितासंग्रह) -- Priya Jamkar

कवी – प्रिया जामकर आणि प्रकाशक -- कॉपर कॉईन.

या संग्रहातल्या कवितांचे स्थायी सूत्र म्हटले तर ‘ खळबळीचा (वा क्षुब्धतेचा) अभाव ‘ हे आहे. ही त्रुटी सांगणे नसून फक्त वर्णन आहे. असे का आहे तर ही एक अत्यंत अपवादात्मक अशी ‘ कारणविहीन असमाधानाची ‘ कविता आहे. परिपूर्ण असमाधान. पण निमित्त न सांगणारी, रोष वा क्रोध नसणारी, जे आहे ते असमाधान जगणारी. वाचकात अमुक प्रकारचा प्रतिसाद यावा असा प्रयत्न ही कविता करत नाही. ती फक्त स्वतःचे आहे तसे असणे व्यक्त होते आणि निरपेक्ष राहते. ही प्रतिक्रियांची कविता नसून असण्याची कविता आहे. त्यामुळे ती सौम्य, नाजुक आणि हळुवार आहे. हे समजूनच ही वाचली जाऊ शकते. ना उत्तेजकता ना कुठला सनसनाटीपणा. असे असण्यात यातल्या काही कवितांचे अस्तित्व नीट आकारालाच न आल्याने अथवा आशयही सुटून गेल्यामुळे रांगोळीसारख्या त्या नुसत्याच नगण्य वाटतात. म्हटले तर हे अडथळे आहेत. तरीही, असे अडथळे ओलांडूनही वाचावी अशी ही ‘ वेगळी ‘ कविता आहे. नाही तरी बरेच कवी दोनचार कवितांच्या जिवावर अमर होतात, हे पाहता, पूर्ण व्यक्त होण्याचा नमूनाच वेगळा असलेली ही कविता मराठीत स्वागतार्ह ठरते. इथे ही कविता पाहा –

अस्वस्थ रान

कविता लिहिण्या आधी
अस्वस्थ रान उगवतं
शरीरभर
मी वेळ बंद करते
रानात घुसते
कधी गाते कविता
कधी ठिबकते
शब्द शब्द
कविता फोडते मला आतून.
मागते चित्त
मी देते
निवांत होते.

आता ‘ लोकहो ‘ या कवितेतल्या या ओळी बघा –

मी दिवसरात्र अथकपणे
स्वप्नाची निगराणी करतेय
माझ्या या कृतीला तुम्ही
वास्तवावरची प्रतिक्रिया समजाल का
लोकहो

या कविता प्रतिक्रियारूप नाहीच आहेत. इथे त्या अथांग ‘ अकारण ‘ असमाधानाचे जणू एक स्वतंत्र जगच निर्माण होतेय. त्यालाच ही कविता ‘ स्वप्न ‘ म्हणते. हे त्या असमाधानातून पळवाट शोधणेही नाहीय. जणू हा एक अंतिम टप्पा आहे. एका ठिकाणी, ती कोणत्याही गटाचा भाग नसल्याचे व्यक्त होते, एका ठिकाणी ती सुखी वा दुःखी नसणे व्यक्त होते. काही क्षणी हा पूर्ण असमाधानाचा टप्पा खरेच अंतिम ठरतो आणि अचानक त्यातून पूर्ण समाधान उमलते. एका ठिकाणी सहजच या ओळी येतात –

मी कुतूहलानं ताजी
होत चाललेय

पहिली गोष्ट म्हणजे ही एक अत्यंत प्रमाणिक आणि आत्मनिष्ठेची अशी कविता आहे. खूप प्रभावी होण्याचा प्रयत्न न करता आपल्या सखोल आशयाने व्यक्त होणारी. या कवितेत प्रतिमांची रेलचेल नाही. ही कविता आधुनिक जीवनातले संदर्भ मधे मधे यावेत असाही प्रयत्न करत नाही. या कवितेत येणारी गूढता ही भाषेमुळे येणारी नसून आशयाची आहे. या कवितेतला ‘ तू ‘ हा कधी तो अथांग असमाधानीपणा असतो तर कधी ती अवस्था फुटून त्यातून निर्माण होणारा मुक्तीचा क्षण. (हे दोन्ही ‘ तू ‘ कवितेत प्रियकराच्या रूपातही येतात.) पण, रूढ अर्थाने ही आध्यात्मिक कविता नाही. प्रत्यक्ष, या आहे या जगात जगण्याची ही एक खरी कविता आहे. तिखटजाळ प्रतिक्रिया देणारी, सुखदुःखांचे कढ आणणारी, उदासीचे वा निराशेचे मूड तयार करणारी अशी ही कविता नाही. यशस्वी होण्याचे प्रयत्नच नसल्याने या अभिव्यक्तीत बऱ्याच ठिकाणी अपूर्तता आणि आशय व्यक्तच न होणे, असेही घडलेले आहे. तरीही, जे ‘ सत्य ‘ काही कवितांतून सशक्तपणे व्यक्त होते ते पाहण्यासाठी अशा कविताही स्वीकारणे भाग आहे.

या कवितासंग्रहाचे सविस्तर परीक्षण करण्याचा इथे हेतू नाही. ते काम आपले दिग्गज समीक्षक करतील. या संग्रहाची प्रमुख वैशिष्ट्ये सांगावीत आणि या कवितांतल्या अपवादात्मकतेची नोंद करावी एवढ्याच माफक हेतूने हे लिहिले आहे. हा एक सुंदर खेळ पाहा –

तो अगम्य वाटतो तिला. ती खुळी त्याला.
ती सूक्ष्मदेहानं प्रवेशते देहात त्याच्या. तन्मय होते.
आतून ठोके ऐकतेय पण चेहरा मोहवतोय.
ती बाहेर येते. आनंदून त्याच्याकडे पहात बिलगते.
तो तिच्याकडे पाहतोय. ती अगम्य वाटतेय त्याला.
खुळाचय. ती हसते.
--- ००० ---

‘ रंगवाचा ‘ नोव्हेंबर २०१९.

‘ रंगवाचा ‘ चा नोव्हेंबर २०१९ चा अंक खास संग्राह्य म्हणावा असा झालेला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे, कमीजास्त अनुभवी असलेल्या अठरा दिग्दर्शकांनी यात त्यांच्या दिग्दर्शन प्रक्रियेबाबत लिहिलेले आहे. ‘ रंगवाचा ‘ ने त्यांना एक प्रश्नावली पाठवली होती आणि त्या अनुरोधाने त्यांनी बोलावे अशी ही योजना होती. त्यांनी संपर्क केलेले सगळेच दिग्दर्शक यात सहभागी झालेले नसले तरी या अठराजणांचे हे प्रगट चिंतनही पुढे या क्षेत्रात येणाऱ्यांसाठी मोलाचे ठरणार आहे. भले भले स्टार दिग्दर्शकही पुढील पिढ्यांसाठी असा फारसा उपयुक्त ऐवज ठेवत नाहीत, या आपल्या पार्श्वभूमीवर तर हा सर्व मजकूर फारच महत्त्वाचा ठरतो. दिग्दर्शकांचे वैचारिक व तात्त्विक चिंतन हे असे एका ठिकाणी उपलब्ध होण्याची ही एक अपवादात्मक घटना आहे. यात व्यावसायिक आणि प्रायोगिक म्हटल्या जाणाऱ्या दोन्ही बाजूंच्या दिग्दर्शकांचा समावेश आहे. अनेक व्यावहारिक अडचणींतून मार्ग काढत जाण्याबरोबरच आशयाच्या अभिव्यक्तिप्रक्रियेत येणारी आव्हाने आणि त्यांची निराकरणे यांचाही परामर्श या दिग्दर्शकांनी इथे घेतलेला आहे. हे सर्व, सर्वच दिग्दर्शकांना आणि विशेषतः नव्याने या क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या दिग्दर्शकांना मार्गदर्शक ठरू शकेल असे आहे. दिग्दर्शकांत असणारे वेगवेगळे दृष्टिकोन आणि नाटक बसवण्याच्या त्यांच्या वेगवेगळ्या पद्धती हे सर्वच उद्बोधक झालेले आहे.

या अंकासाठी मजकूर पाठवू न शकलेले पण ज्यांना संपर्क केला गेला होता अशा सर्वच दिग्दर्शकांशी पुन्हा एकदा संपर्क साधून त्यांचाही मजकूर मिळवायचा प्रयत्न करावा, असे सुचवावेसे वाटते. अशा या सर्वच दिग्दर्शकांच्या अनुभवाचे

आणि आकलनाचे एक पुस्तक निघू शकले तर वर्षानुवर्षे आपल्या रंगभूमीसाठी ती एक अमूल्य देन ठरेल हे निश्चित. या उपक्रमाबद्दल ' रंगवाचा ' चे मनःपूर्वक अभिनंदन ! आणि आणखी विशेष अभिनंदन हे यासाठी तयार केलेल्या प्रश्नावलीसाठी ! या अंकातला इतर सर्व मजकूरही दर्जेदार आहे.

सर्वच नाट्यकर्मींनी हा अंक एक अभ्यास म्हणून वाचावा आणि संग्रही ठेवावा, असे मी सुचवू इच्छितो.

--- ००० ---

' मग एकच धडकी '

-- तीन अंकी नाटक -- मूळ लेखक -- युजीन आयोनेस्को -- मराठी रूपांतर -- त्र्यं. वि. सरदेशमुख
-- सुविद्या प्रकाशन, सोलापूर.

माझे अत्यंत आवडते नाटक. खास प्रेमाने वाचले. काही वर्षांनी या नाटकाचा पुन्हा संबंध आला आणि छान वाटले ! धन्यवाद नीतिन वैद्य.

सुरुवातीला वैद्यांचे प्रास्ताविक असून शेवटी सरदेशमुखांचा आयोनेस्कोवरचा लेख आणि त्यांनी डॉ. लागूंना पाठवलेले पत्र आहे.

नाटकाचा वाचनानुभव चांगलाच येतो. पूर्वी हे कुणी मराठीत सादर केले होते का ते मला माहीत नाही. पण, आता हे रूपांतर उपलब्ध झालेले आहे, तर एखाद्या नाट्यसंस्थेने जरूर विचार करावा. किरकोळ काही बदल लागल्यास ते तालमींच्या ओघात होण्यासारखे आहे. नाटकाचा शेवट बदललेला दिसतोय. पूर्वी मी इंग्लिशमधून वाचले होते तेव्हा ते प्रेत ऍमिडीच्या (नरेशच्या) भोवती पॅरॅशूटसारखे गुंडाळले जाते आणि तो हवेत उडू लागतो आणि त्याची पत्नी मॅडलीन (माधुरी) खालून त्याला बोलावत असतानाही अदृश्य होतो, असे काही वाचल्याचे आठवते. मला तोच शेवट अत्यावश्यक वाटतो. सादर करणाऱ्यांनी ते ठरवावे.

नाट्याभ्यासासाठी आणि एकूणच मराठी वाचकांसाठी हे महत्त्वाचे नाटक, सरदेशमुखांच्या आयोनेस्कोवरच्या उत्तम लेखासह मराठीत उपलब्ध करून दिल्याबद्दल सुविद्या प्रकाशनाला धन्यवाद !

--- ००० ---

नितीन वैद्य

एखाद्या महत्त्वाच्या मराठी लेखकाच्या बाबतीत, त्याच्या मृत्यूनंतर, त्याच्या अप्रकाशित साहित्याचा असा पाठपुरावा करून, मागोवा घेऊन आणि संपादन करून ते लोकांपुढे आणण्याच्या कामाचे हे एक मौलिक उदाहरण म्हणावे लागेल -- नितीन वैद्य यांनी त्र्यं. वि. सरदेशमुखांच्या लेखनाबाबत केलेले काम ! त्यातलेच एक पुस्तक, ' त्र्यं. वि. सरदेशमुख -- साहित्य -- संदर्भसाहित्य ः सूची आणि चरित्रपट ' हे आहे. पुस्तक माहितिपूर्ण तर आहेच, पण, त्याचबरोबर निशिकांत ठकार यांनी सरदेशमुखांशी मारलेल्या गप्पांच्या साक्षात्काराचे परिशिष्टही वाचनीय आहे. व्यक्तिगत जीवनात अनेक संकटांशी सामना करत सरदेशमुखांनी केलेले वाचन-चिंतन-लेखन पाहून थक्क व्हायला होते !

हा एक महत्त्वाचा साहित्य-ऐवज प्रकाशित केल्याबद्दल सुविद्या प्रकाशनाचे अभिनंदन !

विदुर (कादंबरी) – ले० डॉ. कमलेश सोमण

या कादंबरीच्या प्रकाशनाला जाऊन आलो. आम्ही पुण्यात ‘ अवकाश कलामंच ‘ नामक एक नाट्यसंस्था काढली होती तेव्हापासून कमलेश मित्र आहेत. त्यांचा प्रबंध महेश एलकुंचवारांच्या नाटकांवर असून त्याचेही एक दर्जेदार पुस्तक निघालेले आहे. या प्रकाशनाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने या कादंबरीतल्या दोन प्रकरणांचे अभिवाचन आयोजित केलेले होते. अभिवाचक होते, स्वतः कमलेश आणि गौरी लागू. पार्श्वसंगीत होते अक्षय सोमण आणि त्यांचा चमू यांचे. (नंतर प्रमुख वक्ते होते श्री. श्री. वा. कुलकर्णी आणि प्रमुख पाहुणे होते कलर्सवरील ‘ स्वामिनी ‘ फेम अभिनेते गुरुराज अवधानी. त्या दोघांच्या भाषणांना मी थांबू शकलो नाही कारण मला ८ वाजता माझ्या धाकट्या नातीला तिच्या क्लासवरून घरी घेऊन जायचे होते.)

दोघेही अभिवाचक अत्युत्तम असल्याने सुमारे ६०-७० श्रोते पूर्ण मग्न होऊन ऐकत होते. कमलेशांनी ही कादंबरी, महाभारतातले तत्त्वचिंतन स्वतःत पूर्ण मुरवून लिहिलेली आहे, हे जाणवले. युद्धातला सगळा संहार होऊन गेल्यानंतर पांडव आणि श्रीकृष्ण, धृतराष्ट्र आणि गांधारी यांना भेटायला येतात, तो कथाभाग होता. ते येण्यापूर्वी विदुर धृतराष्ट्राशी बोलतो आणि नंतर तसेच गांधारीशीही बोलतो. पांडव आणि कृष्ण यांना क्षमा करावी आणि त्यांच्याबरोबर पुढे आनंदात

राहावे, असे त्याचे सांगणे असते. धृतराष्ट्रही त्याचा राग आवरू शकत नाही आणि नंतर गांधारीही. ते सर्व मुळातूनच ऐकण्या-वाचण्यासारखे आहे.

एवढ्या कथाभागातही हे व्यक्त झालेले आहे की मनाने घडलेली कोणतीच कृती ही पूर्ण बरोबर वा पूर्ण चूक अशी नसते. पांडवांच्या बाजूने सगळे समर्थनीय असले तरी धृतराष्ट्र आणि गांधारी यांचा क्रोधही समर्थनीय असतो. दोन्ही बाजूंनी काही ना काही चुकाही झालेल्या असतात. मानवी जगण्यातल्या या गुंतागुंतीचे आणि सर्वतः अमुकच बाजू घ्यावी असे काही नसते, याचे उत्तम भान या अभिवाचनाने दिले. इतका मोठा संहार घडून गेल्यानंतर क्षमेचा विषय समोर येणे हे जगण्यातले प्रतिक्रियेचे सातत्य तोडण्याचे तत्त्वज्ञान असते. अशा पद्धतीने पाहिल्यास नुसतेच या कादंबरीचे महाभारताचा कथाभाग म्हणून उदात्तीकरण करावे लागणार नाही. शेवटी जगण्याचे सार्थक घटनांच्या बाहेर आणि प्रतिक्रियांच्या बाहेर असल्याचे हे तत्त्वचिंतन हीच या कादंबरीची मूल्यात्मकता आहे.

मला खरे तर ऐतिहासिक वा पौराणिक असल्या प्रकारांची मानसिक ॲलर्जीच आहे. मी या प्रकारांच्या फंदातच पडत नाही. पण कमलेशांच्या मैत्रीमुळे गेलो आणि जाऊन येण्याचे पूर्ण सार्थक झाले.

सर्व संबंधितांचे अभिनंदन !

--- 000 ---

मला उमजलेला गालिब

आजच्या मटामध्ये गालिबवर एक लेख आलेला आहे. त्याच्या मृत्यूला १५० वर्षे झाल्याच्या निमित्ताने. तो जर १५ फेब्रुवारी १८६९ ला गेला असेल तर १५१ वर्षे झाली, १५० कशी ? पण, जाने दो – असल्या हिशोबांच्या पलिकडचा हा कवी आहे. हल्ली काहीही नुसते मोठे नसते – महा असते. हा तर खरोखरचा महाग्रेट कवी !

सुमारे ४५ वर्षांपूर्वी मी गालिब, सेतूमाधवराव पगडी यांच्या पुस्तकावरून समजून घेतला. त्या वेळी मी त्यातच बुडून गेलो होतो. इतके अर्थस्फोटक काही वाचण्याचा आनंद किती विलक्षण असतो ते मी अनुभवत होतो. मला उर्दूचा गंधही नाहीय. आता म्हणाल तर पुन्हा गालिबचा एकही शेर मला मुळातून समजणार नाही. पण, त्या वेळी, पगडींच्या कृपेने मी तो कण न कण समजून घेतला होता. त्यानंतर मी ‘ माझ्या गालिबच्या कविता ‘ या १४ कविता लिहिल्या. पूर्वी कुमार गंधर्वांनी ‘ मला उमजलेले बालगंधर्व ‘ असा एक कार्यक्रम घडवला होता. तसेच या माझ्या कवितांचे स्वरूप होते. मला गालिब कसा समजला त्याला मी अभिव्यक्ती दिली होती. गजलांचे पूर्ण व्याकरण न पाळता सैलसरपणे तो फॉर्म घेतला

होता. त्या कविता नंतर ‘ सत्यकथे ‘ च्या एका दिवाळी अंकात आल्या होत्या. माझ्या ‘ कोरी कविता ‘ या संग्रहात शेवटी या कविता आहेत. तो संग्रह माझ्या www.champralekhan.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. नमून्यादाखल त्यांतली ही एक छोटी कविता –

कविता आणि प्रिया सारख्याच आहेत
तुमच्या देण्याइतकीच परतफेड त्या करतात.

तुमच्या सर्वस्वाला त्यांचे सर्वस्व मिळते,
मग देण्याघेण्याच्या पद्धती काहीही असोत.

कविता आणि प्रिया सत्याचे सार आहेत, खरेच गालिब,
दोघींनाही खोटेपणा अजिबात खपत नाही.

ज्यांना उत्सुकता असेल त्यांनी त्या माझ्या कविता जरूर वाचा.

माझ्या या गालिबदोस्तीमुळे घडलेले दोन किस्से सांगतो –

१. कवी अरुण म्हात्रे यांचा कवितांचा काही कार्यक्रम पुण्यात होता. मला निमंत्रण होते म्हणून मी गेलो होतो. मला तिथे पोचायला जरा उशीर झाला होता. मी गेलो तेव्हा कार्यक्रम चालू होता. मी सुमपणे जाऊन मागे एका खुर्चीवर बसलो. ते अरुणने पाहिले. आणि त्याने कमालच केली ! ‘ माझ्या गालिबच्या कविता ‘ मधल्या काही ओळी त्याला पाठ होत्या, त्या त्याने म्हणायला सुरुवात केली ! “ तर, या ओळी लिहिणारे कवी चं. प्र. देशपांडे आत्ताच आलेले आहेत, त्यांचे स्वागत ! “ असे तो म्हणाला. श्रोत्यांनी टाळ्या वाजवल्या !

२. एकदा एका रात्री गिरीश पतके आणि मी पार्ले पूर्वेला होतो. वाटेत आम्ही एका बारमध्ये शिरलो. तर काय आश्चर्य ! मराठीतले तीन दिग्गज तिथे होते – सचिन खेडेकर, नलेश पाटील आणि किशोर कदम. मग आम्हीही त्यांच्यांतच गप्पा मारत बसलो. किशोरने माझा गालिब वाचलेला होता आणि तो त्या कवितांच्या बेहद्द प्रेमात होता. त्यावरच तो बोलत होता. (त्या मैफलीत मी उगीचच नलेश पाटलांशी वाद घातला होता – ते आता नाहीत – त्याची मला खरेच खंत वाटते !) आम्ही बाहेर पडलो तेव्हा थोडा पाऊस सुरू झाला होता. किशोर म्हणाला, “ या गालिबच्या दोस्ताबरोबर मला पावसात भिजायचेय – “ आणि खरेच त्याने मला त्याच्याबरोबर भिजायला लावले !

३. तिसरा किस्सा नंतर आठवला -- आणखी एक किस्सा नंतर आठवला, तोही सांगतो. तिकडे इंदूर-भोपाळकडे दोन गालिबप्रेमी मित्र होते. त्यांचे मला पत्र आले होते की माझ्या या गालिब-कविता वाचून त्यांना गालिब जसा समजला तसा पूर्वी समजला नव्हता ! मला हे महाप्रचंड वाटले ! माझे ज्ञानपीठच ते ! गालिब समजायला आपण उपयोगी पडणे !

" मै तो कुछ भी नही हूँ मालिक, मगर मै गालिबका दोस्त हूँ, ये ही मेरे लिये काफी है ! " असा एक नाट्यमय संवाद मी इथे म्हणेन. नुसता गालिबच नाही – गालिब आणि तुकाराम ! इथे मी हेही सुचवेन की माझ्या वरील संकेतस्थळावरच ' पहाट आणि तुकाराम ' या माझ्या ५० कवितांचा एक संग्रह आहे, तो अवश्य वाचा.

चला, या निमित्ताने माझा एक कवीपरमेश्वर आठवणीत आला ! गालिब समजून न घेता जे मरतील त्यांनी या पृथ्वीवरचा त्यांचा सगळा वेळ वाया घालवला, असे मी म्हणेन !

--- ००० ---

ऑर्फियस

काल, सागर तळाशीकरने एफबी लाईव्ह वर जी. ए. कुलकर्णी यांची ' ऑर्फियस ' ही कथा वाचली. कोरोना काळात लोकांची नुसतीच जत्रा करून करमणूक करत बसण्यापेक्षा जरा सांस्कृतिक व्यायाम करवणारा हा एक चांगला उपक्रम सागरने सुरू केलेला आहे. उत्तम आवाज, भाषेची समज आणि शब्द न शब्द नीट पोचायला हवा याचे भान ही सागरच्या वाचनाची गुणवैशिष्ट्ये आहेत. तो एक उत्तम अभिनेता आहे. ' राशोमान ' या जगप्रसिद्ध नाटकात त्याने जबरदस्त काम केले होते. त्याच्या सर्व कुवती व्यक्त होतील अशा संधी आपल्या सांस्कृतिक वातावरणात त्याला मिळालेल्या नाहीत, असे मला वाटते. ते आता, जो भी है ! मी ' ऑर्फियस ' या कथेबद्दलच लिहिणार आहे.

ऑर्फियस हे ग्रीक पुराणातले एक मिथकपात्र आहे. तो एक महान संगीतकार, कवी आणि प्रेषित होता. त्याने काही धर्मही सांगितला, असे म्हटले जाते. त्याची पत्नी युरिडाईस त्यांच्या विवाहाच्याच दिवशी सर्पदंशाने मृत्यू पावते आणि ऑर्फियस अत्यंत दुःखी होतो. नंतर तो पाताळलोकात जाऊन, त्याचे संगीत आणि काव्य यांचा देवांवर प्रभाव पाडून तिला पुन्हा पृथ्वीवरील प्रकाशजीवनाकडे नेण्याची संधी मिळवतो. पृथ्वीवर पोचेपर्यंत त्याने मागे वळून पाहायचे नाही, अशी या बाबतीतली अट असते. ती त्याच्याकडून मोडली गेल्याने क्षणात युरिडाईस पुन्हा मृत्यू पावते, अशी ती कथा आहे. हीच कथा आधाराला घेऊन जीएंनी त्यांची कथा लिहिलेली आहे. मानवी जीवनाबाबतची स्वतःची आकलनप्रक्रिया व्यक्त करण्यासाठीच जीए हे आव्हान घेतात, हे स्पष्ट आहे.

या कथेतले भाषिक फुलोरे आणि झगमगाट हे या कथेच्या माहोलासाठी योग्यच आहेत, असे म्हणता येईल. ती तर जीएंची खास क्षमताही आहे. पण, इथे मुख्यतः आपण या कथेच्या आशयाकडेच पाहू.

१ विवाहाच्याच दिवशी पत्नी युरिडाईस सर्पदंशाने मृत्यू पावल्याने ऑर्फियस दुःखी होतो आणि तिला परत आणायचे ठरवतो. आपल्याकडे, रामही पत्नी सीतेचे अपहरण झाल्यावर दुःखी होतो आणि तिला परत आणायचे ठरवतो. आपला यक्षही प्रेयसीच्या विरहाने व्याकूळ होतो. म्हणजेच मानवी जगणे हे घटनांतून सुखदुःख निर्माण करणारे असते. मग तो प्रेषित असो की देव असो की एक साधा यक्ष.

२ मूळ कथेतला ऑर्फियस एक महान वादक, कवी आणि प्रेषित आहे. इथला, जीएंच्या कथेतला ऑर्फियस काही त्या योग्यतेचा वाटत नाही. अवाढव्य भाषा वापरत जीए त्याला देव-देवता यांच्यापर्यंत आणून पोचवतात पण यात त्याचा काहीही स्पार्क दिसत नाही. तो एक सामान्य, सरधोपट, मिडिऑकर माणूसच असल्याचे पुढेही दिसत राहते. युरिडाईसला सोडवून नेताना त्याला अत्यंत हुशार समस्या काय दिसते तर आता ती पूर्वीसारखी असणार नाही. त्याला दिसणाऱ्या सौंदर्यावर, प्रसन्नतेवर कायम तिच्या मृत्यूच्या आठवणीची छाया राहील ! तर नकोच हे म्हणून मुद्दाम तो मागे वळून तिच्याकडे पाहतो आणि जाणीवपूर्वक देवाची अट मोडून तिला पुन्हा मृत्यूच्या पाताळलोकात जाऊ देतो ! यात काय विशेष अक्कलेचा भाग आहे ? एरवीही जगताना प्रत्येकाच्या स्मृती आणि मनोरचना वेगळ्याच असतात. ती समस्या टाळण्याचा उपाय कुठे उपलब्ध असतो ?

३ त्यांना जेव्हा दुसरी संधी मिळते तेव्हा ती युरिडाईस नाकारते. कारण काय तर तिने मृत्यूचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला आहे आणि ऑर्फियसने त्याच्या प्रिय व्यक्तीच्या मृत्यूचा अनुभव घेतलेला आहे – त्यामुळे त्यांचे जगणे पूर्वीसारखे असू शकणार नाही. नंतर पुन्हा, ती आधी मेली तर ऑर्फियसला फार दुःख होईल आणि तो आधी मेला तर तिला सहन होणार नाही ! यात तरी काय मोठी बुद्धिमत्ता दिसतेय ? हेही किरकोळच तर आहे. तेच अगदी अगाध ज्ञान असल्याप्रमाणे सादर केले गेलेय.

४ यातले देव-देवताही यांच्यासारखेच सामान्यच आहेत. शेवटी देवसाहेब म्हणतात की ऑर्फियस आणि युरिडाईस हे दोघेही शहाणे आहेत. का ? तर दोघांनाही आपल्या मर्यादा कळतात म्हणून ! दुः ख सहन करण्यातल्या आणि आकांक्षांची पूर्तता करण्यातल्या मर्यादा ! ये तो सबको मालूम रहता है ! यात खास असे अगाध, सखोल ज्ञान कसले आहे ? ! ते देव नामक इसम यालाच ज्ञान म्हणतेय !

देहमृत्यूचा अनुभव ही एक बालिश असली तरी ‘ अर्थपूर्ण ‘ कल्पना म्हणून स्वीकारली समजा तरी ही कथा कोणता आशय पोचवते ? माणसाच्या सुखाधारित सर्वसामान्य प्रतिक्रियांचा ! माणूस त्याच्या प्रभावयुक्ततेतून वागत असतो, हेच ना ? ही तर जन्नतकी हकीकत सगळ्यांनाच माहीत असते ! पण, हेच काहीतरी सखोल आहे असे समजणे म्हणजे, ‘ दिल बहलानेके लिये खयाल अच्छा है ‘, इतकेच !

जीएंच्या कथा मी बऱ्याच वर्षांपूर्वी वाचल्या होत्या. ते मराठीतले एक मोठे कथाकार आहेत, हेच माझ्या मनात बिंबलेले आहे. पण ही कथा मात्र मला पोरकट, बालिश वाटली.

सदर पोस्ट तुम्ही करमणूक म्हणूनही वाचू शकता वा गंभीरपणेही वाचू शकता. मी काही समीक्षक वगैरे नाही, पण, समीक्षकांनी, शेरेबाजी करणे वा व्हेग काहीतरी बोलणे यापेक्षा कोणत्याही कलाकृतीच्या आशयाच्या पाण्यात उतरले पाहिजे, असे मला वाटते. कोणत्याही कलाकृतीचा आशय पोचत जाण्याची प्रक्रिया या अंगाने जास्त लिहिले गेले पाहिजे. असो.

अगदी थोडक्यात लिहिले आहे. जीएंबद्दलचा आदर दुखावण्याचा वा उगीचच काही सनसनाटी लिहिण्याचा हेतू नाही हे फ्रेंडसनी समजून घ्यावे, हीच एक विनंती !

--- ००० ---

चित्तथरारक पुस्तक --

भंडारदरा धरण (पुनर्जन्माची कहाणी) – ले० मनोहर शियेकर, प्रका० रफल्स पब्लिकेशन सर्व्हिस, पुणे.

काहींना आश्चर्य वाटेल की मी या पुस्तकावर कसे काय लिहितोय. या पुस्तकाचा लेखक हा महाराष्ट्राचा एक अभिमानास्पद अभियंता असून तो माझा आतेभाऊ आहे. त्या नात्यामुळेच हे पुस्तक माझ्याकडे आले हे खरे असले तरी आपापल्या क्षेत्रात कशी उत्तुंग आव्हाने निर्माण होतात आणि ती कशी हिकमतीने पेलली जातात याची ही उद्बोधक आणि प्रेरणादायक कहाणी आहे. क्षेत्र कलेचे असो की शास्त्राचे निरनिराळ्या माणसांनी समस्यांना कसे तोंड दिले हे पाहणे हे पुढील पिढ्यांसाठी मौल्यवान असते. हे पुस्तक तसे फक्त पन्नास पानांचे असून आणखी काही पाने संबंधित माहितीची आहेत. सिव्हिल म्हणजे स्थापत्य अभियांत्रिकीच्या क्षेत्रात महाराष्ट्रात निर्माण झालेले एक प्रचंड आव्हान कसे पेलले गेले याची ही चित्तथरारक कहाणी आहे. कोणत्याही शाखेच्या अभियंत्यांनी तर ही वाचावीच पण तुमच्याआमच्यासारख्या इतर लोकांनीही वाचावी अशी आहे. विद्यार्थ्यांच्या वाचनातही हे पुस्तक समाविष्ट असेल तर अशा कामांसाठी त्यांचीही मानसिक तयारी करायला हे महत्त्वाचे ठरू शकते.

१९६७ च्या भूकंपात भंडारदरा धरणाला धक्का बसला आणि १९६९ साली त्याची एक भिंत असुरक्षित झाली. १९२६ साली बांधलेले हे धरण. हे धरण फुटले असते तर जीवितहानी आणि वित्तहानी प्रचंड झाली असती. ही भिंत दुरुस्त करण्याचे अत्यंत जोखमीचे, तांत्रिक कौशल्याचे आणि धाडसाने, धीराने करण्याचे हे काम होते. यासाठी जी अभियंत्यांची

टीम नेमण्यात आली तिचा कार्यकारी अभियंता हा माझा भाऊ होता. त्यामुळे, या अत्यंत महत्त्वाच्या कामाची प्रत्यक्ष हाताळणी केलेल्या माणसाकडूनच हे सर्व लिहिले गेले आहे. या कामातल्या तांत्रिक समस्या, निसर्गाशी स्पर्धा करत करावे लागणारे काम, असंख्य योजना, ताणतणाव, कुठून कोणते मटेरियल व यंत्रसामुग्री मिळवावी याचे प्रश्न – असे हे अनेकांगी आव्हान होते. या कामातल्या आपल्या लोकांच्या कौशल्यामुळे शासनाचे करोडो रुपये वाचणार होते. या शास्त्राचा अभ्यास असणाऱ्यांना हे सगळे अधिक बारकाईने समजावे म्हणून यात तक्ते व आकृत्याही दिलेल्या आहेत.

एक प्रसंग तर असा आला होता की एखाद्या गूढशास्त्रवाल्याला काही विचारावे असे ठरले ! त्या गूढशास्त्रवाल्याने ध्यानातून नेमकी समस्या सांगणे आणि अमुक कामगाराला धोका असल्याचे सांगणे – हा एक अजब भाग यात आहे !

हे पुस्तक सुविहीतपणे प्रसिद्ध होण्यात चंद्रमोहन हंगेकर यांचे विशेष योगदान झालेले आहे.

एकूणात आपले भंडारदरा धरण आयसीयूतून बाहेर पडून पुन्हा टुणटुणीत कसे झाले याची ही रंजक आणि ज्ञानवर्धक गोष्ट आहे. सदर दुरुस्तीनंतर आता अठ्ठेचाळीस वर्षे झालेली असूनही ते धरण धडधाकट आहे ! या प्रचंड कामात माझ्या आतेभावाचा एक महत्त्वपूर्ण सहभाग होता हे अर्थातच मला अभिमानाचे आहे.

--- ००० ---

चांदोबा

आपल्यापैकी अनेकांचे लहानपण ' चांदोबा ' या मासिकाने व्यापलेले होते. इतकी भरपूर आणि इतकी सुंदर रंगीत चित्रे असलेले मासिक त्या वेळी तरी ते एकमेव होते. ' विक्रम आणि वेताळ ' असो की आणखी शेकडो कथा असोत, त्यांची रंगीत चित्रे हे एक कायमचे आकर्षण होते. त्या वेळी फारसा विचार नसे -- ही सगळी चित्रे त्या गोष्टींसह आपोआप येतात असे मन गृहीत धरे. ते प्रत्येक चित्र प्रत्यक्षात काढावे लागते याचे भान नसे. तर ती खजिनास्वरूप चित्रे काढणारे महान चित्रकार के सी शिवशंकर हे गेल्या २९ तारखेला ९७ व्या वर्षी वारले. त्या मासिकाची किमया -- जादू अशी होती की ते पुढे भारतातल्या बहुतेक सर्व महत्त्वाच्या भाषांतून निघू लागले ! ' चांदोबा ' हा शब्द वेगळ्याच अर्थाने भाषेत समाविष्ट झाला. जी ए कुलकर्णी यांच्या कथांची ज्यांना टर उडवायची असते ते महाभाग म्हणतात की जीए म्हणजे मोठ्यांचा चांदोबा होते !

कै शिवशंकर यांनी आपले बालपण सजवून दिले ! त्याबद्दल मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करायलाच हवी ! दरमहा ही अशी भरजरी रंगतदार ग्रेट चित्रे !

ग्रेट कलाकार ! त्यांच्या स्मृतीस सादर अभिवादन !

--- ००० ---

पुष्पा भावे

विचारवंत, अभ्यासक, विशेषतः नाट्यसमीक्षक पुष्पा भावे गेल्या ! माझी अनेक नाटके त्यांनी पाहिली होती. ' साधना ' च्या नाट्यसंमेलनासाठी पुण्याहून आम्ही एकत्र गप्पा मारत नाशिकला गेलो होतो. त्या आणि मी तिथे गोपूंच्या बीजभाषणावर बोललो. त्या सौम्य स्वभावाच्या पण स्पष्टवक्त्या होत्या. कलावंत, लेखक यांच्याबद्दल त्यांना विशेष आस्था होती.

त्यांच्या स्मृतीस आदरपूर्वक नमन !

--- ००० ---

‘ काळोखाच्या कविता ‘ – नामदेव कोळी – वर्णमुद्रा प्रकाशन.

या कवितांतला अनुभवाचा परिसर म्हणजे शेतमजुराचे आणि त्याच्या कुटुंबाचे जगणे. त्यातला काच, अन्याय, अभाव आणि अनेक दुःखांचे सततचे सान्निध्य. ही तर विद्रोही कवितांचीच भूमी. इतक्या अभावग्रस्त जगण्यात कसली कला आणि कसली संस्कृती ? आणि असे वाटणे अर्थात योग्यच आहे. मनात सतत एक अन्याय सहन करत असल्याची भावना असल्यावर क्रोध आणि विद्रोह येणारच. याच कल्पनेने हा संग्रह वाचू लागलो तर वेगळेच लक्षात येऊ लागले. मुख्य म्हणजे या विद्रोहाच्या कविता नाहीत. यांत आक्रस्ताळेपणा, संघर्षमयता, काही समूहांना वा एकूण समाजालाच शत्रू समजणे, असे काही जाणवत नाही. त्यामुळे या कविता अधिक मोठ्या वाचकवर्गाला पोचतील आणि या जगण्याबाबतची सार्वत्रिक संवेदनशीलता वाढवतील, असे मला वाटते. विद्रोहाइतकाच प्रभावी असा हाही एक मार्ग आहे परिवर्तनाचा. या कवितांची कुवत आणि आवाका अधोरेखित करणारी पान ७१ वरची ही कविता, ‘ तुमचं मन ‘ मला विशेष लक्षणीय वाटली. ती अशी आहे –

तुमचं मन
तुम्ही आदळले जाता जिवंत सापळ्यांवर
आत-बाहेरून होत जाता खिळखिळे
तुमचा देहही हाती लागेल अंत्यविधीसाठी
याची नाहीये कुठलीच शाश्वती

तुम्ही करू शकत नाही प्रेम कुणावर

नपुंसकत्व वाढत जातं भयाण वेगानं

कुणाकडून प्रेमाची अपेक्षाही ठेवणं व्यर्थ

तुम्ही निगराणीत असता छुप्या डोळ्यांच्या

तुमची कैद भोगत असता तुम्ही निमूटपणे

तुमची हालचाल राहात नाही नैसर्गिक

तुम्ही बनत जाता मशीन

जिची सूत्रं असतात तिसऱ्याच हाती

अन मेंदूतली तबकडीही

घासून घासून होत जाते रिकामी

तुम्ही कुठे बोलू शकता पूर्वीसारखं

तुमची बोलती बंद झालेली गोंगाटात

तुमचं मनही नसतं आसपास

ते तर पोखरत असतं भूतकाळ

भटकत राहतं राना-वनात

जाऊन बसतं डोहाच्या खोल तळाशी

-- ही कविता एक प्रकारच्या दूरीभावातून लिहिली गेलेली आहे. जगण्यातल्या स्वातंत्र्याचा पूर्ण नाश हा प्रत्येक वाचकाला पोचावा इतक्या बारकाईने आणि तीव्रतेने इथे व्यक्त झालेला आहे. ‘ तुमची हालचाल राहात नाही नैसर्गिक ‘ ही तर जबरदस्त अर्थवत्तेची ओळ आहे. या कवितेला कलात्मकतेचे वा अर्थसंपृक्ततेचे वावडे नाही. अशा गोळीबंद अभिव्यक्ती या संग्रहात अनेक ठिकाणी आहेत. सुखाचे मरण (पान २२), ‘ तिला अंगवळणी पडला / इथला मोहमयी बंदिवास ‘ (२९), ‘ खरं तर तोंडपाठ आहे त्याला अख्खं जंगल ‘ (३९), ‘ स्वतःमध्येच मेलेला ‘ (४१), ‘ बापाला घरोबा सोडायचा नव्हता / आणि पाटलाला माझ्यातला मजूर ‘ (४७), ‘ जिंदगीची माटी झालेल्या / या मातकट चेहऱ्याच्या बाया ‘ (४८), ‘ शहरातल्या सरकारी दवाखान्यात भरती झालंय गाव ‘ (५५), ‘ ती कविता शहरात हरवलेल्या दिवसांत वाचलीय ‘ (७०), अशा संपृक्त अभिव्यक्ती अनेक ठिकाणी आहेत.

या कवितेत सामूहिकतेचा आक्रोश नसून एकाकीपणाचे जडत्व आहे. या कवीने अभिव्यक्तीचा हा त्याचा स्वाभाविक मार्ग निवडणे हे खरोखरच काहीसे स्तिमित करणारे आहे. ही ग्रामीण, दलित, विद्रोही अशा कोणत्याही विभागवारीतली कविता नाही. माणसाचे अन्यायग्रस्त जगणे, माणसाच्या जगण्यातली परतंत्रता यांची ही कविता आहे. इथे नुसते तपशील महत्त्वाचे राहात नाहीत. त्यामुळे, या कवितेला एक सार्वत्रिकतेचा आयाम प्राप्त होतो.

डॉ. भरतसिंग पाटील यांचे प्रास्ताविक आणि दा. गो. काळे यांचे अंतपान दोन्ही अतिशय समर्पक आहेत. खास विद्रोहाच्याच म्हणाव्या अशा भूमीतून हे एक वेगळेच झाड उगवून यावे ही मराठीच्या दृष्टीने एक लक्षवेधी घटना आहे.

--- ००० ---

' रंगवाचा ' दिवाळी २०२०.

प्रथम ' रंगवाचा ' चे मनःपूर्वक अभिनंदन ! या कोव्हिडच्या वातावरणात असा संग्राह्य मजकूराने गच्च भरलेला दिवाळी अंक काढणे ही साधी गोष्ट नाही. मजकूर तर दर्जेदार आहेच, शिवाय सादरीकरणही आकर्षक आणि बिनचूक आहे. संपादक मंडळ आणि सल्लागार मंडळ हे दोन्ही अनुभवी, सर्जक आणि कार्यक्षम असल्याशिवाय हे शक्यच नसते झाले. यातले ' अल्काझी स्मृती ' आणि ' पडझड आणि उभारी ' हे दोन विशेष विभाग खास उल्लेखनीय आहेत. अल्काझींबाबतचा विभाग विशेषतः नाट्य अभ्यासकांसाठी खूपच उपयुक्त झालेला असून, ' पडझड ' हा विभाग या कोव्हिड काळात ठिकठिकाणी नाट्यकर्मी या संकटाचा कसा मुकाबला करत आहेत याची उत्तम माहिती देणारा आहे. एकूण अंकच उत्तम झालेला आहे, तरीही, मला कमलाकर सोनटक्के, सुप्रिया विनोद, दत्ता पाटील आणि अस्मित पाठारे यांचे लेख विशेष वाटले.

पूर्ण अंकावर तपशीलवार लिहिण्याचा इथे हेतू नाही. फक्त अल्काझी विभागावर थोडे लिहितोय. या विभागात बरेचसे, महती सांगणे, गुणगान करणे आणि आदर व्यक्त करणे हेच असणार हे मान्य असले तरी, प्रत्यक्ष शिक्षण देण्याची त्यांची पद्धत, नाटक बसवतानाचे त्यांचे काही उद्गार वा विचार आणि एकूणच त्यांची दिग्दर्शनाची पद्धत यांबाबत सलग माहिती यात कुठे मिळत नाही. मग, खुद्द अल्काझींच्याच एका भाषणाचा अनुवाद असलेला लेख या दृष्टीने अधिक महत्त्वाचा ठरतो. ' अभिनेत्याचे प्रशिक्षण ' या विषयावरचा हा लेख आहे. इथे त्यांचे सलग विचार मिळतील म्हणून आपण त्यावर लक्ष केंद्रित करतो. या लेखात अल्काझींनी बऱ्याच मुद्यांना स्पर्श केलेला आहे. त्यांतले काही पाहू –

१. भारतीय रंगभूमीची सध्याची अवस्था धूसर आहे – ना परंपरेची नीट जाणीव ना बाहेरील प्रभावांना नीट आपलेसे करून घेणे. विशेष प्रकारच्या कोणत्याही अभिनयाची मागणी करणारी एखादी ठोस व्यवस्थाच अस्तित्वात नाही. -- या गोष्टी अभिनय प्रशिक्षणातले अडथळे वा कमतरता आहेत का, असा इथे प्रश्न येतो.

२. रंगभूमीला जिवंत राहायचे असेल तर तिला आधुनिक असावे लागेल. म्हणजे काय हे इथे थोडे स्पष्ट व्हायला हवे. यशस्वी व्यावसायिक रंगभूमी अभिनेत्यांना भ्रमाधारित चुकीच्या कल्पना देते, असे पुढे एका ठिकाणी ते म्हणतात. म्हणजे ग्लॅमर मिळवणारा अभिनय हा उथळ वा चीप अभिनय का ? तो वेगळा म्हणजे कसा असतो ? आधुनिक असणे आणि भ्रमांनी प्रभावित नसणे – हे जरा अधिक स्पष्ट व्हायला हवे होते, असे वाटले.

३. अभिनयाच्या कोणत्याही शैलीला तिच्या परंपरेतील समकालात अभिनीत होण्याची पद्धत म्हणून स्वीकारले पाहिजे. हा मुद्दा स्पष्ट करताना ते म्हणतात की संस्कृत नाटकांची आता होणारी सादरीकरणे पाहून ते चिंतित होतात. पारंपरिक शैलीतली नाटके आजच्या वास्तववादी शैलीत सादर होणे हे त्यांना तुटकपणा निर्माण करणारे वाटते. ते पुढे असेही म्हणतात की जुन्या संस्कृत नाटकाच्या आशयाची मोडतोड न होता ते आजच्या भाषेत बोलले जायला हवे. हे दोन्ही एकत्र कळायला जरा अवघड जाते.

४. ते एक खूप चांगला मुद्दा मांडतात की अभिनयाच्या विद्यार्थ्याला आपला भवताल समजून घ्यायला तयार केले पाहिजे. पण ते कसे, एखाद्या विचारसरणीच्या वा तत्त्वज्ञानाच्या मदतीने की कसे ?

५. विद्यार्थ्याची एक प्रकारे कोरी पाटी असण्याला ते महत्त्व देतात. आणि शेवटी म्हणतात की ' उचित कलात्मक दृष्टिकोण ' असलेल्याच्या मार्गदर्शनाखाली अभिनय शिकवला जावा – आणि हेच ते अधिक क्लियर करतात – ' दृष्टिकोणाला चालना द्यायची आहे ' असे शब्द वापरले आहेत, ' दृष्टिकोण थोपवायचा आहे ' असे नाही. मग एका दृष्टिकोणाला चालना मिळालेला अभिनेता म्हणजे काय, हे कळत नाही. असो.

-- या लेखातले बरेच मुद्दे तज्ज्ञांनी, प्रशिक्षकांनी, दिग्दर्शकांनी आणि खुद्द अभिनेत्यांनीही चर्चा करावी, असे आहेत. तशा चर्चेतून काही अंतिम निष्कर्ष निघावेत असे नाही पण या अशा चिंतनात अंतर्भूत असणाऱ्या सर्व बाजूंचे भान तरी त्यामुळे नक्कीच वाढू शकेल.

-- असा सर्वगुणसंपन्न दर्जेदार दिवाळी अंक काढल्याबद्दल कणकवलीच्या वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठानचे पुन्हा एकदा अभिनंदन आणि त्यांना नाट्यकर्मींतर्फे धन्यवाद !

--- ००० ---

नाटक एक मुक्त चिंतन

0 रवींद्र दामोदर लाखे 0 ग्रंथाली प्रकाशन.

मुख्य म्हणजे, हे पुस्तक वाचून खूप आनंद झाला ! वाचताना मध्येही राहवेना म्हणून या आनंदाबाबत लाख्यांना फोन करून सांगितले. आपल्याकडे चांगले आणि नामवंत दिग्दर्शक झाले नाहीत असे नाही, पण , कुणीही नाट्यकलेबाबतचे स्वत:चे चिंतन या पद्धतीने मांडून ठेवले नाही. काहींनी आत्मचरित्रे लिहिली पण ती प्रामुख्याने आम्ही कसे ग्रेट झालो यावर होती. त्यांच्या चिंतनाचे दोनचार तुकडे त्यांतून शोधून काढावे लागतील, अशी. याला अपवाद म्हणता येतील ते म्हणजे अतुल पेंठे आणि कुमार सोहोनी. आणि आता लाख्यांचे हे पुस्तक.

हे पुस्तक खरे तर नुसतेच नाटक या कलेबद्दलचे नसून जगण्याच्या कलेबाबतचेही आहे, असे म्हणता येईल. पण आपण याकडे नाटक या क्षेत्रापुरतेच पाहू. नट हा खेळाडू (चापल्य) आणि तत्त्वज्ञ (गांभीर्य) असावा अशा अर्थाचे एक वाक्य

सर्वांनाच पाठ असते, पण त्याचा अर्थ नसतो माहीत. सर्वच तंत्रज्ञ आणि दिग्दर्शकही तत्त्वज्ञच असावे लागतात, म्हणजे काय ? त्याचा अर्थ त्यांनी कांट, हेगेल वा सार्त्र असावे लागते असा नाही. मनाने, समजुतीच्या प्रक्रियेने ते तत्त्वज्ञ असावे लागतात. ‘ मी, माझे, मला ‘ या हव्यासाचे लोक चांगले कलावंत नाही होऊ शकत. तुकारामाचा अशा अर्थाचा एक अभंग आहे की कीर्तनकाराचा नंतर मिळणाऱ्या दक्षिणेवर डोळा असू नये, त्यासाठी त्याने कीर्तन करू नये. त्याचप्रमाणे, नाट्यकला ही सर्वस्व अर्पण करत आत्मसात होणारी कला आहे. या छोटेखानी पुस्तकात ते लाख्यांनी अत्यंत प्रभावीपणे आणि गांभीर्याने विशद केलेले आहे.

हे पुस्तक का, कसे चांगले आहे हे सविस्तर सांगायचे म्हणजे या पुस्तकाइतकीच वा त्याहून जास्त पाने लिहावी लागतील. ते अर्थातच मी करणार नाही. नाटकाची सगळी तंत्रे आणि एकूणच नाटक ही एक कलाकृती म्हणून उभी राहण्याची अगदी तालमीपासूनची प्रक्रिया यांचे अत्यंत सखोल चिंतन या पुस्तकात आहे. मराठीत नाटकाच्या बाबतीतले हे एक बीजपुस्तक ठरू शकते.

पण मुद्दा असा आहे की मराठीत – या पुरोगामी महाराष्ट्रात – हवेय कुणाला हे असले पुस्तक ? अशा गांभीर्याने या कलेकडे पाहणाऱ्या चार लोकांचा तरी समूह इथे एकत्र जमा होणे शक्य आहे का ? यशासाठी आणि वलयासाठी हपापलेपणा हा या कलाक्षेत्रातला एक मोठा रोग आहे. दुसरा मुद्दा अधिकच गंभीर आणि असाध्य म्हणावा असा आहे. तत्त्वज्ञानात्मक गांभीर्य म्हणजे ते झाले आध्यात्मिक ! लगेच द्या टाकून, अशी प्रवृत्ती बोकाळलेली आहे. एका ठिकाणी, या पुस्तकात नटराजाची मूर्ती आणि नाट्यकलेच्या संदर्भातला तिचा अर्थ हा सविस्तर मजकूर पाहूनच काहींना अलर्जी होऊ शकते. धार्मिक अवडंबर आणि कर्मकांड हे वाईटच आणि घातकच, यात वाद नाही, पण त्याचबरोबर तत्त्वज्ञानात्मक, आध्यात्मिक समजुतीच्या प्रक्रियेचाही त्याग व्हायला हवा, असे समजणे, हे कोणत्याही कलाक्षेत्राची हानी करणारेच आहे. हे एक अत्युत्तम पुस्तक मराठीत आलेले आहे. ते नुसतेच पालखीत ठेवले जाऊ नये. महाराष्ट्रातल्या पिढ्या न पिढ्यांना उपयोगी पडणारा हा एक अमूल्य ऐवज आहे, असे मला वाटते.

--- 000 ---

जीवेलागणीच्या कविता

0 रवींद्र दामोदर लाखे 0 वर्णमुद्रा प्रकाशन’

कुठल्याही गोष्टीची कधीही कशाशीही गाठ पडेल आणि त्यातून निर्माण झालेल्या अनाकलनीय गुंतागुंतीतून आपल्या ‘ स्व ‘ ची शकले उडू शकतील – अशी जगण्यातली गुंतागुंत, अनिश्चितता आणि निरर्थकता मान्य असलेली अशी ही लाख्यांची कविता आहे. पण याचा अर्थ ती दु:खाची वा निराशेची कविता आहे असे नाही. ही निरर्थकता म्हणजे ‘ आहे ते पाहणे ‘ या प्रकारची आहे. यापूर्वी मी दोनतीनदा लाख्यांच्या कवितेवर लिहिलेले आहे. आता फार नाही लिहीत. मराठीत ही एक स्वतंत्र पद्धतीची वेगळी कविता आहे, एवढे म्हणून ठेवतो. घटनांना ताळतंत्र नसल्याचा अनुभव देणारी आणि

आपल्या जगण्याकडे पाहण्याची एक दूरस्थ दृष्टी देणारी अशी ही कविता आहे. वाचता वाचता (त्या त्या वेळच्या मूडप्रमाणे) आवडलेल्या कविता – कुठंतरी (27), लाईफ (46), मजकूर (76), माळी (81), बंद दरवाजा (86).

ही कविता म्हणते --

तुमच्या-माझ्यात फरक

गूढतेचा गोडवा चाखेस्तोवर केवळ (21).

--- 000 ---

रीलया

– कथासंग्रह – रवींद्र दामोदर लाखे – पार पब्लिकेशन्स.

रीलया म्हणजे काय हे मी लाख्यांना फोन करून विचारले. त्यांनी हा शब्द कसा तयार झाला वगैरे सांगितले. म्हटले ते ठीक आहे. मी मला समजलेय ते लिहीन. या कथांत जसे कुठूनही, काहीही एकत्र येईल, त्याच्यातून तिसरेच काही निघेल आणि म्हटले तर असंबद्ध विचारही कथेचा भाग बनतील – तसा हा शब्द आहे – अपघाताने काही अक्षरे एकत्र येऊन घडलेला – शब्दकोशातला कोणताही अर्थ नसलेला – या अर्थाने निरर्थक. लाख्यांना हे पटले – ते म्हणाले की आम्हीही आता हाच निरर्थ सांगत जाऊ.

उत्तम आहेत कथा. प्राणी, पक्षी, वस्तू , माणसे, निसर्ग, काहीही, भूत, भविष्य, वर्तमान, वास्तव, स्वप्ने – हे सगळे स्वतंत्र मूल्यात्मकतेशिवाय इथे आहे. निवेदन कुणाहीवरून सुरू होईल आणि कुठेही जाईल – ना या कथांना पात्रांची संगती असेल ना विशिष्ट घटनाक्रम ना कोणती कारण-परिणाम साखळी. प्रत्येक घटनेला जणू हजारो वर्षांचा भूतकाळ आहे – एखादी उथळ मालिका कुठली दाखवणार ? तरीही या कथाच आहेत – कथेत असणारी एक किमान उत्सुकतेची मात्रा इथेही आहे. या कथांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा चिंतनात्मक बाज. म्हटले तर हा संज्ञाप्रवाहासारखा आहे आणि म्हटले तर तत्त्वचिंतनासारखाही. अशा कथा मराठीत फारच विरळा आहेत. ही एक अगदी वेगळीच सघन शैली आहे. काही प्रमाणात ही शैली संगीतकलेशी साधर्म्य सांगते तर काही प्रमाणात अमूर्त चित्रकलेशी. ही एक स्वतंत्र, खुली, मुक्त शैली आहे. यामुळे लेखकाला जगण्यातल्या मूलभूत प्रश्नांबाबत हवे तेव्हा हवे तितके बोलता येते. तरीही ते त्या त्या कथेचा एकसंध भागच असते. त्याचे वेगळे असे अस्तित्व जाणवतही नाही. मराठीत एक वेगळेच अनपेक्षित आशयघन दालन खुले करून देणाऱ्या या कथा आहेत.

एकेका कथेचा विषय-आशय सांगत बसण्यात अर्थ नाही – खरे तर तसा तो सांगताही येणार नाही. समग्र विश्व जणू एकत्रितपणे आणि समग्रपणेही हाताळणाऱ्या या कथा आहेत. तरीही, यांच्या बाबतीत एक प्रश्न पडू शकतो. समजा एकदोन कथा वाचल्यावर ही शैली समजली आणि एकूण कथांना वा पात्रांना फार स्वतंत्र ओळख असण्याचा इथे प्रश्न नाही, हे समजले तर पुढच्या सगळ्या कथा वाचायची गरजच काय ? असे वाटणे हा या शैलीचा दोष तर नाही म्हणता

येणार ? पण, थोडा विचार करता आणखी एक मुद्दा लक्षात येतो. इथे जवळ जवळ प्रत्येक पानावर विजेचा धक्का म्हणावीत अशी अनेक समृद्ध वाक्ये आहेत. ती त्या त्या निवेदनाच्या ओघातच येणारी आहेत. आणि त्यांच्यामुळे प्रत्येक पान आशयनावीन्याने उजळून निघत आहे. या वैशिष्ट्यामुळे प्रत्येक कथेचे स्वतंत्र अस्तित्व समर्थनीय ठरते आहे.
उदाहरणार्थ येईल त्या पानावरची न निवडलेली ही वाक्ये पहा –
“ प्रेमात सफरिंगची मजा असते. सफरिंग ही मजेची गोष्ट वाटायला मन कसं असायला हवं ? “ (११२)
“ कित्येक मुलींच्या मनांत लग्नाच्या आदल्या दिवशी लग्न न करण्याचं येतं. त्या उद्याचा दिवस उजाडू नये अशी प्रार्थना करत झोपतात. “ (११०)
-- अशी शेकडो वाक्ये या कथासंग्रहात आहेत.
मराठी कथेला वेगळेच आयाम आणि ऊंची आणि खोली देणारा कथासंग्रह !
लेखक आणि प्रकाशक यांचे अभिनंदन ! आणि खास रेखाटनांबद्दल चारुदत्त पांडे यांचेही !
--- ००० ---

आरभाट नोंदींचे प्रकरण

० रवींद्र दामोदर लाखे -- ० शब्दमल्हार प्रकाशन.
जी. ए. कुलकर्णी यांच्या एका पुस्तकाचे नाव आहे, ‘ माणसे अरभाट आणि चिल्लर. ‘ मूळ कानडी असलेला तोच शब्द ‘आरभाट ‘ असाही लिहिला जातो. मोठे, महत्त्वाचे असा त्याचा अर्थ आहे. लाख्यांच्या या पुस्तकातल्या बऱ्याच नोंदी या छोट्या छोट्याच आहेत. मग त्यांना आरभाट का म्हणायचे, तर मला असे दिसते की आपल्या सवयीतल्या पाहण्यापासून लांब असणाऱ्या अशा या नोंदी आहेत. एकदा सवयीतले नाही म्हटल्यावर ‘ किती सवयीबाहेरचे ‘ हे मोजणार कसे ? नोंद आकाराने वा ओळींनी कशीही छोटी-मोठी असो, ती सवयीबाहेरची असणे हेच तिचे मोठेपण वा महत्त्व आहे. या अर्थाने या पुस्तकाचे नाव स्वीकारायला हरकत नाही.
“ आपण स्वत: बिनमहत्त्वाचं होऊन जावं. म्हणजे आपलं जगणं बिनमहत्त्वाचं होईल . अखिल मानवजातीचं जगणं बिनमहत्त्वाचं होईल. सगळं सगळं बिनमहत्त्वाचं झालं की जगणं कितीही सुंदर झालं तरी तो बिनमहत्त्वाचा उत्सव असेल. तो आपण आनंदानं साजरा करावा. “ (पृ . १११). – हे या नोंदींचे सूत्र म्हणता येईल. स्वला महत्त्व देत त्याला केंद्रस्थानी ठेवून पाहणे, हे झाले सवयीचे पाहणे. हे तसे नाही. पाहण्यातल्या या आमूलाग्र वेगळेपणामुळे या नोंदी विशेष, नावीन्यपूर्ण झालेल्या आहेत.
रूटीन गोष्टींपासून ते अपवादात्मक अशा सनसनाटी बाबींच्याही नोंदी यात आहेत. हे नुसतेच नावीन्य नसून ही एक आशय-सघनताही आहे. चंद्रमोहनजींचे कल्पक मुखपृष्ठ खासच !

--- ००० ---

पॅरानोया (कवितासंग्रह)

० हेमंत दिवटे ० पोएट्रीवाला प्रकाशन.

हेमंत दिवटे हे नाव सतत आघाडीवर राहून झळकत राहणारे नाव नाही. त्यामुळे, थोडी माहिती देतो. दिवटे हे ' अभिधानंतर ' या वाङमयीन नियतकालिकाचे संपादक होते. (त्यात त्यांच्याबरोबर सचिन केतकरही होते.) त्यावेळी ते सगळे अंक मी वाचले होते. उत्तम दर्जा आणि तसेच दर्जेदार सादरीकरण यासाठी ते लक्षात आहेत. त्यांच्या पोएट्रीवाला या प्रकाशन संस्थेतर्फे त्यांनी काही उत्तम कवितासंग्रहही प्रकाशित केलेले आहेत. ' व्हायरस अलर्ट ' या नावाने त्यांचा एक कवितासंग्रह दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांनी इंग्रजीत अनुवाद केलेला आहे. ही बाब त्यांचे महत्त्व जाणवून देण्यास पुरेशी आहे. शिवाय, आंतरराष्ट्रीय समुदायात कविता वाचनासाठी ज्याला निमंत्रणे येतात असा हा मराठीतला एकमेव कवी असावा. कोणतीही आक्रमकता न करता शांतपणे, संवेदनशीलपणे आपले काम करत राहणारी ही व्यक्ती आहे.

दिवाट्यांचा, ' पॅरानोया ' हा एक कवितासंग्रह अलीकडेच प्रकाशित झालेला आहे. पॅरानोया ही एक मानसिक विकृती असून तो एक रोगच आहे. हा रोग झालेल्या व्यक्तीला प्रत्येकाबद्दल अविश्वास आणि भीती वाटत असते. लोक माझ्याविरुद्ध कारस्थाने करत आहेत, ते मला मारणार आहेत, अशा प्रकारच्या भयग्रस्त मानसिक अवस्थेत ती व्यक्ती असते. आपण कधीही या ना त्या प्रकारच्या हिंसेचे शिकार होणार आहोत अशी ही दृढ मानसिक अवस्था असते.

कवितासंग्रहाला दिवाट्यांनी हे नाव का दिले असावे ? त्या रोगात तर ती रोगी व्यक्ती वास्तवात नसलेल्या गोष्टींची काल्पनिक भीती बाळगत असते. इथे कोणत्या काल्पनिक भीती आहेत ? तर, मला वाटते, कवीला असे म्हणायचे आहे की ती रोगी व्यक्ती जे काल्पनिक वास्तव तयार करते तेच आजचे प्रत्यक्ष वास्तव आहे. पूर्ण समाज आणि सर्वच व्यक्ती त्या वास्तवाच्या शिकार झालेल्या आहेत. तोच रोग आता प्रत्यक्ष वास्तवावर आधारला गेलेला आहे ! हे भयानक आहे ! कुणाचाही कुणावर विश्वास नसणे आणि सर्वांनाच सर्वांची भीती असणे ! या कवितासंग्रहाचे हे शीर्षकच आजच्या जगण्यावरचे एक विदारक भाष्य आहे.

या संग्रहातल्या काही ओळी बघा –

सततच्या दहशतीची सवय एक
व्यसन हे कधीही न सुटणारं
एकदा ते लागलं तर पुन्हा कधी ते
सुटता सुटत नाही (पृ. १४)

मॅनईटर मॉबला

संपवून टाकायचाय मध्यमवर्ग (पृ. १७)

हत्या करून टाकायची

कुणाच्याही नकळत

स्वत:तल्या स्वत:ची (पृ. २२)

मीही गंजत चाललोय

देशही गंजत चाललाय

जगही ...

जंग जंग

गंज गंज (पृ. २६)

– आजच्या जगात जगणाऱ्या एका संवेदनशील व्यक्तीच्या या प्रामाणिक प्रतिक्रिया आहेत.

संग्रहाचे सादरीकरण अत्युत्तम आहे.

--- ००० ---

भगवान ट्रिप (कवितासंग्रह)

० मन्या जोशी ० पोएट्रीवाला प्रकाशन.

मन्या जोशी हा कवी मला माहीतच नव्हता. याच्या सुट्या कविता कधी कुठे दिसल्या नाहीत. कुणाच्या बोलण्या-लिहिण्यातही याचे कुठे उल्लेख आले नाहीत. पण, हा कवितासंग्रह वाचला आणि लक्षात आले की अरे, हा तर आजच्या पिढीचा जादूगार कवी आहे. चार चार चेंडू हवेत उडवत-झेलत राहण्याची भाषिक किमया याच्याकडे आहे. कवितेची ही अशी भाषा मराठीत तरी मी पहिल्यांदाच पाहतो आहे. पण, मराठी साहित्य हे डोकीबंद विद्वानांसाठी प्रसिद्ध आहे. यावर पहिला मुद्दा चर्चेला येईल तो हा असेल की मुळात ही कविताच नाहीय. मग त्याच्याहून हुशार असा एखादा विद्वान उभा राहून म्हणेल की, अहो, कवितेचे जाऊ द्या, हे गद्यसुद्धा नाहीय. याला काही अर्थच नाहीय, यातून काहीच पोचत नाहीय. अशा महानुभावांकडे दुर्लक्ष करूनच ही कविता वाचायला हवी. ही नव्या पिढीची नवी भाषा आहे. आता ‘ भावना पोचल्या

‘ एवढे, इतके म्हणत बसायला कुणाला वेळ नाही आहे. ‘ भापो ‘ म्हणणार फक्त. लहानांची जशी निरर्थक बडबडगीते असतात ना, तशी, मी म्हणेन, ही मोठ्यांची गंभीर-उडाणटप्पू बडबडगीते आहेत. यांत तुम्हाला सुभाषिते वा पाठांतराला गोड ओळी मिळणार नाहीत. पण, नीट वाचलेत तर आपल्या आजच्या जगण्याचे हे ‘ जीवनदर्शन ‘ आहे. या भाषेत ‘ पिंजडेवाली मुनिया ‘ पासून अरुण कोलटकर, मन्या ओक, पु. शि. रेगे, आनंद बक्षी, सुरेश भट, महेश भट असे अनेक संदर्भ आहेत. ही कविता लिहिणारा पर्सोना हा बऱ्यापैकी शिकलेला आणि बहुश्रुत असा आहे. इथे टपोरी भाषेपासून विद्वज्जड भाषेपर्यंत सगळ्याची भेळ आहे. कवितेची ही शैलीच मुळात सगळे काही सांगून जाणारी आहे. शिवाय कविता सांगेल ते वेगळे !

एक बीअर मारू

एक पिझ्झा खाऊ

बस लागली की

विमानात जाऊ

--- याच्यापुढे येते ---

दळूं

कांडूं

खेळूं

आनंद

कळा (पृ. १२४)

(आता कशाचा काही आहे का संबंध ? तर, कुछ भी चलेगा – भंगारच झालेय सगळे, मग, सलग अर्थाची चिंता कशाला ?)

आता माझी मीमांसा न देता काही ओळी देतो –

पक्षी ग्रिलवर बसतात

काळे कावळे कणखर

खिडकी लावते बाई

निसर्ग अजरामर (पृ. ३४)

एका कवितेचा शेवट –

कोणीतरी

काहीतरी

करा (पृ. ३८)

पावसा, याही देशात देव पाड (पृ. ३९)

एकाच जागी

राहा उभा

हलु डुलु नको

बॅकग्राऊंड मी

बदलवत राहीन (पृ. ५८)

सेल्फी काढ

बघत बस

व्हीडिओज बनव

बघत बस

चूप चाप (पृ. ६५)

केंद्रस्थानी तू आहेस

पेरिफेरीवर दुनिया

विडयाचे सर्व रस चाखते

पिंजडेवाली मुनिया (पृ. ७०)

चकाचक बायकांबरोबर

इलेक्ट्रॉनिक क्षण

स्वस्त फोन

स्वस्त मन

युगा युगांची मनबाधा

एकदम आली भेटीला (पृ. ७२)

जीजू बोलतात

मन मार

मोठं होतं   (पृ. ८०)

--- असे किती सांगणार ? ये कडू मेलडी खाव और खुद जान जाव !

--- ००० ---

मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट (कथा)

--- सतीश तांबे.

सतीश तांबे यांची कथा ख्याल गायकीसारखी असते – धिम्या दमदारपणाने वाटेत येणारा राडारोडा, पानेफुले वगैरे वाहून नेत जाणारी. कथेचा विषय-आशय चहूबाजूंनी पाहात त्याला सर्वांगीण अभिव्यक्ती देणे, ही त्यांच्या कथेची खासियत असते. ‘ मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट ‘ ही त्यांची कथा तशीच आहे. तांबे हे कथाकार म्हणून व्यक्तिगत मतमतांतरे व्यक्त करत नसून मानवी समस्यांचे दर्शन घडवतात, असे मला वाटते. कथा आधुनिक विदीर्णतेतून येते की एखाद्या एकसंध भानातून हा मला एक गौण मुद्दा वाटतो. कारण कथेची गुणवत्ता त्यावर अवलंबूनच नसते.

या कथेत अशीच एक गुणवत्तेशी संबंधितच समस्या आहे. एके काळी मराठी साहित्यात दलित-शोषित-वंचित-पीडित अशा व्यक्तींच्या, समूहांच्या साहित्याचा एक लोंढाच आला होता. मराठी साहित्यविश्व ढवळून निघाले होते. मानवी जगण्यातले एक वेगळेच जग साहित्यात येत होते. त्याचे नावीन्य आणि धक्केही साहित्याची निकोपता वाढवणारे होते. पण कालांतराने त्यात साचलेपणा येत गेला आणि त्यातली जान कमीकमी होत गेली. तरीही, साहित्यात आलेल्या एका मोठ्या समूहाची त्या क्षेत्रात एक सत्ता निर्माण होत गेली. ‘ तशा ‘ नसलेल्या साहित्याला आणि लेखकांना नामशेष करणे घडू लागले. त्यातून मग लेखकांना ‘ स्ट्रॅटेजिक ‘ (डावपेचात्मक) वागण्याची गरज निर्माण होऊ लागली. आपल्याला लिहायचेय तेच लिहायचे पण बाहेर आपण ‘ त्यांच्यापैकीच ‘ असल्याचे दाखवणे महत्त्वाचे ठरू लागले. या कथेतला ज्येष्ठ लेखक हा मुळात भणगे या आडनावाचा आहे. पण, एका क्षणी त्याला ही आयडिया सापडते की भणगे ऐवजी ‘ भणंगे ‘ असे नाव धारण करावे ! तो म्हणतो की या एका अनुस्वाराने खूप फरक पडला ! ही आपल्या साहित्य विश्वावरची एक प्रचंड अन्वर्थक उपरोधिका आहे.

आयुष्य तर मध्यमवर्गीय म्हणावे असे गेलेय – जातेय तर वंचित मसाला आणणार कुठून ? त्या बाबतीतलेही खूप तपशील या कथेत आहेत. या कथेतला तो थोडाफार मान्यताप्राप्त लेखक तीतल्या एका होऊ घातलेल्या लेखकाला म्हणतो की त्याची अवस्था ना घरका ना घाटका अशी झाली ! पण, इलाज नाही. ते जग आणि हे जग यांत एक सांस्कृतिक फट निर्माण करायची आणि त्या फटीत मुक्काम करून लिहायचे, हाच मार्ग ! “ गेल्या काही वर्षांमध्ये हालअपेष्टा, शोषण,

अवहेलना, दारिद्र्य यांची रट लावल्याशिवाय इथे लेखक म्हणून उभं राहणं अवघड होत चाललं आहे दिवसेंदिवस ! “ असे तो ज्येष्ठ लेखक म्हणतो. ‘ वास्तव वडापाव ‘ हा या कथेतला प्रकार मुळातूनच वाचावा असा आहे. “ साहित्याचा कला म्हणून विचारच नाही आहे या स्वत:ला लेखक म्हणवणाऱ्या बहुतेकांकडे. हे साले अनुभवांचे लेखनिक आहेत. “ असे एक जहाल वाक्य या कथेत आहे.

तो लेखक, साहित्य हे ‘ रचले ‘ पाहिजे, असे म्हणतो. मला असे दिसते की त्याचा अर्थ, नुसताच अनुभव परावर्तित करणे महत्त्वाचे नसून त्याच्या आकलनाची सर्जक प्रक्रिया साहित्यात यायला हवी, असे त्याला म्हणायचे आहे.

साहित्य संमेलनात त्याच त्याच घिस्यापिट्या चर्चा करत राहण्यापेक्षा या कथेवर एक परिसंवाद घेतला तर तो मराठी साहित्याचे खूप काही भले करू शकेल, असे वाटते.

--- चं . प्र . देशपांडे.

--- ००० ---

पायऱ्यांचा गेम (कवितासंग्रह)

--- प्रणव सखदेव --- अमलताश प्रकाशन.

प्रणवच्या या कवितासंग्रहातल्या ‘ खोली ‘, ‘ सूर्याचा घोडा ‘, ‘ कोरी जागा ‘, ‘ सर्व्हायवल ‘, ‘ मी कोण ‘, ‘ एकरूप लँडस्केप ‘ अशा काही कविता मला विशेष आवडल्या. कोणत्याच कवीच्या सर्वच कविता सारख्याच उंची-खोलीच्या नसतात. पण, मी इथे एक वेगळीच खास बाब निदर्शनाला आणू इच्छितो. एकच अनुभव वेगवेगळ्या स्थळकाळभाषेत कसा व्यक्त होतो ते पहा – आधी ‘ कोरी जागा ‘ ही प्रणवची कविता बघा –

कोरी जागा

आज मी असतो असा
तसा काल नसतो कधी
उद्याही नसतो असणार
खरंतर,
काल म्हणजे गेलेला, संपलेला.
‘ काल ‘ असं काही नसतं
त्यामुळे ‘ कालचा मी ‘ पण गेलेला, संपलेला.

‘ उद्या ‘ म्हणजे मनाचा खेळ, मनाचा कल्पनाविलास.

‘ उद्या ‘ नसतो.

त्यामुळे ‘ उद्याचा मी ‘ पण मनाचा खेळ, मनाचा कल्पनाविलास.

‘ उद्याचा मी ‘ पण नसतो.

स्मरणाचा आणि कल्पनेचा

वापर करून तुलना केली

तर कालचा मी

उद्याचा असणारा मी

आजचा मी

एकसारखे नसतात

म्हणजे ‘ मी ‘

असा कोणीच नसतो

म्हणजे

‘ मी ‘ ची जागा कोरीच सोडायला हवी.

--- आणि या कवितेबरोबर निकॅनोर पाराची ही कविता वाचा --

The Last Toast

by Nicanor Parra

Whether we like it or not,

We have only three choices:

Yesterday, today and tomorrow.

And not even three

Because as the philosopher says

Yesterday is yesterday

It belongs to us only in memory:

From the rose already plucked

No more petals can be drawn.

The cards to play
Are only two:
The present and the future.
And there aren't even two
Because it's a known fact
The present doesn't exist
Except as it edges past
And is consumed...,
like youth.
In the end
We are only left with tomorrow.
I raise my glass
To the day that never arrives.
But that is all
we have at our disposal.

--- एकाच प्रकारचा आशय दोन कवींना कसा वेगवेगळा दिसतो ते आहे ना खास इंटरेस्टिंग ?

--- ००० ---

96 मेट्रोमॉल (कादंबरी)

--- प्रणव सखदेव -- रोहन प्रकाशन.

विष्णुमय जग म्हणतात तसे आता वस्तुमय जग झालेले आहे. माणूस आणि वस्तू यांचे अतूट संबंध हा विषय. पण इथे वस्तू या वस्तूरूप नुसत्या न राहता सजीव अस्तित्वे होतात. आणि अशा कल्पनेने निर्मिलेल्या जगात माणूस आणि वस्तू यांतही रागलोभ, सुखदु:ख, भीतीधाडस यांची घटनामालिका आकार घेत जाते. अशा प्रकारची ही काल्पनिका मराठीत तरी पहिलीच असावी. वस्तू , साधने, उपकरणे, यंत्रे यांचे हे भरगच्च जग आहे. मला एक कबूलच करावे लागेल की यांतल्या बऱ्याच वस्तू आणि तांत्रिक बाबी या माझ्या आकलन-कक्षेतल्या नाहीत. त्यामुळे, लेखकाबद्दल आदर वाढला तरी मला तो एक अडथळाच ठरला. तरीही रेटून मी वाचलीच ही कादंबरी. माणसाने वस्तूंच्या इतके अधीन व्हावे की जणू जिवंत व्यक्तींप्रमाणे त्या वस्तूंनी माणसाच्या जगण्याचा कब्जा घ्यावा, हे आजच्या जगण्याचे भयानक सत्य ही कादंबरी मांडते. तेही कोणताही सनसनाटीपणा न करता – जणू काही एखादी साधीशी गोष्ट सांगणेच चाललेले आहे !

तरीही, मला येत असलेल्या उपरोल्लेखित अडथळ्यामुळे माझ्या मनाने एक वेगळाच मार्ग काढला. की बाबा, ठीक आहे ना, पहिल्या ४०-५० पानांत कळले की काय चाललेय ते – हेच आणखी ८०-९० पाने कशाला ? घटना असतील वेगळ्या, पण हेच ना ! समजले ना ! आणि असे म्हणतच पुढची पाने मी रिचवत गेलो.

माझ्या मर्यादा लक्षात घेऊनही मला असे वाटले की पुढे पुढे हा प्रकार कल्पनेच्या नावीन्यातच अडकत गेला. त्यामुळे, यातल्या बऱ्याच सखोल शक्यता आवाक्यात यायच्या राहून गेल्या. सारांश, खूप लांबवर जाऊ शकेल असे वाटलेली झेप जरा अलीकडेच पडली, असे वाटले. पण अशी झेप घेण्याचा जबरदस्त प्रयत्न म्हणून मराठीत हे एक अपवादात्मक काम ठरेल, हे नक्की.

हा अभिप्राय मी माझ्या आकलनाच्या स्पष्टतेतून खरेच देतोय का, ही शंका आहेच मनात !

--- ००० ---

मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट (कथासंग्रह)

--- सतीश तांबे – रोहन प्रकाशन.

‘ सूर्याचिया परी । तुका लोकीं क्रीडा करी ॥ '

--- तुकाराम.

“Life is not a problem to be solved, but a reality to be experienced.”

— Soren Kierkegaard

वरील दोन्ही भाषिते एकत्र केल्यावर जे समजते ती आहे या सर्व कथांमागची मर्मदृष्टी. या कथांमध्येही पात्रे आहेत, त्यांची सुखदु:खे आहेत, त्यांच्याही आयुष्यांत ताणतणाव, गुंताडे आहेत, संघर्ष आहेत, हिंसाही आहे, पण तरीही, लेखक याचा कोणताही प्रभाव न घेता लिहितो आहे, हे जाणवत राहते. त्यामुळे, या कथा ना कोणत्या सुखदु:खांचा प्रत्यय देणाऱ्या आहेत ना कोणता मूड तयार करणाऱ्या. जगण्याच्या एकूण जंजाळातून हा लेखक सहज विहरत असल्याचे वाचकाला जाणवत राहते. या अर्थाने ही लेखकाची एक सहज पण गंभीर क्रीडा ठरते. यांतल्या पात्रांनाही अनेक समस्या आहेत, त्यांची निराकरणे देणे वा त्यांचा न्यायनिवाडा करणे हा इथे हेतूच नाहीय. कारण अर्थातच सर्व काही इतके जटिल आणि इतक्या प्रभावांनी युक्त आहे की त्याची सोडवणूक वा निष्कर्ष अशक्यच ठरावेत. एका सखोल परिपक्वतेने जगण्याकडे

पाहणारी ही दृष्टी आहे. ही क्रीडा म्हणजे, ‘ शतदा प्रेम करावे ’, ‘ प्रेम कर भिल्लासारखं ‘ किंवा ‘ फक्त लढ म्हणा ‘ अशी बावळट-उथळ नाही. जगण्यात एखादा सल्ला अंमलात आणणारी ही क्रीडा नाही. हा, कीर्केगार्ड म्हणतो तसा जगण्याचा समग्रतेने घेतला जाणारा अनुभव आहे. मानवी जगण्याचा व्यापक आवाका घेत जाणारी ही मर्मदृष्टी आहे. या कथांची निवेदनशैलीही या दृष्टीतून येणारीच आहे. घटनांचे सर्व तपशील आणि त्यांतले सर्व प्रभाव यांची दखल घेत हे निवेदन जाते. त्यामुळे ते सविस्तर आणि काही वेळी पाल्हाळीकही वाटू शकते. पण, विशेष म्हणजे यातले प्रत्येक वाक्य निवेदनात अर्थपूर्ण भर टाकत जाणारे आहे. कुठेही कंटाळा तर येत नाहीच पण हे संपूच नये असे वाटत राहते. या नुसत्या घटनांच्या कथा नाहीत. घटना घडण्याच्या प्रक्रियांचा बारकाईने धांडोळा घेत जाणाऱ्या अशा या कथा आहेत. या वैशिष्ट्यांमुळे या कथा मराठीत अद्वितीय म्हणाव्यात अशा आहेत. कलेतल्या अत्युच्च दर्जाच्या मूल्यदृष्टीचा हा एक विलोभनीय पट आहे. आता थोडक्यात एकेका कथेकडे पाहू –

यत्र – तत्र – सावत्र : -- मनात बाळगावे लागणारे, स्वत: सावत्र असल्याचे जन्मरहस्य , “ ही देवाने दिलेली जमीन पैसे देऊन आपल्या नावावर करणं हा व्यवहार मुळातच काळा आहे – “ हे सवयीच्या व्यवहारापालिकडचे सत्य, आणि “ या पृथ्वीवर अढळ अशी जागाच नसावी बहुधा, प्रत्येक कणाकणावर वाकडी नजर आहेच कुणाची ना कुणाची ! “ -- इथपर्यंत विचार येऊन पोचणे – हे आहे या कथेत. या संग्रहातल्या पाचही कथांमध्ये काही ना काही अपवादात्मक आणि नाट्यमयही अशा गोष्टी आहेत.

नाकबळी : ‘ नाकीडोळी नीटस असणे ‘ हा वाक्प्रचार एका अजब माहोलात नेणारी ही एक गंमतीशीर कथा आहे. नीतीअनीतीचे रूढ साचे ओलांडून ‘ समावेशक ‘ समाधान निर्माण करणारी !

मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट : ही या संग्रहातली जरा दीर्घ आणि कलाक्षेत्रातली एक महत्त्वाची समस्या हाताळणारी अशी एक कथा आहे. एक ज्येष्ठ ब्राह्मण लेखक आणि एक नवखा दलित लेखक यांची ही कथा आहे. दोघांनाही जगण्यातल्या पांढरपेशेपणामुळे एकाच सांस्कृतिक फटीत आश्रय घ्यावा लागणे, असा हा विषय आहे. अनुभव या साहित्यातल्या कच्च्या मालालाच मूल्यात्मक महत्त्व येणे, यातून निर्माण झालेली ही समस्या आहे. या कथेतल्या दोन्ही लेखकांना, तांब्यांना सापडलेली मूल्यात्मकतेची वाट सापडलेली नसावी, हेही एक कारण असू शकते.

संशयकल्लोळात राशोमान : या कथेच्या नायकालाच म्हणू, येणाऱ्या धमक्यांच्या फोन्सवरून हे सगळे सुरू होते. ते फोन्स कोण करत होते हा मुद्दा शेवटी गळूनच पडतो, पण, या कारणाने झालेला विचार-कल्पनांचा गचाघोळ आणि निरनिराळ्या संबंधांतले ताणेबाणे यांचे एक अजब विश्व आपल्या समोर उभे राहते. सत्यबित्य असे काही असते का, याचा हा एक शोध म्हणता येईल. यात शेवटी एक वाक्य आहे की “ एकदा का एखादं शीर्षक घट्ट पाळामुळांसकट डोक्यात उमललं की, पुढची वाटचाल ही बहुतेक वेळा मला एखाद्या सोपस्कारासारखी वाटते. “ हे तांब्यांच्या बाबतीतही खरे असावे. त्यांच्या कथांची अजब शीर्षके हा एक खास अभ्यासाचा विषय होऊ शकतो.

रावण आडनावाच्या पांडवपुत्राच्या नावाची जन्मकथा : हे तर एक प्रचंडच धक्कादायक नाव ! हे सर्व अशक्यप्राय कथानक आपल्या सहज पचनी पडावे हे कथाकार म्हणून तांब्यांचे एक अगाध कसब आहे ! तांब्यांच्या बहुतेक सर्वच कथा ' रचलेल्या ' असतात, असे म्हणता येईल. ही कल्पना आहे की वास्तव या चिकित्सेत पडायची इच्छाच होऊ नये इतके हे सगळे सफाईदारपणे घडते.

या सगळ्यातून जे पोचते ते आपल्याला सवयीच्या जगण्यातून बाहेर काढणारे असते, हे नक्की !

--- ००० ---

मन्या ओक

सतीश तांब्यांचे ' लेखाजोखा ' वाचतोय. त्यात मन्या ओक या भन्नाट कवी-लेखकावर एक अत्युत्तम लेख आहे. मन्याची आणि माझी भेट झाली तेव्हा मी कॉलेज-विद्यार्थी होतो. तांब्यांनी वर्णन केलेल्या त्याच्या सवयीप्रमाणे, माझ्याकडे पैसे मागायचा प्रश्नच नव्हता. मन्या ओक आणि षांताराम पवार दोघेही मालाडला आम्ही राहात असलेल्या भाड्याच्या घरात आले होते. नेमके कोणते अनियतकालिक ते आठवत नाही पण त्यासाठी त्यांना माझ्या कविता हव्या होत्या. मी भोळेपणाने म्हणून गेलो की " देतो की -- नाहीतरी कोण छापणार आहे त्या ! " मन्या म्हणाला, " मग नको -- तुझ्या कविता चांगल्या आहेत आणि या अनियातकालिकात त्या याव्यात असं तुला वाटतं, म्हणून दे -- " ते दोघेही बराच वेळ माझे कवितावाचन ऐकत बसले होते. काही वेळाने मी विचारले, " कशा वाटताहेत ? " उत्तर षांतारामने दिले -- " मला सिगरेटची तलफ आली की मी एक मिनिटही नाही थांबू शकत -- तलफ येऊन अर्धा तास होऊन गेला ! " मग आम्ही जाऊन त्यांचा सिगरेट हा विषय संपवून आलो. आल्यावर, माझ्यावर त्या दोघांनी तोच भविष्य सांगण्याचा प्रयोग केला, ज्याचे वर्णन तांब्यांच्या लेखात छानच आलेले आहे. चौकोन, त्रिकोण, गोल आणि एक नागमोडी रेषा -- या चिन्हांतले एक निवडायचे, ते तीनदा आणि उरलेली चिन्हे एकेकदा याप्रमाणे मन्याने काढून दिलेल्या चौकोनात काढायचे. हवे तसे काढा, कसेही बसवा. मी ते केले. ते काय बोलले ते आता आठवत नाही. पण, पुढे, हा एक मनवाचनाचा प्रकार आहे असे समजून मी स्वत:च जरा खोलवर त्याचा विचार केला. आणि नंतर अनेकांवर त्याचे यशस्वी प्रयोगही केले. एकदा तर आमचे बँकेतले सहकारी आणि दोनतीन ग्राहक यांनी हे सर्व असे करून नावे न टाकता माझ्याकडे १०-१२ कागद दिले ! प्रत्येक कागदाच्या मागे मी माझे रीडिंग लिहून आणले ! तोही प्रयोग प्रचंड यशस्वी झाला ! मन्याप्रमाणे नावानिशी मला काही सांगता येत नव्हते पण मनवाचन परफेक्ट होते ! हाच प्रयोग मी मराठीतला कथाकार अनिल डांगे याच्यावरही केला होता !

मुंबईचे वर्णन दोन शब्दांत करून दाखवा असे आव्हान दिले तर भलेभले गारठतील. पण, मन्याच्या कवितेत ते आहे -- ' दिवेटिंब मुंबई ' ! मी दादरलाच (बहुतेक) मन्याच्या घरीही गेलो होतो. त्या वेळी त्याच्या आईने त्याला जेवायला वाढले

होते, हे आठवते. त्या अनियतकालिकाचे मुखपृष्ठ की देणगी मागायचे पत्रक, ते आठवत नाही -- त्यावर षांताराम पवार एक उंबरा काढणार होता आणि त्याच्या अलीकडे मन्याच्या झिजलेल्या चप्पलजोडाचा फोटो ! मन्याने त्या वेळी, मी किरकोळ एक विद्यार्थी असूनही, त्याच्या कविता मला वाचून दाखवल्या होत्या ! त्यांतली एक ओळ कायमची माझ्या मनात रुतून बसलीय -- ' हे प्रियतम माझे अंधार ' !

या निमित्ताने प्रिय मन्याच्या स्मृतीला सादर अभिवादन !

--- ००० --- ०४-०३-२१.

फेसबुकवर न दिलेला पण आठवणीसाठी लिहून ठेवलेला मजकूर – मन्या आणि षांताराम यांनी वापरलेली ‘ भविष्य पद्धत ‘ मी ‘ मनवाचन ‘ म्हणून कशी स्वत:ची स्वत: समजून घेतली –

मनवाचन

कुंडली, न्यूमेरॉलॉजी हे बाह्य योगायोगांवर आधारित प्रकार आहेत. ते मला फारसे पटत नाहीत. पण, सही, हस्ताक्षर, चेहरावाचन, हस्तरेषा आणि आता मी जे सांगतोय ते – हे प्रकार त्या त्या व्यक्तीच्या प्रत्यक्ष असण्यावर आधारित आहेत. हस्तरेषांत तर आता व्होकेशन पामिस्ट्री, मेडिकल पामिस्ट्री, असेही प्रकार विकसित झालेले आहेत आणि माझ्या मते ते माणसाला खूपच उपयुक्त आहेत. या अशा प्रत्यक्षाधारित ‘ वाचना ‘ चे मी लक्षात घेतलेले तत्त्व असे आहे की -- you get the life that you expect -- तुम्ही जशी अपेक्षा करता तसे जगणे मिळते. यात प्रत्येक गोष्टीला ‘ हुशार ‘ फाटे फोडणे शक्य आहेच. मला म्हणायचेय त्यातले फक्त तथ्य बघावे. मी स्वत: सुमारे आठ वर्षे तीव्र अभ्यास करून हस्तरेषांच्या अर्थांचा प्रत्यक्ष अनुभव पाहिलेला आहे. काही वर्षांपूर्वी ते सगळे बंद केले. लेखन-वाचन की हस्तरेषा यांतल्या निवडीतून मी हस्तरेषा त्यागले. ते असो. तर आता ती मन्या ओक पद्धत सांगतो. गोल, चौकोन, त्रिकोण आणि नागमोडी रेषा ही चिन्हे वर छोट्या, कळण्यापुरत्या आकारात काढायची. मग खाली एक मोठा आयताकृती चौकोन काढायचा. लक्ष्य व्यक्तीला सांगायचे ते असे – या चार चिन्हांपैकी एक निवडा. तुम्ही जे चिन्ह निवडता ते तीन वेळा या चौकोनात काढायचे आहे. आणि उरलेली तीन चिन्हे याच चौकोनात एकेकदा काढायची आहेत. म्हणजेच, निवडलेल्या चिन्हाची तीन आणि ही एकेकवाली तीन अशी एकूण सहा चिन्हे या चौकोनात तुम्हाला हव्या त्या ठिकाणी, हवी तशी काढायची, बसवायची आहेत. हे सांगून तो कागद त्या व्यक्तीकडे द्यायचा. मग आपण लक्ष द्यायचे नाही. त्या व्यक्तीने हा कृतिक्रम पूर्ण केला की तिचे काम झाले. मग आपले काम सुरू. आपले काम म्हणजे एकाग्रपणे प्रत्येक बाब समजून घेत त्याचे अर्थ लावत जाणे. हेच, माझ्या मते, मनवाचन.

आता ही चिन्हे मुळात अर्थपूर्ण समजता येतात – गोल हा कमी कंगोऱ्यांचा, स्मूथ आवडींचा, म्हटले तर निरर्थकतेकडे झुकू शकेल असा प्रकार. चौकोन आणि त्रिकोण निवडणारे कमीजास्त महत्त्वाकांक्षी असतात – त्रिकोणाहून चौकोन जरा अवघड. नागमोडी रेषा ही वृत्ती, स्वभाव, आशानिराशा, जीवनलांबीही दर्शवू शकते. आता हे सगळे कसे काढले आहे ते पाहायचे. कामाच्या शेवटच्या क्षणापर्यंत दम न टिकणारे असतात ते चिन्हाचा शेवट कसा तरी करून टाकतात, रेषा जुळत नाहीत, वगैरे. तसे न होता उत्तमपैकी काढले असेल सगळे तर तेही कळतेच. हा सगळा एक प्रकारे त्या व्यक्तीच्या जगण्याचा आराखडाच असतो. नागमोडी रेषेत तर उघडेच पडते मन. ती केवढी आहे, स्पष्ट आहे की भित्रट, मध्ये तुटतेय का वगैरे पाहून तसे ‘ वाचन ‘ कळते. मुख्य म्हणजे दिलेल्या चौकोनात ही चिन्हे काढताना काही रचना लक्षात घेतली आहे की कशीही काढली आहेत यावरूनही मन कळते. चौकोनात इतकी जागा उपलब्ध असूनही काहीजण कुठे तरी कोपऱ्यात सगळीच चिन्हे बसवून टाकतात. त्यावरूनही मन कळते. असे खूप काही या ‘ कुंडली ‘ वरून समजते. इथून पुढे येतो तो उत्स्फूर्ततेचा भाग. ते सगळे पाहून कधी एक चित्र दिसते, कधी एखादी घटना जाणवते, कधी संघर्ष दिसतो कधी सगळ्याच चिन्हांचा एकमेकांना त्रास होतो आहे असे दिसते. त्याचप्रमाणे स्मूथ, यशस्वी आयुष्याचीही आखणी दिसते. त्यावरून बरेच काही समजते. नागमोडी रेषा किरटी, अधू, तुटक काढणाऱ्यांना तब्येतीच्या तक्रारी असतात.

एवढ्यावरून याचे तंत्र आणि प्रकार स्पष्ट होतो. यातले महत्त्वाचे हे की हा कृतिक्रम त्या व्यक्तीने सहज पूर्ण करून द्यायला हवा. त्या व्यक्तीला मुळीच सावध करायचे नाही, हे मनवाचन आहे, हेही सांगायचे नाही, ती व्यक्ती अनवधानाने ‘ खरी ‘ व्यक्त व्हायला हवी. आपण मन साधे ठेवून आपल्या उत्स्फूर्ततेला खुला वाव दिला तर तीही करामती करते !

आता गेली अनेक वर्षे मी असले कोणतेही प्रकार करत नाही. नाही तर लगेच सगळे हात पुढे करतात ! या प्रकारांचा अभ्यास आणि विचार या खूप गहन आणि वेळखाऊ गोष्टी आहेत. सापळ्यात पकडल्याप्रमाणे अडकवणाऱ्याही आहेत. बचके रहना !

--- ००० ---

दिलीप पुरुषोत्तम चित्रे

चाहते त्यांना प्रेमाने दादा म्हणत. होतेच ते, त्यांच्या कामाने आपोआप झालेले दादा. नेमाड्यांप्रमाणे साहित्यिक शेरेबाजीची गुंडगिरी करून त्यांनी दादापद मिळवलेले नव्हते. खरे तर ‘ टीकास्वयंवर ‘ वाल्या नेमाड्यांऐवजी ‘ साहित्य आणि अस्तित्वभान – १ ‘ वाल्या चित्र्यांना मिळायला हवे होते ज्ञानपीठ. पण इथल्या बाजारबुणग्या विचारवंतांनी चित्र्यांची शिफारससुद्धा केली नसेल. (टीकास्वयंवर वाचून कलेच्या मूल्यात्मकतेचे भान फारसे वाढणार नाही – ती ताकद अस्तित्वभान मध्ये आहे. नेमाडपंथियांनी हीही शेरेबाजी थोडी पचवून घ्यायला हवी.) मुळात त्यांनी ते वाचलेच नसेल

आणि वाचले असले तर अजीर्ण होऊन आजारी पडले असतील. विद्वत्ता आणि मर्मदृष्टी यांचा इतका प्रचंड आविष्कार असलेले पुस्तक मराठीत दुसरे कोणते आहे, ते मला तरी माहीत नाही. चित्र्यांच्या दर्जेदार सखोल कामांची यादी नेटवर आहे. मी नम्रपणे म्हणेन की आम्हा मराठीवासीयांची कुवत पाहता हा आमच्यासाठी एक चमत्कारच होता !

" तुकारामासारख्या विद्येश्वरानं आत्मभान आणि शब्दभान एकवटून स्वभावसमाधीचा प्रत्यय नोंदवून ठेवला. मानसिक क्षोभाच्या अवस्थेतून थेट तुर्यावस्थेपर्यंत पोचणारी तुकारामाची कविता ही खंडित आत्मभानाला अखंड बनवण्याच्या मराठी काव्यकलेचं उत्तुंग उदाहरण आहे. "   असे वाक्य चित्रे सहज लिहून जातात. त्यांचा ' कवी काय काम करतो ' हा लेख मराठीत अजरामर ठरावा असा आहे. त्या लेखातला शेवटचा उतारा असा आहे – " समकालीन मानवी संस्कृतीच्या सार्वभौम संदर्भात भारतीय आणि मराठी वाङमयीन परंपरा पाहण्याचा आपल्याला प्रयत्न करावा लागेल. असा प्रयत्न करताना मराठीतही कवीची सांस्कृतिक भूमिका का आणि कशी बदलत गेली आणि तिचा एकूण मूल्यव्यवस्थेशी काय संबंध आहे, याचाही आपल्याला स्वतंत्रपणे शोध घ्यावा लागेल. जगातल्या वेगवेगळ्या समकालीन संस्कृतींमधल्या कवितेच्या आणि कवींच्या स्थानाची तुलना करून तिचा सार्वभौम मानवी श्रेयाच्या परिप्रेक्ष्यात आढावा घ्यावा लागेल. असं करताना कवी काय काम करतो याचा माणसाचं ह्या अस्तित्वसृष्टीत काम काय ह्या मूळ प्रश्नाशी असलेला संबंध उलगडला जाईल. असं जोवर होत नाही तोवर आपापलं कामसुद्धा आपल्याला कळणार नाही. बिचारा कवी तर दूरच राहिला. " याच लेखात एका ठिकाणी ते लिहितात, " अस्तित्वानुभवाची अनेक पदरी पीडा, आनंद, अचूक इंद्रियसंवेदना, उत्कट भावानुभव, तीव्र आणि सखोल अर्थप्रतीती, सार्वत्रिक मानवी समस्यांचे चिंतन या महत्त्वाच्या बाबी मराठी कवितेत विरळा होत गेल्या. हा काही इंग्रजीचा प्रभाव नाही तर घेडगुजरीपणा पराकोटीला जाऊन भाषिक आणि सांस्कृतिक आत्मभान क्षीण झाल्याचं हे लक्षण. "

हे सर्व समजून घेण्यात कोण इंटरेस्ट घेणार ? मानवी जगणे म्हणजे राजकारण अशा थिल्लर कल्पनांनी स्वत:ची करियर बांधत बसणारे इथले भूमिकावाले लेखक-समीक्षक या अशा कामाकडे लक्ष देणे तरी शक्य आहे का ? मानवी जगणे चालते ते राजकीय डावपेच आणि हलकटपणा यांवर नाही तर सौहार्द आणि प्रेम या मानवी मूल्यांवर, हे इथल्या असंख्य साहित्यप्रेमींच्या डोक्यात शिरण्याची शक्यताच दिसत नाही. असा हा ' आपल्या माती ' च्या दिशेने वेगाने जाणारा समाज लौकरात लौकर दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांना नामशेष करील. या असल्या फडतूस भूमिकेत इंटरेस्ट नसलेल्यांनी तरी चित्र्यांचे ऋण मनापासून मान्य करायला हवे. त्यांची मर्मदृष्टी समजून घ्यायला हवी.

--- ००० ---

थोडक्यात पण अत्युच्च दर्जाचे पुस्तक-परीक्षण ! मराठीत समीक्षेचा विभाग बोंबललेला आहे. गिरीशने ते काम मनावर घेतले तर फार चांगले होईल ! लाख्यांचे पुस्तक जसे अद्वितीय तसेच गिरीशचे त्यावरचे हे टिपणही अद्वितीयच आहे ! हे दोघेही माझे दोस्त असावेत आणि माझ्या अनेक नाटकांचे दिग्दर्शकही असावेत ही गोष्ट मला खूप समृद्धी देणारी आहे !

Girish Patke

is with Ravindra Damodar Lakhe

and 6 others

·

AtpcSrephaohfil 24nr ighaismt 5ilf:2o0u frmrceePMd •

आपले मित्र रवींद्र दामोदर लाखे यांच्या "आरभाट नोंदींचे प्रकरण" या पुस्तकावर मी लिहिलेले परीक्षण मुंबई विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखेच्या कार्यालयातून प्रकाशित होणाऱ्या 'संभाषित' (मार्च २०२१) या तज्ज्ञपरीक्षित संशोधनपत्रिकेमध्ये प्रकाशित झाले आहे. संभाषितच्या संपादक मंडळाचे आभार. सदर परीक्षण येथील मित्रांसाठी देत आहे. वाचून प्रतिक्रिया कळवल्यास आनंदच होईल.

Antechamber मधील योगभ्रष्टाच्या आरभाट नोंदी

गिरीश पतके

संभाषित आणि डॉ. प्रतिभा टेंबे.

मुंबई विद्यापीठातर्फे हे अभ्यासपूर्ण लेखांचे मासिक प्रसिद्ध होत असते. गिरीश पतके यांच्या लेखांच्या निमित्ताने ते इथे फेसबुकवर माहीत झाले. अर्थात, मराठी साहित्याचे विद्यार्थी, अध्यापक आणि अभ्यासक असणाऱ्यांना ते आधीपासूनच माहीत असेल. या मासिकाच्या मार्च २०२१ च्या अंकाचे एक छोटेसेच पण उत्तम संपादकीय आपल्या इथल्या फ्रेंड डॉ. प्रतिभा टेंबे यांनी लिहिलेले आहे. त्यात एका उताऱ्यात त्यांनी साहित्य क्षेत्रातल्या बदलत्या अभिव्यक्तिप्रवाहांचा धावता आढावा घेतलेला आहे. तो असा --

“ खरे तर नव्य- अभिजातवादाने निर्माण केलेल्या सांकेतिकीकरणाविरोधात, कृत्रिमतेविरोधात रोमँटिसिझम जन्माला आला आणि सर्वसामान्यांना- साहित्यिक- कलावंतांना निसर्गाकडे, आपल्या आंतरिकतेकडे वळविले; किंबहुना अंतर्मुख व्हायला भाग पाडले. याचा पुढे अतिरेक होऊन माणूस एकटा, एकाकी, एकलकोंडा झाला. त्याचा समष्टीशी असणारा संबंधच संपुष्टात आला. याविरोधात वास्तववाद जन्माला आला.यानंतर आपल्यातल्या आंतरिकतेला दुर्लक्षून समष्टीशीच तो इतका बद्ध झाला की त्याचे अस्तित्व, त्याचे जीवितकार्य, याचे भानच हरपून तो पूर्णपणे बहिर्मुख झाला. आता तर तो बाह्य वास्तवाच्या इतका आहारी गेला की ह्या वास्तवाच्या दाहकतेनेच त्याचे डोळे पोळले आहेत. अर्थात, ही अवस्था निर्माण होण्यामागेही त्याचा अतिरेकी स्वभाव, त्याची आसक्तीच कारणीभूत आहे. आधुनिकवादाने काही मूल्ये मानवी जीवनाला जरूर पुरवली पण उत्तर-आधुनिकवादाने तर मूल्ये, संस्कृती, विचारधारांचाच अंत झाला आहे, हे ठामपणे म्हटले आहे. सद्य:स्थितीत तर याच अनुभवाची प्रतीती येते आहे. कोरोनापुढे सर्वच विचारधारा, संस्कृती, मूल्ये यांचे सपाटीकरण झाले आहे. जात, धर्म, वर्ण, वर्ग, लिंग, संस्कृती,भाषा, या भेदाच्या भिंती ओलांडून कोरोनाने सर्वांना एका समान पातळीवर आणले आहे. व्यष्टीचा जो अनुभव आहे तोच समष्टीचाही अनुभव आहे. अशा वर्तमानाच्या पोटातून

उद्या कोणता भविष्यकाळ जन्म घेणार आहे, हा प्रश्न आज तरी अत्यंत जटिल होऊन बसला आहे आणि मानवी जीवनाला, मानवी संबंधांना, मानवी व्यवहाराला, मानवी संस्कृतीलाच प्रश्नांकित करून कधी नव्हे इतका या साऱ्या घटितांचा पुनर्विचार करायला अवकाश प्राप्त करून दिला आहे. "

या निमित्ताने एक मूलभूत प्रश्न निर्माण व्हावा, असे वाटते. तो असा – साहित्य असो की कला असो, त्या त्या काळाच्या प्रभावाखाली असणे आणि त्या त्या काळातल्या जगण्याला प्रतिक्रिया देत राहणे हेच असते का कलेचे काम ? प्रतिक्रियारूप जगणे तर पूर्ण माणूस या प्राण्याचेच वैशिष्ट्य दिसते. आहेत त्याच प्रतिक्रिया जरा कौशल्याने मांडणे हेच असते का कलेचे काम ? की आणखी काही असते ? आपण जी कला मौल्यवान समजतो ती फक्त एक हुशार, कार्यक्षम प्रतिक्रियेचीच अभिव्यक्ती असते का ? तसे असेल तर कोणतीही प्रतिक्रिया मौल्यवान ठरू शकते का आणि तशी ती ठरू शकत असेल तर कोणत्या कारणाने वा कारणांनी ते घडते ?

डॉ. टेंबे यांच्या वरील उताऱ्याच्या निमित्ताने यावर चर्चा घडावी, असे वाटते.

--- ००० ---

पोटमारा (कादंबरी)

ले ० रवींद्र पांढरे, प्रकाशक ० लोक वाङ्मय गृह.

याच लेखकाच्या ' अवघाची संसार ' या कादंबरीवर मी २०१८ साली लिहिले होते. त्यातली ही वाक्ये --

" ' मनोगता' त लेखक काय म्हणताहेत ते पाहा – " आध्यात्मिक पातळीवर चिंतन करण्याची माझी कुवत नाही. त्यामुळे चिंतनाला आपोआपच सामाजिक आशयाची डूब लाभली आणि एक स्वतंत्र सामाजिक कादंबरी लिहून झाली. " मला जाणवले ते असे की या लेखकाकडे अत्यंत सखोल आणि परिपक्व चिंतनाची कुवत असून ही कादंबरी आध्यात्मिक वा सामाजिक नसून एक परिपूर्ण अशी ' मानवी ' कादंबरी आहे. " तेच याही कादंबरीबद्दल म्हणता येईल.

दोन मुलगे, पत्नी लीलाबाईच्या पदरात टाकून तिचा पती तरुणपणातच मरून जातो. त्यानंतरची ही त्या कुटुंबाची कथा आहे. तसे ते एक गरीब शेतकरी कुटुंब असते. थोरला मुलगा शेतीच करत राहतो आणि धाकटा शेतीतलेही कष्ट करत का असे ना शिकत जातो आणि पुढे एम ए बी एड होतो. त्याला नोकरी मिळाली की चांगले दिवस येतील असे त्यांना वाटत असते. पण, मग भ्रष्टाचाराचे नमूने समोर येत जातात. शाळेत नोकरी हवी असेल तर अमुक एक, समजा पाच लाख, द्यावे लागतील, अनुदान मिळेपर्यंत बिनपगारी काम करावे लागेल, वगैरे. आता यात नीतीअनीतीचा, चांगल्यावाईटाचा प्रश्नच नाही. हा या समाजाच्या जगण्याचा ढाचाच झालेला आहे. ही पूर्ण कादंबरी अशा देवाणघेवाणींनी भरलेली आहे. आर्थिक, राजकीय, नातेसंबंधांतल्या अशा अनेक प्रकारच्या नाइलाजाच्या म्हणा की समजूतदारपणाच्या म्हणा, देवघेवी. दुसऱ्या एका कुटुंबात बारावीला असलेली एक मुलगी आहे आणि तिला पती शेतकरी नको असून नोकरीवाला हवा आहे. पण, तिच्या पायात थोडा दोष आहे. चांगली नोकरी असलेला मुलगा तिला कशाला स्वीकारेल ? तर, त्या मुलीचा मामा एका

शाळेत पदाधिकारी आहे, त्याला सांगून त्या मुलाला नोकरी मिळवून द्यायची आणि त्या बदल्यात त्याने या मुलीशी लग्न करावे, असे विचार अंमलात येतात. हे झाले की, त्याला नोकरी मिळेल, हिला हवा तसा पती मिळेल, वगैरे. हे सर्व ठरूनही, ऐन वेळी एक राजकीय देवघेव आड येते आणि त्या मुलाला ती नोकरी नाहीच मिळत. सर्वांचे आयुष्य कसे सर्वांच्या आत्मकेंद्री प्रभावांतून जणू अटळ नियतीप्रमाणे चालू असते त्याचा ही कादंबरी एक मोठा आवाका घेते. ना ऊरबडवेपणा, ना आक्रोश ना विद्रोही क्रोध – लेखक, जे आहे त्याचे दर्शन घडवत जातो. पूर्ण समाजच किडलेला असून हे असे किडके जगणे जणू सर्वांना मान्यच आहे. त्या त्या वेळची प्रत्येकाची शक्ती, डावपेच आणि परिस्थितीची साथ यांवर प्रत्येकाचे यशापयश ठरणार ! या सगळ्याचा शेवट त्या मुलाच्या विहिरीत बुडून मरण्यात होतो. सगळेच असे सडके असल्यावर असा इकडेतिकडे नाश होत राहणारच, अशी ही नाइलाज-अवस्था !

पोटमारा म्हणजे पोट मारत, अर्धपोटी राहात, जगणे. एवढे कष्टपूर्वक शिकूनसुद्धा त्या मुलाचा असा नाश होणे हे अन्यायाचे, माणुसकीहीनपणाचे आहे, यात वादच नाही. पण कोण जबाबदार याला ? पूर्ण समाजानेच स्वीकारलेला हा ‘ जीवनमार्ग ’ आहे ! यात परिवर्तन कुठे करणार ? ही व्यवस्था बदलायची म्हणजे कुठे काय करायचे ?

लेखक पांढरे कुठलाही बोध देण्याच्या फंदात पडत नाहीत. अमुक पुढारी वा तमुक पक्ष वा ढमुक विचारसरणी हे सर्व गुंते सोडवून माणसाचे जगणे सुसह्य करील, असे काहीही लेखक सुचवत नाही. ही कादंबरी म्हणजे बाहेरची कुणाची कथा वाचणे नसून स्वत:सह सर्वांच्या सडकेपणाचे दर्शन घेणे आहे. हे अर्थातच परिपक्वता देणारे आहे. मानवी प्रश्नांवर कोणतीही जादूची कांडी उपलब्ध नाही. प्रत्येकाला येणारी परिपक्वता हीच यातून कदाचित मुक्त करू शकते.

त्या तिथल्या ग्रामीण जीवनावर लेखकाची प्रचंड मास्टरी आहे. मराठीतली ही एक ग्रेट कादंबरी आहे !

--- चं. प्र. देशपांडे.

--- ००० --- (26 एप्रिल 2021).

एक कवितासंग्रह

तुम्हाला काही तीव्र दु:ख आहे का, कोणत्याही कारणाने तुम्ही अत्यानंदात आहात का, तुम्हाला काही जीवनमरणाची वा एखादी साधीशीच का असे ना, समस्या त्रस्त करते आहे का, सामाजिक, आर्थिक वा राजकीय कारणांनी तुमच्यावर काही अन्याय चालू आहे का, स्त्री-पुरुष संबंधांतले काही विशेष बारकावे तुम्हाला जाणवत आहेत का, तुम्हाला खूप एकाकी वा निराश वाटते आहे का, जगण्यातली निरर्थकता जाणवते आहे का, आंतरद्वंद्वांमुळे काही नैतिक प्रश्न बिकट झाले आहेत का, एकूणच मूल्यहीन वाटत असल्याने भाषेचे अडवेतिडवे खेळ करत आहे ते साजरे करावे असे वाटते आहे का, स्वप्न, भ्रम आणि मनाची विचित्र अवस्था अशा काही बाबींतून तुम्हाला जगणे काही वेगळेच दिसते आहे का, कविता हा प्रकारच दांभिक वाटत असल्याने भाषा कशीही निरर्थकतेसाठीच वापरायची आहे का, तुमचे बदलते मूडस तुम्हाला एंजॉय करायचे आहेत का, निसर्गसौंदर्याचे तुम्हाला जाणवणारे हजार विभ्रम तुम्हाला व्यक्त करायचे आहेत का, तुम्हाला राग-तिरस्कार-

शौर्य असे काही व्यक्त करायचे आहे का, तुम्हाला स्फूर्तिदायक वा बोधप्रद असे काही लिहायचे आहे का, प्रतिमांची श्रीमंती दाखवत तुम्हाला चमत्कार करून दाखवायचे आहेत का, रोजच्या जगण्यात सामान्यत: सगळ्यांनाच येणारे अनुभव जरा कलात्मक करून तुम्हाला हसू आणि आसू निर्माण करायचे आहेत का, गतकातरता वा बालपणीच्या आठवणी वा आईचे प्रेम हे तुम्हाला व्यक्त करायचे आहे का – असे आणखीही काही – हुश्श --- तर या सर्व प्रश्नांचे एकच उत्तर – नाही हो, असले काहीच नाही – असे असेल तर ? मग कुणीही म्हणेल की बाबा मग तुम्ही कविता लिहिता तरी का आणि कशासाठी ? तर, समजा, काही नाही, तुम्ही म्हणताय ते काही नसूनही हेही एक मन आहेच ना – त्या मनाला उपलब्ध भाषेतून नक्षीकाम करायचा हक्क नाही आहे का ? मनाच्या इतर सर्व अवस्था चालतात तर ही का चालू नये ? – या प्रश्नाचे उत्तर शोधायला प्रवृत्त करणारा एक कवितासंग्रह आलेला आहे --

सटल
अनिरुद्ध दिवाकर आचार्य
वर्णमुद्रा प्रकाशन.

कोणत्या ना कोणत्या किंवा कोणत्याही मानसिक अवस्था जर कवितेतून व्यक्त होऊ शकतात तर सहज काही शाब्दिक नक्षीकाम करणारे मन का बहिष्कृत समजावे ? या संग्रहाचे मला एक वेगळेच महत्त्व वाटते. कोणत्याही मानसिक अवस्थांना अभिव्यक्ती देत राहण्याचे तरी काय महत्त्व आहे मुळात ? करमणूक वा पुन:प्रत्यय ही उत्तरे सोडून याचे काय उत्तर देता येईल ? – हे आव्हानात्मक प्रश्न समोर आणण्याचे काम हा संग्रह करू शकतो.

--- ००० ---

आशय परिवार

(२३ एप्रिल २०२१.)

सोलापूरचे नीतिन वैद्य आणि त्यांचे सहकारी पुरुषोत्तम नगरकर व जयंत राळेरासकर मिळून दर वर्षी ग्रंथदिनाला ' आशय परिवार ' चा अंक प्रसिद्ध करत असतात. अलीकडेच त्यांनी त्र्यं. वि. सरदेशमुख या मराठीतल्या लेखक-कवी-समीक्षक यांच्याबाबत केलेले दर्जेदार संशोधनात्मक काम सर्वांना माहीतच आहे. यंदाचा अंक त्यांनी सादर केला आहे तो कवी कुंजविहारी यांच्या कामाबाबतचा आहे. त्यांचे हे शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष असल्याने ते औचित्यही साधले गेलेले आहे.

कुंजविहारींना देव आणि देश यांचे कवी म्हटले जाते. या अंकाच्या मलपृष्ठावर दिलेली, ' चिरंजीव होवो जगी लोकशाही ' ही कविता पाहण्यासारखी आहे. या अंकात प्रा. निशिकांत ठकार यांचा एक अत्यंत दर्जेदार असा कुंजविहारींवर लेख आहे.

त्यात ते म्हणतात, “ कुंजविहारींचे व्यक्तिमत्व सौम्य, भावनाप्रधान, संवेदनशील, समन्वयशील, तत्त्वदर्शी, विश्वधर्मी, शालीन, माराठमोळे आहे. “ त्यांच्या या सर्व गुणांचा प्रत्यय येईल असा कुंजविहारींनी केलेला कबीराच्या शंभर दोह्यांचा अनुवाद हे या अंकाचे प्रमुख आकर्षण आहे. कबीराच्या या शंभर कविता भारताचे ग्रेट कवी रवींद्रनाथ टागोरांनी निवडलेल्या आहेत. टागोरांनी इंग्रजीत केलेल्या कबीराच्या या कवितांच्या अनुवादावरूनच कुंजविहारींनी हे मराठीतले अनुसर्जन केलेले आहे. टागोरांनी निवडलेल्या कबीराच्या कविता पाहता येणे हेही औत्सुक्याचे ठरणारे आहे. अंकाच्या शेवटी कुंजविहारींच्या कामाचे एकूण निर्देशनही अभ्यासपूर्ण आहे.

‘ कहत कबीरा ‘ या कुंजविहारींच्या अनुसर्जनातल्या या काही ओळी बघा –

मन होता मायातीत, मंत्रमय बने वाणी
देव दिसेना दिसेना, असणे हा त्याचा गुण
असूनिही नसायचे, जाणतात योगीजन
रोमरोमी देव खेळे, बाहेरली भाषा बंद
जिथे जिथे तीर्थ तेथे, पाहिले मी पाणी घाण
जिथे जिथे देव तेथे, जड लाकूड, पाषाण
ग्रंथ-भांडार धुंडुनी, उकलिले शब्दधागे
घट-पट शीण सारा, घडले ना मनाजोगे
काही ऐकिले पाहिले, अभ्यासिले सर्व काही
अनुभवावाचुनिया, समाधान कोठे नाही
तळमळे मनोवृत्ती, कुणा सांगू मी वेदना
दु:ख एका अंतरीचे कळते ना दुजा कुणा
पशुपक्षी किडामुंगी, जीव सारे जाणतात
गर्भातही सांभाळाया, देवाजीचा सिद्ध हात
भक्तिबळे आत्मस्थिती, अनायासे प्राप्त होते

भाषा थोडी जुनी पद्यप्रभावी आहे, पण मराठीतला हा एक मौल्यवान ऐवज या अंकाने वाचकांना आणि अभ्यासकांना दिलेला आहे. अनुवाद व अनुसर्जन यांचा बारकाईने अभ्यास करू इच्छिणाऱ्याला तर हा अंक खूपच महत्त्वाचा ठरेल. यासाठी आशय परिवार परिवाराचे अभिनंदन !

--- ००० ---

एक कवितासंग्रह

तुम्हाला काही तीव्र दु:ख आहे का, कोणत्याही कारणाने तुम्ही अत्यानंदात आहात का, तुम्हाला काही जीवनमरणाची वा एखादी साधीशीच का असे ना, समस्या त्रस्त करते आहे का, सामाजिक, आर्थिक वा राजकीय कारणांनी तुमच्यावर काही अन्याय चालू आहे का, स्त्री-पुरुष संबंधांतले काही विशेष बारकावे तुम्हाला जाणवत आहेत का, तुम्हाला खूप एकाकी वा निराश वाटते आहे का, जगण्यातली निरर्थकता जाणवते आहे का, आंतरद्वंद्वांमुळे काही नैतिक प्रश्न बिकट झाले आहेत का, एकूणच मूल्यहीन वाटत असल्याने भाषेचे अडवेतिडवे खेळ करत आहे ते साजरे करावे असे वाटते आहे का, स्वप्न, भ्रम आणि मनाची विचित्र अवस्था अशा काही बाबींतून तुम्हाला जगणे काही वेगळेच दिसते आहे का, कविता हा प्रकारच दांभिक वाटत असल्याने भाषा कशीही निरर्थकतेसाठीच वापरायची आहे का, तुमचे बदलते मूडस तुम्हाला एंजॉय करायचे आहेत का, निसर्गसौंदर्याचे तुम्हाला जाणवणारे हजार विभ्रम तुम्हाला व्यक्त करायचे आहेत का, तुम्हाला राग-तिरस्कार-शौर्य असे काही व्यक्त करायचे आहे का, तुम्हाला स्फूर्तिदायक वा बोधप्रद असे काही लिहायचे आहे का, प्रतिमांची श्रीमंती दाखवत तुम्हाला चमत्कार करून दाखवायचे आहेत का, रोजच्या जगण्यात सामान्यत: सगळ्यांनाच येणारे अनुभव जरा कलात्मक करून तुम्हाला हसू आणि आसू निर्माण करायचे आहेत का, गतकातरता वा बालपणीच्या आठवणी वा आईचे प्रेम हे तुम्हाला व्यक्त करायचे आहे का – असे आणखीही काही – हुश्श --- तर या सर्व प्रश्नांचे एकच उत्तर – नाही हो, असले काहीच नाही – असे असेल तर ? मग कुणीही म्हणेल की बाबा मग तुम्ही कविता लिहिता तरी का आणि कशासाठी ? तर, समजा, काही नाही, तुम्ही म्हणताय ते काही नसूनही हेही एक मन आहेच ना – त्या मनाला उपलब्ध भाषेतून नक्षीकाम करायचा हक्क नाही आहे का ? मनाच्या इतर सर्व अवस्था चालतात तर ही का चालू नये ? – या प्रश्नाचे उत्तर शोधायला प्रवृत्त करणारा एक कवितासंग्रह आलेला आहे --

सटल

अनिरुद्ध दिवाकर आचार्य

वर्णमुद्रा प्रकाशन.

कोणत्या ना कोणत्या किंवा कोणत्याही मानसिक अवस्था जर कवितेतून व्यक्त होऊ शकतात तर सहज काही शाब्दिक नक्षीकाम करणारे मन का बहिष्कृत समजावे ? या संग्रहाचे मला एक वेगळेच महत्त्व वाटते. कोणत्याही मानसिक अवस्थांना अभिव्यक्ती देत राहण्याचे तरी काय महत्त्व आहे मुळात ? करमणूक वा पुन:प्रत्यय ही उत्तरे सोडून याचे काय उत्तर देता येईल ? – हे आव्हानात्मक प्रश्न समोर आणण्याचे काम हा संग्रह करू शकतो.

--- ००० ---

' मुक्त शब्द ' च्या मार्च-एप्रिल २०२१ च्या अंकात आलेला माझा लेख --

सतीश तांबे यांचा नवा कथासंग्रह,

‘ मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट ‘

--- चं. प्र. देशपांडे.

गंमतीने असे म्हटले जाते की सध्या मराठीत शोधनिबंध सादर करून डॉक्टर झालेले लोक ढिगाने आहेत पण समीक्षक म्हणावेत असे फारसे कुणी नाहीत. यातले तथ्यही मान्य होण्यासारखे आहेच. त्यामुळे नव्या असो की लिहून लिहून ज्येष्ठ झालेल्या असो, अनेक लेखकांची योग्य दखल घेणे वा त्यांचे नीट मूल्यमापन होणे राहून जाते आहे. इंग्रजीत डिलान थॉमस या कवीच्या अगदी सुरुवातीच्या कविताही नजरेसमोर येताच टी. एस. एलियटसारख्या तिथल्या नामवंताने त्याचे महत्त्व जोखले होते आणि ते जाहीरही केले होते. आपल्याकडे कानोसा पद्धती जास्त वापरली जाते. कोण काय म्हणते हे बघत बेताबेताने बोलायचे. किंवा मग कवी वा लेखक कोणत्या गटातला, कोणत्या जातीचा, कोणत्या राजकीय टोळीचा, ग्रामीण की शहरी वगैरे पाहूनही समीक्षा केली जाते. ‘ ग्रामीण साहित्य चळवळ म्हणजे प्रस्थापित साहित्याला आव्हान ‘ अशी बालिश कुस्तिगीर विधाने करणारे समीक्षकही दिसतातच. साहित्य, कला हे काही जिंकण्या-हरण्याचे प्रांत नव्हेत, इथे मानवी मूल्यात्मकतेचा संबंध असतो, हे लक्षात घेणारे समीक्षक अभावानेच दिसतात. एकदा एक लेखक म्हणाला होता की माझे मराठी साहित्यातले स्थान काय आहे, हे मला मरायच्या आधी कळायला हवे. ‘ विपुला च पृथ्वी ‘ याच्यावर त्याचा विश्वास नव्हता. ते ठीक, पण, सांगणार कोण तुमचे स्थान ? गटातटापलिकडे मान्यता असणारे समीक्षक कुठे आहेत ? नाही तर मग, योग्य टोळीत शिरून, फील्डिंग लावून भलीभली पारितोषिके तरी मिळवता यायला हवीत. म्हणजे निदान कागदोपत्री तरी तुमचे स्थान नोंदवले जाईल. पण त्याने समाधान होऊ शकेल ? त्यातला पोकळपणा जाणवत राहणारच ना ! त्यामुळे, आजच्या मराठी साहित्यिकाला, ‘ माती असशी मातीत मिळशी ‘ हे समजूनच आपले लेखन करत राहणे भाग आहे. इथे लेखन हा पोटापाण्याचा उद्योग का होऊ शकत नाही याची चर्चा अनेकदा झालेली आहे. व्यावसायिक यशस्वी लेखकांचे क्षेत्र सोडून, आर्थिक अपेक्षा न बाळगता लिहिणाऱ्या सर्जक लेखकांबद्दल हे प्रश्न आहेतच. म्हणजे मग हे असे लेखक, लेखन हा धर्म मानतात म्हणायचे का ? या संदर्भात मग ---

कथा करोंनिया मोल ज्या पें घेती
तेही दोघे जाती नरकामध्ये

किंवा

जेथे कीर्तन करावे तेथे अन्न न सेवावे

--- या तुकारामबुवांच्या ओळीही लक्षात घ्यायला हव्यात. तुमचे स्थान तरी कशाला निश्चित करून हवेय तुम्हाला ? धर्माच्या दर्जाची कलानिर्मिती करत असाल तर विसरून जा ना ! आपले काम करा आणि जा निघून ! कसली वाट पाहात थांबताहात ? --- हे प्रश्न काहींना निर्दयपणाचे वाटतील पण मानवी मूल्यात्मकतेच्या क्षेत्रात काम करणाऱ्यांना हे विचारले जाणे अयोग्यही नाही.

हे सगळे लिहायचे कारण म्हणजे सतीश तांबे हे मराठीतले एक महत्त्वाचे कथाकार. आता इथे, ' महत्त्वाचे ' हा मूल्यात्मक शब्द नकळत लिहिला गेलाच ! पण, सध्या अशीच आहे परिस्थिती. प्रत्येक गोष्टीची चिकित्सा, विश्लेषण आणि ऐतिहासिक प्रक्रियेतली जागा या पद्धतीने बोलता येत नसले तरीही, सर्जक लेखकांनी त्यांना महत्त्वाच्या वाटणाऱ्या साहित्यकृतींवर लिहीत राहायला हवे. समीक्षक नाही म्हणून लढणार कुणाशी आणि रडत बसून उपयोग काय ? तर, मला असे वाटते की तांब्यांचे कथाकार म्हणून योग्य ते मोजमाप झालेलेच नाहीय. गाडगीळ. जीए, खानोलकर, पानवलकर, तेंडुलकर, कमल देसाई, मेघना पेठे अशा नामावलीत, सतीश तांबे हे नावही खरे तर असायला हवे. ' मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट ' हा त्यांचा नवीन कथासंग्रह आलेला आहे, तो वाचताना याची जाणीव झाली. या कथासंग्रहातली शीर्षक कथा आपण बोलत असलेल्या, मराठीतल्या अनेक प्रश्नांना कवेत घेणारी आहे. तीबद्दल बोलूच.

बराच काळ मराठी साहित्य ही, लक्ष्मण माने यांनी म्हटल्याप्रमाणे, एकूण मराठी समाजातल्या साडेतीन टक्क्यांची मक्तेदारी होती. १९६३ ची नेमाड्यांची कादंबरी ' कोसला ', १९७३ चा ढसाळांचा कवितासंग्रह ' गोलपीठा ', आणि १९७८ चे दया पवारांचे ' बलुतं ' अशा क्रमाक्रमाने अनेक साहित्यकृती येत गेल्या आणि ही मक्तेदारी मोडली गेली. मराठी साहित्याने वगळलेली अनुभवक्षेत्रे साहित्यात फुसांडत आली. आता यातला सुरुवातीचा काळ हा वास्तववाद आणि देशीवादाचा असणे भागच होते. जो तो आपापल्या अनुभवक्षेत्राचे लिहिणार आणि ते गुंताडयाचे असून चालणार नाही. त्यामुळे, जे घडले ते सांगणे, असे सोपे तंत्रच आवश्यक होते. नेमाड्यांनी नुसते ते वापरले नाही तर त्याची आक्रमक भलावण केली. " गेल्या शंभर वर्षांतील मराठी समीक्षेचा आढावा घेतल्यास टेनिसन-ब्राऊनिंगपासून एलियट-बेकेट अशा त्या मानाने दुय्यम दर्जाच्या साहित्यिकांची थोरवी मानणारे भाबडे मराठी विद्वान भीतभीतच तुकारामाची विश्वसाहित्यात गणना करताना दिसतील. " (टीकास्वयंवर पृष्ठ ११५.) एलियट-बेकेट हे दुय्यम लेखक ? जे आपल्याला समजणारे वा झेपणारे नाही त्याची आक्रमक टिंगलटवाळी करणे हे सुरुवातीच्या काळात गरजेचे होते, असेही म्हणता येईल.

याचबरोबर आणखी दोन गोष्टी महत्त्वाच्या झाल्या. एक म्हणजे अनुभवाचा ' दलित-शोषित-वंचित-पीडित–बहिष्कृत ' पणा आणि डावा परिवर्तनावाद. ' डावी राजकीय भूमिका ' हे जणू साहित्याचे व्यवच्छेदक लक्षणच मानले जाऊ लागले. हे सगळे लिहिण्याचा हेतू हा आहे की तांब्यांसारखा लेखक काहीसा बेदखल का राहिला असावा, हे पाहणे. त्याचबरोबर, या कथासंग्रहातली शीर्षक कथाही या प्रश्नाशी संबंधित आहे. तांब्यांचे ' लेखा-जोखा ' नावाचे एक पुस्तक आहे, त्यात पृष्ठ २०३ वर ते म्हणतात, " त्यामुळे एकूणात झाले काय तर आपल्या वैयक्तिक जगण्यात, आसपासच्या घडामोडींत जे काही घडते ते साग्रसंगीतपणे रंगवले की साहित्यनिर्मिती होईल असा संदेश नेमाड्यांच्या अनुयायांमध्ये रुजला. " अनुभवांची दाहकता आणि विविधता असली की झाले, असे झाले. तांबे एका ठिकाणी म्हणतात की एक दृश्य वास्तव असते आणि एक अदृश्य वास्तव असते. " अदृश्य वास्तवाचा वेध आपल्या अनुभवाधिष्ठित कल्पकतेतून घ्यावा लागतो. " (पृष्ठ २०७.) वास्तव हुबेहूब रंगावण्याच्या प्रयत्नात ही परिपूर्णता येणे राहून जाते, असे तांब्यांचे म्हणणे आहे. या सर्व प्रकारात साहित्याच्या ' कल्पकता ' या महत्त्वाच्या अंगाचा विसर पडला, अशी तांब्यांची मांडणी आहे आणि अर्थातच ती पटण्यासारखीच आहे. याच कारणामुळे, जीएं च्या फिक्शन च्या प्रयोगांची नेमाडपंथीयांकडून ' मोठ्यांचा चांदोबा ' अशी

खिल्ली उडवली गेली, असे तांबे म्हणतात. अशा प्रकारांमुळे साहित्य घडवणे आणि रचणे या महत्त्वाच्या निर्मितीप्रक्रियेलाच अडथळे निर्माण झाले. आता, फिक्षन म्हणजे काय, फँटसी म्हणजे काय या चिकित्सेत न पडता पुढे जाऊ.

हे जे सगळे लिहिले त्याचा या कथासंग्रहातल्या ' मुक्काम पोस्ट .. ' या शीर्षक कथेशी संबंध आहे. त्यामुळे, आधी तीवर बोलू. म्हटले तर ही एक दीर्घकथाच आहे. तांबे म्हणतात त्याप्रमाणे (चांगल्या अर्थाने) ही एक उत्तम ' रचलेली ' कथा आहे. हीत दोन प्रमुख पात्रे आहेत. एक म्हणजे मार्तंड भणगे हे एक जुने, बऱ्यापैकी नाव असलेले ज्येष्ठ ब्राह्मण लेखक आणि त्यांचा चाहता असलेला, नव्यानेच लिहू पाहणारा असा एक तरुण दलित लेखक भुवन केंदळे. एक अत्यंत महत्त्वाची अशी सामाजिक, सांस्कृतिक समस्या एका कलात्मक अनुभवातून व्यक्त करण्यासाठी लेखकाने रचलेले हे मैदान असून लावलेली फील्डिंग आहे. दोघेही शहरात राहणारे आहेत आणि दोघांच्याही वाट्याला सामाजिक दु:खाचे, अवहेलनेचे आयुष्य आलेले नाही. एका ठिकाणी भणगे भुवनला म्हणतात, " ह्या मराठी साहित्याचं काही खरं नाही. वाट्याला रटरट नसेल तर सारं व्यर्थ आहे इथे. वास्तविक पाहता मराठी साहित्याच्या उगमाशीच ज्ञानेश्वरांनी खरंतर चांगला धडा घालून दिला होता की , समाजाने कितीही छळ केला असला तरी त्याच्याविषयी आवाक्षर न काढता त्याच्या मंथनातून आलेल्या चिंतनाचा उपयोग करून निर्मिती करायची. पण ते सारं काळाच्या ओघात वाहून गेलं आणि गेल्या काही वर्षांमध्ये हालअपेष्टा, शोषण, अवहेलना, दारिद्र्य ह्यांची रट लावल्याशिवाय इथे लेखक म्हणून उभं राहणं अवघड होत चाललं आहे दिवसेंदिवस. " ही एक वेगळीच समस्या निर्माण झालेली आहे. हा एक वेगळाच रेटा आहे आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्यावरचा घालाही आहे. साहित्यात असे यमनियम वा पथ्यकुपथ्य तयार होणे हे कधीच समाजाच्या सांस्कृतिक पोषणाला हितकारक असू शकत नाही. भुवनच्या मनात आहे की भणग्यांना आपले वसतिस्थान दाखवून आपण काही पांढरपेशे नाही हे दाखवून द्यावे. भुवनला भणग्यांचे लेखन आवडायचे कारण ते उत्कंठावर्धक असायचे, आणि मुख्य म्हणजे वातावरण पांढरपेशे असूनही तशा जगण्याची कोडकौतुके त्यात नसायची. उलट त्यात त्या जगण्याचा पर्दाफाश करणे होते, श्रेष्ठत्वाचा दंभस्फोट होता. दलित साहित्यातल्या सततच्या कर्मकहाण्यांपेक्षा त्याला हे आवडत होते. पण, लेखनाच्या या वैशिष्ट्यांमुळेच, लेखक म्हणून भणगे ना पांढरपेशांना आपले वाटत होते ना दलितांना. तीच परिस्थिती भुवनचीही होणार होती, कारण, तो दलित असला तरी त्याच्याकडे ' दलित अनुभव ' नव्हता. दोघांचीही स्थिती ' न घरका न घाटका ' अशीच असणार होती. जगण्यात ज्या नाट्यमय घटना घडतात त्यांचा खोलात जाऊन वेध घ्यायला हवा आणि तो वेध घेण्याची प्रक्रिया व्यक्त होईल अशी ' रचना ' करायला हवी, असे भणग्यांचे म्हणणे. पण त्याला आता महत्त्व नाही. दारिद्र्य, अवहेलना यांच्यासह जे घडले ते सांगितले की झाले साहित्य, अशी कल्पना बळावलेली आहे. असल्या लेखकांना भणगे ' नुसते अनुभवांचे लेखनिक ' म्हणतात. अमुक प्रकारच्या अनुभवाच्या आग्रहाबरोबरच वास्तववादाचा आग्रह ही साहित्यातली आणखी एक समस्या झालेली आहे. खरे तर प्रत्येकाचे वास्तव वेगळे असते पण या सूक्ष्मतेची गरज राहिलेली नाही. सामान्य निवेदनाच्या स्तरावरचे वास्तव सांगणे हाच वास्तववाद, असे झालेले आहे. आणि भणगे तर फिक्षनचे महत्त्व मानणारे आहेत ! ' वास्तव वडापाव ' या गाडीची योजना करून

वास्तववादावरचा उपरोध भेदकपणे या कथेत व्यक्त झालेला आहे. अनुभवाने ना पांढरपेशाधार्जिणा ना बहुजन पद्धतीची रट लावणारा – या अवस्थेला ही कथा ' सांस्कृतिक फट ' म्हणून सादर करते. शेवटी भणगे भुवनला म्हणतात, " ... तू आता एकच कर.... माझ्या मरणानंतर त्या सांस्कृतिक फटीत मुक्कामाला जा. जे काही लिहायचं असेल ते तिथून लिही. अभिजन आणि बहुजन दोघांनाही सोडून एकटा पड. पुढचं साहित्य या सांस्कृतिक फटीतूनच प्रसवेल, याची मला खात्री आहे. " यावर अधिक भाष्याची गरज नाही. अनुभव आणि वास्तववाद या संकल्पनांचा सर्वांगीण वेध घेणारी कथा म्हणून या कथेला मराठीत एक खास स्थान राहील यात शंका नाही.

जगण्यातल्या अनुभवाचा सखोल वेध घेऊन तो आशय ' रचून ' व्यक्त करणारी या संग्रहातली आणखी एक सर्जक कथा म्हणजे, ' रावण आडनावाच्या पांडवापुत्राच्या नावाची जन्मकथा '. नाव, घराणे, जगण्याचे आदर्श नमूने अशा गोष्टींतल्या ॲब्सर्डिटीचे कारंजे उडवत राहणारी ही एक अकल्पनीय आणि तरीही कुठेही ' वास्तवा ' बाबत शंका घ्यायचा विचारही मनात येऊ नये, अशी एक उत्तम कथा आहे. एक सेमिनार होणार असून त्यात निबंध वाचणाऱ्या एकाचे नाव आहे ' मल्हारी पांडव रावण ' ! कसे काय बाबा हे असे अजब नाव ? – या उत्सुकतेतून ही कथा सुरू होते. पूर्वी लहान मुलांना एक कथा सांगितली जायची की कथेचा नायक राजकन्येला राक्षसाच्या तावडीतून सोडवायला निघतो तर वाटेत त्याला एक मुंगी भेटते, मी येऊ का म्हणते, तो चल म्हणतो. आणि या पद्धतीने एक कावळा, उंदीर, हत्ती हेही या मोहिमेत सामील होत जातात. तोच पारंपरिक लोककथेचा घाट ! त्यामुळे, शंका घेणे आणखीनच दुरापास्त ! या नावाचे रहस्य उलगडत जाणे आणि वाटेतल्या अनेक बाबतींतला उपरोध यांनी ही कथा मराठीतली एक उत्तम असंगत (absurd) फिक्शन ठरते. लेखन ही एक क्रीडा म्हणून पाहणे हे तांब्यांच्या कथेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य या कथेत प्रकर्षाने जाणवते. शेवटी या कथेचा निवेदक जेव्हा या रावण महाशयांना विचारतो की तुमची ही नामकथा मी लिहून प्रसिद्ध केली तर चालेल का ? त्यावर ते रावण म्हणतात, " बेलाशक. आणि त्या मंडळींनी प्रवासाची लिखित माहिती कोणतीही न ठेवल्याने तुम्ही त्यात काहीही तपशील भरू शकता. यात तुमच्या हाताशी ठोस वास्तव असं फारसं काही नाहीच आहे. त्यामुळे उलट ते छानच होईल. " तांब्यांच्या लेखक म्हणून असणाऱ्या सर्जकतेच्या कल्पनेला हे पूरकच आहे.

तांब्यांच्या कथांची नावे हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय होऊ शकतो. ' संशयकल्लोळात राशोमान ' हे असेच एक नाव. ज्यांना अकिरा कुरुसोवाचा जगप्रसिद्ध ' राशोमान ' हा सिनेमा माहीत आहे त्यांना हा ' सत्यशोधा ' चा मराठी अवतार खासच अर्थपूर्ण वाटू शकेल. सगळे मनोव्यापारांचे खेळ ! कथेच्या निवेदकाला खुनाच्या वगैरे धमक्या येणे हा या कथेचा ट्रिगर पॉइंट किंवा उद्घाटनबिंदू म्हणा. साहजिकच काय बाबा ही भानगड, अशी उत्सुकता निर्माण होते. कथा यातल्या अनेक शक्यतांचा धांडोळा घेत जाते पण शेवटी हाताला काहीच लागत नाही. इतकेच नव्हे तर, धमक्या कोण देत होते, हा प्रश्नही गळून पडतो. शेवटी निवेदक म्हणतो, " तर या सर्व मानसिक गदारोळातून मला हळूहळू सत्य आणि संशय यांच्या ह्या सरमिसळीतून एक भन्नाट नवीन नाटक दिसू लागलं, ज्याचं नाव असणार होतं, ' संशयकल्लोळात राशोमान ' – ज्यात मी माझ्या आयुष्यात घडलेलं हे तुम्हाला सांगितलेलंच कथानक थोडेफार फेरफार करून मांडणार आहे आणि एकदा का एखादं शीर्षक घट्ट पाळामुळांसकट डोक्यात उमललं की, पुढची वाटचाल ही बहुतेक वेळा मला एखाद्या सोपस्कारासारखी

वाटते. “ हेच तर सगळे तांब्यांच्या कथेचेही विशेष आहेत. तांब्यांच्या कथेत दलित-शोषित-वंचित-पीडित यांचे जग आणि त्यांच्या समस्या या चलनी मटेरियलला बढावा दिलेला नसतो. जग पांढरपेशे वा कुठलेही वा काल्पनिकही असू शकते. त्यातून मानवी मूल्यात्मकतेच्या दिशेने होणारा कलात्मक प्रवास हाच इथे महत्त्वाचा असतो.

या संग्रहातल्या इतर दोन कथाही या अशा तांबे-प्रक्रियेने युक्त अशाच आहेत. त्यांच्याबद्दल थोडक्यात --

‘ यत्र – तत्र – सावत्र ‘ : -- मनात बाळगावे लागणारे, स्वत: सावत्र असल्याचे जन्मरहस्य , “ ही देवाने दिलेली जमीन पैसे देऊन आपल्या नावावर करणं हा व्यवहार मुळातच काळा आहे – “ हे सवयीच्या व्यवहारापलिकडचे सत्य, आणि “ या पृथ्वीवर अढळ अशी जागाच नसावी बहुधा, प्रत्येक कणाकणावर वाकडी नजर आहेच कुणाची ना कुणाची ! “ -- इथपर्यंत विचार येऊन पोचणे – हे आहे या कथेत. या संग्रहातल्या पाचही कथांमध्ये काही ना काही अपवादात्मक आणि नाट्यमयही अशा गोष्टी आहेत.

‘ नाकबळी ‘ : -- ‘ नाकीडोळी नीटस असणे ‘ हा वाक्प्रचार एका अजब माहोलात नेणारी ही एक गंमतीशीर कथा आहे. नीतीअनीतीचे रूढ साचे ओलांडून ‘ समावेशक ‘ समाधान निर्माण करणारी !

तांब्यांच्या कथेची वैशिष्ट्ये थोडक्यात अशी सांगता येतील --

‘ सूर्याचिया परी । तुका लोकीं क्रीडा करी ॥ '

--- तुकाराम.

“Life is not a problem to be solved, but a reality to be experienced.”

— Soren Kierkegaard

वरील दोन्ही भाषिते एकत्र केल्यावर जे समजते ती आहे या सर्व कथांमागची मर्मदृष्टी. या कथांमध्येही पात्रे आहेत, त्यांची सुखदु:खे आहेत, त्यांच्याही आयुष्यांत ताणतणाव, गुंताडे आहेत, संघर्ष आहेत, हिंसाही आहे, पण तरीही, लेखक याचा कोणताही प्रभाव न घेता लिहितो आहे, हे जाणवत राहते. त्यामुळे, या कथा ना कोणत्या सुखदु:खांचा प्रत्यय देणाऱ्या आहेत ना कोणता मूड तयार करणाऱ्या. जगण्याच्या एकूण जंजाळातून हा लेखक सहज विहरत असल्याचे वाचकाला जाणवत राहते. या अर्थाने ही लेखकाची एक सहज पण गंभीर क्रीडा ठरते. यांतल्या पात्रांनाही अनेक समस्या आहेत, त्यांची निराकरणे देणे वा त्यांचा न्यायनिवाडा करणे हा इथे हेतूच नाहीय. कारण अर्थातच सर्व काही इतके जटिल आणि इतक्या प्रभावांनी युक्त आहे की त्याची सोडवणूक वा त्या बाबतचे निष्कर्ष अशक्यच ठरावेत. एका सखोल परिपक्वतेने जगण्याकडे पाहणारी ही दृष्टी आहे. ही क्रीडा म्हणजे, ‘ शतदा प्रेम करावे ‘, ‘ प्रेम कर भिल्लासारखं ‘ किंवा ‘ फक्त लढ म्हणा ‘ अशी बावळट-उथळ नाही. जगण्यात एखादा सल्ला अंमलात आणणारी ही क्रीडा नाही. हा, कीर्केगार्ड म्हणतो तसा जगण्याचा समग्रतेने घेतला जाणारा अनुभव आहे. मानवी जगण्याचा व्यापक आवाका घेत जाणारी ही मर्मदृष्टी आहे. या कथांची निवेदनशैलीही या दृष्टीतून येणारीच आहे. घटनांचे सर्व तपशील आणि त्यांतले सर्व प्रभाव यांची दखल घेत हे निवेदन जाते. त्यामुळे ते सविस्तर आणि काही वेळी पाल्हाळीकही वाटू शकते. पण, विशेष म्हणजे यातले प्रत्येक वाक्य निवेदनात अर्थपूर्ण भर टाकत जाणारे आहे. कुठेही कंटाळा तर येत नाहीच पण हे संपूच नये असे वाटत राहते. या

नुसत्या घटनांच्या कथा नाहीत. घटना घडण्याच्या प्रक्रियांचा बारकाईने धांडोळा घेत जाणाऱ्या अशा या कथा आहेत. या वैशिष्ट्यांमुळे या कथा मराठीत अद्वितीय म्हणाव्यात अशा आहेत. कलेतल्या अत्युच्च दर्जाच्या मूल्यदृष्टीचा हा एक विलोभनीय पट आहे.

एखाद्या विचारसरणीचे महत्त्व मांडणे, एखादी भूमिका अभिव्यक्त करणे, अमुक अशा प्रकारचे परिवर्तन अपेक्षिणे – असले काहीही या कथा करत नाहीत. त्यांचा आवाका त्याहून खूपच मोठा आहे. जगण्याच्या समग्रतेचे भान देणे म्हणजेच एक मानवी परिपक्वता निर्माण करणे – हे कलेचे अत्यंत मौल्यवान काम या कथा करतात. कोणताही तात्विक/ आध्यात्मिक आव न आणता साधेपणाने केलेल्या निवेदनातून या कथा अशी आशयघन उंची गाठतात. इथे एक विशेष मुद्दा सांगणे मला महत्त्वाचे वाटते. फेसबुकसारख्या समाजमाध्यमांवरचा तांब्यांचा वावर पाहिला तर तो निश्चितच भूमिकायुक्त आणि त्यांची व्यक्तिगत मते व्यक्त करणारा असतो. पण, कथाकार तांबे यातून मुक्त असल्याचे दिसते ! यावरून हेच स्पष्ट होते की ‘ मते ‘ हा एक मर्यादित प्रकार आहे. कला ही व्यापक, समावेशक असते. लेखकाच्या व्यक्तिगत मतांवरून कलेचे मूल्यमापन करणे, ही आणखी एक समस्या होऊन बसलेली आहे. मराठीने या ‘ फटी ‘ च्या गरजेतून, वास्तववादाच्या पकडीतून आणि व्यक्तिगत भूमिका व मते यांतून लौकर बाहेर पडणे हे सांस्कृतिक हिताचे होईल, हे या निमित्ताने समोर यावे.

--- ००० ---

सॅक्सोफोन हे वरातीत वाजवायचे वाद्य नव्हे (कवितासंग्रह)

--- गणेश वामन कनाटे – वर्णमुद्रा प्रकाशन.

कवीने कविता ही वाचकालाच काय, स्वत:लाही बौद्धिक निवेदानासारखी ‘ कळली ‘ पाहिजे असा आग्रह धरू नये. कवितेतच ती स्वत:ला आणि वाचकाला समजावून देऊ नये. चांगली कविता संदेश देण्याची वा बोधप्रद असण्याचीही जबाबदारी घेत नाही. एखादी मीटिंग संपल्यावर जसे, या मीटिंगमध्ये आपण काय विचार केला आणि काय ठरवले याची एक कॅप्सूल पुन्हा एकदा बोलली जाते त्याप्रमाणे कवितेत गोषवारा वा सारांश कधीही देऊ नये. शिवाय, कविता असते कशी किंवा कशी असायला हवी याच्या प्रभावयुक्त पूर्वकल्पना मनात फिट नसाव्यात. ही तत्त्वे तंतोतंतच काय, जरा अधिकच कडेकोटपणे पाळणारे कवी ग्रेस हे गणेश कनाटे यांचे आदर्श आहेत. हा त्यांचा कवितासंग्रहच त्यांनी ग्रेस यांच्या स्मृतीला अर्पण केलेला आहे, तरीही वर उल्लेखिलेल्या तत्त्वांचे इथे अनेकदा उल्लंघन होताना दिसते. त्यामुळे, कवितेत पाणी मिसळल्यासारखे होऊन ती सपक होण्याकडे कलू लागते. माझ्या आवडीनिवडी वा ‘ कविता म्हणजे काय ‘ याचे माझे आकलन हे हजारांतले एक असते आणि ते अंतिम मुळीच नसते याची मला जाणीव आहे. एखाद्या लेखकाचे वा कवीचे, माझ्या मते सदोष असलेले काम चिवडत न बसता त्याच्या जमलेल्या आणि चांगल्या कामावरूनच त्याचे मोल ठरवावे असे मला वाटते. या दृष्टीने पाहता या ‘ सॅक्सोफोन ‘ कवितासंग्रहातल्या खालील कविता मला चांगल्या वाटल्या –

मांजर, कुत्रा, वटवाघूळ आणि मी ----------------- पृष्ठ ५८
सैरभैर पक्षी आणि नदीची पाणीदार काया ---------- " १०१
जेव्हा मी गुं गुं गुं असा आवाज करत बोलेन -------- " १०४
एकटा माणूस खूप खूप खूप एकटा असतो ---------- " ११२
' दि एण्ड ' पूर्वी एकदा तरी ----------------------- " १२०
रिकाम्या जागा आणि निर्वात पोकळी --------------- " १२५
अठ्ठावीस युगांचे वाट बघणे ------------------------- " १२६
स्वप्नातल्या स्वप्नातला मी हरवून जातो हल्ली ---------- " १३०
झेब आणि तिचे गाणे व मी आणि माझे गाणे --------- " १३६
रात्र – रात्र जागून लिहून ठेवलेल्या नोंदी (१) -------- " १४२
नेहमी नाही पण कधीतरी घडतंच ------------------ " १४८

मला असे जाणवते की कनाट्यांची कविता ही मुख्यत: एकटेपणाची कविता आहे. ही तशी आजच्या जगातली एक प्रमुख समस्याही आहे. तो एकटेपणाही पूर्ण कळू शकत नाही आणि त्या एकटेपणातूनही पुरेसे काही आकलन होत नाही. असे हे अर्धवट दर्शनातले जगणे असते. या अवस्थेतूनच कनाटे मानवी जगण्याचा आवाका घेऊ पाहतात. प्रास्ताविकात ते म्हणतात की लौकिक दृष्ट्या ते असतीलही यशस्वी पण मुळात स्वत:ला ते एक पराभूत, निराश व्यक्तीच वाटतात. या मूडची वा मनोवस्थेची तीव्रता ही अर्थातच असह्य असणार. अशा प्रत्येक वेळी कवितेनेच त्यांना तारलेले आहे, असे ते म्हणतात. एकटेपणा हा एक ताण असून त्या ताणाची अशी एक शक्ती असते. त्यातूनच या कविता जन्मतात. पण, कविता तारते म्हणजे काय, तर ती कवीला या मूडबाहेर नेते, थोडेफार स्वातंत्र्य देते. या अर्थाने या एका परिपूर्ण स्वातंत्र्याची वाट पाहण्याच्या कविता आहेत. कनाट्यांना सूर सापडतो तेव्हा हीच मानवी आकांक्षा त्यांच्या कवितांतून विविध प्रकारे व्यक्त होते. त्यांचा पुढचा संग्रह अधिक केंद्रितता आणि अधिक संपृक्तता घेऊन येईल, असे वाटते.

--- ००० ---

शकुनीमामा

--- ले ० डॉ. कमलेश सोमण --- गोयल प्रकाशन, पुणे.

मयासुराने पांडवांबाबतच्या कृतज्ञता बुद्धीतून त्यांना निर्माण करून दिलेल्या मयसभेपासून हे कथानक सुरू होते. चमत्कारांनी युक्त अशा त्या आभासी सभेत दुर्योधन अनेकदा फसतो. त्याची पांडवांकडून आणि विशेषत: द्रौपदीकडून खिल्ली उडवली जाते. त्या अपमानाने दुर्योधन क्रुद्ध होतो. पण पांडवांना युद्धात हरवणे अशक्य असते. त्यावर शकुनीमामा एक धूर्त उपाय काढतो – तो म्हणजे, पांडवांना द्यूत खेळायला बोलावून त्यात त्यांना हरवायचे आणि त्यांचे सर्वस्व लुटून

त्यांना नामोहरम करायचे. फासे टाकण्यात आणि त्यातल्या कपटीपणातही शकुनीमामा माहीर असल्याने हे घडणे नक्कीच शक्य असते. इथून सुरू झालेले हे कथानक शेवटी युद्ध पूर्ण होईपर्यंत जाते.

या १०८ पानी लघुकादंबरीचे वैशिष्ट्य हे आहे की यातले बरेच निवेदन शकुनीमामाकडूनच येते. (काही निवेदन हे कादंबरीच्या निवेदकाकडून येते. निवेदानाचे हे दोन प्रकार अधिक तांत्रिक सजगतेने वापरून कादंबरीची धार वाढवता आली असती, असे वाटले.)

यापूर्वी मी डॉ. सोमणांच्या ' विदुर ' या कादंबरीबद्दल लिहिले होते. तसाच व्यापक आवाका इथेही आहे. मानवी जगण्यातल्या समस्या कशा अनेक कारणांनी, प्रक्रियांनी आकाराला येतात आणि त्या कशा निराकरणहीन बनतात याचे फारच प्रत्ययकारी चित्रण या कादंबरीत आहे. चूक-बरोबर, न्याय-अन्याय वगैरे बाबींचे एकतर्फी निर्णय देणे कसे अवघड असते याचे भान ही कादंबरी देते. अनेक स्वभाव, अनेक हेतू यांचे हे एक अत्यंत गुंतागुंतीचे मिश्रण इथे आहे. मानवी जगणे समजून घेण्याच्या उत्तुंग शक्यता महाभारतात कशा ओतप्रोत आहेत याची जाण ही कादंबरी देते.

एका वेगळ्या कोनातून लिहिलेली, छोटेखानी पण समृद्ध अशी ही कादंबरी आहे. ही लिहिल्याबद्दल डॉ. सोमणांचे आणि प्रकाशित केल्याबद्दल गोयल प्रकाशन यांचे अभिनंदन !

--- ००० ---

माझा मित्र मिलिंद शिंत्रे हा एक फारच सज्जन, नम्र माणूस असल्याने तो स्वत:ला अजिबातच कवी समजत नाही. पण, अपघाताने, त्याच्याही न-कळत तो मराठीतली एक अत्युत्तम न-कविता (anti poem) लिहून गेलेला आहे. मित्रत्वाच्या नात्याने मी त्याला योग्य तो सल्ला आणि प्रोत्साहन दिलेले आहे. त्याच्या नम्रपणामुळे आपण सर्वांनीच या कवितेच्या न-आस्वादाला मुकू नये म्हणून मी हो-पुढाकार घेत आहे. ओळी तोडून थोडा कवितेचा आभास तयार करायची जबाबदारी मी घेत आहे. मिलिंदची परवानगी न घेताच (शक्य तिथे न यावा म्हणून) मी ती न-कविता खाली देत आहे --

एकपात्री समूहनृत्यात

--- कवी --- मिलिंद शिंत्रे (या कवितेचा शिल्पकार अर्थातच – मी किंवा न-मी).

गुडघे दुखत असल्याने, आम्ही सायकियाट्रिस्टची अपॉइंटमेंट घेतली होती.
पण त्यांना अर्धशिशीचा त्रास होत असल्याने, ते डर्मिटोलॉजिस्टकडे गेले होते.
मग ते ऐकून आम्हाला खूप भूक लागली. काहीतरी चमचमीत खावे म्हणून नीरा
प्यायला गेलो. तर तिथे आम्हाला उपवासाचे मटण मिळेल, अशी पाटी दिसली.
मटणविक्याच्या एका कानाला बहिर्गोल भिंगांचे कर्णयंत्र होते आणि दुसऱ्या हातात
कबड्डीची हॉकीस्टिक होती.
तितक्यात एका तरुणीने त्याला कॅरमच्या सोंगट्या देता का किलोभर, असे विचारले.

पण मटणविक्या म्हणाला की, शाकाहारी व्हिक्सच लावा मैदानाला उगाळून,
म्हणजे छान पोहता येईल त्यात अंडरवॉटर.
तोच बंद पडलेल्या पालथ्या रेडिओवर बैठकीचा भांगडा लागला आणि नंतर
छातीच्या डेंटिस्टची जाहिरात लागली. त्यामुळे आम्हाला गुडघ्यांची आठवण झाली.
एकपात्री समुहनृत्यात मोठ्या आवाजात गायल्यापासून आम्हाला गुडघेदुखी झाली होती.
शेवटी ती सहन न झाल्याने अंतिम उपाय म्हणून डोळ्यांच्या चेस्ट हॉस्पिटलमध्ये
आम्ही सदेह घुसलो !!! आम्ही म्हणजे मी एकटाच हो , जणू आचार्य मिलिंद अत्रेच !
--- ००० ---

नवल (कादंबरी)

ले ० प्रशान्त बागड – प्र ० पपायरस

हा एक वेगळाच प्रयोग आहे. ना फारसा भूतकाळ ना फारसे भविष्य अशा मजकूराची कादंबरी. हिचा वर्तमानकाळच महत्त्वाचा. मागे काय काय घडत आले हे तुमच्या लक्षात राहीलच असे नाही आणि पुढे काय होईल याची उत्सुकता ताणणारेही काही नाही. घटनांची सलग साखळी नाही. मानवी संबंधांतले ताणेबाणे, त्यांचे परिणाम, त्यांतून उद्भवणाऱ्या समस्या असले फारसे काही नाही. नायकाव्यतिरिक्त येणारी पात्रे तशी जुजबी आणि फारशी घनता नसलेली आहेत. नायक सोनकुळे हा एक मुखदुर्बळ विद्यार्थी असून तो कॉलेज शिक्षणासाठी पुण्यात आलेला आहे, हे आपल्याला सुरुवातीला कळते. पूर्ण कादंबरी ही काही सहाध्यायी विद्यार्थी, त्यांचे भाऊ वा मित्र यांच्या आसपास फिरत राहते. स्त्री पात्रे तर नाहीतच असे म्हणायला हरकत नाही. सनसनाटी वा खूप भावनिक असे काही घडत नाही. कथानक असे काहीच नाही. ही कादंबरी आपण वाचत जातो आणि वाचलेले विसरतही जातो. साडेतीनशे पानांची ही कादंबरी वाचून झाल्यावर आपण फार तर पाच मिनिटे हिच्यावर बोलू शकू.
मग आहे तरी काय हीत ? तर नायकाबरोबर जात राहणे आणि त्याच्या दिसण्यात जे जे येईल ते बारकाईने पाहात जाणे आणि त्याच्या वेळोवेळी येणाऱ्या काही आठवणी. जागतिक आणि मराठी साहित्यातले, तत्त्वज्ञानातले मधून मधून येणारे संदर्भ पाहता हा नायक बऱ्यापैकी वाचन केलेला आणि खूप विचार करणारा आहे असे आपण मानू शकतो. पूर्ण निवेदन हे कादंबरीचा निवेदकच करत असून अनेकदा ते सोनकुळेचे मनोगत या रूपात येत राहते. नायकाला भेटणाऱ्या व्यक्ती,

त्याला दिसणारी दृश्ये आणि त्याच्या दिनक्रमाच्या भोवतीचे जग हे आहे या कादंबरीचे अनुभवविश्व. या एकूण प्रकारात महत्त्वाचे आहे ते, जे समोर आहे ते नीट लक्ष देत वाचत जाणे. कथानक असे नसल्याने समोरच्या घटितांचे धागे आणि कण जणू मोकळे होतात आणि इतस्तत: पण पूर्णपणे दिसू लागतात. त्यांचे अवधान घेत जाणे हाच आहे या कादंबरीचा आशय. कधी तो काव्यमय वाटतो तर कधी निरर्थक. इथे वस्तूंना वा घटनांना त्यांचे असे वजन वा मूल्य नाही – त्यांचे भान घेत जाणारे मन हाच इथला आशय प्रवाह. निरर्थकता, भावनिकतेचा जवळपास अभाव आणि तरतमभाव न बाळगता समोर येत जाणारे तपशील यांमुळे वाचकाला एक स्वातंत्र्याचा, मोकळेपणाचा फील येऊ शकतो. म्हटले तर ही कादंबरी कुठूनही वाचता येते. अर्थात, शेवटाच्या भागात येणारे छत्री हरवण्याचे प्रकरण नंतर पूर्ण कादंबरीवर त्याची छाया टाकते. ही भराभर वाचून संपवायची कादंबरी नाही. नायकाबरोबर वाचकानेही त्याच्या मनातल्या घटितांबरोबर चालावे, अशी अपेक्षा करणारे हे तंत्र आहे. मराठीत हा एक नवीनच प्रकार आहे. हे वाचन सवयीत बसणारे नाही. त्यामुळे, त्याचे नावीन्य ओसरल्यावर पुढे वाचत राहण्याचा कंटाळाही येऊ शकतो. मी मात्र त्याला बळी पडलो नाही. हा प्रयोग गंभीरपणे केलेला आहे आणि कसदारही आहे हे पाहून मी यातला शब्द न शब्द वाचत गेलो. काही ठिकाणी येणारे काव्यमय भाग, काही ठिकाणी येणारे अनपेक्षित तपशील वा वाक्यरचना हे पाहात जाणे मला इंटरेस्टिंग वाटले. पण, सर्वच वाचकांना असे वाचत जाणे आवडेल का याची शंका निश्चितच आहे. या प्रयोगाच्या यशापयशाबद्दल लगेच भाष्य करणे अवघड आहे. तरीही, सुचलेल्या एका वेगळ्याच मार्गाने अशी पूर्ण कादंबरी लिहिल्याबद्दल बागडांचे आणि तशाच धाडसाने ती प्रकाशित केल्याबद्दल पपायरस प्रकाशनाचे अभिनंदन केले पाहिजे, असे मला वाटते.

--- ००० ---

16 June 2021.

(१) रांगे हात (२) काठपदर -- दोन नाटके.

लेखक ० दिलीप जगताप – प्रकाशक ० कॉपर कॉईन.

दिलीप जगताप हे मराठीतल्या प्रायोगिक रंगभूमीवरचे एक प्रख्यात लेखक आहेत. त्यांच्या नऊ नाटकांची चार पुस्तके अलीकडेच प्रकाशित झालेली आहेत. पाहाताक्षणी उत्तम दर्शन देणारी ही पुस्तके आहेत. तरीही, मुद्रित शोधन जरा अधिक चांगले असायला हवे होते, असे जाणवले.

(१) ‘ रंगे हात ‘ हे सार्त्रच्या ‘ डर्टी हँडस ‘ (म्हणजेच ‘ क्राईम पॅशनेल ‘) या नाटकाचे मराठी रूपांतर आहे. एका राजकीय प्रश्नावर आधारित असे हे नाटक आहे. आक्रमकता चांगली की तडजोडीने पुढे जाणे चांगले, हा विषय आहे. पात्रांची नावे मुळातली तिकडची असली तरी जगतापांच्या सिद्धहस्त, ओघवत्या मराठीमुळे वाचन सहज आकलनीय

होते. कोणत्याही विचारांचे साचे हे मानवनिर्मित असून त्याला सत्याचे वगैरे मूल्य नसते – ते सगळे त्या त्या वेळी बरोबर-चूक ठरवणे असते याची मनाला एक वेगळीच जाग हे नाटक देते. पूर्वी या नाटकाचे मराठीत रूपांतर श्री. ना. पेंडसे यांनी ‘ डॉ. हुद्दार ‘ या नावाने केले होते. जगताप हे एक जातिवंत, जुने, जाणते नाट्यकर्मी असल्याने त्यांचे हे रूपांतर उत्तम झालेले आहे. खरे तर ह्युगोला त्याची बायको होर्डररच्या मिठीत दिसल्यामुळे त्याने त्याचा खून केलेला असतो – ठरलेल्या तत्त्वासाठी नव्हे. पण शेवटी तो ते नाकाबूल करतो – “ पण एक सांगतो, माझं त्याच्यावर खरंखुरं प्रेम आहे आणि जर मी त्याला मारला हे नाकारलं तर तो एका क्षुद्र मादीसाठी मेलेलं निरुपयोगी, बेवारशी प्रेत ठरेल ... “ या विचाराने तो स्वत: मरण पत्करत खोटे बोलतो ! जरूर वाचावे असे नाटक.
(२) ‘ काठपदर ‘ हे जिआ जेनेच्या ‘ द मेडस ‘ या नाटकाचे मराठी रूपांतर आहे. या नाटककाराचे जीवन प्रचंड नाट्यमय होते. गुन्हेगारीतही बरबटलेले. शेवटी त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली तेव्हा सार्त्र आणि पिकॅसो यांनी फ्रान्सच्या अध्यक्षाकडे रदबदली करून त्याला सोडवले होते. हे नाटक शोषक आणि शोषित यांच्यांतल्या नात्यांचा आणि त्यांतल्या हिंसेचा सखोल वेध घेणारे आहे. जेने हा एक ‘ क्रौर्याचा रंगमंच ‘ चा पुरस्कर्ता होता, हे इथे लक्षात घ्यावे. दोन मोलकरणी आणि त्यांची मालकीण यांच्यांतले हे विदारक नाट्य आहे. या मोलकरणीच आलटून पालटून मालकीण होतात आणि त्यांची मने त्या खोट्या खोट्या दृश्यांतून व्यक्त करत राहतात. या नाटकाच्या शेवटच्या भागात येणारे छबी या पात्राचे एक मोठे स्वगत हा नाट्यमयतेचा एक उत्तुंग नमूना आहे. भूमिका बदलांचे हे नाटक लक्षपूर्वक वाचावे लागेल असे आहे. इथेही जगतापांच्या ओघवत्या संवादांमुळे ते आकलन-सुलभ झालेले आहे.

दिलीप जगताप हे माझे जुने मित्र आहेत. नाट्यक्षेत्रात त्यांचे बरेच काम झालेले असूनही एक प्रकारे ते दुर्लक्षितच राहिलेले होते. आता त्यांची नाटके प्रकाशित झालेली आहेत, ही एक चांगली घटना घडलेली आहे. त्याबद्दल, कॉपर कॉईन प्रकाशनाचे अभिनंदन.

--- चं. प्र. देशपांडे.

(हे एफबी मध्ये दिलेले नाही) --- नंतर दिले --

--- ००० ---

०८ जुलै २०२१.

शब्दांची नवलाई (बालकवितासंग्रह)

कवी – एकनाथ आव्हाड , प्रकाशक – दिलीपराज प्रकाशन.

आपले इथले मित्र एकनाथ आव्हाड यांनी बालांसाठी हा एक आगळावेगळा, त्यांच्या भाषाज्ञानात हसतखेळत भर घालणारा असा एक उत्तम कवितासंग्रह लिहिला आहे. हा बालांसाठी जरी असला तरी सर्वांचीच छान उजळणी करून घेईल असा मजेदार संग्रह आहे. व्याकरणातले काही सोपे प्रकार, नामांचे विविध प्रकार, वाक्यांचे प्रकार, वाक्प्रचार, म्हणी,

विविध संदर्भांत येणारे काही खास शब्द अशा नावीन्यपूर्ण योजना यात आहेत. मुलांसाठी आणि पालकांसाठीही प्रत्येक घरात असावे असे हे पुस्तक आहे. उत्तम कागद, उत्तम छपाई आणि संतोष घोंगडे यांची छान रंगीत चित्रे यांनी सजलेले असे हे पुस्तक आहे. मुलांनी वा मोठ्यांनी सहज हाताशी ठेवावे आणि जातायेता एखादे पान तरी वाचावे अशी ही खरोखरच एक विशेष नवलाई आहे.

आव्हाडांनी मुलांसाठी यापूर्वीही खूप लेखन केलेले असून त्यांना बरीच पारितोषिके व सन्मानही मिळालेले आहेत. तुमच्याआमच्या मुलानातवंडांसाठी सातत्याने असे मोलाचे काम करत राहणाऱ्या आव्हाडांचे अभिनंदन !

--- ००० ---

ज्यूलिअस सीझर (तीन अंकी नाटक)

लेखक-अनुवादक – दिलीप जगताप, प्रकाशक – कॉपर कॉईन.

जागतिक नाटककार विल्यम शेक्सपीअर याचे हे एक ग्रेट नाटक. उत्तम अनुवादाने हे नाटक मराठीत उपलब्ध होण्याची ही एक महत्त्वाची सांस्कृतिक घटना आहे. अविनाश सप्रे यांनी या पुस्तकाला लिहिलेली साडेतीन पानी प्रस्तावना हा एक उत्तम प्रस्तावनेचा नमूना आहे. शेवटी ते म्हणतात, " दिलीप जगतापनी भाषांतर करताना मूळच्या संहितेला कुठेही धक्का न लावता, हे भाषांतर आहे असे वाटूही नये, हे अस्सल मराठी नाटक आहे, असे वाटावे अशी किमया केली आहे आणि राजकीय नाटक किती श्रेष्ठ दर्जाचे असू शकते हे दाखवून दिले आहे. त्यासाठी त्याने वापरलेली भाषा नाटकी स्वरूपाची नसून ' नाट्यात्म स्वरूपाची ' (थिएट्रिकल लँग्वेज), अस्सल देशी वाणाची आणि शेक्सपीअरच्या भाषेला पर्याय देणारी आहे, याचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. " – हे तंतोतंत पटण्यासारखे आहे. ही एक वेगळ्याच प्रकारची शोकांतिका आहे. या नाटकाचा नायक कोण, सीझर की ब्रूटस यावर जगभर चर्चा झडत आलेल्या आहेत. मला ही एका व्यक्तीची नव्हे तर एका समाजाची शोकांतिका वाटते. एका पराक्रमी, महत्त्वाकांक्षी व्यक्तीकडून कुणी दुखावले जाणे, कुणी मत्सरग्रस्त होणे, यांतून निर्माण होणारी ही एक क्रिया-प्रतिक्रियांची शृंखला आहे. त्यातून उभा राहणारा प्रचार, कारस्थाने, त्यात सरळ, सज्जन व्यक्तींचेही सामील होणे आणि या सर्वातून तो समाज यादवीकडे, अराजकाकडे ढकलला जाणे आणि त्यातून मोठा सामाजिक विध्वंस होणे – असा खूप मोठा आवाका घेणारे हे नाटक आहे. मानवी स्वभाव आणि राजकीय मूल्ये यांच्यांतल्या संबंधांचाही सखोल धांडोळा हे नाटक घेते.

हे एक महत्त्वाचे, अमूल्य नाटक मराठीत उपलब्ध करून दिल्याबद्दल लेखक व प्रकाशक यांचे अभिनंदन !

--- चं. प्र. देशपांडे.

--- ००० ---

' हृषिकेश मुखर्जींचे चित्रपट – आस्वादन आणि जीवनदृष्टी '

लेखक – डॉ. कमलेश सोमण, प्रकाशक – गोयल प्रकाशन.

गुन्हेगारी, नायक-खलनायक, मारामाऱ्या, पाठलाग, गोळीबार, कॅबरे नाच वगैरे मार्गाने न जाता परिस्थिती आणि माणूस, माणूस आणि माणूस यांच्यांतल्या समस्या, दु:खे, भावभावनांचे हेलकावे या मार्गाचे चित्रपट सुचण्यासाठी आणि त्यांचे दिग्दर्शन करण्यासाठी एक वेगळी चिंतनशीलता लागते. ती असलेले भारतातले अपवादात्मक दिग्दर्शक होते हृषिकेश मुखर्जी. दु:ख आणि मिस्किलपणा यांचे हृद्य मिश्रण करू शकणारे अजब जादूगार होते ते ! त्यांच्या चित्रपटाचे चित्रीकरण चालू असताना कधी महमूद हा विनोदी नट तिथे गेला तर तो म्हणे, " बकवास पिक्चर है ये – नही चलेगी – " असे ' बकवास ' चित्रपट काढण्याचे धाडस थोड्याच लोकांकडे असते. त्यांतले एक होते हृषिदा ! आनंद सारखी बरीच पात्रे त्यांनी त्यांच्या प्रतिभेने कायमचा ठेवा म्हणावा अशी निर्माण करून ठेवलेली आहेत. साधेपणा, साधी माणसे, उत्तम पण उत्तेजकता नसलेले संगीत, आणि भडकपणा टाळत केलेली सहज हाताळणी ही त्यांची वैशिष्ट्ये होती. धर्म असो की राजकारण असो की कला, प्रत्येक क्षेत्रात करमणुकीसाठी वखवखलेल्या या देशात मसालाहीन चित्रपटांची इतकी निर्मिती करणे हे येरागबाळाचे काम नोहे ! त्यांचा एखादा तरी चित्रपट ' खूप महान ' म्हणावा असा आहे का, यावर मतभेद होऊ शकतील पण त्यांनी प्रेक्षकांची मानवी संबंधांची जाण वाढवली, त्यांना अधिक संवेदनशील केले याबाबत मात्र दुमत होऊ नये.

अशा या आपल्या प्रिय दिग्दर्शकाच्या १५ चित्रपटांचा मौल्यवान ऐवज एका ठिकाणी देणारे पुस्तक आपले मित्र डॉ. कमलेश यांनी लिहिलेले आहे – ' हृषिकेश मुखर्जींचे चित्रपट – आस्वादन आणि जीवनदृष्टी '. मुसाफिर, अनाडी, अनुराधा, छाया, असली-नकली, अनुपमा, आशीर्वाद, सत्यकाम, गुड्डी, बावर्ची, आनंद, अभिमान, नमकहराम, चुपके चुपके आणि मिली – हे आहेत ते चित्रपट. या चित्रपटांचे कथासार, काही महत्त्वाचे प्रसंग, काही विशेष संवाद, त्यांतली गाणी, काही फोटो आणि या सर्वांतून लेखकाला जाणवत गेलेले बारकावे यांनी युक्त असे हे पुस्तक आहे. डॉ. कमलेशांनी हे खास प्रेमाने लिहिलेले पुस्तक आहे यात शंकाच नाही.

हिंदी चित्रपट हे भारताचे एक अधूबिंदू म्हणावे असे प्रकरण आहे. त्यातल्या एका महत्त्वाच्या विषयावर आलेल्या या पुस्तकाचे मन:पूर्वक स्वागत आहे ! लेखक आणि प्रकाशक यांचे अभिनंदन !

--- ००० ---

अश्वत्थामा (कादंबरी).

ले ० डॉ. कमलेश सोमण, प्र ० गोयल प्रकाशन.

' सूड ' या एकाच मानवी भावनेवर आणि तीतून निर्माण होणाऱ्या विध्वंसावर चिंतन करणारी ही एक कादंबरी आहे. द्रोण-द्रुपद आणि अश्वत्थामा-पांडव अशा दोन सूड प्रवासांची ही कथा आहे. ही नुसती घटनात्मक कथा नसून मने घुसळून काढत मानवी जगण्याचा अंतर्बाह्य वेध घेणारी एक दर्शनात्मक शोकांतिका आहे. ही सर्व कथा अश्वत्थामा स्वत: निवेदन

करतो आहे. त्यात एक प्रकारची तटस्थताही आहे आणि पश्चात्तापही आहे. पण त्या त्या वेळच्या उकळत्या मनस्थितीही तीव्रतेने निवेदन केलेल्या आहेत.

शेवटाकडे व्यासमुनी अश्वत्थाम्याला विचारतात, " – कसला विचार करतो आहेस ? अजूनही तू तुझ्या भूतकाळातल्या दु:खाने त्रस्त आहेस का ? " हा एक भेदक प्रश्न आहे. त्यानंतर ही कथा वर्तमान काळातल्या संदर्भालाही स्पर्श करते. ' महाभारत ' हे मानवी जीवन हजार प्रकारे मंथन करून पाहणारे एक दर्शक महाकाव्य आहे, हे तर जगन्मान्यच आहे. त्यातल्या अनेक भागांनी असंख्य कलाकृतींना आजवर प्रेरणा मिळालेली आहे. त्यावर लिहावेसे वाटणे आणि ते पेलता येणे हे दोन्ही इथे घडलेले आहे. डॉ. सोमणांनी त्यांची डॉक्टरेट एलकुंचवारांच्या नाटकांवर एक सखोल अभ्यास-प्रबंध लिहून केलेली आहे, हे इथे विशेषत्वाने नमूद करण्यासारखे आहे.

करमणुकीपेक्षा खूपच अधिक काही ' देणारी ' ही एक विशेष कलाकृती आहे.

--- ००० ---

१३ ऑगस्ट २०२१ पर्यंत

सायड (कादंबरी)

ले ० रवींद्र पांढरे, प्र ० रोहन प्रकाशन.

या कादंबरीचे लेखक जन्मजात जळगाव जिल्ह्यातल्या पहूर या गावाचे आहेत. विशेष म्हणजे एसटीने या गावापासून सुमारे तासादीडतासावर असलेल्या लोहारा या गावी शाखाप्रबंधक म्हणून मी साडेतीन वर्षे होतो. किमान ५०-६० वेळा तरी या गावावरून मी ये-जा केलेली आहे. लोहाऱ्यावरून जळगावला जाताना पहूरपर्यंत कच्चा धुळीचा रस्ता असे आणि मग तिथून पुढे चांगला रस्ता. (आता काय परिस्थिती आहे ते मला माहीत नाही.) हे सांगायचे कारण म्हणजे तिथल्या त्या जामनेरी भाषेचा लहेजा मला चांगलाच परिचयाचा आहे. ही कादंबरी वाचताना, आपण एका महान कलाकृतीबरोबर आहोत याच्या आनंदाबरोबरच मला त्या भाषास्वादाच्या पुन:प्रत्ययाचा आनंदही मिळत होता.

' सायड ' ही मराठीतली एक महान कलाकृती आहे. हा लेखकच मुळात मराठीतला एक उत्तुंग प्रतिभेचा कलावंत आहे. पांढऱ्यांच्या ' अवघाची संसार ' आणि ' पोटमारा ' या कादंबऱ्यांवर मी पूर्वी इथे लिहिलेलेच आहे. आनंद होणे ही एखादी मानसिक विकृती म्हणावी असा हा काळ असला तरी ही कादंबरी साहित्यातल्या महानतेचा आनंद देणारी आहे, हे आधीच नमूद करतो. या कादंबरीला ग्रामीण वा परिवर्तनवादी असल्या कोणत्याही अभिधानात बसवता येणार नाही. ही माणसाबद्दलची – मानवी जगण्याचे असंख्य धागेदोरे, कंगोरे समजून घेत वाचकाला एकूण जगण्याबाबतचीच एक

परिपक्वता प्रदान करणारी अशी कलाकृती आहे. अभिव्यक्तिपद्धती आणि तीत अंतर्भूत दृष्टिकोण यांवरून आपण आधुनिक, उत्तर-आधुनिक, अस्तित्ववादी, अतिवास्तववादी वगैरे विभाग पाडतो. तसल्या एखाद्या विभागात बसवू टाकावे असेही हे काम नाही. ही एक, म्हटले तर, साधी, सरळ अशी, कोणत्याही आविर्भावाशिवाय सांगितलेली माणसांची कथा आहे. तिथल्या माणसांच्या जीवन-पद्धती, वागणे-बोलणे आणि निसर्ग यांवर तर या लेखकाचे प्रभुत्व आहेच पण माणसांचे मूल्यमापन करणारा स्वमतदूषित असा भाव कुठेही नसल्यामुळे या एकूणच लेखनाला एक आध्यात्मिक उंची लाभलेली आहे. कोणत्याही धर्मातले कर्मकांड आणि यमनियम या अर्थी इथे ‘ अध्यात्म ‘ हा शब्द वापरलेला नाही, हे कृपया लक्षात घ्यावे. रूढी, परंपरा, आचार-विचार पद्धती यांच्या मान्यताप्राप्त साच्यामुळे मानवी जगण्याला स्थैर्य मिळत असले तरी तोच साचा जगण्याच्या नैसर्गिक प्रवाहाच्या विरोधात असल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचे सर्वंकष भान ही कादंबरी घेते. शांती आणि यशवंता ही या कादंबरीतली दोन प्रमुख पात्रे असली तरी ही काही फक्त त्यांची कथा नाही. १३३ पानांचा मजकूर असलेल्या या कादंबरीत निम्मे तरी केंद्रित फूटेज यांना मिळते का हे पाहण्यासारखे आहे. त्यांच्या निमित्ताने ही पूर्ण मानवी जगण्याचीच कथा सांगितली जाते आहे, हे जाणवत राहते.

सायड म्हणजे एकमेकांचे न्यून ते पुरते करून घेण्यासाठी दोन शेतकऱ्यांनी एकमेकांची शेतीची कामे एकत्रितपणे करण्यासाठी केलेला समजुतीचा करार. शांती आणि यशवंता यांच्यामध्ये तसा करार आहे. त्या दोघांच्या वेगवेगळ्या लग्न कहाण्यांपासून सुरू होणारा सगळा प्रवाहच याला कारणीभूत आहे. याची कथा नाही सांगत बसत. नको ते कोणतेही भरताड नसलेली ही एक समृद्ध कलाकृती आहे. साहेबू आणि यशवंता यांनी अजिंठ्याला जाणे किंवा यशवंताने शांतीसह शेंगोळ्याच्या जत्रेला जाणे अशा प्रसंगांची वर्णने नुसती पाने वाढवणारी नाही आहेत. शांतीची सासू निवर्तल्यानंतर ती आणि तिची आई यांच्यांत होणारा संवाद किंवा साहेबू आणि यशवंताचे शेवटी शेवटी येणारे संवाद हे सखोल शहाणपण व्यक्त करणारे आहेत. ती ती पात्रे त्यांच्या त्यांच्या मर्यादांतलेच बोलत आहेत पण हे सगळे पाहण्यात-सांगण्यात असणारे लेखकाचे शहाणपण हे मराठी साहित्याने आपला दागिना समजावे, असे आहे. असे आणखीही काही प्रसंग आहेत. “ शेवटी नशीब नावाची काही एक गोष्ट राह्यतेच का नही आयुष्यात ? तू तुह्याकडून व्हयीन तेवढं करशील शांतीसाठी, पन शेवटी तिचं नशीब तं काही बदलवता येनार नाही तुले. नाशिबाच्या पुढं कोन्हाचं काही चालत नही, यशोंताभू. “ – इथे ही कहाणी येऊन ठेपते. तसे तर या कथेचे बारीकसे मूळ म्हणावे तर यशवंताच्या बायकोच्या आईचे अवाजवी कन्याप्रेम ! तिला नेण्यासाठी आलेल्या यशवंताला अनेकदा तिला न घेताच परतावे लागल्याने शेवटी चिडून तो म्हणतो की आता न्यायला कुणी येणार नाही, यायचे तर तिने आपल्या पायाने चालत यावे. यातला एक किरकोळ अहंकाराचा, नंतर दुतर्फी झालेला, मुद्दा ! म्हटले तर हाच सगळे घडवतो ! या पद्धतीने पाहिले तर ही एक अत्युत्तम मूर्षा (absurd) कथा ठरू शकते. आणि मग असाही प्रश्न येऊ शकतो की किरकोळ काय आणि महत्त्वाचे काय ? एखाद्याचा स्वभाव, एखादी घटना, नैसर्गिक प्रेरणा – काय, महत्त्वाचे काय समजावे ? इथे लेखक जसे माणसांचे मूल्यमापन करत नाही तसेच एकूण जगण्याच्या कुठल्या भागांचेही नाही करत. हे सगळे मिळून एकत्र आहे याची जाणीव देत राहतो.

या कादंबरीतली निवेदन शैली एखाद्या कवितेसारखी मितभाषी आणि गणितासारखी बिनचूक आहे. आशयाचा एक कणही इथे दुर्लक्षित राहात नाही. त्यामुळे अथ पासून इति पर्यंत वाचताना सतत एक परिपूर्णतेचा प्रत्यय येत राहतो. आणि हे सगळे सहज साधेपणाने घडत राहते. ही नुसतीच एक महान कलाकृती नाही आहे तर अनेक कारणांनी ‘ अभ्यसनीय ‘ ठरावी अशी कादंबरी आहे. रचना आणि शहाणपण यांचा इतका सुंदर मिलाफ क्वचितच पाहायला मिळतो ! पाने फक्त १३३ पण ही खरी समृद्ध कादंबरी !

या कादंबरीची आस्वादक समीक्षा कुणी करू शकला तर ती किमान या कादंबरी इतक्या आकाराची तरी होईलच, असे मला वाटते !

--- ००० ---

माझी प्रिय मैत्रीण सोनाली

एकदा एका ठिकाणी आम्ही काही लेखक, कलावंत मंडळी जमलो होतो. आमच्यांत कोल्हापूरची ही ग्रेट हस्ती सोनालीही होती. तिचे सगळे हिंडणे-फिरणे व्हील चेअरवरूनच चालते. अत्यंत साधी आणि प्रसन्न ' असण्याची ' ही व्यक्ती ओळख होताच जिगरी मैत्रीणच झाली ! त्या वेळी तिच्याशी जे एकदोनदा बोलता आले त्यावरून हिचे असणे हे, ही दिसते याहून खूपच प्रचंड आहे, हे लक्षात आले. तिच्या मनातला सर्वांबद्दलचा स्नेह जाणवत राहिला. जगण्यातल्या काही त्रुटी या किरकोळ दिसू लागल्या. तिच्या जिद्दीचे कौतुक करण्यापेक्षा तिच्या ' असण्याबद्दलच ' आदर आणि प्रेम बाळगायला हवे, हे समजले. या सगळ्यात कहर म्हणजे आमच्यासमोर तिने केलेले सुमारे पाऊण तासाचे भाषण ! मानवी जगण्याची समज ओतप्रोत भरलेले आणि स्वत:चे चिंतन मांडताना कोणताही मुलाहिजा न बाळगता, कोण काय म्हणेल याचे विचार तडीपार फेकून देऊन, ती बोलली ! सर्वांचे डोळे उघडणारे तर ते होतेच पण मधून मधून डोळ्यांत संवेदनशीलतेचे पाणी आणणारेही होते. मी तिचे ते भाषण कधीच विसरणार नाही.

तिच्या मर्यादा संभाळूनही ती काय काय करत असते हे मधून मधून कळत राहिले. तिच्याबद्दलचा आदर दुणावत राहिला. तिला आता तिने केलेल्या एका अनुवादासाठी साहित्य अकादेमीचे पारितोषिक मिळाल्याचे कळले आणि खूप आनंद वाटला ! आज नुसते फेसबुकवर थोडे फिरून पहा -- तिने कमावलेल्या प्रेमादराचे प्रचंड दर्शन होईल !

त्यानंतर पुन्हा आमची भेट झाली नाही. पण तिला मनातच स्थान दिलेले असल्याने प्रश्नच येत नाही ! माझ्यासारखीच अनेकांची अवस्था आहे !

प्रिय सोनाली, तुझे खूप मन:पूर्वक अभिनंदन ! बघू, हे कोव्हिड डिपार्टमेंट बंद झाल्यावर खास तुझ्या भेटीला कोल्हापूरला यायचे मनात आहे. जमल्यास भेटूच !

--- ००० ---

देव जोडे तरी करावा अधर्म । अंतरे ते कर्म नाचरावे ।।

अभ्यासू, समतोल विचाराचा समीक्षक ! (जयंत पवार)

खरोखरच -- इग्नाशियस डायस यांच्या कविता अप्रतिम आहेत !

कोणताही मानसिक पवित्रा म्हणजे पोझिशनच -- मराठी सारस्वताला फिट बसणारी टोपी ! (तिळव्यांची कविता)

23-09-21.

आता अटळ आहे ... (कवितासंग्रह)

कवी – रामदास खरे, प्रकाशक – संवेदना प्रकाशन.

मान्यताप्राप्त विचार, मान्यताप्राप्त निष्ठा, मान्यताप्राप्त चांगले-वाईट – हे सर्व स्वीकारलेले असणे आणि काही कवितावाचनातून, कविता म्हणजे हे असे वा ती अशी अशी असते अशा स्थिर कल्पना आणि त्यातून थोडेफार आत्मसात केलेले कौशल्य – अशा मनातून आलेल्या या कविता आहेत. बोधप्रदता आणि सारांश देणे हे दोष आहेत. चांगल्याचा भावनिक गौरव आणि वाईटाबाबत खेदखंत व्यक्त करणे अशा या सवयीतल्या कविता आहेत. हा या कवीचा चौथा संग्रह असल्याचे कळते. तरीही अजून हेच चालू असावे, हे बरे नाही. जे आहे ते सामान्यत: सवयीत असणारे आहे. थोडी वेगळी माहिती आणि थोडीफार आत्मसात केलेली भाषा यांसह लिहिल्या गेलेल्या या ठीकठाक कविता आहेत.

तरीही कुठेतरी काही ओळी चांगल्या म्हणण्यासारख्या आहेत -- उदा – ‘ निर्मनुष्य ‘ या कवितेतल्या या ओळी –

एकटेपणाच्या गाफील अंधारात
चाचपडत बसतात तो आणि ती !
स्मरणरंजनाचा अल्बम कवटाळून झोपी जातात
विरुद्ध दिशेला ...

आरती प्रभूंवरची कविता ‘ समईच्या शुभ्र कळ्या ‘, कोलाहल, आता अटळ आहे... , करपट फाइल्सची निरीक्षणे (७), अशा काही कविता चांगल्या वाटल्या.

या संग्रहातली खऱ्यांची चित्रे चांगली आहेत.

--- ००० ---

(हे फेसबुकवर दिले नाही.)

The Unsung Saint Sena Maharaj

Treasures of Sena’s Abhangwani.

वारकरी संप्रदायातले आदरणीय संत सेना महाराज यांच्यावरचे तुम्ही पाठवलेले पुस्तक वाचले. जास्तीत जास्त लोकांपर्यंत महाराजांचे कार्य पोचावे यासाठी तुम्ही केलेला हा महत्त्वाकांक्षी प्रयत्न खूपच मोठा आहे. हा प्रयत्न यशस्वीही झालेला आहे. महाराजांचे चरित्र, त्यांचे माहात्म्य आणि त्यांचे निवडक ११० अभंग, त्यांच्या इंग्रजी अनुवादांसह, हे सगळे एका पुस्तकात आणणे सोपे नव्हते. हे सर्व अभंग मुख्यत: भक्तिप्रधान आहेत. नामाचे महत्त्व, ईश्वरचरणी लीन राहण्यात मिळणारा परमानंद, आणि सुखदु:खांचे ओझे गेल्याने येणारा निवांतपणा, निर्भयपणा यांचे हे अभंग आहेत. तुकाराम, ज्ञानेश्वर हे जसा यामागच्या आध्यात्मिक सखोल प्रक्रियांचाही वेध घेतात, तसे इथे फारसे नाही आहे. कोणत्याही चिकित्सेशिवाय, प्रक्रियांच्या दर्शनाशिवाय तडक भक्तीत बुडून जाणाऱ्या भक्ताचे हे अभंग आहेत. त्यामुळे त्यात पुनरावृत्तीही आहे. त्या अवस्थेत पोचलेल्या, तीतच जगणाऱ्या संताचे हे भावोद्गार आहेत. हे त्याच भक्तीने अनुभवण्याचे शब्द आहेत. भक्तीची ही अवस्था कशी, कोणत्या प्रक्रियेने येते याला इथे फारशी अभिव्यक्ती नाही. हे मुक्कामी पोचून तिथेच तल्लीन असण्याचे अभंग आहेत. साहजिकच ते वर्णनात्मक आणि ईश्वरमहतीचा गौरव करणारे अभंग आहेत. तशा भक्तिमार्गात असणाऱ्यांसाठी हा एक अमूल्य ठेवा आहे. पण, मानवी मनाच्या असंख्य हालचाली, वागणे

यांच्या दर्शनातून येणारा काव्यमयतेचा अनुभव इथे फारसा जाणवत नाही. अर्थात इथे तो हेतूच नसल्याने असे होणे साहजिकच आहे.

हा एक अमूल्य ग्रंथ सिद्ध केल्याबद्दल तुमचे आणि सर्व संबंधितांचे अभिनंदन !

--- 000 ---

(हे फेसबुकवर दिले नाही.)

पोचिंकी (कथासंग्रह)

ले ० स्वप्नील चव्हाण .

स्वप्नीलने यापूर्वी अनेक उत्तम नाटके आणि एकांकिका लिहिलेल्या आहेत. त्यांतून मानवी संबंधांबाबतची त्याची सूक्ष्म निरीक्षणे आणि त्यांचा आवाका घेण्यातली परिपक्वता यांचा प्रत्यय आलेलाच होता. कथा हा वाङ्मयप्रकार तो आता प्रथमच हाताळत असला तरी लेखक म्हणून त्यात नावखेपणा जाणवत नाही. या कथा वाचून तो एक सराईत, सफाईदार कथाकार असल्याचे लक्षात येते. तथाकथित सामाजिक वा राजकीय समस्या यांचे वेगळे तुकडे समजण्याची कोणतीही भूमिकावादी आपरिपक्वता इथे दिसत नाही. सर्व मानवी समस्यांची बीजे ही मानवी संबंधांत निर्माण होणाऱ्या गुंतागुंतींतच असतात याचे भान असलेला हा लेखक आहे. नुसतेच ‘ पुढे काय झाले ‘ हे समजण्यासाठी वाचायच्या या घटनाप्रधान कथा नाहीत. यातल्या प्रत्येक कथेच्या वर्तमान प्रवाहाबरोबर राहण्याचा धीर असणे इथे फार महत्त्वाचे आहे. अनुभवाची समृद्धी म्हणजे काय तर त्यातल्या सर्व गुंतागुंतीचे भान घेत जाणे. ती समृद्धी या सर्वच कथांतून जाणवत राहते.

‘ पोचिंकी ‘ या कथेत फँटसी आणि वास्तव जवळ जवळ आहेत – ते एकमेकांत मिसळत राहतात – त्यामुळे, कलात्मक सलगतेला बाधा येते असे वाटले. शिवाय, उघड उघड बोधप्रदता येणेही कलात्मकतेला जरा कमीपणा आणणारे वाटते. बाकी कथा उत्तमच आहे.

‘ जांभूळकाळी ‘ या कथेत आत्महत्येतली भयानकता, गांभीर्य आणि निरर्थकता हे सगळे आलेले आहे.

‘ कश्यपकांड ‘ ही कथा प्राणी, पक्षी आणि माणूस यांच्या एकत्र येण्यातून घडणारे नाट्य व्यक्त करते. यातले अनेक तपशील चकित करणारे आहेत.

‘ मनगमन ‘ ही कथा, चष्म्यातून एक बुद्धिमान लुक देऊन मुलींना खलास करू शकेल अशा माणसाची आहे. बाई कळलेल्या माणसाची. याबरोबरच ही कथा सामाजिक कंडिशनिंगचाही धांडोळा घेते. भाषेच्या आणि अभिव्यक्तीच्या पूर्ण स्वातंत्र्याने लिहिलेली अशी ही कथा आहे.

।। पाळख ।। ही एक प्रतिमाभंगाची कथा आहे.

‘ खानसाम ‘ कथेतला शेकडो वर्षांपूर्वीचा उभा केलेला माहोल चकित करणारा आहे.

‘ अँटिमॅटर ‘ ही कथा स्वप्न, वास्तव आणि कला यांचे संबंध पाहते.

यांतली कोणतीही कथा वाचून लक्षात राहण्यासारखी नाही. या सगळ्या मानवी जगण्यातल्या प्रक्रिया आहेत. त्या त्या कथेत त्या त्या प्रवाहात समजून घेण्याच्या. या आजच्या तरुणाने आजच्या माहोलाचे भान घेत आजच्या भाषेत लिहिलेल्या कथा आहेत. वेळोवेळी कथेची शैली बदलण्याचे एक खास कौशल्य या लेखकाकडे आहे. एकूणच निवेदनात एक सहज प्रभुत्व आहे. कुठेही कसलाही आटापिटा नाही. माणसाच्या जगण्यातल्या मूलभूत प्रश्नांचे भान सतत जागते ठेवणारा हा लेखक आहे.

आताच्या पिढीतला हा एक महत्त्वाचा कथाकार आहे, हे नक्की.

--- ००० ---

(हा संग्रह अजून प्रकाशित झालेला नसल्याने हे फेसबुकवर दिले नाही.)

‘ गावाबाहेर ‘ (कवितासंग्रह)

कवी – राहुल पुंगलिया – प्रकाशक –कॉपर कॉईन .

आधी न ठरवता मन मोकळे सोडून कविता लिहिली तर आपोआपच त्या कवीची स्वत:ची शैली निर्माण होते. मी आता प्रयोग करतो, वेगळी कविता लिहितो असे म्हणून कुणी वेगळी कविता नाही लिहू शकत. जाणीव, नेणीव, स्वप्ने, भ्रम, कल्पना – ही मनाची सगळी आयुधे यात सामील होत असतात. हे जर एक कौशल्य म्हणून नव्हे तर एक सहज लेखनप्रक्रिया म्हणून घडले तर त्या कवितेला एक नवीनता आणि ताजेपणा लाभत जातो. आंद्रे ब्रेटन हा अतिवास्तववादी कवी म्हणतो की मनाला असे पूर्ण खुले सोडावे एवढेच नव्हे तर कविता लिहून झाल्यावर कवीने त्याच्या व्यावहारिक हुशार मनाने तीत सुधारणा करत बसू नये. काही ठिकाणी खटकणे वा असंबद्ध वाटणे वा ठेचकाळणे घडते असे वाटले तरी ते तसेच असू द्यावे. थोडक्यात म्हणजे कवितेत आपल्या उथळ तर्काला थारा देऊ नये. राहुल पुंगलियांचा हा संग्रह वाचताना हे आठवले. ही कविता निर्माण होतानाच ‘ एका माहीत नसलेल्या भानातून ‘ येत असल्यामुळे कधी जुनी होत नाही. ती पुन्हा पुन्हा वाचली जाऊ शकते. आंद्रे ब्रेटनची शैली आता जुनी झाली, असे म्हणता येत नाही. कोणतीही चांगली कविता एक अज्ञाताचा स्पर्श घेऊन येत असल्याने ती कधीच पुनरावृत्ती नसते. मराठीत काहीजणांना असे म्हणायची आवड आहे

की आता अतिवास्तववादाचा काळ संपला, आता मृषावाद (absurdism) संपला, वगैरे. माझ्या मते असे काही होत नसते. अभिव्यक्तीच्या सर्व पद्धती जिवंत असतात आणि तींतून पुढे नव्याही पद्धती निर्माण होत असतात. अमुक पद्धतीने कविता लिहिली जाणे ही काही एखादी फॅशन नसते. पुंगलियांची कविता ही या मार्गाने वास्तववादाचा किनारा सोडून देणारी आहे. माझ्या दृष्टीने हे या कवितेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

कुठल्याही टोळीचा सभासद असणारा वा पारितोषिकांसाठी हपापलेला कवी अशी कविता लिहू शकणार नाही. या कवितेचे उगमस्थान असते एकटेपणा. आत्मनिष्ठेतून येणारा निडरपणा. ' सामाजिक असणे ' याबाबतचा जो आग्रह मराठीत गेली काही वर्षे हैदोस घालत आहे त्याकडे पाठ फिरवणारा हा कवी आहे. या दृष्टीने या संग्रहातले पुंगलियांचे मनोगत वाचण्यासारखे आहे. " साहित्यातून राजकारण करण्याच्या इच्छेमुळे साहित्य क्षुल्लक होत गेले " असे ते म्हणतात. या बाबतीतले आणखीही काही मुद्दे त्यांनी कुणाचा मुलाहिजा न ठेवता मांडलेले आहेत. एखाद्या कवीने असे परखड ' मनोगत ' लिहिणे ही मराठीत क्वचितच घडणारी घटना आहे.

जगण्याच्या प्रक्रियांचे त्यांतल्या अनेक धाग्यादोऱ्यांसह समावेशक भान घेत जाणे हीच ज्या कवितेतली सर्जकता आहे तिला व्यक्तिगत हेतू वा उद्दिष्टे विचारण्यात अर्थ नसतो. कशासाठी लिहिली ही कविता ? कवीचा एखादा मूड वा त्याचे एखादे दु:ख, वा विचारसरणी वा नीतीबोध देणे – असे काहीच नाही ? व्यवस्था बदलाचे तरी नको उद्दिष्ट ? तर तसले इथे काहीही नाही. इथे कवी एक स्वायत्त वास्तव उभे करत जातो आणि त्यातून मानवी मनाच्या अनेक क्रियाप्रतिक्रियांचा आवाका घेत जातो. हे असे समावेशक भान हेच अशा कवितेचे अस्तित्वसमर्थन असते. ही कविता कवितेची अनेक आग्रही वैशिष्ट्ये झुगारून देणारी आहे. त्यामुळे, मला हा संग्रह विशेष स्वागतार्ह वाटतो. याचे मूल्यमापन होत राहील, तो प्रश्न वेगळा. पण आत्ता, आधी आपले पूर्वग्रह, आग्रह बाजूला ठेवून या कवितेला ' या बसा ' तरी म्हणणे महत्त्वाचे आहे. आणि नुसते एवढ्यावरच थांबावे अशी ही कविता नाही. आशयाच्या अनेक शक्यता खुल्या करणारी ही कविता आहे, हेही लक्षात घ्यायला हवे.

फारशी मुद्दाम निवड करत न बसता मी इथे ' ही खोटारडी झाडं ' आणि ' बातमी ' या कवितांचा उल्लेख करेन. सैनिकांच्या बुटांखाली चमचे, वाट्या येणे हे एका अवाढव्य क्रूर वास्तवाला मृषारूप देणे आहे.

सरकारनं प्रत्येक सैनिकाला
बहाल केलंय डिजिटल मस्तक
डोळ्यांच्या डायलवर तरंगतात
भावनांची डौलदार जहाजं

या ओळी मला खूप आशयघन वाटल्या. यातल्या अनेक कविता अशा आहेत की त्यांवर खूप बोलता येईल. ' बातमी ' या कवितेचा शेवट बघा –

रात्री कधीतरी आठवले
तसे पत्र उघडून वाचले

तर भयानक बातमी

दूरवरची इथवर कशीबशी आलेली

इथून ही बातमी आता कुठे जाईल

आणि कोण या बातमीला घरामध्ये घेईल ?

ही कविता जगण्यातल्या घटनात्मकतेचे महत्त्वच प्रश्नांकित करते, असे मला जाणवते.

मी स्वत: एक ‘ लिहिणारा ‘ आहे. मी काही समीक्षक नाही. समीक्षेचे काम हे स्वत:ला समीक्षक म्हणवणाऱ्यांनी करावे. इथे, मला या संग्रहाबद्दल जे काही वाटले ते थोडक्यात पण सकारण सांगण्याचा अल्पसा प्रयत्न केलेला आहे. हा संग्रह निघण्यात माझा ‘ दुश्मन मित्र ‘ मंगेश काळे याचा विशेष पुढाकार असल्याचे कवीने नमूद केलेले आहे. एकूणात, पुंगलिया, मंगेश आणि कॉपर कॉईन यांचे अभिनंदन !

--- ००० ---

मंथन – कादंबरी -- ले ० सुहास भोळे – प्र ० सुहास भोळे.

‘ कामगार आणि मालकांच्या समस्येचे ज्वलंत दर्शन ‘ घडवणारी ही कादंबरी आहे. मुंबईतल्या एका मोठ्या कारखान्याचे मालक आणि एकमेकांशी स्पर्धा करणाऱ्या दोन युनियन्स यांच्यांतले संघर्ष, डावपेच, त्यांतले खऱ्याखोट्याचे मिश्रण आणि कोणत्याही टोकाला जाऊ शकणारी हिंसा यांचे चित्रण असलेली ही एक वास्तववादी कादंबरी आहे. असा एखादा मोठा पट हाताळायचा असतो तेव्हा त्यातली गुंतागुंत आणि ताणेबाणे यांचे विश्वसनीय दर्शन तेव्हाच घडवता येते जेव्हा लेखकाला तो माहोल, त्यातली माणसे आणि त्यांच्या जगण्यातले, कामातलेही अनेक बारकावे माहीत असतात. सुहास भोळे या बाबतीत माहीर असल्याचे जाणवत राहते. समाजाच्या वेगवेगळया स्तरांतली माणसे या कथेच्या ओघात ते सहज पेश करत जातात. यातले अवी-गण्या प्रकरण जरा घाईत सांगितले गेल्यासारखे वाटले. पण एकूणात, लेखकाचा रोख हा, ही एक कथा ओघवत्या शैलीत सांगणे हाच आहे. खरे तर मानवी संबंधांचा हा एक बऱ्यापैकी मोठा पसारा उपलब्ध असूनही लेखक मानवी मनांच्या क्रिया-प्रतिक्रिया, त्यांच्यांत अंतर्भूत असणारे अनेक प्रभाव यांचा आवाका घेण्यात फारसे इंटरेस्ट घेत नाही. त्यामुळे, कलात्मक सखोलतेच्या बाबतीत ही कादंबरी कमी पडते. वृत्तपत्रीय वास्तववादाच्या मार्गानेच जात राहते.

या कादंबरीला ज्येष्ठ लेखक मधू मंगेश कर्णिक यांची प्रस्तावना लाभलेली आहे. ते म्हणतात, “ चित्रमय शैलीने कथानक सादर केल्यामुळे वाचक यामध्ये गुंतून पडतो. लेखकाची ही पहिलीच कादंबरी आहे असे कुठेही वाटत नाही. नवथरपणाचा लवलेशही या कादंबरीत आढळत नाही. म्हणून सुहास भोळे यांच्या भावी कादंबरी लेखनाबद्दल उत्सुकता वाटते. “ हे खरेच आहे.

यात एक प्रश्न महत्त्वाचा म्हणून चर्चेला येऊ शकतो, तो म्हणजे, आता ते तसे वातावरण फारसे कुठे अस्तित्वात नाही. मग आता आजच्या काळात हे का प्रस्तुत ठरावे ? माझ्या मते, हा प्रश्न बरोबर आहेही आणि नाहीही. नुसतीच कथा सांगणे या स्तरावरच जर एकूण निवेदन राहात असेल तर हा प्रश्न बरोबर ठरतो. परंतु, मानवी जगण्यातले, अनेक प्रकारच्या नातेसंबंधांतले भान घेणे, त्या समस्यांचा सर्वांगीण आवाका घेणे, हे घडत असेल तर त्यातला अनुभव, वा वास्तव वा माहोल कोणता आहे याला महत्त्व राहणार नाही. शेक्सपियरची नाटके कोणता प्रस्तुत माहोल सादर करतात ? ही कादंबरी मात्र त्या तशा अपेक्षेत कमी पडणारी आहे.

छपाई करताना प्रत्येक पानावर खालचे मार्जिन किती असावे याचा विचार केलेला नाही. मुखपृष्ठ अगदीच ढोबळ वाटले. कादंबरीचे ‘ मंथन ‘ हे नावही तीतल्या मजकुराच्या मानाने मिळमिळीत वाटले. तरीही, एका वेगळ्या विषयावरची ‘ खरी ‘ कादंबरी म्हणून या कृतीचे स्वागत व्हायला हवे.

--- 000 ---

१६ नोव्हेंबर २०२१.

हुसेनभाईचा कुणी नाद न्हाय करायचा ! (कादंबरी)

ले ० युसुफ शेख – प्र ० अक्षर प्रकाशन.

आधी या कादंबरीच्या शीर्षकाबद्दलच बोलायला हवे. हे शीर्षक म्हणजे काही एखाद्या मुसलमानाने वापरलेली आव्हानात्मक भाषा नाही आहे. ‘ चांगल्या ‘ ला पाठिंबा, आधार देणाऱ्या एखाद्या बलवान माणसाचे हे गंमतीतले, प्रेमातले धमकावणे आहे. फार तर सूक्ष्मशी शक्तीची जाणीव देणेही. पण यात तशी संघर्षमयता नाही. हुसेन स्वत: कुणावर कुरघोडी करणे वा वर्चस्व गाजवणे यासाठी ही भाषा वापरत नाही. उदाहरणार्थ, अभिव्यक्तीची कोणतीही काटछाट न करता आलेला जयशा-बाळी प्रसंग पहा. इथे हुसेन स्वत:च हे वाक्य म्हणतो. पण ते समर्थनीय आणि योग्यही ठरते. यात पुढे निवेदकाचे एक वाक्य आहे, “ सर्वांना स्वत:चं महत्त्व ही निर्विवाद गोष्ट वाटते. पण ते काही अंतिम सत्य नसते. “ या कादंबरीच्या लेखकाचा हाच आहे दृष्टिकोण. सामोपचाराचे, समंजसपणाचे महत्त्व सांगणारी ही एक उत्तम कादंबरी आहे.

स्वत: युसुफ शेख हे जगमित्र असल्याचे फेसबुकवर प्रत्ययाला येतेच. त्यांचे काही मतभेद असतील तर कोणत्याही जातिधर्मांच्या आधाराशिवाय ते सौम्यपणे मांडतात आणि ते ताणून धरायचाही प्रयत्न करत नाहीत.

तसे तर हुसेन हा काही या कादंबरीचा नायक वगैरे नाही. त्याला प्रमुख पात्रही म्हणता येणार नाही. ही एका खेड्यातल्या वस्तीची, अत्यंत बारकाईने सांगितलेली समावेशक कथा आहे. यात अनेक पात्रे आहेत. म्हटले तर आपापल्या सामाजिक स्थितीची जाणीव असलेली पण तरीही मिळूनमिसळून जगणारी ही माणसे आहेत. या कथेत एक खून घडतो पण त्याच्याशी हुसेनाचा काही संबंध नसतो. एका छोट्या भागातले राजकीय ताणतणावही शेवटी कुठेतरी केंद्रित होऊन कसे एखाद्या गळूसारखे फुटतात ते दर्शवणारे ते घटित आहे. ही कादंबरी तशी एखाद्या पात्राची नसून त्या एका वस्तीची, तिथल्या माणसांची, त्यांच्यांतल्या ताण्याबाण्यांची आणि तरीही असणाऱ्या त्यांच्यांतल्या सलोख्याची आहे. जाती-धर्मांच्या अस्मिता लेखकाला निरर्थक आणि अमानवी वाटणे हे या कादंबरीचे आशयद्रव्य आहे. हुसेन आणि सोनी यांच्यांतले प्रेमप्रकरण म्हणजे या माणसांतले सुप्त ताणेबाणे एका सामाजिक समस्येत रूपांतरित होणे आहे. सलोखा असला तरी मनांतले भेद कार्यरत असतातच याची विदारक जाणीव देणारा हा कथाभाग आहे. या कादंबरीचा शेवट तो सलोखा आणि तो ताण यांच्यांतला एक समन्वय साधणारा आहे. भेदांसह जगण्याची एक दिशा सूचित करणारा आहे.

ही काही वाक्ये पहा – " राजकारणात यशस्वी होण्याकरता कित्येक गणिते जुळणे आवश्यक असते. भारतीय सामाजिक परिस्थितीत जातिपातींची भूमिका निर्णायक ठरणे हे ओघानेच आले. " (पान ८२). " हिंसा हे समाजातील हितसंबंधाचंच रूप असून हिंसा हे एक स्वायत्त तत्त्व होऊ लागले , त्याचे तत्त्वज्ञान तयार होऊन त्याला फसवे सामाजिक अधिष्ठान मिळाले की सर्व समाजाचाच विनाश अटळ होतो. काही समाजाचा थोड्या उशिराने होत असेल तर काही समाज लगेच रसातळाला जातात. " (पान ९३).

सतीश तांबे, हेमंत कर्णिक आणि डॉ. शमसुद्दिन तांबोळी यांचे, या कादंबरीवर वेगवेगळ्या कोणांतून लिहिलेले लेख अभ्यसनीय आहेत.

व्यक्तिव्यक्तींत असो की गटागटांत असो, मानवी संबंधांत ताणेबाणे असतात, घर्षण असते आणि अस्मितांतून येणारी हिंसाही असते. ही नुसतीच सामाजिक समस्या नसून मानवी जगण्याचीच एक जटिल परिणती आहे. मग यावर करावे तरी काय ? त्या त्या वेळच्या समजुतदार ' तडजोडी ' फक्त ? समन्वयाची मलमपट्टी आणि फारसे नुकसान न होता वेळ निभावून नेण्याचे ' शहाणपण ' फक्त ? अशा समस्यांचे समूळ उच्चाटन होणे, असे काही घडू शकेल का, हा प्रश्न ही कादंबरी वाचून मनात येतो. छे, छे, असेच असणार मानवी जगणे, असा झटपट निष्कर्ष मान्य करून एका अर्थी असे निराशेचे जगणेच स्वीकारणे भाग आहे का, हा प्रश्न इथे विचारावाच लागणार.

एकूणातच ही एक उत्तम सामाजिक कादंबरी आहेच पण शिवाय एका मुसलमान लेखकाने सामाजिक आस्थेने आणि प्रेमाच्या भावनेने लिहिलेली कादंबरी म्हणूनही ही एक विशेष कलाकृती ठरेल. यासाठी मित्र युसुफ शेख यांचे मन:पूर्वक अभिनंदन !

--- ००० ---

बिह्वीन द लाइन्स

ले ० चंद्रमोहन कुलकर्णी, प्र ० राजहंस प्रकाशन.

२०२० साली प्रकाशित झालेल्या या पुस्तकावर म्हटले तर जरा उशिराच लिहितोय. पण या पुस्तकाची काही वैशिष्ट्ये हायलाईट करायलाच हवीत, असे हे पुस्तक आहे. आपले प्रख्यात चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांनी लिहिलेले हे पुस्तक आहे. आणि यातच त्याचे अद्धितीयत्व आहे. शाळकरी वयापासून एका चित्रकाराची होत गेलेली घडण आपल्याला यातल्या विविध लेखांतून दिसत राहते. हे काही सलग लिहिलेले आत्मचरित्र नव्हे पण काही परिस्थिती व अनुभव यांच्या अभिव्यक्तीतून एका मर्यादित रूपात हे एका चित्रकाराचे चरित्रच आहे. या पुस्तकाचे शीर्षक, ' बिह्वीन द लाइन्स ' याचे दोन अर्थ दिसतात. एक म्हणजे एखादा अभ्यासक्रम पूर्ण करताना त्या कोर्सच्या आतबाहेर घडणाऱ्या भल्याबुऱ्या घटना आणि दुसरा अर्थ कलाक्षेत्रातली स्वीकारलेली कोणतीही जबाबदारी पूर्ण करताना त्या प्रत्यक्ष कामाशिवाय किती असंख्य गोष्टी त्यात अंतर्भूत असतात – विचारात घ्याव्या लागतात, हे सांगणे. या पुस्तकात, या अर्थाने, चित्रकाराच्या कलात्मक रेषा तर आहेतच पण शिवाय त्यांच्या अधलेमधले, आजूबाजूचे अनेक तपशिलांसह भान घेत जाणेही आहे.
पहिल्या भागात चित्रकलेचा अभ्यासक्रम आणि त्या काळातले अनुभव, अडचणी, निराकरणे यांचे चित्रण आहे. दुसऱ्या भागात चित्रकार म्हणून कामे करतानाचे प्रत्यक्ष अनुभव आहेत. आपण नेहमी तयार चित्रे वा अंतिम पूर्ण कामे पाहात असतो, पण त्याच्या मागे काय काय असते हे कलात्मक आणि तांत्रिक तपशिलांसह येणारे निवेदन इथे आहे. आनंद अंतरकरांच्या ' रत्नकीळ ' या पुस्तकाचे मुखपृष्ठ व इतर सजावट करणे यावरचा ' रक्तवाहिनी ' हा लेख अत्युत्तम झालेला आहे. त्याचप्रमाणे अनिमेशन चित्रे करतानाचे अनुभव किंवा ऑक्सफर्डच्या लोकांना चित्रे काढून देण्याचे अनुभव, असे बरेच महत्त्वाचे लेखन इथे आहे. नवीन घडत असणाऱ्या चित्रकारांनी जरूर वाचावे असे हे लेखन आहे. ग्रेस यांच्या पुस्तकाचे काम नाकारण्याच्या निर्णयाचा लेख तर मजेदार म्हणावा असा झालेला आहे. खरे तर तुफान विनोदीच !
चित्रकलेच्या क्षेत्रात शिक्षण घेत कारकीर्द घडवू पाहणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी वाचावेच असे हे पुस्तक आहे.
तुमच्याआमच्यासारख्या वाचकांनाही ' चित्रकार काय करतो ' (' कवी काय करतो ' च्या चालीवर) हे समजण्याच्या दृष्टीने हे एक उत्तम पुस्तक आहे.

--- ००० ---

घरट्यात फडफडे गडद निळे आभाळ

--- रॉय किणीकरांची कविता --- ले ० श्रीनिवास जोशी --- प्र ० सत्यव्रत प्रकाशन.

" किणीकरांच्या कवितेला खूप सखोल असे आध्यात्मिक संदर्भ आहेत. आध्यात्मिक संदर्भ आणि आधुनिक अभिव्यक्ती अशी रॉय किणीकर यांच्या कवितेची धाटणी आहे. ह्यातल्या आध्यात्मिक थीमची सखोल ओळख किणीकरांच्या काळातील ' सेक्युलर ' अभिरुचीला नव्हती " – हे किणीकरांची कविता दुर्लक्षित राहण्याचे एक कारण होते, असे प्रस्तावनेत म्हटलेले आहे. अशा प्रकारची समस्या इथल्या हवेत नेहमीच राहात आलेली आहे. सर्व काही बुद्धी आणि भावना यांतच समाविष्ट असते अशी धारणा पॉवरफुल दिसते. त्यामुळे, व्यक्तिगत भावभावना, अनुभव, मते आणि सामाजिकता यांत पूर्ण कविता सामावते असे गृहीत धरले जाते. देशोदेशींच्या कवितांत वा कलेत असे दिसत नाही. तत्त्वज्ञान वा अध्यात्म हे वर्ज्य समजले जात नाही.

" किणीकर तरुणपणी कम्युनिस्ट होते. नंतर ते मानवेंद्रनाथ रॉय ह्यांच्या प्रभावाखाली ' रॅडिकल ह्युमॅनिस्ट ' झाले. त्यांच्या प्रेमापोटीच त्यांनी आपले रघुनाथ किणीकर हे नाव सोडून रॉय किणीकर हे नाव घेतले. " असे म्हटले आहे. किणीकरांचा शास्त्राबरोबरच, टॉलस्टॉय, डोस्टोवस्की, अशा अनेक लेखकांचा अभ्यास होता. शिवाय त्यांनी गीता, उपनिषदे, ज्ञानेश्वर, तुकाराम आणि इतर संत वाङमयही अभ्यासलेले होते. लेखक, कवी, कलाकार असे जे वाचन करतात ते साहित्यकला समजून घेणे आणि जगण्यातल्या समस्या मुळापासून समजून घेणे यांसाठी असते. खुद्द तुकारामानेही एकनाथी भागवत अभ्यासले होते, म्हणतात. अलीकडे, खानोलकर ' योगवासिष्ठ ' वाचत असत असे त्यांनीच मला सांगितले होते. पण, तरीही, बहुसंख्य वाचकांना अशा प्रक्रिया नाकारायच्या असतील तर त्याला इलाज नाही. सर्वांनी अमुक एका बाबीला महत्त्व दिलेच पाहिजे असे कुणीच कुणालाच म्हणू शकत नाही. असले वातावरण फारच प्रभावी राहिले तर त्या समाजाची कला, साहित्य हे खुरटलेलेच राहात जाईल, हे उघड आहे.

यातल्या अनेक रुबाया खरेच जबरदस्त आहेत. जगण्यातली असत्यता, निरर्थकता, मूर्षता, हे यांतून प्रभावीपणे व्यक्त झालेले आहे. मानवी जगण्यातून हे सगळे हद्दपार होऊ शकते का याचा विचार वाटल्यास करायला हरकत नसावी. ही काही उदाहरणे –

आभाळ झिरपते भरलेल्या माठात

अन निळा माठ बघ, भरला आभाळात

आभाळ पलिकडे, माठ फुटे हा इकडे

हा वेडा जमवी, आभाळाचे तुकडे

आणि –

डबक्यात मनाच्या, स्वप्नांचे शेवाळे

काठावर डोळे मिटुनि, बसले बगळे

घालून शवासन, बेडूक योगी आला

संभोग मागतो, इवल्या मासोळीला

--- असे खूप आहे. श्रीनिवास जोशी यांनी प्रत्येक रुबाईवर त्यांचे सार्थ निरूपण दिलेले आहे. ज्यांना व्यक्तिगत आणि सामाजिक या मर्यादेबाहेरचे काही चालत असेल वा महत्त्वाचे वाटत असेल त्यांनी हे पुस्तक जरूर वाचावे.

--- ००० ---

चित्रकार पाथरे

ले ० शरद आणि सुचिता तरडे, प्र ० हेरिटेज इंडिया.

इतकी अत्युत्तम निर्मिती असलेली पुस्तके मराठीत कमी आहेत. आकारापासूनच हे पुस्तक वेगळे आहे. ८ बाय ८ इंच या आकारातले हे पुस्तक आहे. उत्तम मुखपृष्ठ, उत्तम कागद आणि उत्तम छपाई ! हे एक फाईव्ह स्टार पुस्तक आहे असे म्हटले तरी चालेल. पण ही काही अनावश्यक उधळपट्टी वा बडेजाव नाही. ही या पुस्तकाची गरजच आहे. कारण यात पाथऱ्यांची अनेक चित्रेही आहेत आणि त्या चित्रांचा मुळासारखा फील वाचकांना द्यायचा असेल तर हे अत्यावश्यकच ठरते.

तरडे दांपत्य हे स्वत: चित्रकारितेत माहीर असलेले आहे. त्यांची अनेक चित्रे आणि चित्रकार व चित्रकला यांबाबतचे लेख आपण फेसबुकवर पाहातच असतो. या दोघांच्याही उमेदीच्या काळापासून यांना पाथऱ्यांचा सहवास आणि मार्गदर्शन मिळत आलेले आहे. अशा या आपल्या गुरुतुल्य चित्रकारावर या दोघांनी अत्यंत आत्मीयतेने लिहिलेले हे पुस्तक आहे. आलटून-पालटून दोघांनी एकेक भाग लिहायचा अशी या लेखनाची रचना आहे. त्यामुळे हे पुस्तक सतत दोन वेगवेगळ्या कोणांतून आपल्यासमोर उलगडत जाते. यातून त्यांचे पाथऱ्यांबाबतचे प्रेम आणि आदर हे तर जाणवत राहातातच पण शिवाय एकूणच कलाप्रक्रियेतल्या अनेक घटना आणि प्रक्रिया यांबाबतची वैविध्यपूर्ण निवेदने आपल्यापुढे येत राहतात. हे पाथऱ्यांचे चरित्र नसून या कलावंत दांपत्याला ते कसे दिसत-उलगडत गेले त्याची ही कहाणी आहे.

या कला क्षेत्रातली अनेक प्रकारची कामे, अनेक आस्थापनांशी येणारे संबंध, कामांत येणाऱ्या अडचणी व आव्हाने, ती कशी पेलली वा पार पाडली गेली यांची तपशीलवार वर्णने यात आहेत. या क्षेत्रात आपली कारकीर्द करू इच्छिणाऱ्यांसाठी तर हे उपयुक्त आहेच पण एकूणच छोट्यामोठ्या संकटांना तोंड देण्याची तयारी वाढवणारे म्हणून प्रेरणादायकही आहे.

पाथरे हे एक मनस्वी चित्रकार आणि म्हटले तर लहरी-विचित्र स्वभावाची व्यक्ती होते. त्यांच्या या गुणांचे दर्शन या पुस्तकात आपल्याला पदोपदी घडत राहते. म्हणजे उदाहरणार्थ – पाथरे आर्थिक अडचणीत आहेत हे पाहून, स्वत: अडचणीत असतानाही या दांपत्याने त्यांना काही मदत करावी तर ती मदत हे सज्जन तिसऱ्याच एखाद्या अडचणधारकाला देऊन टाकत !

या पुस्तकात पाथऱ्यांची एखादी मुलाखत असायला हवी होती असे वाटले – ती त्यांनी दिली असती का हा अर्थात प्रश्नच आहे. तरीही त्यांची काही वाक्ये यात सापडतात ती उद्बोधक आहेत. एक म्हणजे चित्रकाराने हात मोकळा ठेवण्यासाठी सतत स्केचेस काढत राहिले पाहिजे, असे ते म्हणत. पान ७० वर ते म्हणतात, माणूस, जनावर यांना चांगलेवाईट म्हणणे हे फक्त आपले विचार असतात, वस्तुत: तसे काही नसते. पान ७१ वर ते म्हणतात, " हा म्हणतो स्वत: चित्रकार. सारखे तशीच पेंटिंग्ज करून विकतो. जरा अक्कल नाही. म्हणे गिराईक खुश म्हणजे आपण खुश. चित्रातलं काही कळत नाही. जे खपतं तेच तसंच विकतात साले ! " पान ८६ वर ते म्हणतात, " त्यामध्ये (म्हणजे चित्रात) गाण्यासारखी लय असावी लागते. त्यातील आकार, रंग ह्यामधील एकरूपता खूप महत्त्वाची. त्यावर त्या चित्राचा जिवंतपणा अवलंबून असतो. जर हे जमले नाही तर ते पेंटिंग अंगावर येते. बघवत नाही जास्त वेळ. " पान १०५ वर ते म्हणतात, " खरं पेंटिंग म्हणजे डायरेक्ट करायला पाहिजे, नाही तर फारच मूड जातो माझा. आणि दर वेळेला नवीन पेंटिंग करणं म्हणजे नवीन कॅनव्हास, नवीन फ्रेम काही परवडणार नाही हो. " पान ११४ – " मी थोडी व्यावसायिक कामे करून पैसे कमावतो. (पण) ही पेंटिंग्ज मी माझ्यासाठी करतो. " व्यवसाय आणि सर्जकता यांच्यांतले द्वंद्व सतत जगत आलेला हा चित्रकार होता, हे आपल्या लक्षात येते. पान १३९ वर त्यांचे एक वाक्य आहे – " इतके दिवस माझी जी तळमळ चालली होती, त्यातलं काहीतरी सापडलंय ! असं वाटतं, अहो, इतकं सोप्पं असतं ना. पण तिथपर्यंत पोचायला फार कष्ट घ्यावे लागतात. आणि ते जमलं तर काय हो ! कुठल्या वेगळ्याच जगात असतो आपण ! " लोकांना त्यांची चित्रे न समजण्याबाबतचा त्यांचा त्रागा पान १४२-४३ वर आला आहे. त्यातला बिनतोडपणा विचारात पाडणारा आहे.

हे पुस्तक म्हणजे तरडे दांपत्याने पाथरे या चिरत्रकाराला मरणोत्तर वाहिलेली आदरांजली आहे. पाथऱ्यांनी अनेक प्रकारच्या माध्यमांतून चित्रे, सजावटी केल्या असल्या तरी अमूर्त चित्रकला हेच त्यांचे हृदयस्थ क्षेत्र होते. त्यांची अनेक चित्रे या पुस्तकात आहेत. मला विशेष आवडलेल्या चित्रांचे पान क्रमांक असे आहेत – २०, ५६, ६१, ६२, ९४, ११०, १२५, १३२ आणि १४८. पाहात राहावे आणि आपले विचार थांबवून त्या चित्रांना बोलू द्यावे, अशी ही चित्रे आहेत.

--- ००० ---

१. मराठी रंगभूमी – चर्चा आणि चिंतन

ले ० डॉ. सतीश पावडे, प्र ० नभ प्रकाशन

२. मराठी रंगभूमी आणि अब्सर्ड थिएटर

ले ० डॉ. सतीश पावडे, प्र ० नेक्स्ट पब्लिकेशन.

आधीच हे सांगायला हवे की ही दोन्ही पुस्तके पुरेसे कष्ट घेऊन लिहिलेली अभ्यासपूर्ण पुस्तके आहेत. ज्या त्या विषयावरच्या संदर्भांची रेलचेल इथे आहे. आणि अर्थातच प्रत्येक विषयावरचे पावड्यांचे विचक्षण चिंतनही आहे. अशा कोणत्याही समीक्षात्मक लेखनाला काळाची आणि त्या त्या समीक्षकाच्या मूल्यात्मक निवडींची मर्यादा असते आणि ती असणारच. पहिले पुस्तक हे पावड्यांनी वेळोवेळी लिहिलेल्या लेखांचे संकलन आहे तर दुसरे पुस्तक म्हणजे ठरवून हाताळलेले एक दालन आहे. पहिल्या पुस्तकात, ' तृतीय रत्न ', प्रायोगिक रंगभूमी, रंगभूमी आणि शेती – असे अनेक प्रश्न हाताळलेले आहेत. यात विशेष विचारार्थ घेतलेली नाटके ही आहेत – ' दर्शन ' – श्याम मनोहर, ' ते पुढे गेले ' – मकरंद साठे, ' आत्महत्या ' – सदानंद बोरकर, ' कॅम्पस ' – वामन तावडे, ' ढिगारा ' -- डॉ. सतीश पावडे, ' फील गुड फॉर्च्युन ' – योगेश शेजवलकर – आणि निवडक एकांकिका या आहेत – ' इटस ऑल राईट ' – लेखकाचे नाव नाही, ' भंकस ' – श्रीकांत सराफ, ' सरी गं सरी ' – गिरीश पांडे, ' घुसमट ' – विजय भालेकर, ' सीमारेषा ' – अनिल साळवे. अब्सर्ड वाल्या पुस्तकात १९६० ते १९९० हा कालखंड घेतलेला असून इथे विशेष विचारात घेतलेली नाटके आहेत – ' एक शून्य बाजीराव ' – चिं. त्र्यं. खानोलकर, ' महानिर्वाण ' – सतीश आळेकर, ' कुलवृत्तांत ' – वृंदावन दंडवते, ' गार्बो ' – महेश एलकुंचवार, ' चल रे भोपळ्या टुणूक टुणूक ' – अच्युत वझे, ' मुंबईचे कावळे ' – शफाअत खान, ' चारशे कोटी विसरभोळे ' – मकरंद साठे, ' अभेद्य ' – प्रशांत दळवी, ' अश्मिभूत ' – एस. जे. तेंडुलकर आणि ' सूतक ' दिलीप पुरुषोत्तम चित्रे. (यात सुरुवातीला असे म्हटले आहे की – " आशयाच्या पातळीवर गो. पु. देशपांडे, श्याम मनोहर यांची नाटके अब्सर्ड आशयद्रव्याशी नाते सांगणारी आहेत, पण आविष्कार पद्धती पारंपरिक पद्धतीची स्वीकारल्याने त्यांच्या नाटकांचा विचार येथे करण्यात आलेला नाही. " – हे वाक्य पटण्यासारखे नाही, हा भाग वेगळा,) आणि एकांकिकांमध्ये तेंडुलकर, खानोलकर, एलकुंचवार, वृंदावन दंडवते, आळेकर, अच्युत वझे, शफाअत खान, वसंत आबाजी डहाके, विजय तापस, वामन पात्रीकर, मकरंद साठे, अतुल पेठे, प्रदीप राणे, किशोर यशवंत – या लेखकांचा समावेश आहे. इथे एक लक्षात घ्यायला हवे – In an essay on Kafka, Ionesko defined his understanding of the term (absurd) as follows – " Absurd is that which is devoid of purpose … Cut off from his religious, metaphysical, and transcendental roots, man is lost; all his actions become senseless, absurd, useless. " (Mrtin Esslin च्या ' The Theatre of the Absurd ' या पुस्तकात, पान २३.) नुसताच उपरोध वा नैतिक विसंगती म्हणजे अब्सर्ड नव्हे. सासू सुनेला उपरोधिक बोलली तर ते अब्सर्ड नव्हे. मोदी असण्यातला उपरोध हा अब्सर्ड नाही ठरत कारण राहुल असणे म्हणजे चांगले, हे मनात असते.

तर मराठीत असे समीक्षा लेखन जरा अवघडच असते. ते एकनाथांचे भारुड आहे ना माहीत – ‘ बाईसाब आल्यात ‘ --
बाईसायबांना घेईन म्हटले बांगड्या
तर कासाराच्या मोडल्या तंगड्या
--- मी काय बांगड्या घेण्याजोगी न्हवती व्हय ?
-- अशा चालीवर ‘ आम्ही काय नीट दखल घेण्याजोगे नव्हतो काय ‘ असे विचारत प्रेमानंद गज्वी किंवा चं. प्र. देशपांडे अशा काही किरकोळ लेखकांची मांदियाळी समोर येऊ शकते. हा नेहमीचाच प्रश्न असल्याने सोडून द्यावा लागेल.
इथे आणखी एक गाणे प्रस्तुत ठरू शकते, ते म्हणजे ‘ इसे मार दिया जाय या छोड दिया जाय ‘ – यात मार देना म्हणजे खतम करणे आणि छोड देना म्हणजे अनुल्लेखाने मारणे. हे विविध कारणांनी घडू शकते – त्यामुळे तेही सोडूनच द्यायला हवे.
या निमित्ताने माझ्या मनात एक प्रश्न आला की ‘ साहेब ‘ हा शब्द जर गोऱ्या अधिकाऱ्यांबद्दल वापरला जात होता आणि इथला ब्रिटिश काळ १८५८ ते १९४७ असून एकनाथांचा काळ जर १५३३ ते १५९९ होता तर त्यांना तो शब्द कसा माहीत असेल – म्हणून जरा शोधले तर हा मुळातला अरबी शब्द असून १५२६ ते १८५७ या मुघल काळात भारतात आलेला आहे. त्यामुळे तो एकनाथांना माहीत असणार. असो.
--- ००० ---
२६-०५-२२.

प्रिय मित्र समीर एस. दळवी यांची पोस्ट --
Sameer S. Dalvi
•
‘शब्द आणि वाक्ये वा ओळी यांच्या साहचर्यातून, क्रमवारीतून व आंतरसंबंधातून व्यक्त होणारी संसूचक अर्थवलये एका परिपूर्ण आशयाप्रत पोचवणारा एकसंध भाषिक मजकूर म्हणजे कविता'.
कविता लिहू पाहणाऱ्या, वाचू पाहणाऱ्या आणि अनेकदा प्रयत्न करून झाल्यावर पुन्हा नव्याने ती लिहू आणि वाचू पाहणाऱ्या कुणालाही, कविता म्हणजे काय किंवा कविता कशास म्हणतात या प्रश्नाचे उत्तर शोधण्यात जो गोंधळ (केऑस) हाती लागतो, त्या गोंधळातून त्याचे बोट धरत, त्याला वाट दाखवण्याचे काम चं. प्र. देशपांडे यांची कवितेची उपरोक्त व्याख्या करते, असे मला वाटते. 'तंबाखूची टपरी आणि अनेक अनुसर्जित कविता' या त्यांच्या कवितासंग्रहातल्या, जगभरातील ५८ कवींच्या अनेक कविता एका संग्रहात वाचताना या व्याख्येचा प्रत्यय पानोपानी येतो. कवितेविषयी असलेल्या आपल्याकडील साहित्यिक आणि सांस्कृतिक समज-अपसमजांना दुरुस्त करत, कवितेच्या प्रांतात गांभीर्याने रमू पाहणाऱ्या कुणालाही अत्युत्तम दर्जाचे दिशादिग्दर्शन करू शकेल, असा कविता विषयक मौलिक ऐवज

त्यांनी या संग्रहाच्या माध्यमातून आपल्या हाती दिला आहे, त्याबद्दल त्यांचे मानावे तितके ऋण थोडेच ! माझ्यापुरती या ऐवजाची मौलिकता काय ते मी थोडक्यात सांगायचा प्रयत्न करतो.

आजवर जे काही चाळीस बेचाळीस वर्षांचे जगलो, त्यात 'एखाद्या व्यक्तीचा वा घटनेचा मला जो काही अनुभव आला' किंवा 'एखाद्या व्यक्तीने वा घटनेने मला जो अनुभव दिला' असं म्हणत, असा अनुभव देण्याची जबाबदारी समोरच्या व्यक्ती किंवा घटनेवर ढकलून, मी म्हणजे कुणीतरी स्वायत्त आणि सार्वभौम व्यक्ती आहे, असा वृद्धिंगत झालेला माझा समज चंप्र त्यांच्या प्रास्ताविकात मांडलेल्या काव्यतत्त्वात दुरुस्त करून देतात. (या संग्रहात केलेले प्रास्ताविक सुद्धा समग्र कवितेच्या संदर्भात आपले कालातीत मूल्य राखून आहे) ते म्हणतात, अनुभव म्हणज काय तर जगण्यातल्या घटितांना - घटनांना येणारा व्यक्तीचा प्रतिसाद वा प्रतिक्रिया. म्हणजेच मी जे धरून चाललो होतो त्याच्या नेमके उलट. अनुभव हा प्रत्येक व्यक्तीच्या शारीर-मानसिक घडणीवर - प्रोग्रॅमिंगवर - कंडिशनिंगवर अवलंबून असतो. त्यामुळे, अनुभवाला सत्याचे मूल्य असू शकत नाही. मी स्वायत्त आणि सार्वभौम असण्याच्या माझ्या समजूतीला सुरुंग लावणारे हे काव्यतत्त्व माझ्या दृष्टीने मौलिक आहे. सध्याच्या पोस्ट मॉडर्न कालखंडात हरारी सारख्या मानववंशशास्त्रज्ञाने देखील या तत्त्वाला आपल्या लिखाणातून दुजोरा दिल्याचे अनेकांनी वाचले असावे. पण कवितेच्या संदर्भात खूपच आग्रही भूमिका घेऊन आपल्या साहित्यिक पर्यावरणात वावरत असलेल्या लोकांनी या तत्त्वाची कितपत दखल घेतली आहे, याबद्दल शंकेला प्रचंड वाव आहे. असो. माझ्यापुरते सांगायचे झाले तर या संग्रहात ज्या कविता अनुसर्जनासाठी निवडल्या आहेत त्यात, वर उल्लेख केलेल्या काव्यतत्वाचे पुरेपूर दर्शन चंप्र आपल्याला घडवतात.

वानगीदाखल मूळ इटालियन कवी, अलेसिओ झानेलीची त्यांनी अनुसर्जित केलेली एक कविता इथे देण्याचा मोह होतो आहे,

प्रतिबिंब

आपण सगळे इतर सगळे आहोत
आपल्यापैकी प्रत्येकजण
आपण जे काही आहोत वा जगण्यात
जिथे पोचतो
तेही इतर सगळ्यांमुळेच घडते
प्रत्येकजण - एकेकटा कुणीच नाहीय --
आपण इतर प्रत्येकाचे
यश आणि अपयश आहोत
आपण इतर प्रत्येकाचे
सुख आणि दुःख आहोत
आपल्याव्यतिरिक्त

इतर प्रत्येकाच्याही

जगण्याचा परिणाम आहोत

आपल्या प्रत्येकात

इतर सगळेही प्रतिबिंबित आहेत

आपण प्रत्येकजण

इतर सर्वांची बेरीज आहोत

निरपवादपणे

आपण प्रत्येकजण

दुसऱ्या कुणाचीच

आपल्याला साक्ष नसेल

तर आपण कुणीच नसू

आणि काहीच नसू

ही आणि संग्रहातील अशा अनेक कविता म्हणजे चं. प्र. देशपांडेंच्या अनुसर्जनाचे सौंदर्य म्हटले पाहिजे.
सगळ्या कवितांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्या त्या कवितेला योजलेली समर्पक अशी शीर्षके ! एखाद्या कवितेचे आकलन तिच्या पहिल्या वाचनात न झाल्यास ती कविता तिच्या शीर्षकाचे स्मरण ठेवत दुसऱ्यांदा वाचावी. असे केल्याने तिचे आकलन होण्यास मदत होते असा माझा अनुभव आहे. या संग्रहातल्या बहुतांश कविता मी अश्या पद्धतीने दोनदा तीनदा वाचल्या. त्यानंतर जे काही आकलन झाले त्यातून स्त्रोत भाषेत योजलेल्या शब्दांचा अंदाज येतो. शिवाय, लक्ष्य भाषेतील अनुसर्जनातले भाषा सौंदर्यही प्रकर्षाने जाणवते. अनुक्रमाच्या बाबतीतही सुरुवातीच्या झानेली पासून ते शेवटच्या निकॅनोर पारा पर्यंत कवितांची केलेली योजना खासच आहे. जिज्ञासूंनी हा कवितासंग्रह वाचल्यास अनुक्रमाच्या अनुषंगाने पाराच्या कवितेचे सर्वात शेवटी केलेले उपयोजन चं. प्र. देशपांडेची कवी आणि अनुसर्जक म्हणून असलेली धारणा स्पष्ट करते.

आजवरच्या माझ्या वाचन प्रवासात दोन पुस्तकांनी खांद्यावरच्या झोळीत कायमस्वरूपाचे स्थान पटकावले होते. पहिले डॉक्टर धर्मवीर भारतींचे 'अंधा युग' आणि दुसरे जयंत पवारांचे 'पासवाला'. 'तंबाखूच्या टपरी' निमित्ताने त्यात आणखी एका सोबत्याची भर पडली आहे.

तंबाखूची टपरी आणि अनेक अनुसर्जित कविता

चं. प्र. देशपांडे

साहित्यिक चं. प्र. देशपांडे यांनी,त्यांच्या फेसबुक पाटीवर एक कविता पोस्ट केली.त्या कवितेच्या

चेतनेमुळे मला जे सुचले ते हे...

चंप्र ह्यांच्या सर्वच कलाकृतीत मानवी जाणिवा व त्यांचे विविधस्तरावर होणारे विभ्रम,भ्रम,संभ्रम,समज, अपसमज,गुण,वैगुण,सगुण,नगुण अशा अवस्थांचे दर्शन घडते.त्यांच्या 'नकविता' अशा आशयाच्या अनेक कवितांचे वाचन व अवलोकन मी करत असतो. इथे 'न' ह्या शब्दातुन काहीच न सांगता बरच काही प्रसवण्याची व पसरवण्याची बैठक लक्षात घ्यायला हवी. बैठक ह्या शब्दातून स्थिर व कायम ,अधिष्टीत व ठाम असा गृहीत अर्थ/समज होतो. ' स्थिरचित्र ' ह्या शिर्षकाची खालील कविता नीट वाचू किंबहुना पाहू..!तिला नकवितेची बैठक आहे. जी तिसऱ्या,चौथ्या अस्तित्वा विषयी बोलते,दाखवते..!

स्थिरचित्र....

स्थिरचित्र
वस्तू असू देत पण त्या नकोत
त्यांचा नुसता आभास हवा
रंगही खास नकोत
निवडलेले बिनचूक होण्यासाठी
पॉलिश नको खरखरीतपणाच असावा
नेमका नको माहोल
नुसतेच जाणवावे
मिसळभेळ वातावरण
निसर्गदत्त म्हणाले
टक लावून नका पाहू जगाकडे
एकएक प्रश्न सोडवत बसाल
तर विसरून जाल
आपण कुठे उभे आहोत
आणि हा रस्ता खरा आहे का
हे प्रश्न
मनावर काय की अंगावर काय
पुरळ उठणे ही अलर्जीच असते
सतत अस्वस्थ करणारी

नेमका विचार हा

शरीरबाह्य समजून

हे कळलेला चित्रकार

काढतो नेमके

काहीच माहीत नसलेले

स्थिरचित्र

जे काही होते समोर अस्पष्टसे

ते सगळे आता कुठे गेले

हेही तो विचारतही नाही

नेमकेपणा

नकोच असतो त्याला

चं. प्र. देशपांडे.

--- ००० ---

पाहिलीत का ही कविता आणि त्यातील स्थिरचित्र...??

चित्रकला/दृश्यकला विषयाचे उच्च शिक्षण घेताना 'स्थिरचित्र' असा एक विषय असतो.ह्या विषयाचा स्वाध्याय का करावा व त्यात नेमके साध्य काय? हे प्रश्न बहुधा सामायिक किंवा सार्वत्रिकपणे सर्वांना सारखेच पडतात.ते असे,

वस्तुचित्र व निसर्गचित्र ह्या दोन्ही विषयात समोरील ठेवलेल्या वस्तूचा यथार्थ/वास्तवदर्शी आविष्कार करणे,त्यावरील छायाभेद,प्रकाशाची प्रत,

आकारमान,पोत,

ह्या बाबींचा समावेश असतो.

पण मग स्थिरचित्र स्वाध्यायासाठी सुद्धा वस्तूंचे संच आणि कापड ह्यांची मांडणी केलेली असते व ती मांडणीपाहुन स्थिरचित्र चितारायचे असते.

मग वस्तुचित्र/निसर्गचित्र

आणि 'स्थिरचित्र' ह्यात फरक तो काय??

माझ्या मते हा फरक प्रथमतः पाहण्यात आहे.स्थिरचित्र काढताना ; वस्तू दिसते तशी काढण्यात स्वारस्य नसते. तर वस्तू समग्र पहावी अशी सूचकता अपेक्षित असते,म्हणजे वस्तू हलक्या मिचकल्या डोळ्यांनी पहायची. असे पाहिल्याने अवाजवी प्रकाश डोळ्यात शिरत नाही व वस्तू ह्या समग्र,रुपात्मक दिसतात.ह्या बघण्यात आकारघनता व तिने व्यापलेले अवकाश व तिने सारलेले अवकाश बघणे अभिप्रेत आहे. ज्याला इंग्रजीत व्हॉल्यूम असे म्हंणतात.' घाट 'असे म्हणता येईल.

तसेच वस्तुचित्र व निसर्गचित्रासाठी प्रत्येकासमोर स्वतंत्रपणे त्या त्या वस्तूंची मांडणी केलेली असते. स्थिरचित्रणात मात्र वस्तूंचा एकमात्र संच,

सुनियोजित मांडणी करून बैठक निर्माण केलेली असते. ह्या स्थिरपणाभोवती स्वाध्यायी फेर करून आपापल्या कोनातून एकाच स्थिरतेला अनुभवतात तेव्हा तिथे मितीकांचा प्रश्न /जाणीव

उभी ठाकते.

वस्तु अचलपणे बैसल्या असतात मात्र स्वाध्यायी चल असल्याने त्याला समोरील स्थिरत्वाच्या विविध मितीकांचे आकलन होते. एकाचवेळी अनेक मिती चित्रात काढण्याची मुभा स्थिरचित्रणात असते.

तसेच वातावरणीय भावदर्शन चित्रात प्रगट व्हाव असेही अभिप्रेत असते.स्थिर अशा मांडणीत चित्रकाराकडून/स्वाध्यायी कडून वैयक्तिक दृश्यमूल्यांची भर घालणे अपेक्षित असते. ह्यात केवलाकाराची निर्मिती, रंगलेपन,पोत, वस्तूचा आपापसातील घनत्व संदर्भात बंध अशा बाबींचा समावेश असतो.

स्थिर आणि त्याचे चित्र ह्यात जो बंध आहे; तो अनेक अदृश्य पण चेतनामयी बाबींकडे लक्ष पुरवतो.पैकी चंप्र सरांनी ह्या कवितेत ' निसर्गदत्त म्हणाले ' असा उल्लेख केला आहे.तो असा-

...निसर्गदत्त म्हणाले

टक लावून नका पाहू जगाकडे

एकएक प्रश्न सोडवत बसाल

तर विसरून जाल

आपण कुठे उभे आहोत

आणि हा रस्ता खरा आहे.....

इत्यादी मधून ही कविता तिच्या अव्यक्तातून व्यक्त अशा स्थिर हेतुकडे बोट दाखवते.हा हेतू आहे 'सहज' असण्याचा.स्थिरत्वात जे गांभीर्य आहे ते जाणून घ्यायचा.

'निसर्गदत्त' म्हणजे ते,जे जे चराचरात, वर्तमानात अखंड ठाकलेले आहे.

निसर्गदत्त हे एक अवलिया/ अध्यात्मिक वल्ली.

ह्यांनी सहजतेच्या मानवी धारणांना उच्चकोटीच्या अध्यात्मिक डुबेची प्रचिती दिली. जीवनाकडे,वस्तुस्थितीकडे, असण्याकडे समग्र पहा. त्यातील निवडक व वेचे स्वरूपाचे पाहिल्यास शंकांची जंत्री उभी राहिल व तयात मार्ग मिळणार नाही...

समग्र पहा,घाट पहा,वस्तु नको..जीवन तुमच्या कोनातून जे दिसते,त्याचे आकलन करा. ते अचल वाटते,पण नाही ...ते प्रवाही व चेतनायुक्त आहे.. स्थिर भासले तरी त्याच्या स्थिरचित्राचा संसर्ग ज्याचा त्याला चांग भला...

धंन्यवाद!!.. चंप्र सर

(क्रमशः)

प्रसन्नचित्त. -- प्रसन्न घैसास.

साहित्यिक श्री चं.प्र.देशपांडे यांच्या 'स्टीललाइफ' ह्या आशयाच्या कवितेमुळे स्फुरलेला जो विचार, तो पुढे प्रतिमांच्या सुचण्याच्या दिशा स्पष्ट करू लागला. त्या अशा.

स्टीललाईफ ह्या

आभ्यासक्रमित अनुभवाचा

विस्तार कालांतराने स्वाध्याय स्वरूपाचा न राहता नवनिर्मितीच्या मार्गाने सुरु झाल्यास एक महत्व पूर्ण मूल्य समोर येते.

ते म्हणजे 'दृश्यप्रतिमा'.

वस्तू,भवताल यांच्या दृश्य अनुभूती मनात घर करतात,म्हणजेच त्यातल्या दृश्याची छबी मनामधे ; त्या वस्तूच्या बाह्यअंगाचे अंकन करतात. ह्यात त्या वस्तूच्या विषयीचे भावनिक नाते,

संगतबंध असे पैलू ही सामावलेले असतात.

वस्तूला,तिच्या समूहाला घाट स्वरूपात अनुभवताना ,

माध्यमाच्या आधारे चित्रनिर्मिती होतं असता,प्रगट होणारे दृश्य हे मूळदृश्याची अवतरणे असतात.

ही अवतरणे कधी रंगप्रतिमा,पोतप्रतिमा,बाह्याकारी प्रतिमा किंवा वरील तिन्ही ने एकाचवेळी युक्त अशी प्रतिमा म्हणून प्रगट होऊ शकतात.

इथे अवधान,अन्अवधान,

जाणीव-नेणिव व चित्र काढण्याचा तांत्रिक सराव ह्या सर्वच गुणवत्तांचा उपयोग होत असतो.

वस्तूप्रतिमा ते चित्रप्रतिमा असा हा प्रवास असतो.

स्थिराचा हा प्रवास प्रतिमा चित्रापर्यंत जाण्याची ही नांदी असते,बहुदा प्रतिमा ह्या

प्रतलीय अनुभूती देणाऱ्या असतात.

वस्तूच्या समग्रदर्शनातील

तिचे सौष्ठव आणि त्यातून मनात होणारा भावनाकल्प यामुळे 'प्रतिमा' घडत जाते.

'प्रतिमेचे चित्रात उमटणे'

हे घडण्याच्या अतार्कीकतेचा भाग आहे. बुद्धी व मनोव्यापार ह्या मधून अकल्पित पाने प्रतिमा उमटावि किंवा जन्मला यावी ही सर्व ज्ञात अपेक्षा आहे.

प्रतिमा एकदा की निर्माण झाली की तिला स्वतंत्र अस्तित्व व कार्यभाग प्राप्त होतो,अनेक प्रतिमांच्या संकराने अधिक नूतन प्रतिमांचे जन्म होतात.

ती स्थिर कधीच रहात नाही पण अस्थिर ही नाही..

ती केवळ असते….!

नकवितेतले 'न' जसे असते..!

प्रसन्नचित्त. – प्रसन्न घैसास.

नवं जग, नवं साहित्य

जागतिकीकरणानंतर साहित्य संस्कृतीची चिकित्सा

ले ० विश्राम गुप्ते, प्र ० देशमुख आणि कं. (पब्लिशर्स) प्रा. लि.

आजचे विचार, आजची आव्हाने आणि आजचे साहित्य यांवरचे हे एक अत्यंत वाचनीय आणि विचारपरिप्लुत पुस्तक मे २०२२ मध्ये प्रकाशित झालेले आहे. लेखकांच्या आणि वाचकांच्या उत्सुकतेचे बरेच विषय या पुस्तकात हाताळलेले आहेत. त्यांतली ही काही शीर्षके बघा – शतखंडीत वास्तव आणि लेखक, वेलकम टु पोस्ट मॉडर्न टाईम, तुम्ही का लिहिता, मार्केटचा वास्तववाद, लेखकाचा मृत्यू, हिंद स्वराज्य आणि आधुनिकता, वगैरे. यातला, ‘ तसलिमा, रश्दी, हुसैन आणि आधुनिकता ‘ हा लेख तर विशेष वाचनीय आहे.

‘ तुम्ही का लिहिता ‘ या लेखातली ही दोन अवतरणे पहा --

“ चालू काळ समजून घ्यायला कठीण आहे. आज नैतिकता, ननैतिकता आणि अनैतिकता ह्यांचं अजब वास्तव तयार होत आहे. ह्या तीन नैतिक पवित्र्यांमधला ‘ ओव्हरलॅप ‘ पोस्टमॉडर्न काळाचं चिन्ह आहे. तुम्ही का लिहिता ? ह्या प्रश्नाला उत्तर देणं म्हणून कठीण आहे. पण कठीण असला तरी लेखकसाठी हा प्रश्न ऐच्छिक नाही तर, अनिवार्य आहे. आपल्याकडे ‘ तुम्ही का लिहिता ? ‘ हा प्रश्न मराठी लेखकाला विचारायची प्रथा नाही. ह्या ऐवजी ‘ तुम्ही काय लिहिता ? ‘ हाच प्रश्न विचारला जातो. मराठी साहित्य संस्कृतीचं हौशी स्वरूप बघता लेखकांना मुलाखतकारांनी असे सोपे प्रश्न विचारणे अपेक्षितच आहे. “ (पान ३६). त्याच लेखाच्या शेवटचे हे पहा – “ आधुनिक साहित्यातली सर्वाधिक लोकप्रिय अस्तित्ववादी स्कूल ही विवेक आणि श्रद्धा ह्या दोन परस्परविरोधी भावनांमुळे माणसाची जी तारांबळ उडते तिला अभिव्यक्ती देते. अनिश्चित मानवी अस्तित्वाचं कोष्टक संभवत नाही. त्याचा उगम आणि विकास गूढ आहे. त्यामुळे मानवी जगण्यात कायमची अनिश्चितता येते. तिच्यामुळे मानवी अस्तित्वाचा डोलारा कायम डळमळत असतो. हे डळमळणं सार्वकालीन आणि सर्वव्यापी असून हीच खरी मानवी अवस्था (human condition) आहे. तिचा अनुभव आपल्यापैकी प्रत्येकाच्या वाट्याला कधी ना कधी येतच असतो. तर ह्याच अनिश्चित अवस्थेचं नेमकं वर्णन करण्यासाठी मी लिहितो असं एखादा (माझ्यासारखा) लेखक म्हणू शकतो. “ (पान ४०).

‘ उग्र वाचकाचा जन्म ‘ या लेखातले हे अवतरण बघा –

“ साहित्याची परंपरा नेहमीच लिबरल म्हणजे मुक्त विचारसरणीला जवळची आणि बंदिस्त विचारसरणीचा विरोध करणारी राहिलेली आहे. ही परंपरा जगातल्या लेखकांनी आणि वाचकांनी आपली मानली. जगभर विखुरलेला माणूस

एक आहे. त्याची भावनिक स्पंदनं एक आहेत. त्याच्या आशाआकांक्षा एकसारख्या आहेत. त्याच्या प्रेरणा समान आहेत -- ही साहित्यिक लिबरल विचारसरणीची गृहीतं आहेत. त्यामुळे साहित्याला वैश्विक परिमाण लाभले. साहित्याचं ध्येय मानवी मूल्यांची जोपासणूक आणि जगण्याचं क्षितिज रुंदावणे हे असल्याने सच्चेपणा आणि स्वातंत्र्याला साहित्यात महत्त्व मिळालं. म्हणून प्रचारकी लिखाण दुय्यम दर्जाचं ठरलं " (पान १३०).

या पुस्तकातले सर्वच लेख अभ्यासपूर्ण असून आजच्या लेखक-वाचक-विचारवंतांसाठी तर हे एक मस्ट पुस्तक आहे. आजचे साहित्य समजून घेण्याला एक दिशा देणारे असे हे पुस्तक आहे.

--- ००० ---

मित्रवर्य संजय आर्वीकर यांनी ' **तंबाखूची टपरी** ' या माझ्या अनुसर्जित कवितांच्या पुस्तकावर दिलेला अभिप्राय --

आदरणीय' चंप्र, तुम्ही पाठवलेली 'तंबाखूची टपरी....' मिळाली. आयुष्यात कधीही तंबाखू न खाणा-या माझ्यासारख्याला त्याचा चस्का लागावा, असं झालं. पुस्तक मिळालं आणि मी प्रवासासाठी निघालो .बरेच दिवस घराबाहेर होतो आणि सगळ्या प्रवासात हे पुस्तक वाचत होतो. 'अनुसर्जनाच्या प्रास्ताविका'ने अत्यंत मूलभूत स्वरूपाचं चिंतन आपण अनुभवतो आहे आणि हे चिंतन एक Practitioner चं आहे, अशी भावना निर्माण केली. तुमच्यातल्या अनुसर्जकाइतकंच तुमच्यातल्या 'चिंतका'नं मला मोहून टाकलं. आपल्या सांस्कृतिक परंपरांसह 'वैश्विक नागरिक' होण्याची तुमची क्षमता अफाट आहे. सैद्धांतिक बाजूने विचार करूनही एकूण मांडणीत आस्वादाचे मोल अबाधित राहील, असं तुमचं लेखन वाटलं. मागे विलास सारंग यांच्या 'सिसिफस आणि बेलाक्का ' पुस्तकावर लिहिताना मी 'अनेक खिडक्या उघडणारी एक अनोखी खिडकी' असा उल्लेख केला होता. ही टपरीही मला अशाच अनोख्या खिडकीसारखी वाटली. तुम्ही कवितेच्या रूपात ओळख करून दिलेल्या कवींपैकी अर्ध्याहून अधिक कवी मला माहीतही नाहीत. त्यांची वाट उत्सुकतेनं धुंडाळावी,असा अनुसर्जित प्रकाश,तुम्ही मला दिलात,यासाठीच प्रारंभीचे ' आदरणीय' हे संबोधन पुन्हा वापरतो आणि तुमच्या या कामाला आणि तुम्हालाही 'सलाम' करतो

-संजय आर्वीकर

२८-०६-२२.

असणे आणि होणे

असणे आणि होणे यात खूप ताण निर्माण झाला तर मन भरकटू शकते. भरकटलेले मन ताळ्यावर आणणे, हे खूप अवघडही होऊ शकते. असे मन माणसाला जगणे असह्य करू शकते. मग तुम्ही राजेमहाराजे का असानात.

१३ जूनला मी इथे दिलेली ' तंबाखूची टपरी ' ही कविता एकूण जगण्याच्या प्रक्रियेसाठीच महत्त्वाची असली तरी ती ' असणे आणि होणे ' या मानसिक समस्येवरचे एक समुपदेशन म्हणूनही वाचली जाऊ शकते. कविता जरा आकाराने ' मोठी ' दिसतेय, चला पुढे -- हा सरसकटचा फंडा वापरावा, अशी ही कविता नाही. पेसोआच्या मूळ आशयाशी पुरेपूर एकत्र राहण्याचा प्रयत्न मी अनुवादात केलेला आहे. तरीही, अनुवादात काही गुणदोष असूही शकतील. या सर्वांसहसुद्धा ही कविता सर्व फ्रेंडसनी वाचावी, असे मला सुचवावेसे वाटते. असणे आणि होणे यात असंख्य मने फाटावीत, असा हा हावरट काळ आहे. आपल्या कुवतीप्रमाणे होईल तितके अत्युत्तम काम प्रत्येकाने करावे, हे निर्विवादच आहे. पण, त्यातून मिळणारे ग्लॅमर, प्रसिद्धी आणि कधी कधी पैसा यांची हाव निर्माण झाली तर सगळेच मुसळ केरात जाऊ शकते. तसे कुणाचेही होऊ नये, या हेतूनेच हे सुचवत आहे. ही काही जीवन-संजीवनी आहे, असे काही म्हणायचे नाहीय.

--- ००० --- (१५-०६-२० ची पोस्ट).

आम्हाला अपेक्षा आहे
की पावसाने सचेतन करावा हा झरा :
या खडकांनी व्हावे खळाळ,
या गोट्यांनी थोडे रांगावे
प्रवाहाखाली, त्या पानांनी
फिरावे गोल भोवऱ्यांत, असावेत
ओलीचे ओघळ आणि चमक.
शय्या तर आहे तयार
पण पाऊसच नाहीये अजून.
०
के ऱ्यान. अमेरिकन कवयित्री.
अनु. चं.प्र.देशपांडे
'तंबाखूची टपरी'तून.

याच के.ऱ्यान ची आणखी एक कविता या संग्रहात आहे, त्यातली शेवटची ओळ आहे,

..तोच होता
सर्वांत कठीण भाग पार पाडायला
रूटीन कामाप्रमाणे बिनचूक
जमणे : मोडून पुन्हा परतणे
त्याच हौदिनीत.

(हौदिनी हा प्रख्यात फ्रेंच जादुगार होता)

दिवसभर घामाची कसमस अनुभवत असताना चं.प्रं.चे हे पुस्तक आकलनक्षमतेचा कस पाहात होते.. केवढे काम करून ठेवलंय त्यांनी.. त्यातली ही पकडीत येतीये असं वाटणारी चिमूट.

--- नितीन वैद्य.

--- ००० ---

तंबाखूची टपरी..

आपल्याला काही गोष्टींत रस असतो व त्याविषयी जाग्या झालेल्या कुतुहलापोटी आपण त्या समजून घेण्याची धडपड करत राहतो.

शाळा-कॉलेजमध्ये शिकताना जो विषय कायम ‘ऑप्शन’ला टाकवासा वाटायचा त्या कवितेच्याबाबतीत असं झालं.

मनातल्या समजुती हळूहळू बदलू लागल्या.

कविता म्हणजे भावपूर्ण, यमक-प्रासयुक्त, ताल-नादमय, गेय साहित्य-प्रकार असं नसतं.

कविता म्हणजे व्यक्त होणं आणि व्यक्त होण्याला अशा मर्यादेत ठेवणं म्हणजे जणू व्यक्त होऊच न देणं.

अल्पाक्षरी आणि आशयपूर्ण गद्य व पद्य साहित्य म्हणजेही कविता अशी नवी समज येत राहिली, कवितांकडे बघण्याची नजर बदलली.

यात महत्त्वाचा वाटा फेसबुक फ्रेंड्सचा आहे.

कवितेशी जोडलेले फ्रेंड्स, त्यांच्या कविता, ते देत असलेल्या पोस्ट्समधले निरनिराळ्या भाषांतील देशी-विदेशी कवी, काव्यसंग्रह, नियत वा अनियतकालिकं, कवितांची वैशिष्ट्यं अशा कविता-विषयक अनेक गोष्टींची माहिती फेसबुकवर वावरल्याने होत राहिली.

अलीकडेच चं. प्र. देशपांडे यांचा 'तंबाखूची टपरी' हा जगभरातल्या ५८ कवींच्या अनेक, मराठीत अनुसर्जित केलेल्या कवितांचा संग्रह मिळाला.

त्यातल्या कविता फेसबुकवर वेळोवेळी प्रसिध्द होत असताना वाचल्या जात होत्या. पण आता पुस्तकरूपाने वाचताना त्यांना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेणं शक्य झालं.

सुरुवातीचे २८ पानी 'अनुसर्जनाचे प्रास्ताविक' म्हणजे तर फक्त कविताच नव्हे तर कोणत्याही कला-अभ्यासासाठी अत्यावश्यक ठरावे असे आहे.

एखाद्या विषयाचा सखोल आणि सर्वांगपरिपूर्ण अभ्यास कसा असावा याचे हे उदाहरण आहे.

ह्या संग्रहातील सर्वांत जुनी कविता सातव्या शतकातल्या चिनी बुध्दिस्ट संन्यासी हान शान याची आहे. तसेच बाकी कालावधी १८३० (एमिली डिकिन्सन) पासून १९८२ (पाब्लो सॅबोरियो) पर्यंत आहे. काळ कोणताही असला तरी यातल्या कविता कालातीत आहेत.

प्रास्ताविकात जे म्हटलेले आहे की 'यातील बहुसंख्य कविता या माणूस म्हणून तडक पोचणाऱ्याच आहेत' ते असे सोदाहरण स्पष्ट करणारे आहे.

त्याचप्रमाणे, माणसाचे भावजीवन आणि अनुभवजीवन यातील दाखवून दिलेला फरक. (जो मलपृष्ठवरही दिलेला आहे) चार्ल्स बुकोवस्की (१९२० ते १९९४) या जर्मन - अमेरिकन कवीची ही कविता वाचताना नकळत चीड आणि खिन्नता असे भाव मनात साकारतात.

संस्मरणीय स्मित

आमच्याकडे एका वाडग्यात काही सोनमासे होते.
त्यात ते वर्तुळाकार फिरत. तो वाडगा होता टेबलावर
जे होते रंगवलेल्या खिडकीजवळ, जड पडदे लावलेल्या.
आणि माझी आई, नेहमीच स्मित करणारी, आम्ही सगळ्यांनी
आनंदी असावे अशी इच्छा करायची, म्हणायची,
“ आनंदी राहा हेन्री ! “ आणि बरोबरच होते तिचे :
शक्य असेल तर आनंदी राहणे चांगलेच की.
पण माझे वडील सातत्याने तिला आणि मला
आठवड्यातून अनेकदा मारत असत. त्यांच्या
सहा फूट दोन इंची शरीरात संताप खदखदत असे
आणि त्यांना हे कळत नसे की काय आहे हे आतून धडका देणारे.
माझी आई, एक गरीब मासा,
आनंदी होता यायची वाट पाहायची मार खात,
दर आठवड्याला दोनतीनदा, मला आनंदी राहायला सांगत :
“ हेन्री, हास बघू ! हसत का नाहीस तू कधी ? “
आणि कसे हसायचे ते ती मला हसून दाखवायची –
आणि इतके विषण्ण स्मित मी कधीच कुठेच नाही पाहिलेले.
एके दिवशी ते सोनमासे मेले, पाचही –
ते तरंगू लागले पाण्यावर कललेले एका बाजूला
आणि डोळे अजूनही उघडे असलेले.

आणि जेव्हा माझे वडील परतले घरी

तेव्हा त्यांनी ते फेकले मांजराला खायला

सैपाकघराच्या जमिनीवर

आणि आम्ही बघत राहिलो

माझी आई स्मित करत असताना.

--- ००० ---

प्रास्ताविकातले असे बरेचसे मुद्दे सोदाहरण वाचता येण्याने कवितेशी अधिक जवळून ओळख होते.

याचा अर्थ प्रत्येक मुद्दा वा

प्रत्येक कविता समजते का? किंवा ती अशी ताडून बघता येते का?

तर त्याचे उत्तर 'नाही ' असेच आहे.

मग आपल्याला हे पुन्हा पुन्हा का वाचावेसे वाटते?

त्याचे उत्तर यातल्याच दोन कवितांमध्ये आहे, ते असे -

एडिथ सिटवेल (१८८७ ते १९६४) या ब्रिटिश स्त्री कवीची ही कविता --

कविता (Poetry)

कविता उदात्त करते काळीज आणि डोळ्यांना,

आणि अनावृत करते अर्थ सर्वच गोष्टींचे

ज्या असतात वसतिस्थान काळीज आणि डोळे यांचे.

ती विश्वाचे रहस्यमय किरण काढते शोधून,

आणि करून देते आपल्याला पुनःप्राप्ती विस्मृत स्वर्गांची.

--- ००० ---

या संग्रहातली पहिलीच कविता, इटालियन कवी –अलेस्सिओ झानेली (१९६३, राहतो इटलीतच)

प्रतिबिंब (Mirroring)

आपण सगळे इतर सगळे आहोत

आपल्यापैकी प्रत्येकजण

आपण जे काही आहोत वा जगण्यात

जिथे पोचतो

तेही इतर सगळ्यांमुळेच घडते

प्रत्येकजण -- एकेकटा -- कुणीच नाहीय.

आपण इतर प्रत्येकाचे

यश आणि अपयश आहोत

आपण इतर प्रत्येकाचे

सुख आणि दुःख आहोत

आपल्याव्यतिरिक्त

इतर प्रत्येकाच्याही जगण्याचा

आपण परिणाम आहोत

आपल्या प्रत्येकात

इतर सगळेही प्रतिबिंबित आहेत

आपण प्रत्येकजण

इतर सर्वांची बेरीज आहोत.

निरपवादपणे

आपण प्रत्येकजण.

दुसऱ्या कुणाचीच

आपल्याला साक्ष नसेल

तर आपण कुणीच नसू

आणि काहीच नसू.

--- ००० ---

चं. प्र. देशपांडेसर, तुम्हांला सादर प्रणाम आणि मन:पूर्वक धन्यवाद!

चित्रा राजेंद्र जोशी -- २.७.२२

--- ००० ---

चित्रसंहिता

ले ० मंगेश नारायणाराव काळे, प्र ० कॉपर कॉईन पब्लिशिंग प्रा. लि.

आमची मुले (मुलगा मोठा, मुलगी लहान) शाळेत असताना कधी कधी आमच्या गंमतीच्या गप्पा होत. तशा एका वेळी आम्ही ठरवले की आपण स्टीलच्या भांड्यांचा कारखाना काढायचा आणि त्यातले आपले स्पेशल उत्पादन असणार पाण्याचा जग. आपल्या कंपनीचे ओळखचिन्ह असणार पृथ्वीगोल म्हणजे जग. त्यामुळे आपली टीव्हीवर जाहिरात अशी येणार – ‘ जगात जग एकच जग – जग जग ! ‘ तर तसे हे एक जबरदस्त पुस्तक आहे. चित्रकलेच्या जगाचा आवाका घेणारे – आणि ते चित्रकलेचे जगही जगभरातले. अशा या टोलेजंग कामगिरीबद्दल प्रथमच माझा मित्र मंगेश याचे

दिलखुलास अभिनंदन. या पुस्तकाचा हेतू लक्षात घेऊन त्याच्याकडे पाहिले पाहिजे. प्रत्येक चित्रप्रणाली वा प्रत्येक महत्त्वाचा चित्रकार यांचे सखोल, सविस्तर दर्शन घडवणे असा इथे हेतू नसून चित्रकलेबाबतच्या भानाची आणि अभिरुचीची आपली क्षितिजे रुंद व्हावीत, विस्तारली जावीत, हा या पुस्तकाचा हेतू आहे. आदिमानवाच्या गुहा चित्रांपासून ते आजच्या आघाडीच्या अनेक चित्रकारांचा यथायोग्य परिचय या पुस्तकातून होऊ शकतो. एक तर आपल्याकडे चित्रकलेला जगण्यातच कमी स्थान आहे आणि त्यातही एकूणच कला या जगाबद्दलच फारच संकुचित धारणा आपण बाळगतो. या दोन्ही समस्यांवर हे पुस्तक म्हणजे एक रामबाण इलाज आहे. हे लक्षात घेता, मराठीत हे पुस्तक अमर राहील असे नक्कीच म्हणता येते. कोणत्याही कलेतल्या प्रणाली वा काळाबरोबर बदलत, विकसित होत जाणाऱ्या अभिव्यक्तिपद्धती म्हणजे माणसाने जगणे समजून घेण्याच्या प्रक्रिया असतात – ते नुसतेच काही निरुद्योगी लोकांनी उभे केलेले तथ्यहीन कौशल्याचे इमले नसतात याचे भान हे पुस्तक सक्षमतेने देते. या पुस्तकाच्या लेखकाकडे असलेली माहिती आणि संदर्भानुरूप त्याला आठवणारे अनेक अर्थपूर्ण तुकडे पाहून अचंबित व्हावे असे हे एक रिच – समृद्ध पुस्तक आहे.

“ मानवी संस्कृतीचा इतिहास हा ‘ कुतूहला ’ चा इतिहास आहे. या कुतूहलातून किंवा गरजेतून माणसाने असंख्य शोध लावले. तेच कलेविषयीही म्हणता येईल. आज उपलब्ध असलेली, ज्ञात असलेली जी असंख्य कलारूपे, कला-अवशेषाच्या रूपाने आपल्यासमोर आहेत, त्यातून त्या काळातल्या मानवी समूहाचे जीवन, जगणे, कुतूहल, प्रेरणा यांचा थोडाफार अदमास घेता येतो. “ (पान १४०). “ कोणत्याही कलेचे जग हे जेवढे ज्ञात प्रदेशात विस्तारलेले असते, त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त जग हे अज्ञाताच्या प्रदेशात असते. किंवा याही पुढे जाऊन असे म्हणता येईल की, कलेचे जग हे नेहमीच एक अमर्याद अशा आज्ञातात विस्तारलेले असते. या दोन धारणांच्यामध्ये कला, कलेचे सर्जन – कलारूपाच्या निर्मितीचा पैस आपल्याला पाहता, अनुभवता येतो. “ (पान २८४). “ निर्मिक/कलावंत, कला, दर्शन आणि विज्ञानाच्या या परस्परावलंबी घडणीच्या पार्श्वभूमीवर काही प्रश्न समोर येतात. ते म्हणजे, कलावंत/निर्मिक, त्याचा भवताल, त्याचा वर्तमान, त्याचा भूतकाळ आणि भविषयासंबंधीची असोशी यांचे काही एक नाते असते का ? या नात्यातून तो काय स्वीकारतो आणि काय टाकून देतो ? कलावंत म्हणून, निर्मिक म्हणून तो त्याच्या समूहापेक्षा वेगळा कसा घडतो ? वेगवेगळ्या अनुभवातून स्वत:ला पुन्हा पुन्हा घडवत, आकारत तो सर्जनाकडे कोणत्या प्रेरणेने जातो ? सर्जन हे त्याचे साध्य असते की साधन ? “ (पान २९५). – असे अनेक प्रश्न मनात घेऊन केलेले हे गंभीर लेखन आहे.

उत्तम कागद, उत्तम छपाई, उत्तम निर्मिती आणि असंख्य चित्रे ही या पुस्तकाची खास वैशिष्ट्ये आहेत. रंगीत चित्रे छापणे हे मराठीत परवडणारे नाही, हे आपण समजू शकतो. या अतिमहत्त्वाच्या निर्मितीबद्दल लेखक-प्रकाशक यांचे मन:पूर्वक अभिनंदन !

--- ००० ---

संपादिका – वैशाली व्यवहारे देशपांडे, प्रकाशक – सुनिधी पब्लिशर्स.

संपादिकेच्या आई डॉ. कल्पना व्यवहारे यांच्या स्मरणार्थ प्रकाशित झालेले हे पुस्तक आहे. विविध विषयांतल्या अभ्यासकांचे/तज्ज्ञांचे लेख यात एकत्रित करण्यात आलेले आहेत. संवाद/संपर्क हे सूत्र धरून या पुस्तकाची आखणी/मांडणी करण्यात आलेली आहे. संगणक, माती, शिल्पकला, चित्रपट, माध्यमे, धर्म, इतिहास, शिक्षण, वारे, वृक्ष, साधना, स्वातंत्र्य आणि शब्द म्हणजे शब्दभाषा – असे विषय आहेत. सर्वच लेख ज्ञानात काही ना काही भर घालणारे आहेत.

निरनिराळ्या संपर्क उपकरणांचे आणि माध्यमांचे आपल्या जगण्यावर होणारे परिणाम अतुल कहाते यांच्या लेखात, डोळ्यात अंजन असे आलेले आहेत. शिल्पकला आणि मूर्तिकला यांतून व्यक्त होणारे त्या त्या काळातले जगणे, पुराणकथा यांवरचा गो. बं. देगलूरकर यांचा लेख उत्तमच आहे. कॅमेऱ्याची दृष्यभाषा आणि शब्दभाषा या दोन्हींचा परामर्ष घेणारा केशव साठे यांचा लेख माध्यमवाल्यांनी अवश्य वाचावा असा आहे. भाषेबाबतचाच चेतन जोशी यांचा लेखही याचबरोबर वाचावा असा आहे. संवाद हीच थीम असल्याने या पुस्तकातले हे दोन विशेष लेख आहेत. माझा मित्र गिरीश रांगणेकर याचा ' संवाद चित्रपटांशी ' हा लेख, भारतीयांचे जगणे आणि वेळोवेळी समांतरपणे इथल्या चित्रपटांत होत गेलेले समस्यांचे, विषयांचे बदल आणि हाताळणीतले व दृष्टिकोणांतले बदल यांवर सविस्तर प्रकाश टाकणारा आहे. त्या त्या विषयांच्या संदर्भात ते ते चित्रपट आठवणे आणि त्यांची वर्ण्य विषयाशी सांगड घालत जाणे हे या लेखात छानच जमलेले आहे.

पुस्तक इंटरेस्टिंग आहे. आजच्या प्रश्नांचे आणि जगण्याचे भान वाढवणारे आहे.

--- ००० ---

आवर्तने द्रुत शून्याची ------ आरती प्रभू.

घटाघटका अशा चालल्या आहेत संपूर्ण
संपूर्ण विदीर्ण होत संपूर्णपणें चालल्या आहेत
मागे ठेवून कित्येक सावल्या एकाच हृदयाच्या
हृदयावरील हृदयांतील जशा की मिटल्या डोळ्यांतील
केवळ फक्त कांहीं वास्तवाबद्दलच्या 'केवल ' हालचाली
घटकघटका धुऊन निघताहेत विरळविरळ
विरळता भरून येतेय जशीं कीं आवर्तनें द्रुत शून्याचीं
छेद घेताहेत प्रकाशगतीशीं... देताहेत उल्कापातांसम

कित्येक स्मृतिचिन्हांना ठिणग्या... क्षणार्ध पडसाद
अडतात ...अडखळतात. ओकेपणावर उभा अवकाश.
आणि काय उरावें ? उरीं भरून यावी कुठून हांक ?
सायंकालीन घंटानाद कोषांतून थरथरत्या दिव्यांचा आवाठ
आताआतां स्तब्ध... कुठल्या घरट्यांतील चोंच असेल
मध्यरात्रीहि आपल्याच पिसांत न खुपसलेली जागी ?
फक्त तयार असेल संपादकाच्या डोक्यांत परवाचा अग्रलेख.
हें तर असेंच सगळे अमानवी रहस्य बंद आपोआप
सतत सुरू सतत बंद यामधील रेषेवर
कःपदार्थ कुठलाहि कण भयंकर स्फोटक आणि त्याचीच
सूत्रें संवेदनांची मानवी कण्याशीं परंपरागत संलग्न
मुंगीच्याही ओठी अगदी शुभ्र कणाची साखर पेरलीय त्यानें.
बांबूच्या वनांतील वाऱ्याची चिरफाड किर्रता
(उदासीन आसमंत जसा की नामानिराळा हवेंत कुठेतरी
राहतो दीर्घ तानेचा तुकडा) प्राणही देहांतील होतोय
फक्त थडग्यांतील दिवा... होतोय जवळ जवळ मिटण्यासाठों
जमा समुदाय काळ्या पाकळ्यांचा... एकांत शोकगीतापूर्वीच ...

- आरती प्रभु

काळाच्या अपूर्ण जाणिवेत जखडलेल्या मनाचा हा एक यूनिक अनुभव. काळाची संपूर्ण जाणीव असू शकते का, असल्यास ती कशी असते यासंबंधीच्या कोणत्याही सूचनेचा तसा प्रश्न नाही. पण अपूर्णतेत होणारे काळाचे विघटन आणि त्यातल्या अनेक जाणिवा यांचे हे स्पष्ट आणि भरीव चित्र. काळाच्या विघटनासारखा विचित्र आणि तितकाच भरभन्नाट अनुभव आणि तो व्यक्त होण्यातली सर्वस्वता हेच या कवितेचे वैशिष्ट्य आणि सामर्थ्य.

'घटकाघटका अशा चालल्या आहेत संपूर्ण'

या ओळीत समोरून जाणाऱ्या काळाच्या सलग तुकड्यांची संपूर्णता कळते न कळते तोवर लगेच पुढच्या ओळीत ती संपूर्णता विदीर्ण होत असल्याचे कळते. आणि ठिकऱ्या ठिकऱ्या उडणाऱ्या क्षणांच्या अद्वितीय अनुभवात कविता तडक

शिरते. या सगळ्या घटनेला कुठेतरी अटळ असे एकाच हृदयाचे केंद्र आहे. यातून साचत जाणाऱ्या उरणाऱ्या सावल्या हृदयातील वा हृदयावरील - पण अपरिहार्यपणे हृदयाशी निगडित अशाच आहेत. हृदयाच्या, हृदयावरील, हृदयांतील हे शब्द जसे अलीकडचा आशय विस्तारतात तसाच पुढचाही. मिटल्या डोळ्यांतील हालचालींची अप्रत्यक्षता या एकाच हृदयाच्या हालचालींना आहे. या हालचाली केविलवाण्या आहेत, कारण त्या फक्त हालचालीच आहेत; आणि त्या 'केवळ फक्त काही वास्तवाबद्दलच्या' आहेत. वास्तवाचे सर्वस्व आवाक्यात नाही, आणि वास्तवाचे भाग विदीर्ण होत चाललेले – अशा या अटळ जाचातला हा केविलवाणेपणा.

पहिले कडवे 'घटका घटका' असे काळाचे संपूर्ण असे कल्पित तुकडे घेऊन सुरू होते तर दुसरे कडवे 'घटका घटका' असे सुरू होऊन विघटनेची प्रक्रिया पुढे ओढते. घटकांची ही धूप सबंध भान विरळतेने भरून टाकते. आणि हा अनुभव चित्रांकित दृश्यांकित होतो तो असा

'जशीं की आवर्तनें द्रुत शून्याचीं
छेद घेताहेत प्रकाशगतीशीं... देताहेत उल्का पातांसम
कित्येक स्मृतिचिन्हांना ठिणग्या...'

'आवर्तनें द्रत शून्याचीं', 'प्रकाशती', 'उल्कापात', 'ठिणग्या' यांतल्या गतिमानतेशी अगदी विसंगत-थंड अशा पुढच्या ओळी येतात.
'क्षणार्ध पडसाद अडतात...अडखळतात. ओकेपणावर उभा अवकाश.'

तीन शब्दी वाक्याचे दोन शब्द वर, एक शब्द खाली आणि एका ओळीत दोन पूर्णविराम; अशा प्रकारे सगळ्याच गतीला ब्रेक लागून एक प्रकारचा बेसावध हरवलेपणा निर्माण होतो. आणि 'ओकेपणावर उभा अवकाश' असे एक प्रचंड भयाण चित्र दिसायला लागते.

तिसऱ्या कडव्यात याही सगळ्याशी विसंगत असे एक साधे-दैनंदिन घटनांचे सहज दृश्य येते. 'आणि काय उरावे ? उरीं भरून यावी कुठून हाक ?' या चालू विचाराला जोडूनच पण एकदम एका वेगळ्या मूडमधे नेणारे दिनक्रमातील काळाच्या उदास-करुण निरर्थकतेची जाणीव देणारे दुसरे एक चित्र येते.

यानंतरचे कडवे या सगळ्या कालविघटनाचे सार शोधू जाते- म्हटले तर तत्त्वही शोधू जाते. आवर्तनांची 'गती' आणि ओकेपणावर उभ्या अवकाशातली ' स्थिती ' अशा या सतत सुरू आणि सतत बंद यांमधील रेषेवरचे हे रहस्य. 'अमानवी

रहस्य.', 'बंद आपोआप रहस्य ?', ' आपोआप सतत सुरू, सतत बंद यांमधील रेषेवर' चे रहस्य. त्या रेषेवरचा कःपदार्थ असा कुठलाही कण भयंकर स्फोटक, आणि त्याचीच सूत्रे संवेदनांनी मानवी कण्याशी परंपरागत संलग्न. मुंगीच्याही ओठी अगदी शुभ्र कणांची साखरपेरणी करून परमेश्वराने गळी मारलेले हे गूढ. भयंकर स्फोटक अशा त्या कणांची संवेदनसूत्रे मानवी कण्याशी संलग्न झाल्यापासून या अमानवी रहस्याची सुरुवात. हालचालींची गती अपरिहार्यपणे एकाच हृदयाशी निगडित राहण्याच्या स्थितिशीलतेचे हे गूढ.

पुढल्या कडव्यातील पहिल्या ओळीत 'सतत सुरू सतत बंद' असे हे रहस्य चित्ररूप घेते -- 'बांबूच्या बनातील वाऱ्याची चिरफाड किर्रता.' उदासीन आसमंत, नामानिराळा दीर्घ तानेचा तुकडा – सगळेच प्रस्तुतापासून तुटलेले --- अलगलेले. देहातला प्राणही फक्त थडग्यातला दिवा वाटायला लागतोय. या सगळयातून झोप आल्याप्रमाणे- भोवळ आल्याप्रमाणे जवळजवळ मिटण्यासाठी काळ्या पाकळ्यांचा समुदाय जमा होतोय. (मृत्युरूप) एकांत शोकगीतापूर्वीचा. 'होतोय जवळ जवळ मिटण्यासाठी' हे पाकळ्यांच्या समुदायाइतकेच थडग्यातील दिव्यालाही लागू. 'जत्रा समुदाय...' यातल्या 'जत्रा' या आघातातून अचानकपणे आणि थंडपणे जमायला लागणाऱ्या पाकळ्यांची भेसूरता जाणवते. 'एकांत शोकगीतापूर्वीचा...' इथे कवित संपते. म्हणजे काळाच्या विघटनाच्या अनुभवाच्या अटळ परिणतीच्या अगदी संपृक्त अवस्थेत संपते.

तर्काच्या क्षेत्रात कधीही समजावून न देता येणारा पण ज्याचे अस्तित्वही नाकारता येणार नाही असा हा अनुभव या कवितेत फार समर्थपणे व्यक्त झालेला आहे. विचार भावना यांच्याही बुडाशी कुठेतरी असणाऱ्या रहस्याकडे लागलेला या कवितेचा रोख एक अपरिहार्य अशी अनिश्चितता आणि धूसरता घेऊनच येतो. त्यामुळेच कविता 'समजल्या' नंतरही न समजता केवळ जाणवूनच घेता येईल असे कवितेचे फार मोठे अस्तित्व उरते. आरती प्रभूंच्या अनेक चांगल्या कवितांचे हे महत्त्वाचे वैशिष्ट्य या कवितेत विशेष जाणवते.

-चंद्रकांत प्रभाकर देशपांडे

--- ००० ---

' तंबाखूची टपरी ' असे सकृतदर्शनी अनाकलनीय शीर्षक असलेला अनुसर्जित कवितांचा संग्रह मला भेट म्हणून आदरणीय श्री . चं . प्र देशपांडे सरांनी दिला .मीही चक्रावूनच गेले होते . अर्थात् हे प्रतीक असणार हे मी ताडले . ज्येष्ठ समीक्षक, नाटककार आणि कवी श्री चंप्र सरांनी या फारशा परिचित नसणाऱ्या युरोपीय वा इतर देशस्थ कवींच्या कविता एका विशीष्ट हेतूने अनुवादित केल्या आहेत . हे Transcreation
एक वैचारिक बैठक घेउन येते . तेच चिंतन आपल्याला प्रस्तावनेत वाचायला मिळते . हा ' हटके' शीर्षकाचा संग्रह चिकाटीने आणि विचक्षणपणे कविता वाचणाऱ्यांसाठीच आहे . सरांनी त्याबाबत योग्य दक्षता घेतलेली आहे .

ही कविता अनवट वाटांनी जाणारी, आशयसंपृक्त आणि प्रचंड प्रमाणात सूचक आहे . या कवितांचा आशय सहजी हाती लागत नाही . त्यासाठी वाचकाची मानसिक पूर्वतयारी आणि दमणूक या गोष्टी आल्याच .

इथे सर असा अनुवाद करण्यामागची आपली भूमिका स्पष्ट करतात . प्रस्तावना प्रदीर्घ तरीही नेटकी, थेट आणि तर्कसुसंगत , मुद्देसूद आहे . हा महत्वाचा ऐवज आहे . इथे सरांनी ह्याच कवींच्या कविता का निवडल्या? निवडीचे निकष कोणते होते , मूळात असे अनुवाद का केले, कवितेचा आत्मा कशात आहे? अनुवाद करताना कोणत्या अडचणी आल्या आणि असा अनुवाद सिध्द करण्यामागचा त्यांचा कलात्मक आणि वैचारिक हेतू या बाबींचा उहापोह केलेला आहे .

आंतरजालावरील युरोपीय कवींच्या कविता वाचत असताना त्यांनी आपल्या मराठी मित्रमैत्रीणींसाठी मराठीत त्या कविता अनुवादल्या . मग या उर्मीने अधिक जोर धरला . त्यामुळे अलिकडच्या म्हणाव्यात अशा सरांना आवडलेल्या कवितांचे अनुसर्जन त्यांनी सुरु केले . प्रामुख्याने हे आधुनिक आणि उत्तराधुनिक कवी आहेत . अमूर्त, वास्तववादी, व्यस्ततावादी अश्या सर्व प्रकारच्या आधुनिक प्रवाहातील कविता मराठीच्या प्रवाहात आणण्याचे मोलाचे काम सरांनी केले आहे . आधुनिक युरोपीय कवितेची जाण व भान मराठी वाचकाला यावे असा सरांचा हेतू आहे .

अर्थात नवे काही घडविताना ' कशाला हा खटाटोप' अशी पृच्छा होतेच .

ज्याप्रमाणे केशवसुत, मर्ढेकर , रेगे , यांनी आपल्याकडे नवे घडविले तसेच वैश्विक साहित्यात घडविणारे कवी आहेतच . त्यांच्याही कवितेचा मागोवा आपण बौध्दिक, भावनिक उत्सुकता म्हणून घ्यायला हवा! आपल्या मळ्याला कुंपण नसावेच ! आपला सहानुभाव विस्तारित करता यायला हवा . आपली आस्वादक्षितिजे रुंदावून पाहायला काय हरकत आहे?

सरांनी दोन प्रकारच्या जीवनातील भेद अचूकपणे दाखवला आहे . एक आहे भाव- जीवन आणि दुसरे अनुभव- जीवन . भावजीवन हे कमी अधिक प्रमाणात स्थलकाल निरपेक्ष असते . अनुभवजीवन मात्र वेगवेगळे असू शकते . कविता या दोहोंना प्रतिबिंबित करते . पण कविता रसिकांपर्यंत पोचते भावजीवनाच्या वाटेने ! म्हणूनच तिचे अपील सार्वकालिक ठरु शकते . केवळ

बुध्दीजन्य आणि बुध्दीगम्य असते ती कविता नाही . ती भूमिका घेउन लिहिलेली , प्रतिक्रियावादी कविता होय .

सर स्पष्ट करतात की कवितेचा आशय अत्यंत महत्वाचा आहे . काव्यतत्वाविना कविता ही खरी कविताच नव्हे!

काव्यतत्व म्हणजे काय हे सरांनी अतिशय तरलपणे सांगितले आहे .

Also there are numerous levels of emotional expression and to reach higher levels requires cold detachment . Poetry is concealed in the ' distanced gaze '

असे गाओ झिंग्झियानचे उद्धृत् सरांनी दिले आहे . अतिशय महत्वाचा संदर्भ आहे तो परतत्वाच्या स्पर्शाचा ! ज्ञानेश्वर, तुकोबाराय यांच्यासारखेच फर्नांडो पेसोआ देखील म्हणतो

Rereading , I wonder " Was that me?"

God knows because he wrote it .

या प्रस्तावनेतून अनुसर्जक हा चिंतनशील सर्जक म्हणून आपल्यापुढे उभा राहतो .

पेसोआ सरांचा आवडता कवी . त्याचे अजून एक उद्धृत् महत्वाचे आहे .

I believe in the world as in a daisy

Because I see it

But I don' t think about it

Because thinking is nor understanding

समग्र भान आवश्यक हे लक्षातच ठेवले पाहिजे .

मानवी जीवनाला सर्वांगाने कवळणारी दूरदृष्टी म्हणजेच ' distant gaze'

सर सर्व विवेचनात कवितेच्या सर्वसमावेशकतेवर भर देतात .

दिलीप चित्रे यांच्या पुस्तकातील काही भाग येथे चर्चिला गेला आहे .

सरांच्या या सविस्तर प्रस्तावनेमुळे काव्यतत्व , अनुसर्जन आणि अनुवादकाची भूमिका याविषयीची अनेक परिमाणे ठळकपणे डोळ्यासमोर आली आहेत . विचारप्रवृत्त करणारी ही प्रस्तावना माझ्या वैचारिककतेला नवे खाद्य पुरवित आहे .

शीर्षक कविता म्हणजे माझी अस्तित्वात असण्याची जाणीव पायदळी तुडविणारी कविता असे ते म्हणतात .

पण कवितेतील Subjectivity आणि Objectivity याविषयीच्या माझ्या शंकांचे निरसन मी सरांना प्रत्यक्ष भेटूनच करुन घेइन

मा श्री . चं. प्र . Champra Deshpande देशपांडे सर या बहुमोल भेटीबद्दल मनापासून आभार आणि धन्यवाद

--- मोहिन पिटके.

<हाकाराची नवी- १६ वी आवृत्ती | Hakara's 16th edition: www.hakara.in>

हाकाराची नवी- १६ वी आवृत्ती सादर करताना आम्हाला मनापासून आनंद होतोय. बघा, वाचा, शेअर करा आणि तुमची प्रतिक्रिया द्या.

We are delighted to present Hakara's 16th edition. Please see, read, share and give us your feedback.

आवृत्ती १६: गुपित/ Edition 16: Secrecy

संपादकीय / Editorial

परामर्श / Reflection

गुप्ततेचे दृश्यभान देणारे अद्भुत जग: डॉ चैतन्य शिनखेडे

Manbhumi Jhumur: A form of Cultural Counter-Narrative: Dr Prasenjit Panda

Revisiting My Secret Shelf: Rakhi Dalal

Covert Operations: Acts of Secrecy and Homosexual Identity: Dr Lee Campbell

Concealing Caste Identity: An Intersectional Reading of Yashica Dutt's Coming Out as Dalit: Priyanka Verma

Secrets that Shatter: A Re-reading of Mahesh Dattani's Tara: Sisodhara Syangbo

चोरकप्पा उघडताना: राखी दलाल/आश्लेषा गोरे

आख्यान / Narrative

Personal Integrity of an Artist-1: Gajānan Mādhav Muktibodh/Saumya Malviya

Fatima's Fish and Rice: Bhaswati Ghosh

वलय: निखिल बैसाणे

To Forget to Remember: Aparna Nori

इतिहास लिहिला जायच्या आधी: आशुतोष पोतदार

दृश्यांगण/ Panorama

Conflicted Coexistence: Vignesh G.

Sites of Crisis: Unmisha Misra

राखाडी रंगाच्या छटांमधल्या दृश्य-प्रतिमा: केतकी सरपोतदार

Strange Metaphors for Terrible Events: Eva Holts
मुक्तावकाश / Open Space

The Display that Hid: Amit Kumar Vishwakarma

प्रयोग-प्रक्रिया: हिमांशू भूषण स्मार्त

Forest and Other Poems: Suchita Khallal/Rahee Dahake

कहाणी आणि इतर कविता: चं प्र देशपांडे

Lozenged love and Other Poems: Antara Mukherjee

मनात: एकांकिका आणि लेखन-दिग्दर्शनाचा प्रवास: मल्हार दंडगे
C P Deshpande is a critically acclaimed Marathi playwright and a thinker. He has written more than 30 plays, and a number of poems and essays, and has received several awards including R C Datar Award (Maharashtra Foundation), and Ram Ganesh Gadkari Award (Government of Maharashtra). His plays are regularly performed in Marathi and other Indian languages.
२३-०८-२२.

खालील परीक्षण घ्यायचे राहिले होते --

नात्यांचे सर्व्हिसिंग (कथासंग्रह).
ले ० विश्वास जयदेव ठाकूर – प्र ० शब्दमल्हार प्रकाशन.

“ मी असंख्य कथा लिहिलेला कथाकार आहे; परंतु ठाकूर यांना भेटलेली पात्रे, प्रसंग, घटना मी कल्पनेतही पाहू शकलेलो नाही. “ – मधु मंगेश कर्णिक.

“ या पुस्तकातील पंचवीस गोष्टींमधून मानवी स्वभावाचे आणि वर्तनाचे अनेक नमूने पाहायला मिळतात. “
--- वसंत आबाजी डहाके.

अशा दोन मातब्बर शिफारशी या कथासंग्रहाला आहेत. विश्वास ठाकूर यांनी त्यांच्या वयाच्या सत्तावीसाव्या वर्षी एक सहकारी बँक स्थापन केली आणि पुढे ती नावारूपाला आणली. बँकेचे कामकाज आणि त्याच्याशी संबंधित माणसे, परिसर आणि त्याच्याही बाहेरचा सामाजिक परिसर यांतून आलेल्या अनुभवांचे, सत्य घटनांचे हे कथन आहे. चारपाच चारपाच पानांची एकेक कथा आहे. तरीही प्रत्येक कथा अनपेक्षितता आणि विविधता यांनी युक्त आहे. एखाद्या निवडक क्षेत्रातील कथा अशा एकत्रितपणे येणे हे एक या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे. ठाकूरांचा उदार मानवी स्वभाव हा या कथांचा स्थायी भाव आहे. माणसे जाणूनबुजून, मुद्दाम, नाइलाजाने वा परिस्थितीमुळे कशी विचित्र वागतात याचे अनेक प्रकार इथे दिसतात. ठाकूरांच्या माणूस-प्रेमामुळेच घडलेल्या, म्हटले तर मार्ग सापडलेल्या अशा या कथा आहेत. मीही अठ्ठावीस वर्षे बँकेत नोकरी केलेली असल्याने मला या कथांबद्दल एक विशेष आत्मीयता वाटली. त्याचबरोबर, ठाकूरांचा एकूण व्याप आणि समस्या हाताळण्यातले त्यांचे कौशल्य आणि परिपक्वता पाहून मी चकितही झालो.

तशा छोट्याछोट्या कथा आहेत, त्यांचे नमूने सांगत बसत नाही. या सर्वच कथा भरगच्च आशयाच्या शक्यता असलेल्या आहेत हे जाणवते पण, तरीही, त्या जरा सविस्तर दिलेल्या बातमीच्या स्तरावर राहतात, असे वाटते. ठाकूरांकडे अधिक मोठा आवाका घेत, खोलातून मानवी जगण्याचे समावेशक भान घेण्याची कुवत असूनही त्यांनी हे सर्व निव्वळ अनुभव कथन या मर्यादित पद्धतीनेच हे हाताळले आहे. त्यातही ते लोकांच्या वागण्याच्या काही प्रक्रिया आणि रचनाव्यूह दाखवतात पण तरीही ते सर्व कलात्मक उंची गाठत नाही. सामान्यत: सर्वमान्य चांगले-वाईट , नैतिक-अनैतिक किंवा एकूणच मान्यताप्राप्त मानवी मूल्ये एवढ्या परिघातच या कथा राहतात. अमुक एक आदर्श वा चांगले अशी मानसिक दिशा न पकडता त्यांनी जर ‘ जे आहे ते ‘ याचे समावेशक भान घेणारे लेखन केले तर नक्कीच ते कलात्मक दृष्टीनेही कसदार होईल असे वाटले.

आहे या रूपातही एका बँकरने लिहिलेल्या कथा या दृष्टीने हे सर्व खास आहेच !

--- ००० ---

(१) इज इट इन युअर डीएनए

(२) ललद्यदस ललबाय

हे पोएट्रीवाला प्रकाशनाने प्रसिद्ध केलेले मीनाक्षी पाटील यांचे कवितासंग्रह वाचले. पहिला संग्रह २००९ ला प्रसिद्ध झालेल्या संग्रहाची दुसरी आवृत्ती असून दुसरा संग्रह नवा आहे. पहिल्या संग्रहातल्या या ओळी बघा --

हळूहळू चटके वाढू लागतात
वाचताना क्रॉसबीचं सूर्यमरण
अन मोजताना मरणाचे डोळे
वितळू लागतो सावली शोधणारा सूर्य
दिवसभर किसलेल्या शब्दांना
पापणीतलं मीठ लावून बरणीत भरल्यावर
संध्याकाळी उतरताना पायऱ्या
फुटपाथवर फडफडणारा गुरुदत्त
बघत असतो केविलवाणं

अशा संपृक्त ओळी लिहू शकणारी ही कवयित्री इतरत्र पाल्हाळिक का होते असा प्रश्न पडतो. या संग्रहात नवखेपणाच्या खुणा दिसतात.

दुसरा संग्रह मात्र कवयित्रीला पडणाऱ्या अनेक आध्यात्मिक प्रश्नांना अभिव्यक्ती देतो. संग्रहाचे नाव काश्मिरी संतकवी लल्लेश्वरी यांच्या नावावरून दिलेले आहे. या संग्रहातली मला आवडलेली ही कविता बघा --

आपुले मरण मी ...
मी जन्माला आली तीच मेलेली
मी जन्मताच आई मेली
मेली म्हणजे तिने ठरवलं की
ती कायमच माझ्यासाठी मेलेलीच असेल
बाप तर फक्त बीजवाहक
तो कधी जिवंत होता हे असेल
फक्त मेलेल्या आईलाच माहीत
माझ्या जन्माअगोदर जन्मलेल्या
भावाबहिणींना याबद्दल विचारावं म्हटलं
तर तेही आले स्वत:च्याच श्राद्धाचं जेवायला
हे सगळं काय आहे म्हटलं

विचारावं लोकांना

तर कळलं

माझ्या मरणसोहोळ्याच्या आनंदानं

साऱ्या गावानंच केलीय

सामूहिक आत्महत्या.

सर्वच नाती, सुखदु:खे यांची वैय्यर्थता आणि निरर्थकता यांचा प्रत्यय देणारी ही कविता आहे. कोणत्याही नात्यात जिवंतपणाच नसण्याची ही एक शोकात्म मानवी अवस्था इथे व्यक्त होते. आता ही एक विशेष कविता बघा –

किंकाळी

फारच भीषण, प्राणांतिक आहे मुंकची किंकाळी

अंगावरच्या शहाऱ्यातून आत्म्याला चिरत चिरत आरपार जाणारी

त्या नजरेतलं भय विझवून टाकतंय साऱ्या रंगांना

तो हृदयभेदी आवाज गोठवतोय साऱ्या आसमंताला

तो कुठचा पूल आहे संवादच संपवणारा

तो मागे उभा असलेला काळपुरुष कोण आहे ?

त्याच्यासोबत अजून कुणीतरी दिसतंय अस्पष्टसं त्या फ्रेममध्ये

का गोठलाय हा दालीचा काळ अनंत काळासाठी

पोटॅटो इटर्सचे पोटॅटोपण संपत चाललेय आता ...

आणि ही अमृता तर थेट जाऊन बसलीय मौजेत

तिच्या डोळ्यातून उमटतेय तीच मुंकची मूक किंकाळी

जी कधीच ऐकू आली नाही कुणाला

पुलावरच्या किंकाळीसारखी

की कापूनच टाकले आहेत कान तुम्ही कायमसाठी

व्हॅन गॉघच्या प्रिय स्मृतीत ...

--- मुंकच्या त्या भयानक चित्राभोवती आणखी दोन चित्रकारांच्या अशांत आठवणी उभ्या करून ही कविता जगण्यातले भय, संवादाचा अभाव, असंवेदनशीलता आणि एक कर्कश अशी दगडी अवस्था यांचे दर्शन घडवते. त्या त्या चित्रांचे आणि चित्रकारांचे संदर्भ मनात जसजसे अधिकाधिक स्पष्ट होत जातील तसतशी अधिकच तीव्रतेने जाणवत जाईल अशी ही कविता आहे.

अशा कविता, अशा ओळी लिहिणारी ही कवयित्री जेव्हा पाल्हाळिक होते, बोधप्रद होते, सारांश देऊ पाहते, समजावून दिल्यासारखे लिहिते तेव्हा अर्थातच वाईट वाटते. हे दोष या कवयित्रीने यापुढे जाणीवपूर्वक टाळायला हवेत, असे वाटते.

या कविता वाचल्यावर एक मात्र जाणीवपूर्वक नक्कीच म्हणता येते की मराठीतली ही एक महत्त्वाची कवयित्री आहे. ही नुसतीच स्वत:ची सुखदु:खे वा प्रतिक्रिया व्यक्त करत नसून मानवी जगण्याबाबतची तिची चिंतनशीलता व्यक्त करत आहे. नुसतेच ‘ अमुक ‘ वर केंद्रित न राहता मानवी जगण्याचा पट समोर घेणारी ही दृष्टी आहे. त्यामुळे, अर्थातच, या कवयित्रीच्या पुढील संग्रहाबद्दल उत्सुकता राहील.

--- ००० ---

खळाळता अवखळ झरा आणि इतर कथा

ले ० एकनाथ आव्हाड, प्र ० मेहता पब्लिशिंग हाऊस.

आपले इथले मित्र एकनाथ आव्हाड हे सातत्याने मराठी बालसाहित्यात मोलाची भर घालत असतात, हे आपल्याला माहीत आहे. बालसाहित्य म्हणजे नुसतेच राक्षस, पऱ्या असे नसून त्यातून मुलांचा बौद्धिक आणि सांस्कृतिक विकास होत असतो, हे लक्षात घ्यायला हवे. त्या दर्जाचे ते लेखन होण्यासाठी मुळात तो लेखक तशी दृष्टी आणि अभ्यास असलेला असावा लागतो. आव्हाड हे नि:संशय तसे दर्जेदार बालसाहित्यकार आहेत. यापूर्वी इथे मी त्यांच्या ‘ शब्दांची नवलाई ‘ या बालकवितासंग्रहावर लिहिले होते. तेही एक छान, उपयुक्त आणि आल्हाद्कारक असे पुस्तक आहे. आव्हाड स्वत: अनेक वर्षे एका महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. तो अनुभवही त्यांच्या गाठीशी आहे. त्यांच्या काही पुस्तकांचे हिंदी, इंग्रजी आणि ब्रेल लिपीतही अनुवाद् झालेले आहेत यावरून त्यांच्या कामाचे महत्त्व लक्षात यावे. उत्तम कागद्, उत्तम छपाई, उत्तम चित्रे व सजावट असलेल्या या छान निर्मितीत काही लहान लहान कथा आहेत. एकमेकांतले प्रेम, सौहार्द, सहकार्य यांचे मानवी जगण्यातले स्थान अधोरेखित करण्याबरोबरच पर्यावरण, नागरिक वर्तणूक, भाषा, अशा जगण्यातल्या महत्त्वाच्या बाबींचे सहज जाता जाता भान आणि ज्ञान देणाऱ्या या कथा आहेत. सध्याच्या काळात मुलांची अशी सर्वांगीण वाढ व्हावी असे वातावरण कमी आहे. ती त्रुटी आव्हाडांची ही पुस्तके भरून काढू शकतात. तुमच्याआमच्या मुलानातवंडांसाठी लिहिणारे असे लेखक आपल्याकडे असणे ही एक मौल्यवान गोष्ट आहे. त्यासाठी आपण आव्हाडांचे ऋणी असायला हवे.

बालसाहित्यातल्या या आणखी एका उत्तम पुस्तकाचे मन:पूर्वक स्वागत !

--- ००० ---

जवळिकीची सरोवरे – प्रज्ञावंत सखेसांगाती

संपादन – नीतिन वैद्य, प्र ० – डिंपल पब्लिकेशन.

हे पुस्तक म्हणजे मराठीतले प्रख्यात साहित्यिक त्र्यं. वि. सरदेशमुख यांनी वेळोवेळी केलेल्या नोंदींचे संपादन आहे. देशविदेशांतल्या अनेक लेखक-विचारवंतांबाबतच्या या नोंदी आहेत. सरदेशमुखांसारख्या विदग्ध आणि प्रगल्भ मनाबरोबर होणारी ही जागतिक मुशाफिरी नक्कीच वाचकाला समृद्ध करणारी आहे. मराठीतले जुनेनवे कवी-लेखक-विचारवंत आणि जगातलेही अनेक अद्वितीय लेखक-कवी-विचारवंत यांच्यांवरच्या या नोंदी अभ्यासक, लेखक, वाचक सर्वांनाच उपयुक्त, उद्बोधक ठरतील अशा आहेत. नीतिन वैद्य यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक घडवलेले हे काम आहे. एखाद्या महत्त्वाच्या लेखकाच्या लेखनाचा त्याच्या मृत्यूनंतर असा पाठपुरावा करून उभे राहिलेले हे एक अपवादात्मक काम आहे. सरदेशमुखांची आणि माझी ओळख-भेट गो. म. कुलकर्णी (माझ्या आत्याचे यजमान) यांच्या घरी दोनदा झाली होती. पाहताक्षणीच त्यांच्या व्यक्तिमत्वात ज्ञानाचा आणि तपस्येचा प्रभाव जाणवत असे. इतके शांत, विदग्ध, प्रगल्भ व्यक्तिमत्व मी क्वचितच पाहिलेले आहे. असेच एक मी पाहिलेले व्यक्तिमत्व म्हणजे मुंबई विद्यापीठात एके काळी इंग्रजीचे अव्वल प्राध्यापक म्हणून प्रख्यात असलेले प्रा. बॅनर्जी यांचे म्हणता येईल. (त्यांच्या ओल्ड इंग्लिशच्या एका एमेच्या पिरीयडला मी अनधिकृतपणे बसलो होतो !) सारांश म्हणजे हे पुस्तक मी त्या अत्यादराने आणि विनम्रतेने वाचले. नमून्यादाखल या पुस्तकातली मला आवडलेली एक खास नोंद खाली देत आहे ---

लुईजी पिरान्देल्लो, २८ जून.

अॅब्सर्ड नाटकांचा उदय दुसरे महायुद्ध संपल्यानंतरच्या काळात झाला हे खरे तरी त्याला पूर्वगामी अशा मानसिक आंदोलनांचे सुगावे त्याच्याही आधी पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाच्या चिमटीत असलेल्या वीसेक वर्षांतही जाणवतात. पिरान्देल्लो या काळातला नाटककार (१८६७-१९३६). आपल्या सिसिली प्रांतातील जन्मगावच्या आसपासच्या बोलीभाषेवर प्रबंध लिहून त्याने विशीतच डॉक्टरेट मिळवलेली. सिग्मण्ड फ्राईडचे लेखन वा मार्शल प्रूस्तच्या कादंबऱ्या येण्यापूर्वीच मानसशास्त्रीय विषय त्याच्या कथांमधून आले होते. त्याला निवेदनात्मक, वर्णनशील संहितांचा मोठा बेभरवसा होता. सुसूत्र, एकातून एक असे जीवन नसते, तर नाटक का तसे असावे, असा त्याचा दावा. लेखकाने कथानक ठरवून ठेवावे, ते सांगण्याचा हेतू मनाशी योजावा आणि पात्रांनी त्याला अनुसरून बोलावे यात पिरान्देल्लोला स्वारस्य नव्हते. माणसांचे स्वभाव सुसूत्र, सुबद्ध नसतात, त्यांची व्यक्तिमत्त्वे कधीच खरी एकसंध नसतात, तर नाटककाराने तशी रचना करावी हे किती फोल आणि विपरीत, असे त्याला वाटे. जाँ आनुई, सार्त्र यांच्या अस्तित्ववादी निराशेपासून युजीन आयनेस्को व सॅम्युएल बेकेट 'यांच्या अॅबसर्डिस्ट कॉमेडीपर्यंत पिरान्देल्लोच्या या विशिष्ट वृत्तीचा परिणाम गाभ्यातून जाणवतो. टी. एस. इलियटच्या ' रिलीजन्स वर्सेस ड्रामाज' वरही तो दिसून येतो. स्वतःची साहित्यकला आणि तत्त्वचिंतन याविषयी त्याने लिहून ठेवले आहे --

‘ आयुष्य मला उदासगर्भ विदुषकी वाटते. कारण सदाच एक मायावी वास्तव निर्माण करून आपण स्वतःची फसवणूक करीत असतो. आपल्या आत ही एक गरजच असते. हे वास्तव किती फोलकट आणि फसवे याचाही आपण वेळोवेळी अनुभव घेतो. हे सगळे का आणि कसे घडते याचे आकलन मात्र आपल्याला होत नाही. ‘ (quoted in ‘ All the world’s a stage ‘ by Ronald Harwood, Sacker and Warlsburg, 1984, p. 288).

पिरान्देल्लोच्या नाटकांवर त्यातील निराशागर्भ दृष्टिकोनामुळे प्रथम खूप टीका झाली. ‘ too cerebral ‘ म्हटले गेले. पण नंतर त्या बौद्धिक दर्शनाआड वाहती असलेली संवेदनशीलता व करुणा यांची टीकाकारांनी जात दाखवली.

सोलापूरच्या 'नाट्य आराधना' या संस्थेने पिरान्देल्लोच्या ‘ नाटककाराच्या शोधात सहा पात्रे ' (मराठी अनुवाद माधवराव वाटवे) या नाटकाचा प्रयोग राज्य नाट्य स्पर्धेत करून राज्यस्तरावर पहिले पारितोषिक मिळवले होते. संस्थेच्या रौप्यमहोत्सवानिमित्ताने १९९५ साली निघालेल्या स्मरणिकेत सरदेशमुखांनी या नाटकावर लेख लिहिला, त्यातला हा संपादित अंश -

पिरान्देल्लोच्या नाट्यकृती समकालीनांनी फार उत्साहाने स्वीकारल्या असे झाले नाही. त्याच्या वागण्या-बोलण्याचा कित्येकदा विपरीतार्थ निघाला आणि पिरान्देल्लो हा एक हृदयशून्य, विक्षिप्त मनुष्य आहे असे पाहिले गेले. मानवी बौद्धिकतेचे रूपांतर भावात्मकतेत कसे करता येते याचा प्रत्यय माझी नाटके आणून देतील असे विधान एकदा त्याने केले. त्याचा खूप गैरसमज झाला, लेखनावर पंडिती वादकौशल्याचे, गूढतेचे, हृदयशून्यतेचे शिक्के बसले.

या नाटकात एका कुटुंबाच्या अंतर्गत वाताहतीचे चित्रण येते. कुटुंबात घडते ते नेमके कशामुळे? घडले असे वाटते ते तेच की आणखी काही वेगळे ? शब्दांचाच नव्हे तर कृतींचाही एकच अर्थ असतो? माणसाच्या आयुष्याचे असे त्रांगडे कशाने होते? ते अनिवार्य आहे? की माणसांनी आपण होऊन ओढवून घेतलेली ती आपत्ती ? असे कितीतरी भेदक प्रश्न निर्माण होतात. काही नाटकाच्या श्रोत्यांना जाणवतील असे, काही पात्रांच्या तोंडून ऐकता येतील असे ... घडते ते भावनिक पातळीवर, त्याचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न होतो तो बौद्धिक पातळीवर. तो फसतो तेव्हा दोन्ही पातळ्यांना डावलून किंवा दोन्हींच्या संकरातून म्हणा फँटसीची एक पातळी निर्माण होते. या तीनही एकमेकात घुसतात तेव्हा नाटकभर एक चमत्कारिक गूढता वावरू लागते.

सत्य काय, त्याचा आभास म्हणतात तो कोणता ? त्यांना विलग करता येते काय ? आभासातून सत्याचा पडताळा घेता येतो काय? सत्यही आभास निर्माण करते तर ढळढळीत असत्य कशाला म्हणता येईल? की सत्य, असत्य असे निश्चयाने काहीच नाही? जगायला जे जे ज्या ज्या परिस्थितीत निकडीचे त्याचा अवलंब माणूस करतो; त्याला जगणेच इतके नामोहरम करते की या प्रकारच्या तात्विक समस्या जाणवल्या तरी त्या सोडवण्याची ताकद फार अल्प असते, त्यामुळे पारंपरिक सामाजिक मूल्ये आदरणीय किती, निषेधार्ह किती याचा निर्णय करण्यास तो असमर्थ ठरतो. नाटक आणि जीवन यांच्या सीमा कोठे विलग होतात ? त्यांना सुटे, निर्लेप कुठे पाहता येते? जीवनातील समस्यांचे दर्शन नाटक घडवते खरे पण ती ती समस्या त्या त्या पात्रापुरती ठाणबंद होते. ती प्रातिनिधिक वा खुद्द नाटककाराचीच जीवनसमस्या आहे असे कल्पिणे अत्यंत फसगतीचे व अकलात्म ठरते असे पिरान्देल्लोचे मत आहे.

‘ नाटककाराच्या शोधात..' मधील बाप ही खुद्द पिरान्देल्लोचीच प्रतिमा असल्याची टीका ऐकून त्याला आश्चर्य वाटले. एवढे खरे की वास्तव आणि त्याची जाण यात पत्नीच्या बाजूने असलेल्या तफावतीमुळे त्याचे कौटुंबिक जीवन विस्कटलेले होते. मुलीने आत्महत्येचा प्रयत्न केला. बायको पुढे मत्सराने वेडीपिशी झाली. पिरान्देल्लो या सर्वाने वेढला गेला. नाटकातला

बाप आपली बाजू मांडत असताना पिरान्देल्लोची प्रतिमा त्या पात्राआडून झळकत राहते असे प्रेक्षकाना वाटल्यास त्यात फारसे आक्षेपार्ह काही नसावे....

नाटकाचा नेमका शेवट काय होतो? त्या सहा पात्रांचे निर्गमन – आगमन शेवटच्या घटकेला कोणीकडे, कशाआडे होते? समोरच्या पात्रांची भासजीवने एका अस्तध क्षणात अकस्मात अंतर्धान पावतात, आभासाची एक ओहोट निर्माण होते. तिच्याने चक्रावलेला दिग्दर्शक रंगमंचावरून काढता पाय घेतो, प्रेक्षकही त्याचेच सहानुभवी होत नाट्यगृहाबाहेर निघतात, तेव्हा त्यांच्या मनात जाण भरून येते की चिंतनात खललेले एक नाट्य आपल्याला विचार करायला अवसर देत देत अनेक तात्त्विक व भावनिक समस्या आपल्यासमोर मांडून गेले.

पिरान्देल्लोचा आज जन्मदिवस..

(पान – १६४ ते १६६).

अशा अनेक श्रीमंत नोंदींनी हे पुस्तक भरलेले आहे. यावर मी काय लिहिणार ? हे एक छान संग्राह्य पुस्तक आहे एवढे मात्र इथे नोंदवून ठेवतो.

--- 000 ---

राहुल पुंगलियाच्या कविता । १ ।

कवी ० राहुल पुंगलिया, प्र ० वर्णमुद्रा.

या आधी पुंगलियांचा ‘ गावाबाहेर ‘ हा कवितासंग्रह प्रकाशित झालेला आहे. या कवीची ही एकूण कविता खूपच वेगळी वैशिष्ट्ये घेऊन समोर येते आहे. मराठी गद्य तर सोडाच, कवितेतही वास्तववाद आणि सलग अनुभवकथन यांचे अबाधित राज्यच चालू आहे. त्यामुळे, सुखदु:खवर्णन, वैचारिक दिशा, नैतिकवाला उपरोध आणि शक्य तो काही बोध एवढ्या वर्तुळात मराठी कविता नुसती वावरतच नाही तर आत्मतुष्टही राहते आहे. पुंगलियांची कविता हा पॅटर्न धुडकावून लावते. इथे जो वाचक वास्तवातली सलगता शोधू जाईल तो वणवण फिरून वैतागून जाईल. ही कविता एखादा अनुभव किंवा अमुक एक विषय अशी बंधने मानत नाही. काही ना काही निमित्ताने हिची निर्मिती प्रक्रिया सुरू होत असेल पण पुढे हिचा सगळा मुक्त संचार असतो. ही भौतिक वास्तवाची कविता नसून मानसिक वास्तवाची कविता आहे. ही कविता जाणवू-समजू शकते पण ‘ आता कळली ‘ अशी संपू शकत नाही. ही अमूर्त, मुक्त कविता आहे. पुंगलियांच्या या आधीच्या संग्रहावर मी लिहिले होते तेव्हाचा हा मजकूर इथेही प्रस्तुत ठरावा –

“ आधी न ठरवता मन मोकळे सोडून कविता लिहिली तर आपोआपच त्या कवीची स्वत:ची शैली निर्माण होते. मी आता प्रयोग करतो, वेगळी कविता लिहितो, असे म्हणून कुणी वेगळी कविता नाही लिहू शकत. जाणीव, नेणीव, स्वप्ने, भ्रम, कल्पना – ही मनाची सगळी आयुधे यात सामील होत असतात. हे जर एक कौशल्य म्हणून नव्हे तर एक सहज

लेखनप्रक्रिया म्हणून घडले तर त्या कवितेला एक नवीनता आणि ताजेपणा लाभत जातो. आंद्रे ब्रेटन हा अतिवास्तववादी कवी म्हणतो की मनाला असे पूर्ण खुले सोडावे एवढेच नव्हे तर कविता लिहून झाल्यावर कवीने त्याच्या व्यावहारिक हुशार मनाने तीत सुधारणा करत बसू नये. काही ठिकाणी खटकणे वा असंबद्ध वाटणे वा ठेचकाळणे घडते असे वाटले तरी ते तसेच असू द्यावे. थोडक्यात म्हणजे कवितेत आपल्या उथळ तर्काला थारा देऊ नये. राहुल पुंगलियांचा हा संग्रह वाचताना हे आठवले. ही कविता निर्माण होतानाच ' एका माहीत नसलेल्या भानातून ' येत असल्यामुळे कधी जुनी होत नाही. ती पुन्हा पुन्हा वाचली जाऊ शकते. आंद्रे ब्रेटनची शैली आता जुनी झाली, असे म्हणता येत नाही. कोणतीही चांगली कविता एक अज्ञाताचा स्पर्श घेऊन येत असल्याने ती कधीच पुनरावृत्ती नसते. मराठीत काहीजणांना असे म्हणायची आवड आहे की आता अतिवास्तववादाचा काळ संपला, आता मृषावाद (absurdism) संपला, वगैरे. माझ्या मते असे काही होत नसते. अभिव्यक्तीच्या सर्व पद्धती जिवंत असतात आणि तींतून पुढे नव्याही पद्धती निर्माण होत असतात. अमुक पद्धतीने कविता लिहिली जाणे ही काही एखादी फॅशन नसते. पुंगलियांची कविता ही या मार्गाने वास्तववादाचा किनारा सोडून देणारी आहे. माझ्या दृष्टीने हे या कवितेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. "

याशिवाय आणखीही काही वैशिष्ट्ये मी लिहिली होती ती अशी – " कुठल्याही टोळीचा सभासद असणारा वा पारितोषिकांसाठी हपापलेला कवी अशी कविता लिहू शकणार नाही. या कवितेचे उगमस्थान असते एकटेपणा. आत्मनिष्ठेतून येणारा निडरपणा. ' सामाजिक असणे ' याबाबतचा जो आग्रह मराठीत गेली काही वर्षे हैदोस घालत आहे त्याकडे पाठ फिरवणारा हा कवी आहे. या दृष्टीने या संग्रहातले पुंगलियांचे मनोगत वाचण्यासारखे आहे. -- साहित्यातून राजकारण करण्याच्या इच्छेमुळे साहित्य क्षुल्लक होत गेले -- असे ते म्हणतात. या बाबतीतले आणखीही काही मुद्दे त्यांनी कुणाचा मुलाहिजा न ठेवता मांडलेले आहेत. एखाद्या कवीने असे परखड ' मनोगत ' लिहिणे ही मराठीत क्वचितच घडणारी घटना आहे.

जगण्याच्या प्रक्रियांचे त्यांतल्या अनेक धाग्यादोऱ्यांसह समावेशक भान घेत जाणे हीच ज्या कवितेतली सर्जकता आहे तिला व्यक्तिगत हेतू वा उद्दिष्टे विचारण्यात अर्थ नसतो. कशासाठी लिहिली ही कविता ? कवीचा एखादा मूड वा त्याचे एखादे दु:ख, वा विचारसरणी वा नीतीबोध देणे – असे काहीच नाही ? व्यवस्था बदलाचे तरी नको उद्दिष्ट ? तर तसले इथे काहीही नाही. इथे कवी एक स्वायत्त वास्तव उभे करत जातो आणि त्यातून मानवी मनाच्या अनेक क्रियाप्रतिक्रियांचा आवाका घेत जातो. हे असे समावेशक भान हेच अशा कवितेचे अस्तित्वसमर्थन असते. ही कविता कवितेची अनेक आग्रही वैशिष्ट्ये झुगारून देणारी आहे. त्यामुळे, मला हा संग्रह विशेष स्वागतार्ह वाटतो. याचे मूल्यमापन होत राहील, तो प्रश्न वेगळा. पण आत्ता, आधी आपले पूर्वग्रह, आग्रह बाजूला ठेवून या कवितेला ' या बसा ' तरी म्हणणे महत्त्वाचे आहे. आणि नुसते एवढ्यावरच थांबावे अशी ही कविता नाही. आशयाच्या अनेक शक्यता खुल्या करणारी ही कविता आहे, हेही लक्षात घ्यायला हवे. "

या कवितांवर आधिक लिहिण्यापूर्वी ‘ आधी वंदू तुज मोरया ‘ म्हणून चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांना सलाम ठोकायला हवा. या पुस्तकासाठी त्यांनी काढलेले अमूर्त चित्र ही या कवितांची निर्मितीप्रक्रिया पुरेपूर व्यक्त करणारे आहे, असे मला वाटते. या कवितांच्या आशयद्रव्याशी एकजीव झालेले असे हे चित्र आहे. या चित्राची त्यांची निर्मितीप्रक्रिया असेल ती असो, मला काय जाणवते ते सांगतो. खाली गडद आहे ते अबोध मन असून वर ते फिकट होत सबोध होत येते. आणि या दोन्ही मनांच्या एकत्रीकरणातून ही कविता निर्माण होत आहे, त्यामुळे, ते उजवीकडचे रंग आणि आकार. ती कला आहे म्हणून तीत रंग आणि रचना आहेत. त्या रंगांना एक हलकीशी पण बेशिस्त अशी आऊटलाईन दिसते. ती अगदी आखीव वा बिनचूक नाही. थोडी सैल आहे आणि फार ठळक नाही. या कवितेचे ‘ असणे ‘ ही तसेच आहे. या आऊटलाईनची पांढरी हलकी रेषा वर बाहेरही उडालेली दिसते. म्हणजेच कवितेतल्या मटेरियलच्या बाहेरचा अवकाशही या कवितेच्या आशयात आहे. आणि हेच चित्र जरा वेगळ्या दृष्टीने पाहिले तर खाली रात्रीचा अंधार आहे, किंचित चांदण्याने तो वर प्रकाशाला आहे आणि आकाशात एक बारीक रेषेची चंद्रकोर आहे. या सर्व कवितांमधून या ना त्या प्रकारचे चंद्रदर्शन अनेकदा होते, हे इथे लक्षात घ्यावे. खालच्या गडद रंगाचा एक तुकडाही डावीकडे बाहेर उडालेला असणे हेही अवकाशाचा निर्देश करणारेच आहे. शिवाय तो तुकडा चित्राची एक परिपूर्णता निर्माण करतो, ते वेगळेच. आणि हे सगळे एक प्रकारच्या शांत, प्रगल्भ पार्श्वभूमीवर. शीर्षकातल्या १ च्या बाजूला असणारे पांढरे दंडही चित्राशी संवादी आहेत. या चित्राबद्दल विचार करत जावे तसे आणखीही बरेच दिसत जाऊ शकते. हे ‘ अमुक ‘ म्हणून कळणारे चित्र नाही, पण, रिच चित्र आहे. आता हे पाहून कुणी सहज याची कॉपी मारू शकेलही कदाचित पण हे सुचणे आणि ते असे अवतरणे हे खरोखरच सर्जकतेचे समृद्ध काम आहे. हे चित्र म्हणजे या संग्रहातल्या कविता कशा वाचाव्यात याचे एक गाईडच आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. तर, चंद्रमोहनजी, सॅल्यूट स्वीकारावा !

या कविता तशा काही वर्षांपूर्वी लिहिलेल्या आहेत, हे जाणवते. कारण इतकी मुक्त शैली असूनही यांत आधुनिक जीवनातले संदर्भ तसे थोडेच येतात. आणि तरीही, मराठीतली ही अत्यधुनिक कविता म्हणावी लागेल. कारण मराठी कवितेने स्वीकारलेल्या अनेक चौकटी नाकारणारी अशी ही कविता आहे. इथले कवी, लेखक, समीक्षक आणि वाचक सर्वांनाच ही कविता समजून घेणे अवघड जाऊ शकते. आपले दुर्बोध कवितेचे अध्वर्यू म्हणजे ग्रेस. तसे तर चित्रे, कोलटकर, आरती प्रभूही दुर्बोध म्हटले गेले आहेत. या कवितांमधली दुर्बोधता वेगळी आहे. इथे विषयाची एकरेषीय सलगताच सोडून दिली जाते. जगण्यातल्या आजूबाजूच्या अनेक गोष्टीही सुचवल्या जातात. आपले पूर्वग्रह, मते बाजूला ठेवूनच ही कविता वाचावी लागते. खरे तर प्रत्येक कविताच तशी वाचायला हवी. पण इथल्या कवितावाचनाच्या सवयी या, अनुभवाची सलगता, वैचारीकतेतला उपरोध आणि सौंदर्यास्वाद यांत बद्ध झालेल्या आहेत. या कवीने जसे मन मोकळे सोडून या कविता लिहिल्या आहेत तशाच त्या वाचायला हव्यात. जगात इतरत्र अशा मुक्त कविता लिहिल्या गेल्या असल्या तरी मराठीत हे सर्व वेगळे आहे. या दृष्टीने ही आपली अत्यधुनिक कविता ठरते. आणि ही साठोत्तरी कविता, ही नव्वदोत्तरी, ही उत्तरआधुनिक अशी लेबले लावून कविता वाचावी असे मला वाटत नाही.

हे सर्व विवेचन जरा आधिक स्पष्ट करण्यासाठी आता प्रत्यक्ष कवितांकडेच जाऊ. सुरुवातीला काही कवितांमधल्या मला आवडलेल्या ओळी पाहू –

बहुतेक कवी, आम्ही सोडून
हुशार आहेत
परिणाम साधून मोकळे होतात
तडक अर्थ मांडतात (पान १९)

डोळे मिटून जाण्यापूर्वी
पावले चालवत राहिलो
बघत राहिलो इथे तिथे
पण काही केले नाही
उरलो नाही कुठे (पान ७६)

गेलेले बरे येथून
म्हणजे काही उरणार नाही
वाटेत बाकावर,
चंद्र उरला जरी आकाशात डोक्यावर (पान ७६)

निघून जाताना
उघड्या डोळ्यांनी पाहण्याशिवाय काही होत नाही
सूर्यास्त होताना काही करता येत नाही तसे
तसे न बघताना होते. डोळे मिटून
आतूनच निघून जाते आपले मन
शरीराच्या हातात हात घालून
दरवाज्यावर डुलक्या घेणाऱ्या
वॉचमनसारखे
आपण तारवाटल्या नजरेने बघतो वर एकदा
नि परत दु:खाच्या थकलेल्या झोपेत निघून जातो आत
आत कोणी नसते आपल्याशिवाय
आपल्या समोरून

आतले कोणीतरी निघून गेलेले असते. (पान ७७)
विचार करत उदास होऊन जातील
निराश होऊन प्रेम करतील
स्फोट होऊन जग फुटलं तरी
माणसं हळूहळू वाळून पानांगत गळून जातील (पान १११)
लोकांना जसे घरदार असते
तसे मला हातपाय आहेत
मी डोळे मिचकावू शकतो
बागेतली झाडे मोजू शकतो (पान ११५)

वस्तू वा दृश्यांपेक्षा घटितांच्या वा वस्तुस्थितींच्या प्रतिमा घडणे हे एक वैशिष्ट्य इथे दिसून येईल. अनुभवापासून आणि स्वत:पासून दूरी हे आणखी एक वैशिष्ट्य. या वैशिष्ट्यामुळे या कविता भावनिक वा सुखदु:खांचे प्रभाव टाकणाऱ्या होत नाहीत. सांगीतिक लयीचीही इथे फिकीर नसल्याने या कविता गद्यसदृश वाटू शकतात, पण, त्यांतल्या सूचकतेमुळे आणि गूढतेमुळे त्यांतले काव्यतत्त्व नुसते अबाधित राहत नाही तर स्पष्ट होते. हे एखाद्या अनुभवाचे निवेदन वा आधीच ठरवलेल्या आशयाचे चित्रण नसून कवीच्या चिंतनशीलतेतून उत्स्फूर्तपणे येत जाणारे असे हे एका कलात्मक आणि सर्जक प्रक्रियेचे अवतरण होत जाणे आहे. इथे अमुक परिणाम साधणे वा अमुक अर्थ सांगणे हे नाही. किंबहुना जगण्यातल्या व्यक्तिगत निरर्थकतेलाच सामोरी जाणारी ही कविता आहे. आपलीच सत्यता संशयास्पद झाल्याने हे आपणच आपल्यातून निघून जाणे आहे. हे सर्व लक्षात घेऊन आता एकाच कवितेकडे पूर्णपणे पाहू. यांतल्या अनेक कवितांवर आस्वादात्मक असे खूप लिहिता येईल, पण, एकच कविता पाहू. मला या संग्रहातल्या पान क्रमांक ७५, ८१, ८४, १०४, १२५, १३६ आणि १५९ या कविता विशेष आवडलेल्या म्हणण्यापेक्षा पोचलेल्या आहेत, असे म्हणू. त्यांतली ‘ सरडा ‘ ही पान ८४ वरची कविता पाहू. ती अशी आहे --

सरडा

एक सरडा दिसतोय मोठा महत्त्वाचा
मॉनिटरच्या काचेआडून मला पाहणारा
अबोल सुचवतोय बाहेर काढायला
आत अडकल्यानं काचेत चेपून
तोंडही वळवू शकत नाहीये इकडे तिकडे

पण एका डोळ्याची उघडझाप करत बघतोय माझ्याकडे
एका सरड्यामुळे इतर प्रोग्रॅम अडकलेत कडेला
थांबलेत
उघडत नाहीत वाट बघतायत
मी सरडा काढण्याची
कुठून आत गेला मॉनिटरच्या सपाट पेटीत?
कोणास ठाऊक?
आत्मा तर नाही ना हा, परवा मी रस्त्यावर पाहिलेल्या
मृत सरड्याचा
पण आत्मा नाहीच हा
काचेचा डोळा स्वत:चा फिरवतोय सावकाश वर्तुळात
मॉनिटरच्या काचेलगत
नि सूक्ष्म वळते आहे शेपूटही जागच्या जागी
बाहेर कसा काढू ह्याला? की
शुक शुक केल्यासारखं
क्लिक करू माऊस दोनचारदा
मग निघून जाईल का?
सरडा निघेलच बाहेर कसातरी
जसा आत गेला तसा
ह्या सरड्याचे नाव काय?
हा मला ओळखतो का? ह्याला माझे नाव ठाऊक आहे का?
हा समोर थांबलाय
वाट बघतोय
मीही थांबतोय
मधून ट्रक निघून जातायत वारेमाप
वाळूचे, मिलिटरीचे इतरही कसले कसले अनेक
आमचा धीर सुटता कामा नये
मग सरडाही निघेल घट्ट काचेतनं बाहेर
मीही परत विचार करू लागेन

स्क्रीनवर दिसणाऱ्या शब्दांचा
सरड्याला भूक लागलीय का?
त्याला तहान लागलीय का?
त्याची मान अवघडलीय का?
मला नाही ठाऊक

या कवितेतले वास्तव हे आपल्या सबोध मनाला जाणवणारे सवयीचे वास्तव नाही आहे. हे अबोध मनातून, स्वप्नातून, भ्रमातून येणारे अनाकलनीय वास्तव आहे. हे कवितेतले सत्य आहे. आता या कवितेचे एक समजून घेणे मी इथे मांडत जातो आहे. असे समजून घेण्याचे अनेक मार्ग असू शकतील. आणि तरीही आशय बदलणार नाही कारण तो नकारात्मक आणि मटेरियल-निरपेक्ष आहे. सुरुवातीलाच या कवितेत म्हटले आहे की हा एक सरडा ' मोठा महत्त्वाचा ' दिसतो आहे. पुढचे वाचत जाताना कळते की ही मनाची कोंडलेली – अडकलेली अवस्था आहे. तो हलू शकत नसला तरी डोळ्याची उघडझाप करतो आहे. ही अवस्था दूरीभावाने पाहिली जात असल्यामुळे ती गंमतीची आणि भयानक, दोन्ही वाटत जाते. पाहिलेल्या एका मृत सरड्याची स्मृती असल्यामुळे हाही एक सरडाच वाटत असणार. मॉनिटरचा स्क्रीन आणि माऊस या आजच्या रोजच्या वापरातल्या वस्तू आहेत. हे मनही आजचे आहे. त्यामुळे ते ' आजच्या ' भाषेत दिसते आहे. हे लक्षात घेतले की पुढच्या अनेक ओळी समजत जातात. मग, ' मधून ट्रक निघून जातायत वारेमाप -- वाळूचे, मिलिटरीचे इतरही कसले कसले अनेक ' या अनपेक्षित ओळी येतात. वाहतूक, सैन्य, आणि इतर कसले कसले हे मानसिक साठे आहेत. हालचाल, संघर्ष, वगैरे. नंतर त्या सरड्याच्या त्रासदायक अवस्थेची कल्पना केली जाते पण शेवट ' मला नाही ठाऊक ' असा होतो. या दूरीभावावर ही कविता संपते. हा दूरीभाव हाच या कवितेचा आशय आहे. मनाच्या ' भ्रामक सत्याचे ' हे दर्शन आहे. हे पाहणे म्हणजे एक प्रकारे त्यातून दूर होणेच आहे. समजून घेण्याच्या कितीही मार्गांना आणि मनाच्या अनेक त्रासदायक अवस्थांना हा आशय स्पर्श करू शकतो. – या सगळ्यामुळे ही मराठीतली एक महत्त्वाची कविता ठरते. ही अपवादात्मक चिंतनशीलता आहे.

कुणी म्हणेल, ठीक, असेल, पण काय उपयोग काय याचा ? लिहिलीच कशाला ही कविता ? हिच्यामुळे कोणते परिवर्तन घडू शकेल ? यावर एवढेच म्हणता येईल की आपल्या चाकोरीबद्ध अशा ज्या मनामुळे विषमता आणि छळ हे निर्माण होतात त्याचे हे जिवंत भान घेणे आहे. ही प्रक्रियाच मूलभूत बदलाची ठरू शकते. सवयीच्या मनाचा सरडा कधी अशा अवस्थेतून सुटणारच नाही. विशेष म्हणजे ही इतकी गुंतागुंतीची कविता असूनही वाचकाला कुठल्या ताणात अडकवत नाही – उलट त्याला रिलॅक्स करते.

इथे मला ॲन सेक्सटन या महान कवयित्रीची ‘ अज्ञानाचा कवी ‘ (‘ The poet of ignorance ‘) ही कविता आठवली. त्या कवितेच्या, मी केलेल्या अनुसर्जनाच्या शेवटच्या ओळी अशा आहेत –

मी जसजशी अधिकाधिक प्रार्थना करत जाते
तसतसा तो खेकडा अधिकच करकचून पकडत जातो
आणि त्याची वेदना विस्तारत जाते.
पूर्वी माझे एक स्वप्न होते,
बहुतेक स्वप्नच होते ते,
ते असे की तो खेकडा म्हणजे
माझे देवाबद्दलचे अज्ञान आहे.
पण मी कोण स्वप्नांवर विश्वास ठेवणारी ?

यातल्या शेवटच्या ओळीवरून वाटते की कदाचित तीही त्या दूरीभावाची दिशाच सुचवते आहे का ? तिकडे मनाचा खेकडा होता, इकडे मनाचा सरडा आहे. दोन्ही ठिकाणी आपल्या अस्तित्वाच्या मुळाला भिडणे आहे ! हेच तर असते कलेचे उत्तुंग कार्य !

--- ००० ---

25-10-22.

बहुपेडी

ले ० गिरीश रांगणेकर. प्र ० सुनिधी पब्लिशर्स.

चित्र्यांच्या कवितेचे वर्णन मी ‘ जास्त जगण्याची कविता ‘ असे केले होते. म्हणजे तीव्रतेने, सर्वस्वाने जगणे, या अर्थी. माझा जुना मित्र गिरीश रांगणेकर याच्या जगण्याचे वर्णनही तसेच करावे लागेल. एकाच आयुष्यात हा किती आयुष्ये जगला वा जगतो आहे याची मोजदाद करणे अवघड आहे. त्यातही, आणखी एक वैशिष्ट्य असे की जे करायचे ते पूर्ण झोकून देऊन, आच आणि जिद्द यांसहच करायचे, ही पद्धत ! त्यामुळे, उपाहारगृह चालवणे, कुरियर सेवा चालवणे यांपासून ते नाटक, सिनेमा यांतली कृतिशीलता, मासिकाचे संपादन आणि मास कम्युनिकेशन मध्ये डॉक्टरेट मिळवून

त्यात प्राध्यापकी करणे, असे अनेक ‘ उद्योग ‘ त्याने केलेले आहेत. त्याचामाझा संबंध, विशेषत: त्याने ‘ व्यक्त-अव्यक्त ‘ हे मासिक चालवले तेव्हा आला होता. त्या मासिकाचे बारापंधराच अंक निघाले पण ते दर्जेदार म्हणावेत असे होते. त्या वेळी त्याच्या सहकारी मित्रांसह आम्ही अनेकदा भेटून चर्चा केल्या होत्या, आराखडे ठरवले होते.

गिरीशने त्याच्या या ‘ बहुपेडी ‘ जगण्याचे चित्र या पुस्तकातून सादर केलेले आहे. एरवी, नुसती कुणाच्या आयुष्याची माहिती वाचून करायचेय काय, असा विचार होऊ शकतो. पण, इथे, एक म्हणजे गिरीशने हे सर्व फार लांबड न लावता रंजकपणे सांगितले आहे आणि दुसरे म्हणजे, प्रत्येक बाबतीतल्या बारीकसारीक तपाशीलांची काळजी घेत कामे करत जाण्याची त्याची अपार मेहनत पाहणे हे अचंबित करणारे आहे. या प्रवासात, महाराष्ट्रात आपापल्या क्षेत्रात काही विशेष योगदान देणाऱ्या अनेक व्यक्तींशी त्याचा संबंध येऊन गेल्याचे पाहणेही ‘ खास ‘ वाटावे, असे आहे. कोणत्याही क्षेत्रात काही करू पाहणाऱ्या तरुणांना हे सर्व लेखन नक्कीच उद्बोधकही ठरू शकते. शिवाय या पुस्तकात नाट्य-चित्रपट कलावंतांच्या अनेक मुलाखती आहेत. प्रत्येक मुलाखत काही ना काही ' देणारी ' आहे. गिरीशचे स्वत:चे काही लेखनही यात आहे.

या पुस्तकातले लेखन म्हणजे, भरगच्च, भरघोस, समृद्ध जगणे म्हणजे काय, हे प्रत्यक्ष दाखवणारे, दिपवून टाकणारे असे एक धावते विश्वदर्शनच आहे !

--- चं. प्र. देशपांडे.

०२-११-२२.

" उद्वेगाची गोष्ट अशी की मराठीत आपल्या लेखनावर आपल्यालाच भाष्य करावं लागतं ! नाही तर कोणी करणार नाही. -
---- मराठीत सगळे बहिरे, मुके. "

--- विलास सारंग, ' सोलेदादशी प्रदीर्घ संवाद ', पान २४.

आर्वीकर : खानोलकर काय विशेष साधतात?

सारंग : खानोलकर आधुनिक लेखक तर होतेच, शिवाय अत्यंत संवेदनाक्षम होते. त्यांच्या 'अजगर' या कादंबरीचा अजूनही नीटसा अर्थ आपण लावू शकलेलो नाही. कॉन्शसच्या पलीकडचं काहीतरी त्यात आहे. मराठीत असं लेखन सर्वसाधारणपणे नाही.

आर्वीकर : खानोलकरांबद्दल असंही बोललं जातं की त्यांच्या कलाकृतींमधील आशयाला पेलू शकेल अशी बौद्धिक शिस्त-कुवत त्यांच्यात नव्हती- व्यक्तिश: मला त्यांचं 'एक शून्य बाजीराव' तर ग्रेट वाटतं.

सारंग : हो, हो, खरं आहे. आजवरची सगळी युद्धं या काठीबरोबरच झाली होती. याच्यापेक्षा आणखी 'इंटेलेक्च्युअल' काय असणार? कुठल्याही मराठी लेखकानं यातलं दहा टक्केसुद्धा केलेलं नाही.

त्यांच्या लेखनामध्ये अर्थांचे अनेक स्तर (मल्टिपल लेव्हल्स) असायचे. मराठी लेखक बरेच 'कॅलक्युलेटेड' लेखन करतात. खानोलकर तसे नव्हते. म्हणूनच काही वेळेला त्यांचं लेखन समाधानकारक नसतं. कारण त्यांचा जो मोठा प्रयत्न असतो, त्याचं नीटसं लेखनांतर्गत व्यवस्थापन ते करू शकत नव्हते.

आर्वीकर : म्हणजे असं तुम्ही सुचवताय की अनेकजण ज्या वाटेनं गेलेही नाही, त्या वाटेवरचं काहीतरी खानोलकर शोधत होते?

सारंग : हो आणि बरेचदा ते त्यांनाही समजायचं नाही की यातून आपण काय साधतोय. काही अंशी हे शेक्सपियरसारखं आहे. त्यानं केलेल्या सगळ्या गोष्टी त्याला स्वतःला कळल्या नव्हत्या.

----- ' सोलेदादशी प्रदीर्घ संवाद ' -- पान २९.

‘ सोलेदाद ‘ शी प्रदीर्घ संवाद

ले ० संजय आर्वीकर , प्र ० वर्णमुद्रा पब्लिशर्स.

हे १२० पानी पुस्तक म्हणजे एक ज्ञानाची खाणच आहे. संजय आर्वीकरांनी घेतलेल्या विलास सारंग यांच्या मुलाखतींचे हे पुस्तक आहे. या मुलाखती कुणा हौशी मुलाखतकाराने घेऊन चालणारच नव्हते. आर्वीकरांनी सारंगांच्या लेखनाचा खूप विचक्षणपणे अभ्यास केलेला आहे हे पानापानावर जाणवते. दोघेही श्रीमंत वाचक, अभ्यासक आणि चिंतक आहेत. पुस्तकाच्या अखेरच्या भागात आर्वीकर म्हणतात, “ तुमच्या सहवासात माझी एक विश्ववेधी संवादयात्रा झाली. “ हे अक्षरश: खरेच आहे. आर्वीकरांचा हा प्रश्न बघा – “ बेकेटच्या ‘ वेटिंग फॉर गोदो ‘ या नाटकात हास्यरसाला भरपूर वाव आहे. उत्तरोत्तर बेकेटची नाटकं निखळ शोकात्म, गांभीर्यानं गारठलेली होतात, याचा समाधानकारक अन्वय लावण्यात आला नसल्याचं तुम्ही बेकेटवर लिहिलेल्या लेखात म्हटलंय. आज तुम्हाला याचा काही अन्वय लागतो का ? “ (पान १०८) -- अशा अनेक चिकित्सक प्रश्नांनी हे पुस्तक भरलेले आहे. किंवा “ हो. तुम्ही एखादी तत्त्वप्रणाली स्वीकारली की तिच्या मर्यादा तुमच्या लेखनात येतातच. “ (पान १०८) – अशी सारंगांची मौल्यवान वाक्ये यात जागोजाग आहेत. मी इथे फेसबुकवर खालील भागावर चर्चा घडवून आणल्या होत्या –

" उद्वेगाची गोष्ट अशी की मराठीत आपल्या लेखनावर आपल्यालाच भाष्य करावं लागतं ! नाही तर कोणी करणार नाही.

----- मराठीत सगळे बहिरे, मुके. "

--- विलास सारंग, ' सोलेदादशी प्रदीर्घ संवाद ', पान २४.

आर्वीकर : खानोलकर काय विशेष साधतात?

सारंग : खानोलकर आधुनिक लेखक तर होतेच, शिवाय अत्यंत संवेदनाक्षम होते. त्यांच्या 'अजगर' या कादंबरीचा अजूनही नीटसा अर्थ आपण लावू शकलेलो नाही. कॉन्शसच्या पलीकडचं काहीतरी त्यात आहे. मराठीत असं लेखन सर्वसाधारणपणे नाही.

आर्वीकर : खानोलकरांबद्दल असंही बोललं जातं की त्यांच्या कलाकृतींमधील आशयाला पेलू शकेल अशी बौद्धिक शिस्त-कुवत त्यांच्यात नव्हती- व्यक्तिश: मला त्यांचं 'एक शून्य बाजीराव' तर ग्रेट वाटतं.

सारंग : हो, हो, खरं आहे. आजवरची सगळी युद्धं या काठीबरोबरच झाली होती. याच्यापेक्षा आणखी 'इंटेलेक्च्युअल' काय असणार? कुठल्याही मराठी लेखकानं यातलं दहा टक्केसुद्धा केलेलं नाही.

त्यांच्या लेखनामध्ये अर्थांचे अनेक स्तर (मल्टिपल लेव्हल्स) असायचे. मराठी लेखक बरेच 'कॅलक्युलेटेड' लेखन करतात. खानोलकर तसे नव्हते. म्हणूनच काही वेळेला त्यांचं लेखन समाधानकारक नसतं. कारण त्यांचा जो मोठा प्रयत्न असतो, त्याचं नीटसं लेखनांतर्गत व्यवस्थापन ते करू शकत नव्हते.

आर्वीकर : म्हणजे असं तुम्ही सुचवताय की अनेकजण ज्या वाटेनं गेलेही नाही, त्या वाटेवरचं काहीतरी खानोलकर शोधत होते?

सारंग : हो आणि बरेचदा ते त्यांनाही समजायचं नाही की यातून आपण काय साधतोय. काही अंशी हे शेक्सपियरसारखं आहे. त्यानं केलेल्या सगळ्या गोष्टी त्याला स्वतःला कळल्या नव्हत्या.

----- ' सोलेदादशी प्रदीर्घ संवाद ' -- पान २९.

सारांश, मराठीतले हे एक मौल्यवान आणि संग्राह्य पुस्तक आहे.

--- ००० ---

चतुर – कादंबरी

ले ० प्रणव सखदेव, प्र ० रोहन प्रकाशन.

पाठपानावर लिहिले आहे –

तर ही गोष्ट आहे तशी साधी –

मरणाची ... आठवणींची ... प्रेमाची ... बालपणाची ...

वयात येण्याची ... मोठं होण्याची ... तिची ... त्याची ...

आणि

काडेपेटीत अडकलेल्या एका चतुराची ... !

--- ती काडेपेटी म्हणजे आहे प्राणघातक आजाराची वस्तुस्थिती आणि प्रेम म्हणजे आहे, हे माहीत असूनही हट्टाने लग्न करणाऱ्या जगावेगळ्या प्रेयसीची. प्रणव आणि रमाची. ती म्हणते, “ मला तू जसा होतास तसाच आवडत होतास. तुझ्या बाजूचं मला माहीत नाही. पण माझ्या बाजूने आपल्यात काहीतरी जुळून आलं होतं. मला तेवढंच हवं होतं. मला नको होतं आणखी काही.

बरं झालं नाही झाली आपली गाढ ओळख ... बरं झालं, आपण एकमेकांना फार फार समजून घेतलं नाही ते ... नाहीतर आता मला तुझ्याबद्दल जे काही आकळतंय, ते आकळणं घडलंच नसतं ... " नुसत्या या एवढ्या छोट्या मजकूरातही हा संबंध किती जगावेगळा आहे याचे अनेक आयाम दिसू शकतात. तर अशा पार्श्वभूमीवरची ही ' साधी गोष्ट ' आहे ! आणि घडायचे ते घडून गेल्यावर आता ही पूर्ण गोष्ट आपल्यासमोर येत आहे ! ओळखही ' पूर्ण ' नाही पण ट्यूनिंग असे जुळलेले की बाकी सर्व तपशील अनावश्यक वाटावेत !

या गोष्टीत प्रणवचे बालपण, किशोर वय, वयात येणे, हे सगळे येत जाते. प्रणवला वर्गातली एक मुलगी प्रचंड आवडणे इतक्या ' बारकाईने ' येते – " मल्लिका मुलींच्या दुसऱ्या म्हणजेच मधल्या रांगेत तिसऱ्या बाकावर बसायची. त्यामुळे तो तिला दोन-तीन मुलींच्या मधून कोणाच्या फार लक्षात येणार नाही, असं पाहायचा. तिला माहीतही नसायचं. तो मात्र तिला नीट न्याहाळायचा, तिचे सगळे हावभाव, हालचाली टिपून घ्यायचा, जसं की बाई आल्या की, एकसाथ नमस्ते करायला उभी राहायची, तेव्हा ती कुडत्याची मागची – ढुंगणाकडची बाजू ओढून नीट करायची. हसत हसत नमस्ते म्हणायची. पुन्हा खाली बसताना बाकावर काही नाहीये ना हे पाहून बसायची. मग बाकाखालून त्या त्या तासाची वही आणि पुस्तक काढायची. मध्येच ओठांवर ओठ दाबून लिपस्टिक सारखी करायची, कधी हाताने केस सारखे करायची. एखादा प्रश्न विचारला की, नेलपेंटने रंगवलेलं नख दोन दातांच्या मध्ये धरून विचार करायची. मग उत्तर सुचलं की, तेच बोट वर करायची. मग त्याला मनातल्या मनात गुदगुल्या व्हायच्या, हसू यायचं. तिच्या अशा कितीतरी गोष्टी, लकबी, अदा जपून ठेवल्या त्याने मनात. चॉकलेटची चांदी किंवा पिंपळाचं जाळीदार पान वहीत जपून ठेवतात तसं – " (पान ११२.)

कुठेही अतिनाट्यात्म वा मेलोड्रॅमॅटिक न होता ही गोष्ट निवेदन होत राहते. मध्येच अचानक असे खोलातले काही येते – " आत्ता आपण पूर्ण अनोळखी असूनही एकमेकांशी बोलतो आहोत याचं कारण ही पोकळी हेच आहे. आपण प्रवासात गाणी ऐकतो, व्हिडिओ पाहतो किंवा पुस्तकंबिस्तकं वाचतो, ते या पोकळीचं अस्तित्व दूर सारण्यासाठीच. बाकी काही नाही. आपण आपलं जवळजवळ सगळं आयुष्य ही पोकळी दूर सारण्यासाठीच खर्च करत असतो. " (पान १३५-६).

या कादंबरीत प्रणवची गोष्ट, त्याचे काही लेख, रमाने वाढवलेला काही मजकूर असे येत राहते. या दृष्टीने लेखनातला हा एक प्रयोग म्हणता येईल. पण, मुख्य वैशिष्ट्य हेच म्हणावे लागेल की अकल्पनीय पार्श्वभूमीमुळे साध्या रूटीन, म्हटले तर सपक बाबींना येत जाणारी शोकात्मता.

कसलेही अवडंबर न माजवता सांगितलेली ही गोष्ट एक अजब प्रेमकहाणी आहे.

--- ००० ---

२०-१२-२२ पर्यंत आले.

कविमित्र हेमकिरण पत्की याने

कविमित्र Ramchandra Kadam याच्या सभासद या मराठीतल्या सर्वोत्कृष्ट कवितेवर केलेलं निरूपण

हे निरूपण आजच्या तरुण भारत मध्ये प्रसिध्द झालं आहे .

सभासद

भविष्याची दैवी अनपेक्षितता अंगातून चमकून गेली
साक्षात्काराप्रमाणे, संगीताप्रमाणे.
संगीताप्रमाणे अस्तित्वाचं प्रवाही लावण्य मला जाणवलं
आणि त्याची स्वयंसिद्धता;
निराकार वस्तूंना लाभत राहणाऱ्या
अनपेक्षित घनतेसारखी.
मी पाहिला भविष्याच्या अनपेक्षिततेचा निरोगी हात,
घटनांची सघन शिवण करताना.
आणि त्याची सर्जक किमया,
वर्तमानाच्या ओसाड फांद्यांतून,
अनपेक्षित पर्णमयता नांदविताना.
आता अनुक्रम जाणवणार नाही, सूर्योदयासारखा.
सूर्यप्रकाशाचा सतत नवीन पदार्थ आता
आणि वस्तूंची ताजी कठीणता.
आता मी सभासद झालो,
अनपेक्षिततेच्या सृजनशील व्यवस्थेचा.

रामचंद्र वामन कदम

सभासद / रामचंद्र वामन कदम

प्रत्येक व्यक्तीचा 'मी' जसा विचार करतो तसा निसर्ग असतो का? निसर्गाचं स्वरूप, त्याची व्यवस्था व्यक्तीच्या विचार - जाणिवांएवढी असते का? निसर्गाच्या विकसनाचं सकंल्पन-चित्र एखादा कलावंत काढू शकतो का? आणि जरी काढलं तरी निसर्गातल्या घटकाचं अमाप जिवंतपण रंगाकारात उतरू शकतं का? एखादी कविता आपण निसर्गकविता आहे असं म्हणतो तेव्हा तिच्यातील शब्द निसर्गातील चेतनेचे सार्थ निदर्शक असतात का? चित्राएवढं, कवितेएवढं निसर्गरूप असतं का? या अशा प्रश्नांनी अस्वस्थ होऊन एखादा चिंतनशील कवी निसर्गातील सृजन व्यवस्थेचा खरा साक्षीदार होतो तेव्हा व्यक्तीच्या निर्माणशीलतेचा अर्थ खूप वेगळ्या रीतीनं व्यक्त होतो.

रामचंद्र वामन कदम यांची 'सभासद' ही कविता मनाच्या प्रक्षेपणापलीकडं जाऊन अस्तित्वाच्या सृजनव्यवस्थेचं चिंतन करते. या त्याच्या चिंतनाला मानवाच्या विचारकक्षेपल्याडच्या निसर्गाची गती आहे. केवळ अपेक्षेतून निर्माण झालेला भावकोश आणि इच्छेचं केंद्रच नसलेलं संपूर्ण असतेपण यातलं अंतर ही कविता आपल्या वेगळ्या मांडणीतून

वाचकांसमोर ठेवते. एका विराट सत्याचा, सुंदराचा अनुभव आत्मबोधाच्या स्थितीतून व्यक्त करण्यासाठीच तिची मांडणी इथं झाली आहे. या कवितेतले 'दैवी अनपेक्षितता', 'प्रवाही लावण्य', 'निरोगी हात', 'ताजी कठीणता' सारखे शब्द प्रयोग तथाकथित आधुनिकतेच्या आणि नवीनतेच्या अभ्यासातून येत नाहीत. ते कवितेच्या आंतर-संगतीचा एक अविभाज्य घटक म्हणून येतात. म्हणूनच या कवितेचं रसग्रहण शब्दकळा, प्रतिमा, संवेदनेची जातकुळी, विषयाचं वेगळेपण, तिची वर्तमानकालीन उपयोजिता असं स्थूल वर्गीकरण करून करता येण्यासारखी नाही. अर्थवान कविता ही एकात्म संवेदनेचं मूर्त जाणीव-रूप असते. कदम यांची ही कविता सृजनाच्या साक्षात्काराचं असंच एक जाणीव-रूप आहे.

कवितागत 'मी' ला एक साक्षात्कार होतो. मनानं निर्माण केलेल्या अपेक्षांच्या जगाची निरर्थकता त्याला उमजते. आणि त्याला मनापलीकडचं एक विशाल जग लख्ख दिसू लागतं. ते मानसिक काळाला ओलांडून अनपेक्षिततेतलं दैवीपण अनुभवात आणणारं असतं. आपल्या हातात नसलेल्या साऱ्या घटना-प्रसंगांची घटितं, जगण्यातली अनिश्चितता, मानसिक सुरक्षितता यांच्यापलीकडं हे दैवीपण 'मी' ला घेऊन जातं. आता 'मी' साठी अनपेक्षितता ही मन मोडणारी गोष्ट म्हणून राहत नाही. पुढच्या क्षणाला इच्छेसारखं की इच्छेविरुद्ध घडणार या त्याच्या धारणेची भूमीच बदलते. संपूर्ण इच्छाशक्तीचंच रूपांतरण होतं. 'मी' च्या जाणिवेला समग्रतेचं अवकाश लाभतं. आपलं असणं हे अंतःसंगीताची परिवर्तनशील लय असलेलं आहे. त्याची सुंदरताही स्थितिशील नाही; ती प्रवाही आहे. असं 'मी' च्या अनुभवास येतं. 'मी' ला जाणवतं की, अस्तित्वाची ही लय, ही सुंदरता कुणा माणसाच्या हातानं केलेलं सृजन नाही. अशा अस्तित्वाची मूळ व्यवस्था हा 'मी' अपेक्षेच्या परिप्रेक्ष्यातून पाहू शकत नाही. त्याच्या भविष्याला अनपेक्षिततेचं परिमाण लाभतं. 'मी' पाहतो या अनपेक्षिततेच्या निरोगी हातांनी घडवलेलं अद्भुत सृजन. दोन घटनांमधला मनानं प्रक्षेपित न केलेला सांधा त्याला कळतो. सृजनसंभवाचं अमर्याद अवकाश त्याला इथंच दिसतं. वर्तमानाच्या ओसाड फांद्यांतून अनपेक्षित पर्णमयता नांदविणारं. शून्यतेतून सळसळणारं. कवितागत 'मी' साठी केवळ हाच सृजनानुभव असतो. दृष्टीचं, जाणिवेचं संपूर्ण रूपांतरण करणारा.

'मी' या सृजनानुभवानं कमालीचा आश्वस्त होतो. आता रोजचा सूर्य नित्यनूतन असेल. त्याच्या उगवण्या-मावळण्यातलं कालावकाश तेच ते असणार नाही. दृश्य पदार्थ कालचा असणार नाही. उजेडल्या दृष्टीला वस्तूंची कठीणताही शिळी आहे, असं जाणवणार नाही. जडतेलाही चेतना सहज आपलंसं करील. अपेक्षेच्या भावकोशाबाहेर विनाप्रयास बाहेर गेलेलं मन निसर्गातल्या झाडां-पाखरांसारखं झाल्याचा अनुभव 'मी' ला येतो. मनापलीकडचं अनुभवाला आल्यावरच 'सृजन' घडतं, असा अर्थपूर्ण निर्देश ही कविता करते. आणि वाचकही कवितागत 'मी' सारखाच अनपेक्षिततेच्या सृजनशील व्यवस्थेचा 'सभासद' होतो.

हेमकिरण पत्की

(13-06-21 ची लाख्यांची रिपोस्ट). – 23-12-22.

धन्यवाद, मित्रवर्य चंद्रमोहन !

@ पूर्व नोंदणी करणारे मित्रहो

@ प्रकाशित झाल्यावर घेणारे मित्रहो

— दोघांनाही आश्वस्त करतो आहे की, लवकरच

।आवर्तने — चं.प्र.देशपांडे।हे पुस्तक उपलब्ध करून देत आहे.

किंमत ₹ 450/-

पूर्वनोंदणी ₹ 375/-

संपर्क : 86249770290 पुस्तकवाला ॲण्ड कंपनी पुणे

9923724550

वर्णमुद्रा पब्लिशर्स शेगाव

।। प्रकशनपूर्व नोंदणी ।।

आवर्तने: कविता, आशय, आकलन । लेखक: चं. प्र. देशपांडे

पृष्ठ संख्या: २४०+

बांधणी: हार्डबाउंड

मूळ किंमत: ₹४५०/- । विशेष सवलतीत: ₹३७५/- (टपाल खर्चासहित)

एक गोष्ट मी स्पष्ट करू इच्छितो. साठोत्तरी, नव्वदोत्तरी, आधुनिक, उत्तरआधुनिक, असे कप्पे लक्षात घेऊन मी इथे लिहिणार नाही. एक वाचक म्हणून कविता समजून घेणे, असे त्याचे स्वरूप असेल, एक विद्वान अभ्यासक म्हणून नव्हे. कवितेचा वाचकाशी होणारा संपर्क हा अभ्यासाच्या बौद्धिक स्तराचा असणे हे मला कविता आत्मसात होण्यातला अडथळा वाटते. कवितेत अमुक इझम्स असतात असेही मी गृहीत धरणार नाही. कवी हा बाहेर, व्यवहारात कोणत्याही विचारसरणीचा असो, प्रत्यक्ष कविता लिहिताना त्याने ती वैचारिक चाकोरी वा आकलन-मर्यादा सोडलेली असू शकते. कवी हिंदुत्ववादी आहे की कम्युनिस्ट आहे याचा कविता वाचनात संबंध आणू नये. असे दिसून येते की कवितेच्या आधी कवीचेच वाचन व मूल्यमापन केले जाते. हे पूर्णतः चुकीचे आहे. कवीची विचारसरणी, त्याची नैतिकता, तो कर नीट भरतो की नाही, या गोष्टींची माहिती वाचकाने मुळीच डोक्यात ठेवायची गरज नाही. हेच जरा पुढे नेऊन असेही म्हणता येते की कवितेतला मी आणि स्वत: कवी हे एकच असे समजणेही चुकीचेच आहे. ते प्रत्यक्षात एकच असले तरीही कविता लेखनाच्या सर्जक प्रक्रियेत तो कवी व्यवहारातली एक व्यक्ती म्हणून तिथे उपस्थित नसतो.

आवर्तने (कविता-आशय-आकलन)

(मर्ढेकर ते मन्या जोशी)

•सामान्यत: अलीकडची बरीच मराठी कविता ही खुजी आहे असे मला जाणवत होते. नुसते ज्ञानेश्वर, तुकाराम थोडेफार अभ्यासल्यामुळेच नव्हे तर जगातलेही अनेक कवी वाचल्यामुळेही.

•आपल्याकडे वा जगभर कवितांच्या अनेक व्याख्या केल्या गेलेल्या आहेत. प्रत्येक विचारवंत वा कवी हा त्याला महत्त्वाची वाटणारी गुणवैशिष्ट्ये घेऊन या व्याख्या सांगतो, हे तर उघडच आहे आणि समजण्यासारखेही आहे. तरीही त्यातले काळाच्या ओघात महत्त्वाचे ठरलेले कवी काय म्हणताहेत हे दुर्लक्षिता येणार नाही. प्रामाणिकपणा सगळ्यांचाच गृहीत धरला तरी माझ्या आकलनातून मला काय वाटते ते मांडावे, असे मला वाटत होते.

•समीक्षकांनी आणि उपपत्तिकारांनी या बाबतीत मांडलेले विचार लक्षात घेऊन मराठी कवितेबद्दल काय बोलता येईल, असे विचार मनात येत होते. कलेत हे असे सामान्यीकरण फसवे असते हे तर मान्यच करावे लागते. दोनचार कवितांच्या जोरावर काही कवी अमर झालेले दिसतात, हेही लक्षात घ्यावे लागणारच. त्यामुळे, एका एका कवीचे – त्याच्या पूर्ण काव्यलेखनाचे मूल्यमापन करावे लागेल का, असा प्रश्न आला. मी स्वत: निरनिराळ्या नोंदी ठेवणारा अभ्यासक नाही, हे एक आणि दुसरे म्हणजे या कामाला मी वेळ किती देणार आहे, हेही प्रश्न समोर आले. मी स्वत:ही थोडाफार कवी, नाट्यलेखक असल्याने मला ते अधिक महत्त्वाचे वाटणार हे तर सरळच होते.

या सगळ्यातून हळूहळू मनात मार्ग असा ठरत गेला की असंख्य खुज्या कविता घेऊन त्यांचे खुजेपण दाखवत बसण्यापेक्षा प्रत्येक कवीच्या, सापडतील त्या, एकदोन चांगल्या कवितांवर लिहीत जावे.

•ही पद्धत चांगली वाटली. मी काही मराठी कवितांचा पूर्ण आढावा घेण्याची जबाबदारी घेतच नाही आहे. मला सहज उपलब्ध झालेले काही कवी मी इथे घेतले आहेत.

•इतर कवींच्या बऱ्याच कविता चांगल्या असूही शकतील. त्यांची आणि माझी दोघांचीही झाकली मूठ राहू शकणे हा एक यातला दिलासा म्हणायचा. मुख्य हेतू मी कोणत्या कवितांना चांगल्या म्हणतो ते व्यक्त व्हावे हाच तर आहे. सारांश म्हणजे या कामासाठी इथे निवडलेले कवी वा त्यांच्या कविता यात कोणतीही कंपूगिरी वा टोळीबाजी नाही. शिवाय, इथे मी एखाद्या कवीच्या एकदोन कवितांवर बोलतो आहे याचा अर्थ त्या त्या कवीच्या सगळ्याच कविता मला चांगल्या वाटतात असे नाही. मी वा मला वाटणे याच पद्धतीने मी लिहिणार आहे. हे स्वत:चे महत्त्व सांगण्यासाठी नसून आधीच नम्रपणे माझी मर्यादा स्वीकारणेही आहे. हा मुखवटा मी स्वीकारत असलो तरी जे लिहिणार ते माझ्या निर्भेळ आकलनाचेच असणार, हेही अर्थात आहेच. पण, काहीतरी सनसनाटी काम करावे असा मात्र यात विचार नाही. एखादा विद्रोह वा क्रांती मांडण्यासाठी हे नाही. एका मराठी माणसाच्या मेंदूने केलेले हे एक आत्मचिंतन आहे, असे म्हणायला हरकत नाही. तरीही, या निमित्ताने कवितेकडे पाहणे, ती वाचकाला पोचण्याची वा समजण्याची प्रक्रिया अशा अंगाने काही बोलायचा विचार आहेच. निदान नव्या कवींना आणि वाचकांना तरी ते इंटरेस्टिंग वाटेल असे वाटते.

— चं.प्र.देशपांडे

"आवर्तने (कविता आशय आकलन)" हे मनोज पाठक यांच्या वर्णमुद्रा प्रकाशनाने प्रकाशित केलेले, चं. प्र. देशपांडे यांनी अगत्याने सस्नेह पाठवलेले नवीन पुस्तक काल घरी आले.
वर्णमुद्राच्या इतर सर्वच पुस्तकांप्रमाणे उत्तम निर्मितीमूल्य हे या पुस्तकाचेही वैशिष्ट्य आहेच. चंद्रमोहन कुलकर्णी यांनी केलेले पुस्तकाचे मुखपृष्ठ हे एक व्यापक व सखोल पेंटिंग आहेच तसेच ते आधुनिक मराठी कवितेतील विविध विषय, प्रतिमा, प्रतिके यांचे निदर्शकही आहे.
या पुस्तकात बा. सी. मर्ढेकर ते मन्या जोशी अशा आधुनिक मराठीतील एकूण ३६ कवींच्या काही निवडक चांगल्या कविता निवडून त्यांवर चंप्रंनी आपले आकलन मांडलेले आहे.
त्याचबरोबर ९० पृष्ठांच्या प्रदीर्घ प्रस्तावनेतून चंप्रंनी मांडलेले आधुनिक मराठी कवितेसंदर्भातील सखोल चिंतनात्मक आकलन अभ्यासकांसाठी निश्चितच उपयुक्त व महत्त्वपूर्ण ठरेल.
या प्रस्तावनेत सुरुवातीलाच चांगली कविता म्हणजे काय याविषयी त्यांनी मांडलेली निरीक्षणे (पृष्ठ क्र. ११ ते १३) पुढीलप्रमाणे – (गिरीश पतके)
---0 ---

सात गोष्टींचं पुस्तक
ले 0 प्रशान्त बागड . प्र 0 – पपायरस.

हा बागडांचा दुसरा कथासंग्रह आहे. यापूर्वी, ' विवादे विषादे .. ' या त्यांच्या कथासंग्रहावरही मी लिहिले होते. हा गंभीरपणे लिहिणारा मराठीतला एक महत्त्वाचा लेखक आहे यात शंका नाही. तेज बुद्धी आणि कवीची फ्री संवेदनशीलता असलेला असा हा एक विशेष लेखक आहे. त्या आधीच्या संग्रहावर लिहिताना, बागडांचा अनपेक्षित असा वेगळा बाज आणि विषयाच्या लिंकपेक्षा अमर्याद अभिव्यक्तीला महत्त्व देणारी शैली यांबद्दल मी लिहिले होते. इथेही तोच प्रकार आहे, पण, वेगळा. आता या कथा मला नीट पोचताहेत का याबाबत मीच संभ्रमात आहे. तरीही, इथे, थोरामोठ्यांनी घालून दिलेल्या परंपरेप्रमाणे, आपल्याला जे नीट कळत नाही त्याची टिंगल करायची वा त्यावर किरकोळ शेरेबाजी करून पळून जायचे, असे मी करणार नाही. हा लेखक ज्या अर्थी काही वेगळे आणि म्हटले तर ' अवघड ' ही काही करतो आहे तर ते समजून घेण्याचा मी प्रयत्न केला पाहिजे, असे मला वाटते. या गोष्टी ' बाहेरून येतात आणि इथे आकाराला येतात ' असे बागड म्हणतात. गोष्ट म्हणजे कथानक, सलग पात्रे, असे झाले मग असे झाले, आणि या प्रकारात हे सगळे अमुक अमुक घटनांतून गेले – अशी सवयीची पठडी या कथा पाळत नाहीत.
यातली पहिलीच कथा ' सिद्धी ' घेतली तर, त्याला एक खून करायचा आहे, त्यासाठी तो तिची निवड करतो आणि ती त्याला तयार होते – अशी सुरुवात आहे. त्याला खून का करायचा आहे, ती तयार का होते, या प्रकारात कुठलाच ताण वा भयानकता कशी नाही – हे प्रश्न इथे अप्रस्तुत ठरतात. सलगता आणि कारण-परिणाम या पद्धतीने ही कथा वाचता नाही

येणार. एकूणच मला असे दिसते की या कथा कविता समजूनच वाचाव्या लागतील. हे पाहिले की इथे वाद सुरू होतील – मग यांना कथा का म्हणावे ? आणि अशा कथेसारख्या पद्धतीने लिहिलेल्या मजकूराला कविता तरी कसे म्हणता येईल ? बरे, याला ललित लेखही नाही म्हणता येणार ! मग काय, फेटाळून लावायचे ? आपल्याला सुरुवातीला निदान एखाद्या लेखकाचे गांभीर्य आणि माध्यमात तो घेत असलेले स्वातंत्र्य हे काहीतरी महत्त्वाचे आहे, एवढे तरी जाणवायला हवे.
आता, ‘ माश्या न मारणाऱ्याचे अनुभव ‘ ही एक विचित्र नावाची कथा बघा. शीर्षकातच, माश्या मारणे वा न मारणे या फालतू गोष्टीला महत्त्व दिलेले दिसते ! त्यावरून एकूण कथेच्या ऐवजाची कल्पना येते. या कथेच्या पहिल्या उताऱ्यात वाक्य येते, “ कालही रस्त्याने चालता चालता मी कथेच्या मागे मागे गेलो होतो. “ या कथेचे शेवटचे वाक्य आहे, “ मला कथा गवसण्याचा प्रश्न नाही. “ मध्येच ही कथा भलतीकडेच जाते आणि मग वाक्य येते, “ आता माश्या मारणाऱ्याच्या कोंड्याकडे येतो. “ यात एक वाक्य असे आहे की, “ म्हणजे तो अहोरात्र माश्यांचा विचार करत होता आणि – की म्हणून ? – माश्या सतत त्याच्याभोवती भणभणत होत्या. “ सार्त्रच्या ‘ फ्लाईज ‘ च्या सखोलतेचा आशय ही अब्सर्ड कथा सहज सांगून जाते.
मी हे पुस्तक पुन्हा एकदा वाचायला घेतलेले आहे.
--- 000 ---
15-02-23.

शेक्सपियर च्या ‘ कोरियलेनस ‘ या नाटकाचा स्वैर मराठी अनुवाद
योद्धा
अनु ० दिलीप जगताप, प्र ० कॉपर कॉईन.

दिलीप जगताप यांची तगडी मुक्त भाषा हे या अनुवादाचे एक खास वैशिष्ट्य आधीच नोंदवतो. भाषेची नाट्यमयता म्हणजे काय याचा हा एक उत्तम वस्तुपाठ ठरावा. यात अनेक मोठमोठ्या लांबीचे संवाद आहेत – ते जर अशा जोरकस शैलीत आले नसते तर हे नाटक मुळातच पंक्चर झाले असते. त्यामुळे, एकूणात, वाचनीयता हा या नाटकाचा एक महत्त्वाचा गुण म्हणावा लागेल. मराठीची ताकद आणि सौष्ठव हे या नाटकाला सहज पेलून धरणारे आहे. नाट्यमयता रक्तात मुरलेला जगतापांमधला नाटककार इथे सलाम घेऊन जाईल.
कोरियलेनस हा यातले प्रमुख पात्र असलेल्या मार्शियस या योद्ध्याला दिला गेलेला किताब आहे. पण जगताप नाटकाचे नाव ‘ योद्धा ‘ ठेवतात हेही अन्वर्थक आहे. एक अद्वितीय योद्धा असण्याचा गर्व वा घमेंड आणि त्यातून सामान्यांना तुच्छ लेखणे हे या नाटकाच्या वृक्षाचे बीज आहे. इतर अधिकारी व सामान्यजन यांच्याशी अपमानास्पद वागल्यामुळे मार्शियसला राज्याबाहेर हाकलून दिले जाते. याचा बदला घेण्यासाठी म्हणून तो शत्रूला जाऊन मिळतो. आणि आपल्याच राज्यावर चाल करून येतो. मग त्याच्या आईच्या विनवणीमुळे संहार टळतो पण शत्रूला त्याने युद्धाचा शब्द दिलेला

असतो तो मोडला गेल्यामुळे तो त्या शत्रूच्या दृष्टीने विश्वासघातकी ठरतो आणि मारला जातो ! एवढेच आहे हे नाटक, पण, या एकूण काळात यातले मानवी जगणे जे उलटे-सुलटे हेलकावे खात जाते त्यात शेक्सपियरची प्रज्ञा वा प्रतिभा दिसून येते. एका माणसाच्या वेडपट स्वभावामुळे अनेक समूह भूमिका बदलत उलट-सुलट होत जातात ! मराठीत सदोदित भूमिकांचा आग्रह धरणाऱ्यांनी हे नाटक जरूर वाचले पाहिजे. भूमिकांमधल्या अब्सर्डिटीवरचा जमालगोटा शेक्सपियरने फार पूर्वीच देऊन ठेवलेला आहे.

मानवी जगण्यातली अब्सर्डिटी कळल्याशिवाय कुणी सर्जक कलाकृती निर्माणच नाही करू शकणार, असे मला वाटते. त्या दृष्टीने हे एक जबरदस्त नाटक आहे. हा संवाद बघा – " धन्यवाद. ज्यांच्याबरोबर एका ताटात जेवलो त्या जिवलग मित्रांना सोडून मी माझ्या कट्टर दुश्मनाकडे आलोय. ज्या गावात मी जगलो, वाढलो त्या गावातून हाकलले मला आणि या परक्या शत्रूच्या भूभागात आलोय मी. ऑर्फिडियसने माझा शिरच्छेद केला तर तो योग्यच ठरेल पण त्याने मला जीवदान दिले तर त्याच्यासाठी मी माझे प्राण अर्पण करेन. " यातल्या शेवटच्या वाक्यातला उपरोध हा मानवी गधडेपणाचा उत्तुंग नमूना आहे ! आणखी एका ठिकाणी एका माणसाबद्दल दया वाटणे, कृतज्ञता वाटणे पण त्याच वेळी सूडभावना प्रचंड महत्त्वाची ठरणे – असे अनेक ' विनोद ' या नाटकात आहेत !

हे नाटक म्हणजे फक्त मार्शियस ची शोकांतिका नाही वाटत. ही पूर्ण मानवी जगण्याचीच शोकांतिका वाटते. वेळोवेळी बदलते सर्वांचे मानसिक पवित्रे हे संघर्ष, हिंसा आणि नाश घडवतात, हे जाणवते. जणू उपाय नसलेले गधडे जगणे ! मानवी जगण्याचा हा असा प्रचंड आवाका समर्थपणे मराठीत आणल्याबद्दल अनुवादक-प्रकाशकांचे अभिनंदन !

--- चं. प्र. देशपांडे.

--- ००० ---

शेक्सपियरची दोन नाटके

' योद्धा ' आणि ' चेटूकवारं '

मराठीत स्वैर अनुवाद – दिलीप जगताप, प्रकाशक – कॉपरकॉईन.

-- असे हे पुस्तक आहे. काल मी यातल्या ' योद्धा ' या नाटकावर लिहिले. मनात ताजे असते तोवर ते लिहिले जावे म्हणून पूर्ण पुस्तक असा कार्यक्रम न राबवता, वाचून झाले त्यावर लिहिले. आज दुसरे नाटक

' चेटूकवारं ' (मुळातले ' THE TEMPEST ')

वाचले. अनुवाद चांगलाच आहे पण तुलनेने हे नाटक कमी ताकदीचे वाटले. यात खास असा काही मोठा संघर्ष नाही आणि खूप नाट्यमय अशी खूनबीन घटनांची सनसनाटीही नाही. पण शेवटी, मास्टर तो मास्टर – या न्यायाने शेक्सपियरचा मोठेपणा जाणवतोच. याने असे केले म्हणून मग त्याने तसे केले अशी रचना करता करता असंख्य पात्रे

आणि मानवी स्वभाव यांचे प्रचंड भान घेत जाणे असे इथे फार घडत नाही. त्यातही, जादूटोण्याची मदत घेतलेली दाखवल्याने माणसांचे कार्यकर्तृत्व नगण्य ठरते. त्यामुळे मानवी कृतींचे अभेद्य जंजाळ म्हणावे असा काही अनुभव इथे येत नाही. तरीही हाताळणीत मास्टरी आहेच.

प्रोस्पेरो या ड्यूकला बेकायदेशीरपणे पदच्युत करून एका तराफ्यावरून समुद्रात मरायला सोडले जाते. एक नोकर, त्याच्यासोबत त्याची छोटी मुलगी, आणि इतर काही सामानाबरोबरच त्याची जादूची पुस्तके देतो. त्या जादूचा उपयोग करून तो कसे जुने हिशोब मिटवतो आणि त्याच्या मिरांडा या कन्येचे फर्डिनांड या राजपुत्राशी कसे लग्न होते, वगैरे असा कथाभाग आहे. सुरुवातीचे वादळ, विजा आणि खवळलेला समुद्र यांचे शेक्सपियरकृत वर्णन जबरदस्त आहे. तेव्हाच्या वेळचे कप्तानाचे हे बोलणे – " तूफान नसेल, संथ पाण्यात हे होडके आपोआप तरंगत असेल, त्या वेळी शांत संध्याकाळी आपण ' बुडते जहाज कसे वाचवावे ' या आपल्या ग्रंथाचे इथेच प्रकाशन करून त्याबद्दल चार चांगले शब्द बोलू, पण आता आत जा. कारण, अक्कलवंत मूर्खांनो, तुम्ही नकळत पश्चिमेकडील पिसाळलेल्या वादळाला साथ देत आहात. तुम्ही आत जा. " – एकूणात असे अक्कलवंत मूर्ख मानवजातीत सर्वच स्थळकाळात राहात आलेले दिसतात !

माणसे असतात जादूच्या प्रभावाखाली पण समजतात असे की सगळे त्यांच्याच प्रयत्नांनी घडते आहे. हे एका वेगळ्या प्रकारे आपल्या साधू वाण्यालाच ईश्वराने घडवलेले शासन ! पण नाटक एकूण सुखात, आनंदात संपते.

तरीही, अनेक पात्रे आणि जिवंत माहोल हा अनुभव येतोच. शेक्सपियरचे संवाद मराठीत आणणे हे मराठीला एक प्रकारे समृद्ध करणेच आहे. जगतापांनी ते काम चोखपणे केलेले आहे.

असे संवाद पाठ करून म्हणू शकणारे कुणी आहेत का सध्याच्या पिढीत, कोण जाणे. पण, असे साहित्य वाचले जाणे हा जागतिक मानवी संस्कृतीचा एक महत्त्वाचा प्रवाह समजायला हवा. संस्कृती म्हणजे नुसते किल्ले, मंदिरे, लेण्या यांचे जतन नव्हे. मानवी जगणे आणि त्यांतल्या नात्यांतून निर्माण होणाऱ्या समस्या यांचा कुठेही घेतला गेलेला आवाका जगात इतरत्र कुठेही प्रस्तुतच असतो, हे समजून घ्यायला हवे.

अनुवादक जगताप आणि प्रकाशक कॉपरकॉईन यांनी हे एक चांगले काम केले आहे.

--- चं. प्र. देशपांडे.

--- ००० ---

बे बे बकरी (दोन अंकी नाटक)

ले ० दिलीप जगताप, प्र ० कॉपर कॉईन .

सर्वेश्वरदयाल सक्सेना यांच्या ' बकरी ' या हिंदी नाटकावर आधारित असे हे नाटक आहे. मराठीतली ही एक उत्तम राजकीय-सामाजिक उपरोधिका आहे. हे नाटक अनेक कारणांनी मला विशेष वाटले. जगताप हे ग्रामीण जीवनाचा माहोल, तिथली भाषा, म्हणी, वाक्प्रचार, त्यांच्या बोलण्यात येणारे रामायण-महाभारताचे संदर्भ या सगळ्यात पूर्ण

मुरलेले आहेत. त्यामुळे हे सर्व त्यांच्या भाषेत हात जोडून त्यांच्या सेवेला हजर आहे. शिवाय जगतापांना राजकीय-सामाजिक जगण्यातल्या विसंगती आणि दांभिकपणा आणि शोषण यांचीही जवळून जाणीव आहे. त्यामुळे, या नाटकाच्या लेखनात एक सहजता, ' खरेपणा ' आणि विश्वासार्हता आपोआप आलेली आहे. नाट्यतंत्र तर जगतापांना अवगत आहेच. या सर्व बाबींमुळे या नाटकाचे वाचन हे एक उद्बोधक कलात्मक आनंद देणारे ठरते.

कथावस्तू तशी छोटी व साधीच आहे. साधा बकरीचा काय तो प्रश्न पण तीसुद्धा एका खेडूत बाईकडून सक्तीने काढून घेतली जाते. लुटली जाते. प्लॅन असा की ही बकरी महात्मा गांधींच्या बकरीची वंशज असल्याचे भासवत तिला देवत्व द्यायचे आणि लोकांना तिच्या नादी लावून आपले अनेक कार्यभाग साधायचे. ती बाई फारच त्रास देऊ लागल्यावर तिला तुरुंगात घातले जाते. जनता कधी समजून, कधी भोळेपणाने आणि कधी नाइलाजाने या बकरीदेवीच्या चरणी लीन होत जाते. ते भांडवल वापरून कुणी पुढारी निवडून येतो. आणि शेवटी आनंद साजरा करण्याच्या पार्टीसाठी तीच बकरी वापरायचे ठरते ! या सगळ्या प्रकारात महात्मा गांधी, त्यांचे तत्वज्ञान यांचे चपखल संदर्भ येत राहतात. शासकीय कार्यालयांचे काम, कायदा-सुव्यवस्था आणि शेतीच्या समस्या यांचेही संदर्भ येत राहतात. दुष्काळी भागात अंधश्रद्धेचे पीक काढण्याचा हा धूर्त प्रयोग यशस्वी होत जातो. शेवटी एक तरुण आणि त्याचे काही साथीदार बाजी उलटवतात.

ग्रामीण जीवनाचा माहोल हाताळणारी मराठीतली ही एक अद्वितीय उपरोधिका आहे. हे नुसते विनोदी नाटक नाही, फार्स तर नाहीच. मग याला कृष्णनाट्य म्हणता येईल का ? मला वाटते, नाही. कृष्णनाट्याच्या मुळाशी एक अभेद्य अशी निराशा असते. तसे इथे नाही. हे अब्सर्ड वा मृषा नाट्यही नाही. कारण तशा नाटकात एक मूलभूत अर्थशून्यता आणि हेतूहीनता असते. तसेही इथे नाही. म्हणून याला उपरोधिका म्हटले आहे.

या नाटकासोबत आपल्याला शफाअत खानांचे ' शोभायात्रा ' आठवू शकते. समोर असलेल्या परिस्थितीतले व्यंग्य, विसंगती, मूल्यहीनता हे सर्व चितारताना लेखकाच्या मनात इथे ' चांगले म्हणजे काय ' असे काही असते. तसे ते जनमान्यही असते पण जगण्यात त्याचा अभाव असतो. या अर्थाने अशी नाटके आशावादी असतात. एका विशेष उंचीवरून जगण्यातली ही विदारकता उघडी पाडण्याचे काम अशी नाटके करतात.

असंख्य ' खऱ्या ' तपशीलांनी युक्त असे मास्टर नाट्यलेखन मराठीत खूप कमी आहे. समीक्षकांनी आणि अभ्यासकांनी या नाटकाची विशेष दखल घ्यायला हवी, असे मला वाटते.

या उत्तम निर्मितीबद्दल लेखक-प्रकाशक यांना धन्यवाद !

--- चं. प्र. देशपांडे.

--- ००० ---

' बे बे बकरी ' या दिलीप जगताप यांच्या नाटकावरच्या माझ्या अभिप्रायाला आदरणीय कमलाकर सोनटक्के सर यांचा प्रतिसाद ---

[7:37 am, 04/03/2023] Dilip Jagtap: चं. प्र देशपांडे यांचं अतिशय मार्मिक आणि मर्म ग्राही विवेचन.

सर्वेश्वर दयाल सक्सेना यांच्या मूळ हिंदी नाटकाचा अचूक स्वर हेरणारं आणि दिलीप जगताप यांच्या स्वैर अनुवादाचं भरभरून कौतुक करणारं.

आपलं आणि चं. प्र. देशपांडे यांचं भरपूर अभिनंदन.

[7:37 am, 04/03/2023] Dilip Jagtap: From ; Kamlakar Sontakke.

डॉ. अरुण प्रभुणे, अमेरिका, म्हणतात, " विचारपूर्वक लिहिले आहे. "

--- ० ---

मराठीतली एक महत्त्वाची

न-कादंबरी (anti-novel) आणि स्व-जाण कादंबरी (meta-novel)

स्वप्नासारखा उजेड

ले ० रवी लाखे, प्र ० पेपरवॉल पब्लिशिंग.

एखादा माहीत असलेला (खरे तर माहीत नसलेलाही) गंभीर लेखक त्याचे काही ‘ वेगळेच ‘ लेखन समोर ठेवतो तेव्हा अनेकांना त्याच्या आकलनात अडचणी येऊ शकतात. अशा वेळी स्वत: जरा सबूरीने समजून घेण्यापेक्षा शक्य तो ते लेखनच धुडकावून लावावे, रद्दच करावे, नाकारावे – असे मार्ग वापरून आपल्या मठ्ठपणाचे रक्षण आणि समर्थन करावे याला मराठीत एक उदात्त परंपरा आहे. तो धोका याही कादंबरीला आहेच. न- कादंबरी म्हणजे कादंबरी या साहित्य प्रकाराची अनेक ‘ मान्य ‘ वैशिष्ट्ये भिरकावून देऊन वेगळाच मार्ग चोखाळणारी कादंबरी. कथावस्तू, स्वभावचित्रण, निवेदनातली सलगता, कारण-परिणाम साखळी, काळाचा दस्तावेज उभा करणे वगैरे जी सवयीने माहीत असलेली अशी कादंबरीची लक्षणे आहेत त्यांचा इथे अभाव आहे. पु. शि. रेग्यांच्या ‘ सावित्री ‘ या कादंबरीला ‘ छापून छापून वाढवलेली कादंबरी ‘ म्हणणारे लेखक-समीक्षक इथे लिहून लिहून वाढवलेल्या कादंबऱ्या लिहीत राहिले ! कारण एकच, कादंबरी निदान ३०० पानांची तरी असायला हवी ! ही कादंबरी तीही अपेक्षा मोडीत काढणारी आहे. ही फक्त १०० पानांची भरगच्च आशयाची अशी कृती आहे. फॉर्मचा किंवा साहित्य प्रकारात होणारा हा बदलही या कादंबरीत मधून मधून चर्चिला जातो. याप्रमाणे जेव्हा एखादी साहित्यकृती स्वत:ची जाण व्यक्त करते तेव्हा तिला स्व-जाण वा meta म्हणावे.
आपल्याला जे समजत नाही किंवा जे आपल्या सवयीतले वा चाकोरीतले नाही त्याची टिंगल करणे, टवाळी करणे ही पद्धत आता तरी आपण बंद करायला हवी. अभिव्यक्तिपद्धतीत असे बदल का, कशामुळे होत असतात हेही आपण समजून घ्यायला हवे. काळानुरूप मनांचे ढाचे बदलतात, प्रतिक्रियांच्या पद्धती बदलतात, जगण्याकडे ‘ पाहणे ‘ ही बदलते. त्यामुळे परंपरा नाकारणारे असे लेखन घडत असते, हे समजून घ्यायला हवे. स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी, ही कथाच नव्हे, ही कादंबरीच नव्हे, ही कविताच नव्हे अशा तुरंत-पळवाटा वापरणे घडू नये. नुसतेच स्वत:च्या कोसल्यात अंग मुडपून पडून राहणे हे कला क्षेत्राचा घात करणारे आहे.

या बदलत्या पद्धती, वेगळे ‘ पाहणे ‘ यांचे काय महत्त्व वा मूल्यात्मकता असते माणसाच्या जगण्यात ? – हा प्रश्न इथे प्रस्तुत ठरतो. बऱ्याचजणांना संदेश, बोध, नीतीप्रचार, वा काही आदर्श हे साहित्यकृतीतून पोचणे महत्त्वाचे वाटते. या सगळ्याचा थोडक्यात सारांश म्हणजे, ‘ व्यवस्था बदलणे ‘. काय बदलायचे व्यवस्था म्हणजे ? आयपीसी की घटना की संसदभवन ? की मोदींच्या जागी ममता दीदी वा पवारसाहेब वा आदित्यजी वा राहुलभाई यांची स्थापना करणे ? ही बाहेरची सगळी व्यवस्था म्हणजे आपल्या मन वापरण्याच्या सामूहिक पद्धतीची अभिव्यक्ती असते, हे लक्षात घ्यायला हवे. कला क्षेत्र हे या मुळाकडे लक्ष देत असते. पाचशे पुस्तके वाचली म्हणजे मन परिपक्व होते, असे नाही. मनाला स्वत:च्या वर्तणुकीचे भान येण्याने परिपक्वता येते. त्यानेच जगण्यात मूल्यात्मकता येते. हे सर्व पाहता, कुणी निरुद्योगी, चंगीभंगी माणसे फावल्या वेळात हे असले उद्योग करतात, असे समजू नये. हे कलावंत, लेखक हे माणसाच्या जगण्याबाबत अत्यंत गंभीर आणि संवेदनशील असतात म्हणूनच त्यांच्याकडून अशा कलाकृती निर्माण होत असतात, ही प्राथमिक जाण असणे अत्यावश्यक आहे. कला मुख्यत: मानवी समस्यांचे, वर्तणुकीचे भान घेत असते -- हा कलाक्षेत्राचा पायाच असतो, असे म्हणता येईल.

आता या कादंबरीकडे जाऊ. या कादंबरीला एखादे सलग कथानक नाही. ‘ पुढे काय झाले ‘ यासाठी ही वाचायची नसून वर्तमान काय चालू आहे, हे पाहणे, हे या कादंबरीचे तंत्र आहे. काहीच पूर्वनियोजित नाही. एकाला जोडून वा एखाद्या निमित्ताने दुसरे काही असे निघत जाते. कुठलाच तुकडा हा परिपूर्ण असा नाही. वास्तव हे पूर्ण कधी समजूच नाही शकत, अशा अर्थाचे एक वाक्यच आहे या कादंबरीत. नावावरूनच कळते की ही कादंबरी ‘ वास्तववादी ‘ नाही आहे. या कादंबरीतल्या लेखकाच्या मनाला गाढवाचे मूर्त रूप दिलेले आहे. ही वाक्ये बघा – “ दोघे चालत राहिले. चालण्यात एवढे गुंगले की तहानभूक विसरले. देहात जेवढी शक्ती तेवढं चालणं झाल्यावर ते कोसळले. डोळे मिटले गेले. आत एक उजेड पसरला. त्या उजेडात निरंजनच्या कादंबरीतली पात्रं सावल्यांसारखी बसली होती. तो स्वत: आणि गाढवही त्यात होतं. तो उजेड स्वप्नासारखा होता. “ पूर्ण थकल्यावर, कोणताही कंट्रोल ठेवायचे त्राण नसताना दिसलेला हा उजेड ! याच वातावरणात ही पूर्ण कादंबरी घडते. तर हीत काय काय घडते हे इथे सांगण्यात अर्थच नाही. ते मुळातूनच वाचायला हवे. या कादंबरीची शैलीही म्हटले तर ताबाहीन आहे पण वाक्यावाक्यात लेखकाच्या चिंतनशीलतेचा प्रत्यय देणारी आहे.
आता ही आणखी काही वाक्ये बघा –

“ तर आता हा मी लिहितोय तो मजकूर कुठला पेहराव करील मला माहीत नाही. मी सर्व मजकुरावरच सोपवलं आहे. भूमिका बदलली की पेहराव बदलतो तसं काहीसं होत राहील किंवा होणारही नाही. “ (पान ११).

“ लेखक आणि माणूस हे द्वंद्व घमासान चालूच असतं “ (पान २१).

“ स्किझोफ्रेनिक बेलगाम रहदारीतून चालताना मला भीती वाटते. मरणाची भीती वाटते. नीट पाहिलं तर साधी भीतीसुद्धा मरणाची असते. गेल्या दोन दशकांत ही रहदारी एवढी वाढलीये. “ (पान २४).

“ लेखक नाराजीनं म्हणाला, असं ठरवून लिहिलं तर माझी तरी लिहिण्यातली मजा जाईल. “ (पान ८५).

“ लेखक एकदम ओरडला. अरे कादंबरी मी लिहिणार आहे की तुम्ही ? मला सामाजिक जाणिवेचं लेखन वगैरे प्रकारच मुळात मान्य नाही. तुम्ही ठरवताय तसं मला नाही जमणार लिहायला. “ (पान ८६).

“ अहो मला एवढंच सांगायचंय की जे दिसतं तेवढंच वास्तव नसतं. पलीकडे खरं वास्तव असतं जे आपल्याला कल्पित वाटू शकतं “ (पान ९६).

“ म्हणून मला वाटतं की खोटं परंतु मौलिक असं खरं बोलणं म्हणजे फिक्शन असावं. “ (पान १०८).

“ हे बघ कलावंताला सत्य वगैरे कधीही गवसणार नसतं. सत्य गवसल्याचा त्याला भास होतो. भ्रम होतो. “
(पान १०८).

कादंबरी लेखनाबद्दल आणि मानवी संबंध आणि कृती यांबद्दल अशी बरीच चिंतनात्मक वाक्ये या कादंबरीत आहेत. जी घटिते आहेत ती रूटीन नाहीत. लिहिण्यात कोणतेही टॅबू (मान्यतेची बंधने) नाहीत. अत्यंत ओघवत्या रीतीने परंतु बारीकसारीक तपशीलांचा वेध घेत हे लेखन येत राहते. हे तपशील एखाद्या कार्यक्षेत्राचे वा एखाद्या गुंतागुंतीच्या आर्थिक व्यवहाराचे नसून मानसिक वर्तणुकीचे आहेत.

प्रकार बराच वेगळा आहे तर हे भराभर वाचून संपवता येणार नाही. आरामात घोटाघोटाने घ्यायची ही एक दर्जेदार दारू आहे. सावकाश, हळूहळू किक देईल पण ती नुसत्या एका व्यक्तीला नव्हे तर व्यक्तीच्या माध्यमातून एकूण मानवी जगण्याला असेल.

--- चं. प्र. देशपांडे.

--- ००० ---

०९-०३-२३.

भवताल आणि भयताल (कवितासंग्रह)

कवी ० दीपक बोरगावे, प्र ० सम्यक विद्रोही प्रबोधन संस्था, कोल्हापूर.

१९७६ ते ७९ या काळात मी कोल्हापुरात होतो. तेव्हा आम्ही ‘ प्रत्यय ‘ या समूहाची स्थापना केली होती. त्यात अनेक लेखक, कवी, चित्रकार, दिग्दर्शक, अभिनेते वगैरे होते. वाचने व चर्चा खूप चालत. त्यात आताचे डॉ. दीपक बोरगावेही सामील असत. नंतर आमचे भौतिक, मानसिक मार्ग वेगळे होत गेले, तो भाग वेगळा. इथे फेसबुकवर बोरगावे सरांचे दर्शन नेहमीच होत होते, पण, अलीकडेच त्यांची प्रत्यक्ष भेट झाली. त्या वेळी त्यांच्याकडून मला हा सदर कवितासंग्रह सप्रेम भेट मिळाला. तो वाचून झाल्यावर मित्रत्वाच्या नात्याने हा अभिप्राय लिहीत आहे.

या संग्रहातल्या कविता प्रामुख्याने शोषित-वंचितांची दु:खे व्यक्त करणे आणि विशेषत: समतेच्या चळवळींतल्या महात्म्यांचे मोठेपण व्यक्त करणे, अशा आहेत. या सर्व कवितांच्या मुळाशी सामाजिक समतेची तीव्र इच्छा असल्याचे प्रभावीपणे जाणवते. कला वा कविता ही परिवर्तनाचे साधन असायला हवी ही एक प्रगाढ निष्ठा यामागे आहे. विषमतेची

व्यवस्था बदलण्याची आच आहे. या कविता त्यांचे जीवितकार्य चोखपणे करत राहतील यात शंका नाही. माझे कलेबाबतचे आकलन वेगळे असते. कला हे साधन नसून साध्य आहे, असे मला वाटते. कला ही स्वत:च्या असण्यातच परिपूर्ण म्हणजे समतायुक्तच असणे, हे मला महत्त्वाचे वाटते. विशेष म्हणजे या दृष्टीनेही ' पोचतील ' अशा काही कविता या संग्रहात आहेत. त्यांतल्या तीन कवितांबद्दल थोडक्यात बोलायचा विचार आहे.

(एक) इथं काहीतरी

इथं काहीतरी
जळल्याचा वास येतोय
गादीवर सिगारेटचं थोटकं तर टाकलं नाहीस ना?
खिडकीही उघडीच आहे
बाहेर काही जळत असेल का ?
कुठून येतोय हा वास
काही समजत नाही
कुठेतरी नक्कीच जळत असलं पाहिजे
जरा खाली जाऊन पाहतोस का?
शेजाऱ्यांनी धूर केला की काय?
काय वैताग आहे!
ऑफिसातही हाच वास होता
काही लागण तर नसावी ?
काहीही होऊ शकते हो !
धुराचाही नवा संसर्ग असू शकतो ?
काही कळत नाही
पोरांना खालीच घेऊन गेलेलं बरं
ती बिचारी कारण नसता आजारी पडतील
नक्की समजेल का उद्या ?
काही भरोसा नाही कशाचाच!
इथं काहीतरी
जळल्याचा वास येतोय
(पान ४९).

ही कविता नुसतीच धुराच्या वा गटाराच्या वा उंदीर मेल्याच्या वासाबद्दल आहे, असे मला वाटत नाही. हा एका व्यापक अवकाशातला, मानवी जगणेच धोक्यात आणणारा वास आहे. बाहेर त्याचा उगम सापडत नाहीय. कारण तो वास सडत चाललेल्या मनाचा आहे. धर्म, जात, भाषा वा विचारसरणी यांच्याशी होणाऱ्या समरूपतेच्या घट्ट स्थितिशीलतेतून तयार होणाऱ्या डबक्याचा हा वास आहे. हे मानसिक जळत राहणे, नष्ट होत राहणे आहे. हे भान देणे हेच इथे कवितेचे परिपूर्ण काम आहे.

(दोन) वर्तुळे

एक वर्तुळ अगदी वर, त्यात अनेक वर्तुळे
आजूबाजूलाही अनेक त्याच्यातूनच फुटलेली
शिवाय, प्रत्येकांत लपलेली अनेक छोटी वर्तुळे
हीही उपस्थित अनेक मोठ्या वर्तुळांत
एकमेकांना छेदून बाहेर पडू पाहणारी
केंद्रापासून
पण परिघावरच लोंबकळणारी
ह्या छोट्या वर्तुळांखाली
त्यांच्या मधोमध अजून अनेक वर्तुळे
फिरतात अगदी वरच्या वर्तुळात
म्हणजे तसा प्रयत्न असावा त्यांचा
प्रत्येकांची केंद्रे ही वेगवेगळी
तीही फिरतात एका तिसऱ्याच केंद्रातून
वरचे वर्तुळ हे वरच जाणार
आणि खाली सरकणारे केंद्र
हे वर कधी जाईल, हे सांगता येणार नाही
वर्तुळांच्या ह्या हालचाली
अगदी हैराण करणाऱ्या
केंद्रांची वर्तुळे बनत
इतिहासाची चाके वर्तमानात बदलतात
एक वर्तुळ अगदी वर त्यात बरीच वर्तुळे
आजूबाजूलाही अनेक त्याच्यातूनच फुटलेली
(पान ८०).

ही कविता, समूह आणि व्यक्ती यांच्या व्यामिश्र रचनांची अनाकलनीय अस्तित्वे व्यक्त करते. केंद्रे हलतात, बदलतात – वर्तुळांच्या हालचाली हैराण करतात. हे वेगवेगळ्या प्रकारे पण एकमेकांवर परिणाम करत चालणारे मानवी जगणे आहे. ' इतिहासाची चाके वर्तमानात बदलतात ' ही यातली मर्म-ओळ आहे. इतिहासाच्या प्रभावाखाली वर्तमान आहे. तसेच, वर्तमानाच्या सोयीने भूतकाळही बदलतो आहे. काळालाही जणू वस्तुनिष्ठ परिमाण राहिलेले नाही. आपापल्या मन:स्थितीप्रमाणे भूतकाळ पाहिला व सादर केला जातो आहे.

(तीन) आपण हा प्रश्न उद्या सोडवू

पाच पन्नासची लोकलाय

चल मी निघतो

जाशील रे माहिताय अजून चिकार वेळाय

मी काय म्हणतोय

प्रत्येक व्यवस्थेत कलेचे एक मूल्य असतंच

भांडवली व्यवस्थेचाही इथे अपवाद करता येणार नाही

वर्गीय संघर्षाचा प्रश्न नाही रे हा

जातीचे काय करणार?

हा तिढा कायम आहे

कलेच्या माध्यमातून हे सोडवता येईल रे थोडंस्स

ते तू कर

बघ काय होतंय ते?

जातीचं काय झालंय माहिताय

आपल्या देशात तरी किमान

ती आपल्याच शरिराला चामड्यासारखी चिकटलीय

ती इतकी घट्ट आहे की

तिला काढून टाकणं म्हणजे

कठीणच

अरे ही अडक आपणांसच काढाय पाहिजेल

ते खराय रे; पण काय झालंय माहिताय?

चल, मला निघाय हवं माझी लोकल चुकेल

आपण हा प्रश्न उद्या सोडवू

(पान ११३).

ही काहीशी लाईट व उपरोधिक टोनमधली कविता आहे. कलेची मूल्यात्मकता आणि प्रत्यक्ष जगणे यांतले अंतर इथे उघडे पाडले जातेय. इथे जात जणू घट्टपणे शरीराची चामडीच बनून चिकटलेली आहे ! या प्रश्नावर ना निराकरण आहे ना तसे काही सापडण्याची आशा आहे. हा मानवी मनाच्या समरूपतेचा प्रश्न आहे. जातीशी समरूप असण्यात सुरक्षित वाटण्याची ही समस्या आहे. याची का गरज पडावी ? कोणत्या असुरक्षिततेमुळे मन हे जात, धर्म, भाषा वा विचारसरणी यांना बिलगून राहू इच्छिते ? – हा प्रश्न नुसताच सामाजिक म्हणून नाही पाहता येत. मग करावे काय ? तेही नाही कळत ! त्यामुळे या प्रश्नापासून पळच काढण्याची एक उथळ युक्ती इथे कामाला येते आहे ! निर्भीडपणे हे इथे व्यक्त झालेले आहे. एकदा तुम्ही कविता वाचकाकडे सोपवलीत की, त्या कवितेशी प्रतारणा न करता का असे ना, पण ती वाचण्याचे आणि समजून घेण्याचे स्वातंत्र्य वाचकाला असते ! कवीचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य जितके महत्त्वाचे असते तितकेच वाचकाचे वाचनस्वातंत्र्यही महत्त्वाचे असते ! – असे काही या निमित्ताने म्हणावेसे वाटते !

--- ००० ---

----- अगदी घरगुती स्वरूपाचे जेवण झाले. चंप्रंना मी माझी पुस्तके दिली. एक इंग्रजी अनुवादाचे पुस्तक पण दिले. पण ते म्हणाले नको. मी सामाजिक, राजकीय वगैरे असले काही आता वाचत नाही. कवितासंग्रह मात्र त्यांनी आवर्जून घेतला. हा तुमचा कवितासंग्रह आहे. मी नक्की वाचतो.

यावेळी शिरीष चिंधडे यांचे पुस्तक मनोजने ('पूर्वप्रभा आणि पश्चिम आभा', वर्णमुद्रा प्रकाशन) मला भेट म्हणून दिले. माझ्या संग्रहावर चंप्र काही लिहितील वगैरे असे काही वाटले नव्हते. पण आज फेसबुकवर चक्क त्यांनी केलेली काही निरीक्षणे मला वाचायला मिळाली. मलाच माझ्या-- या काही ज्याला कविता म्हणता येतील त्यावर त्यांनी जे सांगितले आहे ते-- वाचून आनंद तर झालाच-- पण माझ्याच कवितांचा हा वेगळा अर्थही समजला.

चंप्र म्हणतात ते खरच आहे. वाचकांना अभिप्रेत असणारा, समजणारा-- वेगवेगळ्या अर्थांचे आकलन, त्याचे विश्लेषण हे अधिक महत्त्वाचे असते. त्यांनी माझ्या कवितांवर लिहिलेली काही निरीक्षणे मी इथे शेअर करतो आहे.

-दीपक बोरगावे

०-०-०

कोणते का असे ना, प्रस्थापित साम्राज्य उद्ध्वस्त करणारी कविता ! भाषेला म्हणजे मनाला असे फ्री सोडून दिलेली कविता मराठीत कमी आहे ! सलाम !

Sharmishtha Bhosale

•

तू क्रॉफर्ड मार्केटात घेऊन दिलेले झुमके हरवले

तर तिथंही

मी मारली उगाच फालतू फिलॉसॉफी
की जो खोया है
वो फिर मिला भी है
चाहे रूप बदलकर क्यों न हो
हरवून पुन्हा भेटतात माणसं
तेव्हा फक्त चकवे भेटतात ॲक्च्युली
पुरान्यावाल्या माणसाच्या पुलाखालून
वाहून गेलेलं असतं कितीतरी गॅलन पाणी
हरामी, अपरिहार्य पाणी.
बरं ते सोड,
स्टॉकहोम सिंड्रोमचा हँगओव्हर उतरला
तेव्हा किती कुरूप दिसायला लागला ना
तुझ्यातला ॲडम,
आणि माझ्यातली इव्ह
रात्रीचे इको ओलांडत
पहाटे वळून पाहिलं
तर अर्धवट उजेडात
किती अनोळखी वाटला होता
शेजारी झोपलेला तुझा देह
तेव्हा वाटलेली भीती
अस्सल होती
तुझ्या नोमॅड नजरेइतकीच
आलास, ये!
निघालास,
हरकत नाही.
तेवढा
जाण्याआधी घास ना
माझ्या कपाळी,
तुझ्या सावळ्या कपाळावरचा भंडारा

मी जेजुरीच्या डोंगरात शोधत फिरेन नागफणी

नाही सांगणार दावा तुझ्या सख़्तकोमल बहरावर

- शर्मिष्ठा

-- 00 --

पूर्वप्रभा आणि पश्चिम आभा

ले ० शिरीष चिंधडे, प्र ० वर्णमुद्रा

शिरीष चिंधडे यांचा इंग्रजी वाङमयाचा सखोल अभ्यास असून ते शिक्षणतज्ञही आहेत. त्यांच्या परिश्रमांतून हे पुस्तक लिहिले गेलेले आहे, हे महत्त्वाचे आहे. अनेक क्षेत्रांतल्या काही ना काही अद्वितीय काम करून गेलेल्या व्यक्तींविषयी आपल्याला कुतूहल असते. कसे गेले असेल त्यांचे आयुष्य, कोणत्या प्रेरणांनी त्यांनी कामे केली असतील, अडचणी, संकटे त्यांनाही आली असणारच त्या त्या वेळी ते त्यांतून कसे बाहेर पडले असतील, त्यांची स्वभाववैशिष्ट्ये कोणती असतील, अशा अनेक प्रश्नांबाबत आपण उत्सुक असतो. हेच ओळखून चिंधडे यांनी अनेक मोठ्या व्यक्तींची थोडक्यात चरित्रे आणि त्यांच्या कार्याची वैशिष्ट्ये यांवर वेळोवेळी लिहिलेले लेख या पुस्तकात संकलित केलेले आहेत.
यांतला बर्ट्रांड रसेलवरचा प्रदीर्घ लेख तर खासच आहे. त्याची जडणघडण आणि त्याची एक जागतिक महत्त्वाचा तत्त्वज्ञ होण्याची वाटचाल या लेखात फार चांगल्या पद्धतीने आलेली आहे. त्याच्या काही मतांचेही उल्लेख यात आलेले आहेत. एका ठिकाणी तो म्हणतो, “ आपल्या व्यक्तिमत्वावर स्त्रियांचा प्रभाव पडेल याची पुष्कळ पुरुषांना धास्ती असते. माझ्या स्वत:च्या प्रत्ययानुसार ही मूर्खपणाची भीती आहे. पुरुषाला स्त्री व स्त्रीला पुरुष हा मानसिक आणि शारीरिक गरजेतून हवाच असतो. स्वत:पुरतंच म्हणायचं झालं तर, ज्या स्त्रियांवर मी प्रेम केलं त्यांचा मी ऋणाईत आहे. कारण त्यांच्या प्रेमाविना मी`तद्दन कोत्या मनाचा पुरुष झालो असतो. “ कॉनरॅड आणि रसेल यांच्या मैत्रीबद्दल लिहिताना चिंधडे लिहितात, “ अंतरीचे स्वर जुळल्यावर वैचारिक मतभेद क:पदार्थ असतात, हे या मैत्रीवरून सिद्ध होते. “ एकदा रसेलला राजकारणात शिरायची हुक्की येते, तेव्हा त्याला लिबरल संघटनेकडून काही प्रश्न विचारले जातात – ती प्रश्नोत्तरे अशी आहेत --

प्र. : आपण चर्च ऑव्ह इंग्लंडचे सभासद आहात काय ?

उ. : नाही. माझ्यावर नॉनकन्फर्मिस्ट म्हणून संस्कार झालेले आहेत.

प्र.: ते संस्कार अजून टिकून आहेत काय ?

उ. : नाही.

प्र. : म्हणजे आपण अज्ञेयवादी आहात, असा अर्थ आम्ही घ्यायचा काय ?

उ.: होय. तसाच अर्थ तुम्ही घ्यावयास हवा..

प्र. : प्रसंगवशात तरी चर्चमध्ये जायला तुम्हाला रुचेल ना?

उ.: छे, छे!

प्र. : प्रसंगवशात तुमच्या पत्नीला चर्चमध्ये जायला रुचेल ना?

उ. : छे! तिलाही ते रुचणार नाही.

प्र. : म्हणजे तुम्ही अज्ञेयवादी आहात असंच ना?

उ. : होय. बहुतेक असंच असावं.

अर्थात रसेलना तिकिट मिळालं नाही.

एकूण १५ अशा लोकोत्तर व्यक्तींचा परिचय या पुस्तकात आहे. जरूर वाचनीय !

--- ००० ---

इन्शाअल्लाह

या कादंबरीचे अभिवाचन -- ले ० अभिराम भडकमकर -- प्र ० राजहंस प्रकाशन.

राजहंस पुस्तक पेठेच्या वर्षपूर्ती समारंभानिमित्त हा कार्यक्रम आयोजित केलेला होता. प्रेक्षकांचा प्रतिसाद उत्तम होता. उत्तम इडली-चटणी, उत्तम चहा आणि कार्यक्रमानंतर उत्तम बर्फी असा उत्तम आतिथ्याचाही यात समावेश होता. पाच अभिवाचकांपैकी अभिराम आणि सुशील हे माझे मित्र होते, स्वाती चिटणीस या उत्तम अभिनेत्री म्हणून माहीत होत्या – या तिघांना मी उत्तम म्हणायची गरजच नाही. पण, मला माहीत नसलेले सलीम मुल्ला आणि सचिन सुरेश हेही तोडीस तोड होते हे नक्की. त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रेक्षकसंख्येला ते अभिवाचन नीट पोचणे हे सहज शक्य झाले. दणक्यात पाऊस असूनही इतक्या लोकांच्या तिथे उपस्थित असण्याचे सार्थक झाले ! संजय भास्कर जोशी आणि विनया खडपेकर यांचे चार चार शब्द अन्वर्थक आणि समयोचित होते. या निमित्ताने एक अभिनव स्पर्धा घेण्यात आली होती. आपापल्या आवडीची कविता वाचून ते रेकॉर्डिंग पेठेकडे पाठवायचे होते. त्यांतून विजेत्या ठरलेल्यांना पारितोषिके देण्यात आली. प्रत्येक विजेत्याने कोणती कविता वाचली होती, हे सांगायला हवे होते असे वाटले. असो.

मूळ मुद्याकडे वळायचे तर हिंदू आणि मुस्लिम यांच्यांतली तेढ ही भारतातली एक प्रमुख समस्या आहे. त्यावर बोलणे नाजुक तर आहेच पण ते स्फोटक आणि ज्वालाग्राहीही ठरू शकते. या विषयावर मराठीत निर्भीडपणे आणि निर्भयपणे एक कादंबरी लिहिली जावी ही एक स्वागतार्ह घटना आहे. लेखकाचे बालपण कोल्हापुरातील टाकाळा या मुस्लिमबहुल वस्तीत गेलेले असून अजूनही त्याचा त्या जीवनाशी, राहणीशी संपर्क असल्याने या समस्येवर प्रत्यक्षदर्शी भूमिकेतून लिहायला तो अगदी योग्य माणूस आहे. शिवाय मराठीतला तो एक ख्यातनाम लेखक असल्याने त्याची मांडणी ही समतोल आणि जबाबदारीची असणारच हे आपण समजू शकतो.

अनेक पात्रांच्या तोंडून हे सर्व येत असले तरी प्रामुख्याने या दोन समुदायांतली तेढ समजून घेऊन शक्य तर काही निराकरण सुचवणे या हेतूने लिहिलेली ही कादंबरी आहे. मुस्लिमांमध्ये शिक्षण, धर्मचिकित्सा आणि धर्मसुधारणा होणे हा एक प्रमुख उपाय इथे सुचवलेला आहे. हिंदूंमध्ये तुलनेने या प्रक्रिया यशस्वीपणे चालूच आहेत हे लेखकाने दाखवले आहे. मुस्लिमांमध्ये या प्रक्रिया तिथल्या बुद्धिवाद्यांनी पुढाकार घेऊन चालवल्या पाहिजेत आणि तसे झाले तर सहिष्णू हिंदूंची त्यांना साथ असेल असे लेखकाचे प्रतिपादन आहे. या बाबतीत सर्व बाजूंनी वादाचे मुद्दे येत राहतात हेही लेखकाने सांगितलेले आहे. तीन तलाक वाईट मग तुमच्याकडे बायका टाकल्या नाही का जात – असे वाद हे अमर्याद चालू शकतात. लेखकाला असे दिसते की वैचारिक क्लॅरिटीनेच यातून मार्ग निघू शकेल.

हिंदू, मुस्लिम आणि पुरोगामी यांच्यांतली कट्टरता लेखकाने एकाच पातळीवर घेणे ही या आकलनातली एक महत्त्वाची बाब आहे. इथे प्रश्न असा येतो की पुरोगामी म्हणजे जर शिक्षित, धर्मचिकित्सक आणि सुधारणावादी असतात असे मानले तर ते का कट्टर असतात ? मला असे दिसते की कुणी धर्माच्या साच्याशी समरूप होतो तर कुणी एखाद्या वैचारिक व्यूहाशी. माणसे अशी समरूप झाली की ती अलग पडणारच आणि त्यांच्यांत फूट पडणारच आणि संघर्ष होणारच, असे मला वाटते. माणसाला कुठे ना कुठे समरूप होण्याची मानसिक गरज का वाटते, हा मला यातला खोलातला आणि समावेशक प्रश्न दिसतो. या कादंबरीचा पुढील भाग येणार असेल तर न जाणो तो या अंगाने येईल. त्यासाठी माझा लेखक मित्र अभिराम याला माझ्या शुभेच्छा !

--- ००० ---

19-04-23.

भवताल आणि भयताल (कवितासंग्रह)

कवी ० दीपक बोरगावे, प्र ० सम्यक विद्रोही प्रबोधन संस्था, कोल्हापूर.

-चंप्र देशपांडे

१९७६ ते ७९ या काळात मी कोल्हापुरात होतो. तेव्हा आम्ही ‘ प्रत्यय ‘ या समूहाची स्थापना केली होती. त्यात अनेक लेखक, कवी, चित्रकार, दिग्दर्शक, अभिनेते वगैरे होते. वाचने व चर्चा खूप चालत. त्यात आताचे डॉ. दीपक बोरगावेही सामील असत. नंतर आमचे भौतिक, मानसिक मार्ग वेगळे होत गेले, तो भाग वेगळा. इथे फेसबुकवर बोरगावे सरांचे दर्शन नेहमीच होत होते, पण, अलीकडेच त्यांची प्रत्यक्ष भेट झाली. त्या वेळी त्यांच्याकडून मला हा सदर कवितासंग्रह सप्रेम भेट मिळाला. तो वाचून झाल्यावर मित्रत्वाच्या नात्याने हा अभिप्राय लिहीत आहे.

या संग्रहातल्या कविता प्रामुख्याने शोषित-वंचितांची दु:खे व्यक्त करणे आणि विशेषत: समतेच्या चळवळींतल्या महात्म्यांचे मोठेपण व्यक्त करणे, अशा आहेत. या सर्व कवितांच्या मुळाशी सामाजिक समतेची तीव्र इच्छा असल्याचे प्रभावीपणे जाणवते. कला वा कविता ही परिवर्तनाचे साधन असायला हवी ही एक प्रगाढ निष्ठा यामागे आहे. विषमतेची व्यवस्था बदलण्याची आच आहे. या कविता त्यांचे जीवितकार्य चोखपणे करत राहतील यात शंका नाही. माझे

कलेबाबतचे आकलन वेगळे असते. कला हे साधन नसून साध्य आहे, असे मला वाटते. कला ही स्वत:च्या असण्यातच परिपूर्ण म्हणजे समतायुक्तच असणे, हे मला महत्त्वाचे वाटते. विशेष म्हणजे या दृष्टीनेही ‘ पोचतील ‘ अशा काही कविता या संग्रहात आहेत. त्यांतल्या तीन कवितांबद्दल थोडक्यात बोलायचा विचार आहे.

(एक) इथं काहीतरी

इथं काहीतरी
जळल्याचा वास येतोय
गादीवर सिगारेटचं थोटकं तर टाकलं नाहीस ना?
खिडकीही उघडीच आहे
बाहेर काही जळत असेल का ?
कुठून येतोय हा वास
काही समजत नाही
कुठेतरी नक्कीच जळत असलं पाहिजे
जरा खाली जाऊन पाहतोस का?
शेजाऱ्यांनी धूर केला की काय?
काय वैताग आहे!
ऑफिसातही हाच वास होता
काही लागण तर नसावी ?
काहीही होऊ शकते हो !
धुराचाही नवा संसर्ग असू शकतो ?
काही कळत नाही
पोरांना खालीच घेऊन गेलेलं बरं
ती बिचारी कारण नसता आजारी पडतील
नक्की समजेल का उद्या ?
काही भरोसा नाही कशाचाच!
इथं काहीतरी
जळल्याचा वास येतोय

(पान ४९).

ही कविता नुसतीच धुराच्या वा गटाराच्या वा उंदीर मेल्याच्या वासाबद्दल आहे, असे मला वाटत नाही. हा एका व्यापक अवकाशातला, मानवी जगणेच धोक्यात आणणारा वास आहे. बाहेर त्याचा उगम सापडत नाहीय. कारण तो वास सडत

चाललेल्या मनाचा आहे. धर्म, जात, भाषा वा विचारसरणी यांच्याशी होणाऱ्या समरूपतेच्या घट्ट स्थितिशीलतेतून तयार होणाऱ्या डबक्याचा हा वास आहे. हे मानसिक जळत राहणे, नष्ट होत राहणे आहे. हे भान देणे हेच इथे कवितेचे परिपूर्ण काम आहे.

(दोन) वर्तुळे

एक वर्तुळ अगदी वर, त्यात अनेक वर्तुळे
आजूबाजूलाही अनेक त्याच्यातूनच फुटलेली
शिवाय, प्रत्येकांत लपलेली अनेक छोटी वर्तुळे
हीही उपस्थित अनेक मोठ्या वर्तुळांत
एकमेकांना छेदून बाहेर पडू पाहणारी
केंद्रापासून
पण परिघावरच लोंबकळणारी
ह्या छोट्या वर्तुळांखाली
त्यांच्या मधोमध अजून अनेक वर्तुळे
फिरतात अगदी वरच्या वर्तुळात
म्हणजे तसा प्रयत्न असावा त्यांचा
प्रत्येकांची केंद्रे ही वेगवेगळी
तीही फिरतात एका तिसऱ्याच केंद्रातून
वरचे वर्तुळ हे वरच जाणार
आणि खाली सरकणारे केंद्र
हे वर कधी जाईल, हे सांगता येणार नाही
वर्तुळांच्या ह्या हालचाली
अगदी हैराण करणाऱ्या
केंद्रांची वर्तुळे बनत
इतिहासाची चाके वर्तमानात बदलतात
एक वर्तुळ अगदी वर त्यात बरीच वर्तुळे
आजूबाजूलाही अनेक त्याच्यातूनच फुटलेली
(पान ८०).

ही कविता, समूह आणि व्यक्ती यांच्या व्यामिश्र रचनांची अनाकलनीय अस्तित्वे व्यक्त करते. केंद्रे हलतात, बदलतात – वर्तुळांच्या हालचाली हैराण करतात. हे वेगवेगळ्या प्रकारे पण एकमेकांवर परिणाम करत चालणारे मानवी जगणे आहे. '

इतिहासाची चाके वर्तमानात बदलतात ' ही यातली मर्म-ओळ आहे. इतिहासाच्या प्रभावाखाली वर्तमान आहे. तसेच, वर्तमानाच्या सोयीने भूतकाळही बदलतो आहे. काळालाही जणू वस्तुनिष्ठ परिमाण राहिलेले नाही. आपापल्या मन:स्थितीप्रमाणे भूतकाळ पाहिला व सादर केला जातो आहे.

(तीन) आपण हा प्रश्न उद्या सोडवू

पाच पन्नासची लोकलाय

चल मी निघतो

जाशील रे माहिताय अजून चिकार वेळाय

मी काय म्हणतोय

प्रत्येक व्यवस्थेत कलेचे एक मूल्य असतंच

भांडवली व्यवस्थेचाही इथे अपवाद करता येणार नाही

वर्गीय संघर्षाचा प्रश्न नाही रे हा

जातीचे काय करणार?

हा तिढा कायम आहे

कलेच्या माध्यमातून हे सोडवता येईल रे थोडंस्स

ते तू कर

बघ काय होतंय ते?

जातीचं काय झालंय माहिताय

आपल्या देशात तरी किमान

ती आपल्याच शरिराला चामड्यासारखी चिकटलीय

ती इतकी घट्ट आहे की

तिला काढून टाकणं म्हणजे

कठीणच

अरे ही अडक आपणांसच काढाय पाहिजेल

ते खराय रे; पण काय झालंय माहिताय?

चल, मला निघाय हवं माझी लोकल चुकेल

आपण हा प्रश्न उद्या सोडवू

(पान ११३).

ही काहीशी लाईट व उपरोधिक टोनमधली कविता आहे. कलेची मूल्यात्मकता आणि प्रत्यक्ष जगणे यांतले अंतर इथे उघडे पाडले जातेय. इथे जात जणू घट्टपणे शरीराची चामडीच बनून चिकटलेली आहे ! या प्रश्नावर ना निराकरण आहे ना

तसे काही सापडण्याची आशा आहे. हा मानवी मनाच्या समरूपतेचा प्रश्न आहे. जातीशी समरूप असण्यात सुरक्षित वाटण्याची ही समस्या आहे. याची का गरज पडावी ? कोणत्या असुरक्षिततेमुळे मन हे जात, धर्म, भाषा वा विचारसरणी यांना बिलगून राहू इच्छिते ? – हा प्रश्न नुसताच सामाजिक म्हणून नाही पाहता येत. मग करावे काय ? तेही नाही कळत ! त्यामुळे या प्रश्नापासून पळच काढण्याची एक उथळ युक्ती इथे कामाला येते आहे ! निर्भीडपणे हे इथे व्यक्त झालेले आहे. एकदा तुम्ही कविता वाचकाकडे सोपवलीत की, त्या कवितेशी प्रतारणा न करता का असे ना, पण ती वाचण्याचे आणि समजून घेण्याचे स्वातंत्र्य वाचकाला असते ! कवीचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य जितके महत्त्वाचे असते तितकेच वाचकाचे वाचनस्वातंत्र्यही महत्त्वाचे असते ! – असे काही या निमित्ताने म्हणावेसे वाटते !

--- ००० ---

21-06-23.

नाटक सांगोपांग (समीक्षा)

ले ० नीलकंठ कदम, प्र ० शब्दालय प्रकाशन.

नीलकंठ कदम हे माझे एक जुने मित्र आहेत. ते गेली अनेक वर्षे अनेक नियतकालिकांतून व वर्तमानपत्रांतून नाट्य-परीक्षणे लिहीत आलेले आहेत. समक्ष बोलण्यातून वा गप्पांतून सामाजिक-राजकीय भूमिकेबाबतचे त्यांचे आग्रह जाणवत असले तरी ती चौकट त्यांच्या कामाला बाधित करताना दिसत नाही. प्रत्येक नाटकाला त्या त्या नाटकाच्या ' असण्या ' प्रमाणे प्रतिसाद देण्याची कुवत असलेले हे समीक्षक आहेत. त्यांच्या या पुस्तकात वेळोवेळी त्यांनी लिहिलेली नाट्य-परीक्षणे समाविष्ट आहेत. ती अर्थातच दर्जेदार म्हणावीत अशी आहेत. ' शोभायात्रा ', ' यळकोट ', ' अधांतर', ' रणांगण ', (माझे) ' ढोलताशे ' अशा अनेक नाटकांची परीक्षणे इथे आहेत. शिवाय, प्रेमानंद गज्वी, दत्ता पाटील, श्याम मनोहर अशा काही लेखकांवरचे लेखही आहेत. त्यामुळे अभ्यासकांना आणि नाट्यकर्मींना इथे रंगभूमीवर काय काय कसे कसे घडत आलेले आहे याचे सहजच भान मिळते. कदमांची परीक्षणे ही नुसती गोषवारा देणारी नसून त्यांना जाणवलेल्या त्या त्या नाटकांच्या वैशिष्ट्यांनी आणि बारकाव्यांनी युक्त अशी आहेत. सारांश म्हणजे हे एक चिंतनशील समीक्षक आहेत. नाटकातल्या जीवनप्रवाहाला ते सहज सामोरे जाताना दिसतात. या पुस्तकामुळे कदमांची ही मूल्यात्मकता विशेषत्वाने जाणवली. आणि हेही आले लक्षात की कदमांच्या योग्यते एवढे लक्ष काही नाट्यक्षेत्रात त्यांच्याकडे दिले गेलेले नाही. खरे तर हे समीक्षक आणि प्रशिक्षक दोन्ही आहेत.

नाट्य-परीक्षणांबाबत एकत्रितपणे वाचल्याने हे काही, आजवर नीट लक्षात न आलेले तर समजलेच पण त्याहून महत्त्वाची म्हणावी अशी एक गोष्ट लक्षात आली. कदमांनी लिहिलेल्या काही नाटकांच्या संहितांच्या आस्वादक समीक्षा या पुस्तकात आहेत. ते लेखन मराठी नाट्य क्षेत्रासाठी खूप महत्त्वाचे आहे असे मला वाटते. कोणत्याही नाटकाची व्यामिश्रता आणि समग्रता समजण्यासाठी खुले आणि पूर्वग्रहविरहित मन असणे आवश्यक आहे. तसे मन असलेला हा समीक्षक आहे, हे मला माहीतच नव्हते. कदाचित बऱ्याचजणांना ते माहीत नसेल. या पुस्तकामुळे कदमांची नाट्यसंहितेची आस्वादक

समीक्षा या प्रकारातली महारत विशेष लक्षात आली. हे नव्याने घडले. कविता, कथा, कादंबरी यांच्या आस्वादक समीक्षा आहेत पण नाटकाच्या संहितांबाबत या प्रकाराचा अभावच दिसतो. कदमांची या प्रकारच्या लेखनातली क्षमता पाहता त्यांनी किमान दहा तरी त्यांना चांगल्या वाटणाऱ्या नाटकांच्या आस्वादक समीक्षा लिहाव्यात असे इथे सुचवावेसे वाटते. नाटक पाहण्याचे / समजून घेण्याचे ते उत्तम वस्तुपाठ ठरतील यात शंका नाही.

या पुस्तकात, विशेषत: ‘ डॉ. हुद्दार ‘ या नाटकावरचा सविस्तर लेख पाहावा. सार्त्रच्या ‘ क्राईम पॅशनेल ‘ या नाटकाचे श्री. ना. पेंडसे यांनी केलेले हे नाट्यरूपांतर आहे. (याच नाटकाचे रूपांतर दिलीप जगताप यांनीही ‘ रंगे हाथ ‘ या नावाने केलेले आहे.) या नाटकात विचारांचे गुंते आणि मनातली आंतरद्वंद्वे यांची एक खूप व्यामिश्र अशी प्रक्रिया घडत जाते. ती खुल्या मनाने पाहात जाण्याला कदमांनी त्यांच्या या लेखात दिलेली अभिव्यक्ती खास दाद द्यावी अशी आहे.

उदाहरणादाखल हा उतारा बघा --

“ नाट्यवस्तूच्या संदर्भात बॉंबस्फोटाचा विचार करू जाता प्रत्ययाला येते ते असे की, चंदन आणि हुद्दार यांच्यामधल्या विरोधाचे सूचन होणे, चंदाने हुद्दारांच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होणे, खुनाची कृती करावी किंवा नाही, ह्या मानसिक आंदोलनात सापडलेल्या चंदनच्या हातून प्रत्यक्ष कृती न घडणे, त्यामुळे त्याला स्वत:च्या भेकडपणाचा प्रत्यय येऊन व्यक्तिमत्व-लोपाच्या दुःखद अनुभवाला सामोरे जावे लागणे, अशा विविध अनुभवघटकांना साक्षात करून आणि ' पुढे काय ' अशी विलक्षण उत्सुकता निर्माण करून हे दृश्य समाप्त होते. नाट्यवस्तूच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरावे असे हे दृश्य आहे. “

एवढे सगळे जाणवणे हे मन लवचिक, तरल, खुले असल्याशिवाय शक्य नाही. हा पूर्ण लेखच या विशेष कुवतीसाठी वाचण्यासारखा आहे. नाटकात जे जे घडत जाते ते ते आणि जे जे बोलले जाते ते ते असे सर्व एकत्रितपणे पाहण्याचा जिवंतपणा असल्याशिवाय हे घडू शकणार नाही. एखाद्या चांगल्या कलाकृतीची समृद्धी अशी जाणवत जाणे आणि ती मांडलीही जाणे हे कला क्षेत्रातले एक महत्त्वाचे घटित समजायला हवे. याच प्रकारची संवेदनशीलता आणि नाटकाच्या प्रक्रियेतले अनेक बारकावे जाणवत जाणे आणि ते नीट मांडले जात राहणे हे कदमांच्या ‘ आत्मकथा ‘ या एलकुंचवारलिखित नाटकावरच्या लेखातही प्रत्ययाला येते. हीच किमया अगदी नव्या पिढीचा लेखक असलेल्या धर्मकीर्ती सुमंत याच्या ‘ गेली एकवीस वर्षे ‘ या नाटकावरील लेखातही जाणवते.

कदमांची नाट्यसमीक्षा ही नुसती माहितीपूर्ण गोषवारा अशा प्रकारातली नाही. लेखकाला जे काही म्हणायचे आहे ते सर्व समजून घेत त्याहूनही अधिक अशा प्रत्यक्ष जगण्याच्या परिप्रेक्षात ही समीक्षा नाटकाकडे पाहते. त्यामुळे, हे पुस्तक म्हणजे नुसताच एक माहितीपूर्ण संदर्भग्रंथ झालेला नसून हा एक नाटक ‘ जाणवून ‘ घेण्याच्या प्रक्रियेचा वस्तुपाठही झालेला आहे. प्राध्यापक, विद्यार्थी, अभ्यासक, नाट्यकर्मी इतकेच काय इतर नाट्यलेखकांनाही काही ‘ देणारा ‘ असा हा ग्रंथ आहे. यासाठी कदम आणि शब्दालय प्रकाशन यांना मन:पूर्वक धन्यवाद !

--- चं. प्र. देशपांडे.

--- 000 ---

नायिकेचा आदिबंध आणि मलिका अमरशेख यांची कविता

ले ० डॉ. सुप्रिया आवारे, प्र ० वर्णमुद्रा पब्लिशर्स.

१. आता माझ्यासमोर जगण्या मरण्याचे प्रश्नयत. ते आता जास्त महत्त्वाचेयत. की जसं एखाद्या हमालाला, फुटपाथवर राहणाऱ्याला बाकीचे प्रश्न नसतात. त्याला दोन वेळची भाकरी मिळवणं हे महत्त्वाचं असतं. तो हिंदी पिक्चरमधलं घर बघतो आणि समाधान पावतो. (पान २५२).

२. तेव्हा निर्णय घेणं ही सुद्धा एक जबाबदारीय. जगण्याची जबाबदारी घेणं ही सुद्धा एक जबाबदारी होते आणि त्याचं ओझं होतं. आता जगायचं कसं ? जगण्याचं ध्येय कायय, त्याचं श्रेयस कायय ? आहे की नाही ? हे जे सगळे प्रश्नयत जे पोटाची खळगी भरण्याव्यतिरिक्त पडलेले प्रश्नयत , ते सनातन आहेत. जे संतांनी पण विचारले आणि बाकीच्या लोकांनी पण विचारले. त्याकडे हा अस्तित्ववाद घेऊन जातो आणि मुळात आपण आपल्या अस्तित्वाला प्रश्न विचारणं इथूनच खऱ्या ज्ञानाची सुरुवात होते. तुम्हाला सत्य कायय माहीत नसतं. त्याही पलीकडे सत्य असेलच असं नाही. मे बी नसेलही. (पान २५९-६०).

--- ही दोन उद्धृते आहेत मलिका यांच्या मुलाखतीतली, काही प्रश्नांबाबत बोलताना त्यांनी दिलेल्या उत्तरांतली.

याचप्रमाणे, त्यांचा ' भीषण गर्म हवा ' हा संग्रह २०२१ साली प्रसिद्ध झाल्यावर लिहिलेल्या ' परिशिष्ट १ ' मध्ये डॉ. आवारे लिहितात, "शेकडो वर्षे एका त्रासातून दुसऱ्या त्रासामध्ये अस्तित्वालाच कंटाळा आला आहे असं ती म्हणते. हा प्रवास मनुष्यजातीचा आहे तसाच तो स्त्रीजातीचाही आहे. परंतु अशा संघर्षाकडे पाहण्याची मलिकाची दृष्टी स्त्री-पुरुष भेद टाळून अधिक विस्तारत जाताना दिसते. या ताणातून सुटका करून घेताना ती एक पर्याय म्हणून पाहते की,

या नको असलेल्या अस्तित्वाचं पुन्हा कशात तरी रूपांतर करावं

की या अस्तित्वाला कुलूप लावून बिनबोभाट गुपचूप पळून जावं

परंतु अस्तित्वाचं दार बंद करणं हे मरणसदृश आहे. आत्यंतिक दबावामुळे रूपांतरणाऐवजी संपून जाणं स्वीकारावं हे सकारात्मक असत नाही. जाणं-येणं हा खरं तर अध्यात्माचा विषय येथे वैश्विक बनून येतो. प्रत्येक मनुष्याला व प्रत्येक काळाला कंटाळा आणणारं हे जाणं-येणं आहे, " (पान २७२).

यावरून एक लक्षात येते की मलिका अमरशेख यांच्या कवितेतला विद्रोह वा स्त्रीवाद हा तुकड्यांचा नसून समावेशक आहे. पुरुषसत्ताक व्यवस्था, स्त्रीचे शोषण हे विषय तर आहेतच पण त्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोण हा एखाद्या बाजूचा वा एखाद्या शत्रुत्वाचा नाही आहे. त्यामुळे या कवितेला नुसत्याच एखाद्या चळवळीचे रूप न राहता तिला अधिक मूलभूत असे ' आदिबंधात्मक ' रूप येते. एका ठिकाणचे हे एक महत्त्वाचे विवेचन पहा –

" शरीरसंबंधाविषयी मलिकाने -- स्त्रीने घेतलेली भूमिका मराठी काव्यप्रांतात महत्त्वपूर्ण व प्रथमच आहे. कवयित्रीला दोघांनाही मिळालेला सेक्सचा अधिकार सर्वात मोठ्या पारितोषिकासारखा वाटतो. ती नव्या जगात प्रवेश करताना मानवाला शरीर संबंधानं येणारा अधिकार प्रथम मिळवू इच्छिते. तिच्या नवीन जगाच्या बांधणीतली ही मानवतावादी

भूमिका आहे. त्या आधारित नवं जग तिला अपेक्षित आहे. हा आनंद अस्सलपणे उपभोगणाऱ्या काल्पनिक नेणीवेचं चित्र ती रेखाटते. ते दोघांनाही आदिम
स्त्री-पुरुषापर्यंत घेऊन जाणारं आहे. “ (पान ११७).
मलिका अमरशेख यांच्या कवितेचा अत्यंत आत्मीयतेने धांडोळा घेणारे हे पुस्तक आहे.

--- ००० ---

एकटे दुकटे शेर

कवी – चंद्रशेखर सानेकर, प्र ० ग्रंथाली

यातले सगळेच शेर सगळ्यांना आवडतील असे नाही. वेगवेगळे शेर वेगवेगळ्यांना आवडू शकतील. मला चांगले वाटलेले खाली देतोय –

आपापली सगळ्यांनी तलवार उपसली आहे
पण कोणाशी लढायचे हे कोणी जाणत नाही ०८
आपण अपुले एकाकीपण कोणावरही लादत नसतो
म्हणजे दारू पीतानाही दोस्त आपला सोबत नसतो १६
तुझ्या नि माझ्या प्रेमाचा ज्या वेळी करार ठरला
देवाने माझ्यात भास अन तुझ्यात पारा भरला १७
अश्रू पुसणे देवालाही आता झेपत नाही
काळाचाही रुमाल आता विटका झाला आहे ३२
त्या रणरणत्या उन्हास आपण शिव्या देत होतो तेव्हा
एक झुळुक आली होती पण आपण ती जगलो नाही ३८
पडताना असतो थकवा, उठतानाही असतो थकवा
रात्र एक अफवा आहे की झोप हीच आहे अफवा ४७
मला फक्त आवडला होता एक प्रश्न अनवटसा
कैक उत्तरांनी माझ्यावर चिडून हल्ला केला ४८
तिचीच तुजला लागत आहे ठेच सतत
तुझ्या मनावर पडली आहे जी आठी ५३
उदास होण्याचीही इच्छा उरली नाही
काळ मनाला भीषण रोगी करतो आहे ५८
कुणास ठाउक कुठे भटकते, कुठून येते

माझ्यापेक्षा झोपच माझी थकून येते ५९
कापरा आवाज, मुद्दे शुन्य, धूसर शब्दही
बघ, किती अंदाजवाणे बोलतो आहेस तू ८१
सोडून जावे असा दुरावाही नाही
जवळ यायला छान बहाणाही नाही ८२
गाभ्याविषयी तुला तेवढी आस्था नाही
कलेवराची तुला जेवढी चिंता आहे १०२
एका महान सत्याचा सत्कार सोहळा आहे
आणिक तोही असंख्य बेवारस अफवांच्या हस्ते १११
युद्धाने थकलेल्या दुनियेची ही मजबूरी आहे
युद्धाशिवाय परवडणारा दुसरा विरंगुळा नाही ११२
गरुडाचे कौतुक करताना हजारदा तू विचार कर
फक्त कावळ्यांची वस्ती जर तुझ्या भोवताली आहे ११३
तो माझा आरसा फोडतो हे नाही भय माझे
मीच सतत माझ्या चेहऱ्यावर शंका घेतो आहे ११५
हवा बिघडली आहे की आकाशच थकले आहे ?
अनेक पक्ष्यांना पंखांचे ओझे होते आहे ११६
आजवरी जे काही केले तंद्रीतच केले सगळे
गुजराणच केलेली नाही कुठल्याही भानावर मी १४०
एथवर आलास तर जाणीव ही टाकून दे !
गाठले आहेस आता टोक तर, झोकून दे ! १४१
एकमेकांची भोके झाकली एवढी त्यांनी की –
एक ठिगळ दुसऱ्या ठिगळाला मानपत्र देते आहे १४४

--- नुसतीच शाब्दिक चमत्कृती नव्हे तर जगता जगता बसलेले हे ‘ अर्थधक्के ‘ आहेत. प्रत्यक्ष जगताना जर जागे असणे घडत असेल तरच अशा ओळी येणे शक्य आहे.

यावर वेगळा अभिप्राय काय देणार ?

हाच अभिप्राय समजावा.

--- ००० ---

गझलच्या उजेडात गझल

ले ० चंद्रशेखर सानेकर, प्र ० ग्रंथाली.

सुरुवातीच्या मनोगतात सानेकर म्हणतात, "काटेकोर चिकीत्सकाच्या नजरेला हे चिंतन ढोबळ व भरड वाटू शकतं याचंही मला भान आहे. " हे तितकेसे खरे नाही. मुळात गझल या विषयावर असे विश्लेषक लेखन आहे किती मराठीत, हा एक प्रश्नच आहे. सानेकरांनी ती पोकळी नक्कीच बरीच भरून काढलेली आहे. सानेकर स्वत: एक चांगले गझलकार असून त्यांना या काव्यप्रकाराबाबत प्रचंड आत्मीयता आणि आच आहे. त्याच प्रेमाने त्यांनी या विषयाचा सखोल अभ्यासही केलेला आहे, हे या पुस्तकात जाणवते. गझलेची बाह्य वैशिष्ट्ये आणि तीतले सखोल मर्म-प्रदेश यांचे निर्देश सानेकरांनी यथायोग्य भाषेत व्यक्त केलेले आहेत. स्त्रियांनी लिहिलेल्या गझला कमी का आहेत, मराठी कवींना (सुरेश भट सोडून) गझल फारशी का जमली नसावी, अशा विषयांबाबतची त्यांची विवेचने चिंतनीय आहेत. मराठी, हिंदी आणि उर्दू भाषांतल्या काही गझलांचे वेळोवेळी त्यांनी दिलेले दाखले नक्कीच विषयाची जाण वाढवणारे आहेत. कविता आणि गझल यांची त्यांनी केलेली तुलना आणि तीतले काही मुद्दे पटण्यासारखे नसले तरी विचाराला चालना देणारे आहेत. या पुस्तकात अनेक वाक्ये अशी आहेत की जी सानेकरांच्या अनेक वर्षांच्या चिंतनातून आलेली आहेत, हे जाणवते.

नमून्यादाखल खाली काही उद्धृते देत आहे –

" कुठल्याही विचारसरणीची, इझमची, विषयाची पोझ घेऊन, अभिनिवेश घेऊन गझल लिहिता येत नाही. "

" विलक्षण शैलीत, विलक्षण शब्दांत सांगितलेली विलक्षण गोष्ट म्हणजे गझल. "

" कला म्हणजे रासिकाला ' धडा शिकवणं ' नव्हे, तर त्याच्या नकळत कणभर का होई ना त्याला ' समृद्ध ' करणं म्हणजे कला. "

याहून अधिक सूक्ष्म आणि सखोल अशी बरीच आहेत वाक्ये.

या पुस्तकात काही वेळा पुनरुक्तीचा दोष जाणवतो. पण हे काही एखाद्या हुशार अशा शिस्तबद्ध प्राध्यापकाने लिहिलेले पुस्तक नाही. हे एका कवीने लिहिलेले आहे, हे समजून घ्यावे लागेल. यापुढे, कदाचित, अशी पुस्तके वा समीक्षात्मक टिपणे ही स्वत: लेखक-कवी असलेल्यांनाच लिहावी लागतील, अशी शक्यता आहे. अशी कामे करतील असे फारसे कुणी दृष्टीपथात नाहीत. सर्व सांस्कृतिक विकासाला आता इथले राजकारणाचे क्षेत्र पुरेसे आहे !

सानेकरांचा एक शेर –

" तू गझलेच्या वाट्याला जाऊस नको

तुला एकले असणे जर झेपत नाही "

तसे तर हे सर्वच कलेला लागू होईल. कला हे टोळीचे क्षेत्र असूच नाही शकत. अनेक मोठमोठ्या कलावंतांनी हे वेगवेगळ्या प्रकारांनी सांगितलेले आहे.

--- ००० ---

मित्रवर्य कै. ना. धों. महानोर

महानोर गेल्याचे कळले. वाईट वाटले. आम्ही दोघेही साधारण एकाच सुमारास ‘ सत्यकथे ‘ त लिहू लागलो होतो. त्यांना आणि मलाही सत्यकथेत बऱ्यापैकी फूटेज मिळत असे. गीत आणि कविता यांत एक अंतर मानले जाते. ते अंतर खूप कमी करणारे कवी म्हणजे आरती प्रभू आणि ना. धों. महानोर. शिवाय राजकीय क्षेत्रातही त्यांचा वावर होता. मुख्य म्हणजे ते एक अभ्यासू शेतकरी होते. शेती या विषयावरचे त्यांचे लेखनही वाखाणले जात असे. तशा आमच्या भेटी दोनचारच झाल्या असतील, पण, एकमेकांचे लेखन वाचून निर्माण झालेला स्नेह होता.

त्यांची एक आठवण सांगतो. २०-०२-८० ला जळगाव जिल्ह्यात एका दिवशी, सेंट्रल बँक ऑफ इंडिया या आमच्या बँकेच्या अकरा शाखा सुरू होणार होत्या. उद्घाटनाचे आयोजन वगैरे ज्या त्या शाखेच्या मॅनेजरवर सोपवण्यात आले होते. माझी प्रथमच मॅनेजर म्हणून लोहारा या शाखेसाठी नेमणूक झालेली होती. माझ्या शाखेपासून जवळच शेंदुर्णी आणि तिथून जवळच पळसखेड, हे महानोरांचे गाव हे मला माहीत झालेले होते. मला आमच्या शाखेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते व्हावे असे वाटत होते. त्यांना तशी विनंती करण्यासाठी त्यांच्या गावी जाणे आवश्यक होते. त्यासाठी बँकेचे काही उच्च अधिकारी जीप घेऊन आले. “ ते येतील या कार्यक्रमाला ? “ त्यांनी मला विचारले. म्हटले, बघू तर विचारून, चला. आणि आम्ही तिकडे गेलो. महानोरांनी आनंदाने आमचे स्वागत केले. मी बोलायला सुरुवात केली – “ मी श्याम मनोहरचा मित्र (त्या वेळी आम्ही जिगरी दोस्त होतो !) या बँकेत इथे मी मॅनेजर म्हणून येतो आहे. मीही सत्यकथेत लिहीत असतो, कदाचित तुम्ही काही वाचलेही असेल. मी चंद्रकांत देशपांडे. “ इथे मला त्यांनी थांबवले. “ म्हणजे, चंद्रकांत प्रभाकर देशपांडे – “ ते म्हणाले. “ होय “, मी म्हणालो. यावर ते म्हणाले की, " श्यामच्या ओळखीची गरज नाही, तुलाच मी ओळखतो. बोल – “ मग मी त्यांना काम सांगितले. त्या दिवशी दुसरे काही नाही ना हे पाहून घेऊन ते म्हणाले, “ तुला मी नकार देऊच नाही शकणार. येईन ! “ आमचे उच्च अधिकारी चकित झाले ! या आपल्या एका साध्या मॅनेजरच्या शब्दाचे इतके वजन ? त्यानंतर महानोरांनी स्वत: आमच्याबरोबर येऊन त्यांची शेती आम्हाला दाखवली. मग परतीच्या मार्गावर असताना आमच्या अधिकाऱ्यांना, मीही कविता लिहितो, वगैरे माहिती दिली. आमच्या त्या समारंभाला अध्यक्ष म्हणून आम्ही, बहुतेक माजी सभापती, गजाननराव गरुड यांना बोलावले होते. कार्यक्रम दणक्यात झाला ! सारांश, एका राष्ट्रीयीकृत अशा मोठ्या बँकेची एक शाखा एका कवीच्या हस्ते सुरू करण्याचे पुण्य आणि आनंद मला मिळाला ! कवी असल्यामुळे ‘ वट ‘ दाखवता येण्याचा आयुष्यात घडलेला तो एकमेव महान प्रसंग !

तर असे प्रिय स्नेही असलेल्या महानोरांच्या स्मृतीस हार्दिक अभिवादन !

--- ००० ---

हरी नरके सर

' स्नेहशील विचारवंत ' या अपवादात्मक विभागात शिरोभागी घ्यावेत असे होते हरी नरके सर ! सुरुवातीला फेसबुकवर आमच्या मैत्रीपूर्ण लढती झाल्या होत्या , पण, स्नेह हाच पाया होता ! पुस्तक पेठेत आमची भेट झाली तेव्हाचा हा फोटो

आहे. ही अर्थातच एक महत्त्वाची आठवण म्हणून माझ्या संग्रही असेल ! पठारे सरांबरोबर नरके सरांनी आपल्या मराठी भाषेसाठी खास कष्ट घेतलेले आहेत ! ते त्यांचे प्रयत्न फलद्रूप होवोत हीच या प्रसंगी शुभेच्छा !
सरांच्या स्मृतीस आदरपूर्वक अभिवादन !

आता अमेझॉन वरही उपलब्ध --

Char Purusharthanchi Char Natake | चार पुरुषार्थांची चार नाटके

एक नाटकाकार आणि काही नाटके

ले 0 सुधीर रसाळ, प्र 0 विजय प्रकाशन

10-11-22 ला प्रकाशित झालेले समीक्षेचे हे पुस्तक मराठी समीक्षेतले एक उत्तुंग शिखर ठरावे, असे आहे. यात खानोलकरांचे, ' एक शून्य बाजीराव ', तेंडुलकरांचे, ' सखाराम बाइंडर ', खाडिलकरांचे, ' सवाई माधावरावांचा मृत्यू ', तारा वनारसे यांचे, ' कक्षा ' हे नाटक यांबरोबरच एलकुंचवारांच्या नाटकांवर एक सविस्तर लेख असा महत्त्वाचा ऐवज आहे. त्याचबरोबर, मला आस्वादक समीक्षेचा, एखाद्या नाटकाची उत्तुंगता, सूक्ष्मता आणि खोली यांचे दर्शन घडवणारा असा आणि आपल्या जगण्यात एक दार्शनिक भान देणारा लेख वाटला तो म्हणजे, या पुस्तकात तीन भागांत असलेला, शेक्सपियरच्या ' किंग लिअर ' या नाटकावरचा ' राजा लिअर : सत्तासंघर्षाचे नाट्य ' हा लेख ! आपल्या नाट्यसमीक्षेत निव्वळ अपवादात्मक म्हणावा, असा हा लेख आहे. याच्या प्रारंभीच रसाळ सांगतात की त्यांनी शेक्सपियरचे हे मूळ नाटक वा त्यावरची इंग्रजी समीक्षा वाचलेली नाही. त्यांचे हे संपूर्ण लेखन, गो. वि. करंदीकरांनी केलेल्या मूळ नाटकाच्या ' राजा लिअर ' या अनुवादित नाटकाच्या वाचनावर आधारलेले आहे. समीक्षेचा हा एक विशेष प्रकार म्हणावा लागेल. इथे एक लक्षात घ्यायला हवे. त्या काळात मुंबई विद्यापीठात इंग्रजी विषयातले तीन प्राध्यापक विशेष ख्यातनाम होते – प्रा. बॅनर्जी, प्रा. होमाई जे. श्रॉफ (ज्यांचा मी विद्यार्थी होतो) आणि तिसरे आपले विंदा करंदीकर. त्यामुळे, त्यांनी केलेला अनुवाद हा मूळ संहितेशी नक्कीच एकनिष्ठ असणार असे आपण मानू शकतो. शिवाय, याला आणखी एक आधार म्हणजे, या अनुवादित नाटकाचे, कोल्हापूरच्या ' प्रत्यय ' या संस्थेने भारतभर प्रयोग केले होते आणि ते वाखाणलेही गेले होते. हे पाहता, रसाळ, प्रास्ताविकात जे म्हणतात की, " कुठल्याही दोन भाषांत साहित्यकृतींची भाषांतरे जशी होत राहिली पाहिजेत तसेच भाषांतरित साहित्यकृतींच्या आकलनांचीही भाषांतरे होत राहिली पाहिजेत. ही प्रक्रिया दोन भाषांतील अभिजात साहित्यकृतींबाबत घडणे अधिक उपयुक्त असते. " – याचे उत्तम उदाहरण म्हणून या समीक्षेकडे पाहता येईल. ही समीक्षा इंग्रजीत अनुवादित झाली तर नक्कीच योग्य त्या सन्मानानेच वाचली जाईल, यात शंका नाही. या तीन प्रदीर्घ लेखांच्या शेवटी, रसाळ म्हणतात, " केवळ सत्ताप्रेरणेचीच नव्हे तर एकूण मानवजीवनाची अर्थपूर्णता हे नाटक अभिव्यक्त करते. एकूण सृष्टी, तिचे आणि मानवाचे नाते, मानवनिर्मित समाज आणि माणसामाणसातील नाती, मानवाच्या ' मानव ' म्हणून मर्यादा आणि त्याची दु:खे अशा अनेक गोष्टींची अर्थपूर्णता प्रकट करणारे हे एक महान नाटक आहे. " या

निष्कर्षापर्यंत रसाळ कसे येतात हे वाचत जाणे, ही एक अमर्याद कलानंदाची गंभीर प्रक्रिया आहे, हे नक्की. अशी समीक्षा लिहिता येण्यासाठी समीक्षक स्वत:ही कसा एक सर्जक आणि खुल्या दिलाचा माणूस असावा लागतो, हे इथे कळते. ही समीक्षा कुणाला कशी रुचेल अशा विचाराचा मानसिक अडथळा असता तर ही अशी निर्भय, मुक्त समीक्षा शक्यच झाली नसती. निर्भयतेबरोबरच ही समीक्षा निर्भीडही आहे. एका ठिकाणी रसाळ, शेक्सपियरच्या नाट्यांतर्गत काळात कशी एक चूक झालेली आहे, तेही दाखवून देतात.

खानोलकरांच्या, मराठीत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या पण नऊदहा प्रयोगांतच आटोपलेल्या, ' एक शून्य बाजीराव ' या नाटकावरचा रसाळांचा लेखही असाच मनस्वी आणि संग्राह्य झालेला आहे. त्यातही त्यांचे एक मत ते स्पष्टपणे मांडतात की यातल्या गर्भनाट्याचा आणि या मूळ नाटकाचा नीट मेळ बसत नाही. तेंडुलकरांच्या ' सखाराम बाइंडर ' वरचा रसाळांचा लेखही असाच ताकदवर झालेला आहे. ते म्हणतात, " वास्तवाचा स्वीकार करता करताच या वास्तवाला पाठमोरे होण्याची तेंडुलकरांची वृत्ती या नाट्यलेखनात प्रथमच संपुष्टात आलेली आहे. उघड्या डोळ्यांनी, एक प्रकारच्या गृहीतनिरपेक्ष वृत्तीने तेंडुलकर इथे वास्तवाला सामोरे जाताना दिसतात. अशा प्रकारे वास्तवाला सामोरे जाणे ही खरे म्हणजे कलानिर्मितीची प्राथमिक आणि अपरिहार्य अवस्था आहे. हे नाटक वास्तवाला धीटपणे सामोरे जाते आहे म्हणून ते लक्षणीय आहे, असे नव्हे. अशा वास्तवाची एक अर्थपूर्ण संघटना बांधण्यात ते यशस्वी झाले आहेत म्हणूनच त्यांचे हे नाटक लक्षणीय मानायला हवे. " या वाक्यापर्यंत रसाळ कसे येऊन पोचतात ते वाचणे हे कलेच्या प्रांतात अतीव उद्बोधक ठरेल यात मला शंका वाटत नाही. एलकुंचवारांवरच्या प्रदीर्घ, सखोल लेखात ते म्हणतात, " महेश एलकुंचवारांसंबंधी ' मराठीतील नाटकाच्या कक्षा विस्तारणारे नाटककार ' असे सार्थ विधान करावेसे वाटते. " एखाद्या नाटककारावरचा एक सखोल, अभ्यासपूर्ण लेख म्हणून हा लेख मराठीत कायमच वाचला जात राहील. तसेच ' कक्षा ' आणि ' सवाई माधवरावांचा मृत्यू ' या नाटकांवरचे लेखही वाचनीय आहेत.

प्रत्येक नाट्यकर्मीने, कलाभ्यासकाने आणि वाचकाने/प्रेक्षकाने वाचलेच पाहिजे, असे हे पुस्तक आहे. यात कुणाचे मतभेद होणार नाहीत वा हे सर्वच लेखन सगळेच वाचक आहे असे स्वीकारतील असे नसले तरीही या पुस्तकाचे मराठीतले मोल असाधारण आहे, असे म्हणावेसे वाटते.

--- चं. प्र. देशपांडे.

--- 000 ---

एका चर्चेत, डॉ. सुधीर रसाळ यांच्या कॉमेंटवर मी दिलेला प्रतिसाद ---

" सर, मला जे दिसते ते असे -- मराठी भाषा, ती बोलणाऱ्यांच्या संख्येमुळे जगात 5 वी की 12 वी राहील, पण, साहित्यकला म्हणून ती नष्ट होत चाललेली आहे. लौकरच दार्शनिक तत्त्व असणारे साहित्य इथे कालबाह्य ठरणार आहे. याची खेदखंत कुठे फारशी दिसत नसल्याने ही प्रक्रिया वेगाने होईल असे वाटते. त्यामुळे, ज्याला जे समजते, महत्त्वाचे वाटते, ते त्याने करावे आणि आपण वाळवंटात मुतलो, असे समजून विसरून जावे, असा ' विकासकाल ' चालू आहे ! या

परिस्थितीला प्रतिकार न करता आपले काम करत राहणे -- असे माझे चालूआहे. (म्हणजे, तुम्ही काय स्वत:ला तारणहार समजता की काय, असे म्हणत काहीजण यावर उसळून येतील, हे मला माहीत आहे.) सगळेच नष्ट होणार आहे, हेच खरे समाधान ! "

३१-०८-२३.

हे तुम्ही वाचले आहे का? हे ।आवर्तने। ह्या पुस्तकात आहे. तुम्ही (लोक) ते वाचत नाही म्हणजे काय? ते वाचाच. आणि त्यासह आधीची चंप्रं ची ९० पानी प्रस्तावना सुद्धा.

पूर्वी आमच्याकडे (तुमच्याकडेही असेलच) चहा किंवा कोल्ड्रिंक्स ची जाहिरात ' कडक/ थंड्यात थंड. कडक/ थंड नसल्यास गिलास फोडून पैसे वापिस ' अशी जाहिरात असे, त्या धर्तीवर ' मेंदूला झिणझिण्या न आल्यास पुस्तक फाडून पैसे वापिस! ' असे ह्या पुस्तकाविषयी म्हणता येईल. तेव्हा मागवा आणि वाचा. ' तूही छान मीही छान, आपण दोघे छानच छान! ' पुरे झाले नाही का आता? --- मनोज पाठक.

गणपतीच्या दिवसांत एकदा तरी हे नाटक वाचतोच. खूप आधार मिळतो.

"काकू, तू मला सांग की काय काय म्हणून साजरं करावं... सगळे इतके सण - घरातल्यांचे, नातेवाइकांचे, मित्रमैत्रिणींचे वाढदिवस, उदघाटनं, निरनिराळे वर्षारंभ, ऑफिसचे, दुकानांचे वाढदिवस, नोकरी लागणं, प्रमोशन, मुलांच्या परीक्षांचे रिझल्ट, शिवाय खेळात पहिला, वक्तृत्वात पहिली, शिवाय सत्यनारायण, निरनिराळ्या शांती, रुद्र, मुंजी, साखरपुडे, लग्न, एकसष्ठ्या - असं किती सांगू तुला - हे सगळं रोगट नाही वाटत तुला ? आनंद हा सारखा असा बाहेरून ओरबाडून हावरटासारखा खात राहावा असं वाटणं हा वेडेपणा नाही वाटत ?"

"...आणि धर्मात गर्दीचं काय काम ? स्वतःला एकटं पाडण्याचं काम प्रत्येकाने स्वतः केलेलं आहे, तसंच तो एकटेपणा टाकणंही प्रत्येकाला स्वतःला करावं लागेल. गर्दी, प्रदर्शन, उन्मत्तपणा यांचा धर्माशी काहीही संबंध नाही हे मला स्वच्छपणे पटतं."

('ढोल ताशे' या नाटकातील अक्षय या पात्राच्या संवादांतून) -- विकास पालवे यांची पोस्ट.

' दिक्कालाच्या वाटेवरले अंधारदिवे '

या युद्धविध्वंसाच्या काळात कुणाही सजग माणसाची मनस्थिती दिङमूढ म्हणावी अशी होते. आजच्या (१८-१०-२३) पुणे सकाळ मधली ब्रिटिश नंदी यांची, त्यांच्या ' ढिंग टांग ' या सदरातली ही गद्य कविता जरूर वाचावी. युद्धातून येणाऱ्या विदारक मानवी अवस्थेचे हे एक परिपूर्ण दर्शन आहे !

--- ००० ---

‘चार पुरूषार्थांची चार नाटके’ या संग्रहाच्या निमित्ताने चंप्रंच्या - ढोल ताशे, इराक, बुद्धिबळ आणि झब्बू आणि जणू काही वास्तव - या चार नाटकांचे पुनर्वाचन घडले.

या आधी ही चारही नाटके मी स्वतंत्रपणे वाचली होती. शिवाय, त्यांचे रंगमंचावर सादर झालेले नाट्यप्रयोगही मी पाहिले होते.

आता, चंप्रंनी ‘चार पुरूषार्थांची चार नाटके’ या शीर्षकचौकटीत या चारही नाटकांचा समावेश करून एक अनोखा नाट्यसंग्रह उपलब्ध करून दिला आहे. अनोखा अशासाठी की, स्वतंत्रपणे वाचली होती तेव्हा अनुक्रमे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या पुरूषार्थांचा पदर या नाटकांशी पुढे मागे कधीकाळी जोडला जाऊ शकेल, असे मला वाटले नव्हते. पण आज जेव्हा मी ही चारही नाटके एका ब्रॅकेटमध्ये ठेवून वाचतो तेव्हा मात्र ती संग्रहाच्या थीमला तंतोतंत समर्पक वाटतात. ही नाटके तशी योजनापूर्वक लिहीलेली नाहीत, ओघाओघात ही चौकडी पूर्ण झालेली आहे, असं चंप्र म्हणत असले तरी ही किमया घडलीय हे खरेच !

ज्यावेळेस ही नाटके चंप्रंनी लिहीली असतील त्यावेळेसच त्यांना धूसरपणे का होईना, या नाटकांना लगटून असलेल्या पुरूषार्थांच्या मितींचा अंदाज आला नसेलच, असं वाटत नाही. पण, नाटककार हा स्वतःच्या नाटकांचा सजग वाचकही असतो. आणि जेव्हा आपणच लिहीलेली नाटके तो वारंवार तपासून पाहत राहतो तेव्हा त्या नाटकांत निहित असलेल्या अशा मिती काळाच्या ओघात त्याच्यापाशी ठळक होत जात असाव्यात. चंप्रंचा नाटकांचा हा संग्रह या प्रोसेसची परिणती वाटतो. किंबहुना, चंप्रंना नाटककार म्हणून या नाटकांची ही मिती कदाचित ती लिहीत असतांनाच जाणवली असावी ! त्यांच्या नाटकांचे वाचक आणि त्या नाटकांच्या प्रयोगांचे कर्ते तसेच रसिक प्रेक्षकांनी ती आपल्या योगदानाने अधिक उजागर केली, असं म्हणता येईल.

champralekhan.com हे आपले संकेतस्थळ विकसित करून आपली समग्र नाट्यसंपदा एका क्लिकसरशी कुणालाही विनामूल्य उपलब्ध करून देणारे चंप्र सबंध देशातील एकमेव साहित्यिक असावेत. तिथे स्वतंत्रपणे त्यांच्या नाटकांच्या संहिता उपलब्ध आहेतच. पण, आपल्या अनेक नाटकांचे एकत्रितपणे संग्रह करून, त्यांत अंतर्निहित असलेल्या मिती अधोरेखित करत, पुस्तकरूपाने ही नाटके चंप्रंनी नव्याने उपलब्ध करून दिली आहेत, यापुढेही देणार आहेत.

सुट्या म्हणून वाचलेल्या संहितांना पुस्तकाच्या रूपात एकत्रितपणे वाचतांना त्या संहितांचा आजवर न जाणवलेला आयाम ठळक होत राहणे, हे या संग्रहांचे वैशिष्ट्य आहे. ते त्यांचे महत्वही आहे ! --- समीर दळवी.

नाटक : इराक लेखक : चं .प्र .देशपांडे प्रकाशन : www.champralekhan.com

'इराक ' हे नाट्यपुस्तक आज वाचलं . दोन देशांमधील राजकारणाच्या सहमती -असहमतीच्या पोझिशन्स , तसेच देशांतर्गत दोन पक्षांमधील मतभेद आणि त्याचसोबत त्यांच्यातील देवघेव , दोन विरोधी पक्षांकरिता सहानुभूती असेलेले नागरिक आणि त्यांमुळे त्यांच्या आप-आपसातील होणारे मतभेद आणि सरतेशेवटी या सर्वांच्या राजकारणाचा एका सामान्य कुटुंबावर कसा प्रभाव पडत जातो यावर हे नाटक प्रकाश टाकत. नाटक कमालीची घट्ट पकड वाचकावर ठेवत

जात . अनेक नॉन-फिक्शन वाचून देखील इतका कन्टेन्ट मिळायचा नाही जितका हे फिक्शनल नाट्य तुमच्च्यापर्यंत पोचवत . हे नाटक वा त्याची पीडीएफ चं .प्र .देशपांडे यांच्या वेबसाइट्वरुन डाउनलोड करू शकता .

प्रिया : मी जेव्हा सत्या बघितला होता ना तेव्हा मलाही मनातनं असच वाटून गेलं होत कि मला असाच पती मिळावा - धीट -actionpacked ! पण मी मिनटाईम तुझ्या प्रेमात पडून बसलेले ! तूच माझ ते स्वप्न सत्यात आणशील असं माझ्या स्वप्नातही आलं नसतं

ओम : याचा अर्थ आपण 'एक दुजे के लिये ' आहोत हेच नक्की ! जगात इतक्या वस्तू इतकी सुखाची साधनं आहेत - ती आपल्यासाठी नाहीत असं स्वतः ला पटवत का जगायचं ? मोठीमोठी हॉटेलं ,एसी बंगले , कार्स -आपल्यासाठी का नाहीत ? थोडं कमी जगू पण दिल खोलके जगू !

प्रिया : मलाही हेच पटतं ! तुलाच असं धाडसी जगण आवडतं त्यामुळे प्रश्नच नाही - नाही तर माझं जगणं फालतूंच झालं असतं! टीव्ही सिरियल्स बघणे आणि पोथ्या वाचणे -- असं ! ----- प्रसन्न जोशी.

गिरीश पतके ---

आत्ताच चंप्रंचे नवीन प्रकाशित झालेले "वस्तू आणि इतर सहा दीर्घांक" हे पुस्तक आले. यातील सगळेच दीर्घांक हे महत्त्वाचे नाट्यऐवज आहेत शिवाय ते चंप्रंस्टाईलचे आहेत.

या सहा दीर्घांकांपैकी "बुद्धिबळ आणि झब्बू" व "डावेदार" हे दोन दीर्घांक मी दिग्दर्शित केले होते. तो कालखंड माझ्यासाठी अत्यंत मजेचा आणि आनंदाचा होता.

आणखी एक जुळून आलेला योगायोग म्हणजे आजच्या दिवशीच पण २३ वर्षांपूर्वी म्हणजे ०६ नोव्हेंबर २००० रोजी "बुद्धिबळ आणि झब्बू" या दीर्घांकाचा पहिला प्रयोग झाला होता.

नाटकवाल्यांनी आणि जिज्ञासू वाचकांनी हे विक्रीस उपलब्ध असलेले पुस्तक जरूर विकत घ्यावे.

वस्तू आणि इतर सहा दीर्घांक --

ले ० चं. प्र. देशपांडे.

मूळ किंमत रु.४००/--

सवलतीची किंमत रु.३५०/-- पोस्टेजसह.

'चार पुरुषार्थांची चार नाटके ' हे पुस्तक लेखक / नाटककार चं .प्र .देशपांडे यांच्या अनुक्रमे धर्म (ढोलताशे) , अर्थ (इराक) , काम (बुद्धी बळ आणि झब्बू) , मोक्ष (जणू काही वास्तव) या थीम्स वर बेतलेली नाटके आहेत . 'ढोलताशे' व 'जणू काही वास्तव' चा आत्मा फिलॉसॉफिकल आहे परंतु ते सादर होताना पात्रांमधील चर्चा रंजक होतील असं पाहिलं आहे . पण मुळात कथेचा आशय हा गहन तत्वज्ञानावर आधारित असल्याने विनोदी नाटकातील नव-याची वारंवार

होणारी फजिती वगैरेंच्या स्वरूपाचे ठराविक संवाद मिळणार नाहीत . वरती रंजक म्हटलंय म्हणजे जे काही ह्युमर आहे ते नैसर्गिक ,आणि काळाला धरून आहे आहे . पुस्तकाच्या २९५-२९६ या दोन पानांवरील (नाटक : 'जणू काही वास्तव') कॅरॅक्टर नम्रता च्या तोंडी जे संवाद दिले आहेत ते वाचून मला चं.प्र यांच्या पायावर डोकं ठेवावे असेच वाटले . मानसशास्त्र ,शरीरशास्त्र , अध्यात्म , योग या सर्वाचं त्यांनी केलेलं इंटिग्रेशन हे अफलातून आहे . हे दोन चांगले मोठे पॅराग्राफ आहेत . यात सर्व गुंता त्यांनी समर्थपणे उलगडून दाखवला आहे . This is worth a read !
या उलट इराक (थीम 'अर्थ') आणि , बुद्धी बळ आणि झब्बू (थीम 'काम') हि दोन नाटक टोकाची मटेरियलिस्टिक आहेत . 'बुद्धीबळ आणि झब्बू' मध्ये स्त्री पुरुष एकमेकांना आकर्षित करण्याकरिता कसे हळूहळू अड्वान्समेंट करीत असतात हे वाचाल तर हाच तो 'ढोलताशे' वा 'जणू काही वास्तव ' चा लेखक असेल हे पटतच नाही. इथे चं.प्र. 'छोटी सी बात' मधील कर्नल ज्युलियस नागेंद्रनाथ विल्फ्रेड सिंग जास्त वाटतात . झुडुपा आडून किंवा मॉल मधील फूड पार्क मध्ये गुपचूप कॅमेरे लावून त्यांनी प्रियंकारांत चाललेले संभाषण रेकॉर्ड वगैरे करून संवाद लिहिलेत कि काय देव जाणे .एकूणच सांप्रत काळात नात्यांमधील वाढत चाललेलं dis-satisfaction काय रूप घेतंय हे यात छान पाहायला मिळेल . 'इराक ' हे पूर्णपणे राजकारण बेस्ड आहे . आणि अफाट आहे .
चं .प्र सारख्या अत्यंत प्रगल्भ ,विद्वान आणि व्यासंगी व्यक्तीची या माध्यमातून वेगळी ओळख झाली , पुस्तक रुपी आशीर्वाद मिळाला त्याबद्दल आनंदी आहे . – प्रसन्न जोशी.
--- 2023 posts end ---

भाषेच्या पुरात असा बिनधास्त पोहणारा कवी मराठीत असणे ही एक गहन आणि महान गोष्ट आहे !
(श्रीधर तिळवे यांची कविता)

मी तर सत्यकथेचा एक वारेमाप कवी होतो -- एकदोनदा तर कवितेचा आख्खा विभागच मला देण्यात आला होता ! एस एस सी झाल्या झाल्या १९६३ साली माझी ' झुंजुन गेल्या सरी ' ही कविता सत्यकथेत पहिल्यांदा आली होती.

भावनिक असो की वर्णनात्मक, वास्तव म्हणजेच आशय, अशा समजुतीतून लिहिलेली कविता ही ' चांगली ' असू शकत नाही. कोणतेही वास्तव हे भाषेप्रमाणेच कवितेचे माध्यम असते, हे पाहणे महत्त्वाचे आहे. याचाच अर्थ, आशय हा कवीच्या ' स्वभावाने ' दूषित झालेला नसतो. या पद्धतीने पाहता, वरील विवेचन योग्य वाटते.
(राहुल पुंगलिया यांच्या पोस्ट वरील कॉमेंट).

अत्यंत उत्तुंग आहे हा लेख ! ग्रेट ! मराठीत याची ताबडतोब विल्हेवाट लावायचे प्रयत्न होतील. आपल्या विचारात जे बसत नाही ते फालतू -- हे इथले प्रस्थापित सत्य आहे ! टिंगल-टवाळ्या आणि शेरेबाजी हेच या लेखाचे भवितव्य असेल.

" बुध्दीवाद विवेकवाद किंवा पुरोगामीपणा वगैरेंच्या बळावर एबस्ट्रॅक्शन नाकारलं जातंय. " -- हे तुमचे वाक्य हे इथले एक गलिच्छ सत्य आहे ! इथल्या कलाक्षेत्राचे मुख्य कार्य म्हणजे सर्व सांस्कृतिक प्रवाह मातीत घालत राहणे, हे आहे. सवयीचे, रद्दड, रटाळ असे ' नवे नवे ' अभिव्यक्त करत राहणे, एवढे इथे बास आहे. -- हे असे खरे तर बोलू नये, पण, लेख खूपच आवडल्याने चुकून बोलले गेले आहे. त्यामुळे, इथेच, सॉरी म्हणून मोकळा होतो ! (रवी लाखे)

फारच चांगले परीक्षण ! मराठीत चांगले नाट्यसमीक्षक वा एकूणच समीक्षक यांबाबत एक पोकळी आहे -- ती भरून काढण्याचे काम बऱ्याच प्रमाणात तू करू शकशील ! गांभीर्याने मनावर घ्यावे ! (काठपदर वर गिरीश पतके.)

डाव्यांना दु:खमुक्ती, निर्वाण -- हे चालेल का याची शंका वाटते !

हा उतारा (दोन्ही अर्थांनी) ग्रेटच ग्रेट आहे ! प्रत्येक साहित्य संमेलनाच्या प्रवेशद्वारावर हा ढळढळीतपणे लावला जायला हवा ! मराठीत डॉक्टरेट करणाऱ्या प्रत्येकाला हा उतारा पाठ करणे बंधनकारक असावे ! (राहुल पुंगलिया)

करमणूक, बोध, आरोग्य आणि यशस्वी होण्याचे नुस्खे देणे -- अशी उद्दिष्टे सोडून लिहिली जाणारी काही सांस्कृतिक महत्त्वाची पुस्तके डोळ्यांपुढे घेऊन ही पोस्ट लिहिलेली आहे. विशेषत: सर्जक साहित्य म्हणावे अशी पुस्तके. सवयीतला माल देणाऱ्या पुस्तकांचा अभ्यास कसला करणार ? डिजिटलचा मुद्दाच महत्त्वाचा ठरत जाईल असे दिसते.

तुकारामाच्या अभंगाचा अर्थ तद्दन चुकीचा सांगितलेला आहे. असाच चुकीचा अर्थ आ. ह. साळुंकेही सांगतात, असे मी वाचले होते. तुकाराम बाहेर एक सांगायचे आणि आत वेगळेच समजून राहायचे, अशी फसवाफसवी करतील ? पूर्वी मी एका ठिकाणी लिहिलेला मजकूर --

देव असण्या-नसण्याच्या संदर्भात तुकारामांच्या दोन ओळी पाहण्यासारख्या आहेत :--

आहे ऐसा देव वदवावी वाणी !

नाही ऐसा मनी अनुभव !!

एक अभ्यासक, या ओळी, तुकाराम मुळात कसे नास्तिक होते हें सिध्द करण्यासाठी वापरतात, असं मी वाचलं होतं. म्हणजे देव आहे असं वरवर म्हणावं पण तो नाही हे मनातल्या अनुभवरूपात समजून घ्यावं ! ढोंगीपणावर आसूड ओढणारे तुकाराम स्वत: ढोंगी होते ? तसं नव्हतं. या ओळींचा अर्थ नीट समजून घ्यायला हवा. तुकारामांच्या मते ’ देव आहे ’ हे एक होकारात्मक वाक्य दिसत असलं तरी देवाचा प्रत्यक्ष अनुभव हा ’नाही ऐसा ’ म्हणजे ’काहीच नसण्याचा ’ आहे. ’ मागेपुढे अवघे रिते । कळो येते अनुभवे ।। ’ असं ते म्हणतात. त्यांच्या अभंगांवरून असं दिसतं की देवाचा प्रत्यक्ष अनुभव म्हणजे चैतन्यमय अशा काहीच नसण्याचा अनुभव. यात मनाची विदीर्णता लोप पावते. इथे एकविधता-एकात्मता

असते. विदीर्णता ही दु:खमय असते आणि एकात्मताच फक्त आनंदमय असते -- हा सारांश. याचा अर्थ देव नाही असं म्हणणारे लोक या एकात्मतेची शक्यताच नाकारतात. 'अशी एकात्मता शक्य आहे का ? ' हा योग्य प्रश्न म्हणता येईल. शक्य आहे किंवा शक्य नाही ही मतं निरर्थक आहेत.

नेमाडे आणि साळुंखे यांनी लावलेला अर्थ घेतला तर आख्खी गाथा मातीत जाईल !

हे जरा सविस्तर ---

तुकारामाच्या एका विवाद्य अभंगाबद्दल बोलू या. त्यातल्या पहिल्या दोन ओळी अशा आहेत --

आहे ऐसा देव वदवावी वाणी ।

नाही ऐसा मनी अनुभवावा ।।

-- या ओळींचा आधार घेऊन नेमाडे, तुकारामाने निरीश्वरवादही व्यक्त केला होता, असे म्हणतात. आणखी एक विद्वान डॉ. आ. ह. साळुंखे तर तुकाराम नास्तिकच होता हे सांगण्यासाठी या ओळी वापरत असल्याचे वाचले होते. या दोन ओळींमुळेच अनेकांचा घोटाळा होतो, असे दिसते. याबद्दल मला काय वाटते, ते सांगतो. ' असणे ' ही होकारात्मक अभिव्यक्ती आहे आणि ' नसणे ' ही नकारात्मक. देव आहे असे जरी आपण होकारात्मक म्हणत असलो तरी त्याचे प्रत्यक्ष अस्तित्व नकारात्मक आहे. ' रिकामीक ' आहे. ' तुका करी रिता ठाव । त्यांसी बैसावया वाव ', ' मजहून नष्ट आहे ऐसा कोण ', ' अहो पंडितजन । तुका टाकावा थुंकोन ', ' मागेपुढे अवघा दिसे रिता ठाव ', ' तुका म्हणे पोते । देवे भरिले नव्हे रिते ', ' देह निवेदुनि पायीं । जालों रिकामा उतराई ।। ' – असे बरेच सापडेल. जे कृष्णमूर्ती, ओशो वा आणखीही काही संत या रिकामेपणाबद्दल (emptiness) बोलतात. सारांश, हा निरीश्वरवाद नसून ' देव ' या शुद्ध अनुभूतीचे हे वर्णन आहे.

या बाबतीत फोन करून मी डॉ. सदानंद मोरे यांच्याशीही चर्चा केली होती, हे इथे नमूद करून ठेवतो. नेमाड्यांच्या पूर्ण भाषणावर बोलावे असा माझा अभ्यास नाही. त्या भाषणातला हा मुद्दा महत्त्वाचा वाटला म्हणून लिहिले आहे.

॥ अकवितेचे समर्थन करणारी समीक्षा ॥

चं. प्र. देशपांडे हे मराठीतील मोठे प्रयोगशील नाटककार आहेत, कवी आहेत आणि समीक्षकही आहेत. 'आवर्तने / कविता, आशय, आकलन' हा चं. प्र. देशपांडे यांचा समीक्षाग्रंथ वर्णमुद्रा प्रकाशनाने दहा महिन्यापूर्वी जानेवारी २०२३ मध्ये प्रकाशित केलेला आहे. देशपांडे यांनी आयुष्यभर कवितेविषयी जे चिंतन केलेलं आहे ते १०० पानी प्रस्तावनेच्या रूपात सुरुवातीला दिलेलं आहे. नंतर १३० पानांमध्ये मराठीतल्या मर्ढेकरांपासून पुढच्या काही कविता घेऊन देशपांडे यांनी त्यांचे कवितेविषयीचे चिंतन त्या कवितांना लावून दाखवलेलं आहे. म्हणजे १०० पाने सिद्धांत आणि १३० पाने त्या सिद्धांताचे उपयोजन, असे हे २३० पानांच्या पुस्तकाचे स्वरूप आहे.

देशपांडे यांना कवितेचे सगळेच पारंपारिक निकष अमान्य आहेत. सुखदुःखाची, भावनेची, विचाराची, विद्रोहाची, उपयोजन असलेली कविता त्यांना ठोकळेबाज वाटते. हे काहीच नसलेली अकविता हीच खरी कविता आहे असे त्यांना वाटते. अशा कवितेच्या चर्चेसाठी दुर्दैवाने त्यांना स्वतःच्याच कविता घ्याव्या लागतात. कारण त्यांच्याशिवाय मराठीत कुणी अकविता लिहिली नाही. त्यामुळे असे म्हणावे लागते की स्वतःच्या कवितेचे समर्थन करणारी ही समीक्षा आहे. स्वसमर्थन वाईट नसतेच. कारण साहित्यातील नवसंवेदनांच्या प्रस्थापनेसाठी मर्ढेकरांनाही हातात लेखणी घ्यावी लागली होती. गंगाधर गाडगीळ यांनी तर नवकथेचे समर्थन करण्यासाठी आघाडीच उघडली होती. आनंद यादवांनीही साहित्यातील बोलीच्या समर्थनार्थ समीक्षा लिहिली होती.

देशपांडे यांचे स्वसमर्थन यासाठी अडचणीत येते की त्यांना स्वसमर्थन मान्य नाही. शिवाय त्यांनी कुठल्याही तात्विक मुद्याच्या आधारे हे विवेचन केलेले नाही. ही केवळ माझी मते आहेत, असा खुलासा त्यांनी सुरुवातीलाच केलेला आहे. 'सैद्धांतिक समीक्षा मला योग्य वाटत नाही. ती हुकूमशाहीने वागते. मला आस्वादक समीक्षाच योग्य वाटते' असेही देशपांडे यांचे मत आहे. एकदोन ठिकाणी अकविता लिहिणारे कवी म्हणून दुर्लक्षित राहिलेले असा ज्यांचा उल्लेख देशपांडे यांनी केलेला आहे त्यांची एकही कविता प्रस्तावनेच्या मजकुरात उदाहरणासाठी देशपांडे यांनी घेतलेली नाही. आपली कविता काय आहे हे सांगण्याऐवजी काय नाही ते देशपांडे सांगतात. ते म्हणतात, 'ती एक मूड गिरवत गुंग करणारी नसते, संगीत लईच्या वापर ती फारसा करीत नाही, ती एखाद्या अनुभवाचा प्रत्यय देणारी नसते, रुटीन सुखदुःखाचे सामान वापरत हसू व रडू निर्माण करण्यात तिला रस नसतो, ती कोणत्याही व्यावहारिक कृतीला प्रवृत्त करत नाही' वगैरे. अशा कवितेचे समीक्षण करताना कुणी 'ही सगळी भरल्या पोटाची करमणूक आहे' असं म्हणालं तर देशपांडे अशा समीक्षकांना बाजारबुणगे, आत्ममग्न, सुखासीन विद्वान अशी शेलकी विशेषणे लावतात. आणि तरीही वर आपल्या कवितेवर काहीही प्रतिक्रिया आली तरी तिचा प्रतिवाद करत बसू नये असा सल्ला कवींना देतात. अशा परस्पर विसंगतीने ही प्रस्तावना भरलेली आहे. कारण अशी अकविता लिहिणारे कवी 'तिकडं बाहेर देशात मार्क्सवादी आहेत' असा तपशील पुरवून या विद्वानांचा प्रतिवादही करताना देशपांडे दिसतात.

भालचंद्र नेमाडे यांच्यावर देशपांडे यांचा राग दिसतोय. पण त्यांचे नाव न घेता ते त्यांना देशीवादावरून टोमणे मारतात. मतभेदाची निर्मळ समीक्षा आणि ही हेत्वारोपाची कलुषीत समीक्षा यात फरक असतो. नेमाडे यांची डॉ. सुधीर रसाळ यांनी केलेली समीक्षा ही मतभेदाची निर्मळ समीक्षा आहे. तो तोल देशपांडे यांना सांभाळता आलेला नाही. स्वतःच्या कवितेच्या टीकाकारांविषयी लिहिताना देशपांडे यांना आपले विकार आवरता आलेले नाहीत. त्यामुळे असा त्यांच्या भाषेचा तोल अनेक ठिकाणी गेलेला दिसतो. त्यामुळे या समीक्षेची भाषा निरपेक्ष न राहता ती स्वसापेक्ष होतांना दिसते.

एका बाजूला सर्व पारंपारिक कविता मोडीत काढताना दुसऱ्या बाजूला समाज माध्यमातल्या कवितेच्या लोंढ्याविषयी ते स्वागतशिल आहेत. त्यातूनच चांगली अकविता पुढे येण्याची शक्यताही त्यांना वाटते. मराठी लोककवितेविषयी आणि बहिणाबाईविषयी त्यांनी काहीही लिहिलेले दिसत नाही. कदाचित त्यांना ते सगळेच फार प्राथमिक स्वरूपाचे काव्य वाटत

असावे. कारण त्यात तर राग -लोभ, भाव-भावना, सुख-दुःख, देव-धर्म, नाती-गोती याशिवाय अन्य काहीही नसते. त्यासोबतच आमच्यासारखे लोकधर्मी कवीही त्यांच्या कक्षेबाहेरच असणार.

मला मात्र त्यांची कविता वाचायला आवडते. देशपांडे यांचा कवितासंग्रह निघाला नसावा असे मला वाटत होते. पण इथे त्यांनी दिलेल्या स्वतःच्या कवितेच्या उदाहरणाखाली त्यांच्या संग्रहाचा उल्लेख असल्यामुळे तो प्रकाशित झालेला असावा. पण मला पुस्तकांच्या दुकानात कुठे तो मिळाला नाही. त्यामुळे वाचता आला नाही. पण सत्यकथेतील कवितेच्या दोनही खंडात त्यांची विपुल कविता निवडण्यात आलेली आहे. तितक्या अन्य कुणाच्याही कविता त्या खंडात पाहायला मिळत नाहीत. तिथली त्यांची ती कविता मी मोठ्या आवडीने वाचलेली आहे. मराठी कवितेचा एक आस्थावान वाचक म्हणून मराठीत सर्व प्रकारची कविता लिहिली जावी असंच मला वाटत असतं.

देशपांडे यांच्या या समीक्षा लेखनात इंग्रजी उतारे भरपूर आहेत. त्यांचा मराठी अनुवाद मात्र ते देत नाहीत. माझ्यासारख्या इंग्रजी मुळीच न समजणाऱ्या वाचकांची त्यामुळे मोठीच अडचण होते. कदाचित आमच्यासारखे वाचक देशपांडे यांना अपेक्षितच नसावेत. इंग्रजीचे जाणकार वाचकच त्यांना अभिप्रेत असावेत.

हा जो सगळा मजकूर मी लिहितोय तो या पुस्तकाच्या शंभरपानी प्रस्तावनेविषयीच आहे. या शंभर पानात अनेक वेळा विचारांची पुनरुक्ती झालेली दिसते. या एकूण शंभर पानांचे सार लेखकाच्या खालील एक दोन उताऱ्यात सामावलेले आहे, असे आपल्या लक्षात येते. उदाहरणार्थ,

"इथले कवी मुळातच कविता लिहितात ते कवी म्हणून ओळखले जाण्यासाठी, तशी मान्यता मिळवण्यासाठी, मोठे कवी म्हणून टिकून राहण्यासाठी आणि जन माणसाचा आदर मिळवून आत्मतुष्ट होण्यासाठी. याचाच अर्थ कविता लिहिण्याचा मूळ हेतूच कविताबाह्य असतो. त्यामुळे सहाजिकच मग रुटीन सामान्य अनुभव, विचार, नीती, कल्पना, न्याय, समता वगैरे अभिलाषित मूल्य, भावभावनांचे पुनःप्रत्यय आणि थोडीफार चकित करणारी तंत्रकौशल्य या मर्यादेत ही कविता खेळत-बागडत राहते. अगदी तथाकथित दुःखाची कविताही. एकदा उद्दिष्ट कविताबाह्य मान्यतेचे असले की पुनरावृत्ती हे एकच कवितेचे कार्यक्षेत्र बनते. मग भाषेवर आणि तंत्रावर हुकूमत असलेले काही कवी इथे निव्वळ विविध गुणदर्शन दाखवत अमर होतात. त्यांच्या कवितेत सलग गांभीर्य कसलेच नसते. पार अनिलबिनीलांपासून उदात्त अशा कुसुमाग्रजांपर्यंत. यांना जगण्याबाबत एकही समस्या सखोलपणे दिसत नाही, कारण पहायचीच नसते. कमी कुवतीचे रटाळ, सेफ जगणे हीच एक आस असल्यावर जनमान्य मार्गाने आयुष्य रेखाटत जाणे हे बंधनकारक ठरते. जनमान्य दुःखाचा मोफत डोस आणि जनमान्य अस्मितांचे उदात्तीकरण यात हे कवी रमतात. त्यांना स्वतःला एखादे दुःख महत्त्वाचे वाटले, मुळापासून त्याकडे पहावेसे वाटले, असे घडत नाही. कुसुमाग्रज इथले प्रतिनिधिक भाषा पुढारी होतात - त्यांच्या नावे भाषादिन साजरा होतो, हा याचा पुरावा आहे. हे असले कवी धर्म, भक्ती, प्रेम, अस्तिक, नास्तिक, वारकरी, शूर, देशभक्त, बांधिलकी, युद्धसमर्थक असे सगळे असतात. या प्रत्येक विभागातल्या कविता लिहून ते लोकप्रिय होत राहतात. थोडक्यात म्हणजे यांना कशाचेच फारसे गांभीर्य नसते आणि कोणत्याही समस्येला सामोरे जायची आचही नसते."

"बुद्धीची प्रत्येक गोष्ट द्वंद्वयुक्त असल्याने, समतावादी हेच विषमतावादी असतात, शांततावादी हेच युद्धवादी असतात आणि नीतीवादी हेच अनीतीवादी असतात - हे समजून घ्यायला हवे."

"चांगली म्हटली जाणारी काही साहित्य निर्मिती सर्वसामान्य माणसाचा विचार करत नाही, ती त्याच्यापर्यंत पोचू शकत नाही, अशी एक तक्रार केली जाते. 'सर्वसामान्य' माणूस कोण ? भाषाच न येणे, वाचायचा उत्साहच नसणे, या गोष्टी सोडून देऊ. 'सर्वसामान्य' माणूस म्हणजे मुख्यतः स्वतःच्या मानसिक सवयी घट्ट पकडून बसणारा, वेगळे काही रिसिव्ह करायलाच तयार नसलेला माणूस, हे लक्षात घ्यायला हवे. सर्जक साहित्यकृती ही कुठल्याही मानसिक सवयीची गुलाम नसते. ती त्याच्या पर्यंत पोहोचत नसेल तर कारण स्पष्ट आहे - सर्जकताच नाकारणारे मन ! अशा कर्मकठीण माणसांना तर सर्जक जगणेही उपलब्ध नसते ! सर्जक जगणे म्हणजे माणसाच्या मानसिक सवयींनी पूर्णतः बद्ध नसणे"

हे उतारे वाचल्यानंतर त्यावर मी काही भाष्य करण्याची गरज नाही. देशपांडे यांच्या मताचे स्वरूप आपल्या सहज लक्षात येते. देशपांडे यांच्या मते अकविताच फक्त समग्रावधानी म्हणजे सर्वश्रेष्ठ असते. इतर समग्र मराठी कविता ही शूद्र स्वरूपाची आहे. याचा निष्कर्ष असा की, 'समग्र मराठी कविता शूद्र स्वरूपाची आणि एकट्या चं. प्र. देशपांडे यांची कविता समग्रावधानी. आणि त्यांची ती अकविताच फक्त सर्वश्रेष्ठ' शंभर पानाच्या या प्रस्तावनेतून माझ्या प्रत्येयाला आलेला हा निष्कर्ष.

अंगाई गीतांपासून ते मर्तीकाच्या गाण्यापर्यंत समाजाची शेकडो प्रकारच्या कवितेची गरज असते. कविता ही इतकी विविधरुपीनी आहे की कवितेचा हा एकच प्रकार सर्वश्रेष्ठ म्हणणे हे अहंकारी अज्ञानच म्हणावे लागेल. शास्त्रीय संगीताचे महत्त्व सांगताना लोकगीतांपासून सर्व संगीत प्रकार नाकारणे आणि शुद्ध शास्त्रीय संगीताचाच केवळ आग्रह धरणे हे जसे अहंकारी अज्ञान असते, तसेच अकवितेलाच शुद्ध समग्रावधानी कविता म्हणण्यातही असते. आमच्या कवितेचे कौतुक होत नाही, आम्हाला बेदखल केलं जातं असं पालूपद या लेखनात आहेच. या दीर्घ प्रस्तावनेच्या मूळाशी हेच कारण असावं. अशी शंका घ्यायला पुष्कळ वाव आहे. आणि तसं असेल तर या लेखनाला दिलेला तात्विक मुलामा थकलादुच म्हणावा लागेल.

चंप्र हे नाव तसं खूप मोठं आहे. या लेखनामागेही लेखकाची खूप मेहनत आहे. साधना आहे. पण हे लेखन खूप विस्कळीत आहे. तसं ते आहे हे लेखक आधीच कबूल करतोय. देशपांडे यांनी त्यांच्या सत्यकथेतल्या चाळीसपन्नास वर्षांपूर्वीच्या टिपणापासून ते आजच्या फेसबुकवरील टिपणापर्यंत, सगळं जशाला तसं इथं घेतलय. अलीकडच्या काळात चं. प्र. देशपांडे यांनी आपली जुनी नाटकंही पुनर्प्रकाशित करताना त्यांचं पुनर्लेखन केलेलं आहे. तसं या सगळ्या लेखनाचं केलं असतं तर फार बरं झालं असतं. त्यामुळे पुनरुक्ती टळली असती. विचारांची स्पष्टता आली असती. हे पुनर्लेखन करताना देशपांडे यांनाच यातला पुष्कळ मजकूर हटवावासा वाटला असता. त्यांच्या नाटकाच्या पुनर्लेखनात त्यांनी तसे केल्याचं म्हटलेलं आहे.

सुरुवातीच्या १०० पानाच्या प्रस्तावनेनंतर १३० पाने मराठीतल्या काही अकवितांच्या विवेचनांची आहेत. सुरुवात मर्ढेकरांपासून होते. त्याआधीची एकही कविता या योग्यतेची नाही असा याचा अर्थ होतो. 'जगण्याचा लिप्ताळा' असे

मर्ढेकरांच्या इथे निवडलेल्या कवितेचे शीर्षक आहे. अर्थात मरढेकरांच्या कवितेचे शीर्षक म्हणजे त्या कवितेची पहिली ओळ असते. मर्ढेकरांची ही एकमेव कविता देशपांडे यांना त्या योग्यतेची वाटते. तीही त्यांच्या हातून नकळत लिहिल्या गेली असावी, असे देशपांडे यांना वाटते. मर्ढेकरांच्याही इतर बहुतेक कविता प्रतिक्रियात्मकच आहेत, असंही ते लिहितात. आरती प्रभू यांची 'आवर्तने द्रुत शून्याची' ही कविता देशपांडे यांना आवडलेली आरती प्रभूंची एक कविता आहे. आरती प्रभू यांनी स्वतः आणि श्री. पु. भागवत या चिकित्सक प्रकाशकाने कोणत्याही संग्रहात घेण्याच्या योग्यतेची नाही म्हणून बाजुला ठेवलेली, पूर्वी कधीतरी सत्यकथेत प्रकाशित झालेली ही कविता देशपांडे यांना आरती प्रभूंची समग्रावधानी कविता वाटते. आरती प्रभूंच्या याच कवितेच्या शीर्षकातील 'आवर्तने' हा शब्द देशपांडे यांनी या पुस्तकाच्या शीर्षस्थानी ठेवलेला आहे.

पुढे अशाच आणखी काही कविता घेऊन देशपांडे यांनी त्या कवितांची विवेचन केलेले आहे. रसग्रहण हा शब्द देशपांडे यांना मान्यच नाही. रस, रसिकता, रसग्रहण हे सगळेच शब्द त्यांना फालतू वाटतात. त्यांनी निवडलेल्या कवितांपैकी अनेक कविता मला सामान्य दर्जाच्या वाटल्या. देशपांडे यांना मात्र त्या कविता त्या त्या कवींच्या सर्वोत्कृष्ट कविता वाटतात. अर्थात त्यावर काही आक्षेप घेण्याचे कारण नाही. कारण देशपांडे हे सगळेच फार गांभीर्याने करत आहेत, याविषयी मला शंका नाही.

वर्णमुद्रा प्रकाशनाने पुस्तक फारच भारी काढलेले आहे. पूर्वी मौज, पॉप्युलर अशी पुस्तकं करायचे. त्यांनी आता अशी पुस्तकं करणं बंद केलेलं आहे. चंद्रमोहन कुलकर्णी यांचे मुखपृष्ठ आहे. ते मजकूराला न्याय देणारं असतंच.

□ इंद्रजित भालेराव.

साधक-बाधक होत राहणार, हे मान्य ! या दीर्घ अभिप्रायाबद्दल **इंद्रजित भालेराव** यांना धन्यवाद !

'चार पुरुषार्थांची चार नाटके ' हे पुस्तक लेखक / नाटककार चं .प्र .देशपांडे यांच्या अनुक्रमे धर्म (ढोलताशे) , अर्थ (इराक) , काम (बुद्धी बळ आणि झब्बू) , मोक्ष (जणू काही वास्तव) या थीम्स वर बेतलेली नाटके आहेत . 'ढोलताशे' व 'जणू काही वास्तव' चा आत्मा फिलॉसॉफिकल आहे परंतु ते सादर होताना पात्रांमधील चर्चा रंजक होतील असं पाहिलं आहे . पण मुळात कथेचा आशय हा गहन तत्वज्ञानावर आधारित असल्याने विनोदी नाटकातील नव-याची वारंवार होणारी फजिती वगैरेंच्या स्वरूपाचे ठराविक संवाद मिळणार नाहीत . वरती रंजक म्हटलंय म्हणजे जे काही ह्युमर आहे ते नैसर्गिक ,आणि काळाला धरून आहे आहे . पुस्तकाच्या २९५-२९६ या दोन पानांवरील (नाटक : 'जणू काही वास्तव') कॅरॅक्टर नम्रता च्या तोंडी जे संवाद दिले आहेत ते वाचून मला चं.प्र यांच्या पायावर डोकं ठेवावे असेच वाटले . मानसशास्त्र ,शरीरशास्त्र , अध्यात्म , योग या सर्वांचं त्यांनी केलेलं इंटिग्रेशन हे अफलातून आहे . हे दोन चांगले मोठे पॅराग्राफ आहेत . यात सर्व गुंता त्यांनी समर्थपणे उलगडून दाखवला आहे . This is worth a read !

या उलट इराक (थीम 'अर्थ') आणि , बुद्धी बळ आणि झब्बू (थीम 'काम') हि दोन नाटक टोकाची मटेरियलिस्टिक आहेत . 'बुद्धीबळ आणि झब्बू' मध्ये स्त्री पुरुष एकमेकांना आकर्षित करण्याकरिता कसे हळूहळू अड्वान्समेंट करीत असतात हे वाचाल तर हाच तो 'ढोलताशे' वा 'जणू काही वास्तव ' चा लेखक असेल हे पटतच नाही. इथे चं.प्र. 'छोटी सी बात' मधील कर्नल ज्युलियस नागेंद्रनाथ विल्फ्रेड सिंग जास्त वाटतात . झुडुपा आडून किंवा मॉल मधील फूड पार्क मध्ये गुपचूप कॅमेरे लावून त्यांनी प्रियंकारांत चाललेले संभाषण रेकॉर्ड वगैरे करून संवाद लिहिलेत कि काय देव जाणे .एकूणच सांप्रत काळात नात्यांमधील वाढत चाललेलं dis-satisfaction काय रूप घेतंय हे यात छान पाहायला मिळेल . 'इराक ' हे पूर्णपणे राजकारण बेस्ड आहे . आणि अफाट आहे .

चं .प्र सारख्या अत्यंत प्रगल्भ ,विद्वान आणि व्यासंगी व्यक्तीची या माध्यमातून वेगळी ओळख झाली , पुस्तक रुपी आशीर्वाद मिळाला त्याबद्दल आनंदी आहे . – प्रसन्न जोशी.

पेसोआच्या कविता

अनुवाद ० महेश्वर लव्हेकर, प्र ० वर्णमुद्रा पब्लिशर्स

पेसोआ जसा लव्हेकरांचा आवडता कवी आहे तसाच माझाही. त्यामुळे, हे पुस्तक मी खूपच आत्मीयतेने वाचले. प्रख्यात लेखक आणि २००० सालचा नोबेल विजेता, गाओ झिंगझिआन, त्याच्या भाषणात पेसोआबद्दल म्हणाला होता --

“ Fernando Pessoa the most profound poet of the twentieth century “

विसाव्या शतकातला ‘ सर्वांत सखोल आणि गहन कवी ‘ ! तसे तर सखोल आणि गहन हे शब्द बऱ्यापैकी वापरात असतातच. पण, काय असावा या शब्दांचा अर्थ ? आणि एवढे असून असून काय असणार आहे ? आपल्याकडे जसे आपापल्या टोळीतल्या कवीला आपण ग्रेट म्हणतो तसलेच असेल काही. एखादे भयानक, वेदनादायक दु:ख असू शकेल. तशा दु:खाचा अनुभव नीट व्यक्त झाला की सखोल होणारच ती कविता. नास्तिक, बुद्धिप्रामाण्यवादी, पुरोगामी (हे विशेष हुशार लोक), तसेच, हिंदुत्ववादी, परिवर्तनवादी, स्त्रीवादी, आधुनिकतावादी, उत्तर-आधुनिकतावादी, स्वच्छंदतावादी, वगैरे सर्वांना हेच वाटेल की सखोल म्हणजे दु:खच असणार ! दारिद्र्याचे असेल किंवा वंचिततेचे असेल किंवा अन्याय सहन करावा लागण्याचे असेल. --- तर हे असे सर्वसामान्य अंदाज ! पण, पेसोआची कविता असल्या प्रकारची ‘ सखोल ‘ नाही. मुळात या कवितेला दु:खाची कविताच म्हणता येणार नाही. हे समजूनच संदीप देशपांडे यांनी मुखपृष्ठ केलेले आहे. हे चित्र ‘ दु:खभावी ‘ नाही. ही सखोलता वेगळी आहे – खुल्या मनाने पाहावी लागेल.

मी चिंता करत नाही यमक जुळेल का नाही याची.

क्वचितच साम्य असतं एकमेकांलगतच्या दोन वृक्षांत.

जसा फुलांना रंग असतो तसाच मी करतो विचार आणि लिखाणही.

पण परिपूर्ण नसतं माझं स्वत:ला व्यक्त करणं,

कारण अभाव आहे माझ्यात दैवी साधेपणाचा,

बाह्यांग हेच एकमेव अंग असण्याचा.

मी पाहतो आणि हलतो आतून,

उताराच्या दिशेने पाणी वाहत जावं तसा.

आणि वाहत्या वाऱ्यासारखंच नैसर्गिक आहे माझं काव्य ...

दु:ख जसे स्थितिशील असते तशी ही कविता स्थितिशील नाही. अमुक एखाद्या व्यक्तिगत अनुभवाचा गौरव करणारी नाही. प्रस्तावनेत लव्हेकरांनी उल्लेख केला आहे की ओक्ताव्हियो पाझ च्या पेसोआ वरील लेखाचे शीर्षकच – unknown to himself ' असे आहे. त्याने अनेक टोपणनावांनी कविता लिहिल्या. जणू ती टोपणनावे म्हणजे वेगळ्याच व्यक्ती होत्या. " त्याचे उगमस्थान, " पेसोआ म्हणतो, " माझ्या मानसिकतेत खोलवर रुजलेला हिस्टेरिया किंवा हिस्टेरिकल नुरास्थेनिया. यामुळे मला स्वत:च्या व्यक्तित्वाच्या बाहेर पडण्याची, त्यापलीकडे जाण्याची ओढ वाटायची. " ही जगण्यात येणाऱ्या अनुभवांची कविता नसून जगण्याचीच कविता आहे. या ओळी बघा –

जगण्यानं हशील होत नाही काहीच.

किंवा जगण्याविषयी विचार करण्यानं.

किंवा त्याविषयी आपण विचार करतोय या विचारानं.

तो विचारतो – " माझ्या निद्रानाशी अवस्थेत स्वप्न पाहतोय का मी आयुष्याचं ? "

पेसोआची कविता म्हणजे त्याचे जगण्यातला कोणताही क्षण पाहणे असते. ती अमुक अनुभवाची वा अमुक विषयावरची अशी कविता नसते.

लाट शांतपणे जवळ येत चाललीय

आणि मी काही विचार करतोय असं नाही वाटत मला.

एका वेगळ्याच मितीतून लिहिली गेलेली ही कविता आहे. ही कविता मराठीत येणे हे खूपच महत्त्वाचे आहे. यातल्या सगळ्याच कविता पेसोआच्या सर्वोत्कृष्ट कविता आहेत असे नाही. पेसोआची काव्यसृष्टी हे खरे तर एक प्रचंड विश्वच आहे. त्या विश्वाची उत्तम ओळख घडवण्याचे काम हे पुस्तक नक्कीच करते. लव्हेकर आणि वर्णमुद्रा यांना धन्यवाद !

--- ००० ---

उत्तर-आधुनिकता आणि मराठी कविता

ले ० मीनाक्षी पाटील, प्र ० पॉप्युलर प्रकाशन.

मराठी कवितेतील आधुनिक ते आधुनिकोत्तर जाणिवांपर्यंतचा अभ्यासपूर्ण आढावा घेणारा ग्रंथ – हे महत्त्व असलेला हा ग्रंथ मराठीत चांगलीच हालचाल निर्माण करील असा आहे. हे तिकडचे आहे, इकडचे नाही – असली वावदूकगिरी कुणी करू नये, असा हा विषय आहे. जागतिकीकरणानंतरच्या मानवी जगण्यात जगभर काही समान सूत्रे दिसतात हे समजून घ्यायला हवे. भौतिक परिस्थितीत जसे काही मोठे, महत्त्वाचे बदल होतात तशा माणसांच्या मन:स्थितीही बदलत जातात,

प्रतिक्रिया बदलत जातात. हे असे इझम्स म्हणजे पाहण्याचे, अभिव्यक्तीचे वेगळे प्रवाह असतात. सर्जक लेखकाला वा कवीला हे जाणीवपूर्वक बौद्धिक भान असेल वा नसेल पण साहित्यात, कलेत हे बदलते प्रवाह येत राहतात.

या पुस्तकाचा पहिला औपपत्तिक भाग खूपच अभ्यासपूर्वक मांडलेला आहे. मानवी बुद्धीच्या साहाय्याने माणूस अधिकाधिक चांगला जगू लागेल – हे आधुनिकतेचे प्रमुख सूत्र हळूहळू संशयास्पद होत उत्तर-आधुनिकतेत ते कसे नाकारले गेले, याचा हा मराठी कवितेच्या संदर्भातला आढावा आहे. जगातल्या अनेक विचारवंतांचे या बाबतीतले चिंतन समजून घेत हे लेखन सिद्ध झालेले आहे. " उत्तर-आधुनिकतावादी साहित्यात विविध प्रकारच्या शैली व सांस्कृतिक स्तर, वेगवेगळे वाङ्मय प्रकार, गांभीर्य व हलकेफुलकेपणा यांची इतकी वैचित्र्यपूर्ण सरमिसळ केली जाते की पारंपरिक वाङ्मयीन चौकटीत त्याचे वर्गीकरण करणेही अवघड व्हावे. " – हे फार महत्त्वाचे आहे. अशा बदलांना आधी तुरंत नकार देणे ही आपली आवडीची एक डल पद्धत आहे. ती कलाकृती काय कसे व्यक्त करतेय हे पाहण्याआधी हा वाङ्मय प्रकार कोणता याचीच चर्चा करत बसणे इथे वारंवार घडते. त्या दृष्टीने हे पुस्तक म्हणजे एक खळबळजनक ऐवज ठरू शकतो. उदाहरणार्थ, " या आधुनिकतावादी कवींनी सौंदर्यवादी भावकवितेच्या परंपरेने रूढ केलेल्या ठरीव साच्याच्या काव्यकल्पनेचा निषेध आणि उपरोध करत आपल्या कवितेत गद्य कल्पनेचा आणि तपशीलाचा सर्रास वापर करून कवितेतील गद्यात्मकतेची प्रतिष्ठा वाढवली. " – हे सत्य घ्या. बऱ्याच अभ्यासकांच्या हे पचनी पडणे अवघड आहे. संकल्पनात्मक बैठक आधी तयार करून मग इथे मराठीतल्या आठ निवडक कवींच्या संदर्भात त्या संकल्पनांचे अस्तित्व कसे दिसते ते दाखवले आहे. सामाजिक-सांस्कृतिकतेतला उच्च-नीच भेद उधळून टाकणारे नामदेव ढसाळ, जागतिकीकरणानंतर चिन्हमय झालेल्या माणसाच्या जगण्याला मुखर करणारे श्रीधर तिळवे, जागतिकीकरणामुळे झालेले माणसाचे अमानवीकरण आणि वस्तूकरण याचे दर्शन घडवणारे हेमंत दिवटे, महानगरी जीवनातली असुरक्षितता व भय व्यक्त करणारे वर्जेश सोलंकी, एकाच वेळी तीव्र आत्मजाणीव आणि परात्मभावाची जाणीव यांतले द्वंद्व व्यक्त करणारे सलील वाघ, संगणकीकरण, माहितीचा विस्फोट आणि संपर्क-क्रांती यांतून विखंडित झालेल्या जगण्याचा वेध घेणारे सचिन केतकर, अपारंपरिक अभिव्यक्तिपद्धतीतून नव्या भोगवादी जगण्यातली विदारकता दाखवणारे संजीव खांडेकर आणि उलथापालथ, विस्कळितपणा व संभ्रमितपणा यांचे अनुभव व्यक्त करणारे मन्या जोशी – अशा या आठ कवींचा उत्तर-आधुनिक वैशिष्ट्यांच्या संदर्भात विचार करण्यात आलेला आहे.

हे पुस्तक अभ्यासकांनी तर वाचावेच पण स्वत: कवी-कलावंत यांनीही (सावकाशपणे का असे ना) वाचावे, असे मला वाटते. विचार, प्रतिक्रिया, अभिव्यक्तिपद्धती हे काहीच अबाधित राहणारे नसते याची जाणीव होण्यासाठी अशी पुस्तके महत्त्वाची असतात यात शंकाच नाही.

--- ००० ---

अधिसत्ता (कविता)

कवी ० मनोज सुरेंद्र पाठक, प्र ० पोएट्रीवाला पेपरवॉल पब्लिशिंग.

या कवितासंग्रहाची पहिली आवृत्ती २००६ साली निघाली होती आणि अलीकडेच २०२४ मध्ये त्याची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली आहे. मनोज स्वत:च्या कवितांबद्दल अनेकदा किरकोळीत बोलताना दिसत असला तरी तिकडे दुर्लक्ष करून वाचाव्यात अशा या कविता आहेत. या पुस्तकाच्या परिशिष्टात राहुल पुंगलिया म्हणतात, " या कविता चांगल्या आहेत कारण मनोज पाठक आपल्या व्यक्तिमत्वाची लुडबुड कवितेमध्ये होऊ देत नाही. आपल्या भावना व विचारांची अभिव्यक्ती करण्यासाठी कवितेची सबब त्याला गरजेची नाही. " कवीच्या व्यक्तिमत्वाचा म्हणजे त्याच्या भूमिकेचाच गौरव करत राहणाऱ्या आणि स्वत:ची सुखदु:खे व मते एवढेच कवितेचे क्षेत्र सीमित समजणाऱ्या मराठी कवितेत त्यामुळे ही कविता वेगळी ठरते.

या संग्रहातल्या मनोजच्या ईश्वरविषयक कविता हा एक वेगळा चर्चेचा विषय ठरू शकतो. काही तथाकथित धार्मिक मासिकांतून येणाऱ्या कवितांसारख्या या घिस्यापिट्या कविता नाहीत. ईश्वर हा स्वीकारलेला वा नाकारलेला नसून तो ' अनोळखी ' असण्याच्या या कविता आहेत. तरीही या विषयाला त्याच्या मनात स्थान आहे. मनाचे सगळे मटेरियल हे वैज्ञानिक पद्धतींनी घडत नसते. असंख्य संस्कार, प्रभाव, परिस्थिती आणि कदाचित जनुक रचनाही यांच्या एकत्रित योगाने हे घडत असते. मनोज, त्याच्या जगण्यातले हे ईश्वरी अस्तित्व स्वत:च्या वा वाचकाच्या माथी श्रद्धेच्या रूपात मारत नाही. या नुसत्याच प्रतिक्रिया नसून ते ' पाहणे ' ही आहे. एका ठिकाणी तो म्हणतो,

कंटाळून तुझ्या असण्यानसण्यासकट

मी तुला स्वीकारतोय

हे हरामखोर ईश्वरा

दुसऱ्या एका ठिकाणी तो म्हणतो,

तुझ्या असण्याने

आशेचे घोडे

दौडतात थकतात

म्हणजे एकरूपता नाहीच. मनाच्या इतर असंख्य कृतींमधल्याच याही कृती आहेत.

या संग्रहातल्या, ' तुकडे जुळवताना येवो मरण ', ' अन्न ', ' आई दुबोध होत जायची दिवसेंदिवस ', ' एक संपूर्ण सशक्त अवयव ', आणि ' मित्रांच्या आले लक्षात ' या कविता अधिक एकसंध वाटल्या. काही कवितांत मनोजचे भान ढळते आणि कवितेचा आशय नीट व्यक्त होत नाही, असे वाटले. ' मित्रांच्या आले लक्षात ' ही कविता तर एकूण जगण्याचा भेदक गोषवाराच पाहणारी आहे. ' अन्न ' ही कविता बघा –

मी लिहितोय म्हणजे

कुणाशी बोलतोय ?

किंवा हे जे प्रश्न उभे राहतात भुवया उंचावून
ते कुणाला मागत असतात उत्तरं ?
किंवा सालोसाल मी करतोय काय
या मित्र हरवत चाललेल्या जगात ?
किड्या-मुंग्यांनी ओढून न्यावे
आपल्या सजातीयाचे कलेवर
तसे ओढत नेतो आहे
मी कुणाला ? कशासाठी ?
की आता तेच आहे अन्न
पुढच्या प्रवासासाठी ?

--- ईश्वर असो की माणसे की वस्तू की निसर्ग, प्रत्येक नात्यात स्वत:चे अलग पडत जाणे हा या कवितांचा स्थायीभाव दिसतो. विशेष म्हणजे हा भाव इथे व्यक्तिगत वैशिष्ट्याच्या रूपात येत नसून जणू एका निरर्थक पाहण्याच्या दृष्टीतून येतो. हे मराठीत वेगळे आहे.

--- ००० ---

नाटक --एक वर्तमान : चं.प्र. देशपांडे : एक काव्यविमर्श

ही एका साहित्यिकाची तत्वचिंतनपर कविता. विस्मयाने स्तंभित होत गुंतून पडावे असे क्वचितच काही वाचनात येते. ही कविता सकृद्दर्शनी निरपेक्ष कालसंबधित वाटली तरी ती व्यक्तीमात्र व जगताचे असणे (being) होणे किंवा घडणे (becoming) तसेच करणे वा कृतीशीलता (doing) असा अस्तित्वाचा समग्र पैस व्यापणारी आहे. यातील कालभाष्य संदर्भप्रचूर असल्याने एका वाचनात कळणारे नाही. परंतु ती कवीने अटीतटीच्या जीवन प्रसंगात राहून मांडलेली एक कैफियत असल्याने एकाच वेळी त्याचे नाट्यविषयक कलाभान व जीवन दृष्टीकोन दर्शवणारी आहे. तत्वतः अनंत (infinite) काळाच्या सान्त (finite) भानाने व्यक्तीच्या जागृतावस्थेत संविद-जाणिव (conciousness) विलसत असते. त्यात विश्व एक घटित (phenomenon) या रूपाने प्रत्ययास येते. गीतेतील कालसंबधित "अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत । अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ।।२.२८।। तसेच नासदियसुक्तातील सृष्टीपुर्वी सत् असत् काहीच नव्हते इत्यादी आपल्याला परिचीत असते. त्यानुसार 'असणे' किंवा व्यक्त (existence) हे दोन अव्यक्तांच्या नसण्याच्या (void) दरम्यान भासमान होणारे आहे एवढे तरी कळण्यासारखे आहे. थोडक्यात व्यक्त-वर्तमान हे अमूर्त नसून प्रखरमूर्त स्वरूपातील तसेच कालश्रृंखला भूत-वर्तमान-भविष्य अशा प्रकारची आहे. परंतु या कवितेत आरंभ ते अखेर याचा एक संकल्पित व्यत्त्यास प्रत्ययाला येतो. तो धारणारूप आहे की छद्म उपहासगर्भ आहे असाही प्रश्न पडून जातो. आरंभीच्या कडव्यात कविने वास्तवाची व्याख्या करत त्याची भरवण भूत-भविष्याने घडल्याचे म्हटले आहे. त्याच्या

दृष्टीने वर्तमान अस्तित्वातच नाही. ते पुढच्या कडव्यात अधिक स्पष्ट होते (समजतेय का/वर्तमान म्हणजे निव्वळ पोकळी / काहीच नसलेली / ना ग्रह ना तारे ना सूर्य ना पृथ्वी) याचा अर्थ कविचा संकल्पित नाट्यकालावकाश भूत भविष्य व्यापणारा असून त्यामध्ये वर्तमानाला कसलीच जागा वा भुमिका नाही. वर्तमानात जगण्याची कल्पनाही त्याला विसंगत वाटते. त्यामुळे वर्तमानात नाट्य घडविणेही त्याला उलट किंवा विरूद्ध प्रकारातील व म्हणून अशक्य कोटीतील वाटल्यास नवल नाही. पुढच्या ओळीतून क्रमशः वर्तमानाला दिलेल्या नकारांची एक चढती कमानच अनुभवास येते. थोडक्यात कविचा नाट्यावकाश भूत-भविष्याने आधारभूत अशा ज्ञात विश्वातील असून वर्तमानाशी त्याचा संबंध तूटलेला आहे. वर्तमान ही निव्वळ पोकळी असल्याने त्यात शोधण्याजोगे काय असते? असा त्याचा सवाल आहे. त्यामुळे माहितीशोधक संगणकालाही त्यातून काही गवसण्यासारखे नाही अशा निष्कर्षाप्रत कवि येतो. इथे विज्ञानाची वर्तमान संदर्भातील जी अज्ञेयता सूचीत होते ती हतबलता की सैद्धांतिक स्वरूपातील असाही एक प्रश्न समोर येतो. तो अभावितपणे आधुनिक पुंजयामिकीतील (Quantum mechanics) अनिश्चितता तत्वाचे स्मरण करुन देतो.पुढे हे सूत्र नाट्य (की न-नाट्य) विषयातील समावेशक घटकसंदर्भात एक प्रश्नांकन स्वरूपात विस्तारत जाते.यात अशा नाटकाचा दिग्दर्शक नायक नायिका नेपथ्य प्रकाशयोजना प्रेक्षक स्वगत असे बहुतांश घटक प्रविष्ट होत एका व्यापक नकाराचा स्वर बुलंद करताना दिसतात. एवढेच नव्हे तर काही नाटके (वेटींग फाॅर गोदो, एक शून्य बाजीराव गार्बो (?) व नाटककार यांचाही उल्लेख केला जातो. अखेरीस नाटक कसे घडायला हवे याची कविला अभिप्रेत भुमिका येते ती -- घडून न घडल्यासारखे व्हायला हवे -- या स्वरूपात. ते पुष्कळच आध्यात्मिक आशयाचे वाटते. तो शांकरभाष्यातील अजातवाद (समर्थांच्या भाषेत ' अगा जे घडलेची नाही)म्हणून प्रसिद्ध आहे. या कवितेतील रूपकयोजनेत नाटकाचे प्रयोजन कालसंदर्भात की कालाचे प्रयोजन नाट्यसंदर्भात की कवितेच्या शिर्षकात आहे तसे दोन्ही अन्योन्याश्रय स्वरूपात असा एक प्रश्न पडून जातो. खरे तर ही संपुर्ण कविताच पृच्छा स्वरूपातील एक प्रश्नमालिका असल्याचे दिसून येते. कवितेचा काहीसा सकारात्मक शेवट सोडल्यास यात कसलेही गृहीतक नाही. असलेच तर ते गणितातील शून्य अभ्युपगमासारखे (Null hypothesis) आहे. याला मृषा किंवा ॲब्सर्ड म्हणता येणार नाही. उलटपक्षी ते अशा प्रवृत्तीचा शोध घेत त्याचे अंतरंग उघड करणारे आहे असे म्हणता येईल. कालावकाश व वर्तमान संबंधित असल्याने या काव्यनिवेदनाला घटितार्थशास्त्रीय म्हणावे की अस्तित्ववाचक प्रश्नांकन करणारी म्हणून याला अस्तित्ववादी म्हणावे की वस्तुनिष्ठा व एकसत्व तर्काभासाला विरोधी जाणारी म्हणून उत्तराधुनिक म्हणावे असा माझ्यासमोर प्रश्न आहे. अर्थातच यात नामांकनाचा सोस नसून प्रवृत्तीचा शोध घेण्याचा प्रयास आहे इतकेच.

Champra Deshpande

मन:पूर्वक धन्यवाद, दरेकर सर !

कविता अशी –

नाटक – एक वर्तमान

न कळता बोलून फायदाच काय
वर्तमानात जगा हा बोध ठीक
पण कळतोय का अर्थ
वास्तवात खरे तर असतात
भूतकाळ आणि भविष्यकाळ
वर्तमान काळ नसतोच
पण आता
उलटे करा म्हणताहेत
भूत भविष्य जाऊ द्या
वर्तमानातच घडवा नाटक
समजतेय का
वर्तमान म्हणजे निव्वळ पोकळी
काहीच नसलेली
ना ग्रह ना तारे ना सूर्य ना पृथ्वी
आहे का असा एखादा संगणक
जो वर्तमानात करेल सर्च
आणि शोधेल काही
माहिती नसलेले
कोण असेल दिग्दर्शक
या नसलेल्या नाटकाचा
कोण करेल याची प्रकाशयोजना
मेंदूबाहेरची
कोणती अभिनेत्री
होईल माता
भावनाहीन
आणि कोणता नायक
म्हणेल स्वगते
नसण्याचे स्वागत म्हणून

प्रेक्षागृहात असतील
एक एक प्रेक्षक
स्त्री असो की पुरुष
ज्यांचे डोळे असतील
कथाबाह्य आणि कसलीच
अपेक्षा न करणारे
बाहेरून काही नकोच आहे
कारण मी म्हणजे एक
खजिना आहे पूर्ण गरीब
हेच तर आहे
उपकाराचे नाटक
आपोआप चालणारे
म्हटले तर उरलेले
गालिब म्हणाला
खयाल अच्छा है
विचारांकडे पाहून तो हसत होता
विचार समजत होते की ते आहेत
येणार कुणीच नव्हते
हे तर नसलेल्या गोष्टींचा
शोध घेणारे नाटक
बेकेट म्हणाला मलाच नाहीं माहीत
तर तुम्हाला सांगू काय
खानोलकरांनी सांगून ठेवले
कोणत्या काठीचे हट्ट चालतील
आणि कोणते नाही चालणार
ते होते बाजीराव पण शून्य उरले
नाटकात खुपसलेल्या सुरीने
मेलेली विद्यार्थिनी
असलेले काही लैंगिक देत होती

की नसलेल्या जगात अंतर्धान पावत होती

एका नाटकात आला संवाद

तू आधी होतास तसाच चालला असतास

नाटक असेच तर घडायला हवे

काहीच न घडल्यासारखे

वर्तमानात

--- 000 ---

To think new thoughts you have to break the bones in your head.

– Jean -Paul Sartre (हीच ती कवटीच्या आतली हिंमत ---).

रवीन्द्र दामोदर लाखे

April 3 at 11:21 AM

-

https://www.facebook.com/share/p/FuJJDEXMU22yD134/?mibextid=oFDknk

काल चंप्रंचं हे पुस्तक घरी आलं. यात चंप्रंची महत्त्वाची नाटकं आहेत. ते स्वतःच आपलं पुस्तक प्रकाशित करतात. मराठीतला अत्यंत महत्त्वाचा कवी, नाटककार आणि तत्त्वचिंतक - निरपेक्ष पणे आपला लेखन करीत राहणारा हा माझा मित्र आहे, फिलॉसॉफर आहे नि गाईडही आहे. मूख्य म्हणजे लेखकाआधी तो माणूस आहे. याही पुस्तकाचं मुखपृष्ठ म्हणजे चंप्रनी काढलेला फोटो आहे. कॅलिग्राफी Priya Deshpande ची आहे. यातलं एक नाटक मी केलेलं आहे - तशी त्यांची चार नाटकं मी केली आहेत. शिवाय परिशिष्टात नाटककार चंप्र असा माझा लेख आहे. आपल्या आयुष्यात असा एखादा ग्रेट माणूस असायला फार मोठं भाग्य लागतं - खूप मोठी माणसं पाहिली त्यांचा सहवास मिळाला पण या सम हाच.

नाणेफेक आणि इतर पाच नाटके

हे पुस्तक गेल्या २५ मार्च ला प्रकाशित झाले. इतर काही कामांत व्यस्त होतो, त्यामुळे, त्याच्या विक्रीबाबतची पोस्ट इथे द्यायचे राहिले होते. सदर पुस्तकात खालील नाटके समाविष्ट आहेत ---

ए, आपण चहा घ्यायचा ?

धागेदोरे

नाणेफेक

सध्या तरी शेवट गोड

सामसूम

झालं गेलं विसरून जाऊ

(अर्थात -- क्लॅरिटी)

आणि विशेष म्हणजे

परिशिष्टात रवीन्द्र दामोदर लाखे यांचा, माझ्या नाट्यलेखनाबाबतचा अभ्यासपूर्ण लेख आहे.

हे पुस्तक ३८४ पानांचे असून त्याची किंमत रु.४००=०० (रुपये चारशे फक्त) आहे.

सध्या त्याची सवलतीची किंमत रु.३००=०० (रुपये तीनशे फक्त) पोस्टेजसह ठेवलेली आहे.

खरेदी करायचे झाल्यास पैसे पाठवण्यासाठी आवश्यक माहिती अशी आहे ---

Chandrakant Prabhakar Deshpande

HDFC BANK Saving Account No.03591000003204

IFSC : HDFC0000359

For G pay : Mahesh Deshpande mbl 9970065875 OR

UPI ID gathaent-3@okhdfcbank

Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा.

धन्यवाद !

गनिमी काव्याचे नमूने

--- विश्वास कणेकर, प्र ० वर्णमुद्रा पब्लिशर्स.

हा संग्रह वाचताना आवडलेल्या ओळी ---

माझ्याबद्दलच्या त्यांच्या अज्ञानातच

मी जगत राहीन (पान १४)

खऱ्याखुऱ्या खऱ्यापेक्षा

खोटंखोटं खरंच

खरंखुरं वाटतं (पान ३४)

प्रेत नसणे म्हणजे जिवंत असणेच की (पान ३९)

तूच आधी गेलीस तर ?

तुझं नसणं

म्हणजे माझ्यात मी नसणं

माझंच जाणं मी पाहणं (पान ७४)

आता तरी मास्क काढ मनावरचा

आणि

ये भानावर. (पपान ९५)

आठवणींचं शेवाळ वर्तमानावर.

केव्हा यायचं असतं भानावर ? (पान १०७)

--- अशा ओळी लिहिणारा कवी त्याचे समस्याप्रधान जगणे उलटेपालटे करून पाहतो आहे, हे जाणवते. तरीही क्वचितच एखादी पूर्ण कविता सलग वा सखोल जाण व्यक्त करते, असे दिसते. दिसणं (पान ३५) आणि खेळखंडोबा (पान ७५) या कविता तशा म्हणता येतील. हे असे का घडत असावे, असा प्रश्न हा संग्रह समोर ठेवूनच विचारता येतो. कवी प्रांजळ असल्याने इथेच काहीसे उत्तर सापडते. याचे काहीसे उत्तर खेळखंडोबा या कवितेत आहे. स्वत:ला बोन्साय करणे स्वीकारल्यावर कविता फुलवणे कशाला ? तसेच आत्मकलेश या पान ९७ वरच्या कवितेत या ओळी येतात –

कधी सुटणार ही माझी कुबट सवय

सांगण्याची ?

त्याच आणि तसल्याच जुनाट शब्दांतून ?

याचे कारण, कविता लिहायची हे ठरलेले आहे, जगणे राहू दे जमेल तसे – असे घडत असावे. हे म्हणजे मग घोड्यापूढे टांगा बांधणे होते. अशा अवस्थेतूनही बरेच कवी जात असणार. या अवस्थेला प्रांजळ आणि खुली अभिव्यक्ती देणारा हा संग्रह आहे.

--- ००० ---

वासकसज्जिका (कवितासंग्रह)

--- नेहा भांडारकर , प्र ० सायन प्रकाशन.

वासकसज्जिका म्हणजे सर्व काही आवरून, नटून प्रियकराची वाट पाहणारी सुसज्ज नायिका. या कवितासंग्रहातल्या कविता पाच विषयांत विभागलेल्या आहेत. ते विभाग असे --- प्रकृतीपुरुष, स्त्री आणि संस्कृती, अधिक्रमण-स्पर्श-मोक्ष, कविता आणि पाऊस. या संग्रहाच्या नावाप्रमाणेच त्यातल्या कवितांची भाषाही ‘ राजेशाही ‘, लखलखीत आणि जरा जडच म्हणावी अशी आहे. त्यामुळे, अर्थातच ‘ धीरे धीरे चल ‘, अशा पद्धतीने हा संग्रह वाचावा लागतो. (याला कुणी ‘ वाचकभंजिका ‘ म्हणू नये म्हणजे झाले !) एका अर्थाने या कवितेलाच, वाचकासाठी नटूनथटून सज्ज असलेली चमकदार कविताही म्हणता येईल. ही एक प्रकारची स्वप्नील उदात्तता आहे. एकूणात ही स्वच्छंदी – रोमँटिक कविता आहे. कधी आहे तेच उत्तुंग भाषेत व्यक्त करणारी तर कधी कल्पनेने उत्तुंगता निर्माण करणारी. सिनेमात जसे राज कपूर आणि सुभाष घई हे शोमन समजले गेले त्याचप्रमाणे ही भाषेतली आतसबाजी आहे. अहंकार नष्ट होऊन मुक्ती मिळणे हा एक (माहीत

नसलेला असा) एक मुक्तीचा मार्ग असतो आणि दुसरा म्हणजे आहे हेच जग एका वेगळ्याच स्तरावर असल्याचे कल्पून त्यापासून दूर जाणे, हा. ही कविता या दुसऱ्या मार्गाने जाणारी वाटते. क्वचित कधी ही कविता आहे ते व्यक्त करते – ते पाहून, त्याच्या तुलनेत, या कवितेची मूलवृत्ती अधिकच ठळकपणे जाणवते.

कविता कशी असावी असे वाटते तर अशी –

शब्द अंबर (पान ९९)

शब्दांबरावर लटकवावीत
झुंबरं अक्षरांची
प्रज्वलित व्हावेत
अगणित दीप कवितांचे
नवरसाच्या मिलाफाने
झुलावे इंद्रधनूने
सप्तरंगी लेणे कोरून क्षितिजावर
शुभ्र करडे काळे सावळे
तरंगावेत ढगांचे पुंजके
झिरपावे कवीने
होऊन श्रावण
अन गावे रिमझिम गाणे

लेणी, उत्खनन, परंपरागत कल्पना, प्रतिमा अशा मार्गाने ही कविता व्यक्त होत राहते. यात थोडा बदल म्हणजे, क्वांटम थिअरी, चुंबकीय लहरी, लॉग आऊट, स्क्रीन शॉट , वगैरे असे समकालीन शब्दही येतात. जून वा परंपरागत वा काल्पनिक वास्तव आणि आजचे प्रत्यक्ष वास्तव या दोन्हींतही ही कविता वावरते. ही कविता बुद्धिजीवी कलाप्रेमींच्या आवडीनिवडी जपते. (पान ६१). आदर्श, बोध, वैचारिकता, निवेदन पूर्ण करणे, सारांश सांगणे यांच्या मर्यादा अनेक ठिकाणी पडलेल्या दिसतात, ते यामुळेच असावे. कविता कशी असायला हवी हे जणू ठरलेलेच आहे. त्यामुळे या कवितेत अज्ञातातील झेप क्वचितच दिसते. तरीही खालीलप्रमाणे अनेक मिती असलेल्या, अर्थपूर्ण ओळीही अनेक ठिकाणी दिसतात –

शक्य झाल्यास शोषून घे तू
आर्द्रता माझ्या डोळ्यांतील
अन बरस धरणीवर मनसोक्त
पूर्ण रिक्त होईस्तोवर (पान ११९)

तर कधी कोश बनवत राहिले

आयुष्यभर एकांतवासाचा (पान ३३)

खोलवर झालेल्या जखमा

त्या जखमांचे व्रण

हव्या नको असलेल्या

दृश्य अदृश्य स्पर्शांचे डाग

कधी कधी विस्मृतीच्या काळोखातून

उजेडात येतात

अधिक गहिरे अर्थ घेऊन (पान ४०)

या संग्रहातल्या पुढील कविता मला आवडल्या – लॉग आऊट (पान २३), वॉल्टेअरचे तत्त्वज्ञान (पान ९१), घुसमट (पान १०६) आणि निगरगट्ट (पान १२३).

ही कवयित्री नको त्या झगमगाटांच्या मोहांना बळी पडून, प्रत्यक्षातले जगणे ' पाहण्याच्या ' स्वत:च्या क्षमतांना दडपत आहे, असे वाटले. या क्षमतांना जर उत्स्फूर्त वाव दिला गेला तर खूपच भेदक आणि अर्थवाही कविता तिच्याकडून लिहिली जाईल, असेही वाटले.

--- ००० ---

वासकसज्जिका ह्या कवितासंग्रहावर एक सजग वाचक म्हणून Champra Deshpande सरांनी दिलेली साक्षेपी प्रतिक्रिया महत्वाची वाटते. --- नेहा भांडारकर.

गिरीश पतके यांचा ' रंगावाचा ' मधला लेख –

--- दिलीप जगताप – भाग २.

इये मराठीचिये नगरी मराठीचे डॉक्टर शेकड्याने आहेत पण नाट्यवाङ्मयाची अभ्यासपूर्ण चिकित्सा करणारा एकही नाही. अशी दुर्दशा कशामुळे होत असावी ? सगळीकडे निर्भय बनो चे नारे असताना, इथे मात्र सभय रहो, असे का घडत असावे ? अभ्यासाचा आळस हे असेल एक कारण किंवा मग कुवतच नसावी. कुवत आणि हिंमत. हिंमतही लागणार. कारण आपण काही लिहिले तर त्याचे हसे तर नाही होणार ? – हा विचार असणार. आणि नाटककार समजा परिवर्तनवादी नसेल आणि आपण त्याच्यावर लिहिले तर ते एक प्रकारे प्रतिगामित्वाचे बळ वाढवणारे तर ठरणार नाही ? – असेही काही असावे. ते असो. गिरीश पतके हा एक बिगर-डॉक्टर हे काम हिंमतीने करतो आहे.(दुसरे एक बिगर-डॉक्टर आहेत – रवीन्द्र दामोदर लाखे.) कशाला हवाय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा ? जुन्यांच्या पुण्याईवर ? आज काय स्थिती आहे मराठीची ? असो.

मे' २३ च्या ' रंगावाचा ' मध्ये या लेखाचा पहिला भाग प्रसिद्ध झाला होता. आता हा दूसरा भाग आलेला आहे. आणखी एक तिसरा आणि शेवटचा भाग येणार आहे, असे कळते. दिलीप जगताप हा मराठीतला एक निवडक महत्त्वाचा नाटककार आहे. कोण आपल्याला टाळ्या वाजवते आहे का, कोण बक्षिसे देते आहे का, कुणी कुठे आपल्या एकूण लेखनाची योग्य दखल घेत आहे का – या बाबींच्या फंदात न पडता गेली कित्येक वर्षे मराठी रंगभूमीला महत्त्वाच्या संहिता देत आलेला हा लेखक आहे. शेक्सपियर, सार्त्र, झने अशा अनेक नाटककारांच्या महत्त्वाच्या नाट्यकृती या नाटककाराने मराठीत आणलेल्या आहेत. (शिवाय स्वत:चीही अनेक नाटके आहेतच.) नाट्यतंत्र आणि भाषा यांवरच्या त्याच्या हुकमतीमुळे हे सगळे अत्यंत दर्जेदार काम झालेले आहे. अशा या लेखकाच्या लेखनाचा सर्वांगीण आवाका घेण्याचे आणि मराठीत त्याला योग्य ते स्थान देण्याचे काम गिरीश पतके यांचा हा प्रदीर्घ लेख करत आहे. हे काम करायला खूप मेहनत, बुद्धी आणि मर्मदृष्टी लागलेली आहे, हे स्पष्टच आहे.

जगताप आणि पतके या दोघांच्याही कामाला मराठीतल्या नाट्य आणि कला विश्वाकडून योग्य तो प्रतिसाद मिळायला हवा. कशाचेच काही देणेघेणे नसल्याप्रमाणे डल, मद्दड पडून राहिलेले आपले कलाक्षेत्र अशा कामांनी जागे व्हावे आणि प्रभावित व्हावे, असे वाटते. अन्यथा, अभिजात भाषेचा दर्जा राहील बाजूला, त्या ऐवजी, जाऊ दे, मरू दे असे म्हणायची वेळ येईल !

--- ००० ---

असीम प्रदेश (कविता संग्रह) **एफ बी वर न दिलेले**

--- मुग्धा देशपांडे, प्र ० वर्णमुद्रा पब्लिशर्स.

पान नंबर १६ वर ३ नंबरची कविता बघा. स्फोट वगैरे घडतात. कविता ईश्वराला विचारते की आम्हा माणसांना जन्माला घालायचा तुझा नेमका उद्देश तरी काय होता. आणि शेवटी म्हणते, आमच्या पेशींत काहीतरी विधायक करायची ऊर्जा टाक. नुसते सत्प्रवृत्त असल्याचे वैचारिक व्यक्त करणे म्हणजे कविता नव्हे. पान ३९ वरची एक कविता म्हणते, की तिने तिच्या सीमारेषाविहीन अद्भूत प्रदेश वसवला. म्हणजे काय ? पान ४९ वरच्या एका कवितेत –

आधुनिक युगातला पुत्र तुझा मी
संवेदन आणि बुद्धिमत्तेचा
संगम घडवीन भविष्यात
चमकत्या बेगडी दुनियेत
शिंपेन किरण आसमंतात

इथेही, म्हणजे काय, हा प्रश्न येतोच. असे आणखीही काही ठिकाणी आहे. एखादे माहितिवजा निवेदन करणे वा एखादा विचार मांडणे वा एखादा आदर्श सांगणे – हे सगळे एक मितीय व एकरेषीय असते. याला कविता नाही म्हणता येणार.

मध्येच एखादी कविता ठीक म्हणावी अशी येते, उदा ० पान २९ वरची पिकासो बाबतची कविता. पण यातही पिकासोच्या चित्रांचे उदात्त वर्णन करून, शेवटी, मला कळली आहेत का ती चित्रे असा प्रश्न विचारणे आहे. भाषा, बहुश्रुतता एवढे पुरेसे नाही ठरणार कवितेला. या कवयित्रीचा पहिलाच आहे हा संग्रह. पण तिच्या अधिक अर्थपूर्ण कवितांची वाट पाहावी असा मात्र आहे.

--- ००० ---

२०-०४-२०२४.

शब्दांच्या पसाऱ्यातील अर्थांच्या आत्महत्या (कविता संग्रह)   **FB वर दिलेले नाही.**

--- सुनीता झाडे -- प्र ० हस्ताक्षर प्रकाशन गृह

मजकुराची कविता होण्यासाठी काय व्हायला हवे ? सामान्यत: न जाणवणारे असे काही विचार, भावना, प्रतिक्रिया, मूड, निराशा, उद्वेग, क्रोध वा पूर्ण निरर्थकतेची जाणीव – असे काही. यात, जगण्यात दिसलेल्या संबंधांची व्यामिश्रता वा जाणवलेली असंबद्धता वा निरर्थकता – असे काहीही. कवितेची रचना आणि आशय यांत काहीशी अनपेक्षितता असते. या अर्थाने ती काहीशी वा बरीच नाट्यमयही असते. पण, हे असे फारसे काही नसेल आणि तरीही कविता लिहिली जात असेल तर ' शब्दांच्या पसाऱ्यातील अर्थांच्या आत्महत्या ' असाच अनुभव येत राहणार. कुठूनही कॅमेरा फिरवला तरी दहाबारा गोष्टी त्याच्या रेंजमध्ये येतातच पण त्यांना ' काव्या ' चा स्पर्श होत नसेल तर मग फक्त सवयीतले तपशील, सवयीतले अनुभव आणि ' कविता असते अशी ' या समजुतीतून आलेली कृतक कलात्मकता असे आणि इतपतच काही घडते. या संग्रहात हेच घडताना दिसते आहे.

सुट्या सुट्या काही ओळी वा अर्थांचे कंगोरे पाहता, या कवयित्रीकडे स्वातंत्र्य आणि धाडस असल्याचे दिसते. ते कवितेत पूर्णत्वाला का जात नसावे तर ' यशस्वी कविता लिहिण्याची इच्छा ' हे त्याचे कारण असावे असे वाटते. या कवयित्रीचे स्वत:चे असे काही व्यक्त होण्यात तिच्याच स्थितिशील मनाचा अडथळा असावा असे वाटते. या प्रकारात स्वत:च स्वत:ची सर्जकता दडपणे घडत राहते. या अडथळ्यावर मात करता आली तर ही कवयित्री ' अर्थपूर्ण ' कविता लिहील असे वाटते.

तरीही आहे यात चांगल्या वाटलेल्या काही कविता सांगायच्या झाल्या तर, ' आभाळाचे विषय ' (पान ३४), ' शब्दांच्या पसाऱ्यातील – ' (पान ५१), ' स्वप्नातला पुरुष ' (पान ८३), ' रोशन ' (पान १२९) आणि ' सहीतला मोर ' (पान १३९) – या सांगता येतील.

या कवयित्रीने कवितेबद्दलच्या ‘ अपेक्षित ‘ कल्पना फेकून देऊन स्वत:च्या जगण्यातले प्रत्यक्ष अर्थ यशापयशाची पर्वा न करता व्यक्त केले तर ती खूपच प्रभावी कविता लिहू शकेल, असे वाटते. असे वाटावे असे पुरेसे पुरावे या संग्रहात आहेत.

--- ००० ---

--- हा अभिप्राय मी फेसबुकवर नाही देत. फक्त तुमच्याशी संवाद साधण्यापुरताच इथे दिला आहे. माझे सगळे बरोबरच असते, असे मला वाटत नाही. पण, तुमचा संग्रह वाचला आहे तर प्रामाणिकपणे जे वाटले ते तुम्हाला सांगणे हे माझे काम आहे. कविता लिहीत राहा -- तुमचा मार्ग तुम्हाला नक्की दिसू लागेल ! शुभेच्छा !

--- 000 ---

हिल्लोळ हरवून आतबाहेरचा (कविता संग्रह)

--- प्रज्ञा दया पवार -- प्र ० – पॉप्युलर प्रकाशन

हा कविता संग्रह मला नुसताच आवडलेला नसून महत्त्वाचाही वाटतो. याची कारणे मी नंतर देणार आहे. पण, त्याचबरोबर, या निमित्ताने काही लिहिणार आहे.

साहित्यबाह्य क्षेत्रात तेंडुलकर म्हणाले होते की मला बंदूक द्या, मी मोदींना गोळी घालू इच्छितो. त्यांची ऊठबस डाव्यांमध्ये होती, ते डाव्यांचे समर्थक होते. प्रत्येक लेखकाने राजकीय भूमिका घ्यायला हवी आणि ती डावीच असायला हवी, असे वाटणाऱ्यांना हे अर्थातच आवडणारे होते. पण, तेंडुलकर त्यांच्या लेखनात, विशेषत: नाट्यलेखनात अशा राजकीय भूमिकेला बांधील होते का ? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच येईल. त्यांच्या आकलनाप्रमाणे एकूण मानवी जगण्याचा आवाका घेणे हेच त्यांच्या लेखनातून घडत होते. त्याशिवाय ते ‘ सखाराम बाइंडर ‘ सारखे नाटक लिहू शकले असते का, हा प्रश्नच आहे. ‘ कन्यादान ‘ तर विवाद्य ठरल्याचे इथे आठवते. तसेच उदाहरण मी सतीश तांबे यांचेही देईन. ते फेसबुकवर बरेचसे डावे बोलताना दिसतात, बीजेपीच्या विरोधात असतात, पण, ही राजकीय भूमिका त्यांच्या कथालेखनावर स्वार होत नाही. उदाहरणार्थ, त्यांची, ‘ पळवाटा वाटा पाताळाच्या ‘ ही कथा वा अन्य बऱ्याच कथा बघा. अमुक एक वैचारिक ठामपणा अभिव्यक्त न करता त्यांच्या कथा खुलेपणाने जगणे ‘ पाहणाऱ्या ‘ आहेत. तसेच कवितेतले उदाहरण द्यायचे झाल्यास, राहुल पुंगलिया यांचे देता येईल. ते स्वत:ला गांधीवादी म्हणवतात पण कोणत्याही वैचारिक साच्यात वा निष्कर्षात त्यांची कविता अडकलेली नसते. कोणतेही चांगले लेखन हे व्यक्तिगत मतांच्या मर्यादेत बद्ध नसते, हाच याचा अर्थ. लेखक जेव्हा खुला असतो, मानवी जगण्यातल्या समस्यांना वैचारिक अंतिमता देणारा नसतो तेव्हाच तो काही मौल्यवान निर्मिती करू शकतो, हेच अनेकदा दिसून येते. जगातल्या अनेक मोठमोठ्या कलावंतांनीही हे सांगितलेले आहे.

‘ हिल्लोळ – ‘ या कवितासंग्रहात अनेक कविता या अशा ‘ मानवी ‘, अमुक एक वैचारिक दिशा न देणाऱ्या आणि म्हणूनच अधिक व्यापक आशयाच्या आहेत, असे मला जाणवते. स्त्रीच्या कविता असून त्या स्त्रीवादातही बद्ध होत नाहीत. सर्व स्त्री-

पुरुषांना आणि कोणत्याही व्यक्तीला जगण्यात प्रस्तुत ठरतील अशा या कविता आहेत. हिल्लोळ म्हणजे दु:ख वा वेदनायुक्त कल्लोळ वा गोंधळ. असा गोंधळ अनुभवत नाही असे कुणीच नसते. इथे तो निर्ममपणे ‘ पाहिला ‘ जातो, हे विशेष आहे. प्रज्ञा दया पवार या पुरोगामी विचारांच्या, जगण्यात तशा तीव्र प्रतिक्रिया देणाऱ्या म्हणून आपल्याला माहीत असल्या तरी त्यांची ती प्रतिमा मनात बाळगून वाचू नयेत अशा बऱ्याच कविता या संग्रहात आहेत. यामुळेच, यातल्या बऱ्याच कविता या वाचून ‘ संपत ‘ नाहीत. यासाठी उदाहरणादाखल मी, ‘ आतला दरवाजा ‘ (पान २४), ‘ नसलेल्या परमेश्वरासारखं ‘ (पान ५१), ‘ पुनर्लेखन ‘ (पान ६०), ‘ गेली सगळी संबोधनं वाऱ्यावर उडून गेली ‘ (पान ६३), ‘ गुहेच्या तोंडाशी ‘ (पान ६६), ‘ तुला नाही चेहरा कुठलाच ‘ (पान ७३) आणि ‘ हिल्लोळ हरवून आतबाहेरचा ‘ (पान १६९) या कवितांचा उल्लेख करेन. मला या कविता विशेष वाटतात. अशा आणखीही कविता या संग्रहात आहेत.

या कविता जर एखाद्या विचारसरणीने प्रेरित नाहीत तर मग त्या कवयित्रीची व्यक्तिगत सुखदु:खे वाचकांच्या मनात परावर्तित करणाऱ्या आहेत का ? एखादा मूड, एखादी मन:स्थिती सांगणाऱ्या आहेत का ? तर तसे गुंतणेही इथे जाणवत नाही. इथे पूर्ण ‘ पाहून ‘ बाजूला होणे आहे. अनुभव हे सत्य, असत्य वा कल्पित असतील – त्यामुळे हे नुसते फोटोग्राफिक चित्रणही नाही. मनाचे गोंधळ, भ्रम, आभास यांनाही इथे वाव आहे. खालील कविता पहा –

पुनर्लेखन

सनी लिओनी नाव असलेली स्त्री
मी असले
तरी मी ती नाही.
माझं नाव सांगताच मला आरपार न्याहाळणाऱ्या नजरा
तिच्याचसाठी असतात या उघड सत्याने
माझा जीव भांड्यात पडतो नि मला घायाळही करतो.
एक सेक्शुअल ऑब्जेक्ट
बनून राहण्याचं
मुक्तमोकळं स्वातंत्र्य लिओनी जगते.
तिच्या बेडरूमच्या खिडक्या थेट आकाशातच सताड उघडतात
तिच्या चादरीवर
भांडवली मऊशार पिसं
स्वतःला टांगून घेतात
वासनेच्या निळ्याजांभळ्या फुलांचं मत्त रान
दौडत जातं रक्तातून
तिच्या निव्वळ असण्याने आभासी.

ती एकटी असताना काय करत असेल

पुरुषांचे अतींद्रिय आकार छळत असतील का तिला स्वप्नातही ?

मीच आहे पिकासोची वीपिंग वुमन

भयानक दु:खाच्या शरीरात राहणारी

जसं मला वाटतं कैकदा

तसं वाटत असेल का तिलाही ?

गच्च भरलेल्या विहिरीतून

उसळावेत पाण्याचे प्रपाती लोट

नि क्षणार्धात कोरड्याठाक् विहिरीतून

वर सरसरत यावा स्वतःचाच अनोळखी आवाज

चकित

भयचकित

ऐकतेय सनी लिओनी

एक तीक्ष्ण खिळा

लपवून ठेवलाय तिने हातात

रात्रभर खोदत असते ती टोकदार अग्राने

सगळे गाढ झोपेत असताना

तो प्राचीन अंधारलेला खंदक.

स्वातंत्र्याचे करुण डोळे

चमकून उठतात

पलीकडे नेणारं भुयार

नाहीच सापडत कधी सनी लिओनीला

सनी लिओनी नाव असलेली स्त्री

मी असले

तरी मी ती नाही

छे .. छे .. हे तिचं पुनर्लेखनही नाही

अथवा

माझंही.

ही काही करमणुकीसाठी लिहिलेली उथळ कविता नाही. जगण्यासाठी वापरात येणाऱ्या मानवी प्रतिमांचा खेळ ही कविता मांडते. कुणाचीही कोणतीही प्रतिमा असूही शकते आणि नसूही शकते ! कोणतीही प्रतिमा स्वीकारली तरी तिला कशाचीही पुनरावृत्ती म्हणता येत नाही. आलटून पालटून येणाऱ्या या कदाचित भासमय प्रतिमांतून ही कविता प्रतिमेच्या सत्यतेचा प्रश्न समोर आणते. यापुढची प्रत्येक वाचकाची कविता ही त्याची स्वतंत्र असू शकते. ज्या शक्यता आपल्या जगण्यात नाहीत त्या असूही शकतात असा भासमय व्यूह तयार करून ही कविता, एक प्रकारे, सर्वच प्रतिमांचे अस्तित्व धोक्यात आणते. ही चिंतनशीलता कोणताही कवी जाणीवपूर्वक, ठरवून आणू शकणार नाही. मन खुले सोडण्याची कलेतली सिद्धी त्यासाठी असावी लागणार.

अशा, वैचारिक भूमिकावादी नसलेल्या पण मानवी जाणयुक्त असलेल्या बऱ्याच कविता या संग्रहात आहेत. या कविता सामाजिक-राजकीय हेतू बाळगणाऱ्या वा अमुक बाजू घेणाऱ्या नाहीत. या सर्व माणसांसाठी आहेत. हे सगळ्यांचे जगणे आहे. कलाबाह्य, व्यावहारिक क्षेत्रात कोणतेही मतभेद असोत, या कविता सर्वांनीच आत्मीयतेने वाचाव्यात अशा आहेत. कलेच्या असण्यातून हेच सौहार्द आणि समज निर्माण व्हावी हीच तर कलेची मूल्यात्मकता. म्हणूनच. वाचकांनी, कलवंताच्या आपल्याला आवडणाऱ्या वा न आवडणाऱ्या प्रतिमेचे ओझे घेऊन कोणतीही कला वा कविता पाहणे चुकीचे ठरते. ही समज सर्वच वाचकांनी बाळगायला हवी. कोणत्याही कलावंताचे अमुक वागणे वा विचार पटत नाहीत म्हणून त्याला बाद करणे हे कलेतली प्राथमिकही समज नसल्याचे लक्षण आहे.

--- ००० ---

11-07-24.

तुझं शहर हजारो मैलांवर – कवितासंग्रह

--- सुनीता डागा.

ओस जाल्या दिशा मज भिंगुळवाणे ।

--- तुकाराम.

प्रिया अशी नाजुक की हाती येऊनही हात लावू नये

बोलावले तर येणार नाही म्हणून संकोचून गप्प बसावे

--- माझ्या ‘ गालिब ‘ कवितेतून

माझ्या इच्छेचा तेवढाच राहू दे छोटा भाग

ज्यामुळे तुला मी सगळीकडे अनुभवू शकेन

--- टागोर – अनुवाद माझा.

या अवस्था समजून घ्याव्यात. या संग्रहातल्या कविता या स्त्री-पुरुष अशा प्रेमकविता वा विरह कविता नाहीत. तसे तर या कवितांना ईश्वर वा मुक्ती वा भक्ती वा श्रद्धा अशा कोणत्याही माहितीतल्या अर्थांची गरज नाही. यांतला तो म्हणजे सरळ आपण, आपल्या अपूर्णतेच्या बाहेरचा पूर्णतेचा क्षण असे समजू शकतो. ही सरळ देह, मन आणि पूर्णता यांची कविता आहे.

अनुभव व्यक्त करणे वेगळे आणि अनुभवाकडे ‘ पाहणे ‘ व्यक्त करणे वेगळे. ही पाहणे व्यक्त करणारी कविता आहे. त्यामुळे अर्थातच ही तडक प्रतिक्रिया देणारी कविता नाही. ही निव्वळ सुखदु:खांची भावनिक कविता नाही. मराठी वाचकाला सतत हवेसे वाटणारे भावनिकतेचे स्पर्श इथे खूपच कमी आहेत. प्रतिमा, अलंकार यांची गर्दी नाही. गुंग करणारी वा मजा आणणारी सांगीतिक लय नाही. भावनेपेक्षा विचार हे या कवितेच्या अभिव्यक्तीचे माध्यम आहे. ही ‘ स्वत:ला ‘ व्यक्त करणारी कविता नसल्याने हीत एक तटस्थता आहे. ती तटस्थताच इथे प्रमुख आशय आहे. या, आधी ठरलेल्या आशयाच्या कविता नाहीत. अभिव्यक्तीच्या प्रवाहाबरोबरच आशय उलगडत जाण्याच्या या कविता आहेत. या अर्थाने अज्ञातात झेप घेणारी अशी ही कविता आहे. या नुसत्या वैचारिक कॅप्सूल्स नसल्याने ‘ वाचल्या – समजल्या ‘ असे इथे होऊ शकणार नाही. आपल्या आशयाशी एकनिष्ठ असलेली ही कविता मराठीतल्या सवयीच्या कवितेसारखी दाद आणि टाळ्या घेऊ शकेल, असे नाही. वाचकाने आपल्या अपेक्षा आणि अर्थ लावण्याचे अधाशी प्रयत्न बाजूला ठेवून ही कविता वाचायला हवी.

आता जरा प्रत्यक्ष कवितांकडे वळू. कुठल्या कवितेवर किती लिहिणार ? तरीही, थोडक्यात पाहू. सुरुवातीला या ओळी पाहा –

न सांगता
अवचित आपल्या जगात
निघून जाण्याच्या तुझ्या सवयीनं
अस्ताव्यस्त होत राहिलं जगणं
तुझ्या जगाचा विचार करत
हरवत गेलं
जगण्याचं प्रयोजन (पान ९३)

पूर्ण जगण्याचे प्रयोजन म्हणावे इतके महत्त्वाचे हे काही आहे. प्रत्यक्ष संवादाबाबत हे पहा –

तुझ्या वाक्यांच्या सरी
बरसत राहतात एकसारख्या
तेव्हा कळत नाही मला की
मी भिजतेय पूर्ण की
शोधतेय गोंधळून आडोसा

तुझं अखंड बोलणं

पर्यायाने माझं न बोलणंच असतं

हे लक्षात येत नाही तुझ्या (पान ४२)

‘ त्या दिवसांना ‘ (पान १२६) सारखी एखादी कविता त्याने तिला उद्देशून व्यक्त केलेलीही येते . ‘ असणं नसणं ‘ (पान ४७) ही कविता तर या अजब गूढ संबंधाचे सखोल चित्रणच आहे. त्या कवितेची ही सुरुवात पहा –

तुझ्या नसण्याला सावलीप्रमाणं

सोबत घेऊन चालते मी

तेव्हा कणाकणानं

विरून जात असतं

माझं असणंही

मात्र मिटू देत नाही मी

तुझं नसणं ...

या संग्रहातल्या खूप कविता आशय-समृद्ध आहेत. मराठीतला हा एक अद्वितीय कविता संग्रह आहे.

--- ००० ---

आर्वीकर : खानोलकर काय विशेष साधतात?

सारंग : खानोलकर आधुनिक लेखक तर होतेच, शिवाय अत्यंत संवेदनाक्षम होते. त्यांच्या 'अजगर' या कादंबरीचा अजूनही नीटसा अर्थ आपण लावू शकलेलो नाही. कॉन्शसच्या पलीकडचं काहीतरी त्यात आहे. मराठीत असं लेखन सर्वसाधारणपणे नाही.

आर्वीकर : खानोलकरांबद्दल असंही बोललं जातं की त्यांच्या कलाकृतींमधील आशयाला पेलू शकेल अशी बौद्धिक शिस्त-कुवत त्यांच्यात नव्हती- व्यक्तिश: मला त्यांचं 'एक शून्य बाजीराव' तर ग्रेट वाटतं.

सारंग : हो, हो, खरं आहे. आजवरची सगळी युद्धं या काठीबरोबरच झाली होती. याच्यापेक्षा आणखी 'इंटेलेक्च्युअल' काय असणार? कुठल्याही मराठी लेखकानं यातलं दहा टक्केसुद्धा केलेलं नाही.

त्यांच्या लेखनामध्ये अर्थांचे अनेक स्तर (मल्टिपल लेव्हल्स) असायचे. मराठी लेखक बरेच 'कॅलक्युलेटेड' लेखन करतात. खानोलकर तसे नव्हते. म्हणूनच काही वेळेला त्यांचं लेखन समाधानकारक नसतं. कारण त्यांचा जो मोठा प्रयत्न असतो, त्याचं नीटसं लेखनांतर्गत व्यवस्थापन ते करू शकत नव्हते.

आर्वीकर : म्हणजे असं तुम्ही सुचवताय की अनेकजण ज्या वाटेनं गेलेही नाही, त्या वाटेवरचं काहीतरी खानोलकर शोधत होते?

सारंग : हो आणि बरेचदा ते त्यांनाही समजायचं नाही की यातून आपण काय साधतोय. काही अंशी हे शेक्सपियरसारखं आहे. त्यानं केलेल्या सगळ्या गोष्टी त्याला स्वतःला कळल्या नव्हत्या.

----- ' सोलेदादशी प्रदीर्घ संवाद ' -- पान २९.

निस्सीम एझिकिएल

या विचारवंत कवीची जन्मशताब्दी १६ डिसेंबरला सुरू झाली. ते भारतीय पर्यावरणातले इंग्रजी कवी होते. १९५२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या पहिल्या कवितासंग्रहाचे नाव ' टाइम टु चेंज ' असे होते. त्या संग्रहाने त्यांनी गद्यप्राय मुक्तछंदाला प्रतिष्ठा मिळवून दिली असे डॉ. गजानन मालोकार, त्यांच्या आज दि. २६-१२-२४ च्या पुणे मटा मध्ये आलेल्या लेखात म्हणतात. मराठीत अजूनही हा विषय अत्यंत गांभीर्याने चघळण्याचा आहे, हे आपण पाहातोच. याच विषयावर एझिकिएल यांचा १९७१ च्या ' स्पॅन ' मासिकात ' अमेरिकन पोएट्री इन द सिक्स्टीज ' हा एक लेख आलेला होता – ज्याचा उल्लेख मी माझ्या, ' कवितेतील अ-भाव ' या सत्यकथेत आलेल्या लेखात केला होता. पुण्यात त्यांचे, ' ॲब्सर्ड ड्रामा ' या विषयावर झालेले व्याख्यान मी ऐकले होते. त्यातले अत्यंत महत्त्वाचे, माझ्या लक्षात राहिलेले वाक्य होते, ' देअर इज नो मेसेज ! ' ॲब्सर्ड नाटके कोणताही संदेश वा बोध देत नाहीत – हा मुद्दा त्यांनी मांडला होता.

त्यांच्या स्मृतीस अभिवादन !

--- ००० ---

उधळपट्टी

प्रायोगिक नाटकांसाठी कधी वर्गणी काढली असेल तेवढीच. बाकी म्हणजे काही वर्षे दारूवर झालेला खर्च. ना ट्रिपा मारणे ना परदेश पाहण्याची हौस ना ताजमहाल ना काश्मीर. उधळपट्टी म्हणावी असे फारसे काही केले नाही. वाचन आणि लेखन यांवर वेळेची आणि शक्तीची उधळपट्टी मात्र केली. पण ती काही आर्थिक नाही म्हणता येणार. ती आता करत आहे. स्वत:चीच पुस्तके स्वत:च काढून. एखादा प्रकाशक तयारही झाला असता या कामाला, पण, एकेका पुस्तकाला त्याने किमान सहा सहा महिने तरी लावले असते. मला मी आजवर लिहिलेले, किरकोळ दुरुस्त्यांसह अंतिम करून ते लौकरात लौकर पुस्तक रूपात आणायचे होते. म्हणून ही सर्व जबाबदारी मीच उचलायचे ठरवले. यात अनेकांची साथ मिळत गेली. तर यासाठी होणाऱ्या खर्चाला उधळपट्टी म्हणता येईल. हे सर्व कुणाला हवे आहे का, कुणी वाचणार आहे का आणि कुणी हे वाचावे तरी का – अशा कोणत्याच प्रश्नांची सर्वमान्य अशी उत्तरे नसताना मी ही कामे करत आहे. आता, हे तरी करायची काय गरज होती, हा प्रश्न आहेच ! मराठीत काही आनंदयात्री असतात तसा समजा मी एक निरर्थतायात्री (खरे तर मी कोणतेच लेबल स्वीकारत नाही) आहे – मग तर याची अजिबातच गरज नव्हती. हे तर स्वत:लाच खोडून काढणे झाले ! यावर एक कामचलावू उत्तर डोक्यात ठेवलेले आहे, ते असे – लेखन सगळे नुसते निरर्थकतायुक्त होते म्हणण्यापेक्षा निरर्थकच होते, असे समजू. त्याचे www.champralekhan.com हे संकेतस्थळ काढायचाही निरर्थकपणा केला तर

आता हे सर्व पुस्तक रूपात आणून तो निरर्थकपणा पूर्णच का करू नये ? हे तरी बरोबर आणि खरे आहे का, कोण जाणे. काय असेल ते असो. ही पुस्तके काढायचे काम वेगात पूर्ण करणार आहे ! मग एखाद्या मुलाखतीत मी म्हणेन की मनात होता तो सर्व निरर्थकपणा पूर्ण केल्याने आता मी तृप्त आहे, समाधानी आहे, वगैरे ! सारांश म्हणजे लौकरच येत आहे पुढील कवितासंग्रह –' इटालियन जॉब चा शेवट ' (या अभिजात मराठीची क्षमा मागून, अर्थात --)

--- 000 ---

कै. नरेंद्र चपळगावकर सर

सरांच्या स्मृतीला नमन करून त्यांची एक आठवण --

साहित्य आणि कला हे क्षेत्र पूर्णपणे सामाजिक-राजकीय भूमिकांनी व्यापलेले असायला हवे या सतत कानीकपाळी आपटल्या जाणाऱ्या मूर्ख अपेक्षेला कंटाळून मी ' कलेचे सैनिकीकरण ' हा लेख लिहिला होता आणि तो लोकसत्तेत छापून आला होता. तो आवडल्यामुळे सरांनी कुठून तरी माझा नंबर मिळवून मला फोन केला होता. सुमारे अर्धा तास ते फोनवर माझ्याशी बोलले होते. मला ते खूप विशेष वाटले. नंतर तोच लेख जरा सविस्तर लिहून आपला मित्र मंगेश नारायणराव काळे याच्याकडे मी दिला. त्याने तो ' खेळ ' या नियतकालिकात छापला होता.

सरांच्या स्मृतीला पुन्हा एकदा नमन

--- ० ---

मोझार्टचे रेक्वियम

-- कवितासंग्रह – गणेश कनाटे – वर्णमुद्रा प्रकाशन.

' असलाच तर हा प्रश्न आहे ' या कवितेतल्या खालील ओळी बघा –

प्रेषित नसलो तरी काय झाले
आपण बोलत राहायला पाहिजे
आपलं कुणीच ऐकत नाही
म्हणून काय बोलणंच सोडायचं ?
-- असलाच तर हा प्रश्न आहे

--- मराठीत हा प्रश्न अनेक कवींना आहे, हे आपण जाणतोच. सामाजिक-राजकीय भूमिका घेऊन लिहिणारे कवी, सामान्यत: बोधप्रद लिहिणारे कवी आणि रोमँटिक मनोरंजन करणारे कवी – हे सोडले तर इतर सर्वच कवींना हा प्रश्न पडू शकतो. वाचणार कोण ? भय आणि मृत्यू हे मानवी जगण्यातले महत्त्वाचे प्रश्न आहेत, असा प्रास्ताविकात उल्लेख आहे. या प्रश्नांना, माहीत असणारी कोणतीही वैचारिक उत्तरे देऊन उपयोग नसतो, तसे त्यांचे निराकरण होत नाही. प्रत्येक वेळी

नव्याने शोध घेण्याचे हे विषय असतात, इतकेच नव्हे तर, हे कधीच न संपणारे विषय असतात. अशा खोलात जाणाऱ्या कविता वाचणार कोण, हा प्रश्न मराठीत. भाषा तेवढी तगल्यास, अजून पाचशे वर्षे तसाच राहील, असे दिसते आहे. ते काहीही असो, मराठी कवितेच्या रटाळ मर्यादांतून ही कविता बाहेर पडू इच्छिते म्हणून तिचे स्वागत करायला हवे. तरीही, या कवितांत अनेक ठिकाणी, ' चांगली कविता ' कशी असायला हवी याबाबतची कवीची वैचारिकता कविता लेखनाच्या प्रक्रियेवर आक्रमण करताना दिसते. तसे घडते तेव्हा ती ती कविता तिची सर्जकता गमावून बसते, हे इथे नोंदवायला हवे. मला आवडलेल्या, या संग्रहातल्या कविता खालीलप्रमाणे आहेत –

हा रस्ता माझ्या पायांत गुंतून तर जाणार नाही ? (पान ३२)

एका अर्ध्यामुर्ध्या माणसाची सोबत (पान ३४)

न्यायनिवाडा, शिक्षा आणि प्रार्थना (पान ७८)

भीती वाटते (पान ९०)

कवितांची मोठमोठी शीर्षके नावीन्यपूर्ण वाटतात.

या कविता कोणत्याही परिवर्तनासाठी, नैतिक तत्त्वे प्रस्थापित करण्यासाठी वा फडजिंकू करमणुकीसाठी लिहिलेल्या नाहीत. या अर्थाने या मानवी जगण्याच्या कविता आहेत.

कविता लिहिताना या कवीमधला समीक्षक शांत राहिला तर या कवीकडून खूपच मौल्यवान कविता येत राहतील, असे वाटते.

चंद्रमोहन कुलकर्णी यांचे मुखपृष्ठ उत्तम !

--- ००० ---

मागल्या आठवड्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नामदेव सभागृहात "खेळ खल्लास" पुस्तकाचा प्रकाशन समारंभ झाला. (याआधी डिसेंबरमध्ये पुणे पुस्तक महोत्सवात बुक लाँच झाले होते.) विद्यापीठाच्या ललित कला केंद्राचे विभाग प्रमुख आणि माझे मित्र प्रवीण भोळे यांनी अगदी अगत्य पूर्वक कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रकाशनाआधी ललित कला केंद्राच्या काही विद्यार्थ्यांनी नाटकातल्या निवडक भागाचे समरसून अभिवाचन केले. पुस्तक प्रकाशन देखील या विद्यार्थ्यांच्याच हस्ते करायचे आम्ही आधीच ठरवले होते. त्यामुळेच या विद्यार्थ्यांच्याच हस्ते प्रकाशन झाले. अभिवाचनात मित्रवर्य प्रवीण भोळेने लिहिलेल्या दीर्घ प्रस्तावनेचा आणि आदरणीय चंप्र देशपांडेंनी लिहिलेल्या ब्लर्बचा भाग देखील समाविष्ट केल्याने नाट्य आकलन सुलभ झाले.

(गिरीश रांगणेकर)

गिरीश पतके

'कनक रंगवाचा' या नाट्यविश्वाला वाहिलेल्या नियतकालिकाच्या २०२४च्या दिवाळी अंकाला सर्वोत्कृष्ट दिवाळी अंकाचा सन्मान मिळाल्याची बातमी आपण नुकतीच वाचली असेल.

याच 'रंगवाचा'चा फेब्रुवारी २०२५चा ताजा अंक आत्ताच मिळाला. हा अंक या नियतकालिकाचा नवव्या वर्षातला पहिला अंक असून आजवर नाट्यक्षेत्रातील अनेक नामवंत या नियतकालिकामधून लिहिते झालेले आहेत. हा अंकदेखील त्याला अपवाद नाही.

अशी नियतकाालिके चालवणे, त्यामध्ये चांगला मजकूर यावा यासाठी प्रयत्नशील राहणाऱ्या व्यक्तींना वाचकांनीदेखील सहकार्य करणे गरजेचे असते. हे नियतकालिक टिकावे, वाढावे यासाठी जिज्ञासू वाचकांनी, नाट्यकर्मींनी या नियतकालिकाचे पालकत्व जरूर स्वीकारावे.

या अंकात ज्येष्ठ नाटककार, कवी चं. प्र. देशपांडे यांच्या एकांकिका व काही नाटके यांवर मी लिहिलेल्या 'समग्र भानाची शहाणीव देणारे नाटककार - चं. प्र. देशपांडे' या प्रदीर्घ लेखाचा तिसरा आणि शेवटचा भाग देखील प्रकाशित झाला आहे. इच्छा असल्यास जरूर वाचा. आपल्या प्रतिक्रिया मिळाल्या तर आनंद आहेच.

गिरीश पतके ---

द ट्रायल -

काफ्काच्या या जगविख्यात कादंबरीवर चंप्रंनी त्याच नावाचे नाटक लिहिले आहे. त्याबाबत थोडेसे...

जयेश के ला त्याच्या तिसाव्या वाढदिवशी सकाळीच अनपेक्षितपणे कोणतेही कारण न देता अटक झालीये. पण तो त्याची सगळी दैनंदिन कामे करू शकणार आहे. आपणाला झालेली ही अटक बेकायदेशीर असून त्याविरोधात न्याय मागणे हा आपला अधिकार आहे असे म्हणणारा के न्यायालयाच्या दरवाजावर धडका मारतो आणि शेवटी त्यातून आलेल्या सगळ्या निराशाजनक अनुभवातून आपण जन्माला येणे हीच अटक आहे या निष्कर्षाप्रत पोहोचणारा जयेश के हा या विखंडित काळातला न-नायक आहे.

इन्स्पेक्टर - तुला अटक झालीय एवढंच, आहे काय त्यात - तुला याची माहिती द्यायचं काम माझ्याकडे होतं, तर ते मी केलंय -- तुझी शेरेबाजी आणि मतंही ऐकलीयत- काही का असेना, सध्या एवढं पुरेसं आहे आणि इथं आपण एकमेकांचा निरोप घेऊ शकतो, तू तुझ्या कामावरही जाऊ शकतोस -

के - मला जर अटक झालीय तर मग मी बँकेत कसा जाणार?

इन्स्पेक्टर - तुझ्या लक्षातच येत नाहीय अटक झालीय याचा अर्थ, तुझ्या रोजच्या दिनक्रमाला तुझ्या कामांना अडथळा येणाराय असं कुठाय?

के - म्हणजे अटक होणं हे काही फारसं वाईट नाहीय तर?

इन्स्पेक्टर - कोण म्हणतं तसं आहे म्हणून?

के - मग, आता मला सांगा. काही फरकच पडणार नाहीय तर मला सांगायची तरी काय गरज होती?

इन्स्पेक्टर - ती माझी ड्यूटी आहे!

के - गधडेपणाची ड्युटी ! (पृ. ३०३-३०४)

जयेश के ला अटक नेमकी का झाली आहे? त्याचा काय गुन्हा आहे, ही अटक खरंच झालीये, की ते त्याच्या मनाचे खेळ आहेत. ही कसली अटक आहे, ती केवळ त्याचीच आहे का या जगातील सगळ्यांचीच आहे? फक्त के ला त्याची जाणीव झाली आहे व इतरांना तशी जाणीव नाही असे काही आहे का...असे अनेक मूलभूत प्रश्न यातून समोर येतात.

या अटकेविरुद्ध दाद मागण्यासाठी प्रत्येकाला एक दरवाजा असतो आणि त्या दरवाज्यातून प्रवेश करून आपल्या प्रश्नांची उत्तरे मिळवायची असतात. फक्त एकच अडचण म्हणजे या दरवाजावरील राखणदारांच्या अडथळ्यांवर प्रत्येकास मात करावी लागते. तो दरवाजा समग्रावधानाचे रूपक वा प्रतिक आहे. हा दरवाजा दैनंदिन समस्यांच्या निराकरणाचा आहे की मानसिक-आध्यात्मिक प्रश्नांच्या निराकरणाचा? याबाबत प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन वेगवेगळा असू शकतो. मात्र अशा विविध 'मी' युक्त दृष्टिकोनांचा उपयोग होत नसल्याने अनेकजण त्या दरवाजापर्यंत जाऊनही त्या पलीकडील सकल्याचा प्रदेश अनुभवू शकत नाहीत. दैनंदिन समस्यांवरील वा मानसिक-आध्यात्मिक प्रश्नांवर उपाय शोधण्यासाठी बाहेरून मिळणाऱ्या मदतीचा फारसा उपयोग होत नसतो. त्यासाठी 'स्व'चे साकल्याने आकलन होण्याची गरज असते, स्वतःच्या मीपणाचे अस्तित्व नाकारण्यातूनच साकल्यपूर्ण समग्र भानाची प्रक्रिया सुरू होत असते. सार्त्र या 'स्व'लोपालाच नथिंगनेस म्हणतो.

या कलाकृतीतील के खेरीजची इतर पात्रे व प्रसंग खरोखरच अस्तित्वात आहेत, की त्या के च्या मनातील भासयुक्त विविध प्रतिमा आहेत यादृष्टीनेही विचार करता येऊ शकतो. ही सगळीच पात्रे विशिष्ट चौकटीत अडकलेली व मिडिऑकर असल्याचे लक्षात येते. त्यांचे असे स्वरूप मानवी जगण्यातील, आजूबाजूच्या भवतालाची निरर्थकता, असंगतता, विदीर्णता आणि अराजकता व्यक्त करते. विदीर्णता पूर्वी नव्हती आणि आताच आहे, असे नसून आता प्रमाणाने ती फारच प्रचंड असून ती दर सेकंदाला जाणवते हे आजच्या जगण्याचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. मनाच्या विषयांची संख्या प्रचंड वाढणे हे त्याचे कारण आहे.

--- ० ---

11-03-25